खंड
नऊ

## होळकर रियासत

# काव्यायन

संपादक
डॉ. देवीदास पोटे



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

खंड नऊ

# होळकर रियासत
# काव्यायन

सुधारित आवृत्तीचे संपादक

डॉ. देवीदास पोटे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

➢ **पुस्तकाचे नाव** : खंड नऊ : होळकर रियासत : काव्यायन

भाग : एक ते तीन

भाग एक : सुभेदार थोरले मल्हारराव यांजवरील काव्य

भाग दोन : देवी अहिल्याबाई होळकर यांजवरील काव्य

भाग तीन : स्वातंत्र्यवीर यशवंतराव होळकर यांजवरील काव्य

Volume Nine : Holkar Riyasat : Kavyayan

Part One : Subhedar Thorle Malharrao Yanjvaril Kavya

Part Two : Devi Ahilyabai Holkar Yanjvaril Kavya

Part Three : Swatantryaveer Yashwantrao Holkar Yanjvaril Kavya

➢ **पहिल्या आणि दुसऱ्या आवृत्तीचे संपादक** : डॉ. देवीदास पोटे

➢ **प्रथमावृत्ती** : २०१४

➢ **दुसरी सुधारित आवृत्ती** : २०२२

➢ **आयएसबीएन** : ९७८-९३-९३५९९-१८-६

➢ **प्रकाशक** :

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

➢ © **प्रकाशकाधीन** :

➢ **मुखपृष्ठ** : सतीश भावसार

➢ **मुद्रक** :

व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
मुंबई ४०० ००४.

➢ **किंमत** : रुपये २४०.००

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः त्या त्या कवींची वा संपादकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# अध्यक्षांचे मनोगत

छत्रपती शिवरायांनी हिंदवी स्वराज्याचे तोरण उभारले. लोककल्याणाचा आदर्श घालून दिलेल्या या राजाच्या लढवय्या शिलेदार-मावळ्यांनी पुढे अटकेपार स्वराज्याचा विस्तार केला. त्यात होते महाराजांचे मराठी सरदार शिंदे, घोरपडे, निंबाळकर, दाभाडे, गायकवाड आणि इंदूरचे होळकर. या होळकरशाहीचा इतिहास हा आधुनिक भारताच्या इतिहासातील एक महत्त्वाचा कालखंड होता. होळकर रियासत हे अखिल मराठेशाहीचे एक महत्त्वाचे अंग आणि आधारस्तंभ होते. होळकरशाहीत मल्हारराव होळकर आणि अहिल्याबाई होळकर यांचे कार्य ऐतिहासिक महत्त्वाचे होते. त्यात अहिल्याबाईंचा शासनकाळ हा तर होळकरशाहीचा सुवर्णकाळच मानला जातो.

सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेल्या अहिल्याबाई एका वैभवशाली होळकर राज्याच्या स्वामिनी बनल्या. त्या शूर लढवय्या, चांगल्या रणनीतीज्ञ आणि न्यायवृत्तीच्या होत्या. त्यांच्या जीवनात आलेली अनेक संकटे, दुःखाला त्यांना सामोरे जावे लागले; पण प्रजेच्या कल्याणात आणि सेवेतच आपला मोक्ष आहे, हे ओळखून त्यांनी आयुष्यभर जनहिताची असंख्य कामे केली. अन्यायाची त्यांना चीड होती. त्यांनी धर्माचरण आणि राजकारणाची सुयोग्य सांगड घातली. कर्तव्यनिष्ठा, धर्मनिरपेक्षता; तसेच त्या केवळ राजमाता न राहता पुण्यश्लोक लोकमाता ठरल्या. अत्यंत साधे निर्मळ जीवन आणि पराकोटीचे दातृत्व ही त्यांची जगावेगळी ओळख होती. काश्मीर ते कन्याकुमारी अन् द्वारका ते पूर्वेकडच्या देशभरातील अनेक मंदिरं, तीर्थस्थळं, नदीकाठ, धर्मशाळा, पिण्याच्या पाण्याचे हौद, विहीर-बारवा त्यांनी बांधल्या. जगावेगळ्या दानशूरत्वाने देशभरात आपला कायमस्वरूपाचा ठसा

उमटविणाऱ्या त्या एकमेव महाराणी आहेत. या देशात अनेक राजेरजवाड्यांनी आपापल्या राज्यात लोकोपयोगी कामे केली आहेत, हा इतिहास आहे; पण स्वतःच्या राज्याबाहेर देशभर जनसेवेची पाणपोही उभारणाऱ्या एकमेव अहिल्याबाईच होत्या. हिंदुस्थानच्या अनेक राजघराण्याच्या इतिहासात जनकल्याणाची कामे केल्याचा इतिहास बघायला मिळतो; पण आपल्या राज्याबाहेर सर्व जाती-धर्मांच्या स्थळांच्या जीर्णोद्धारासाठी मदत केलेल्या अहिल्याबाईच दिसून येतात.

इंदूरच्या होळकर घराण्याचे मल्हारराव होळकर संस्थापक होते. त्यानंतर अहिल्याबाईंचा सुवर्णकाळ येतो. त्यांच्यानंतर यशवंतराव होळकरांनी हा वारसा सांभाळला. हा इ. स. १६९३ पासूनचा दोनशे वर्षांचा इतिहास आहे. भारताच्या इतिहासातील होळकरशाहीचा इतिहास आमचा एक सांस्कृतिक वारसा आहे. तो एकत्रित स्वरूपात पुनर्प्रकाशित करावा यासाठी आमचे मित्र डॉ. देवीदास पोटे हे प्रयत्न करत आहेत, ही गोष्ट माहीत असल्याने हे काम करण्याची संधी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास द्या, अशी विनंती मी त्यांना केली. आणि त्यांनी ती स्वीकारून होळकरशाहीचा समग्र इतिहास प्रकल्पासाठी रात्रंदिवस झोकून देऊन काम केले. माणसाने ठरविले आणि नियोजनपूर्वक ध्यास घेतला की, ते काम वेळीच पूर्ण होऊ शकते, हा अनुभव डॉ. देवीदास पोटे यांच्या कामातून दिसून आला. केवळ दीड वर्षात एकहाती दहा खंड करणे, हे अवघड नाही, हे त्यांनी दहा खंडांच्या सुमारे पाच हजार पानांच्या या बृहद प्रकल्पातून दाखवून दिले आहे.

या समग्र इतिहासाचे प्रकाशन साहित्य आणि संस्कृती मंडळाचा अध्यक्ष म्हणून माझ्या काळात होत असलेले दुसरे महत्त्वाचे काम आहे. असेच पहिले मोठे काम म्हणजे महाराष्ट्राचे वाङ्मयमहर्षी गुरुवर्य केळूसकर यांचे बारा खंड तयार झाले आहेत. होळकरशाहीचा समग्र इतिहास प्रकल्पात पूर्वप्रकाशित खंडांचे लेखक-प्रकाशक आणि दूरदृष्टी दानशूर अहिल्याबाईंच्या अनोख्या पर्वाची ओळख होणार आहे.

मुद्रणकलेचा शोध लागण्यापूर्वी हजारो वर्षांपासून आपल्याकडे सुरुवातीस मौखिक परंपरा होती. यात बोलणे आणि ऐकणे या दोन प्रक्रिया माणसाच्या जगण्यातल्या महत्त्वाच्या बाबी ठरल्या. माणूस जसजसा प्रगत होत गेला तसतसा आजूबाजूचे निरीक्षण बोलण्यातून व्यक्त करू लागला. कथा-गाण्यांतून तो आविष्कार होऊ लागला. पुढे अक्षरांना आकार देऊन लिपी विकसित होऊन लिखित परंपरा वाढली. पुढे मुद्रणकलेचा शोध लागल्याने कथा, काव्यास छापील स्वरूपात स्थान मिळाले. तरीही मौखिक परंपरेतील गीत, अभंग, पुराणकथा, पोवाडे, भारूड या काव्यप्रकारांतून व्यक्तीनिहाय काव्य-इतिहास लेखनाची परंपरा लोकप्रिय होती. वाचनापेक्षा श्रवण सहज आणि मनोरंजन-प्रबोधनाचे काम होत गेल्याने इतिहासलिपीचे युगपुरुषांचे चरित्र काव्यग्रंथांतून शाहीर, कवी अन् पंडितांनी मांडलेले आहे. होळकर रियासतीचा नववा खंड अशाच काव्यदर्शनाचा आहे.

मल्हारराव, यशवंतराव आणि अहिल्याबाई या होळकर रियासतीतील महत्त्वाचे खांब आहेत. या युगपुरुषांच्या कर्तृत्वाच्या विविध पैलूंचे दर्शन, पराक्रमाचे पोवाडे शाहिरांनी गायिले आहे. कवींनी काव्यातून या आदर्श व्यक्तींच्या गौरवाचे गीते लिहिली आहेत. अशा कविता, गाणी, पोवाडे, पद्य चरित्रे, पाळणे, दीर्घकाव्ये या विविध काव्यप्रकारांचा समावेश संपादक डॉ. देवीदास पोटे यांनी या खंडात केला आहे. मराठी भाषेतील काव्यासोबत इंग्रजी कवयित्री जोना बेली यांचे अहिल्याबाईच्या कर्तृत्वाचे वर्णन करणारे सातशे ओळींचे दीर्घकाव्य यातील विशेष आहे. हा सगळा खजिना वाचकांना उपलब्ध करून देताना महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास खूप आनंद होत आहे. आमचे मित्र डॉ. देवीदास पोटे यांच्या अथक परिश्रमामुळेच हे काम होऊ शकले, त्यामुळे त्यांचे आभार.

मुंबई, दि. २५ ऑक्टोबर २०१८

**बाबा भांड**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई

# प्रस्तावना

भारतीय मध्य इतिहासाच्या काळात मराठेशाहीचा कालखंड अतिशय महत्त्वाचा आहे. मराठेशाहीच्या पायाभरणीत ज्या शूर योध्यांचे योगदान आहे. त्यात एक महत्त्वाचे नाव आहे मल्हारराव होळकर. सुभेदार मल्हारराव होळकर हे इंदूरच्या होळकरशाहीचे संस्थापक होते. ते मराठेशाहीचे आधारस्तंभ होते. होळकरशाही ही मराठेशाहीचेच एक अंग होती. मल्हाररावांचे अवघे आयुष्य युद्ध, मोहिमा आणि अखंड घोडदौड यात गेले. त्यांनी आपल्या आयुष्यात बावन्न लढाया लढल्या आणि त्या सर्व लढायांत त्यांनी विजयश्री मिळविली. मल्हारराव हे शौर्याचे मूर्तिमंत प्रतीक होते. हिंदुस्थानात 'मल्हार आया' असे म्हटले की भल्याभल्या शत्रूंची गाळण उडत असे. दिल्लीवर मराठ्यांनी आपला ध्वज फडकावला वा अटकेपर्यंत मजल मारली, या सर्व यशात मल्हाररावांचा मोलाचा वाटा होता. थोरले बाजीराव आणि मल्हारराव यांच्या अतूट अनुबंधाने मराठेशाहीचा पाया बुलंद झाला, हे ऐतिहासिक सत्य आहे. या 'काव्यायनात' मल्हारराव होळकर, अहिल्याबाई होळकर आणि यशवंतराव होळकर या होळकर रियासतीतील प्रमुख राज्यकर्त्यांच्या पराक्रमाचे नि कार्य-कर्तृत्वाचे वर्णन करणारे पोवाडे आहेत.

२

मल्हाररावांवरील पोवाड्यात शाहीर देवकीनंदन सारस्वत यांनी म्हटले आहे,

धन्य धन्य वीर बहादुर। मल्हारराव होळकर
इन्दूरचे थोर सुभेदार जी जी जी।।

मराठा सत्तेची शान
गुणांची जणु ही खाण
शत्रूंची उडवी दाणादाण
मनी सदा कर्तव्याचे भान जी जी जी ।।

इंदुरला राज्य वसविले
सुनेला शिक्षण दिले
स्त्रीत्वाला सन्मानित केले
जगामध्ये कीर्तिमान झाले जी जी जी ।।

शिवरायांचा घेऊन वारसा
गनिमी कावा, युद्धाचा ठसा
प्रजापालन राज्याचा वसा
''मल्हार आया'' ऐकुन शत्रूचा गाशा जी जी जी

पेशव्यांच्या गादीसी मान
मूर्तिमंत उरी अभिमान
लढवय्या ठसा महान
तळपते असे शौर्य रामबाण जी जी जी ।।

अबलेला कराया सबला
खासगीचा हक्क दिधला
आदर्श नवा ठसविला
होळकरशाहीचा जयजयकार झाला जी जी जी ।।

असा योद्धा होणे नाही
असा पोशिंदा होणे नाही
मल्हारीही प्रसन्न लवलाही
इतिहास मिरवितो कर्तृत्वाची द्वाही जी जी जी ।।

श्री. अण्णाजी पांडुरंग जोशी करकंबकर यांचे नऊ भागातील १०८ कडव्यांचे काव्य हे मल्हाररावांच्या आयुष्यातील सर्व घटना, त्यांचे चरित्र, चारित्र्य आणि कर्तृत्व यांचा सखोल आढावा घेणारे आहे. शेवटच्या समाप्तीच्या चार ओळी आर्या वृत्तात असून काव्यसमाप्तीची तिथी आणि कवीचे नाव त्यात गुंफले आहे.

काव्याच्या प्रारंभी कवी श्री. अण्णाजी पांडुरंग जोशी यांची प्रस्तावना आहे. या ग्रंथाला पुण्याच्या दक्षिणा प्राईस कमिटीचे २०० रुपये बक्षीस मिळाल्याचा त्यात उल्लेख

आहे. हे काव्य श्रीमंत शिवाजीराव होळकर (इ. स. १८८६-१९०२) यांच्या कारकिर्दीत शासकीय खर्चाने छापून प्रसिद्ध करण्यात आले.

एकनाथशास्त्री जोशी यांचे दिलेले अल्पचरित्रही मनोवेधक आहे. त्यांचा जन्म सन १८५०चा. त्यांना लेखनाचा आणि कविता करण्याचा छंद होता. ते शीघ्रकवी होते. त्यांनी श्रीमंत तुकोजीराव होळकर यांच्यावर एक श्लोक लिहिला. तो पाहून श्रीमंत शिवाजीरावांनी त्यांना शेलापागोटे इनाम दिले होते. तो श्लोक असा :

मालवपालक रक्षि प्रजा द्विज सेवि शिवा शिव नित्य मनानें।
दुष्ट जनावरि रुष्ट सदोदित शिष्ट जनावरि तुष्ट मुदानें।।
वीरजनामधिं शूरचि तद्रिपु बोलति यासह युद्ध नकोजी।
हाचि वसो चिर इंदूर पत्तनीं होळकर प्रभुराव तुकोजी।।

वयाच्या ३३व्या वर्षी क्षयरोगाने त्यांचा मृत्यू झाला. आजारपणात अंथरुणावर पडल्या पडल्या त्यांनी वडिलांच्या सांगण्यावरून आपले कुलस्वामी खंडोबा यांच्या स्तुतीपर एक आर्या रचली. वडिलांनी ती लिहून घेतली ती आर्या अशीः

कल्पद्रुम मल्हारी भक्तांची सर्व संकटें वारी।।
भारी थोर जगामधिं तारी संसार म्हाळसाधारी।।

काव्याचा प्रारंभी भाग १ ते ९ मधील कथानकाचा सारांश थोडक्यात दिला आहे. यामुळे काव्याच्या अभ्यासाच्या आणि आकलनाच्या दृष्टीने तो अतिशय उपयुक्त ठरला आहे. अशा प्रकारे प्रत्येक भागानुसार काव्याचा सारांश देणे हे या काव्याचे विलोभनीय वैशिष्ट्य आहे.

मल्हाररावांचे हे कार्य पुढे चालविले ते त्यांनी घडविलेल्या अहिल्याबाई नावाच्या अद्वितीय व्यक्तिमत्त्वाने. जगाच्या आणि भारताच्या इतिहासात पराक्रमी स्त्रिया अगदी थोड्याच झाल्याचे आढळते. भारतातील राणी लक्ष्मीबाई, राणी चेन्नम्मा, चांदबिबी अशा काही बिजलीप्रमाणे चमकून गेलेल्या स्त्रियांची नावे आदराने घेतली जातात. या मोजक्या महाराण्यांमध्ये अहिल्याबाईंचा इतिहास आपल्या वेगळेपणाने आपल्या नजरेत भरतो.

*''निष्कामता निजदृष्टी। अनंत पुण्ये कोट्यानुकोटी।।''* असे संत एकनाथांनी पुण्यकर्माबाबत म्हटले आहे. शुद्ध, उत्तम, असाधारण आणि निष्काम असे पुण्याचे चार प्रकार आहेत. अहिल्याबाईंनी ही चारही प्रकारची पुण्ये जोडली आणि 'पुण्यश्लोक' ही महान पदवी सार्थ केली. आधी केले मग नाव झाले, असा हा मौनरूप कर्मयोगाचा प्रवास आहे !

*'पुण्य फळले बहुतां दिवसा।*
*भाग्य उदयाचा ठसा।।'*

संत तुकारामांनी सांगितलेले हे पुण्याचे रहस्य अहिल्याबाईंच्या सत्तर वर्षांच्या जीवनप्रवासात ठायीठायी उलगडत जाते.

जीवन हे उदात्त, पवित्र आणि साधे असावे. त्याचा आधार भोग किंवा उपभोग नसावा. जीवनाची भाषा परस्परांच्या सोयीकरीता स्वीकारलेली भाषा असते. महत्त्वाकांक्षा, अपेक्षा आणि सौहार्द यासाठी मोठी माणसे इतरांना निरपेक्षपणे मदत करतात, दानधर्म करतात, शिवाय समाजकार्यसुद्धा करतात. कीर्ती, प्रतिष्ठा, लौकिक, प्रसिद्धी अथवा 'वाहव्वा' मिळविण्यासाठी अशा व्यक्ती ही कामे करीत नाहीत, तर मानवतेच्या आणि ईश्वरी शक्तीच्या अथांग श्रद्धेने ती कार्य करीत असतात. त्यांना कुणाच्या स्तुतीची अपेक्षा नसते. खराखुरा आनंद कसा मिळवावा याचे रहस्य त्यांच्या आध्यात्मिक वृत्तीत दडलेले असते. अहिल्यादेवींचा विचार करताना हे सारे चिंतन होत जाते आणि त्यांचे श्रेष्ठत्व सिद्ध करण्यास शब्द खुजे वाटतात. काहीही न बोलता नम्रपणे माथा टेकवावा आणि धन्य धन्य व्हावे, एवढी एकच भावना मनात उरते.

भगवान श्रीकृष्णाने 'भगवद्‌गीते'त सत्त्वगुणांची जी महती गायिली आहे, तिचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे अहिल्यादेवी. राजराणी असूनही राजयोगिनी ठरलेली ही राजमाता प्रतिभावंतांच्या महाकाव्याचा विषय व्हावी, यात नवल ते काय? कर्मफळात आस न ठेवता, सत्कर्मात रत होऊन, चांगले आचरणे करणे अतिशय कठीण असते. तेही हेतुशून्य भावनेने करणे तर केवळ अशक्यच! परंतु 'ईश्वरार्पण भावा'ने जगण्याचा आदर्श त्यांनी घालून दिला आणि आयुष्याचे सार्थक केले. होळकर घराण्याच्या इतिहासाबरोबरच राज्यशास्त्र, नीतिशास्त्र, अध्यात्मविद्या, ज्ञानश्रद्धा, परस्पर नातेसंबंध, धर्मशास्त्र, देशप्रेम, स्वाभिमान आणि देशभक्ती अशा अनेक विषयांच्या अनुषंगाने अहिल्याबाईंच्या चरित्रावर प्रकाशझोत टाकताना आपण अहिल्याबाईंच्या बहुविध कर्तृत्वाने थक्क होतो.

३

कविता वा गीतांपेक्षा पोवाडा हा काव्यप्रकार वेगळा आहे.

पराक्रमी वा कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वाच्या पराक्रमाचे, शौर्याचे, गुणांचे वा कर्तृत्वाचे काव्यात्मक वर्णन पोवाड्यातून केले जाते. हे एक स्तुतिस्तोत्र वा प्रशस्ती असते. पोवाडा हा व्यासपीठावरून सादर केला जाणारा लोकसंगीताचा प्रकार आहे.

याला पवाडा असेही म्हणतात. महाराष्ट्र शब्दकोशात पोवाडा शब्दाचा अर्थ दिला आहे. संस्कृत भाषेतील प्र+वद् = स्तुती करणे या धातूपासून पोवाडा या शब्दाची व्युत्पत्ती झाली आहे.

एखाद्याची एखादा चांगल्या कामाबद्दल स्तुती करण्याची रीत वैदिक काळापासून चालत आली आहे. वैदिक काळातील गाथा अशाच स्तुतीपर आहेत. या गाथा म्हणजे महापुरुषांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या प्रसंगांवर व त्यांच्या दानशूरतेवर रचलेले पोवाडेच आहेत. विश्वदेवांनी अभ्युत्क्रोश केला, असे ऐतरेव ब्राह्मणात म्हटले आहे. हा अभ्युत्क्रोश म्हणजे इंद्राचे गुणवर्णनच आहे असे सायणाचार्यांनी त्यावर भाष्य केले आहे.

अशा प्रकारची स्तवनात्मक कवने इसवी सनाच्या दहाव्या शतकापासून हिंदी वा तत्सम भाषेत रचली जात होती. त्यांना रासो असे म्हणत. पृथ्वीराज चव्हाण यांचा भाट चंद बरदाई याचे पृथ्वीराज रासो हे काव्य म्हणजे एक पोवाडाच आहे. भूषण नावाचा एक कवी शिवाजी महाराजांच्या बरोबर काही काळ होता. त्याने शिवाजी महाराजांच्या चरित्रातील काही रोमहर्षक प्रसंग काव्यात वर्णन केले आहेत. ते 'पोवाडा' या प्रकारातच मोडतात.

आपल्याकडे उपलब्ध असलेल्या पोवाड्यांची संख्या सुमारे तीनशे आहेत. यात शिवकाळ, शाहू महाराजांचा काळ आणि अव्वल इंग्रजी काळ असे टप्पे आहेत.

पोवाडे रचणारे शाहीर मराठी आहेत. त्यांची भाषा तडफदार पण रांगडी आहे. अज्ञानदास, प्रभाकर, सगनभाऊ, परशुराम, होनाजी बाळा, गंगू हैबती, रामजोशी, खाडिलकर, अमरशेख हे मराठीतील काही महत्त्वाचे शाहीर आहेत.

प्रसिद्ध संशोधक वि. का. राजवाडे यांनी 'महिकावतीची बखर' या ग्रंथाला प्रस्तावना लिहिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे,

''पोवाडे हे गद्यपद्यात्मक असून ते केवळ काव्य नव्हे तर दृश्य काव्यही आहे. पोवाडा हे एक प्रकारचे नाटक आहे. त्यात अनेक पात्रे असतात. मुख्य शाहीर व त्यांचे सहकारी पोवाड्यातील व्यक्तींच्या सोंगाची बतावणी करतात. मुख्य पात्राची बतावणी मुख्य शाहीर करतो. याशिवाय, कथानकाचा धागा शाबूत ठेवून कथेचे तात्पर्य तटस्थपणे सांगण्याचे नाटकातील सूत्रधाराचे कामही तो गद्यात करतो.''

इंग्रजीत 'पोवाडा' या काव्याला ballad असे म्हणतात. पोवाडा रचणारा वा गाणारा शाहीर म्हणजे balladist.

अहिल्याबाई होळकर यांचा धवल चरित्र, चारित्र्य आणि कर्तृत्वाने अनेक शाहीरांच्या प्रतिभेला आकर्षित केले. म्हणूनच सर्वात जास्त पोवाडे अहिल्याबाई होळकर यांच्यावर लिहिले गेले आहेत. त्यापैकी राजाराम दौलत गडकरी यांचा 'धर्मकार्य' शाहीर प्रभाकर यांचा 'धन्य धन्य कलियुगी', वनविहारी यांचा 'देवी अहिल्ये, प्रणाम तुज करितो' वामनराव मोटे यांचा अहिल्येचा अवतार, विनायक आनंद रेघे यांचा 'पुण्यश्लोक देवी अहिल्याबाई' शाहीर भास्करबुवा निरगुडकर यांचा 'मी सून सुभेदारांची', शाहीर रामचंद्र नरहर माळी यांचा 'श्रीमंत इंदूर राजघराण्याचा इतिहासिक पोवाडा', शाहीर बन्सीधर यांचा 'अहिल्याबाई सती जातात' हे पोवाडे प्रमुख आहेत. यापैकी शाहीर प्रभाकर यांचा पोवाडा सुप्रसिद्ध आहे. यातील ध्रुवपदातील दोन ओळीतच शाहिरांनी अहिल्याबाईंची महती सांगितली आहे. ते म्हणतात–

सती धन्य धन्य कलियुगी अहिल्याबाई।
गेली कीर्ति करुनिया भूमंडळाचे ठायी।।

ते पुढे म्हणतात –

महाराज अहिल्याबाई पुण्य प्राणी
संपूर्ण स्त्रियांमधि श्रेष्ठ रत्नखाणी ।।
दर्शने मोठ्या पापाची होईल हानी ।
झडतात रोग पापाची होईल हानी ।।
वर्णिती कीर्ति गातात संत ते गाणीं ।
झाली दैववशें ती होळकराची राणी ।।।

अहिल्याबाईंच्या विविधांगी कार्य कर्तृत्वाचे प्रलयकारी वर्णन पोवाड्याच्या पुढील दोन चौकांतून आले आहे,

बांधिले घाट मठ फार
कुठे शिवास संतत धार ।
कुठे ठेवतां पाणी गार ।। (चाल पहिली) ।।
त्या साठी मुशाफिर कायें धांवत जाई ।।
विश्रांत पावती पाहून आमराई ।।
किती ग्रहण संधींत तीलतुला त्या केल्या ।
कधि कनक रौप्य आणि कधीं गुळाच्या भेल्या ।।
सांभाळ करुनि काशीस यात्रा नेल्या ।
कावडी शतावधी रामेश्वरी गेल्या ।।
संसारी असून तिच्या वासना मेल्या ।
तिजपुढे सहज मग मुक्ति उभ्या ठेल्या ।

अहिल्याबाईचे जीवन म्हणजे ज्ञानेश्वरादी संतांच्या अभंगवाणीचा आविष्कार आहे. असे वर्णन शाहीर राजाराम दौलत गडकरी यांनी केले आहे. आपल्या रचनेत त्यांनी म्हटलंय,

नमस्कार आरंभी केला देवि अहिल्येला ।।
इतिहासाच्या पटलावरच्या अढळ तारकेला ।।
आद्य ऋषींनीं ज्याला स्तविलें अभिनव सूक्तांनीं ।।
श्रीसंतांनीं ज्ञानेशांनीं अभंग वाणीनीं ।।
त्या तत्त्वाचें जीवन सतिचें केवळ धर्माचें ।।
संसाराचें परमार्थाचें राजकारणाचें ।।
झाली कीर्ति तीर्थी जगतीं कोण गणिल गणती ।।
दशांकगणिती हात टेकिती धन्य सती म्हणती ।।
विश्वकुटुंबी धर्मावांचुनि तिला क्रिया नव्हती ।।
मऊ मेणाहुनि असिधारेहुनि तीक्ष्ण तिची नीति ।।

तत्त्वमूळ चैतन्यांत ।।
जड सृष्टींत ।।
अबाधित असत ।।
तो धर्म न तरवारीचा ।।
तो धर्म न वाचस्पतिचा ।।
तो धर्म न मिळमिळतेचा ।।
''वस्तूचें वस्तुत्त्व राखणें धर्म'' खरें वचन ।।
आज शाहिरा करी अहिल्यादेवीवर कवन ।।धृ।।

अहिल्याबाईंनी 'धर्मकार्य' करून 'धर्मराज्य' निर्माण केले असे निरीक्षण शाहिरांनी नोंदविले आहे ते म्हणतात,

नमो अहिल्ये नमो देवते आदिशक्ती माते ।।
''धर्मकार्य'' गातील कवीजन पावन तव चरितें ।।
तुम्हीच भारतस्वराज्य मंगल देवि देवतांनों ।।
हिंदभूमिच्या अभिमानांनों प्रियकर बालांनों ।।
परतापानें निजराष्ट्राचा धर्मात्मा झुरतां ।।
परात्पराचें परम तेज तुम्हि घेवोनी येतां ।।
वात्सल्यानें पाजुनि त्याला स्फूर्तीची मात्रा ।।
धर्माचें नवजीवन देता राष्ट्राच्या गात्रा ।।
कसल्याशा चैतन्यानें ।।
समभावानें ।।
एकत्वानें ।।
विश्वाला आच्छादोनी ।।
काळाशीं झगडा करुनी ।।
ताळ्यावर त्याला आणुनी ।।
''धर्मराज्य'' जीवांचें जीवा देता मिळवून ।।
आज शाहिरा करी अहिल्यादेवीवर कवन ।।धृ।।

विनायक आनंद रेघे यांनी आपल्या 'पुण्यश्लोक देवी अहिल्याबाई' या आपल्या पोवाड्यात अहिल्याबाईंच्या माता, पुण्यश्लोकी न्यायाची मूर्ती, विश्वप्रेमाची देवी या शब्दांत गौरव करताना 'धन्य धन्य' या शब्दांनी त्यांचे मोठेपण सांगितले आहे. त्या पोवाड्यातील ओळी अशा :

दुःख ऐरणीं दुःख घणी हिरकणी तशी राहे

अजरामरही कीर्ति सरिता म्हणुनि तिची वाहे
पर-धर्म-सहा असुनि पक्की स्वधर्म निष्ठ खरीं
पोकळ गर्वा वाचुनि जगती फक्त हीच नारी
स्मीथ असेची वदतो दुसरा इतिहास लिहितां
''न्यायी-नृपती-श्रेष्ठ'' लिहुनी संबोधी ''माता''
हिंदू अहिंदू आंग्ल सर्वही म्हणति ''धन्य धन्य''
''पुण्यश्लोकां देवि अहिल्या त्रैलोक्या मान्य''
जोवरि गगनी रवि शशि तोवरि कीर्ति आखंड
धन्य अहिल्या धन्य होळकर धन्य भरतखंड
शिकवुनि गेली कधीं कुणासी देउ नका त्रास
स्वतःसि जिंकिल तो विश्वासी जिंकिल हे खास
ती देवी इह लोकीची
मूर्ति न्यायाची
तशी नीतिची
ती देवी भूत दयेची
ती मूर्ति हिन्दुधर्माची
ती देवि विश्व प्रेमाची
आनंद सुता पावन करि त्या धन्य माउलीची
अगाध कीर्ति साध्वि अहिल्या देवी ही साची

'अहिल्येचा अवतार' या पोवाड्यात अहिल्याबाई हा एक दैवी अवतार होता अशी कल्पना मांडली आहे. या पोवाड्यात शाहीर वामनराव मोटे म्हणतात,

अहिल्येचा अवतार अहिल्याबाई झाली स्वर्गवास
करी रयत रोदनापुढें जगदीश होईल कैसें ।।धृ.।।
पुण्यश्लोकी जगा ठावकी कीर्त तुमची देशांतरी।
देशोदेशीं, तीर्थाचे ठायीं कीर्त केली नानापरी।।
अन्नसत्र घाट देवळें बांधले कळाकुसरी।
महारण्य कोकंठाणें घडविल्या बारवा विहिरी।।
नित्य दक्षिणा इच्छाभोजन ब्राह्मणास पूजन करी।
धर्मनीत अवतार केवळ कीर्ति वाढवी कोठवरी।
सुखवस्तीनें हेत तयाचा दया वाढतो वनवास।
गेला वृक्ष मोडून पक्षी बसती कोणा ठायास ।

अहिल्येचा अवतार ।।

'मी सून सुभेदारांची' हे अहिल्याबाईंनी अभिमानाने मिरविलेले बिरुद आहे. या ओळीतून त्यांचा आपले पितृतुल्य सासरे सुभेदार मल्हारराव होळकर यांच्याविषयींचा जाज्वल्य अभिमान प्रकट होते.

राघोबादादा पेशवे यांनी इंदूरवर राज्य जिंकण्याच्या कुटिल हेतूने आक्रमण केले होते. तो प्रसंग या पोवाड्यात वर्णन केला आहे. कुठल्याही प्रकारे दडपण न बाळगता अतिशय चातुर्याने अहिल्याबाईंनी राघोबादादांना कात्रीत पकडून नामोहरम करणारा संदेश पाठवला आणि 'मी सून सुभेदारांची' हे आपले ब्रीद सार्थ केले. त्या प्रसंगाचे वर्णन करताना शाहीर भास्करबुवा निरगुडकर यांनी म्हटलंय,

तो काळ पेशवाईचा, राघोजि भाज्यां भारी ।।
घे द्रव्य रसद मीषानें, तो संघ चमूचा भारी ।।
फिरतांना राघोबाची, ये मालव माती स्वारी ।।
होळकर वीर वंशाची, ती स्नूषा सत्ता धारी ।।
**चाल ।।** जाणुनी मनीं ती अबला, मागणी करी द्रव्याला ।।
दावितो वीर वृत्तीला ।।
परि मीन मनो ती साची ।। मी सून सुभेदारांची ।।
मी द्रव्य समर्पण केले त्या शिव प्रभू चरणाला ।।
बिबव मंजिरी सह त्यांसी, अर्पिन घेणाराला ।।
शिव निर्माल्य तुम्हाला, आवडेल जरी घेणाराला ।।
तुम्हि ब्राह्मण मी क्षत्रीं त्वरें यावें दान घेण्याला ।।
**चाल ।।** जरि मान्य असें तुम्हाला त्वरें यावें दान घेण्याला ।।
हा निश्चय माझा कथिला ।।
ही कृती असे पुण्याची ।। मी सून सुभेदारांची ।।
मी स्नूषा वीर पुरूषांची ।। अंगना असे वीरांची ।।
मी अभिमानी धर्माची ।। मी भगीनी असे वीरांची ।।
मज आवड मनिं वीरांची, दावीन वृत्ती वीरांची ।।
वीरांची कन्यका आहे। वीरत्व दावीत साची ।।
**चाल ।।** समरात चकमक करतां, ये कातीन तुमचे हातां ।।
चित्तांत विक्षपकर्ता ।।
जा धरा वाट पुण्याची ।। मी सून सुभेदारांची ।।

आपले पती खंडेराव यांच्या कुंभेरी येथील युद्धभूमीवर वीरमृत्यू झाल्यानंतर

अहिल्याबाई सती जाण्यास निघतात. त्या प्रसंगाचे चित्रमय वर्णन शाहीर बन्सीधर यांनी केले आहे. अहिल्याबाईचे सतीचे रूप पाहून मल्हाररावांच्या दुःखाचा बांध फुटला. त्यांनी हंबरडा फोडला आणि 'तू खंडूच्या रूपाने जिवंत आहेस' असे म्हणून सती न जाण्याबाबत आर्तपणे विनवणी केली. विवेकी अहिल्याबाईंनी सारासार विचार करून आपल्या सासऱ्यांची विनवणी शिरोधार्थ मानून राज्याच्या हिताकरिता आपला सती जाण्याचा निर्णय रहित केला. हा प्रसंग शाहीर बन्सीधर यांनी जिवंतपणे शब्दांकित केला आहे. तो असा :

चिता धडकली चंदन-काष्ठीं धगधगत्या ज्वाला। लागली हळहळ सर्वांला
पवन देउनी साथ, नेतसे ज्वाला आकाशीं। लोचनीं गळती जळराशी
अलंकार ते सर्व टाकुनी सती अहिल्येनें। न्हाणली शीत-जल-स्नानें
शुभ्र वस्त्र परिधान करोनी केस मुक्त केले। पसरले पाठीवर ओले
भाळावरतीं मळवट ओल्या भरी कुंकवाचा। दिसे तो वेष भवानीचा
सरणाजवळीं उभी ठाकली येउन जगदंबा। घातली प्रदक्षिणा सांबा
**चाल :** तें दृश्य पाहतां सारें। भवतालीं जन हळहळले
तो थाट पाहतां शोकें। पशु पक्षी मीन कळवळले
करि वंदन मल्हारीला। 'शुभ आशीवर्च हे उठले
फुटे हृदय हें तडकुन त्याचें उठला जंजाळ। फुटेना तोंडातुनि बोल।।
तरी बोलला अडखळुनी तो एकवटुन जीव। ''करुं नको दुःखावर घाव
तूंच शोभशीं आर्य-कन्यका सुता भारताची। कुलाची स्वामिनी तूं अमुची
तरी प्रार्थना माझी तुजला विनंती पायाशीं। नको तूं मागूं मज आशी
ऐक एवढी तुझ्या पित्याची विनंती हृदयाची। नको तूं अवमानूं माझी''
**चाल :** ''तो पराग सोडुनि जातां। सुमनाची मग का महती
जरि गळता सुम सांबाचें। तरि निर्माल्यांतच गणती
शिरिं कृपा पतीची शांता। तें जीवन अमुचें जगतीं
निर्माल्यासम जीवन झालें शुष्क आज माझें। कसे मीं सांगावें वाचें'' ।।
शोक दाटला नयनीं उठला अंतर डबडबलें। किती तरि अश्रू खळखळले
'पुन्हा विनंती करितों साध्वी घुटमळती प्राण। दे सती मजला जीवदान'
विनंती पाहुनि तंव श्वसुराची अंतरी कळवळली। परतली सती धन्य झालीं
पावित्र्याची दिव्य दीप्ति ती कर्तव्यीं रतली। जगासी वंद्य नित्य झाली ।।

शाहीर रामचंद्र नरहर माळी आपल्या 'श्रीमंत इंदूर राजघराण्याचा संक्षिप्त इतिहासिक पोवाडा' या रचनेत अहिल्याबाईंच्या कर्तृत्वाचे आणि महानतेचे वर्णन करताना म्हणतात,

श्रीमन्महाराणी अहिल्याबाई। धर्मदेवता ही अवतरली महीं।
जणो द्रौपदी मंदोदरी तारा।। कीर्ति जणू चमके अढळ तारा।।
झाली होळकर वंशोद्धारा।।धृ.।।
किती अगम्य ईश्वरी करणीं। असे ही धरणी।
रत्नाची खाणी। धन्य ईश्वरी खेळ सारा।।

**।। मिळवणी ।।**

अहिल्याबाई दयाधर्माची। न्यायनीतिची। शुद्ध पवित्राची।
मूर्ति कीर्तिचा डंका सारा त्रिखंडीं त्रिकाल गर्जे पुरा।
धन्य हा स्वदेश होई खरा।।
अहिल्याबाईनें तीर्थयात्रा केल्या। धर्मशाळा बांधिल्या।
विहिरी खोदविल्या। अडचण जाणुनि यात्रेकरुची।
सोय तिनें केली प्रवासाची। चहुंकडे सर्व प्रकाराची।।
बदरीनारायण रामेश्वर। ॐकारेश्वर। जगन्नाथपुरी।
केदारनाथ द्वारका उज्जनीची। अयोध्या गया प्रयागाची।
पंढरपुर सुलतानपुरची।।
हरिद्वार नाशिक जेजुरी। इंदुर महेश्वरीं। थोर काशीपुरीं।
सदावर्ते अन्नछत्रें यांची। देणगी आहे महाराणीची।
थोरवी किती वर्णूं तिची।।
असें क्षेत्र राहिलें नाहीं। जेथें गेली नाहीं। अहिल्याबाई।
कितीकशा देवमंदिराची। स्थापना केली धन्य तिची।
कुंठित गति कवित्वाची।।
बारा हजार सहाशें त्र्याहत्तर। धार्मिक स्थानेतर। सांप्रत खरोखर।
नुसती होळकर हद्दीमधीची। गणती करुं इतर ठिकाणींची।
जरुर मग निराळ्या पोवाड्याची।।

यात अहिल्याबाईंनी देशभरात केलेल्या बारा हजार सहाशे त्र्याहत्तर निर्माणकार्यांचा उल्लेख केला आहे. या सर्वांची एकत्रित सूची होणे आवश्यक आहे. याबाबत भारत सरकारच्या संबंधित विभागाने योग्य ती पाऊले उचलावीत असे सुचवावेसे वाटते.

वृद्धबद्ध काव्यरचना आज जवळजवळ अस्तंगत झाली आहे. या ग्रंथात गोविंद एकनाथ गोसावी यांचे ‘अहिल्याबाई : पद्यमय चरित्र’ आणि ह. भ. प. संतकवि श्री दासगणू

महाराज यांचे 'श्री देवी अहिल्याबाईचे चरित्र' ही दोन दीर्घकाव्ये समाविष्ट केलेली आहेत. ही काव्ये रचनात्मक आणि काव्यदृष्ट्या अतिशय दर्जेदार असून शार्ईलविक्रीडित, स्त्रग्धरा, इंद्रवजा, गीति, आर्या, पृथ्वी, शिखरिणी, वसंततिलका, मंदाक्रांता, उपेंद्रवज्रा, आदी वृत्तांत रचलेली आहेत. दासगणू महाराजांनी आर्या, ओवी, दिंडी, पद, लावणी, श्लोक, कटाव, साकी या वृत्तांचा वापर केला आहे. काही ठिकाणी त्यांनी जात्यावरील ओवी आणि भजनाची चालही वापरली आहे.

ही दोन्हीही काव्यमय चरित्रे मराठी काव्याची वैशिष्ट्ये आणि वैभव अधोरेखित करणारी आहेत.

पंडित कवी मोरोपंत यांचे 'अहिल्ये-वरा-धरा-भूषा' हे बारा ओळींचे काव्य अतिशय प्रसिद्ध आहे. त्यात त्यांनी 'अहिल्याबाई ही निरपेक्ष न्यायाची मूर्तीच आहे' असे म्हटले आहे. आपल्या काव्यात ते म्हणतात,

देवि अहिल्याबाई। झालीस जगत्रयात तू धन्या
न न्यायधर्मनिरता अन्या कलिमाजि ऐकिली कन्या

सौ. मालती चितळे यांची 'संगीतिका' ही अतिशय नाट्यपूर्ण आणि प्रभावी पद्धतीने लिहिली आहे. आरंभी सविस्तर निवेदन असून नंतर एकेका पदामधून एक एक प्रसंग वर्णन केला आहे.

अहिल्याबाईंच्या लहानपणी अहिल्याबाईंना शिक्षणाचे धडे दिले ते पळशीकर तात्या पंतोजी यांनी. त्यांच्या मनात अहिल्याबाईंविषयी अतिशय कौतुक होते. अहिल्याबाईंची कुशाग्र बुद्धी आणि ग्रहणशक्ती याबाबत ते कौतुकाने बोलत. या संगीतिकेतील एक पद अहिल्याबाईंविषयी त्यांचे मत व्यक्त करणारे आहे. ते म्हणत,

पळशीकर पंतोजी तात्या। मीच मुलीचा गुरु।
तीव्र बुद्धी चातुर्य पाहूनी। शिक्षण केले सुरु।
रानी जाता ठेवी घाई। मजपाशी भाकरी।
प्रेमे मांडीवर ती बसूनी। विविध प्रश्न ही करी।
पोथी आणि भक्तीकथा। ही ऐके आवडीने।
होईन काही देवप्रिया मी। पुसे तळमळीने।
सती द्रौपदी दमयन्ती। ती राणी तारामती।
सत्ताधारी धनिकच का हो प्रभूप्रिया असती।
बाहू चौकस चाणाक्ष माझी पोर।
साध्वी झाली जी पुढे जगी थोर।
धन्य झाले मी जन्म सार्थ झाला।
अहिल्येच्या किती सांगू कौतुकाला।।

या संगीतिकेतील शेवटचे पदही अतिशय महत्त्वाचे आहे. 'नारीजातीला तू तर भूषण' असा अहिल्याबाईंचा गौरव करून 'भारतभर तुझ्या प्रेमाची ज्योती उजळत राहो' अशा आशयाचा शेवट केला आहे. ते पद असे :

त्रिभुवनी गाजे तव कीर्ति
दाखवू देवी अहिल्यां सती।।धृ।।
नरजन्माचे केले सार्थक। तुला भेटला जगदोत्पादक।
कर्मावरती रत न लिप्तता। तू तर ज्ञानवती।।
हुरळलीस ना कधि सुखाने। खचलीस ना तू कधि दुःखाने।
स्थितप्रज्ञता समूर्त झाली। तुझिया रुपे सती।।
न्यायप्रिय तू राजकारणी। धूर्त चतुर तू मधुरभाषिणी।
प्रजाजनांची माय खरी तू। वात्सल्या ना मिती।।
अन्नछत्र मंदिरे विहीरी। दान भूमिचे घाट नदीतीरी।
केली व्यवस्था देवपूजेची। चोहीकडे तूं सती।।
कर्णापरि तुज दानशूरता। रिपूस कांपवी तुझी थोरता।
प्रेम आदरे विनम्र जनता। तुझिया चरणा प्रति।।
जगलीस हिंदू धर्मासाठी। लढलीस भूमि प्रेमासाठी।
गौरविला ध्वज भगवा आपुला। गौरविली ही क्षिती।।
नारिजातीला तू तर भूषण। सदा आठवू त्वदीय सद्‌गुण।
तव प्रेमाची उजळो ज्योती। अखंड या भारती।।

'प्रणवात्मिका आदिशक्ती' हे मेघश्याम कृष्णराव सावकार यांचे अहिल्यास्तवन हे अभिजात काव्याचे उत्तम उदाहरण आहे. अहिल्याबाईंचे व्यक्तिचित्र कवीने नेमकेपणाने शब्दरूप केले आहे. त्यातील महत्त्वाच्या ओळी अशा :

प्रणवात्मिका आदिशक्ती। जगद कल्याणकारिणी
अवनीवरी अवतरे ती। अहिल्यारुप घेऊनी।।
हिंदवी राजधर्माची। ध्वजा ही स्फूर्तिदायिनी
विश्ववंद्य महा साध्वी। अहिल्या शिवयोगिनी।।
राज संन्यासिनी राही। वैभवातही नित्य ती
जान्हवी जल पूता त्या। अहिल्येस नमस्कृती।।

ज्येष्ठ कवींमध्ये शांता ज. शेळके, महाराष्ट्रकवी यशवंत, माधव जूलियन यांची काव्ये सरस उतरली आहे.

अनंतफंदी यांचा 'महेश्वरचा कटाव', मंदाकिनी गावडे यांचा 'अहिल्याबाईंचा पाळणा' अब्दुल गफूर यांची 'मानवता गौरवांकित झाली', नीलांबरी गानू यांचे 'ती एक

अहिल्या होती' ही काव्ये उल्लेखनीय आहेत.

गोविंद काळे, वंदना विटणकर, प्रा. म. सी. हळपे, अणासाहेब डांगे यांनी अहिल्याबाई चरित्रविषयक 'अहिल्या गाथा' आणि अहिल्या गीतायन लिहिले आहे. त्यातून त्यांची प्रत्येकी एक निवडक रचना या ग्रंथात समाविष्ट केली आहे.

निरंजन होळकर यांनी 'अहिल्या' या काव्यातून अहिल्याबाईंच्या व्यक्तित्वाच्या विविध पैलूंचे वृत्तबद्ध काव्यचित्र रेखांकित केले आहे. त्यातील काही ओळी अशा :

अहिल्या कल्याणाचे व्रत
अहिल्या त्यागाचे चरित्र
अहिल्या मल्हारींची शिष्या
अहिल्या दीनांचीच मित्र

अहिल्या सर्वस्वाचे दान
अहिल्या वास्तवाचे भान
अहिल्या मूर्तिमंत शिव
अहिल्या कर्तव्याची आन

अहिल्या एक राजमाता
अहिल्या गरीबांची त्राता
अहिल्या लोकांचेच राज्य
अहिल्या भूमीची विधाता

अहिल्या होळकरांची राणी
अहिल्या नर्मदेचे पाणी
अहिल्या एक लोकमाता
अहिल्या शाश्वताची कहाणी

महाराष्ट्राने झाशीची राणी लक्ष्मीबाई आणि इंदूरची राणी अहिल्याबाई यांच्याकडे वर्षानुवर्षे अक्षम्य दुर्लक्ष केल्याचे लक्षात येते. निदान विज्ञानयुगाच्या संगणक काळात तरी अहिल्याबाईंच्या प्रशासकीय, सामाजिक, सांस्कृतिक अशा अनेकांगी ऐतिहासिक कामगिरीचे विविध माध्यमांतून दर्शन घडविणे ही काळाची गरज आहे. सध्याच्या अस्थिरतेच्या बिकट परिस्थितीत, राज्यकर्ते आणि शासनकर्ते किंवा अधिकारी यांना 'विश्वस्त' भावनेने त्यागयुक्त सत्ता कशी राबवावी याची प्रेरणा अहिल्याबाईंच्या चरित्रातून मिळेल, असे वाटते. राज्यात शांतता, सुव्यवस्था कशी राखावी याची शिकवण या समग्र अहिल्या साहित्यातून मिळते. स्थितप्रज्ञता म्हणजे काय अन् आत्मसंतोष कसा असतो,

अखंड प्रसन्नता राखून समस्त संसारव्यथांवर कशी मात करावी हे तत्त्व या चरित्रात्मक विविध प्रकारच्या काव्यांमधून सहजपणे उमगते. निष्काम कर्मयोग साधताना विवेक आणि वैराग्य कसे गुरूस्थानी बसवावेत ह्याचीही सजग जाण येते. *'कर्म पराधीनपणे। निपजतसे प्रकृतिगुणे ।।'* (३.५९) असे 'ज्ञानेश्वरी'त संत ज्ञानेश्वरांनी सांगितले आहे. हाच भाव अंतरी दृढ धरून, अखंड नामस्मरणी लीन राहून, रूढ लौकिकाला साजेसा राजधर्म पाळणारी महासती अहिल्या एकमेव, अद्वितीय अशीच आहे.

अहिल्याबाईंच्या एकूण जीवनपटावर धावती नजर टाकली, तरी आपल्या लक्षात येते की, व्रतवैकल्यांचे सारे नीतिनियम पाळून महेश्वरसारख्या नर्मदातटी निवास करून, तीर्थक्षेत्री राहून राज्याचा गाडा हाकणे सोपे नव्हते, पण हा चमत्कार त्यांनी करून दाखवला आहे. स्त्री आरक्षणाच्या या संक्रमणकाळात भावी पिढ्यांना याच राजमातेच्या राज्यपद्धतीचा उपयोग होणार आहे, यात शंका नाही. लोकसंग्रहाद्वारे आपली समाज'शक्ती' वाढविण्याचे कसब राजकारणी स्त्रियांनीच नाही, तर पुरुषांनीसुद्धा कसे वाढवावे, याची मुळाक्षरे गिरविण्यासाठी अहिल्यानीती निश्चितच मार्गदर्शन करील अशी पूर्ण खात्री वाटते. हे ज्ञान हृदयावर प्रतिष्ठापित व्हावे, शांतीला अंकुर फुटावा, आत्मबोधाचा विस्तार प्रकट व्हावा, अशी आंतरिक तळमळ आहे. ज्ञानेश्वरांनी दाखविलेल्या महामार्गाने जीवनक्रम आखताना प्रपंच आणि परमार्थाचे सौख्य एकाच वेळी लाभावे एवढेच अंतरीचे सांगणे व्यक्त करावेसे वाटते.

दिवसेंदिवस आपले आयुष्य आणि मनाचे आरोग्य अशांत, ताणतणावांनी ग्रासत चालले आहे. जगाच्या पाठीवर कुठल्या देशात शांती आहे, असा प्रश्न पडतो. अशा धकाधकीच्या आणि असुरक्षित जीवनाला, समाजाला अहिल्याविचार मनःशक्ती वाढवून नव्या जीवनाची, नव्या निर्मितीची प्रेरणा देऊ शकतात. अहिल्याबाईंचे बालपण, लग्न, तरुणपण, संसार, दरबार, अनेक जिवलगांचे मृत्यू आणि एकटेपणा या साऱ्यांचा सुसंबद्ध चित्रपट आपणापुढे उलगडावा आणि त्यापासून सत्य, अहिंसा, करुणा, शील, प्रज्ञा, श्रद्धा या चिरंतन मानवी मूल्यांवरील आपला विश्वास सदैव अढळ रहावा म्हणून माळव्यातला इतिहास पुन्हा एकदा सर्वदूर पोहोचणे अगदी आवश्यक आहे.

## ४

स्वातंत्र्यवीर यशवंतराव होळकर यांचा पोवाडा शाहीर अमर शेख यांनी ज्येष्ठ साहित्यिक न. र. फाटक यांच्या सूचनेनुसार लिहिला होता.

यातील प्रारंभीचा ध्रुवपदाच्या ओळींनीच अंगावर सरसरून काटा येतो आणि अंगात वीरश्रीचा संचार होतो. त्या ओळी अशा :

स्वातंत्र्यसूर्य मावळत होता मराठ्यांचा
वठुं लागे कल्पतरु तोरा कुसळ सराट्यांचा
सुळ्सुळाट् झाला होता मराठ्यांत नरुट्यांचा

होता काळ षंढ बावळट लाळघोट्यांचा
घुबडांचे घुत्कार नि कलकलाट कोल्ह्यांचा
अशा भयाण भीषण काळीं
पुनः तळपली भवानि माउली
झाला थरकांप हिंदद्वेष्ट्यांचा, गोऱ्या सायबांचा ।। जी जी जी ।।

सहा चौकांचा हा दीर्घ पोवाडा यशवंतरावांच्या संघर्षाचे, अफाट शौर्यगाथेचे आणि इंग्रजांबरोबर केलेल्या स्वातंत्र्ययुद्धाचे पूर्ण चित्र डोळ्यासमोर उभे करतो. यशवंतरावांच्या मोहिमेचा तुफानी वेग, त्यांची अफाट जिगर, धैर्य यांचे जिवंत वर्णन शाहीर अमरशेख यांच्या शब्दाशब्दांतून पुरेपूर उतरले आहे.

शाहीर खाडिलकर यांचा पोवाडाही आठ चौकांचा असून त्यांची शैलीही प्रवाही आणि वेगवान आहे. त्यांनी यशवंतराव होळकरांच्या पराक्रमाचे आणि व्यक्तिमत्त्वाचे प्रारंभी केलेले चित्रण अतिशय चित्रमय आहे. त्यांनी म्हटलंय,

निराशेचा वणवा पेटला। चारी बाजुला। तरि न डगमगला।
केला ज्यानं दुष्मनांचा संहार। मुकुंदरा खिंड गाजविली फार।
कीर्तिनं ज्याला घातला हार। यशवंतराव रणवीर। पराक्रमी धीर।
पांडुरंग शीर। त्याला नमणार ।।धृ।।

**प्रास्तविक**

डोळे जसे काय मोती टप्पुरे होते पाणिदार।
वरती कमान भिवयांची शोभली काळी काळी भोर।
दृष्ट कुणाची कशी लागली एक डोळा चूर।
बंदुकीच्या दारूनं उडविला मर्द खरा वीर।
अंग पिळलेलं छाती जशी काय भिंत भव्य थोर।
अभयदान देण्यास सज्ज ती झाली तलवार ।।
कंगणीदार पागोटं वीराच्या शोभे शिरावर।
शिरपेंच मोत्यांचा वर। जडविलीं रत्नं सुंदर।
वरती मोत्यांचा तुरा घोळतो राजमस्तकावर ।। जी ।। चाल ।।
लंका घोडी शोभे सुंदर यशवंत झाला वर स्वार।
भाला बर्ची ढाल तलवार। शत्रूंचे फोडी जिव्हार ।। चाल ।।
घोड्यांच्या टापा ऐकून। झाले अर्धेमुर्धे रणधीर ।। चाल ।।
कनवाळू उदार दिलदार। प्रेमाची घाली पाखर।
गांजलेले लोक पाहून। रायाला येत गहिंवर ।।

द. आ. तिवारी यांची 'रणकीर्ती यशवंताची' ही कविता १९३५ सालच्या 'मालव साहित्य'च्या इंदूर विशेषांकात प्रसिद्ध झाली होती. यशवंतरावांच्या रणझुंझारतेचे वर्णन करताना त्यांच्या लेखणीला जणू बहर आला आहे. या काव्यातील काही महत्त्वाच्या प्रेरणादायी ओळी पहा :

पंचानन घेई झेप, कंदारमधोनी जैसा
वीजेचा उसळे गोल - अंबरामधोनी जैसा
उसळला रिसालेदार, इंदुर नगरीचा तैसा
    कर्नलचा पदवीवाला
    घाबरला टोपीवाला
    सेने आधींच पळाला
चढली डंक्यावर साची - रणकीर्ती यशवंताची

जेजुरीचा मल्हारी संचारिला होता देहीं!
तैसा पूर्वज मल्हारी संचारिला होता देहीं!
एक बहादुर लढला, कोणीहि न झाला स्नेहीं!
अश्वांस विसावा नाहीं
    देहास विसावा नाहीं
    हल्ल्याची प्रतिदिनिं घाई
स्फुरवी मति शाहीराची - रणकीर्ती यशवंताची

अंबड (जि. जालना) येथील कवी रामभाऊ लांडे यांचा स्वातंत्र्यवीर यशवंतराव होळकरांची पाळणा अतिशय नेमक्या भाषेत उतरला आहे. यातील काही कडवी नमुन्यादाखल पहा :

    पहिल्या दिवशी आनंद झाला
    तुकोजी पोटी हिरा जन्मला
    वाफगावात झाला बोलबाला
प्रजेच्या मनी हर्ष दाटला जो बाळा जोजो रे जो ।।

    चवथ्या दिवशी चौघडा वाजे
    होतील राज्याचे यशवंत राजे
    तयांची कीर्ती दिगंती गाजे
होळकरांचे नाम विराजे जो बाळा जोजो रे जो ।।

आठव्या दिवशी बाळ यशवंत
दाही दिशांनी एक आसमंत
पराक्रमी हा पुत्र श्रीमंत
पळभराची नसे उसंत जो बाळा जोजो रे जो ।।

चौदाव्या दिवशी बसे दरारा
नवाब, पठाण इंग्रज घाबरा
चारी मुलखाला यशवंत नारा
जिद्द यशाची, थरार सारा जो बाळा जोजो रे जो ।।

पंधराव्या दिवशी लढाई झाली
मुकुंदरा घाटी, धूम उडाली
दुधाखेडी, हिंगलाज माता पावली
होळकरशाहीची ध्वजा रोविली जो बाळा जोजो रे जो ।।

अहिल्याबाईंच्या या लोककल्याणकारी राज्यकारभाराचा वारसा होळकरशाहीत पुढेही अखंड चालू राहिला. अहिल्याबाईंनंतर अतिशय अडचणीच्या, कठीण प्रसंगातून होळकरशाहीला वाचविले ते स्वातंत्र्यवीर प्रथम यशवंतराव होळकर यांनी. प्रबळ इंग्रजी सत्तेशी सतत संघर्ष करून त्यांनी होळकरशाहीचे राज्य बुडण्यापासून वाचविले. अहिल्याबाईंचा शासनकाळ शांततेचा तर यशवंतरावांचा काळ अखंड संघर्षाचा. ''जीन तख्त जीन घर'' असे त्यांच्याबाबत म्हटले जाते. घोड्यावरचे जीन हेच त्यांचे घर झाले होते. यशवंतरावांनी इंग्रज सत्तेचे आक्रमण थोपवण्याचा जिवापाड प्रयत्न केला पण भारतातील राजे, संस्थानिक यांच्याकडून त्यांना प्रतिसाद मिळाला नाही. परिणामी भारतात ब्रिटिश सत्तेने आपले पाय घट्टपणे रोवले आणि दीडशे वर्षे त्यांनी भारतभूमीवर अंमल गाजविला.

**५**

वीरत्वाचे आणि पराक्रमाचेच पोवाडे गायिले जातात. आदर्श, महान व्यक्तिमत्त्वांवरच काव्ये रचली जातात. मल्हारराव, अहिल्याबाई आणि यशवंतराव हे होळकरशाहीचे प्रमुख आधारस्तंभ होते. त्यांच्या कर्तृत्वावर, पराक्रमावर काव्ये रचली गेली. त्यातूनही सर्वात देदीप्यमान कारकीर्द झाली ती अहिल्याबाईंची. म्हणूनच अहिल्याबाईंवर शाहीर, कवी,

यांनी सर्वात अधिक काव्यात्मक लेखन केले आहे.

६

या काव्यायनात कविता, गीते, पोवाडे, पद्यचरित्रे, पाळणे, दीर्घकाव्ये आदी विविध काव्यप्रकारांचा समावेश आहे.

या काव्यरचनांतून त्या त्या व्यक्तिमत्त्वांचे पैलू आपल्यासमोर उलगडत जातात. अनेक मराठी कवी, शाहीर यांनी या व्यक्तिमत्त्वांचे चरित्र आणि चारित्र्य यांचे बारकावे सूक्ष्मपणे टिपले आहेत. यात मोरोपंत, शान्ता शेळके, महाराष्ट्रकवी यशवंत, माधव जूलियन, चंद्रशेखर यासारखे कवी आहेत. प्रभाकर, अनंतफंदी, रामचंद्र नरहर माळी, बन्सीधर, वामनराव मोटे यासारखे शाहीर आहेत; गोविंद एकनाथ गोसावी, संत दासगणू महाराज यासारखे पद्यचरित्रकार आहेत आणि अनेक नामवंत जुने-नवे कवी आहेत. इंग्रजी विभागात एस. के. देव, आर. आर. द्विवेदी, सी. ए. डॉबसन, शरद लाळगे, डॉ. एन. जी. काळे, के. सी. होळकर यांनी अहिल्याचरित्राचे विशेष विविध परींनी वर्णन केले आहेत. इंग्रज कवयित्री जोना बेली हिने सातशे ओळींचे दीर्घकाव्य लिहून अहिल्याबाईंच्या लोककल्याणकारी राज्यकारभाराचे वर्णन केले आहे आणि अहिल्याबाईंच्या कर्तृत्वाला वंदन केले आहे. संस्कृत विभागात पं. खुशालीराम, पं. गजाननशास्त्री करमेलकर डॉ. प्र. ना. कवठेकर आणि शैलेन्द्रनाथ पाठक यांनी अहिल्याबाईंच्या कर्तृत्वाचा काव्यरूप मागोवा घेऊन त्यांच्या असामान्य व्यक्तिमत्त्वाचे मूल्यमापन केले आहे. हे काव्यायन हा महत्त्वाचा ऐतिहासिक दस्तावेज आहे आणि गौरवपूर्ण वारसा सांगणारा राष्ट्रीय ठेवा आहे.

७

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष श्री. बाबा भांड यांनी होळकरशाहीच्या समग्र इतिहासाचा प्रकल्प संपादनासाठी माझ्याकडे सोपविला त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. या ग्रंथांचे आवश्यक त्या ठिकाणी संपादन करून हे काम विहित कालावधीत पूर्ण करता आले याबाबत समाधान वाटते. याकामी अनेक नामवंत इतिहासकार, अभ्यासक, रसिक आणि सुहृद यांचे अनेक परींचे सहकार्य लाभले, हे कृतज्ञतापूर्वक नमूद करावेसे वाटते.

मा. जयसिंगराव पवार (कोल्हापूर), प्रा. सु. प्र. कुलकर्णी, डॉ. लीला गोविलकर (अहमदनगर), डॉ. गणेश मतकर, डॉ. ना. ग. काळे, राजेंद्र लाळगे, सुनील मतकर, सुभाष वाघमारे, विठ्ठलराव गावडे (इंदूर), वसंत महेश्वरकर (महेश्वर), रामभाऊ लांडे (अंबड, जि. जालना), डॉ. मुरहरी केळे, डॉ. सुधीर तारे, रवींद्र लाड, प्रतापराव पाटील, मुकुंद सराफ (मुंबई), डॉ. अरुणचंद्र पाठक (पुणे) यांचे अनमोल सहकार्य लाभले. या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

ज्येष्ठ साहित्यिक, इतिहासकार आणि माजी मराठी संमेलनाध्यक्ष डॉ. सदानंद मोरे

यांच्याबरोबर वेळोवेळी झालेल्या चर्चेचा संपादन करण्याच्या कामात विशेष उपयोग झाला हे नमूद करणे आवश्यक आहे. त्यांचे मनःपूर्वक आभार.

पूर्वसूरींचे ऋण मान्य करून या आवृत्तीचे संपादन करताना आनंद आणि समाधान वाटले. हा काव्यग्रंथ इतिहास संशोधक, अभ्यासक आणि रसिक यांना उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

**डॉ. देवीदास पोटे**

मुंबई, दि. १५ ऑक्टोबर २०१८ संपादक

## भाग एक

# सुभेदार थोरले मल्हारराव होळकर यांजवरील काव्य

**खंड नऊ : भाग एक**

## होळकर रियासत : काव्यायन

**सुभेदार थोरले मल्हारराव होळकर**
**यांजवरील काव्य**

**Volume Nine : Part One**

## Holkar Riyasat : Kavyayan

**Subhedar Thorle Malharrao**
**Yanjvaril Kavya**

**पूर्व प्रकाशन**

- **थोरले मल्हारराव होळकर सुभेदार यांजवर काव्य** इ. स. १८९१
  – अण्णाजी पांडुरंग जोशी करकंबकर
- **राजा मल्हारराव होळकर** इ. स. १९३५
  – चंद्रशेखर
- **मल्हार आया** इ. स. १९३५
  – अज्ञात

# अ नु क्र म णि का


- **अध्यक्षांचे मनोगत** तीन
- **प्रस्तावना** सहा
- **मूळ लेखकाची (कवीची) प्रस्तावना** ४
- **एकनाथशास्त्री जोशी करकंबकर यांचे अल्प चरित्र** ६
- **काव्यातील कथानकाचा सारांश** ८
- **थोरले मल्हारराव होळकर सुभेदार यांजवर काव्य** ११
  भाग पहिला ते भाग नववा
- **राजा मल्हारराव होळकर** ६७
  चंद्रशेखर
- **मल्हार आया** ६८
  अज्ञात
- **पोवाडा** ६९
  शाहीर देवकीनंदन भागवत
- **तळपली तलवार** ७१
  नीलांबरी गानू

# प्रस्तावना

हे काव्य रचून तयार झाल्यावर पुणें येथील दक्षिणाप्राईझ कमेटीकडे कर्त्यानें परीक्षणाकरितां पाठविलें, व कमिटीने पसंत करून २०० रुपये बक्षीस दिले. दुर्दैवानें ह्या गोष्टीचे आधीच कर्त्यांस काळानें गाठिलें, त्यामुळें आपली कृति विद्वानांस पसंत पडल्यानें जो आनंद वाटावयाचा त्यास तो अंतरला, इतकेच नाही, तर प्रस्तुत काव्यांत जे कांहीं अल्पस्वरुप दोष राहून गेले होते, त्यांचे शोधन त्याचेच हातानें होऊन जी सुधारणा व्हावयाची तीही झाली नाही. पण त्याहून जास्त हानी झाली म्हणावयाची ती ही कीं, त्याचे हातून जास्त योग्यतेचे अनेक ग्रंथ कदाचित झाले असते, ते होण्याची आशा समूळ नाहींशी झाली. किंबहुना सदर कारणामुळें प्रस्तुत ग्रंथ छापून प्रसिद्ध झालाही नसता. परंतु दानशूर व गुणग्राही आमचे श्रीमंत शिवाजीराव महाराज होळकर ह्यांनीं आपल्या महाप्रतापी पूर्वजांचे आपल्या सेवकवर्गापैकीं एकाने भक्तिपुरःसर केलेले हे चरित्र सरकारी खर्चाने छापवून आम्हास फुकट देण्याचा हुकूम दिला, त्यामुळे हा सुयोग घडून आला. त्याबद्दल महाराज साहेबांचे जितके उपकार मानावे तितके थोडेच आहेत.

रघुवंशाप्रमाणें होळकर वंशावर मल्हारराव महाराजांपासून आरंभ करून थेट शेवटचे तुकोजीराव महाराजापर्यंत साद्यंत २१ सर्गांचे काव्य करावयाचे, असा कर्त्याचा हेतू होता. त्याप्रमाणें हे पहिले चरित्र तयार झाले, तोच शरीरक्षीणतेनें त्याजवर आपला अंमल इतका बसविला कीं त्यास तेथेंच आपले काव्य पुरे करावे लागले. ''शितावरून भाताची परिक्षा'' ह्या न्यायानें पुढील भाग जर झाले असते तर ह्या सारखेच चित्तवेधक झाले असते ह्यांत संशय नाही. आधी अशी चरित्रे स्वतःसिद्धच चित्तवेधक असतात. खरेच! मल्हारराव, अहिल्याबाई, तुकोजीराव, अशा सारख्यांचीं चरित्रे कोणास चित्तवेधक होणार नाहीत? पहिल्याचे अतुल शौर्य, दुसरीचा लोकोत्तर धार्मिकपणा व आचारसंपत्ती, तिसऱ्याची विलक्षण बुद्धिमत्ता व मुसद्दीपणा इत्यादिकांचे वर्णन कोणास लुब्ध करणार नाही? त्यातही एखाद्या

कुशल कर्त्याचे हातून ती झाली तर वाचकांचे आदरास पात्र झाल्यावाचून रहाणार नाहीत. असो, ह्या पुस्तकास तरी पुष्कळ वाचक मिळोत व आपल्यांत मल्हाररावासारखे जे वीर पुरुष होऊन गेले, त्यांजविषयीचा त्यांचा अभिमान जागृत राहो, म्हणजे कर्त्याच्या श्रमाचें सार्थक झाले असें होईल.

**– अण्णाजी पांडुरंग जोशी करकंबकर**

•

# एकनाथशास्त्री जोशी करकंबकर यांचें अल्प चरित्र

प्रस्तुत काव्याचे कर्ते कै. एकनाथशास्त्री यांचा जन्म स. १८५० इसवींत करकंब येथें झाला. त्यांची बुद्धी फार विशाल होती. लहानपणीं ७/८ वर्षांचे असतां त्यांच्या वडिलांनीं त्यांस रघुवंश काव्याची संथा देण्यास आरंभ केला. तेव्हां दोन तीनदां श्लोक सांगितला कीं, तो पुन्हा सांगण्याची आवश्यकता पडत नव्हती. तो ते तेव्हांच पाठ म्हणून दाखवित.

पुढें त्यांस ज्योतिष शिकण्याकरितां वैजापुरास बाळंभट जोशी यांच्याजवळ ठेवले. तेथें १४ व्या वर्षी त्यांची ग्रहलाघवादि ग्रंथांत बरीच गति झाली. पुढें ते इंदुरास आले, तेथें त्यांचे वडील अण्णाजी पांडुरंग जोशी भारतीबुवा यांचे चातुर्मास पुराण चालूं होते. त्या अवकाशांत मुहूर्तमार्तंड नामक ज्योतिषावरील ग्रंथ ते शिकले.

त्यांनीं प्रथम नशिराबादेस इंग्रजी शिकण्यास आरंभ केला, तेव्हां त्यांची फार गरीब स्थिती होती. फी भरण्याचे देखील सामर्थ्य त्यांस नव्हते, परंतु त्यांनीं पहिला नंबर ठेवून फी भरण्याचा प्रसंगच वडिलांस येऊं दिला नाही. सुमारें वर्षानंतर ते, तीर्थरूप व मातोश्री यांसह इंदुरास आले. येथील इंग्रजी मदरशांत त्यांनीं इंग्रजी अभ्यास पुरा केला. सन १८७५ सालीं त्यांची मुंबई युनिव्हर्सिटीची प्रवेश परिक्षा उतरली. नंतर त्यांनीं येथील हायस्कुलांत असिस्टंट मास्तराची चाकरी धरली. ती शेवटपर्यंत ते करीत होते. लहानपणापासून त्यांची शरीर प्रकृती फार अशक्त होती त्यामुळें कॉलेजांत जाऊन पुढें अभ्यास करण्याचा हेतू त्यांस सोडून द्यावा लागला.

कविता करण्याचा व निबंध लिहिण्याचा त्यांस फार नाद असे. ते मोठे मार्मिक, रसज्ञ, व बहुश्रुत होते, हे त्यांची कविता जे वाचतील त्यांच्या सहज लक्षांत येईल. ''दादोजी कोंडदेवाचा छत्रपती शिवाजी महाराजास उपदेश'' व ''मल्हारराव होळकरावर काव्य'' या दोन ग्रंथांस दक्षिणा प्राईस् कमिटीनें अनुक्रमें ५० व २०० रुपयांची बक्षिसे दिली. त्यापैकीं पहिले काव्य तर मागेंच छापून प्रसिद्ध झाले व प्रस्तुत काव्य आतां श्रीमंत महाराज शिवाजीराव होळकर यांच्या औदार्याने छापण्याचा योग जमून आला. याशिवाय शास्त्रीबुवांनीं अनेक स्फूट विषयावर कविता केलेली आहे. त्यांनी ''सुंदरी काव्य'' नांवाचा एक ऐतिहासिक पद्यग्रंथ लिहिला आहे परंतु तो अपूर्ण आहे. ''खिळ्यावर रूपक'' नांवाचा विनोदपर एक निबंध लिहिला आहे. तसेच ''प्रस्तुत कालीन नाटक प्रयोग'' या विषयावर एक निबंध लिहिला आहे.

ते मोठे शीघ्र कवी होते. एके प्रसंगीं त्यांनीं श्रीमंत महाराज होळकर सरकार यांजवर

पुढील श्लोक केला तो पाहून महाराज साहेबांनीं त्यांस शेला पागोटें इनाम दिलें.

*मालवपालक रक्षि प्रजा द्विज सेवि शिवा शिव नित्य मनानें ।।*
*दुष्ट मनावरि रुष्ट सदोदित शिष्ट जनावरि तुष्ट मुदानें ।।*
*वीरजनामधिं शूराचि तद्रिपु बोलति यासह युद्ध नकोजी ।।*
*हाचि वसो चिर इंदूर पत्तनीं होळकर प्रभुराव तुकोजी ।।*

शास्त्रीबोवांची प्रकृती मूळचीच अशक्त होती; पुढें त्यास क्षय होऊन त्यांतच त्यांचा अंत ता. २५ मे १८८३ इसवींत झाला. त्यावेळीं त्यांचे वय अवघे ३३ वर्षांचे होते. शेवटीं अतिशय आजारी होऊन आठ दिवसांनीं अंत होणार अशा वेळीं त्यांचे वडील भारतीबुवा त्यांस म्हणाले, ''तूं इतक्या कविता केल्यास परंतु आपला कुलस्वामी खंडोबा यावर कांहीं केल्या असत्या तर चांगले झाले असते.'' तेव्हां शास्त्रीबुवा म्हणाले, ''आतां मला लिहिण्याचें सामर्थ्य नाही. तुम्ही लिहित असाल तर सांगतो.'' मग त्यांनी वडिलांस बिछान्यावर पडल्यापडल्या पुढील आर्या सांगितली.

*कल्पद्रुम मल्हारी भक्तांची सर्व संकटें वारी ।।*
*भारी थोर जगामधिं तारी संसार म्हाळसाधारी ।।*

त्यावर भारतीबुवा म्हणाले, ''एक कविता शंकरावर करा.'' तेव्हां शास्त्रीबुवा म्हणाले, ''शंकरावर दुसरी कविता करणें नको. वरील आर्येत थोडा फेरफार केला म्हणजे ती शंकरावर लागू होते.'' तो फेरफार येणेंप्रमाणें :

*त्रिपुरारी मल्हारी भक्तांचीं सर्व संकटें वारी ।।*
*भारी थोर जगामधिं तारी संसार अंबिकाधारी ।।१।।*

शास्त्रीबुवांची कविता, स्वाभाविक आवेशयुक्त, रसभरित व प्रसंगविशेषीं मोठी विनोदपर आहे. तींत संस्कृताचे फाजील मिश्रण नाही व प्रायः ती दुर्बोधही भासत नाही. ते ईश्वरकृपेनें कांही वर्षे वाचते तर त्यांच्या हातून चांगले ग्रंथ निर्माण झाले असते अशी आशा होती त्यांच्यांत कल्पनाशक्ति प्रखर होती. मनुष्य स्वभावाचे ज्ञान त्यांस चांगले होते असे त्यांची कविता वाचणारांस सहज कळून येण्यासारखे आहे. परंतु ती कल्पकता रसज्ञता, बहुश्रुतता, विनोदपरता या सर्वांस अकस्मात विराम मिळाला. त्यांचा पूर्ण विकास होण्याच्यापूर्वीच त्यांचा कर्त्याबरोबर अंत झाला.

•

# काव्यातील कथानकाचा सारांश

***भाग १ ला :*** मल्हारराव नीरा नदीचे काठीं होळमुरूम या गावीं जन्मला. त्याच्या बापाचे नांव खंडोजी चौगुले असें होते. मल्हारराव लहान असतांच खंडोजी निवर्तला. पुढें मल्हाररावाचे आईचे व तिच्या नवऱ्याच्या भाऊबंदांचे पटेना. म्हणून ती मुलासह खानदेशात तळोदे या गावीं आपला भाऊ नारायणराव बारगळ याचे घरीं जाऊन राहिली. नारायणरावानें आपल्या भाच्यास मेंढ्या चारण्याचे काम लावून दिले. एके दिवशीं रानात झाडाचे छायेंत दगडावर मल्हारराव निजला असतां वारुळातून नागाने येऊन आपली फणा त्याचे मस्तकावर धरिली. त्यानंतर एके दिवशीं नारायणरावाचे स्वप्नांत जेजुरीचा खंडोबा येऊन त्याने ''तुझा भाचा राज्यपद पावेल'' असे सांगितले. ह्यावरून नारायणरावानें मल्हारजीस मेंढ्या चारण्याचे कामातून काढून शिपाईगिरीचे कामांत घातलें.

***भाग २ रा :*** मल्हारजीस दांडपट्टा, तिरंदाजी, वगैरे शूरास आवश्यक ज्या ज्या निरनिराळ्या विद्या, त्या प्राप्त झाल्या. ह्या वेळीं मल्हारजी बराच प्रौढ वयाचा झाला हे पाहून नारायणरावाने त्यास, बाळाजी विश्वनाथ सैन्यासह दिल्लीस सय्यद बंधूंचे साह्यार्थ जात होता, त्याजबरोबर जाण्यास परवानगी दिली. ह्या मोहिमेत बाळाजीचा मुलगा बाजीराव याचा मल्हाररावाशीं स्नेह जमला. दिल्लीहून परतल्यावर मल्हारजी पुन्हा खानदेशांत आपले मामाचे घरीं गेला.

***भाग ३ रा :*** मल्हाररावाचे लग्न नारायणरावाची मुलगी गौतमाबाई हिच्याशीं झालें. नारायणरावाची बायको (म्हणजे मल्हाररावाची मामी) ही या गोष्टीस प्रतिकूल होती. त्यामुळें आता मामीशीं सलोख्यानें राहणें दुरापास्त झाले. तो लवकरच तें घर सोडून मध्य हिंदुस्थानांत बांडे म्हणून प्रसिद्ध सरदार होते, त्यांजपाशीं चाकरीस राहिला. इतक्यांत बांडे हे निजामावर

स्वारी करण्यास निघाले. त्यांजबरोबर मल्हारजीस जाण्यास आयतेंच मिळाले. एकदा बांड्यांचे व पेशव्यांचे सैन्यांमध्ये कांहीं कारणावरून बेबनाव झाला, तो मल्हाररावानें आपल्या मध्यस्थीनें नाहीसा करून पूर्ववत् त्यांचे सख्य केले. ही गोष्ट पेशव्यांस कळली तेव्हां त्यांस संतोष झाला व त्यांनीं मल्हाररावास बांड्यांपासून मागून घेऊन त्यास आपले पदरीं पाचशें घोड्यांचा नाईक करून ठेविले. इ. स. १७२४, १७२६, १७२८, ह्या सालांत खानदेशांत दंडखान याच्याशीं युद्ध करून मल्हाररावानें शूरत्वाविषयीं मोठे नांव संपादन केलें व पेशव्यांचे वतीनें कर्नाटक व हैद्राबाद या दोन मुलखांत मोठे जय मिळविले. या कामगिरीबद्दल पेशव्यांनीं त्यास १२ परगण्यांची जहागीर दिली.

***भाग ४ था :*** दक्षिणेतल्याप्रमाणें उत्तर हिंदुस्थानांतही मराठ्यांची सत्ता स्थापित करून मुसलमानांचा बीमोड करावा, ह्या इराद्यानें मल्हारराव व बाजीरावाचा भाऊ चिमणाजी अप्पा हे मोहिमेस निघाले. ती वेळ त्यांच्या हेतूच्या सिद्धीस फार अनुकूल होती. मोगल बादशाहा नेहमी विलासांत निमग्न असे. त्याच्या जुलमी अंमलामुळें त्याची हिंदू प्रजा त्याजवर अत्यंत नाखूष होती. व दक्षिणेकडून कोणी स्वधर्मी राजा मुसलमानांचा नाश करून आपलें राज्य स्थापित करण्याकरिता हिम्मत बांधून येईल तर त्यास मनापासून सहाय्य देण्यास एका पायावर तयार होती. मल्हारराव व चिमणाजी अप्पा ह्यांनीं ही वेळ साधून माळव्यांत प्रवेश केला व मोगलांशीं निकराच्या लढाया करून मराठ्यांची सत्ता स्थापिली.

***भाग ५ वा :*** ह्यानंतर मल्हाररावानें धार व उज्जयिनी ही पुरातन शहरें मुसलमानांच्या अंमलातून मुक्त केली. इकडे बुंदेलखंडाचा राजा छत्रसाल यास बादशाहाकडील अधिकारी महंमदखान बंगष ह्यानें फार त्रस्त केलें. त्यांचे शासनार्थ बाजीरावानें बुंदेलखंडांत जाऊन त्यास हाकून लाविलें व माळव्यांत मराठ्यांचा अंमल पूर्णपणें बसविला. ह्याप्रसंगीं मल्हाररावानें जे पराक्रम केले त्याबद्दल बाजीरावानें माळवा प्रांत त्यास वंशपरंपरा जहागीर करून दिला.

***भाग ६ वा :*** एके दिवशीं दिल्लीपासून कांहीं अंतरावर कालिकेचा मेळा भरला असतां मराठ्यांनीं त्यावर अकस्मात् छापा घालून लूट आरंभिली, जो मुसलमान हातीं सापडला त्याची कत्तल उडविली व सर्व मोगल सरदारांस जर्जर करून टाकिलें. ह्यानंतर मराठ्यांचे सैन्य कोकणातील वसईचा किल्ला फिरंग्यापासून सोडविण्याकरितां दक्षिणेत परत आले.

***भाग ७ वा :*** मल्हारराव आता कुटुंबपरिवारासह राजाप्रमाणें दरबारी थाटांत राहू लागला. तथापि लढाईचे काम अजून संपले नव्हते. रोहिलखंड व राजपुताना ह्या मुलखांत त्यानें अनेक पराक्रम केले. इ. स. १७५१ त दिल्लीच्या बादशाहानें चांदवड परगण्याची सरदेशमुखी त्यास दिली व त्याच वर्षीं पेशव्यांनीं त्यास माळव्याचा सुभेदार केलें.

***भाग ८ वा :*** जाटांचे पारिपत्य करण्यासाठीं मराठ्यांनीं कुंभेरीस वेढा दिला, त्या प्रसंगीं मल्हाररावाचा एकुलता एक मुलगा खंडोजी म्हणजे प्रसिद्ध अहिल्याबाई होळकरीण हिचा पती प्राणास मुकला.

***भाग ९ वा :*** इ. स. १७५९ त यमुनेच्या कांठी मोठी लढाई झाली. तीत मराठ्यांचा सेनाधिपति दत्ताजी पडला व त्याचा भाऊ जनकोजी त्याच्या मरणामुळें हतवीर्य होऊन मोठ्या संकटांत पडला. ह्यावेळीं मल्हारराव राजपुतान्यात होता. त्यास हे वर्तमान समजतांच तेथून निघून आला. इकडे पुण्यात पेशव्यांस ही पराजयाची वार्ता मिळतांच सदाशिवराव भाऊ अफाट सैन्यानिशीं येऊन दाखल झाला. ह्याप्रमाणें मराठ्यांचे सर्व सैन्य एकत्र मिळाल्यावर एकदम लढाई द्यावी किंवा नाही ह्याविषयीं विचार चालला. एकदम लढाई देऊं नये असा मल्हाररावांचा सल्ला होता. परंतु सदाशिवराव भाऊंनीं त्याचे ऐकिले नाही. मल्हारराव कानाच्या आजारानें इ. स. १७६६ साली अलमपुरास निवर्तला. मरतेवेळीं महादजी शिंदे, तुकोजी व रघुनाथराव पेशवे हे जवळ होते.

•

# थोरले मल्हारराव होळकर सुभेदार यांजवर काव्य

## ।। भाग पहिला ।।

कोण्याही विधिनें कुठेंहि कुणिही कोण्याहि नामें स्वतां ।।
भावें शुद्धमनें जया अळवितां ज्याची कृपा तत्वतां ।।
होते, जो करितो स्वरूप आपुल्या भक्तां निदानीं, महा ।।
शोभे जो प्रभु विश्वचालक तया माझा नमस्कार हा ।।१।।
जो विघ्नें अनिवार्यही पळवितो शुद्धांतरें प्रार्थितां ।।
जो चित्तीं करुनी प्रकाश सुपथीं नेतो पदीं लागतां ।।
मी जो पंगुच काय काव्य गहनीं चालूं बघे त्या मला ।।
नेवो तो प्रभु पार देउनि बला हें मागणें त्याजला ।।२।।

1

वेलीस जैसें फळ त्यापरी जें ।। नीरातटीं ग्राम लघू विराजे ।।
असे जया होळ मुरूम नाम ।। मल्हारिचा त्यामधिं होय जन्म[१] ।।१।।
रविकुळासम निर्मळ सोज्वळ ।। धनगरांत खुटेकर जें कुळ ।।
शिशु तयामधिं हा कुलनायक ।। रविच ये उदया सुखदायक ।।२।।
बलिष्टवीरां चिर देइ जन्म ।। म्हणून की वीरकरोपनाम[२] ।।
त्याच्या घराण्याप्रत सार्थ साजे ।। होतें तसें पात्र जनस्तवा जें ।।३।।
[३]खंडोजी ह्या नामवेषें जनांत ।। होता त्याचा चौगुले ख्यात तात ।।
आरामाला ज्यापरी पारिजात ।। तैसा तात हा करी शोभिवंत ।।४।।
तृतीयवर्षांमधिं पुण्यराशी ।। तत्तात झाला शिवलोकवासी ।।
दायादपीडा मग फार होतां ।। जाई तया घेउनि दूर माता ।।५।।
ती ये तळोद्यामधिं खानदेशीं ।। पुत्रासवें नंतर बंधुपाशीं ।।
तो येथ नारायणजी स्वनामें ।। बंधू असे बारगळोपनामें ।।६।।
मल्हारि कांहीं मग थोर होतां ।। करोनियां मातुल आणि माता ।।
विचार चित्तामधिं, चारण्यास ।। मेंढ्या, तया धाडिति ते वनास ।।७।।
एके दिनीं सूर्य नभीं प्रदीप्त ।। करी बहू तो वनभाग तप्त ।।
चालावया त्यावर जीवजंतु ।। होते मनीं आणित फार किंतु ।।८।।

---

१ इ. सन १६९३

२ आमच्या जवळच्या मराठी बखरींत असें लिहिलें आहे कीं, होळकर ह्यांचे मूळचें उपनाम 'वीरकर' आहे; होळकर हें उपनाम गांवावरून प्राप्त झालें आहे.

३ मालकम साहेबाच्या मध्य हिंदुस्थानाचे इतिहासांत मल्हाररावाच्या पित्याचें नांव 'कोंडाजी' असें दिलें आहे.

वाहे नदी एक वनांत शांत ।। वाजे हळू तींतिल वारि कांत ।।
त्यातें जणू ऊन बहूत लागे ।। म्हणून की तें कण्हण्यास लागे ।।९।।
वाहे तदा ओघ अभंग शांत ।। मासा करी व्यंग उडूनि त्यांत ।।
जे अंशु होते पडले रवीचे ।। त्या खाद्य जो जाणुनि काय नाचे ।।१०।।
विस्तीर्ण शेतें रमणीय काळीं ।। होतीं दुभागीं बहु लागलेलीं ।।
वाहे तयांतून जलौघ नीट ।। वेणींतला भांगच काय थेट ।।११।।
होता नदीच्या तटिं वाढलेला ।। तरू वडाचा बहु फांकलेला ।।
छत्री शिरीं पर्णमयी धरून ।। वाटे निवारी जणु काय ऊन ।।१२।।
छाया असे गर्द बहू तयाची ।। घेण्या विसावा निजण्या सुखाची ।।
वाटे असे ही स्थित काय थेट ।। तेजोनिधीच्या मधिं एक बेट ।।१३।।
येथें दुपारीं श्रमुनी उन्हानें ।। त्रासूनि रानीं बहु चालण्यानें ।।
केलें असे ज्यास बहू निचेष्ट ।। मल्हारि तो ये हरण्यास कष्ट ।।१४।।
शिलेवरी ठेवुनि मस्तकातें ।। घे झोंप तो गाढ निवांत तेथें ।।
भासे शिलाग्रीं मुखपद्म त्याचें ।। छायासरीं स्थापित काय साचें ।।१५।।
कांहीं घडींनीं रवि तो नभांत ।। होई जरासा कलथा गतींत ।।
खालीं तदा तो तिरपीं कहारीं ।। बाणांप्रमाणें किरणें झुगारी ।।१६।।
तो वक्रदृष्टी रवि पाहुनीयां ।। वेगें शिलात्याग करूनि छाया ।।
पळे जणो होउनिं सैन्य गोळा ।। बघूनि तोफेंतिल लाल गोळा ।।१७।।
छायांबरा सारूनियां करांनीं ।। हा कोण येथें निजला म्हणोनी ।।
त्या बालकाचें मुखपद्म वर्य ।। कोपें बघे रेखुनि काय सूर्य ।।१८।।
प्रतापशाली अपुल्याप्रमाणें ।। होणार हा स्वीय पराक्रमानें ।।
सामर्थ्य त्याचें बघण्या म्हणोनी ।। जागें करी कीं रवि त्या करांनीं ।।१९।।
स्पर्धा रवीची जणु देखुनी ही ।। वल्मीकवासी फणि दीर्घदेही ।।
फणा उभारूनि बहिःप्रदेशीं ।। येई हळू डोलत त्याजपाशीं ।।२०।।
ह्या बालकाच्या बहु तापलेल्या ।। घर्मप्रवाहामधिं न्हाणलेल्या ।।
मुखारविंदावरतीं फणेस ।। धरुन छाया करि नाग त्यास ।।२१।।
मारीत होता किरणस्वरूपी ।। मुखास जे बाण रवि प्रतापी ।।
त्या वारण्याला जणु काय ढाल ।। फणी करी हा स्वफणा विशाल ।।२२।।
पुढें नृपाचें पद पावणार ।। म्हणून आतांच भुजंग थोर ।।
करी फणाछत्र शिरावरी तो ।। कीं पुच्छ तें चामर हालवी तो ।।२३।।
किंवा पुढें बालक हा स्वभर्ता ।। होणार हें वाटुन काय चित्ता ।।
भू आपुला पाणि फणास्वरूपी ।। देण्या तया आधिंच काय अर्पी ।।२४।।

माता तयाची हुडकीत त्यास ।। घेऊनि ये भोजन ह्या स्थलास ।।
तो नाग देखूनि पुढें, तियेला ।। दरारूनी घाम बहूत आला ।।२५।।
हा नाग येथें कुठुनी निघाला ।। निद्रेंत कैसा मम पुत्र ठेला ।।
ऐसें मुखें बोलत ती भिऊन ।। तेथेंच थांबे भुइला खिळून ।।२६।।
विक्राळ दाढेमधिं हें यमाच्या ।। आहे जणों मूल भरीं निजेच्या ।।
किंवा यमानें फणिरूप पाश ।। की टाकिला प्राण हरावयास ।।२७।।
कीं मृत्यु काढी फणिरूप जिंव्हा, ।। चाटावया प्राण वनांत तेव्हां ।।
मातेप्रती ह्यापरि त्या घडीस ।। अत्यंत भीतिप्रद होति भास ।।२८।।
तेथून धावून बहूत वेगें ।। बंधूस ती घेउनि येई मागें ।।
दावी फणी त्या सुतमस्तकींचा ।। की निद्रित श्रीधरमस्तकींचा ।।२९।।
होता वटीं एक कपी, तयास ।। वाटे तदा नाग जणो फणेस ।।
धरूनि शीर्षी नवऱ्यामुलाचे ।। स्वरूप देई अबदागिरीचें ।।३०।।
'कां उत्सवाचा दिन आज?' हें त्या ।। भासून तो लालफलें क्षणीं त्या ।।
तोडी, विनोदें जणु नागशीर्षी ।। गुलाल गोट्यांसम त्यांस वर्षी ।।३१।।
तेणें फणी तो डचकोनि अंतरीं ।। वेगें फणेतें अटपोनि नंतरीं ।।
कीं रक्षितें तें शिरिचें सुदर्शन ।। अदृष्ट हा वारुळिं लोक पाहुन ।।३२।।
ह्यानंतरी मातुल आणि माता ।। धावूनि मल्हारिस जागवीतां ।।
निद्रेंतुनी तो उठला सजीव ।। जीवांत त्यांच्या मग येइ जीव ।।३३।।
मोतीं जसें अग्निमुखामधून ।। वायूंतुनी दीपक ज्यासमान ।।
निशाचरापासुनियां सुधेचा ।। जैसा मिळावा घट एकदाचा ।।३४।।
मुखामधूनी फणिच्या तदैव ।। मातें मिळाला सुत की सदैव ।।
ऐसें तयाच्या जननीस वाटे ।। हर्षें तिचा फारच ऊर दाटे ।।३५।।
जेवावया घालुनि तेथ त्यास ।। बंधूसवें घेउनि ती घरास ।।
ये, स्नान अभ्यंग तयास घाली ।। दुग्धान्न देती मग त्यास झाली ।।३६।।
स्वजातियांनीं कथितां तियेला ।। पाहूनि सूज्ञ द्विज एक त्याला ।।
पुसे वनांतील चमत्कृतीचा ।। माता तयाची मग अर्थ साचा ।।३७।।
''पाषाण जैसा बहु अप्रसिद्ध ।। केव्हा करी देव पदास लब्ध ।।
तैसें नृपाचें पद पूर्व योगें ।। लाभेल बाई! तव पुत्र आंगें ।।३८।।
समाप्ति होतां दश वत्सरांची ।। अरिष्ट भीती टळते तयाची ।।
म्हणून तों काल कुठें तयातें ।। जाऊं न देणें'' कथि विप्र तीतें, ।।३९।।
होईल कैसें द्विजवाक्य साचें! ।। विचार ऐसा मनिं मातुलाचे ।।
घोळून, रात्रीं मग झोंप त्यास ।। लागून, हो स्वप्न असा तयास ।।४०।।

''कीं जेजुरिला रिघुनी, सुखाचे ।। मल्लारिमार्तंडकुलप्रभूचे ।।
घेण्या जणो आपण दर्शनास ।। आहों नगाग्रीं स्थित आसपास ।।४१।।
बघावया स्थान कडेपठार ।। तेथून वेंगें वळलों समोर ।।
तो अद्रि तेंव्हा खडकाळ ओस ।। लंघीत आहों'' गमलें तयास ।।४२।।
पुढें अकस्मात् अति किर्र झाडी ।। लागून जाते मग फार गाढी ।।
अंधार भारीच भरे सभोंतीं ।। वाटे जणो कज्जलवृष्टि होती ।।४३।।
होती दिशा धुंद भयाण साऱ्या ।। येतो तदा वेग बहूत वाऱ्या ।।
उडून तेणें नयनांत धूळ ।। पडे मतीला न सुचून घोळ ।।४४।।
पुन्हां अकस्मात् नग उग्रवेश ।। की पेट घेतो पडुनी प्रकाश ।।
भासे मना; नंतर दीसतात ।। दाहीं दिशांला दिवट्या बहूत ।।४५।।
खोरीं दरे थोर, कडे सखोल ।। सुरेख दृष्टी पडती समूल ।।
त्यांच्यामधीं ही भरतो उजेड ।। उजेड सारा दिसतो प्रचंड ।।४६।।
होते कडे जे तुटले विशाल ।। त्या सर्व भागामधिं फार खोल ।।
ते भासति, हा नग काय रोषीं ।। दाढा तदा घोर भयाण वाशी ।।४७।।
होत्या बहू ज्या दिवट्या तयांत ।। प्रकाशल्या, त्या जणु भासतात ।।
विक्राळ तोंडे गिरि वासुनीयां ।। की हालवीतो लळळा जिभा या ।।४८।।
शिखामण्याचा करुनी प्रकाश ।। सहस्त्रजिंव्हा हलवीत शेष ।।
येथें असे काय विराजमान ।। भासे तदा हा गिरि दीप्तिमान ।।४९।।
रत्नाकरांतून निघून आंगें ।। मैनाक रात्रीं वडवाग्नि संगें ।।
रमे इथें येउन काय गुप्त ।। भासे तदा पर्वत हा प्रदीप्त ।।५०।।
आनंददाते पहिल्याप्रतीचे ।। पदोपदीं मंजुलगायनाचे ।।
आलाप कांनी इतुक्यांत येती ।। वर्षे सुधा काय गमे सभोतीं ।।५१।।
तशांत मार्तंड गुणानुवाद ।। करीत वाघेमुरळ्या समोद ।।
येतात येथें करतात छान ।। वीणामृदंगावरनृत्यगान ।।५२।।
करून भंडार सुवर्णचूर्ण ।। मुष्टी तयानें आपुल्या भरून ।।
त्या दाट त्याची करतात वृष्टि ।। जिच्यापुढें झाकुनि जाय दृष्टि ।।५३।।
येते तदा एक हळूं समीप ।। रंभेप्रमाणें मुरळी सुरूप ।।
स्वहस्त ती देउनि आपणास ।। नेते पुढें दूर, गमे मनास ।।५४।।
येथेंहि कोटी दिवट्या धरून ।। आहेत वाघेमुरळ्या नवीन ।।
येथेंहि आहे भर गायनाचा ।। त्या वर्णण्या काय वदेल वाचा! ।।५५।।
होतो न होतो स्थित या स्थलांत ।। तो गर्जनां होउनि घोर त्यांत ।।
छेदोनियां पर्वतश्रृंग भव्य ।। बाहेर ये सुंदर मूर्ति दिव्य ।।५६।।

सर्वत्र अत्यंत महा प्रकाश।। तिच्या स्वरूपें पडुनी, विकास।।
दे मानसा तो सुखदायि ऐसा।। लक्षावधी चंद्रहि दे न तैसा।।५७।।
दिव्यप्रभें भूल जणो पडून।। थांबून तेव्हां क्षणमात्र गान।।
पूरावरी पूर पुन्हां नवीन।। येती तया अंबुधिच्या समान।।५८।।
डोळे प्रकाशें अगदीं दिपून।। आहों कुठें सांप्रत हें सुचे न।।
सिंहासनीं तों स्थित भव्य फार।। मार्तंडमूर्ती दिसते समोर।।५९।।
करोनियां मंडल दासदासी।। येती पुढें नाचत पुण्यराशी।।
मर्यादशील स्थलिं त्या नमूनी।। ते ठाकती होउनि गुंग गानीं।।६०।।
ती कोमलांगी मुरळी फिरून।। धरून हरता स्वकरें तिथून।।
ने आपणा देवपदासमोर।। ती नाचण्याला मग जाय दूर।।६१।।
तों एक तेथें जणु तेज मूर्त।। होता गभीराकृति वृद्ध भक्त।।
तों लक्षुनी बोलत आपणास।। आहे, असा मानसिं होय भास।।६२।।
''हे पुरूषा ! देवकृपें नृवीर।। भाचा तुझा होईल भूप थोर।।
आहे तया दाखविलें भुजंगे।। सुचिन्ह भावी प्रकटून अंगें'' ।।६३।।
उच्चारिले भाषण हें न तोच।। होतो सभोंतीं जयघोष उंच।।
स्वप्नीं असे भासुन त्यास, वेगें।। तो उंच घोषा सरसाच जागे।।६४।।
सुस्वप्न तो देखुनियां खुशाले।। नमून मार्तंडपदास बोले।।
''हे देवदेवा सदया कृपाळा।। हे दीनबंधो चिरलोकपाळा।।६५।।
तुझें कृपाछत्र जरी विराजे।। शिरीं, तरी वीजहि तीक्ष्णतेजें।।
समर्थ नाहीं करण्यास नाश।। शोभे तुझा हा महिमाप्रकाश।।६६।।
करावया रंकसमान राव।। रावापरि रंक, समर्थ देव।।
विश्वांत तूं शोभसि एक साचा।। आम्हां मिळो अंश तुझ्या कृपेचा'' ।।६७।।
श्रुतिस्मृती ज्यापरि ऐक्यतेनें।। द्विजोक्ति सुस्वप्न तया प्रमाणें।।
आहेत अर्थांत बहू समान।। म्हणून हा मातुल हर्षमाण।।६८।।
मामा पुढें स्थाइक काम त्यातें।। सांगे हयांचें घरच्या, स्वचित्तें।।
तेणें गमे राजपदीं रिघाया।। तो पायरी एक चढे क्षणीं या।।६९।।
आणीक, बांडे कदमाख्य वीर।। स्वामी असे जो अपुला उदार।।
मामा स्वतांचा हय त्याजपाशीं।। मल्लारिनामें करि एक हर्षी।।७०।।
गिरिमधुन जलौघा मार्ग होतांच लब्ध।। भुवनिं कधिं जसा तो हो महत्वें प्रसिद्ध।।
अटविमधुन होतां मार्ग मल्हारिलागीं।। जगिं विदित महत्वें तो तसा होय वेगीं।।७१।।

•

## ।। भाग दुसरा ।।

जैसा विनू पावुन शुक्लपक्षा ।। वर्धिष्णु तेजें मुख देत अक्षा ।।
मल्हारजी त्यापरि यौवनास ।। पावून सध्यां विलसे विशेष ।।१।।
योध्यास आवश्यक, त्या गुणांस ।। संपादुनी गाजवि तो स्वतास ।।
तो मल्लविद्या तशि शस्त्रविद्या ।। शिकून होता जणु भीम सध्यां ।।२।।
ततुल्य भल्लभ्रमणीं न कोणी ।। मल्ल प्रसिद्ध स्थित त्या ठिकाणीं ।।
प्रचंड दोर्दंड अखंड पुष्ट ।। होते तयाचे फिरले प्रकृष्ट ।।३।।
विस्तीर्ण वक्षःस्थल वज्रतुल्य ।। जें हो प्रतिस्पर्धिमनांत शल्य ।।
तैसे बहू सुप्रभ तुंद गल्ल ।। शोभे तयाचें वदन प्रफुल्ल ।।४।।
तो चालतां प्रौढिमधीं स्वभावें ।। भू पादभारें जणु कंप पावे ।।
ऐकोनि तत्छब्द गभीर चिप्प ।। रडें त्यजोनी शिशु हो अपाप ।।५।।
होता असा तो जरि वीररूप ।। तदीय अंतःकरणीं अमूप ।।
क्षमास्वरूपी स्थित चंद्रिका ती ।। सदा प्रकाशे बहुहर्षदा ती ।।६।।
करावया बाहुबलप्रसिद्धि ।। तो सिद्ध होता शिरण्यास युद्धीं ।।
ये पेशवा सांप्रत या प्रदेशा ।। तेणें तयाची पुरि हो मनीषा ।।७।।
पिता जयाचा श्रुत विश्वनाथ ।। बाळाजिला त्या पद राजदत्त ।।
मिळूनि एव्हां चिर पेशव्याचें ।। तो अग्रणी होय बलें मतीचे ।।८।।
मंत्रांत इंद्राजवळी प्रवीण ।। बृहस्पती ज्यापरि त्यासमान ।।
हा पेशवा छत्रपतीसमीप ।। शोभे तदा बुद्धिबलें अमूप ।।९।।
स्वीकारूनी छत्रपतीप्रभूचे ।। यशःसुगंधा जगततलाचे ।।
संपूर्णभागीं पसरीत जाय ।। हा पेशवा होउनि वायु काय ।।१०।।
पराक्रमीं द्रोणसम प्रवीर ।। हा पेशवा घेउनि सैन्य शूर ।।
उभारण्याला विजयध्वजास ।।[१] दिल्लीमधीं थेट, निघे सहर्ष ।।११।।
स्वांगांतलें दावित थोर पाणी ।। युद्धांगणीं देत रिपूंस पाणी ।।
ये पेशवा हा गुणि खड्गपाणी ।। गोदावरीचें बघण्यास पाणी ।।१२।।
मल्हारजीला श्रुतवर्तमान ।। होतांच हें त्यामधिं, ज्यासमान ।।
मंत्रश्रुतीनें बलभीमरूपीं ।। आवेश हो व्यक्त तसा प्रतापी ।।१३।।

---

१ सय्यद बंधूंस साह्य देण्याकरिता बाळाजी विश्वनाथ पेशव्यानें जी दिल्लीवर स्वारी केली ती ही होय. ह्या स्वारींत मल्हारराव होळकर होता असें मराठी बखरींत लिहिलें आहे. थोरले बाजीराव आणि मल्हारराव होळकर यांच्या संबंधानें पुढें ज्या आख्यायिका वर्णिल्या आहेत त्या मराठी बखरींतूनच घेतल्या आहेत.

मल्हारजीच्या बहु आग्रहास ।। देखोनि मामा धनवंत त्यास ।।
स्वारींत जाण्या अनुमोदनास ।। दे देउनीया हय पंचवीस ।।१४।।
ज्या पांढरे हें उपनाम, ऐसा ।। स्वारींत होता सरदार खासा ।।
मल्हारजीला प्रियमातुलानें ।। धाडीयलें त्यासह ओळखीनें ।।१५।।
[२]स्वारींत ह्या वेतनलाभ कांहीं ।। मल्हारजीला नव्हता कदाही ।।
जें प्राप्त हो बाहुपराक्रमानें ।। हो तेंच त्या वेतन मुख्यतेनें ।।१६।।
स्वातींतली जीवनवृष्टि जैशी ।। मुक्ताफलांनी युत शिंपल्यांसी ।।
करी लुटींतीलहि त्यापरीच ।। तत्तुल्य लोकप्रित सार्थ साच ।।१७।।
ही पेशव्याची मग तेथुनीया ।। स्वारी निघाली पहिली जिताया ।।
ती खानदेशांतुनि पार जाय ।। अभ्रैकभागांतुनि वीज काय ।।१८।।
आकाशगंगातटिं ज्याप्रमाणें ।। विस्तीर्ण मेघावलि त्याप्रमाणें ।।
ही पेशव्याची मग थोर सेना ।। तापीतटीं होय विराजमाना ।।१९।।
सुतेस माता जशि त्याप्रमाणें ।। तापीनदी ही अपुल्या पयानें ।।
सानंद सेनेप्रत पेशव्याचे ।। करी करोनी हरण श्रमांचें ।।२०।।
विस्तारलेली जणु सागरानें ।। तापीनदी ही स्वभुजा सुखानें ।।
निद्रेंत भूमीवर, सैन्य तीतें ।। उल्लंघुनी जाय पुढें पुढें तें ।।२१।।
विंध्याचलाच्या मग पायथ्यासी ।। येऊन तें सैन्य तिथून हर्षी ।।
पराक्रमाचा ध्वज उच्च भागीं ।। की रोवण्याला वर जाय वेगीं ।।२२।।
आलिंगिणारे गगना तरू असे ।। विराजती ज्यांत बहूत दाटसे ।।
ऐशींअरण्यें घनघोर त्यास्थलीं ।। मार्गांत तेव्हां किति तीस लागलीं।।२३।।
वनांसभोंतीं सकलत्र हीरवी ।। वृक्षीं तदा जी बहुसांद्र पालवी ।।
शोभे तियेला वनदेविचा जणू ।। नामी चिकाचा पडदाच कीं म्हणूं ।।२४।।
ह्या पालवींतून वनांतरामधीं ।। सूर्योष्ण पावे न शिरूं जरा कधीं ।।
प्रयत्न अंशू शिरण्यास खेटुनी ।। करीत; कांहीं घुसत क्षणोक्षणीं ।।२५।।
तेणें गमे मूठभर प्रभा करीं ।। दिली असे की उधळोनि भीतरी ।।
पर्णांतुनी सूर्य अपूर्णसा दिसे ।। भासे तिथें तो स्थित गुप्तकीं असे ।।२६।।

---

२ परमुलखी स्वारी करावयास निघालेल्या मराठी लष्कराबरोबर कोणी कोणी धाडसी लोक आपले जवळचे घोडे घेऊन लुटीच्या आशेने त्या वेळी जात असत अशी चाल असे. अशा लोकांस बरोबर येण्याविषयी लष्कराच्या मुख्याकडून मनाई नसे; व त्याकडून त्यांना दरमहा नेमणूक वगैरे काही मिळत नसे. लुटीमध्ये जे प्राप्त होईल त्यावरच ते लोक आपला निर्वाह करीत असत; व बहुशा दोन पैसे गांठी बांधून ते स्वदेशी परत येत असत.

वृक्षीं कुठे पुष्पलता परोपरी ।। खुलोनि, त्यांचीं गळुनी फुलें बरीं ।।
शय्या तयांच्या मृदुरम्य भूवरी ।। अपाप होत्या बनल्या वनांतरीं ।।२७।।
वायू इथें मंद सुगंध शीतल ।। वाहून दे हर्ष मनास केवल ।।
कुठें कुठें नीरसपर्णमिश्रित ।। होते वनांतून जलौघ वाहत ।।२८।।
पर्णें तशीं एकिकडेहि वाळलीं ।। बहूत होतीं पडलीं स्थलोस्थलीं ।।
कुठें कुठें शुष्क असे उभें तृण ।। कुठें असे तें हिरवेंहि त्यांतुन ।।२९।।
कदा कदा क्रूर गरीब घाबरे ।। घे श्वापदें धांव समोरूनि त्वरें ।।
कदा दिसे भेसुर येथ एकटा ।। धनुष्यबाणांसह भिल्ल चोरटा ।।३०।।
कदा कदा पक्षिविराव मंजुळ ।। पडून कर्णी सुख होय पुष्कळ ।।
कदा कदा व्याघ्रगगंभीरगर्जनें ।। दणाणुनी जात विशाल हीं वनें ।।३१।।
तंबु स्वयंभूच जणो सुविस्तृत ।। जीं हीं वनें थोर मनास भासत ।।
सेना कधीं त्यांत विराम पावत ।। पुढें पुढें चाल करी अबाधित ।।३२।।
पाहूनि डोळे फिरतात ज्यां, असे ।। दरे कुठें खोल भयाण फारसे ।।
शिला अतिस्थूल गजाकृती कुठें ।। आहेत मोठ्या डगरी तशा कुठें ।।३३।।
कोंदाटले वृक्ष असंख्य ज्यांवर ।। आहेत ऐसे तट हे जणो वर ।।
भासे, चढाओढ करून सत्वर ।। शीर्षीं रिघाया बघती अगोदर ।।३४।।
विस्तीर्ण ऐसे गिरिभाग उन्नत ।। आहेत बाजूस कुठें विराजत ।।
कुठें कुठें ते खडकाळ रुक्षसे ।। आहेत अत्युच्च विशाल फारसे ।।३५।। युग्म ।।
प्रचंडसे पांडुरघासवेष्टित ।। पाहूनि ते उंचवटे कुठें स्थित ।।
भासे, सुखें वृद्धजटालराक्षस ।। आहेत कीं निद्रित येथ बाजुस ।।३६।।
चकाकणारे रविच्या प्रभें दिनीं ।। म्हणूनि दृष्टी पडतात लांबुनी ।।
जे श्वेतसे फार, दऱ्यांतुनी तसें ।। जे वाहणारे सकलत्र वक्रसे ।।३७।।
प्रवाह ऐसे बघुनी नगीं स्थित ।। भासे असें, वासुकिरज्जुवेष्टित ।।
कीं सिंधुच्या मंथनकाळिंचा महा ।। आहे इथें मंदरशैल काय हा ।।३८।। युग्म ।।
क्रमीत ऐसा पथ शूर सेना ।। येता नगाग्रीं यवनासुरघ्ना ।।
हो भास दृष्टीं महिषासुराचें ।। देवीच की पाद धरी स्वताचे ।।३९।।
असाच ती मार्ग पलीकडील ।। बहूतसा दुर्गम उंचखोल ।।
क्रमीत तेथून पुढें त्वरेनें ।। सेना सारे अप्रतिबंधतेनें ।।४०।।
ह्या भूमिची जी कटिमेखलाच ।। ती नर्मदा गाठुन लागलींच ।।
घालीत डोळीं रिपुच्याच धूळ ।। सेना निघे कीं मग वावटूळ ।।४१।।
दिल्लीपुरीच्या मग आसपास ।। एक्या प्रदेशीं करि सैन्य वास ।।
दे तेथला नायक खंड तेणें ।। संधी असा सांप्रत हो त्वरेनें ।।४२।।

''कीं पेशव्याच्या कुणि सैनिकांनीं ।। कापूं नये तेथ तृणास रानीं ।।
मोडील जो ह्या नियमा बळेंच ।। त्या पेशवा दंड करील साच'' ।।४३।।
परंतु आवश्यक फार होतें ।। मल्हारजीच्या तुरगांप्रती तें ।।
ह्या व्यत्ययें तो चिडला म्हणून ।। जणो महापूरच वेगवान ।।४४।।
जैसा न मर्यादित सिंह मुक्त ।। मल्हारजी ही नियमानुरक्त ।।
तैसा न होतां, तृण कापवूनी ।। आणी त्वरें बारगिरांकडूनी ।।४५।।
एव्हां क्रमें देखत सैन्य सर्व ।। तो पेशव्याचा सुत बाजीराव ।।
मल्हारजीच्या स्थलिं वर्ज्यघास ।। आहे असें ऐकुनि ये सरोष ।।४६।।
मल्हारजीच्या मग बारगीरा ।। तो पेशव्याचा तनुज प्रहारा ।।
करी करांतील लहान काठी ।। मारून रोषांत तदीय पाठीं ।।४७।।
मल्हारजी ह्या क्षणिं राहुटींत ।। चऱ्हाट होता स्वकरें वळीत ।।
देखोनि तो हा दुरुनी प्रकार ।। तापून गेला लवलाहि फार ।।४८।।
मल्हारजी हा बहु वीर मानी ।। हें कृत्य भारीच अयोग्य मानी ।।
तो बाजिरावास हणी तिथून ।। ढेकूळ कोपें विसरून भान ।।४९।।
तो लाल डोळे करूनी म्हणाला ।। ''कां देत कांहीं असतां आम्हांला ?।।
आम्हीं उपाशींच जणो मरावें ।। वाटें तुम्हां काय? मला कथावें ।।५०।।
आम्हां नसे वेतन नेमलेलें ।। उत्पन्नभक्षी लुटिचे भुकेले ।।
आहों आम्ही; लूट सुटेल कैशी ।। जी अन्नपूर्णाच असे आम्हांसी'' ।।५१।।
त्या पेशव्याचा सुत उत्तरास ।। देतां न, जाई तिथुनी सरोष ।।
सांगून हें वृत्त म्हणे पित्याला ।। 'येणें कसा राहिल धाक? बोला' ।।५२।।
ऐशा अवाज्ञें बहु पेशवा तो ।। हो वुद्ध, आज्ञा मग दे अशी तो ।।
'मल्हारजी होळकरा त्वरेनें ।। लुटून घ्यावें अगदीं बलानें ।।५३।।'
आज्ञा अशी निष्ठुर पेशव्याची ।। मल्हारजीला कळतां, तयाची ।।
लाहीच होऊन तदा तयाचा ।। प्रदीप्त कोपानल होय साचा ।।५४।।
तो गर्जला मेघ जणो अफाट ।। त्वेषें तदा चावुन दांत ओंठ ।।
सवेग ओष्ट स्फुरतां, तयाची ।। जिव्हां न हाले क्षणमात्र साची ।।५५।।
कांहीं पळांनंतर तो कडाडे ।। तेणें मनीं धाक बहूत वाटे ।।
''चिंता न कांहीं, लुटुं द्या तयांस ।। फांशींच का देति न ते अम्हांस?।।५६।।
हें मृत्युहस्तासम लंबमान ।। माझ्या करीं शस्त्र बहू भयाण ।।
आहे तयानेंच मदीय मान ।। घेतों तया पासून कापवून ।।५७।।
काड्या तृणाच्या उपटून दोन ।। आणयिल्या, दंड असा म्हणून ।।
हो लभ्य; वा; उत्तम गोष्ट साची ।। कृपाच मोठी समजावयाची ।।५८।।

जो वृक्ष दे आश्रय तोच आंगें ।। शाखाकरा झोकुनि फार रागें ।।
जरी शिरीं ताडण आश्रितांचे ।। करी, तरी जीवित नष्ट साचें ।।५९।।
माझी तरी गोष्ट असे अशीच ।। मृतापरी सांप्रत मीहि साच ।।
कर्तव्य मातें तरि काय आहे ।। राहून येथें श्रम घेत देहें ?'' ।।६०।।
तो बारगीरांस पुढें म्हणाला ।। ''आहेत जे सिद्ध मरावयाला ।।
हो ज्यांस माझा अभिमान, त्यांनीं ।। वेगें चलावें मजसार्ध रानीं'' ।।६१।।
बोलून ऐसें मग अश्व त्यानें ।। सोडून सारे दिले त्वरेनें ।।
लावून रक्षा शरिरा, तिथूनी ।। तो बारगीरांसह जाय रानीं ।।६२।।
होता तिथें पर्वत सान एक ।। जाऊनिया त्यावरती विशंक ।।
तो बैसला वर्जुनि अन्नपाणी ।। जणो तपस्वीच तपार्थ कोणी ।।६३।।
कोणी स्वजातीय मनुष्य थोर ।। स्वारींत होता सरदार वीर ।।
मल्हारजीला कळवी ''न धैर्य ।। सोडी, अम्ही तूस अहों सहाय'' ।।६४।।
ह्यानंतरी तो सरदार गेला ।। भेटावया सत्वर पेशव्याला ।।
बोले तया ''होळकर प्रयाण ।। अन्यत्र येथून करी रुसून ।।६५।।
होणार येणें अपुली कदा न ।। लोकीं प्रतिष्ठा, हित ही तसें न ।।
सिंहां जरी काढुन दे गिरीच ।। निःसत्व होईल जनांत तोच ।।६६।।
जरी न देई विलसू स्वदेहीं ।। आकाश नक्षत्रगणा कदाही ।।
पडेल निस्तेज तरी स्वतांच ।। न हा पराचा अपराध साच ।।६७।।
मल्हारजीतुल्यजनां म्हणोनी ।। क्षुद्रापराधास्तव अंतरोनी ।।
घेऊं नये हें गमतें मनास ।। अल्पज्ञ मी काय वदूं विशेष'' ।।६८।।
रुचून हें भाषण पेशव्यातें ।। मल्हारजीतें मग तुष्टचित्तें ।।
नगावरूनी समजावुनियां ।। तो आणवीं सत्वर पूर्व ठायां ।।६९।।
मल्हारजी जी अवधूतवृत्ति ।। धरी, तिथेची करुनी निवृत्ति ।।
त्या पेशवा तोषवि शांतवोनी ।। भक्ता जणो देवच काय कोणी ।।७०।।
हा पेशवा नंतर मान्यतेनें ।। मल्हारजीला अपुल्या धनानें ।।
समुद्र मेघास जसा जलानें ।। प्रसन्न चित्तीं करि त्याप्रमाणें ।।७१।।
मल्हारजी होळकरांत वर्य ।। ह्या वित्तलाभें तुरग स्वकीय ।।
करी शतानें अधिक त्वरेनें ।। शूरत्वकृत्येंहि पराक्रमानें ।।७२।।
दावून मोठें कुशलत्व शौर्य ।। हा पेशवा साधुन राजकार्य ।।
स्वकीर्ति ठेवून तिथेंच, वेगें ।। फिरे रिपुश्रीसमवेत मागें ।।७३।।
हें सैन्य एके दिनिं पेशव्याचें ।। एक्या प्रदेशामधिं काननाचे ।।
छाया तरूंची बघुनी विशाल ।। वस्ती करी तींत तदा खुशाल ।।७४।।

एकीकडे सोडुन सैन्य सर्व ।। थोड्या मनुष्यांसह बाजीराव ।।
शोभे वनश्रीवसती जणो जी ।। त्या अंबराईमधिं जाय राजी ।।७५।।
ह्या आडवाटें अनुयायिसार्ध ।। मल्हारजी होळकर प्रसिद्ध ।।
घेऊन संगें तृण येत होता ।। तो ह्या स्थलीं ये अवचीत आतां ।।७६।।
संगें वनश्रारमणी अपूर्व ।। घेऊन जों चोरून बाजीराव ।।
होता, तया तोंच चहूंकडूनीं ।। मल्हारजी वाढे तुरंगमांनीं ।।७७।।
मल्हारजी नंतर सावकाश ।। त्या अंबराईंत करी प्रवेश ।।
देखोनियां सन्निध बाजिराव ।। वंदी तयातें अभिमान पूर्व ।।७८।।
तेव्हां तयाच्या कृतिच्या स्मृतीनें ।। मल्हारजीच्या हृदयीं त्वरेनें ।।
कोपार्क थोडा प्रकटून दीप्त ।। तद्देह तापे जणु सूर्यकांत ।।७९।।
तो बोलला ''केवळ त्या घडीस ।। ढेंकूळ होतें हणिलें तुम्हास ।।
उरांतुनी भल्ल न पार नेला ।। हें चांगलें होय गमें मनाला'' ।।८०।।
वीरास शोभाप्रद फार साचा ।। अहंकृतीचा बहु धाडसाचा ।।
उद्गार ऐसा परिसून त्याचा ।। हसून बोले सुत पेशव्याचा ।।८१।।
''तसें कराया जर पाहतास ।। तरी तुझें लग्नच त्या घडीस ।।
हस्तांतल्या ह्या तरवारिसंगें ।। लावीयलें मीं असतें सुयोगें ।।८२।।
वाणी तुझी शुद्ध धनूप्रमाणें ।। जरी विराजे बहु वक्रतेनें ।।
तरी सदा शोभसि वीर साचा ।। गुणाप्रमाणें सरलांतराचा ।।८३।।
आवेश ऐसा तव मी बघून ।। तुझ्यावरी फार असें प्रसन्न ।।
मी पेशवा होइन, तूंस एक ।। देईन तेव्हां अधिकार ठीक'' ।।८४।।
बोले तया होळकर प्रवीर ।। की ''आपणासन्निध लोक थोर ।।
जरी आम्हांला धरतील हातें ।। पावूं अम्हीही तरी उन्नतीतें ।।८५।।
महाजनांचा महिमा असाच ।। नीचोन्नतीला करणार साच ।।
धरून शंखाहि करीं हरीनें ।। त्या धन्य केलें जनवंदनानें'' ।।८६।।
प्रभाकरापासुन, संगमास ।। त्यजून जैसा ग्रह सप्रकाश ।।
तैसा सुतापासुन पेशव्याचे ।। स्थानीं रिघे होळकर स्वताचे ।।८७।।
उद्यानरूपी यवनप्रदेश ।। भेदोनिया, त्यांत करून नाश ।।
गजावलीतुल्यपराक्रमाची ।। अजिंक्यसेना मग पेशव्याची ।।८८।।
यशःप्रभा वीज जणो धरून ।। जणो धनानें उदकें फुगून ।।
येई त्वरें ते तेथुन दक्षिणेला ।। भासे मनाला जणु मेघमाला ।।८९।।युग्म।।

•

## ।। भाग तिसरा ।।

मल्हारजी सांप्रत मातुलाचे ।। गेहीं वसोनी अपुल्या श्रमाचे ।।
निवारणातें करि काल कांहीं ।। जसा दिनांतीं रवि दिव्यदेही ।।१।।
जिची स्वरूपाविशिं फार आख्या ।। कन्या अशी सुंदर गौतमाख्या ।।
होती तयाच्या प्रिय मातुलास ।। रम्या रमा ज्यापरि सागरास ।।२।।
उपवर स्थित सांप्रत ही असे ।। तरुणता शरिरीं उदिता दिसे ।।
विकसिता लघुशी कळि ज्यापरी ।। तशिच ही विलसे गुणसुंदरी ।।३।।
कन्या अशी पाहुन सूज्ञ तात ।। विचार ऐसा करि तो मनांत ।।
जैसा सुभद्रेप्रत सव्यसाची ।। भाचा स्वतांचा वर हा तसाची ।।४।।
ह्या योजनेला जननी तियेची ।। कदा न होती अनुकूल साची ।।
''पाहून कोणी वर भाग्यवंत ।। द्यावी सुता त्या'' धरि ती मनांत ।।५।।
जैशी महाविस्तृत अद्रिमाला ।। महानदीसागरसंगमाला ।।
मध्यंतरी विघ्न करी तसेंची ।। योगाप्रती ह्या जननी तियेची ।।६।।
त्यागून वेगें अबलाविचार ।। कन्येप्रती बारगळप्रवीर ।।
मल्हारजी होळकराग्रणीला ।। देई रमा सिंधु जसा हरीला ।।७।।
सीतेवरी राघवराम जैसा ।। मल्हारजी प्रेमळ कांत तैसा ।।
प्रीति स्वपत्नी वरतीच ठेवी ।। स्वप्राण त्यातें गणि तीहि साध्वी ।।८।।
हें वृत्त झाल्यावर रुष्ट मामी ।। लागे कराया कुरकूर धामीं ।।
बोले ''घरीं फार तुरंग झाले ।। म्हणून आतां व्यय हा न तोले'' ।।९।।
तुरंगवृद्धी करण्यास मूळ ।। मल्हारजीशौर्यच हो विशाल ।।
म्हणून त्याच्या हृदयास साच ।। ही उक्ति कापी जणु कर्तरीच ।।१०।।
बांडेगृहीं वारगिरी स्वतांची ।। करावयाला दृढता मनाची ।।
करून, तेथून निघावयाचा ।। विचार तो व्यक्त करी स्वतांचा ।।११।।
पाहून त्याच्या बहु आग्रहास ।। मामा तयाचा अनुमोदनास ।।
देऊन उत्तेजित फार त्याला ।। करी रणीं गाजविण्यास भाला ।।१२।।
ह्यानंतरी सुंदरगौतमेची ।। आणी तिच्या प्रेमळ वल्लभाची ।।
एकीकडे गांठ पडे सुखाची ।। की भूमिभागीं विधुरोहिणीची ।।१३।।
नथ अमोलिक जी तिचिया प्रभें ।। जणु वसंतऋतूंतिल रम्यभें ।।
बहु सुशोभित, जें बुरख्यामधीं ।। खुलतसे जणु पर्णगणामधिं ।।१४।।
स्ववदनांबुज रम्य असें निकें ।। धरून, स्वालति ती स्मित थोडकें ।।
करून, बाजुस हंसगतीमधीं ।। सरून होय सलज्ज मनामधीं ।।१५।। युग्म ।।

लावण्यशोभा बघुनी अपूर्व ।। मल्हारजीचा स्थिरदेह सर्व ।।
हो विस्मयें कंपित, त्यांत भासे ।। देवीच संचार करी स्वतोषें ।।१६।।
घोटाळुनी किंचित तो म्हणाला ।। ''ऐशी सदानंदनदी विशाला ।।
त्यजून, वाटे, न कुठेंच जावें ।। वाटे सदा तींतच मग्न व्हावें ।।१७।।
परंतु पुष्टाजगराप्रमाणें ।। भूभार एके स्थळीं आळसानें ।।
होऊन बुध्या दिन घालवावे ।। हें गोड वाटे न मला स्वभावें ।।१८।।
तरी क्षणाचाहि तुझा वियोग ।। करी सदाही ममचित्त भंग ।।
होऊनियां मी निरुपाय आतां ।। निरोप घेतों तव दुःखदाता'' ।।१९।।
प्रियवचाप्रत ऐकत गौतमा ।। उतरतो खरकन्मुखचंद्रमा ।।
रुचिर मान जरा लचकावुनी ।। पदर ती चुरि दुःखित होउनी ।।२०।।
प्रीती अशी व्यंजित गौतमेची ।। पाहोनिया होळकराग्रणीची ।।
हो तुष्टि, आनंद सहस्त्रधारा ।। चित्तास त्याच्या फुटल्या झरारा ।।२१।।
समपि जाऊन तिच्या हनूला ।। धरून तो तीस तदा म्हणाला ।।
''हे सुंदरी उत्तर का न देशी? ।। कां तूं मनुत्साह न वाढवीशी'' ।।२२।।
''घेऊन संगें मजला चलावें ।। कोणीकडेही मग दूर जावें'' ।।
तनूर्ध्वभागाप्रत डोलवीत ।। ती बोलली लाजत भीतभीत ।।२३।।
''नेईन संगें तुज योग्य कालीं ।। धरू नको आग्रह तूं अकालीं'' ।।
बोलून ऐसें तिजला प्रसन्न ।। करून तो जाय बळें तिथून ।।२४।।
तो नंतरी उत्सुकतें तिथून ।। नंदूरबाराख्यपुरा रिघून ।।
बांडेगृहीं होय विराजमंत ।। जाळींतुनी सिंहच की वनांत ।।२५।।
निजामअल्लीसह संगराचा ।। येई स्वरें योग पुढें यशाचा ।।
मल्हारजीही समरप्रसंगा ।। त्या शोभवी दावुन शौर्यरंगा ।।२६।।
प्रमत्तयोद्धा यवनप्रवीर ।। होता रणीं एक सगर्व थोर ।।
मल्हारजी सर्सुन त्याजवर्ती ।। उड्डाण वेगें करि शौर्यमूर्ति ।।२७।।
तो म्लेंछही सर्सुन अग्रभागीं ।। काढून वक्षःस्थळ बाह्यभागीं ।।
डौलांत जंब्या हलवीत शीघ्र ।। येई जणो राक्षस काय उग्र ।।२८।।
भल्लप्रहारें अतिशीघ्रतेनें ।। जंब्याच तो होळकराग्रणीनें ।।
अधःस्थलीं पाडियला सुदूर ।। तेणें चिडे म्लेंच्छ मनांत फार ।।२९।।
तो क्रुद्ध घोडा भरधांव काढी ।। क्षणामधीं होळकरास वेढी ।।
मल्हारजी ह्यासमयीं स्ववाजी ।। त्यजून भूमिस्थित होय गाजी ।।३०।।
होतांच भूमिस्थित फार वेगें ।। भिडून त्याशीं निमिषांत अंगें ।।
ओढून अश्वावरूनी तयास ।। मल्हारजी हो स्थित झुंजण्यास ।।३१।।

ठोकूनि दंडाप्रत काडकाड ।। करून तैसा रणशब्द चंड ।।
मल्हारजी त्यावर झांप घाली ।। की सिंह सांडावर शौर्यशाली ।।३२।।
त्याची गचांडी धरुनी सवेग ।। दोर्दंडयुग्मीं चुरुनी तदंग ।।
नैपुण्य पेंचांमधलें अपूर्व ।। दावून तद्गर्व हरून सर्व ।।३३।।
करूनिया जर्जर याप्रमाणें ।। मल्हारजी वीर पराक्रमानें ।।
त्या म्लेंच्छवीरा अदळी धडाडा ।। की राक्षसातें बलभीम गाढा ।।३४।। युग्म ।।
सामर्थ्य योजून तदा समग्र ।। स्वशस्त्र वेगें उपसून उग्र ।।
मल्हारजी कंदुकतुल्य त्याचा ।। करी शिरश्च्छेद सगर्व साचा ।।३५।।
हें कृत्य शूरत्वविशिष्ट मोठें ।। देखोनि योद्धे अवघे मराठें ।।
'शाबास! शाबास!' मुखें म्हणालें ।। शत्रू तसे फार मनांत भ्याले ।।३६।।
मल्हारजीशौर्य बघून गाढें ।। प्रसन्न होऊन गुणज्ञ बांडे ।।
देई तदा पंचविसा ह्यांचें ।। मल्हारजीला पतक स्तुतीचें ।।३७।।
पुढें, सदाही जयवंत झेंडे ।। घेऊन सेनापति आणि बांडे ।।
जाण्या निघाले गुजराथदेशीं ।। मार्गांत तापीतटिं हो निवासी ।।३८।।
पराक्रमी सैन्यहि पेशव्याचें ।। तापीतटीं ह्या समयास पोंचे ।।
हे वीर एकेस्थळिं मिश्र होतां ।। हो त्याक्षणीं ह्यापरि भास चित्ता ।।३९।।
नक्षत्रसंघामधिं ज्याप्रमाणें ।। आकाशगंगा अतुलप्रभेनें ।।
तापीनदी हो बहु त्यासमान ।। ह्या वीरसंघांत विराजमान ।।४०।।
ह्या दोन सैन्यांत पुढें प्ररूढ ।। कांहीं निमित्तें कलह प्रचंड ।।
होऊन दोन्हीकडचेहि लोक ।। उद्युक्त झाले लढण्या अनेक ।।४१।।
पाहोनि ऐसा कलहाग्नि थोर ।। मल्हारजी होळकरप्रवीर ।।
सिंधूपरी क्षुब्ध अशा समाजीं ।। शिरून बोले सकलांस गाजी ।।४२।।
''हे वीर हो! हे यवनारिवीर! ।। स्वदेशमुक्तिव्रतधारिवीर! ।।
हे भीष्मभीमांपरि शूरवीर ।। कृष्णार्जुनातुल्य यशस्विवीर! ।।४३।।
वीरास जें योग्य न कृत्य साच ।। त्यातें तुम्ही आचरण्या स्वतांच ।।
उद्युक्त झालां सगळेच कैसें! ।। आश्चर्य वाटे मजला बहूसें ।।४४।।
जीं म्लेंच्छरक्तास सदा पिणारीं ।। तीं नग्न शस्त्रें तुमचीं कहारीं ।।
योजावयाला अपसांमधींच ।। आहेत का पात्र कदाहि साच? ।।४५।।
जे नाचणारे रणिं नेहमींचे ।। छातीवरी खानपठाण यांचे ।।
ते उग्र भाले स्वजनांतरास ।। आहेत का पात्र विदारण्यास? ।।४६।।
ज्यांनी यमाचे वसतीस जाणा ।। धाडीयले सय्यदशेख नाना ।।
ते तीव्र खांडे दिसतात पात्र ।। तुम्हाप्रती का वधण्या स्वमित्र? ।।४७।।

जे मोगलांचे मनिं बिंबवीती ।। योद्धा मराठा जणु कालमूर्ती ।।
ते बाण, बर्च्या, तरवारि, तेगे ।। का पात्र येथें धरण्यास वेगें? ।।४८।।
बाणा मराठी विसरून गेला ।। कां आज? हो काय तरी तुम्हाला? ।।
बाणा मराठी-यवनांस दंड ।। देणें, असा तो विलसे अखंड ।।४९।।
ही गोष्ट कां आज तुम्हा स्मरेना? ।। कां दंड देण्या बघता स्वतांना?।।
येणें मराठी बिघडेल जूट ।। लक्षांत हें आणित कां न नीट? ।।५०।।
हें घ्याल लक्षामधिं कां जरी न ।। जैसा गजा अंकुश त्यासमान ।।
हा जूट ज्या वांकवि सार्वकाल ।। तो म्लेंच्छ डोकें वरती करील ।।५१।।
डोकें तयानें वरती करून ।। देऊनियां ताव मिशांवरून ।।
घरा लुटावें तुमच्या, बरें हें। वाटे तुम्हां काय? मला कथा हें ।।५२।।
घरा लुटोनि मग उन्मदानें ।। कुलीन नारी तुमच्या बलानें ।।
त्यांनीं छळाव्या जणुकाय रानीं ।। मृगी बहू निर्दय लांडग्यांनीं ।।५३।।
छळोनि नारी मग त्या खलांनीं ।। दासी तयांना अपुल्या करोनी ।।
स्वकीय बीबींजवळी तयांस ।। ठेवून द्यावें पद सेवण्यास! ।।५४।।
हें गोड वाटे तुमच्या मनास ।। म्हणून आता करिता स्वनाश? ।।
जाई मराठ्यांतिल काय पाणी! दुर्बुद्धि ऐशी सुचते म्हणोनी ।।५५।।
जो म्लेंच्छ बारा रणिं शीघ्र कापी ।। स्वदेह एकेक असा प्रतापी ।।
विध्वंसुनीयां अपुल्याच हातें ।। कां अप्रतापी करितां तयातें? ।।५६।।
जें नाम होणार पराक्रमानें ।। स्तुत्यर्ह आणि अमर क्रमानें ।।
तें निंद्य आणि चिरनष्ट साच ।। कां हो! स्वतांचें करिता उगींच? ।।५७।।
प्रताप ज्यांचा जगिं जागरूक ।। असे महादैवत काय एक ।।
ज्यांनीं सुकृत्यें करूनी अनेक ।। स्वनाम केलें चिर निष्कलंक ।।५८।।
त्या पूर्वजांचे बहुशूरवंशी ।। जन्मूनियां आपण शौर्यराशी ।।
स्वबंधुहत्या करूनी सदाही ।। दोषी करावें शुभनाम तेंही! ।।५९।। युग्म ।।
हें योग्य आहे अपणास काय? म्हणून ऐसें करण्या अकार्य ।।
उद्युक्त होता! शिव! राम! राम! ।। विषाद चित्तास गमे प्रकाम ।।६०।।
हे बांधवांनो। जरि कां तुम्हांस ।। स्वलौकिकाची बहु होय आस ।।
स्वधर्म व्हावा न कदापि नष्ट ।। वाटे तुम्हांतें जरि हें अभीष्ट ।।६१।।
नानाप्रकारें पिडिल्या स्वभूची ।। येते जरी कींव तुम्हांस साची ।।
स्वराज्य सर्वत्र सदा खुलावें ।। वाटे तुम्हांते जरि हें स्वभावें ।।६२।।
स्वदेश निर्म्लेंच्छ करावयाचा ।। असेल गेली जरि ही स्ववाचा ।।
स्वतंत्रता हीच वरावयाची ।। आहे प्रतिज्ञा जरि ही स्वतांची ।।६३।।

सारांश-सर्वत्र सदा सुखाचा।। ''स्व'' हाच शुद्ध श्रुत आवडीचा।।
व्हावा तसा शब्द ''पर'' प्रणष्ट।। वाटे तुम्हांतें जरि हें अभीष्ट।।६४।।
तरी पहा हींच भयाण भारी।। नग्नास्त्रशस्त्रें तुमचीं कहारीं।।
आवेश तैसा अनिवार्य हाच।। भयंकर क्रोध तदेव हाच।।६५।।
बा! पावलेले स्फुरणास हेच।। विशालबाहू तुमचे तसेंच।।
या सर्व गोष्टींसहवर्तमान।। चला त्वरें सर्व तुम्ही इथून।।६६।।
चला कुठें? म्लेंच्छ बहुप्रमत्त।। ठोकावया शीघ्र चला रणांत।।
ठोकोनि त्यांचा करूनी चुराडा।। लावूं यशाचा जयवंत झेंडा''।।६७।।
मल्हारजीहोळकराग्रणीचें।। ऐकोनि हें भाषण सुज्ञतेचें।।
रुद्रावतारी जणु हे प्रवीर।। झाले स्वचित्तामधिं शांत फार।।६८।।
संतापदावानल पेटुनीयां।। विवेककल्पद्रुम जो जळाया।।
पाहे, तया वाचविलें त्वरेनें।। ह्या दाटशा भाषणवर्षणानें।।६९।।
हें पेशव्याला श्रुत वर्तमान।। होतांच आश्चर्य बहू गमून।।
मल्हारजीतें बहुगौरवानें।। बोलाविलें सन्निध शीघ्र त्यानें।।७०।।
मल्हारजीतें बघतां तयातें।। येई स्मृती जो करि भांडणातें।।
स्वारींत दिल्लीवरच्या स्वतांशीं।। तो वीर हाची गुणशौर्यराशी।।७१।।
मल्हारजीसन्निध दिव्यरत्न।। स्वसैन्यकोशांत विराजमान।।
व्हावें सदा, हें बहु त्याघडीस।। वाटे गुणग्राहक पेशव्यास।।७२।।
त्यातें दिलेल्या वचनास तेव्हा।। स्मरून आणीक मनांत एव्हां।।
मागून बांडेकदमाकडूनी।। घे पेशवा होळकरा स्वसेनीं।।७३।।
मल्हारजी वीर रणीं अजिंक्य।। जाणोनि हें पंचशताश्वमुख्य।।
त्या पेशव्यानें करूनी स्वचित्तें।। स्थापीयलें योग्यपदीं तयातें।।७४।।
स्वारी पुढें ही यवनप्रदेशीं।। पडूनि विद्युत्सम दीप्तिराशी।।
स्वराज्य हें तोय जणो जिवंत।। उत्पादुनी ती परते पुण्यांत।।७५।।
[१] माजे पुढें जें रण खानदेशीं।। मल्हारजी त्यामधिं शौर्यराशी।।
करी, हटें झुंजुनि फार, साचें।। वीराग्रणीत्व प्रकट स्वताचें।।७६।।
स्ववीररूपी जणु भोवऱ्यांत।। घेरोनि तो म्लेंच्छ तदा प्रमत्त।।
रसातळीं घालुनि त्यांस वेगें।। दाऊदखानास पिटाळि आंगें।।७७।।

---

१ हे खानदेशांतले युद्ध इसवी सन १७२४ मध्यें झालें. ह्यांत बऱ्हाणपूर येथील सुभेदार अजीमुउल्लाखान याचा सरदार दाऊदखान यांस शिंदे होळकर यांनीं पूर्ण पराजित करून पिटाळून लाविलें.

कर्नाटकाभीतरिं पेशव्यानें ।। [2] स्वारी नृपाज्ञें बहुशूरतेनें ।।
केली महाजी मग तींत शूर ।। मल्हारजी होळकरप्रवीर ।।७८।।

कीं दक्षिणेची ध्रुवकांति अन्य ।। प्रख्याति ऐसी अपुली अनन्य ।।
स्थापी तिथें तो अढळ, स्वकीय ।। दावोनि युद्धांत अपूर्व शौर्य ।।७९।।

[3] पुढें निजामासह पेशव्याचें ।। प्रख्यात मोठें रण शूरतेंचें ।।
गोदातटीं होय पलीकडे जें ।। मल्हारजी त्यांत बहू विराजे ।।८०।।

तो ह्याप्रसंगीं अपुले जिवाचे ।। घेऊनि योद्धे रणशूर साचे ।।
सावेश वेगें गरुडासमान ।। म्लेंच्छोरगीं शीघ्र पडे तुटून ।।८१।।

तो देत धीर स्वमुखें स्ववीरा ।। युद्धीं स्वकाया करूनी पुढारा ।।
स्वचित्त लाभीं धरूनी जयाचे ।। झुंजे स्वकार्यें स्वमनें स्ववाचें ।।८२।।

तेव्हां तयाचा अति उग्र मल्ल ।। विद्युल्लतेतुल्य सदा विलोल ।।
विराजुनीयां, यवनोदरांत ।। घुसे जणो दारुण दैत्यदंत ।।८३।।

हें शौर्य, हें धाडस, हा प्रताप ।। पाहोनियां म्लेंच्छ शिखंडिरूप ।।
होऊनि भाल्याप्रत फार भ्याले ।। घेऊनियां जीव पळोनि गेले ।।८४।।

मल्हारजी आणि दुजे प्रवीर ।। ह्यांनीं असा विक्रम फार थोर ।।
रणांत केला, यवनेश तेणें ।। हो पेशव्याला नत पूर्णतेनें ।।८५।।

श्रीमंत तेव्हां मनिं हृष्ट फार ।। जो लाभ हो त्यांतुन जाहगीर ।।
मल्हारिला देउनियां बरीच ।। करी तयातें कृतकृत्य साच ।।८६।।

---

२ इ. स. १७२६ मध्यें बाजीराव पेशवे आणि फत्तेसिंग भोसले ह्यांनीं ही स्वारी कर्नाटकावर केली होती.

३ हे गोदावरीपलीकडे निजामासहवर्तमान झालेलें युद्ध इ. सन १७२८ मध्यें घडलें. ह्या युद्धांत मल्हारराव होळकराने फार पराक्रम केला म्हणून त्यास पेशव्याने बारा परगण्यांची जहागीर करून दिली.

## ।। भाग चवथा ।।

स्वराज्यहानी करण्या प्रवृत्त ।। जो जाहला अल्पविवेकयुक्त ।।
[१]दाभाडिया त्या वधुनी रणांत ।। होतां मराठे मग एकचित्त ।।१।।
चोंहीकडे सर्सुनि पेशव्याचे ।। झेंडे यशस्वी चिरकाल साचे ।।
लावावयां वीर अनेक हर्षी ।। वेगें निघाले यवनप्रदेशीं ।।२।।
योद्धें मराठे बलशौर्ययुक्त ।। स्थापावया संतत उत्तरेंत ।।
सत्ता स्वतांची अवघे मिळून ।। होते विशेषेंकरुनी झटून ।।३।।
सिद्ध त्वरें ह्यासमयास ठीक ।। करूनियां सैन्य विशाल एक ।।
[२]तें माळव्याभीतरिं धाडिण्याचें ।। श्रीमंत चित्तांत अणी स्वतांचे ।।४।।
प्रसिद्धयोद्ध्याचीं चिमणाजिपंता ।। सेनापती मुख्य करूनि आतां ।।
नांवाजलेले समरीं अनेक ।। दे पेशवा त्यासह वीरलोक ।।५।।
अनेकयुद्धीं मिळवोनि कीर्ति ।। मल्हारजी सांप्रत शौर्यमूर्ति ।।
लोकांत गाजें सरदार साचा ।। विश्वाससिंधू जणु पेशव्याचा ।।६।।
ह्या थोर सेनेमधिं तुष्टचित्तें ।। बिनीवरी नेमुनि मुख्य त्यातें ।।
आज्ञापिले त्याप्रत पेशव्यानें ।। प्रवेश तेथे करण्या त्वरेनें ।।७।।
स्वकीय मोठ्या अनिवार्य ओघीं ।। अल्पप्रवाहांसम शत्रु वेगीं ।।
ओढीत, हे सैन्य पुढें प्रभावे ।। तापीस उल्लंघुनिया विसावे ।।८।।
घेऊनि योद्धे अपुले बलिष्ट ।। मल्हारजी वीर रणीं वरिष्ठ ।।
निघून तेथून बहूत वेगीं ।। हो प्राप्त विंध्याद्रि समीपभागीं ।।९।।
ह्या अद्रिच्या नंतर पैलभागीं ।। हें वर्तमान श्रुत होय वेगीं ।।
तेथील अग्रेसर हिंदुलोक ।। हो हर्षसिंधूंत बहूत गर्क ।।१०।।
ज्यापासुनी क्लेश सदाहि घोर ।। होती, असा जो यवनाधिकार ।।
तेणें तदा तेथिल लोक सर्व ।। भोगीत होते कुदशा अपूर्व ।।११।।
दयाबहादूर म्हणून आता ।। करीत तेथें अधिकार होता ।।
पाहोनि त्याचा अधिपत्यताप ।। लाजे शनीही स्वमनीं अमूप ।।१२।।
संतोषवाया यवनाधिपास ।। स्वलोभ तैसा पुरवावयास ।।
शोषी असा तो दुबळ्या जनांस ।। ग्रीष्मर्तुची विस्मृति हो न त्यांस ।।१३।।
लहान मोठे अधिकारि तैसे ।। वित्त प्रजेचें हिसकीत ऐसें ।।
निःसत्व पोळी मधुमक्षिकांची ।। जैशी, प्रजा त्यापरि होय साची ।।१४।।

---

१ इ. स. १७३१ मध्यें त्र्यंबकराव दाभाडे, बाजीरावाबरोबर युद्ध करून लढाईंत पडला.

२ ह्या माळव्याच्या स्वारीस इ. सन. १७३२ मध्यें सुरुवात झाली.

ह्या म्लेंच्छराज्यें जन गांजलेले ।। होते असे कीं बहु कोपलेले ।।
स्नेहें कुणी मेळवितां तयांतें ।। ते सिद्ध होते भडकावयातें ।।१५।।
संतप्त कां ते नसणार पोटीं ।। विटंबना नित्य अशीच मोठी ।।
त्यांची घडे ह्या यवनांकडून ।। प्रत्येक कर्मीं पशुच्या समान ।।१६।।
धरून भेद ''स्वपर'' स्वचित्तीं ।। हे म्लेंच्छ काकांसम नीचवृत्ति ।।
त्या श्रेष्ठ हंसांसम हिंदुलोकां ।। गर्वें हिणावूं जर लागले कां ।।१७।।
तरी तयांचा अभिमान कैसा ।। सोशील मोठा अपमान ऐसा?।।
राखावयातें स्वमहत्व थोर ।। होतील जीवावरही उदार ।।१८।।
जो हिंदुचा धर्म अनादि थोर ।। मांडोनि त्याची छलना अघोर ।।
फोडोनि तीर्थांतिल पूत मूर्ति ।। पाडोनियां जाळुनि मंदिरें तीं ।।१९।।
करोनियां गोवध देउळांत ।। घुसोनि आंगें यतिंच्या मठांत ।।
थुंकोनि तोंडावरती तयांचे ।। लाथाळुनी नंतर त्यांस साचें ।।२०।।
यज्ञोपवीतें हरुनी द्विजांचीं ।। की आंतडीं तोडुनि काय त्यांची ।।
देऊनियां दुर्धर वेदनेस ।। स्वधर्मदीक्षा दिधूनी जनास ।।२१।।
विटंबुनी संतत हिंदुलोकां ।। ऐसा अनाचार अविंध ते कां ।।
संपूर्णभागीं करण्यास ऐसे ।। प्रवृत्त झाले जरि दैत्यवेशें ।।२२।। कलापक ।।
''हे अन्यधर्मांतिल हिंदु सर्व'' ।। म्हणून ते म्लेंच्छ सदा सगर्व ।।
स्वराज्यनीतिमधिं पक्षपातें ।। जाचूनि भागी इतुकें तयांते ।।२३।।
कीं सर्व धर्माचरणांवरीही ।। द्वेषें करा बैसवुनी सदाही ।।
त्यांच्या शवींही कर ठेवण्यातें ।। उद्युक्त झाले जरि दुष्टचित्तें ।।२४।। युग्म ।।
संपूर्ण त्यांच्या तरि चित्तवृत्ति ।। क्षोभून भारी जणु सिंधुमूर्ति ।।
संताप त्यांचा जणु नक्र काय ।। तेव्हां न कां तो उसळून जाय? ।।२५।।
तदीय अंतःकरणा घरेंच ।। तेव्हां न कां तीं पडणार साच? ।।
कां अंतरात्मा न जळेल त्यांचा? ।। कां प्राण कासाविस हो न साचा? ।।२६।।
कां म्लेंच्छकंठास पिळून दाबूं ।। कां घोट घेऊं जबड्यांत कोंबू?
चिरून फाडून, करून चिंध्या ।। कां मोक्ष देऊं यवनांस सध्या? ।।२७।।
त्यांच्या मनाची स्थिति ह्याप्रतीची ।। अतर्क्य दुःसह्य असून साचीं ।।
सूड स्वतांचा उगवावयातें ।। ते लोक सारे टपुनीच होते ।।२८।।
संत्रस्त ठाकूर असे तिथून ।। दिल्लीपतीसन्निध ये उठून ।।
ह्या दुःखमुक्तीकरिता तयांनीं ।। प्रार्थीयलें त्यास तदा नमूनी ।।२९।।
नाजूक दिल्लीपति ह्या घडीस ।। घेऊनि नाना तरुणीजनांस ।।
अंतगृहीं हास्यविनोदलीला ।। करीत होता बहु रंगलेला ।।३०।।

कांताभुजीं बद्ध सदा असोनी ।। हौशी असा हा यवनेश चैनी ।।
गानांत नृत्यांत असून गुंग ।। होता विलासांमधिं फार दंग ।।३१।।
मधुरगान रणांतिल शब्दची ।। जणु मृदंग रणांतिल वाद्यची ।।
नयनबाण रणांतिल बाणची ।। मदनराज रणांतिल शत्रुची ।।३२।।
गणुनि, पावुनियां स्फुरण स्वतां ।। यवनराज तयासह झुंजतां ।।
रणिं पराभव पावुनि दुर्यशें ।। रिपुसमीप चतुर्भुज तो असे ।।३३।। युग्म ।।
होती तिथें एक मनोज्ञसुंदरा ।। कीं बोलती चालति कामकंदरा ।।
दिल्लीपती तींत निबद्ध निर्भर ।। केला असे त्या मदनें निरंतर ।।३४।।
बादशाहि जणु मूर्तिमंत की ।। हीच रम्य तरुणी असे निकी ।।
त्यास होउनि असें तदा तिचे ।। सेवनाविण दुजें न त्या सुचे ।।३५।।
करोनियां सुंदरशी अरास ।। गुलाल याची उधळीत रास ।।
विलासिनींच्या धरुनी करांस ।। खेळे सदा हा यवनेश रास ।।३६।।
स्त्रीकंकणांचा ध्वनि थोर कानीं ।। जो होय तेणें जनदीनवाणी ।।
ही त्यास ऐकूं न च ये म्हणोनी ।। गेले निराशें जन ते तिथूनी ।।३७।।
देशांत ह्या जो जयसिंगराय ।। द्वितीय होता जणु इंद्र काय ।।
करावया सत्वर दुःखहानी ।। प्रार्थीयलें त्यास पुढें तयांनीं ।।३८।।
जो पेशवा विष्णुसमान त्यास ।। प्रार्थूनिया सांगुनि संकटास ।।
''आणा मराठ्यांप्रत शीघ्र येथें'' ।। हें ह्या नृपानें कथिलें तयांतें ।।३९।।
पुढें मराठे रिघतां समीप ।। ह्या तप्तलोकां रुचले अमूप ।।
छाया जशी तप्तजनासमीप ।। वाढोनि येतां रुचते अमूप ।।४०।।
मल्हारजी हा गरुडासमान ।। तेथील लोकांस तदा गमून ।।
तो पेशवा त्यापरि त्यांस साच ।। पृष्टीं तयाचे गमला हरीच ।।४१।।
नक्रापरी ग्रासुन जो अविंध ।। आहे तयापासुनिया अबाध ।।
होऊं गजेंद्रासम मुक्त वेगें ।। ऐसें जनाच्या मनिं फार वागे ।।४२।।
इंदूरनामें प्रगण्यांत थोर ।। संपन्न मोठा बलशालि फार ।।
कोणी तदा चौधरि नंदलाल[३] ।। सर्वत्र विख्यात असे सुशील ।।४३।।
त्या त्रस्तसंतापित ठाकुरांनीं ।। योद्ध्या मराठ्यांप्रत त्या ठिकाणीं ।।
आणावयाचें प्रमुखत्व त्यातें ।। होतें दिलें ह्यासमयीं स्वचित्तें ।।४४।।
मल्हारजी होळकरासमीप ।। स्वदूत तो सांप्रत गुप्तरूप ।।
धाडुनि त्यातें कळवी ''त्वरेनें ।। या; साह्य आम्ही करुं निश्चयानें'' ।।४५।।

---

३ राव नंदलाल चौधरी इंदूर परगण्याचा जमींदार म्हणजे मुख्य अधिकारी होता. ह्याचे वंशज सध्या इंदुरांत चांगल्या स्थितींत आहेत.

ह्या नंदलालें मग घाटवाटा।। करोनिया मुक्त जणो कपाटां।।
दिला मराठ्यांप्रत मार्ग आंत।। रिघावया सत्वर माळव्यांत।।४६।।
धिप्पाड भीमाकृति फार पुष्ट।। योद्धे मराठे मग हे बलिष्ठ।।
हे वीर ऐसे, खुलती जयांचे।। वक्षःस्थळीं घाव बहू रणींचे।।४७।।
करोनियां धाडस शूरतेनें।। युद्धीं रिपूंचीं हरिलीं निशाणें।।
म्हणोनि तोडे स्वपराक्रमाचे।। विराजती वामपदीं कुणांचे।।४८।।
करूनि छाती, तुटुनी पडूनी।। तोफा रिपूंच्या जितल्या म्हणूनी।।
हस्तीं कुणांचे बहुमोल साचीं।। मोठीं कडीं शोभति कांचनांचीं।।४९।।
सेनापतींतें रिपुंच्या लढून।। खेळून कुस्ती अणिलें धरून।।
अमोल कंठ्या म्हणुनी कुणांच्या।। गळ्यांमधीं शोभति मोतियांच्या।।५०।।
जे स्वप्रतापार्जित तेंच देहीं।। असूनिया भूषण, अन्य कांहीं।।
नसूनि हे वीर बहूत साधे।। जणो दुजे राघववीर योद्धे।।५१।।
आहेत ज्यांच्या कटिं मांडचोळणे।। बंड्या तसे अंगरखे नवे जुने।।
आहेत आंगीं, तशिं थोर धाकुटीं।। साधीं मराठीं शिरिं घट्ट पागुटीं।।५२।।
ते काठियावाड सतेज गाजी।। जंघाल ते भीमथडी सुवाजी।।
दुजेहि तैसे अतिवेगि नाना।। आहेत वारू बसण्यास ज्यांना।।५३।।
म्लेंच्छ स्वदेशांतुनियां खणोनी।। जें काढणें तेंच जणो गणोनी।।
स्वभूमिचें नांगरणें, निघाले।। आहेत जे घेउनि उग्र भाले।।५४।।
वा कापणें म्लेंच्छ रणांत हेंच।। की माजलेलें तृण कापणेंच।।
गणोनि, खांडा करुनी विळाच।। सर्सावले जे असती खरेच।।५५।।
ढोरें जणो म्लेंच्छच जे तयांचे।। पाठीवरी ओढित काठियांचे।।
रट्टे, रणीं त्या वळवोनि, मागें।। आहेच जे संतत फार वेगें।।५६।।
स्वदेशचें वैभव थोर हेंच।। शेतांतलें पीक अपार साच।।
राखावयातें तरवार हीच।। करोनियां गोफण घोर साच।।५७।।
अविंध जे भासति भोरड्याच।। निवारुनी त्यां दिनरात्र साच।।
आकाशपंथीं उडवोनि त्यांतें।। जे देत आहेत सदा स्वहस्तें।।५८।।
ऐसे मराठे रणशूर वीर।। विस्तीर्ण रेवा उतरोनि पार।।
चढोनियां भैरवघाट गुप्त।। प्रवेशले सत्वर माळव्यांत।।५९।।
तापे उन्हाळा अतितीव्र आतां।। तो मास तापप्रद चैत्र होता।।
होतें असें ऊन तदा प्रचंड।। बाहेर तें काढुं न देइ तोंड।।६०।।
सर्वत्र आहे अशि सामसूम ती।। तो निर्जन प्रांत गमे सभोंवती।।
धूलींत जे श्वेतरजः कण स्थित।। आहेत तेजें कधिं ते चकाकत।।६१।।

धरून थारा पशुपक्षि छायीं ।। आहेत सारे स्थित ठाइठायीं ।।
नभामधीं घारच मात्र एक ।। घालीत आहे धिरट्या अनेक ।।६२।।
कदा कदा पंख विहंगमांचे ।। निःशब्दापर्णांत तदा तरूंचे ।।
हालून, जो शब्द उठे हळूंच ।। ओढीत आहे स्थिर लक्ष तोच ।।६३।।
होते तिथें रक्षक जे अविंध ।। टाकोनि कामें अपुलीं सबंध ।।
एकांतवासीं घुमुनी निवांत ।। आहेत ते शर्बत थंड पीत ।।६४।।
वेळीं अशा होळकरप्रवीर ।। ठाणीं रिपूंची बहु थोर थोर ।।
घेरी जणो पूर बहू विशाल ।। ग्रामें निशीं काय तटावरील ।।६५।।
तेव्हा उडे जें घनचक्र त्यांत ।। मल्हारजीनें यवन प्रमत्त ।।
उत्पाटिले देउनि त्यांस मोक्ष ।। प्रचंडवातें जणु काय वृक्ष ।।६६।।
जो म्लेंच्छ निर्धास्त पडून होता ।। उठूंच त्यालागिं दिलें न आतां ।।
जो स्वस्थ होता बसला उठून ।। उभेंच राहूं दिलें तया न ।।६७।।
उभा असे त्याप्रत हात कांहीं ।। घोड्यास लावू न दिला जराही ।।
जो स्वार घोड्यावरती तयाची ।। चांदीच केली तिथल्यातिथेंची ।।६८।।
तेव्हां उडे गोंधळ काय थोर ।। त्रेधा रिपूंची किति होय फार ।।
आंगांत आल्यापरि काय भूतें ।। दाही दिशांला पळुं लागले ते ।।६९।।
सर्वत्र जेव्हां उघड्या शिरांनीं ।। ते दाटले फारच घाबरोनी ।।
तेव्हा गमे त्यास्थळिं नारळीचें ।। उत्पन्न झालें वन काय साचें ।।७०।।
मल्हारजींने प्रखर स्वभल्लें ।। कापोनि हेंही वन दाटलेलें ।।
दाढ्या जयां थोर अशा शिरांचा ।। कीं त्याक्षणीं व्युत्क्रम नारळांचा ।।७१।।
केला जणो ढीगच, बोकडांचीं ।। कीं दाढियांनीं युत मस्तकेंची ।।
अनेक कापोनि, विशाल साचीं ।। राशी जाणो कीं रचिली तयांची ।।७२।। युग्म ।।
वार्ता दयाबाहदराप्रती ही ।। होतांच थोडी श्रुत शीघ्र तोही ।।
घेऊनियां सैन्य बलाढ्य थोर ।। आला लढाया समरीं समोर ।।७३।।
मल्हारजीही लवलाहि त्यास ।। सर्सावला टक्कर द्यावयास ।।
अविंध आणी मग ते मराठे ।। हो ह्यांत तेव्हा रणे[४] फार मोठें ।।७४।।
आहेत दोन्हीकडलेहि वीर ।। सशस्त्र सज्ज स्थित युद्धशूर ।।
पेट्या जिरे बख्तर टोप ज्यांहीं ।। आहेत केले धृत बद्ध देहीं ।।७५।।
घोड्यांवरी स्वार, तसे पदाती ।। असूनि योद्धे कुणि उष्ट्रहस्तीं ।।
भानुप्रभें शस्त्रसमूह सारा ।। ज्यांचे करीं फार चकाकणारा ।।७६।।

---

४ अमझरा व धार यामध्यें तरळें खेड्याजवळ ही लढाई इ. स. १७३२ मध्यें झाली. मराठी बखरींत लिहिलें आहे कीं, मल्हारराव होळकरानें मोठा पराक्रम करून आपल्या हातानें दयाबहादराचा शिरच्छेद केला.

दिसून, अन्यत्रहि राहणारीं ।। असंख्य शस्त्रें तशिं उग्र भारी ।।
आहेत मारीत बहू चकाकी ।। चाले तदा झुंज अपूर्व लोकीं ।।७७।।
तोफा धडाडा किर्तिं गर्जतात ।। ढगें धुराचीं जणु दाटतात ।।
गोळे विजेचे जणु लोळ त्यांत ।। दिव्यप्रभें फार झळाळतात ।।७८।।
कृतांतदंडाकृति बंदुकांचे ।। झडोनियां फेर बहू भयाचे ।।
असंख्य गोळ्या मग फार तप्त ।। पर्जन्यबिंदूसम वर्षतात ।।७९।।
जे दारुचे बाण बहू भयाण ।। ते क्रूर सर्पांपरि सर्सरून ।।
विषापरी ओकत अग्निधारा ।। जाती रणीं वक्रगती सरारा ।।८०।।
सुतारनाले किति हस्तनाले ।। जेजालयांचा रणिं मार चाले ।।
ते रेकलेही किति! गंजिफांचे ।। होतात गाडे रणिं रिक्त साचे ।।८१।।
होतात विच्छिन्न शिरें कुणांची ।। वक्षःस्थळे भग्न तशीं कुणांचीं ।।
वियुक्त होती कुणिं हस्तपादीं ।। भाजूनि कोणी पडतात युद्धीं ।।८२।।
चाले धडाका रणिं ह्याप्रमाणें ।। हो बाह्य कांहीं नर अश्व तेणें ।।
घोडे चहूंफेर पुढें सुवेगीं ।। वाऱ्यापरी धांवति सर्वभागीं ।।८३।।
मी मी म्हणोनी लढणार मोठे ।। घोड्यांवरी स्वार असे मराठे ।।
फेंकीत भल्लद्युति ह्या धुमींत ।। सर्सावलेले जणु भासतात ।।८४।।
कीं सूर्य एकेक तदा प्रतापी ।। अश्वावरी बैसुनि उग्ररूपी ।।
फेंकीत नाना किरण स्वकीय ।। आहे निघाला लढण्यास काय ।।८५।।
गतीत घोड्यांवरि भूमधील ।। ह्या वाजिंचे होउनि घृष्ट नाल ।।
खणाणसे नित्य निनाद होत ।। ज्या व्यक्त होती ठिणग्या रणांत ।।८६।।
त्या, वीर हे चालवुनी स्वभल्ल ।। स्वशत्रुचें नासिक, कर्ण, भाल ।।
छेदोनि, पाडोनि बहूत रक्त ।। तेव्हांच तेणें करितात शांत ।।८७।। युग्म ।।
ऐशा प्रतीचें रण होत होत ।। योद्धे मराठे यवन प्रमत्त ।।
छातीस छाती भिडवोनि होतें ।। झुंझावया नंतर लागले ते ।।८८।।
भासे तदा दोन ढगें अफाट ।। की खेळती झुंज रणीं अचाट ।।
कीं हस्तिंचे दोन समाज मस्त ।। निर्धास्त कुस्ती करिती प्रशस्त ।।८९।।
कोणी मराठा करिं लठ्ठ सोटा ।। धरूनि मोठा, यवनास रट्टा ।।
देउनि, जें मस्तक अत्तरानें ।। सुंगधि तें फोडि पराक्रमानें ।।९०।।
''हा काय युद्धीं टिकणार लांडा'' ।। ऐसें मुखें बोलत, उग्र खांडा ।।
कोणी मराठा खुपसी तयाचे ।। छातींत तेणें क्षण तो न वाचे ।।९१।।
कीं मृत्युजिव्हा तरवार ऐशी ।। कोणी मराठा उपसोनि रोषीं ।।
जो हिंदुनारींस अविंधहस्त ।। गांजी, तयातें उखडी समस्त ।।९२।।

स्वहस्त मांडीवर थाडथाड ।। हणोनि, दंडाप्रत काडकाड ।।
ठोकोनि कोणी यवनास कुस्ती ।। देऊनि त्याची हरि सर्व मस्ती ।।९३।।
ऐसा रणीं एकसहा सपाटा ।। उडे, विराजे विजयी मराठा ।।
अविंधही कंबर बांधुनियां ।। झुंजे न मागें हटता रणीं या ।।९४।।
खेंकाळणें कर्कश घोडियांचें ।। ते नाद तैसे गजघंटिकांचे ।।
हस्ती तसे उष्ट्र अनेक ह्यांचा ।। 'ची, ची' असा शब्द कठोर साचा ।।९५।।
खणाखणी ती बहु आयुधांची ।। ती युद्धवाद्यध्वनि थोर साची ।।
तो 'दीन, दीन' स्वर उच्च फार ।। तो शब्द तैसा 'हर, शंभु' घोर ।।९६।।
हे शब्द एकत्र मिळोनि सर्व ।। कल्लोळ अत्यंत असा अपूर्व ।।
उत्पादणारा भयकंप चित्तीं ।। माजोनि जाऊनि जिथें सभोंतीं ।।९७।।
युद्धांगणाभीतरि मध्यभागीं ।। होऊनि गर्दी बहु जेथ जंगी ।।
अत्यंत ईर्षेस चढोनि वीर ।। रंगांत होते रण जेथ घोर ।।९८।।
जेथें सभोंतीं उडुनी धुराळा ।। तोंडाप्रती तोंड दिसे न डोळां ।।
जेथें मराठे आणि ते अविंध ।। होते बहू एकवटोनि कुंद ।।९९।।
जेथें तदा येउनि अभ्र त्यांत ।। होऊनि भानू बहुवेळ लुप्त ।।
काळोख तेणें पसरोनि अल्प ।। येई जिथें घोर रणास रूप ।।१००।।
मल्हारजीवीर तिथें प्रचंड ।। ठोकोनि छाती दृढ, देउ तोंड ।।
राही उभा घेउनि थोर थोर ।। जे जीव कीं प्राण असे स्ववीर ।।१०१।।
[५] बुळे विठोजी बलभीमरूप ।। मल्हारजीदाशरथीसमीप ।।
ते लांबहाते रिपुगर्वहर्ते ।। ते गावढे संगरकीर्तिकर्ते ।।१०२।।
ते वाघ नामापरि वर्तणारे ।। वाघासही मारुनि टाकणारे ।।
ते वाघमारे जणु भीमशौर्ये ।। ते गाजलेले फणसे स्ववीर्यें ।।१०३।।

---

५ बुळे, लांभाते, गावडे, वाघ, वाघमारे, फणसे, बारगळ, आणि भागवत, ही सर्व घराणीं धनगर ज्ञातीचीं आहेत. ह्या घराण्यांविषयीं जी थोडीबहुत माहिती ऐकून ठाऊक आहे ती थोडक्यांत पुढें दिली आहे.

(बुळे) इंदुरांत बुळ्यांचे घराणें मोठें प्रसिद्ध व पहिल्या प्रतीचें आहे. ह्या घराण्यांतील पुरुषच काय पण बायकाही शूर होत्या अशी प्रख्याति आहे. यशवंतराव महाराज होळकर ह्यांची कन्या श्रीमंत भीमाबाईसाहेब बुळे ह्यांची शिपाईगिरीबद्दल सर्वत्र मोठी ख्याती होती असें जुने लोक सांप्रत नेहमीं सांगतात. ह्या घराण्यास कोटा वगैरे महाल पूर्वी जहागीर होते. सांप्रत रेसिडेन्सी मार्फत ठेवीचें व्याज बरेंच येतें त्यावर ह्या घराण्याचा खर्च चालतो.

(लांभाते) लांभात्यांचें घराणें पूर्वी फार मोठें होतें म्हणून सांगतात. सांप्रत ह्या घराण्याकडे जिरापूर माचलपूर महालीं कांहीं जमीन वंशपरंपरेनें जहागीर आहे. थोरले तुकोजीराव होळकर गादीवर असतां हें घराणें चांगले भरभराटींत असून त्यांतील पुरुषही मोठे गाजीमर्द होते असें पुढील रांगडी पद्यावरून दिसून येईल.

प्रख्यात ते बारगळ प्रतापें।। दुर्जेय ते भागवत स्वदर्पें।।
असे असे घेउनि थोर वीर।। उभा असे होळकरप्रवीर।।१०४।।
उभा असे चोपित शत्रुलागीं।। अविंध विध्वंसित अग्रभागीं।।
ज्या शत्रुच्या येति अखंड झुंडी।। चालोनिया, त्यांस उदंड खंडी।।१०५।।
घडोनि थोबाड, धरोनि कल्ले।। दाबोनि कंठास करें, स्वभल्लें।।
फोडी रिपूंचीं रणिं टाळकींच।। कीं नारळे मेखसुनें खरींच।।१०६।।
कीं मृत्युचें तीक्ष्ण नख प्रचंड।। तद्भल्ल ऐसा विजयी अखंड।।
करी रिपूंचीं नरडीं दुखंड।। प्राशी सदा रक्त, भरून तोंड।।१०७।।
म्हणून आरक्त तदीय भल्ल।। नागांतकाची जणु चोंच लाल।।
कीं होउनी, नागच जे अविंध।। त्यांचीं विदारी उदरें सबंध।।१०८।।
संसप्तकांचा गण की प्रमत्त।। हे म्लेंच्छपक्षीय रणांगणस्थ।।
मल्हारजी अर्जुन की द्वितीय।। कापी जसा तो कडबाच काय।।१०९।।
तद्भल्लसामर्थ्य असें बघोनी।। तो म्लेंच्छपक्षीय बहूत मानी।।
दयाबहादूर समीप तेथ।। संतप्त चित्तांत असे बहूत।।११०।।
फोडीत मोठ्या डुरक्या गभीर।। भूमी खुरानें उकरीत फार।।
निश्वास सोडीत बहूत थोर।। पृष्ठावरी ताडित पुच्छभार।।१११।।

---

५ *''परगड परगड घोरा दवडे ऊटाकी लड साजे।।*
*जालमसिंगकी पाटणपर लांभातेके गोळे गाजे।।*
*जद कोटाबुंदी ऊबा ऊबा धूजे।।*
*जद उदेपुर थरथरे।। होळकर सरकारसे भायबकरे।।*
*तकुहलारे गड गाजिया।। रामपुरा होळकरका वाजया।।*
*कैएक पेरें जीराबक्तर कैएक पेरे पेटी।। लांभातेकी फौज सुन्नेकी अंगोठी।।''*

(वाघ) वाघांचेही घराणें पूर्वी फार मोठे होतें. ह्या घराण्याचा मूळ पुरुष संताजी वाघ हा पानिपतच्या लढाईत होळकराच्या सैन्यांतील एक प्रमुख वीर होता हें इतिहास प्रसिद्ध आहेच. ह्या घराण्याला बेटमे परगणा जहागीर होता. सांप्रत हें घराणें अप्रसिद्ध आहे.

(वाघमारे) वाघमाऱ्यांला पूर्वी महिदपूर महालीं जहागीर होती; परंतु सध्यां ते अप्रसिद्ध आहेत.

(फणसे) फणसे हे इंदुरांत मोठे प्रतिष्ठित मानकरी आहेत. ह्यांचे वडील घर दक्षिणेंत निफाड गांवीं आहे. सांप्रत इंदुरांत असणारे फणसे हे श्रीमंत महाराज तुकोजीराव होळकर यांचे सख्खे शालक आहेत. चालू पूर्वशतकामध्यें ह्या घराण्यांतल्या राजाभाऊ फणसे नामक पुरुषानें होळकरशाही बरीच हालविली.

(बारगळ) इंदूरवासी बारगळ सध्यां अप्रसिद्ध आहेत. अलीकडेच तळोद्याचे मुख्य बारगळ घराणें व राजकीय होळकर घराणें ह्यांमध्ये शरीरसंबंध झाल्यानें तळोद्याचें बारगळ सांप्रत इंदुरांत जहागीरदारांत मोडतात. गावढे व भागवत हे इंदुरांत खाऊन पिऊन चांगले सुखी आहेत; व ह्यांची गणना मानकऱ्यांत आहे.

कधीं कधीं थोर वसंड पुष्ट ।। थरारवीत स्वमनात रुष्ट ।।
उभा जसा सांड तसाच आता ।। दयाबहादूर दिसे समस्तां ।।११२।। युग्म ।।
मल्हारजी दारुण सिंहनाद ।। करीत, होऊनि कृतांत शुद्ध ।।
सर्वत्र भीतीं पसरीत धाक ।। धांवे त्वरें त्यावरती विशंक ।।११३।।
दयाबहादूरहि वीर जंगी ।। धांवे पुढें सर्सुनि ह्या प्रसंगीं ।।
ते भूस्थ दोघे मग तप्तचित्त ।। होती त्वरें द्वंद्वरणीं प्रवृत्त ।।११४।।
दयाबहादूर लगेंच रोषीं ।। भिडोनिया होळकराग्रणीशीं ।।
पाडावया त्या बहु देई झोले ।। परंतु हा काय तयास तोले?।।११५।।
धरोनि शेंडी, असडोनि मुंडी ।। त्याची गचांडी धरुनी, घमंडी ।।
हरोनि, गुत्ता मुखिं त्या प्रमत्ता ।। देऊनि वक्षीं तशि एक लत्ता ।।११६।।
मल्हारजीवीर बलाढ्यमल्ल ।। सुदर्शनातुल्य अजिंक्यभल्ल ।।
सर्वप्रदेशीं भ्रमवीत आतां ।। कीं होउनी कृष्णच युद्धकर्ता ।।११७।।
घोळोनि ऐसा जणु वक्रदंत ।। कुस्तींत त्याचे करि वक्र दंत ।।
विध्वंसुनी तो शिशुपाल काय ।। खरा स्वभूचा शिशुपाल होय ।।११८।।
कीं कृष्ण कंसांतक भीतिदाता ।। की भीम दुःशासननाशकर्ता ।।
दयाबहादूरविनाशकर्ता ।। मल्हारजीवीर तसाच आतां ।।११९।।
दृष्टीसमोर स्थित देखुनीयां ।। पांचावरी धारण बैसुनीयां ।।
अविंध सारे अवशिष्ट लीन ।। पळोनि गेले समरामधून ।।१२०।।
अविंधपक्षीय कितीक थोर ।। युद्धांत ह्या शौर्य करून फार ।।
झाले गतप्राण, कितीक मेले ।। उगींच ताठा मिरवीत डौलें ।।१२१।।
वेळेवरी वेतन लभ्य हो न ।। उपासमारा पडतो म्हणून ।।
म्हणून कंटाळुन जीवितास ।। कितीक मेले लढुनी निराश ।।१२२।।
'आणूं मराठे लुगडीं धुण्यास ।। तरीच दावू मुख हें तुम्हास' ।।
बोलोनि ऐसें अपुल्या सख्यांतें ।। कितीक हो प्राप्त रणांत जे, ते ।।१२३।।
'योद्धे मराठे अपुल्याप्रतीच ।। धुण्यास आतां लुगडीं खरेंच ।।
नेतील' हें पाहुनि, लाजुनीयां ।। बुध्या रणीं हो मृत झुंजुनीया ।।१२४।। युग्म ।।
मुख्याधिकारी बहुपक्षपाती ।। स्वतांप्रती नीट न वागवीती ।।
कधीं श्रमाचें फल लब्ध हो न ।। कितीक गेले पळुनी म्हणून ।।१२५।।
योद्धे मराठेहि कितीक नाना ।। पुढें पुढें सर्सुनि झुंजतांना ।।
कामास आले समरांगणांत ।। घायाळ हो फार कितीक त्यांत ।।१२६।।
संपादुनीयां जय थोर ऐसा ।। करीत आनंद जनीं बहूसा ।।
मल्हारजी नंतर सैन्यभारा ।। घेऊन तेथून निघे पुढारा ।।१२७।।

•

## ।। भाग पाचवा ।।

[१] भोजाधिपत्यें बहु एकदा जे ।। अखंडसौभाग्यवती विराजे ।।
जी एकदां पंडितरूपहंसा ।। दे मानसातुल्य बहूत हर्षा ।।१।।
म्लेंच्छाधिकारें जणु दीनदासी ।। जी भोगिते सांप्रत दुःखराशी ।।
जी म्लेंच्छतापें बहु शुष्क आतां ।। ये जींत ऐकूं खलकाकवार्ता ।।२।।
त्या ख्यातधारानगरींत आतां ।। मल्हारजी म्लेंच्छविनाशकर्ता ।।
प्रवेशुनीयां अपुल्या यशाचा ।। झेंडा उभारी अविनाशि साचा ।।३।।
पुरींत यानंतर पेशव्याची ।। द्वाही त्वरें तो फिरवी सुखाची ।।
स्वातंत्र्यदानें जणु कुंकुमानें ।। करी तिचें सोज्वळ भाळ मानें ।।४।।
बुळे विठोजीस पुरीमधीं या ।। कामावरी सांप्रत ठेवुनीयां ।।
मल्हारजी विक्रमराजधानी ।। करावया मुक्त निघे तिथूनी ।।५।।
ही राजधानी नृपविक्रमाची ।। किती स्तवावी महती तियेची! ।।
तैसें तिचें दुःखहि ह्याघडीचें ।। किती कथावें बहु घोर साचें ।।६।।
जी विक्रमानें नृपविक्रमाचे ।। हो एकदां भूषण दिव्य भूचें ।।
ती म्लेंच्छसत्तेंत असे क्षणीं या ।। की रत्न मातींत अनर्घ्य वाया ।।७।।
जिच्या प्रभावास भिऊनि फार ।। देशांतरीचे नृप थोर थोर ।।
येतीच पूर्वी करभार देण्या ।। मागून तैसें अभयास घेण्या ।।८।।
तिच्या शिरीं दुःसह दुःखदाता ।। अविंध यांचा करभार आता ।।
असूनि, वांकूनि तिचा गळाच ।। अत्यंत आहे भयभीत तीच ।।९।।
विद्वज्जनांची जननी जणो जी ।। कीं त्यांस माहेरघरापरी जी ।।
असूनि, पूर्वी चिरकाल जींत ।। ज्ञान प्रकाशे जणु मूर्तिमंत ।।१०।।
रत्नें नऊ पंडितरूप मोठीं ।। जी एकदां लेवुनियां स्वकंठीं ।।
अतुल्य शोभा मिरवीत लोकीं ।। विराजली अन्य सरस्वती कीं ।।११।।
तिच्यांत आता हटवादि काजी ।। ते मौलवी क्रूरपणा राजी ।।
''जे हिंदुचे ग्रंथ अमोल सारे ।। अर्वाच्य ते'' हें मत सांगणारे ।।१२।।
ऐसे शिखानष्ट बहूत नष्ट ।। अनेक शंखासुर काय दुष्ट ।।
होऊनि, काखेंत कुराण पीठें ।। मारूनि, मार्गी फिरतात थाटें ।।१३।।
उडूनि सर्वत्र गुलाल रंग ।। पूजा अनंगास मिळूनि सांग ।।
हर्षांमधीं मंगल गायनांत ।। झाले वसंतोत्सव रम्य जींत ।।१४।।

---

१ तरळा खेड्यावरची लढाई झाल्यावर मल्हाररावानें धार व उज्जयनी हीं दोन शहरें काबीज केलीं असें मराठी बखरींत लिहिले आहे.

दिसूनि सर्वत्र फकीर आतां ।। रिघूनि कर्णीं हयदोस वार्ता ।।
शोकामधीं तींत रडारडीचे ।। होती पहा उत्सव ताबुतांचे ।।१५।।
श्री कालीदासादि महाकवींचीं ।। होतीं जयीं सुंदर नाटकेंची ।।
आतां पहा तींत असभ्यतेचे ।। होती तमाशे चिर भांड यांचे ।।१६।।
ऐशी दशा उज्जयिनी पुरीची ।। देखूनि दुःखास्पद फार साची ।।
कोणा प्रतीही आणखीं स्वभावें ।। वाटे असें तीस तदा पुसावें ।।१७।।
''विस्तीर्ण भारी नभ चुंबिणारे ।। चित्तास भांबावुनि टाकणारे ।।
कौशल्य तेथें बहु भव्य आंगें ।। गेले तुझे सौध असे कुठें गे! ।।१८।।
रम्यांगना रम्य अशा वसंतीं ।। घेऊनि पंखे बहु रम्य हातीं ।।
घालीत वारा अपुल्या प्रियांस ।। करीत श्रृंगारिक भाषणांस ।।१९।।
बैसूनियां ज्यांवर चांदण्यांत ।। शोभा जया उज्वल दे बहूत ।।
ऐशा विशालाकृति चंद्रशाला ।। गेल्या कुठें गे! तव ह्या घडीला ।।२०।। युग्म ।।
जे पांच रम्याकृति कामबाण ।। आम्रादि ते ज्यांत बहू खुलून ।।
तो भृंगगुंजारव गोड भारी ।। तो कोकिलांचा ध्वनि मोहकारी ।।२१।।
भरोनियां ज्यांत बहू सभोंतीं ।। ज्यां नंदनाची सर येत होती ।।
उद्यान ते फारच सौख्यदाते ।। गेले कुठें गे! तव सांग मातें ।।२२।। युग्म ।।
कांहींच दृष्टी न पडे जराही ।। झाली कशी गे! कुदशा तुझी ही ।।
कोणीच का गे! प्रिय हिंदुभर्ता ।। मिळे न तूतें तव दुःखहर्ता'' ।।२३।।
आता अशा उज्जयिनीपुरीस ।। गांठूनि, हां हां म्हणतां तिथेस ।।
करूनि दुःखांतुन मुक्त नित्य ।। मल्हारजी हो कृतकृत्य सत्य ।।२४।।
जो पेशव्यांचा ध्वज ऊर्ध्वभागीं ।। येथें खुले, तो जणु ह्या प्रसंगीं ।।
तिच्या शिरींच्या पदराप्रमाणें ।। लोकीं विराजे बहु आदरानें ।।२५।।
मल्हारजी वीर असा प्रताप ।। करीत येथें असतां अमूप ।।
पवार आणी चिमणाजिपंत ।। त्यातें मिळाले मग माळव्यांत ।।२६।।
हा विप्र योद्धा मग शत्रू लीन ।। करीत युद्धीं असतां लढून ।।
बलाढ्य सिंद्यासह सैन्ययुक्त ।। श्रीमंतही मागुनि येति तेथ ।।२७।।
शौर्यस्तुती होळकराग्रणीची ।। हो पेशव्यापास बहूत साची ।।
श्रीमंत आता बहु सैन्ययुक्त ।। जाती पुढें बंगषमर्दनार्थ [२] ।।२८।।

२ दयाबहादूर रणभूमीवर पतन पावल्यावर त्याचे जाग्यावर बादशहानें महंमदखान बंगष हा नवा मुसलमान अधिकारी नेमिला होता. प्रथमतः त्याची स्वारी बुंदेलखंडावर येऊन थडकली. ह्या अरिष्टांतून आपली मुक्तता व्हावी म्हणून बुंदेलखंडाच्या छत्रसाल राजानें बाजीराव पेशव्याची कुमक मागितली; बाजीरावानें स्वतः येऊन त्याची कुमक केली; व बंगषाचा पूर्ण पराभव केला.

बुंदेलखंडाधिप तो सुशील ।। ह्या बंगषें पीडुनि छत्रसाल ।।
देशामधीं जो जणु दैत्य होता ।। श्रीमंत त्या वेढिति शीघ्र आतां ।।२९।।
उपासमारें बहु घाबरोनी ।। युद्धीं कदा तोंड न दाखवोनी ।।
हे म्लेंच्छ शेंदाडशिपाई साच ।। चोरूनि मागें पळुं लागतांच ।।३०।।
सिंद्यासवें होळकरप्रवीर ।। मागें तयांच्या वणवाच थोर ।।
कीं लागुनी भाजुनियां तयांस ।। देशांतुनी शीघ्र पिटाळि त्यांस ।।३१।।
करोनियां निर्भय छत्रसाल ।। पावोनिया मानधना, सुशील ।।
श्रीमंत तेथूनि निघूनि वेगें ।। जिंकी पुढें मालवदेश आंगें ।।३२।।
ह्या माळव्याचे विजयांत फार ।। मल्हारजी होळकरप्रवीर ।।
स्वशौर्य दावी तशि बुद्धिमत्ता ।। तोची करीं स्थापित हिंदुसत्ता ।।३३।।
श्रीमंत चित्तीं म्हणुनी प्रसन्न ।। होऊनि त्या फारच गौरवून ।।
इंदूरच्या त्या प्रगण्यासहीत ।। देती जहागीर तया बहूत ।।३४।।
मल्हारजी नंतर इंदुरीं या ।। स्वकीय सेनेप्रत ठेवुनीया ।।
पाहोनि डोळां रथल सोइचें तें ।। ठाणें स्वतांचे करि मुख्य त्यातें ।।३५।।
श्रीमंत ह्यानंतर तेथुनीयां ।। निघूनि, सैन्यासह ठेवुनीयां ।।
शिंद्यासवें होळकराग्रणीस ।। मागें, रिघे सत्वर दक्षिणेस ।।३६।।
निघूनि गेल्यावर पेशवा तो ।। प्रांतांतुनी ह्या कर काळिचा तो ।।
मल्हारजी वीरजनांत वर्य ।। गोळा करी कीं रस काय सूर्य ।।३७।।
दिल्लींतुनी सैन्य पुढें त्वरेंनें [३] ।। ये जिंकण्या त्याप्रत आढ्यतेनें ।।
परंतु तो होळकराग्रणीचा ।। प्रताप देखोनि असह्य साचा ।।३८।।
जणो दिवाभीतच होउनी तें ।। दडूनि मागें भयभीत चित्तें ।।
खोट्याच आत्मस्तुतितें कराया ।। फिरून दिल्लीस रिघे जगाया ।।३९।।
जैसें न एक्यास्थळिं इंद्रचाप ।। नभीं, तसा होळकरप्रताप ।।
येथेंच गाजूनि असे, न ऐसें ।। अन्यत्रही तो बहुसा प्रकाशे ।।४०।।
वेगें भराऱ्या गरुडासमान ।। मारीत शत्रूंस करीत दीन ।।
तो गुर्जरींही शिरुनी, जितून ।। ये माळवीं तेथुनियां फिरून ।।४१।।
जें मागणें बादशहास केलें ।। तें पेशव्यातें नच लब्ध झालें ।।
म्हणून तो घेउनि सैन्य वेगीं ।। ये नर्मदा लंघुनि ह्याप्रसंगीं ।।४२।।
मल्हारजी आणि दुजे प्रवीर ।। घेऊनि कांहीं मग लोक शूर ।।
उल्लंघुनीयां यमुनानदीस ।। गेले दुआबांत लुटावयास ।।४३।।

---

३ ह्या सैन्यावर खानढौराण वजीर याचा भाऊ मुझफरखान हा मुख्य होता. मुझफरखान सरोंजपर्यंतच येऊन मागे फिरला; आणि त्यानें दिल्लीच्या लोकांस लटकेच समजाविले कीं आपण मोठा पराक्रम केला.

एके दिनीं होळकरप्रवीर ।। एकाग्रचित्तास करूनि फार ।।
करीत पूजा असतां हराची ।। ये थोर सेना बहु मोगलांची ।।४४।।
ती हे मराठे बहु अव्यवस्थ ।। देखोनियां अल्प तसें बहूत ।।
तुटूनि त्यांच्यावर त्याक्षणींच ।। पडे जणो काय महामरीच ।।४५।।
क्षणैक घोटाळुनियां स्वचित्तीं ।। योद्धे मराठे मग हे स्वहस्तीं ।।
धरूनि शस्त्रांस करून चाल ।। ते झुंजती शत्रुशिं फार वेळ ।।४६।।
प्रचंड होतें रिपुसैन्य तेणें ।। मल्हारजीवीर तदा त्वरेनें ।।
घेऊनि हे अल्प सवें मराठे ।। तेथूनि मागें सुखरूप लोटे ।।४७।।
ह्या नंतरी गर्व करीत शुष्क ।। सेनापती सादतखान [४] मूर्ख ।।
ह्या मोगलांसार्ध पुढें न येतां ।। आगऱ्याकडे जाय सहर्ष आतां ।।४८।।
तो बादशाहास बहूत थाटें ।। लिहूनि धाडी मग कीं ''मराठें ।।
मीं संगरीं ठोकुनि काढियेले ।। मीं चंबळापारच त्यांस केलें'' ।।४९।।
चित्तास आल्हादक फार साची ।। ऐशी सुवार्ता पसरे जयाची ।।
होऊनि सेनापतिची प्रशंसा ।। दिल्लींत हो हर्षच हर्ष तैसा ।।५०।।
त्या पेशव्याच्या वकिला निरोप ।। देतां वजीरें सहसा सदर्प ।।
निघूनि आगऱ्यातुनि पेशव्याला ।। तो सत्वरी येउनियां मिळाला ।।५१।।
हें मौर्ख्य दिल्लीपतिचें बघूनी ।। साश्चर्य संताप मनीं रिघूनी ।।
मल्हारजी आदिकरून लोकीं ।। श्रीमंत तेव्हां वदलें असें कीं ।।५२।।
''योद्धे मराठे बलशौर्यराशी ।। आहेत सध्या यवनप्रदेशीं ।।
स्वेंच्छाविहारी जणु की उदंड ।। विशाल डोहीं मगर प्रचंड ।।५३।।
म्लेंच्छांस ही गोष्ट कळेल तेव्हां ।। दिल्ली मराठे लुटतील जेव्हां ।।
हो चंबळापार न ते मराठे ।। कळेल हें त्यां बसतांच सोटे ।।५४।।
दिल्लीवरी ही मग पेशव्याची ।। स्वारी निघाली रणशूर साची ।।
संपूर्ण भागीं पसरीत दर्प ।। ती येउनीयां भिडलां समीप ।।५५।।
समीपची येथुनि कालिकेचा ।। [५] मेळा भरे ह्यासमयीं सुखाचा ।।
मल्हारजीचे मनिं त्याक्षणीं ये ।। की तो लुटावा लवलाहि शौर्ये ।।५६।।

---

४ ह्या सेनापतीचे नांव मालकमसाहेबानें आपल्या मध्य हिंदुस्थानाच्या इतिहासांत 'बऱ्हाणुलमुल्क' असे दिले आहे. सादतखान अयोध्येचा सुभेदार होता.

५ मालकमसाहेबांच्या इतिहासाचे मराठी तरजुम्यांत ह्या मेळ्याच्या संबंधानें असे लिहिलें आहे. ''दिल्ली शहरापासून सात आठ कोसांच्या टप्प्याच्या आंत, मराठा सरदारांनीं कालिका भवानीचा प्रसिद्ध मेळा लुटला. त्या सरदारांत मल्हारराव होता. मोठी छाती करून केलेल्या त्या प्रसिद्ध स्वारीच्या प्रसंगीं, मराठ्यांनीं, हुमायून बादशाहाच्या कबरेजवळच्या पुलावर, डुक्कर मारून टांगून, मुसलमानीं सत्तेचा धिःकार प्रदर्शित केला.

पवाराशिंदेप्रभृतिप्रवीरां ।। पाचारुनीयां अपुल्या विचारा ।।
सांगूनि, सोत्साहमनें तयाला ।। मल्हारजीवीर असें म्हणाला ।।५७।।
'हे वीर हो! हा बहु थोर मेळा ।। लुटू जरी आपण ह्या घडीला ।।
होईल हें धाडस एक ऐसें ।। गातील त्या मित्र रिपूहि तैसें ।।५८।।
तेणें मराठे गमतील नित्य ।। सर्वांप्रती अद्भुत वीर सत्य ।।
हे वीर बा! मानव की सुरांश। राहील ही भ्रांति सदा जनांस ।।५९।।
आतां असे गोष्ट बहू खरी ही ।। मेळ्यांत ह्या म्लेंच्छ महासमूहीं ।।
सशस्त्र आहेत, तसें समीप ।। अविंधसेनाहि असेल मोप ।। ६०।।
परंतु शिंद्यासम भीष्मरूपी ।। वीरांमधीं वीर महाप्रतापी ।।
योद्धा पवारासम अद्वितीय ।। भीमस्वरूपी असतां सहाय ।।६१।।''
कीं भारतीवीरच अन्य ऐसे ।। योद्धे दुजेही असतां बहूसे ।।
आहे मराठ्यांस अशक्य काय? ।। पदार्थ त्यां साहस काय होय! ।।६२।।
करीत तो सादतखान गिल्ला ।। लोकीं वृथा जंबुकवल्गनेला ।।
करीत आहे मिरवीत डौल ।। करीत निंदा अमुची खुशाल ।।६३।।
त्याच्याच नाकावर काय लता ।। परंतु दिल्लीपतिच्याहि आतां ।।
नाकावरी लात हणूनि, टोला ।। मारूनि जेव्हां लुटु हाच मेळा ।।६४।।
तेव्हां तयांची बहु वल्गना ती ।। संपूनि ते होतिल सुन्न चित्तीं ।।
कळेल तेव्हांच पहा तयांला ।। मल्हारजी काय रणीं पळाला ।।६५।।
मल्हारजी मी जरि नावचा हो ।। तरी पहा म्लेंच्छ गलिच्छ हे हो ।।
लत्ताप्रहारीं तुडवूनि, सूड ।। घेईन, त्यांची जिरवूनि खोड ।।६६।।
हे क्षुद्र हे मोगल कःपदार्थ ।। हे झुंजण्या काय रणीं समर्थ ।।
पाणी असे काय तयांत साचें? ।। धिःकार सत्तेस असो तयांचे! ।।६७।।
ठोकोनियां दंड, मिशीस पीळ ।। देऊनि मी ह्यासमयीं खुशाल ।।
देखा प्रतिज्ञा करितों तियेस ।। हा दीप तो चंद्रच साक्ष खास ।।६८।।
कोणी हुमायून अजा निपसूजा ।। जो होउनी जाय तदीय राजा ।।
त्याच्याच देखा कबरेसमीप ।। मी सूकराचें शवची कुरूप ।।६९।।

---

५ यावेळीं त्यांस पुष्कळ लूट सापडली. यापूर्वी कांहीं महिने, बादशाहाच्या लष्करापासून मल्हारराव पराजय पावला होता, त्याचा पुरतेपणीं मोबदला होईल इतके द्रव्य व इतका नावलौकिक, वर लिहिलेल्या प्रसंगीं त्यानें संपादिला.'' मल्हारराव दुआबांत लूट करीत असतां मोगलांची फार मोठी फौज चालून आली म्हणून तो आपल्या थोडक्या लोकांनिशीं यमुना नदी उतरून मागें सुखरूप लोटला, तोच हा मागील उताऱ्यांतील बादशाहाच्या लष्करापासून झालेला मल्हाररावाचा पराजय होय. ह्याचें वर्णन पूर्वी कवितेंत आलेंच आहे.

टांगोनि देतों, जर अन्यथा ही ।। हो मत्प्रतिज्ञा, कथितों असें ही ।।
हा घोर मद्‌भल्ल बहूत उग्र ।। माझ्याच वक्षांत शिरेल शीघ्र'' ।।७०।। युग्म ।।
मल्हारजीहोळकराग्रणीची ।। ऐशी प्रतिज्ञा जणु अर्जुनाची ।।
ऐकोनि शिंदे शरिरीं स्फूरून ।। बोले 'प्रतिज्ञा खरि' ही भयाण ।।७१।।
ही शोभते होळकराप्रतीच ।। मल्हारजीवीरच तीस साच ।।
नेईल सिद्धीस, न ह्यांत शंका ।। तो गाजतो वीर असाच बाका ।।७२।।
ही कल्पना होळकराग्रणीची ।। उत्कृष्ट भारीच अपूर्व साची ।।
घेऊनियां हा बडगा सपाटा ।। मी सिद्ध देण्यास असें रपाटा ।।७३।।
ह्या पूत मेळ्यामधिं गोवधातें ।। करूनि जों म्लेंच्छ अधर्म तेथें ।।
बा! क्रूरचित्तें करितात त्यांचा ।। हा सूड उत्कृष्ट सुयुक्त साचा ।।७४।।
हा सिद्ध शिंदा लढण्यास बंदा ।। मुष्टिप्रहारें कुटण्या अविंधां ।।
हरूनि त्यांचे समरांत कुर्रे ।। देतों पहा मी उडवोनि धुर्रे ।।७५।।
पवार सावेश फुगूनि दंडीं ।। बोले ''कसे बंद तुटोनि, बंडी ।।
माझी कशी होय ढिली पहा ही ।। आंगीं भरे त्वेष असाच कांहीं ।।७६।।
चला लुटूं यासमयींच मेळा ।। टांगू मशीदींतचि सूकराला ।।
होईल ही गम्मत एक थोर ।। उडेल लोकांतहि मौज फार ।।७७।।
घेऊनि हस्तीं तरवार घोर ।। मी सिद्ध युद्धास असें पवार ।।
लांडेच मेंढे जणु होम कुंडीं ।। जाळोनि मी तोषवितोंच चंडी ।।७८।।
मल्हारजी ज्यावर फार राजी ।। कोणी असा वीर तिथें तुकोजी [६] ।।
होता, पुढें सर्सुनि तो म्हणाला ।। 'जाण्यास आज्ञा मज द्या वनाला ।।७९।।
करूनियां पारध सूकराची ।। मी आणितों ह्यासमयींच साची ।।
दोर्दंडयुग्मामधिं ह्याच किंवा ।। मी आणितों त्यास जिवंत एव्हां' ।।८०।।
वीरोक्ति होतांच अशा अचाट ।। आवेशसिंधू चिडुनी अफाट ।।
माजोनियां काय तुफान साच ।। उच्चारिती ते रणशब्द उच्च ।।८१।।
दणाणुनीया नभ जाय तेणें ।। ये पेशवा तेथ तदा त्वरेनें ।।
त्या सांगतां हा कट, तो सहर्ष ।। दे त्यां स्वतांच्या अनुमोदनास ।।८२।।

•

६ हा मल्हाररावाच्या फार प्रीतींतील तुकोजी होळकर योद्धा होय. हा मल्हाररावाच्या सख्या चुलत भावाचा मुलगा होता असे होळकरांच्या वंशावळीच्या झाडावरून दिसते. ह्यालाच पुढें अहिल्याबाईनें दौलतीचा कारभार सांगून मुख्य सेनापती केले.

## ।। भाग सहावा ।।

हा कालिकेचा बहु थोर मेळा।। दिसे दुरूनी रमणीय डोळां।।
दृष्टी जरी लांब कितीहि नेली।। दिसे जनें भू तरि वेढलेली।।१।।
असंख्य नानाविधजातिलोक।। असूनि पोशाक तसे अनेक।।
दिसूनि जातीपरि भिन्न त्यांचे।। होते बहू भेदहि पागुट्यांचे।।२।।
अनेक रंगीं शिरिं पागुटीं तीं।। दिसूनि हो ह्यापरि भास चित्तीं।।
कीं लोक हे पुष्पतरू प्रकीर्ण।। प्रफुल्लसे चित्रविचित्रवर्ण।।३।।
पुढें पुढें प्राप्त समीप होतां।। अनेक नारीनर भिन्न आतां।।
दिसूनि हो भास जणो लताच।। की पुष्पवृक्षांमधिं मिश्र साच।।४।।
कीं वायुनें थर्थर कांपणारा।। उद्यानची हा चल संघ सारा।।
बाहेरुनी दृष्टिपडे पहातां।। दिसे बहू गम्मत आंत जातां।।५।।
विस्तीर्ण बाजार उभे फुलांचे।। भाजा फळें तांदुळ दाळ यांचे।।
तैसे पिठाचे घृतशर्करेचे।। होते किती अन्य पदार्थ यांचे।।६।।
असंख्यवस्त्रें बहु मौल्यवान।। मोत्यें जवाहीर रुपें सुवर्ण।।
अनेकभागीं झळके अपार।। तारा नभीं ज्यापरि सर्वदूर।।७।।
रम्य स्त्रियांचे समुदाय कोठें।। धरूनि फेरे रमणीय मोठे।।
कोठें उभ्यानें, बसल्याठिकाणीं।। होते तदा गात रसाळ गाणीं।।८।।
बारीक पर्णांपरि कर्दळीच्या।। दलांपरी नाजुक पंकजाच्या।।
भिंगापरी निर्मल, मल्मलीच्या।। परोपरीच्या बहु आवडीच्या।।९।।
किती गुलाबी, पिवळ्या कितीक।। साड्या कुसुंबी खुलुनी अनेक।।
नामी लहंग्यांवर, बाजुबंद।। जयांमधूनी दिसती सबंध।।१०।। युग्म।।
ज्यांतून तैसे कुच कंचुकीरथ।। कडेस थोडे उघडे प्रशस्त।।
संपत्तिचे कुंभच काय गुप्त।। वरूनि येती खिल पाहण्यांत।।११।।
कीं रोहिण्या काय मुखेंदुलीन।। ऐशा नथा सुंदर मौल्यवान।।
ढगांतुनी कीं बुरख्यांमधून।। दृष्टीस केव्हां पडतात छान।।१२।।
कंठांतली आभरणप्रभा जी।। फांके सभोंवार विशाल तेजीं।।
ती भासावी काय खळेंच साचें।। लागे सभोंतीं मुखचंद्रम्याचे।।१३।।
जयांवरी कांचन कंकणांचें।। तेज स्फुरे, वामकरांबुजाचे।।
त्या अंगुल्यांभीतरिं की दलांत।। कीं खेळतो भृंगच नेत्र कांत।।१४।।
कीं आकळाया गज कामरूप।। त्या साखळ्या रम्यपदीं अमूप।।
आहेत, होतो छुमछूम ऐसा।। गतीमधीं नूपुरशब्द तैसा।।१५।।

समाज ऐसे युवतीजनांचे ।। होते जिथें शोभत रम्य साचे ।।
तारुण्यसंपन्न तिथें अनेक ।। अत्यंत रंगेल मिळूनि लोक ।।१६।।
कोणी फुलें सुंगित शांततेंत ।। कोणी मिशांला उगिं पीळ देत ।।
बोळे कुणी उत्तम अत्तराचे ।। स्थापीत नीट श्रवणीं स्वतांचे ।।१७।।
स्त्रियांकडे फेंकित वक्रदृष्टि ।। वर्णील ती हो कवि काय तुष्टि ।।
टीका स्वरूपावरती करीत ।। होते तदा काळ सुखें क्रमीत ।।१८।।
पाहूनि तांबोळिण फाकडीशी ।। किती तसे फक्कड लोक हौशी ।।
मिळूनि, घेऊनि विडे करीं, ते ।। चैनीमधीं हांसत खात होते ।।१९।।
स्वीयप्रिया रंजविण्या कितीक ।। तैसे विलासी जन छानछूक ।।
मेवा मिठाई खणपातळांतें ।। त्या त्या दुकानांमधिं घेत होते ।।२०।।
थाटांत मौजेस्तव ह्या ठिकाणीं ।। अविंधही माजुमिच्या दुकानीं ।।
होते मिळाले कितिएक तेथें ।। डोळ्यांत सुर्मा चढवीत होते ।।२१।।
जीं जाहलीं चिंब भिजूनि तैलीं ।। वस्त्रें शरीरीं अशिं किट्ट काळीं ।।
असूनि, कंठांत कपर्दिकेच्या ।। आहेत माळा बहुशा जयांच्या ।।२२।।
कपर्दिका ज्यांस बहूत लग्न ।। काळ्या अशा त्या परड्या मलीन ।।
जे सोडिती श्वासच धूर तोंडे ।। ऐसे प्रदीप्तानन पोत जाडे ।।२३।।
आहेत हस्तांत, तसे जयांचे ।। पट्टे कपाळांवर कुंकुमाचे ।।
भोपे असे ते जणु मेघ काळे ।। विद्युल्लातयुक्त बहूत ओले ।।२४।।
धरूनि कंठांत बलाकमाला ।। स्वीकारूनीया लघु आकृतीला ।।
मेळ्यांत संचार करीत काय ।। होते, असा भास मनास होय ।।२५।।
भारी तदा विक्रय होत होता ।। कामामधीं गर्क समाज होता ।।
म्लेंच्छाधिकारी स्थिर पीत हुक्के ।। होते तदा लावुनि लोड तक्के ।।२६।।
येथें अकस्मात् रणशूर मोठे ।। त्या प्राप्त झाले समयीं मराठे ।।
फेकोनि घोड्यांस चहूंकडोनी ।। मेळ्यास ह्या वेढियलें तयांनीं ।।२७।।
''समस्त बाळें अबला समस्त ।। अशस्त्र तैसें नरही समस्त ।।
टाळोनि, ठोका अवशिष्ट लोक ।। अविंधपक्षाकडचे विशंक'' ।।२८।।
ऐसा मराठ्यांमधिं घोष होत ।। जे म्लेंच्छ होते जनरक्षणार्थ ।।
प्रवीर हे व्यक्त तदा तयांत ।। नृसिंह नाना जणु दानवांत ।।२९।।
तेव्हां धुमाचक्कर जें उडालें ।। मल्हारजी वीर तयांत भल्लें ।।
करी जणो काय अविंधसत्र ।। कीं वुद्ध जन्मेजय सर्पसत्र ।।३०।।
जिथें जिथें सापडला अविंध ।। तिथें तिथें कापियला सबंध ।।
जिथें जिथें जाय लपोनिया तो ।। तिथें तिथें शोधुनि ठोकिला तो ।।३१।।

जिथें जिथें हो स्थित झुंजण्या तो ।। तिथें तिथें झुंजुनि मारिला तो ।।
जिथें जिथें ये शरण स्वतां तो ।। तिथें तिथें श्वापरि सोडिला तो ।।३२।।
हे म्लेंच्छ कीं बोकड पुष्ट साच ।। देऊनि चंडीस असे बळीच ।।
असंख्य वस्त्रां धनभूषणांतें ।। संपादुनी हस्ति तुरंगमांतें ।।३३।।
योद्धे सरारा मग शौर्यकर्ते ।। हुमायुनाच्या कबरेकडे ते ।।
वेगें निघाले शर शंकराचे ।। पुरीकडे की त्रिपुरासुराचे ।।३४।।
अस्ताचलीं सूर्य रिघूनि सध्या ।। झाली असे रम्य बहूत संध्या ।।
समीपभागस्थ अविंधसेना ।। फांके क्षणीं ह्या सगळ्या ठिकाणां ।।३५।।
सर्वस्थलीं दुंदुभिचे दुरूनी ।। आहेत ऐकू रव येत कानीं ।।
आहे तसा होत तयांत भिन्न ।। अविंधशब्द श्रुत ''दीन, दीन'' ।।३६।।
आहेत गोळ्या बहु, आणि गोळे ।। चोहीकडे वर्षत तापलेले ।।
टापा ह्यांच्या ध्वनि खाडखाड ।। आहेत सर्वत्र करीत चंड ।।३७।।
टेंभे मशाली बहु पेटुनीया ।। उजेड त्यांचा अति फांकुनीया ।।
चकाकत स्वच्छ तदा बहूत ।। आहेत शस्त्रें तशिं नग्न त्यांत ।।३८।।
ऐशा बहू घोरतर प्रसंगीं ।। योद्धे मराठे रणशूर जंगी ।।
भीतां न मागें सरता न थोडें ।। गेले पुढें घालित शीघ्र घोडे ।।३९।।
ते शीघ्र आले कबरेसमीप ।। तों म्लेंच्छ यांचा समुदाय मोप ।।
होता तिथें क्षोभुनि लोटलेला ।। चित्तामधीं फारच तापलेला ।।४०।।
न ह्या अविंधांमधिं खांडवांत ।। न वीर हे अग्निच फार तप्त ।।
पडूनि, वेढूनि सवेग त्यांतें ।। त्यां लागले भस्म करावयातें ।।४१।।
अविंधविध्वंस असा सगर्व ।। अत्यंत चालू असता अपूर्व ।।
जो पूल होत कबरेसमीप ।। मल्हारजी त्यावर कालरूप ।।४२।।
ये, म्लेंच्छ त्यानें तिथले स्वभल्लें ।। कापोनिया तें स्थल साफ केलें ।।
योद्ध्या तुकोजीप्रत शोधितांच ।। तो सूकरासार्ध असे तिथेंच ।।४३।। युग्म ।।
त्यानें पुलाच्या मग मध्यभागीं ।। गाडोनिया भल्ल अनेक वेगीं ।।
टोंकें तयांचीं खुपसोनी पोटीं ।। टांगीयला सूकर ऊर्ध्व थाटीं ।।४४।।
पूर्वी हणी सोरटिसोमनाथा ।। जो एक सोठा महमूद, आतां ।।
येणेंपरी होळकरें तयाचा ।। काढीयला की वचपाच साचा ।।४५।।
पुलावरी टांगि न तो वराहा ।। भाळा जणों की कबरेचिया हा ।।
तो डाग लावूनि तियेस लोकीं ।। सदैव विद्रूप करूनि टाकी ।।४६।।
फोडोनि देवप्रतिमा अनेक ।। होता अविंधें अणिला कलंक ।।
जो हिंदुशौर्या, जणु तोच तेथ ।। टांगी वराहाकृति मूर्तिमंत ।।४७।।

वराहदेहीं, जणु की घनाचे ।। खंडीं, तदा दांत सुळे तयाचे ।।
भासे उदेले यवनांप्रतीच ।। की धूमकेतूच अनिष्ट साच ।।४८।।
मल्हारजी आदिकरून वीर ।। हे जीस अष्टादश हस्त घोर ।।
आहेत की ती जयवंत सेना ।। चंडीपरी ये पहिल्या ठिकाणा ।।४९।।
पुढें बहू वुद्ध अविंध लोकां ।। घेऊनिया मीरहुसेनकोका[१] ।।
तसाच राजा शिवसिंग[१] कोपी ।। ये संगरीं मुझ्फरखान[१] गप्पी ।।५०।।
स्वशौर्यरूपी जणु घाणियांत ।। तिळांपरी मोंगल हे बहूत ।।
पिळूनियां होळकरें तयांचें ।। काढीयलें खूपच तेल साचें ।।५१।।
मल्हारजी मीरहुसेनकोका ।। धाडी स्वभल्लें यमराजलोका ।।
प्रताप शिंदेहि करूनि थोर ।। करी स्वखड्गें शिवसिंग ठार ।।५२।।
शूरत्वकृत्यें अशिं हीं बघोनी ।। चित्तीं अविंधीं बहुसें भिऊनी ।।
केलें तहा; त्यामधिं पेशव्यास ।। हो लब्ध संपत्ति बहूत देश ।।५३।।
श्रीमंत ऐसे विजयी मराठे ।। घेऊनि येतांचि पुण्यांत थाटें ।।
दे कोंकणीं क्लेश फिरंगि त्यांतें ।। श्रीमंत जाती मग शासण्यातें ।।५४।।
दंडोनियां वाकवुनी फिरंगी ।। हे पेशवा घेउनि वीर जंगी ।।
घेण्या समाचार निजाम याचा ।। [२]भोपाळच्या सन्निध लावि मोर्चा ।।५५।।
हें पेशव्याचें बहु सैन्य थोर ।। प्रचंड पूरापरि सर्वदूर ।।
विस्तारतां मोंगलसैन्य त्यांत ।। ग्रामापरी सांपडलें विभक्त ।।५६।।
सरोनि किल्ल्यांतिल अन्नपाणी ।। तें मोंगलांचें दळ दीनवाणी ।।
होऊनि भारी जठराग्नितापें ।। चित्तामधीं थर्थर फार कांपे ।।५७।।
टोळ्या तयाच्या मग भिन्न भिन्न ।। बाहेर नाना पडता लपून ।।
पळावया, त्यांस चहोंकडोनी ।। मल्हारजी वेढि असें ह्यांनीं ।।५८।।
सिंधूमधीं घोर तुफान थोर ।। नौका जशा पेलित सर्वदूर ।।
टोळ्या तशा, स्वारच हे क्षणीं त्या ।। की पालथ्याची उलथ्या करी त्या ।।५९।।
भूकंप की दारुण उद्भवून ।। नाना गृहें डळमळ हालवून ।।
तो स्वीयदंष्ट्रींच जणो, न गर्ती ।। करी जशीं चूर्ण समग्र पुर्ती ।।६०।।
आवेश ह्यांचा जणु त्या समान ।। टोळ्या तशा त्या बहु हालवून ।।
प्रतापगर्तेत तदा तयांचें ।। करोनि टाकी जणु चूर्ण साचें ।।६१।।
त्रेधा तयांची उडतांच ऐशी ।। ते वाकले त्रासुनि पेशव्याशीं ।।
जयामुळें ह्या धन अर्ध कोट ।। तो पेशवा मिळवि देश इष्ट ।।६२।।

---

१ हे मोगल सरदार होत.

२ ही भोपाळची लढाई इ. स. १७३८ मध्यें झाली.

योद्धे मराठे बलि हे तिथून ।। फिरंगिलोकांप्रत दंड पूर्ण ।।
देण्यास वेगें मग कोंकणांत ।। गेलेचि अत्यंत रणोत्सवांत ।।६३।।

कीं अद्रि दुर्ग वसइस्थ फिरंगि यांचा ।। की वज्र सोडुनि सुरंग महा स्वतांचा ।।
भेदोनि, होळकरवीर यशस्वि धन्य ।। कीं इंद्र भूवर विराजुनि जाय अन्य ।।६४।।

फोईस थोर सरदार तयास बर्ची ।। मारोनि संगरिं वधोनि, फिरंगि यांची ।।
होळी जणो करुनि धाडुनि मृत्युधामा ।। त्यां, आणि होळकर सार्थकता स्वनामा ।।६५।।

•

## ।। भाग सातवा ।।

मल्हारजी समयीं ह्या चिर माळव्यांत ।। स्थापोनि राज्य दृढ, त्यापरि दक्षिणेंत ।।
त्या जाहगीर असुनी बहु थोर आतां ।। संसारसौख्य उपभोगित गोड होता ।।१।।
नेमें सदा उठुनियां अरुणोदयींच ।। प्रातर्विधी अटपुनी मग तो सवेंच ।।
हो प्राप्त मल्लगृहिं दंड हजार तेथ ।। काढोनि, दोन घडि कुस्ति लढे निवांत ।।२।।
तो तीन चार मग शेर पिऊनि दुग्ध ।। जे प्रीतिंतील सरदार रणप्रसिद्ध ।।
त्यांसार्ध बोलत कथा रणिंच्या खुशालीं ।। पावे विराम घटिकाभर अश्वशालीं ।।३।।
सैन्याधिकारि बहु मानकरी स्वतांचे ।। तेव्हां तिथें असत जे मुजरे तयांचे ।।
तो घेत घेत चिर बोलत गोड त्यांशीं ।। स्नानार्थ तेथुनि उठे मग पुण्यराशी ।।४।।
स्नानास तो करुनियां बहुशा जलानें ।। पाटावरी बसुनिया मग शुद्धतेनें ।।
आंगास भस्म बहु चर्चुनि आवडीनें ।। लागे शिवार्चन पुढें करण्या मनानें ।।५।।
गौतमा सुमति अंगनोत्तमा ।। भक्तिमान परमा, सुरोत्तमा ।।
पूजिण्यास नमण्यास मानसें ।। ती सदा पतिसमीपची असे ।।६।।
तैशी स्नुषा अल्पवयी अहिल्या ।। साध्वींत साध्वी सुकृती अतुल्या ।।
शिवार्चना सासुसमीप मौनें ।। बसे सदा प्रेमळ मानसानें ।।७।।
तो वेदमूर्ति जणु शंकरभट्ट वृद्ध ।। नामावली शुभ उमापतिची विशुद्ध ।।
बोले तदा, तदनुसारच वेगळालीं ।। तीं बेल वाहत तिघेजण शंभुभालीं ।।८।।
म्यानांतुनी उपसुनी तरवार तीचें ।। पाणी पहात अथवा कधिं बंदुकीचें ।।
खंडोजिराव सुत पाहत रूप तेव्हां ।। काळ क्रमी करित कृत्य असेंच किंवा ।।९।।
पूजा अटोपुनि करूनि बहूत दानें ।। पत्नी स्नुषा सुत बरोबर आवडीनें ।।
घेऊनि एकवट तो मग भोजनार्थ ।। थाळ्यावरी बसतसे बहुशा सुखांत ।।१०।।
मध्यें विनोदपरगोष्टि तदा करीत ।। पत्नीस सूनुस सुनेप्रत लाजवीत ।।
तो भोजनास अटपोनि, रिघे स्वचित्तें ।। अंतर्गृहामधिं विराम करावयातें ।।११।।
गुणवती पतिदैवत गौतमा ।। शयनिं कांतपदाब्ज मनोरमा ।।
चुरित ती चिर सन्निधची वसे ।। कधिं परस्परभाषण हो असें ।।१२।।
''प्राणनाथ! सरकार! चाकरी ।। ही मला अवडते किती तरी ।।
डागिणा मज कधींहि शालुही ।। ह्यापरी न अवडे अमोल ही'' ।।१३।।
''हे सखे! विमल नित्य अंतरीं ।। ज्या तशाच कुलवंत, सुंदरी! ।।
अंगना असति त्यां असेंच गे ।। वाटतें सतत, हें न वावगें'' ।।१४।।
''वावगें म्हणुन वा न वावगें ।। मी तुम्हां न पुसतें, मला उगें ।।
वाटतें चरण हे अतिप्रिय ।। मत्करांत विलसोत अक्षय '' ।।१५।।

''ते सदाहि असती तुझ्या करीं।। ह्यांत काय अधिक प्रिये! तरी।।
स्वारिंत प्रतिदिनीं अलीकडे।। राहशी, तव मनापरी घडे'' ।।१६।।
''तें खरें, पण सदैव काळजी।। कापि फार सखया! मनास जी!।।
जों रणांत असतां तुम्ही प्रिया!।। तों नसेच मनिं धीर माझिया'' ।।१७।।
''मी कदाहि रणिं जाउं लागतां।। देशि धीर मज थोर तत्वतां।।
हें कसें उलट आज भाषण।। बायकाच तुझि भ्याड एकुण'' ।।१८।।
''कां न बाइ! मज जात घेउन।। त्या लढाईत तरी घरांतुन?।।
बायकाच आम्हीं भ्याड कीं तदा।। हें तुम्हाप्रत कळेल सर्वदा'' ।।१९।।
''बायकोस अथवा लढाइतें।। मी जपूं? वद, कसें करूं तिथें?।।
मी त्वदीय पुसुं घाम? की रणीं।। घाम आणुं रिपुलागिं त्या क्षणीं?'' ।।२०।।
''घाम येइल अहा! मला तिथें।। घाम ये जरि कुठें तया भितें।।
मीहि होळकर बायको खरी।। काय मी डगमगे पहा तरी'' ।।२१।।
''थोर धाव इतुकी तुझी जरी।। काळजी करिशि कां अशी तरी?।।
संगरांत असतों अम्ही सदा।। बोलशी न पण ह्यापरी कदा'' ।।२२।।
''खंडु बाळ बहु हूड तो असे।। त्यास जा जपत फार फारसें।।
तोहि वीरशिशुची असे-तरी।। काळजी उगिं भिणेंच अंतरीं'' ।।२३।।
''देख वाण सतिचेंच निर्भर।। घेतलें आम्हिं असे निरंतर।।
पाहिजे मग कशास घोर हा?।। शंभु साह्यच असो सदा अम्हां'' ।।२४।।
गोष्टी अशा कधिं करीत बहू सुखांत।। तो वामकुक्षि करि चार घडी निवांत।।
विश्रांति घेउनि अशी मग तो तिथून।। होई विराजित कचेरिंत सुप्रसन्न।।२५।।
मंत्री तदीय सुविचारि तसे गुणाढ्य।। कीं नीतिमंत कवि, की गुरू धीबलाढ्य।।
तसेंच मंगलकृती, बुध थोर, त्यांत।। मल्हारजी जणु खुले रवि शोभिवंत।।२६।।
[1]रामाजिपंत पळसीकर हे दिवाण।। श्रीमंत ह्याकडुन त्यापरि जो प्रधान।।
[2]गंगाधर स्थित, तुकोजि, बुळे विठोजी।। संताजि वाघ, अणखी दुसरेहि गाजी।।२७।।
ह्यांचा विचार चिर घेउनि राजकार्य।। प्रत्येक तो नयबलीं करि वीरवर्य।।
लोभी जसा कृपण वित्त, तसा स्वचित्तें।। निर्लोभ लोकहित तो जपि, वाढवी तें।।२८।।
चित्तीं न आणुनि जरा कधिं जातिभेद।। तो सौख्य देइ सकलांस सदा अबाध।।
म्लेंच्छप्रजा शरण नित्य मनें असे जी।। तीतेंहि सौख्य वितरी करि तीस राजी।।२९।।

१ रामाजीपंत पळसीकर हा, सध्यां जे इंदुरांत पळसीकर दिवाण आहेत त्यांचा मूळपुरुष होय.

२ ह्याचे पुरे नांव गंगाधर यशवंत असें होतें. हा लोकांत गंगोबातात्या ह्या नांवानें प्रसिद्ध असे. हा पेशव्यानें नेमलेला मल्हाररावाचा कारभारी होता. हाच पुढें अहिल्याबाईच्या इच्छेआड आला.

कामें अनेक करूनी मग राजकीय ।। तो सैन्य सांध्य समयीं निरखी स्वकीय ।।
घोडे पुढें फिरवुनी मग वेळ कांहीं ।। वाड्यांत तो परत ये युत सेवकांहीं ।।३०।।

गुणिजन रिघले जे तेथ तैं थोर साचे ।। असति जणु तटाकीं हंस की मानसाचे ।।
करुनि गुणपरीक्षा योग्य मल्हारजी त्या ।। सुखवुनि करि मुक्ताहारयुक्त क्षणीं त्या ।।३१।।

युद्धांत कोठें नसतां, खुशाल ।। ऐसा क्रमीं होळकर स्वकाल ।।
तेणें गमे तो जणु धर्मराज ।। त्या नावडेची कधिं नीच मौज ।।३२।।

आतां त्वरें होळकरप्रवर्य ।। उत्पन्न होतांक्षणि राजकार्य ।।
सुतासवें घेउनि सैन्यराशी ।। जाण्या निघे तो रजपूतदेशीं ।।३३।।

खंडूजिराव सुत होळकराग्रणीचा ।। की अर्जुनात्मज दुजा अभिमन्यु साचा ।।
दावीत शौर्य समरीं रणवीर आतां ।। होता, सदा समरिं तो करि साह्य ताता ।।३४।।

वेगें ससैन्य शिरुनी रजपूतदेशीं [३] ।। मल्हारजी जितुनी ईश्वरसिंग ह्याशी ।।
जें बुंदिचें हरण तो करि राज्य घातें ।। घेऊनि संधिमधिं त्याजकडूनिया तें ।।३५।।

---

३ रजपूत लोकांच्या मुलखांत मल्हारराव होळकरानें केलेल्या ह्या पुढील दोन स्वाऱ्यांविषयीं मराठी बखरींत जो वृत्तांत दिला आहे त्याचा सारांश येणेंप्रमाणें :

(१) बुंदीचा राजा उमेदसिंग हाडे हा अल्पवयस्क होता. ह्याची सापत्न माता जयपुरवाला सवाई जयसिंग ह्याची बहीण होती. सापत्न मातेमध्यें आणि पुत्रामध्यें अतिशय प्रेम होते. परंतु जयसिंगानें हे राज्य अपहार करण्याची बुद्धी धरली. भावाचे कपट बहिणीस समजतांच, ती उमेदसिंगाला घेऊन पुण्यास पळून गेली. तेथें मल्हारराव होळकर नुकताच हिंदुस्थानांतून आला होता. ती मल्हाररावाला शरण जातांच, त्यानें तिला उमेदसिंगास बुंदीच्या गादीवर पुन्हा स्थापन करण्याचे अभिवचन दिले. असें राजकारण उपस्थित झाल्यावर मल्हारराव परगणे नेवाई (नेटाई?) प्रांत धुंडाड येथें सैन्यासह दाखल झाला. तो येथें सडी फौज घोडाराऊत घेऊन राहिला. पुढें जयपुरचा सांप्रतचा राजा ईश्वरसिंग (कारण सवाई जयसिंगाचा काल झाला होता.) ह्यानें मल्हाररावावर चाल केली, प्रथम रजपूत व मराठे यांच्या बिनीवरच्या लोकांमध्ये मोठी हातघाईची चकमक झडली, तींत रजपूत पराभव पावले. मग मराठ्यांनीं राजा व त्याचे सैन्य ह्यांस वेढा दिला; व त्यांस कोठूनही दाणापाणी बिलकुल न पोहचे अशी त्यांनीं तजवीज केली. यामुळें ईश्वरसिंग जेरीस येऊन त्यानें आपला दिवाण राजमल्लखत्री याच्या सल्ल्यानें मल्हारराव होळकराशीं तह केला. तहातील कलमें येणेंप्रमाणें : (अ) बुंदीचे राज्य उमेदसिंग हाडे ह्यास परत द्यावे; (ब) व मराठ्यांस खंडणीबद्दल वीस लाख रुपये मिळावे.

(२) जयपुरवाला सवाई जयसिंग ह्याला माधवसिंग व ईश्वरसिंग असे दोन पुत्र होते. त्यांत माधवसिंग वडील बायकोचा असून वयाने धाकटा होता; व ईश्वरसिंग लहान बायकोचा असून वयाने थोर होता. जयसिंगानें ईश्वरसिंगास गादीचा वारस केले.

पुढें जयसिंगाचा काल झाल्यावर ईश्वरसिंग सिंहासनारूढ झाला. परंतु त्याला आपल्या सापत्नबंधूची भीती वाटू लागली. त्यानें माधवसिंगास जिवे मारण्याचा बेत केला. हा त्याचा बेत माधवसिंगाच्या आईस कळतांच, ती तेथून आपल्या मुलास घेऊन, आपले माहेर जे उदेपूर तेथें पळून गेली. उदेपुरच्या राण्यानें आपल्या भाचास मल्हारराव होळकराच्या संधानानें जयपुरच्या गादीवर बसविण्याचा निश्चय केला. मग तो राणाजी माधवसिंगास बरोबर घेऊन, चंद्रावताच्या रामपुरा शहरामध्ये दाखल झाला.

'हाडे' म्हणून रजपूत उमेदसिंग ।। जो स्वामि तेथिल खरा स्थित, त्या अभंग ।।
दे राज्य-थोर जन आश्रय देति ज्यांतें ।। आम्रापरीच फल अर्पिति गोड
त्यतें ।।३६।।युग्म।।
ह्यानंतरी शरण माधवसिंग येतां ।। मल्हारजी जयपुरास सवेग आतां ।।
जाऊनि, तेथिल अमात्यचि मल्लखत्री ।। फोडोनियां, भिडवि सैन्य समीप रात्रीं ।।३७।।
होतांच हें विदित ईश्वरसिंग ह्यातें ।। वालीकृती नृपति तो धरूनी भयातें ।।
येण्याअधींच जणु राघवबाण भल्ल ।। प्राण त्यजी विष पिऊनि अभाग्यशील ।।३८।।
प्रख्यात होळकरवीर यशस्वि आतां ।। की रामचंद्र जणु उत्तरदेशजेता ।।
सुग्रीवतुल्यकृति माधवसिंग जो कीं ।। त्यातें करी जयपुरेश समर्थ लोकीं ।।३९।।
स्वारींत ह्या मिळवुनी धनदेशकीर्ति ।। मल्हारजी विजयि संगरसिंहमूर्ति ।।
सर्वत्र हो श्रुत असा विनवावयातें ।। साह्यार्थ त्या मुसलमानहि लागले ते ।।४०।।
जे रोहिले करित देश सदा अयोध्या ।। उद्वस्त, त्यांस करण्यास्तव दंड सध्यां ।।
दिल्लींतला वजिर सफ्दरजंग तेथें[४] ।। पाचारण्यास करि होळकराग्रणीतें ।।४१।।
मल्हारजी त्वरित घेउनि सैन्य मोठें ।। हो प्राप्त तेथ, दुसरेहि तसे मराठे ।।
तो एक क्लृप्ति अशि अद्भुत ह्याप्रसंगीं ।। काढी, जिणें करि पलायन शत्रु वेगीं ।।४२।।
गोळा करोनि निशिं पांच हजार बैलां ।। श्रृंगांस बद्ध करुनी जळत्या मशाला[५] ।।
सोडोनि देइ मग एक दिशें तयांस ।। वृक्षीं तसे धरि दिवे दुसऱ्या दिशेस ।।४३।।

---

३ त्यानें मल्हारराव होळकरास सांगून पाठविले कीं, माधवसिंग हा तुमचा भाचा आहे; त्याला जयपुरच्या गादीवर बसविण्याची आपण तजवीज करावी.

असें दुसरें राजकारण उपस्थित झाल्यावर मल्हारराव फौजेनिशीं तिकडे वळला. ईश्वरसिंग व राजमल्लखत्री दिवाण ह्यांची मने परस्परांविषयीं शुद्ध नव्हती. म्हणून दिवाणानें मल्हाररावास फौजेसह चाटसू प्रांत धुंडाड येथपावेतों युक्तिप्रयुक्तिने आणिले. नंतर त्याने ईश्वरसिंगास सांगितले की, मल्हारराव होळकर मोठी फौज घेऊन सदरहू ठिकाणीं आला आहे; आपण फौज जमा करून त्याशी सामना करावा. हे वर्तमान ऐकतांच राण्याचे हातपाय गळाले. मराठे फार जवळ येऊन भिडले, व दरबारांतही फितूर दिसतो म्हणून आता आपली धडगत नाही ह्या धास्तीनें ईश्वरसिंगाने विषप्रयोग करून आपला प्राण दिला. हे वर्तमान लगैहात दिवाणानें होळकरास कळविले. मल्हारराव तत्काल जयपुरास दाखल झाला. राजाचे प्रेत पडले होते, त्यास अग्निसंस्कार करवून तेथें त्याने स्वस्थता राखिली. मल्हाररावाने दुराशा न धरितां ह्या राज्याचा अपहार केला नाही. त्यानें रामपुऱ्यांत सांडणीस्वार पाठवून माधवसिंगास आणिले; आणि त्याला पुत्र म्हणून जयपुरच्या राज्यपदीं स्थापित केले. माधवसिंगानेही ह्या उपकाराबद्दल मल्हाररावास पाऊणकोट रुपये नजराणा दिला. ह्याशिवाय त्यानें रामपुरा, हिंगळाजगड, टोंक व धाकटा रामपुरा, इतक्या जागा होळकरांच्या ताब्यात दिल्या.

४ ही रोहिल्यांवरची स्वारी मल्हाररावानें इ. स. १७५१ मध्यें केली.

५ प्राचीन काळीं कार्थ्याजिनियत जनरल हानिबाल ह्यानें अशीच युक्ति योजून रोमन लोकांचा पराजय केला होता.

होता निशीथसमय क्षणिं या भयाण।। सर्वत्र निश्चल असे, न हलेहि पान।।
दाही दिशांस भरला निबिडांधकार।। होता, पदार्थ पुढचा न दिसेहि थोर।।४४।।
अस्तें कलंकिविधु हो नत अंधकारा।। आश्चर्य हें न, पण निर्मल होत तारा।।
त्या लुप्त! हा नियमची जगिं दुर्जनांचें।। वर्चस्व तें सुजन पावति लोप साचे।।४५।।
होती तदा चहुंकडे बहु सामसूम।। होते करीत पशु वन्य मधून धूम।।
वेळीं अशा वृष सदीप म्हणून भीत।। वेगें पुढें भडकले बहु अत्यवस्थ।।४६।।
झालेहि वृक्ष इकडे बहु दीपबद्ध।। तेजोनिधीच पसरे विपिनांत शुद्ध।।
जे हो तरूंवरि दिवेच दिवे गमे ते।। आरक्त काय फुललीं सुमनेंच त्यांतें।।४७।।
ही रात्र कृष्ण यमुनाच गमे विशाल।। हे दीप लाल कमलें व तिच्यामधील।।
कीं रात्र नाथगमनें रुसुनी स्वताचे।। आरक्तनेत्र करि काय मिसें दिव्यांचे।।४८।।
शार्दूल गर्जन तदा त्यजुनी भयानें।। सोडोनि जंबुक कुई बहु संभ्रमानें।।
घूत्कार टाकुनि दिवांध भयांधतेनें।। तैसे दुजे वनवराहवृकादि मौनें।।४९।।
जाळीमधीं, दडणिं, ढोलिंत, जेथ तेथें।। गुप्तस्थलां बघत शोधित भीत चित्तें।।
हें काय संकट असे न कळोनि त्यातें।। सैरावरा चहुंकडे पळुं लागले ते।।५०।।युग्म।।
अन्योन्यखाद्य पशु हे असतांहि आतां।। एकत्र जाति पळुनी पथिं भेट होतां।।
सर्वांसमान भय जे करितें असेंच।। जे जे परस्परविरुद्ध तयां सखेच।।५१।।
वृक्षस्थ पक्षिगण झोंपिंतुनी उठून।। लागे उडू, पण अदृष्टि उडे म्हणून।।
दीपांवरीच-फिरतां विधि, सारखेंच।। हो त्राणसाधन असून नसून साच।।५२।।
येथें असा घडत हा असतां प्रकार।। मल्हारजी त्वरित घेउनि अल्प वीर।।
फेंकोनि अश्व तिमिरीं तिसऱ्या दिशेनें।। म्लेंच्छांवरी तुटुनि तो पडला त्वरेनें।।५३।।
ते रोहिले दचकुनी उठले, मराठे।। पाहोनि सन्निध तयां भय फार वाटे।।
देखोनि तोंच जिकडे तिकडे दिवेच।। भासे तयांस भडके वणवाच साच।।५४।।
भासे तयांस मग लावुनि की मशाला।। वेताळ घेउनि पिशाचगणा निघाला।।
हे भास होति मनिं जों क्षण एक त्यांचे।। लागेच तो उदरिं भल्ल शिरूं तयांचे।।५५।।
ते तर्कले मग मनामधिं घाबरोनी।। ''हा एक मार तर येच, चहूंकडूनी।।
आहेत येत दुसरेहि रिपू सदीप''।। चोहीकडे म्हणुन ते फुटले सकंप।।५६।।
मल्हारजी बहुत ठोकुनि शत्रु काढी।। दाढ्या धरून उलथे अदळोनि झोडी।।
ते संकटेंच पण ओसरले त्वरेनें।। वायु प्रचंड रिघतां ढग ज्याप्रमाणें।।५७।।
सर्वस्व लब्ध रिपुचें मग हो मराठ्यां।। हो प्राप्त त्यांत बहुमोलहि वस्तु मोठ्या।।
ढाला धनें भरुनि होळकरप्रवीर।। देऊनि तुष्ट करि ह्यासमयीं स्ववीर।।५८।।

हें संपतांच रण होळकरार्य शूर ।। दिल्लींत सादर रिघे रणरंगधीर ।।
तो बादशाह सरदेशमुखी करून ।। दे त्यास चांदवडची बहु गौरवून [६] ।।५९।।
ही प्राप्ति थोर सरदेशमुखीपणाची ।। पावूनि काय जणु भोगि शिखामण्याची ।।
मल्हारजी परत तेथुनि ये पुण्यास ।। दे हर्ष फार सकला, अति पेशव्यास ।।६०।।
ह्यानंतरी त्या गुणि पेशव्यानें ।। त्यातें 'सुभेदार' अशी मुदानें [७] ।।
देऊनि मोठी पदवी स्तवून ।। दे माळवीं धाडुनियां तिथून ।।६१।।
जैसा सुधांशु शरदांतिल पौर्णिमेचा ।। तेजस्वि षोडशकलें विलसे सुखाचा ।।
मल्हारजी सुखद सर्वजनां तथैव ।। ह्या श्रेष्ठशा पदविनें विलसे सदैव ।।६२।।

---

६ इ. स. १७५१ मध्ये चांदवड या सरदेशमुखीची सनद मल्हाररावास बादशाहाकडून मिळाली.

७ इ. स. १७५१ मध्येंच पेशव्यानें मल्हाररावास 'माळव्याचा सुभेदार' म्हणून उपपद दिलें.

•

## ।। भाग आठवा ।।

जाटास दंड करण्या रघुनाथपंत ।। शिंदेहि होळकर ह्यासमयीं सुखांत ।।
कुंभेरनामकपुरा रिघुनी सवेग ।। वेढीत त्या रणधुरंधर हे त्रिवर्ग ।।१।।
एकेदिनीं करित पौरुष देत वेढा ।। खंडूजीराव असतां रणवीर गाढा ।।
तोफेंतुनी सुटुनि शत्रुकडील गोळा ।। लागोनि त्यास हृदिं तो पडला भुईला ।।२।।
भासे तदा सकळिकां पडला अकालीं ।। हा वीर काय अभिमन्युच अन्य खालीं ।।
मल्हारजी त्यजुनि शुद्धिस ह्या कुवार्ते ।। खालीं पडे गळुनि की गिरि वज्रपातें ।।३।।
वेढा त्यजूनि मग तेथुनि सर्व वीर ।। घेऊनि मूर्च्छितचि होळकरप्रवीर ।।
म्यान्यांत घालुनि तसा युवराजदेह ।। गोटांत शीघ्र अपुल्या रिघले समोह ।।४।।
हो बायकांमधिं अकांत-किती बरें तें ।। होणार दुःख जननीस! किती स्त्रियेतें!!।।
मल्हारजी हळुंहळूं उठुनी अशांत ।। होऊनि सावध विलाप करी बहूत ।।५।।
''हे बालका! मम करा किति थंड गार ।। हा लागतो कर तुझा जणु शीत नीर! ।।
जी उष्णता रणिं चढे रिपुमर्दनें ते ।। गेली कुठें अजि करांतुनि सांग मातें? ।।६।।
ऐसा तुझा अचल कां पडला सुकाय! ।। चांचल्य त्यांतुन कुठें रणजन्य जाय? ।।
हो काय भाजुनि दशा तरि ह्या मुखाची! ।। गेली तयावरिल कांति कुठें यशाची? ।।७।।
जी घाय घेउनि अनेक रणीं सदाही ।। छाती तुझी डगमगे न पुरा जराही ।।
ती आज भग्न कशि होय! कुठें तियेचें ।। सामर्थ्य जाय? मज सांग मुखें स्वतांचे ।।८।।
येता रणांतुनि तुझें मुख शौर्यगोष्टी ।। सांगूनि देत अज कां मजला न तुष्टी? ।।
कां नेत्र आज मिटले? रणकष्ट होतां ।। आहेस काय तरि निद्रित गाढ आतां! ।।९।।
हा तात दीन तव मारित तूस हाका ।। आहे, तयासहि न उत्तर देशि तू कां? ।।आक्रोश।।
फार पडुनी धरणीवरी ही ।। माता करी तव, तिशीं तरि बोल कांहीं ।।१०।।
ही स्त्री सती तव अचेतन भूमिभागीं ।। आहे, तिला तरि उठीव उठूनि वेगीं ।।
हा लाडका सुत तुझा रडतो पहा कीं ।। घेऊनि त्यास तरि तूं समजीव अंकीं ।।११।।
आतां मदीय गुणि बोलत हा न पुत्र! ।। आता मदीय कसला तरि! मी अपुत्र! ।।
आतां गुणीहि कसला! गुण लुप्त सारे! ।। देवा कसा दिवस हा अणिला तुवां रे!।।१२।।
आतां असे विफल जीवित हें मदीय ।। दीपाविना सदन जेवि, तसेंच होय ।।
आतां असे मजपुढें तम सर्वभागीं ।। जाऊ कसा तरुनि ह्यांतुनि मी अभागी! ।।१३।।
आहे किती कठिण दुःसह की पित्यानें ।। द्यावी तिलांजलि सुता अपुल्या करानें! ।।
काळीज हें करपतें मम हे गिरीशा! ।। भस्मूनि त्यासच करी मम शीघ्र नाशा ।।१४।।

अंकीं स्वकीय शिशुंच्या धरुनी स्वशीर्ष ।। पंचत्व पावति सुखमधिं जे सहर्ष ।।
ते तात धन्य किति होत! किती सुखी ते! ।। आतांच मारुन विभो! मज, सौख्य दे तें ।।१५।।
हें राज्य हें सदन काय करावयायें? ।। हें व्यर्थ जीविताहिं काय करावयाचें?'' ।।
मल्हारजी वदुनि ह्यापरि खिन्न राहे ।। होत्या स्त्रिया करित शोक बहूत मोहें ।।१६।।
शास्त्रज्ञ पोक्त शुचि शंकरभट्टनाम ।। होता पुरोहित तिथें सुविचारधाम ।।
तो ह्याक्षणीं, जरि मनामधिं खिन्न, वाचें ।। लागे करूं प्रथम सांत्वन बायकांचें ।।१७।।
माता वदे ''कुलगुरो! कशि सांडुं दुःख? ।। गेला किं हो सुत बरोबरिचा सुरेख! ।।
आम्हां कधीं दुखविलें न कुभाषणानें ।। वृद्धा अम्हां त्यजुनि जाय कसा त्वरेनें ।।१८।।
आणूनि आजच बनामधुनि शिकार ।। ठेवूनियां मजपुढें वदला कुमार ।।
'आई! हिला करुनि ठेव, तुझ्या कराचें ।। लागे मला बहुत भोजन गोड साचें ।।१९।।
येतां रणामधुन जेविन सावकाश' ।। गेला असें वदुनि तो मजला रणास ।।
हा वेळ पाहत बसें तव वाट बाळा! ।। मातें कसें फसविलें पण तूं? कपाळा! ।।२०।।
आतां कुणास तरि भोजन तें समर्पूं! ।। हातास ह्या यश न, काय तयास कापूं?'' ।।
दाटूनि कंठ तिजला मग बोलवेना ।। तों स्त्री तदीय वदली अतिशोकपूर्णा ।।२१।।
''आतां तुम्हांस म्हणतें दुसरें न कांहीं ।। जातें सती पतिसवें, मज धीर नाहीं ।।
ह्या सासुबाइ जननीसम, मामुजी हे ।। संभाळतीलच मुला, वदणें नको हें'' ।।२२।।
शोकार्णवांत असतां सगळे असे ते ।। बोले पुरोहित ''घडे भवितव्य जें तें ।।
होणार काय तरि शोक करूनि आतां ।। जो प्राणि जाय नच तो मिळणार हातां ।।२३।।
व्हावा रणांत मृत तो प्रभुचाच होतां ।। हा नेम; त्यास अपुला न उपाय आतां ।।
विद्युद्विपत्ति अवचीत शिरीं जगीं या ।। ऐशाच कोसळति! ही प्रभुचीच माया ! ।।२४।।
जन्मे जगीं मनुज तो मरतोच तेथ ।। आहे जरी खचित हें तरि भेद त्यांत ।।
आहे असा, मनुज जे मरतात कांहीं ।। सत्कारणींच, मत ते मृत हो कदाही ।।२५।।
त्यांचाच मृत्यु अति धन्य, मरोनियांही ।। पृथ्वीमधीं अमर ते असती सदाही ।।
तारेच होत पृथिवीवरचे महा ते ।। रत्नेंच होत तिचिया गळिंचीं जणो ते! ।।२६।।
ह्या कोटिंतीलच खरा तुमचा सुपुत्र ।। जो ठोकित स्वरिपु चालवित स्वशस्त्र ।।
जो मुक्त देश करण्या निघतां स्वकीय ।। पावे रणीं मरण, तो नच रत्न काय? ।।२७।।
आहे किती मरण गोड तरी अहा! हें ।। चित्तास मोहुनि किती तरि हर्ष दे हें ।।
ह्याच्या पुढें खचित तुच्छ असे स्वगेहीं ।। बैसूनि कोट्यावधिवत्सर वाचणेंही ।।२८।।
घेऊनि राज्य परके घुसतां स्वदेशीं ।। जो प्राण दे समरिं, घालविण्यांत त्यांशी ।।
देशाभिमानयुत तोच उदार भारी ।। स्तुत्यर्ह तोच नर तोच परोपकरी ।।२९।।
जो देशमुक्तिकरितां पडतो रणांत ।। त्याचाच तो सफळ जन्म असे बहूत ।।
त्या स्वर्गवास चिर, उद्धरुनी कुला तो ।। निभ्रांत उत्तमगती पितरांस देतो ।।३०।।

पोटीं असे उपजणें सुतरत्न साचें ।। हें फार थोर तरि भाग्य असे कुणांचें ? ।।
ज्यांच्या असे पदरिं पुण्य तदीय पोटीं ।। रत्ने अशी निपजतात अमोल मोठी ।।३१।।
पुत्रें रणांत मरुनी स्वपित्या यथार्थ ।। सर्वामुखीं म्हणविणे चिर वीरतात ।।
मातेप्रती म्हणविणें चिर विरमाता ।। स्वस्त्रीप्रती म्हणविणें चिर वीरकांता ।।३२।।
हें थोर भूषण मनोज्ञ परस्परांस ।। आहे किती! न वदवे! उपमा न त्यास ।।
तो धन्य तात! सुत धन्य! तशीच माता ।। ती धन्य! त्यापरिच ती अति धन्य कांता!'' ।।३३।।
हे गोड बोल परिसोनि पुरोहिताचे ।। शांती गमे मनिं जरा सगळ्या जणांचे ।।
शिंदे जयाजि सुमती, रघुनाथपंत ।। मल्हारजीस मग शांतविती बहूत ।।३४।।
जाऊं सती न दिली अपुल्या सुनेस ।। हें सर्व दुःख गिळुनी, मथुरापुरीस ।।
पुत्रक्रियेस करण्यास्तव फार खिन्न ।। मल्हारजी त्वरित जाय पुढें तिथून ।।३५।।
दिल्लीपंत त्यजुनि भोग विलास निद्रा ।। नामें असे नगर जें चकलेशिकंद्रा ।।
जाटास साह्य करण्या निघतां तयांत ।। होता तदा उतरला पथिं सैन्ययुक्त ।।३६।।
होतांच हें विदित होळकराग्रणीतें ।। छापा अकल्पिक रिपूंवर शीघ्र तेथें ।।
घालूनि तो पळवि त्यास, परंतु राणी ।। पेंढारि सैन्य धरि ती मलकाजमानी ।।३७।।
पेंढारियांकडुनि बेगम घेउनी ती ।। मल्हारजी तिस तदा बहु तुष्ट चित्तीं ।।
योग्यादरें करुनि धाडुनि दे सुखांत ।। दिल्लीमधीं स्वसुमती जणु मूर्तिमंत ।।३८।।
मागूनि तोहि यवनेशपुरींत थाटें ।। सैन्यासवें रिघुनि बादशहास भेटे ।।
पावूनि मान धन आणिक जाहगीर[१] ।। मागें फिरे तेथुनि होळकरप्रवीर ।।३९।।
ह्यानंतरी रणबली रघुनाथराव ।। घेऊनि होळकरवीर सवें निगर्व ।।
देण्यास मार गिलच्यांस रणांगणांत ।। दिल्लीमधीं गमन तो करि सैन्ययुक्त ।।४०।।
येतां इथें नजिबखां शरण स्वतांला ।। मल्हारजी तिथुनि त्याप्रत शुक्रताला ।।
काढूनि वाचवि मयासुर ह्यास जैसा ।। कौंतेय खांडववनांतुन शीघ्र तैसा ।।४१।।
अग्रेसरत्व समरांतिल घेउनीयां ।। मल्हारजी बलि पुढें मग सर्सुनीयां ।।
लाहोरनामकपुरास जितूनि, मारा ।। देऊनि थोर, गिलचां रणिं ठोकि सारा ।।४२।।
ठाणीं तिथें सुदृढ बैसवुनी स्वकीय ।। जीवंत कीं स्वविजयप्रतिमाच काय ।।
मल्हारजीप्रभृतिवीर तिथुनि मागें ।। स्वस्वस्थला परतले मग सर्व वेगें ।।४३।।
कांहीं पुढें दिन सुखें क्रमिता बसून ।। मल्हारजीप्रत पुण्यांतुन ये लिहून ।।
''पैसा तुम्हाकडुन सांप्रत येथ ये न ।। श्रीमंत रुष्ट तुमच्यावर हो म्हणून'' ।।४४।।
हें ऐकतांच अपुले चतुरस्त्र लोक ।। धाडोनिया प्रथम, मागुन तो सशंक ।।
ये दक्षिणेंत, उतरे मग जेजुरींत ।। हें वर्तमान कळलें सगळें पुण्यांत ।।४५।।

---

१ मराठी बखरीत लिहिले आहे कीं, ह्यावेळीं बादशाहानें मल्हाररावास फक्त ऐशीं लाख रुपये दिले; व अंतरवेदींतील विटाव्या तालुक्यापैकी कांहीं गांव बक्षीस दिले.

नेण्या पुण्यामधिं तया सुत पेशव्याचा ।। येई तिथें सुमति माधवराव साचा ।।
तो ह्या सुतासहित शीघ्र पुण्यासमीप ।। आला जणो घन सुखप्रद सेंद्रचाप ।।४६।।
श्रीमंत आणिक सदाशिवराव आंगें ।। येऊनि नेति पुरिं सादर त्यास संगें ।।
तो स्वस्थलास रिघतां स्वमनीं सशंक ।। त्यातें विचार सुचला मग शीघ्र एक ।।४७।।
मागील रात्र उरतां प्रहर स्वचित्तें ।। तो पालखींत बसुनी, अपुल्या स्थलातें ।।
सोडूनि, अल्पजन घेउनियां स्वतांचे ।। की शुक्र अन्य उदये गृहिं पेशव्याचे ।।४८।।
तो नंतरी तिथिल चाकरमाणसांत ।। गादी स्वकीय पसरोनि निजे सचिंत ।।
श्रीमंत आणिक सदाशिवराव तेथें ।। ये मल्लकृत्य उरकोनि उगीं स्वचित्तें ।।४९।।
बिंबाजि नाइक वदे मग त्यांस ''येथ ।। मल्हारजी रिघुनि निद्रित चाकरांत ।।
आहेत; हें घडुनि वेळ बराच जाय'' ।। हें ऐकतांत बहु विस्मय त्यांस होय ।।५०।।
ते तत्क्षणीं उभयतां रिघतां समीप ।। मल्हारजी उठुनि त्यांस लवूनि मोप ।।
राहे उभा स्वकर जोडुनि किंकरींच ।। गंभीरसा स्वकर जोडुनि कीं करीच ।।५१।।
श्रीमंत त्याप्रद वदे ''लवणें कुठून ।। आलें अजी? किमपी हें समजे अम्हां न ।।
आहां अम्हां चिर तुझी वडिलाठिकाणीं ।। आली तशीच कृति होत तुम्हांकडोनी'' ।।५२।।
बोलोनि ह्यापरि करीं कर पेशव्यानें ।। देऊनि होळकर ह्याप्रति मान्यतेनें ।।
तो स्वासनावरि अधिष्ठित होय आतां ।। तेथें उभा उगिं सदाशिवराव होता ।।५३।।
भाऊकडे बघुनि होळकरप्रवीर ।। बोले ''उभा असशि कां अमुच्यासमोर! ।।
बा ! बैस तूंहि, रिघलों बघ मीच येथें ।। कर्तव्य काय तुज जें कर ह्याक्षणीं तें ।।५४।।
कारागृहांत मज टाक, तशाच घाल ।। बेड्या पदीं मम, करी तुज जें रुचेल'' ।।
भाऊस बोलुनि असें, बसवोनि त्याला ।। खालीं, पुढें उभयतांप्रत तो म्हणाला ।।५५।।
''ते बाजिराव सुमती असतां, सदाही ।। वागूनिया अगदिं निष्प्रतिबंध आम्ही ।।
तें कृत्य जें करूं नये अमुच्याकडून ।। होतांच लेंकुरपणें, वदतां जरा न ।।५६।।
त्याची क्षमाच चिर थोर मनें करूनी ।। ह्या योग्यतेप्रत अम्हां आणिलें तयांनीं ।।
लोभें तदीय चिर आश्रय पावलेलों ।। आहों अम्ही गरिब चाकर वाढलेलों ।।५७।।युग्म।।
हो राजकारण अम्हां करणें कसेंही ।। केलें अम्ही न पुसतां कधिं त्यांस कांहीं ।।
त्यांनीं परंतु अणितां न मनांत काहीं ।। मानीयलेंच अमुचें करणें सदाही ।।५८।।
त्यांचेच वंशज तुम्ही, म्हणुनी असेंच ।। चालेल, हा भरंवसा मजलागिं साच ।।
होता; बघूनि अपुली पण दृष्टि वक्र ।। डोळे अतां उघडले अमुचेहि शीघ्र ।।५९।।
आलों असे समयिं या अपुल्यापुढें हा ।। मी एकटाच, धनि आपण थोर आहां ।।
निर्भ्रांत सर्वपरि चाकर दोषयुक्त ।। आहों अम्ही; जवळ मी स्थित होय येथ ।।६०।।
जें पारिपत्य करणें अमुचें असेल ।। तें ह्या घडीस लवलाहि करा खुशाल ।।
पायांत घालुनि बिड्या गडिं टाकुनीयां ।। घ्या प्राण सत्वर मदीय तुम्ही क्षणीं या'' ।।६१।।

श्रीमंत त्या वदत तैं ''मजलागिं भासे ।। तोंडांतुनीच अपुल्या निघतील ऐसे ।।
हे बोल दुःसह जरी तरि काय आतां ।। ये आमुचा विषम कालच दुःखदाता'' ।।६२।।
श्रीमंत सद्‌गदित होत असें वदून ।। मल्हारजीहिं मनिं जाय तसा द्रवून ।।
श्रीमंत ह्यांस मग होळकराग्रणीस ।। भाऊ वदे उभयतांप्रत सावकाश ।।६३।।
''आहां तुझी उभयतां सरदार थोर ।। शास्त्रार्थगोष्टि कथुनी रमणीय फार ।।
वाग्वैभवास बहु दावितसां खरेंच ।। माझ्या गळीं पण असे पडला प्रपंच ।।६४।।
वाण्याकडूनि पहिलें घरिं दाळपीठ ।। आणोनियां, जिथिल तेथिल बेत नीट ।।
लावोनि, भाग पडतें मज साधण्याचें ।। नित्य प्रसंग, मज सौख्य कदा न साचें ।।६५।।
देणेकरी सतत पाठिस लागुनीयां ।। आहेत, त्यास मम काम तुम्ही क्षणीं या ।।
पाहोनि, मेळ अवलोकुनिं कागदांचे ।। ह्यांतूनि मोचन करा मम एकदांचें ।।६६।।
मीही बहूत मग बोलुनि गोड छान ।। घेईन बा! उभयतांप्रत आवडून ।।
आहां समर्थ धनि चाकर सारखेच ।। एकत्र आपण अहां बसले तसेंच ।।६७।।
झालें असे बहुतसें ऋण दौलतीस ।। चित्तांत किंतु जरि हो तरि कागदांस ।।
पाहोनि, मुक्त मजलागिं करा'' तयातें ।। मल्हारजीं मग वदे बहु शांत चित्तें ।।६८।।
''आहे तुला शपथ, सांग खरें, किती तें ।। झालें असे ऋण!'' सदाशिवराव त्यातें ।।
''पाऊण कोटि रुपये'' हसुनी म्हणाला ।। ''कांहीं उणे अधिकसे असतील मेळा'' ।।६९।।
तो लेखणी दउत कागद मागवोनी ।। भाऊस सत्वर कथी लिहिण्यास पानीं ।।
''शिंद्यावरी अणि अम्हांवरि साठ लक्ष ।। लावा; दुज्यांवर तसें उरले समक्ष'' ।।७०।।
हे साठ लक्ष रुपये मग मागतांच ।। मल्हारजी त्वरित बोलवुनी तिथेंच ।।
तो कोट्याधीश धनिकाधिप विष्णुपंत[२] ।। देई तयाकडुनि ते रुपये समस्त ।।७१।।
श्रीमंत आणि बलि होळकरप्रवीर ।। ह्यांचें असें बहु हितावह ऐक्य थोर ।।
हो - प्रत्यहीं गगन आणिक सूर्य ह्यांचें ।। जैसें, तसेंच चिरकाल अभंग साचें ।।७२।।

---

२ हा विष्णुपंत पेशव्याचे वेळीं पुण्यांत कोणी मोठा सावकार असावा असे मराठी बखरीवरून दिसते.

•

## ॥ भाग नववा ॥

मल्हारराव असतां स्थित दक्षिणेंत ॥ शिंदे ससैन्य इकडे रणिं उत्तरेंत ॥
गाजीउद्दीन यवनाप्रत साह्य देत ॥ होते बहू नजिबखां सह झुंज घेत ॥१॥
नजिबखां गिलचे अपुल्याप्रती ॥ रणिं सहाय करूनि लढे अती ॥
सतत हें असतां रण चालत ॥ यवन तो यमुनातटिं हो स्थित ॥२॥
खुलतसे यमुनेंत मधें तिथें ॥ सुखद बेट[१] गमे दिसतांच तें ॥
जणु तदीय उरःस्थल अल्पसें ॥ पदर जाउनियां उघडें दिसे ॥३॥
बेटास सोडूनि पठाण रोहिले ॥ येण्या पुढें दोन हजार पातले ॥
घेऊनि थोडे रणवीर सत्वर ॥ शिंदे तुटोनी पडले तयांवर ॥४॥
जें युद्ध हो घोर तदा, तयामधीं ॥ दत्ताजि आणी जनकोजि शौर्यधी ॥
हे झुंजले फार असें घडीभरी ॥ ते भासले राघवलक्ष्मणांपरी ॥५॥
ठोकीत शत्रू असतां समोर ॥ घायाळ झाला जनकोजि फार ॥
दत्ताजिचा होय ठिकाण नष्ट[२] ॥ झाले मराठ्यांप्रत फार कष्ट ॥६॥
मल्हारजी घेउनि सैन्यराशी ॥ होता क्षणीं ह्या रजपूतदेशीं ॥
साह्यार्थ त्यातें जनकोजि यानें ॥ बोलाविलें त्या समयीं त्वरेनें ॥७॥
शिंदे अणी होळकरप्रवीर ॥ एकत्र होतांक्षणीं सैन्यभार ॥
ठेवूनि तोंडीं रिपुचे, तिथूनी ॥ आग्र्याकडे ते वळले मिळूनी ॥८॥
जें युद्ध मागें बहु होय दारुण ॥ योद्धे मराठे रिपु त्यांत घेरुन ॥
होते जया मेळविण्यांत निश्चयें ॥ तों म्लेंच्छसेना रणिं फार अन्य ये ॥९॥
ज्या हो 'खराडे' उपनाम, मल्ल ॥ तो शेटिबा होळकराकडील ॥
योद्धा अन्याबा पळशीकराख्य ॥ कामास येता समरांत मुख्य ॥१०॥
सेना मराठी सगळी पळाली ॥ आग्र्यास ती होळकरा मिळाली ॥
मल्हारजी नंतर सैन्यराशी ॥ घेऊनियां ये रजपूतदेशीं ॥११॥
पराभवाचें मग वर्तमान ॥ धाडी पुण्याभीतरिं तो लिहून ॥
ही तेथ वार्ता फुटतांच पूर्ती ॥ हो क्षुब्ध भारी जनचित्तवृत्ती ॥१२॥
आज्ञापत्रें धाडुनी पेशव्यानें ॥ पाचारीलें सर्व वीरा त्वरेनें ॥
भाऊलागीं सर्वसैन्याधिपत्या ॥ देऊनी तो धाडण्याचें करी त्या ॥१३॥
जरी न हो तज्जननीमनामधीं ॥ विश्वासरावाप्रत आग्रहें अधीं ॥
घेऊनि सेनेसह उत्तरेकडे ॥ भाऊ न आतां क्षण लावितां चढे ॥१४॥

---

१ यमुना नदीमध्यें हे शेरणीचे बेट होते.

२ इ. स. १७५९ मध्यें दत्ताजी शिंदा धारातीर्थी पतन पावला.

मल्हारजी त्यास तदा लिही ''पुढें। अविंधसेना नदिच्या तटाकडे ।।
येता न, मागेंच असा.'' परंतु हें। तो नायके, येइ पुढेंच आग्रहें ।।१५।।
पुढें तया होळकरप्रवीर ।। शिंदे, तसा सूरजमल्ल वीर ।।
मार्गी मिळाले, अणखीहि अन्य ।। युद्धार्थ योद्धे रिघले ससैन्य ।।१६।।
हें चालवावें रण कोणत्या रिती ।। ह्याचा करायास विचार सांप्रती ।।
एकत्र योद्धे मिळतांच, भाउला ।। तेव्हां असें सूरजमल्ल बोलला ।।१७।।
''न लढते नर, वस्तु जड, स्त्रिया ।। सुदृढ थोर गडीं धरुनी तयां ।।
रिपुंसवें हलकें हलकें, सडे ।। लढुनि आपण त्यास अणूं रडें ।।१८।।
चपळ दक्षणि लोक खरे जरी ।। तरि असे रिपुची कडि त्यांवरी ।।
म्हणुनि मी म्हणतों लढतां तसें ।। पळुनि जातिल ते रिपु कीं ससे'' ।।१९।।
विचार चित्तांत करूनि नंतरी ।। मल्हारजी भाषण त्या क्षणीं करी ।।
''जें बोलले सूरजमल्ल सांप्रत ।। तें सर्व आहे मजलागिं सम्मत ।।२०।।
अभ्यास ऐसाच लढावयाचा ।। आहे अम्हांला चिरकाल साचा ।।
ही युद्धरीती बहु साधलेली ।। आहे मराठ्यां चिर लाभलेली ।।२१।।
घेऊनियां सैन्य अशेष आपुलें ।। त्या फेकितां चोहिकडे न मोकळें ।।
एक्याच ठायीं करितां जरी रण ।। होऊं यशस्वी न तयांत आपण ।।२२।।
स्वनाश होईल तरी असा महा ।। समर्थ होऊं न लढावया पुन्हा ।।
जो स्वाधिकारात्मकवृक्ष वर्धित ।। समूळ तेणें उलथेल निश्चित ।।२३।।
टोळ्या करोनी लढणें अनावृत्त ।। वाटे बरें; कारण हो पराजित ।।
टोळी जरी एक, दुजी तिजी तरी ।। होईल शौर्यें जयवंत संगरीं ।।२४।।
बरें कुणीही विजयी न हो जरी ।। तयामधीं स्वहित कोणतें तरी? ।।
सर्वस्व घेऊनि सुखांत आपण ।। जाऊ स्वदेशीं, परंतूहि मागुन ।।२५।।
बरें, मिळाला जय झुंजता असें ।। सोन्याहुनीही पिंवळेच फारसें ।।
येणें करूनी अपुलेंच राहिल ।। महत्व येथें ध्रुवतुल्य निश्चल ।।२६।।
म्हणोनियां मी म्हणतों तसें लढूं ।। विच्छिन्न वैरी करण्यामधीं गढूं ।।
घालूनि छापे दिनरात्र सारखे ।। करूं अविंधांस सुखास पारखें ।।२७।।
थकूनि भागूनि वनांत चालता ।। ते पीत हुक्के असतां विसंबता ।।
घेरूनि त्यांलागिं कदा अकल्पिक ।। भाजूं फुटाण्यांपरि ते गवंतक ।।२८।।
उपोषणांनीं गळुनी, पथीं कधीं ।। थांबूनि, जों घालिति ते मुखामधीं ।।
कदन्न, तों गाठुनि त्यां वनांतरीं ।। केव्हां पिटाळूं खरमर्कटांपरी ।।२९।।
निमाज कल्मा पढत स्वजानुंला ।। टेकोनिया ते असतांहि त्यांजला ।।
वेढोनि ते जों नच होति सावध ।। केव्हां तयांची करू तोंच पारध ।।३०।।

काहूनि दुःखातिशयें बहू असें ।। ते झोपिचे जों बहु गोड गोडसे ।।
घेती न घेती झुरके निशाभरीं ।। त्या तोंच केव्हां पळवूं भुतांपरी ।।३१।।
त्यां खानपानीं शयनासनीं असें ।। गाठूनि ठोकूनि पिटूनि धाडसें ।।
प्रसंग येता कधिं सामना रणीं ।। करूनि, त्यांची नरडींच फोडुनी ।।३२।।
अत्यंत त्या जर्जर ह्यापरी सदा ।। करूनि, त्यांचे मुखिं 'या! खुदा! खुदा!'।।
हीं अक्षरें घालुनिया, पुढें झुट ।। त्यांची करूं चोहिकडे फुटाफुट ।।३३।।
येथें न त्यांतें घरदार आश्रय ।। अपाप ते पावतिल स्वयें क्षय ।।
किंवा स्वरक्षा करण्यास, येथिल ।। जनानखाने फुगवोनि देतिल'' ।।३४।।
मल्हारजीचा सुविवार हा रुचे ।। सर्वांस, भाऊ पण त्यास, दुर्वचें ।।
बोलूनि, धिःकारि सगर्व त्यापरी ।। नेत्रप्रदाना नर अंध ज्यापरी ।।३५।।
अफाट सेना मग ही त्वरें पुढें ।। दिल्लीवरी सत्वर येउनी भिडे ।।
ठोकूनि ती कुंजपुरस्थ रोहिले ।। ठाणें पुढें तें करि शीघ्र आपुलें ।।३६।।
करूनि मोठ्या मग खंदकास ।। भाऊ करी पाणिपतीं निवास ।।
अबुदल्लिचें सैन्यहि सर्व धैर्ये ।। कालिंदिचे ऐल तटीं पुढें ये ।।३७।।
लहान मोठ्या समरीं झटापटी ।। होऊनि कांहीं न, झुंजुनी हटीं ।।
योद्धेहि दोन्हीकडचे अनेकसे ।। कामास येता बहु थोर थोरसे ।।३८।।
निदानचें युद्ध करावयाचें ।। चित्तांत भाऊ अणुनी स्वतांचे ।।
पाचारि वीरा मग त्या घडीला ।। मल्हारजी त्यास असें म्हणाला ।।३९।।
''झुंजणें समयिं ह्या नसे हित ।। शत्रुसख्यच विहीत निश्चित ।।
वेळ ही शुभ खरोखरी नसे ।। बोलतों म्हणुनि मी तुम्हां असें ।।४०।।
पांच साह दिन जाउं द्या तरी ।। झुंज देउ यवनांस नंतरी ।।
पांडवांसह पुरा सुबोधन ।। वैर ह्यापरि करी विलक्षण ।।४१।।
दैन्यकालच तदीय तत्वतां ।। ये, म्हणोनि लढण्या प्रवर्ततां ।।
बोध सर्व जन त्या असा करी ।। मित्र पांडव जरी, गती बरी ।।४२।।
तो लढे परिसतां न हें रणीं ।। सैन्य नष्ट करि आठरा दिनीं ।।
हाच मास दिन हेच वर्ष हें ।। तेधवां पतित होय तो स्वयें ।।४३।।
वाटतें घडतसे तसेंच कीं! ।। काय होइल गती कळे न कीं! ।।
बोलला मग तयास भाउ तो ।। ''जो रिघे दिन कधीं टळे न तो ।।४४।।
अनिष्ट चिंती न कुणी स्वकीय ।। दैवें घडे त्यास उपाय काय? ।।
पुण्यप्रभू छत्रपतीकडे ती ।। जयाजय प्राप्ति असे रणांतीं ।।४५।।
आतां तृणप्राय गणूनि जीव ।। प्रताप युद्धीं करूनि अपूर्व ।।
खड्ग स्वहस्तीं धरुनि प्रकाम ।। शौर्यें करावें रणवीरकर्म ।।४६।।

पूर्वी जसें कौरव पांडव स्वतां ।। झाले कुरुक्षेत्र रणांत तत्वतां ।।
सुस्नात, व्हावेंहि तसेंच आपण ।। बा कोणता विक्रम थोर ह्याहुन?।।४७।।
यशःप्रभा ही तुमची असे कीं ।। त्राता निदानास असे पिनाकी ।।
गर्दीस वैरी मिळवू प्रभावें ।। करूनि सत्कीर्ति रणीं मरावें'' ।।४८।।
बोध स्वताचे बहु दूरदृष्टिचे ।। आले कदापी न मनास भाउचे ।।
मल्हारजी खिन्न म्हणोनि अंतरी ।। राहे जसा बद्ध मृगेंद्र पंजरीं ।।४९।।
ह्या संगराचा परिणाम कोणता ।। हो, सांगणें हें नलगेच तत्वतां ।।
जें व्हावयाचें भवितव्य तें घडे ।। तेणें पुरा सिंधुहि कोरडा पडे! ।।५०।।
मल्हारजीच्या म्हणण्याप्रमाणें ।। हें युद्ध झालें असतें मतानें ।।
तरी मराठ्यां जय सत्य येतां ।। तसाच तत्प्रत्यय पूर्व होतां ।।५१।।
''योग्य प्रसंगीं उगवीन सूड ।। ही गांठ मारूनि मनीं अखंड'' ।।
ह्या सर्व नाशांतुनि अल्प सैन्य ।। घेऊनि तो पार पडे अनन्य ।।५२।।
कृश प्रवाहासम उष्ण काळिंच्या ।। ग्वाल्हेरिला जाउनि पावसाळिंच्या ।।
पुष्ट प्रवाहासम तेथुनि स्वयें ।। सवेग तो नंतर माळव्यांत ये ।।५३।।
मल्हारजीच्या अपरोक्ष रांगडे ।। जाऊनिया माधवसिंग याकडे ।।
घोडे चढे जो जयसिंग त्याप्रत ।। घेऊनि येथें अधिकार सांप्रत ।।५४।।
स्थापीत होते जणु काय काजवे ।। स्वतेज अस्तीं विधुच्या निशीं जवें ।।
करूनि हाडे नृप शीघ्र आपुला ।। मल्हारजी तोंच तयांस भेटला ।।५५।।
जें युद्ध हो भयद त्यामधिं रांगड्यांचे ।। वर्चस्व हो प्रथम; होळकराग्रणीचें ।।
गोळी करीं घुसुनि घायवाटे बहू तो ।। भग्नैकसानुगिरितुल्य तदा गमे तो ।।५६।।
युद्धीं जरा कचरले मग ते मराठे ।। हाडोति वीर लढले पण फार हट्टें ।।
तेणें तदा जयपुरांतिल युद्धकर्तें ।। झाले पुढें नच समर्थ सरावयातें ।।५७।।
बांधोनि हस्ता गळिं पागुट्यानें ।। की घालुनी हारच कौतुकानें ।।
जें होय रक्तें वपु लाल, साच ।। की चर्चुनी तें जणु कुंकुमेंच ।।५८।।
कीं युद्धभू हीच विशाल वेदी ।। तिच्याकडे त्या रणवाद्यनादीं ।।
वधू जयश्री वरण्यास मानें ।। मल्हारजी काय वराप्रमाणें ।।५९।।
आता रिघे त्याक्षणीं अल्प मागें ।। जे ओहटीतुल्य सरूनि आंगें ।।
होते मराठे, अनिवार्यतेनें ।। सर्सावले ते भरतीप्रमाणें ।।६०।। युग्म ।।
मल्हारजी समरवीर तदा प्रकोपें ।। ठोकोनियां जयपुरस्थ भट प्रतापें ।।
युद्धीं, पुढें अजयपूरित त्यां करोनी ।। त्यांची हरी जयपुरःसर राजधानी ।।६१।।
जो हो कृतघ्न बहु माधवसिंग त्याशी ।। वेढोनि, त्याकडुनि घेउनि खंडराशी ।।
हाडे नृपास मग जाउनि बुंदिमाजीं ।। राजी करूनि परते मग तो स्वराज्यीं ।।६२।।

शासूनियां तेथिल दांड रांगड्या।। विच्छिन्न त्यांच्या करुनी तशा गढ्या।।
तेथील पैसा उगवोनि तुंबला।। स्थापी पुन्हां तो अधिकार चांगला।।६३।।
उत्पात मंदसौर फार मदांधतेनें।। मेवातियांहिं करिता मग, त्यां त्वरेनें।।
तो स्वीयदुर्धर पराक्रमहुंकृतीनें।। दाही दिशांस उडवी चिलटांप्रमाणें।।६४।।
ह्यानंतरी जाउनि दक्षिणेस।। तो पेशवा माधवराव यास।।
भेटे फिरे तो मग जाट याचे।। साह्यार्थ आज्ञेवर पेशव्याचे।।६५।।
नजिबखां लढुनी समरीं अती।। उडवि सूरजमल्ल शिराप्रती।।
हटुनि पौत्र तदीय रणांत जी।। नवलसिंग करी बहु काळजी।।६६।।
मल्हारजी तेथ ससैन्य येतां।। हा जाट आनंदित होय आतां।।
सेनेंत त्याच्या पण होय फूट।। अभीष्ट तेणें उतरे न घाट।।६७।।
होता तसा यवन तो म्हटला स्वकीय।। दोघांत होळकरवीर म्हणोनि वर्य।।
जन्मेजयक्षितिपतक्षकजिह्मगांत।। जैसा सुरेंद्र, करि साम तसेंच युक्त।।६८।।
देण्या सुजाउद्दवल्यास साह्य।। मल्हारजी वीर रणीं असह्य।।
स्वकीय राज्यीं नस्ता, फिरोनी।। उठाव केला बहु रांगड्यांनीं।।६९।।
जो आपणा म्हणवि हिम्मतबाहदूर।। गोसावि जो आमुदगीर[३] तया समोर।।
हे रांगडे करुनियां उठले सरोष।। कोल्हेच काय नसतां वनिं सिंहवास।।७०।।
ह्यांनीं स्वसैन्यें दतियांतुनी झणी।। आणोनियां त्यापरि शेवड्यांतुनी।।
दुज्या स्थलांतूनिहि मेळवोनियां।। झाशींत नेलीं तिजला जितोनियां।।७१।।
होतांच हें विदित होळकरास, वेगें।। तो शेवड्यावरच चालुनि जाय आंगें।।
त्यानें प्रहार करितां तिकडे पुरा त्या।। झाशीच मूर्च्छित पडे इकडे क्षणीं त्या।।७२।।
भ्याले बहू कारण रांगडे ते।। ये रक्षण्या तेथुनि शेवड्यातें।।
मूळींच टोला बसतांच ऐसा।। विस्तार शाखा धरतील कैसा?।।७३।।
पूर्वी जैसा कीचकत्रासिता जी।। त्या सैरंध्रीपास तो भीम गाजी।।
तैसा वेगें घेउनी सैन्य सर्व।। झाशीपाशीं येइ मल्हारराव।।७४।।
त्या रांगड्यांस फसवोनि अशा प्रकारें।। झाशीस वेढुनि, तिच्यांतिल सैन्य सारें।।
ठोकूनि, वाकवुनि हिम्मतबाहदूरा।। येतांच तो शरण देउनि त्यास थारा।।७५।।
उन्मत्तहस्तिकृति जे दतियानृपाल।। तो शेवडेनृप दुजेहि तसें अडेल।।
ते सर्व नम्र करुनी स्वबलांकुशानें।। मल्हारजी बहु हरी करभार मानें।।७६।।
ह्यानंतरी तो रघुनाथदादा।। महादजी सांप्रत मुख्य शिंदा।।
मल्हारजीलागिं ससैन्य येथें।। हे भेटतां, जाति पुढें तिघे ते।।७७।।

---

३ अमुदगीर गोसावी म्हणून कोणी बादशाहींतील सरदार होता.

राणा मधें गोहदचा दुराशें ।। सैन्यीं करी लूट म्हणूनि रोषें ।।
त्या शासण्यातें हरण्यास गर्व ।। दे त्यास वेढा रघुनाथराव ।।७८।।
परंतु आंतूनि सहाय शिंदा ।। आहे तया हें परिसोनि दादा ।।
महादजी यावर कुप्त होतां ।। मध्यस्थ हो होळकरार्थ आतां ।।७९।।
भेटाया जो पौत्र हो प्राप्त सध्यां ।। मालेरावा त्या, तसें खिन्न शिंद्या ।।
घेऊनीयां नेइ मल्हारराव ।। दादापाशीं साधण्या मेळ पूर्व ।।८०।।
दादासमीप रिघतांक्षणिं ह्या तिघांनीं ।। केले पटापट तया मुजरे लवोनी ।।
दादा वदूनि कृति ही अपुली बरी न ।। मल्हारजीस बसवी जवळीं समान ।।८१।।
मग होळकराग्रणी वदे ।। ''लघु आम्ही अपुल्या घरामधें ।।
शिशु तातगृहीं जसें, तसें ।। लडिवाळीं चिर वाढलों असे ।।८२।।
स्वकरीं धरुनी तुम्ही अम्हां ।। करियेलें जनिं माणसें पहा ।।
अपुले गत बंधु हो पिता ।। जगणें ठीक नव्हे अम्हां अतां ।।८३।।
कधिंही न अम्ही कृतघ्नतें ।। करु कांहीं अपकारकारि तें ।।
करण्यांत असे सदोदित ।। अमुचें हो कुल शील दूषित ।।८४।।
म्हणतों वदतां न आणखी ।। उगिं ह्या अज्ञ मुलांस लौकिकीं ।।
स्थित ठेवुनि चाकरी गृहीं ।। चिर घ्या त्यांकडुनी विनंति ही ।।८५।।
अमुच्याकडुनी पुढें अतां ।। श्रम होणें नच शक्य तत्वतां ।।
बसल्या स्थलिं अन्नवस्त्र जी! ।। दिणें प्राप्त तुम्हा अम्हां अजी ।।८६।।
अमुचे मिटता सदोदित ।। मग डोळे, जगिं नांव रक्षित ।।
करतील मुलें सदैव हीं ।। धुणिंपाणीं अपुलीं करूनिही'' ।।८७।।
मल्हारजी अश्रु वदूनि ह्यापरी ।। डोळ्यांस आणी, पण उत्तरा करी ।।
दादा न त्या देइ निरोप त्यां पुढें ।। देऊनि कंठ्या शिरपेंच चौकडे ।।८८।।
मल्हारजी गोहदच्या कलींत ।। पडूनि, राणा तिथला प्रमत्त ।।
दादापदीं नम्र करी, बहूसा ।। त्यापासुनी देववि खंड तैसा ।।८९।।
ये हे तिघे वीर अलंपुरांत ।। मल्हारजीचा अति कान येथ ।।
लागे दुखूं त्याजमुळें तयाचा ।। आसन्नकाल[४] स्थित होय साचा ।।९०।।

४ इ. स. १७६५ मध्यें मल्हाररावाचा काल झाला म्हणून म्यालीसन साहेब व मालकम साहेब आपआपल्या ग्रंथांत लिहितात. ह्या दोन्ही साहेबांच्या ग्रंथांत मल्हाररावाच्या जन्ममरणकाळाचा मुळींच मेळ बसत नाही; कारण इ. स. १६९३ मध्यें जन्मून मल्हारराव आपले वयाचे ७६ वे वर्षीं इ. स. १७६५ मध्ये निवर्तला, म्हणून सदरहू ग्रंथांत उल्लेख आहे! आमच्या जवळच्या मराठी बखरींत शके १६८९ भाद्रपद वद्य ११ एकादशीस प्रहर दिवस चढतां सुभेदार पंचत्व पावले म्हणून लिहिले आहे.

महादजी त्यापरि मालराव ।। तुकोजि आणी रघुनाथराव ।।
समीप होते स्थित ह्या प्रसंगीं ।। बहूतसे दुःखित अंतरंगीं ।।९१।।
त्यांस होळकरवर्य बोलला ।। ''होय शेवट मदीय चांगला ।।
पुत्र आज असता जरी, तरी ।। ह्यास होति न कधीं बरोबरी ।।९२।।
मालराव सुत हाच पौत्र हा ।। एक मानुनि तरी सुखी महा ।।
मी असें घडतसे यथोक्त हें ।। होय पक्कफलपाततुल्य हें ।।९३।।
बाजिराव अमुचे धनि नाना ।। पुत्र मित्रहि तसें गत नाना ।।
भेटतील मज देतिल हर्ष ।। नित्य ईशपदिं राहिल शीर्ष ।।९४।।
ह्या सुखाहुनि दुजें तरि कोणतें ।। चांगलें सुख असे चिर कोणतें? ।।
पोर हें पण नसे बहु जाणतें ।। काळजी इतुकिही मनिं बाणते ।।९५।।
घ्या करांत शिशुचा कर दादा ।। घ्याजि पाटिल! तुम्ही मज मोदा ।।
द्या, निवेल मग घोरच सर्व ।। थंडगार मम होइल जीव'' ।।९६।।
मल्हारजीनें मग पौत्रपाणितें ।। दोघाजणांच्या करिं देउनी तिथें ।।
तुकोजिहस्तीं दिधतांहि तो झणी ।। बोले उभा राहुनि हस्त जोडुनी ।।९७।।
''पदरिं मी अपुल्या स्थित चाकर ।। धनिकरामधिं यास्तव मत्कर ।।
दिउनियां करणें मम सोय ती ।। उचित हें असतां, कशि ही कृती?'' ।।९८।।
गुणपरीक्षक होळकर स्थिर ।। करि तयाप्रत ह्यापरि उत्तर ।।
''बल तुझें स्तुतिपात्र बहूतसें ।। रिपुभयावह शौर्य तुझें असे ।।९९।।
तव पराक्रम आक्रमि सर्व ही ।। बहुत खोल असे तव बुद्धि ही ।।
विलसती सुविचार तुझे अती ।। झळकते तव निर्मलशी मती ।।१००।।
श्रीमंत यांची म्हणवोनि चाकरी ।। न डाग ज्या, तें मम नाम त्यापरी ।।
मनापरी तूंच सदा सुरक्षित ।। बुद्धिप्रभावें करशील निश्चित'' ।।१०१।।
वदुनि ह्यापरि तो स्थिर हो. जरी ।। समरशूर असे बहु हा तरी ।।
न वधितां जितशत्रु हरीपरी ।। उलट त्यांवर थोर दया करी ।।१०२।।
जरि उदार तरी जलदापरी ।। न भलत्या स्थलिं वृष्टि कधीं करी ।।
बहुतची जरि धीट असे तरी ।। न कधिं साहस मूर्खपणें करी ।।१०३।।
जर कुणाप्रत आश्रय दे स्वतां ।। तर कधीं उदीपरि आश्रिता ।।
लपवितां न, तया जनिं निर्भय ।। उघड वागवि रक्षुनि अक्षय ।।१०४।।
तनु परोपकृतींत जरी सदा ।। झिजवि चंदनतुल्य, तरी कदा ।।
खलसमागम त्यास नसे जरा ।। जणु सुवर्णसुयुक्त खुले हिरा ।।१०५।।
पिकगणाप्रत आम्रतरू जसा ।। गुणिजनाप्रत आश्रय दे तसा ।।
मधुर आम्रफलापरि फारसें ।। मन असे परिपूर्ण दयारसें ।।१०६।।

नयपथा त्यजुनी भलतीकडे ।। कधिंहि टाकियणें पद वाकडें ।।
धरियणें तरवारिवरीच तें ।। मनिं असे समजे चिर सूज्ञतें ।।१०७।।

जणु रविच असा हा ख्यात मल्हारराव ।।
जनबहुसुखदात्री चंद्रिका ती अपूर्व ।।
त्वरित उदित भारी रम्य होणार आतां ।।
समयिंच म्हणुनी कीं पावला काय अस्ता ।।१०८।।

•

**।। आर्या ।।**

मालवदेशीं इंदुर-नगरीं मल्हारराव होळकर ।।
यावर काव्य असे हें विरचित इतिहास पाहुनी बखर ।।१।।
विक्रम शुभसंवत्सरिं आश्विनमासांत शुद्ध दशमीला ।।
हा ग्रंथ एकनाथें नयनखवसभू शकांत संपविला ।।२।।

नयन = २, ख = ०, वसु = ८, भू = १.
(सर्व आकडे मिळून १८०१ शक होतो.) : इ. स. १८८१

**मल्हारराव होळकर यांजवरील काव्य समाप्त**

•

# राजा मल्हारराव होळकर

**चंद्रशेखर**

जर्यानि पटक्यासवे फडकतो अव्यक्त वायूवरी
राज होळकरातला प्रमुख तो मल्हारनामा हरी
संग्रामात अजिंक्य भौमच, दुजा राघो भरारी भला
त्याचे वैभवकेंद्र हो, म्हणुनि हे इन्दोर प्यारे मला

शौर्याचे तुमुलौघ धावति अहा विद्युतप्रवाहापरी
त्याचे उद्भवयंत्र शूरवर तो, जाज्वल्य तो अंतरी
राष्ट्राचा नरसिंह तो, तळपला विख्यात सेनापती
''आला'' ऐकुनि कापती रिपु भये, मातंगसे पांगती

सन्मंत्री किती राजकारणी, महाराष्ट्रात हा साजला
सेनानायक दक्ष हा कितीतरी, युद्धात नावाजला
दादांनी अति राजनिष्ठ म्हणुनि बंधू तया मानिले
ह्याने शूरवरा इनाम रुपये ढाली भरूनि दिले

अबदालीवरी हा तुटोनि पडला राघो भरारीसवे
युद्धाचा प्रलयप्रसंग मजला येथे न तो वानवे
केला जर्जर, तो धुडावुनि दिला दिङ्नाग हिंदांतुनी
झेंडा तो अटकेवरी उभविला ख्याती असे ही जनी

जाटाते बहु तीव्र शासन दिले, वर्चस्व संस्थापिले
घेवोनि भरताख्य ते पुर, पुन्हा त्याचे तयाला दिले
कुंभेरीवरी वीरपुत्र पडता भीष्मप्रतिज्ञा करी
शिंद्यांनी परी भीड घालुनि तदा ती भंगिली अंतरी

ज्याचे पौरुष हे अलौलिक असे राष्ट्रास हा दीपवी
त्याची ही जणु सिंहरास नगरी, स्वामी हिचा तो रवी

•

## मल्हार आया

**अज्ञात**

''मल्हार आया'' ध्वनि होय जेथे
जनानखाना विसरोनि तेथे
विपक्ष पांगे भयभीत जैसा
तो सिंहनादे गजयूध जैसा

•

# पोवाडा

## शाहीर देवकीनंदन भागवत

धन्य धन्य वीर बहादुर। मल्हारराव होळकर
इन्दूरचे थोर सुभेदार जी जी जी।।

मराठा सत्तेची शान
गुणांची जणु ही खाण
शत्रूंची उडवी दाणादाण
मनी सदा कर्तव्याचे भान जी जी जी।।

इंदुरला राज्य वसविले
सुनेला शिक्षण दिले
स्त्रीत्वाला सन्मानित केले
जगामध्ये कीर्तीमान झाले जी जी जी।।

कुंभेरीचे रण घणघोर
पुत्रास नेई काळ हा क्रूर
दुःखाचा एकच कहर
आकाशीची कोसळे जणु कुठार जी जी जी।।

अहिल्येस पुत्र मानिले
सती जाण्यापासून रोखिले
राज्याचे सूत्र सोपविले
रयतेचे पालनहार झाले जी जी जी।।

शिवरायांचा घेऊन वारसा
गनिमी कावा, युद्धाचा ठसा
प्रजापालन राज्याचा वसा
''मल्हार आया'' ऐकुन शत्रूचा गाशा जी जी जी

पेशव्यांच्या गादीसी मान
मूर्तीमंत उरी अभिमान
लढवय्या ठसा महान
तळपते असे शौर्य रामबाण जी जी जी।।

अबलेला कराया सबला
खासगीचा हक्क दिधला
आदर्श नवा ठसविला
होळकरशाहीचा जयजयकार झाला जी जी जी ।।

पानिपतात अपमान घोर
कुणी उगा होती शिरजोर
शब्दांचे मारिती तीर
विसरूनी मनीचे शल्य, पुन्हा हाती तलवार जी जी जी ।।

असा योद्धा होणे नाही
असा पोशिंदा होणे नाही
मल्हारीही प्रसन्न लवलाही
इतिहास मिरवितो कर्तृत्वाची द्वाही जी जी जी ।।

•

# तळपली तलवार

## नीलांबरी गानू

मराठमोळ्या मर्दुमकीची तळपली तलवार
होळकरांच्या मल्हाराचा शौर्याचा एल्गार ।।

शब्दासाठी प्राणही द्यावे
रीत अशी ही, असे जगावे
शिवरायाचा गनिमी कावा, पुन्हा दाविला थरार ।।

दक्षिण-उत्तर असे दरारा
तलवारीचा धाकच न्यारा
''मल्हार आया'' शब्द जाहले विजयाचा उद्गार ।।

नसानसातुनि इमान भरले
मराठशाहीचा खांब जाहले
राऊ पेशव्यांसोबत होता मैत्रीचा करार ।।

असून सासरे हृदय पित्याचे
सून अहिल्या व्रत सतीचे
थोपवूनी तियेला केला रूढीवरी प्रहार ।।


देशहितास्तव अखंड लढणे
पानिपती अपमानित होणे
सारे विसरून देशासाठी, पुन्हा फुले अंगार ।।

खड्गधारी हा रुद्र भूवरी
कर्तव्यास्तव धावे सत्वरी
एके ठायी असा दाटला गुणांचा संभार ।।

पराक्रमाची अक्षय गाथा
मातीचा अन् उन्नत माथा
तेज पाहुनि थरारला अन् असा देव मल्हार ।।

•

## भाग दोन



# देवी अहिल्याबाई होळकर यांजवरील काव्य

खंड नऊ : भाग दोन

# होळकर रियासत : काव्यायन

अहिल्याबाई होळकर यांजवरील काव्य

Volume Nine : Part Two

# Holkar Riyasat : Kavyayan

Ahilyabai Holkar Yanjvaril Kavya

पहिली आवृत्ती : २०१४

दुसरी सुधारित आवृत्ती : २०२१

पहिल्या आणि दुसऱ्या सुधारित आवृत्तीचे संपादक :
डॉ. देवीदास पोटे

# अनुक्रमणिका

## • मराठी विभाग •


| | | |
|---|---|---|
| अहिल्या प्रजाहितकारिणी | प्रभाकर पानट | ७८ |
| अहिल्ये वरा-धरा-भूषा | कविवर्य मोरोपंत | ७९ |
| प्रणवात्मिका आदिशक्ती | मेघश्याम कृष्णराव सावकार | ८० |
| नमस्कार त्या अहिल्या सतीला | विठ्ठल रामचंद्र बडे | ८१ |
| देवी अहिल्ये प्रणाम करितो | वनविहारी | ८३ |
| राजयोगिनी सती अहिल्या | शान्ता ज. शेळके | ८५ |
| अहिल्या कर्मयोगिनी | सौ. विजया जहागीरदार | ८६ |
| धर्मकार्य (पोवाडा) | राजाराम दौलत गडकरी | ८७ |
| पुण्यश्लोक देवी श्री अहिल्याबाई होळकर | पुरुषोत्तम सदाशिव आरस | ९२ |
| सती धन्य धन्य कलियुगी अहिल्याबाई (पोवाडा) | शाहीर प्रभाकर | ९५ |
| देवी अहिल्या | चंद्रशेखर | ९७ |
| पुण्यश्लोक देवी अहिल्याबाई | विनायक आनंद रेघे | ९९ |
| श्री देवी अहिल्याबाई होळकरीण | शि. श्री. पंडित | १०५ |
| अहिल्येचा अवतार (पोवाडा) | वामनराव मोटे | ११० |
| अहिल्या प्रशस्ति | दु. आ. तिवारी | ११२ |
| देवी अहिल्याबाई होळकर | महाराष्ट्रकवी यशवंत | ११३ |
| अहिल्याबाईंचा पाळणा | सौ. मंदाकिनी गावडे | ११४ |
| रम्य घाट बांधले कुणी? | माधव जूलियन | ११६ |
| या वीण आस ना चित्ता | अज्ञात | ११७ |
| अहिल्या गीत | प्राचार्य अनंत पोतदार | ११८ |
| कटाव महेश्वरचा | अनंतफंदी | १२२ |
| श्री देवी अहिल्याबाई | रुक्मिणीतनय | १२३ |
| अहिल्या पुण्य-प्रताप | सी. के. देव | १२४ |
| देवी अहिल्या स्तवन | श्रीमती गंगूताई महाजनी | १२५ |

| | | |
|---|---|---|
| अहिल्या स्तवन | गिरिजासुत | १२७ |
| नमस्कार त्या श्री अहिल्या सतीला | अहिल्या भक्त | १२८ |
| अहिल्या गीत | तारा करंडे | १२९ |
| मातोश्रींच्या मनी | गोविंद काळे | १३० |
| मी सून सुभेदारांची | शाहीर भास्करबुवा निरगुडकर | १३२ |
| विजयोऽस्तुते | काव्यशेखर | १३५ |
| श्रीमंत इंदूर राजघराण्याचा संक्षिप्त इतिहासिक पोवाडा | शाहीर रामचंद्र नरहर माळी | १३६ |
| अहिल्यास्तुती | भार्गवराम | १४७ |
| धन्य अहिल्या | गोपाळ शंकरराव होळकर | १५१ |
| अहिल्या पंचक | डॉ. शिवनंदन अकोलकर | १५२ |
| ती एक  अहिल्या होती | नीलांबरी गानू | १५३ |
| अहिल्याबाईंच्या सौभाग्यावर घाला | अज्ञात | १५५ |
| अहिल्याबाई सती जातात | शाहीर बन्सीधर | १६० |
| जा रे दूता निरोप माझा सांग पेशव्यांना | वंदना विटणकर | १६२ |
| अहिल्या झाली युगनिर्माती | प्रा. म. ना. लोही | १६३ |
| होळकरांची राणी | डॉ. देवीदास पोटे | १६४ |
| अहिल्याबाई : पद्यमय चरित्र | गोविंद एकनाथ गोसावी | १६५ |
| श्रीदेवी अहिल्याबाईचे चरित्र | ह.भ.प. संतकवि श्रीदासगणू महाराज | २३५ |
| धन्य महेश्वर | अण्णासाहेब डांगे | २६४ |
| नमू या सती अहिल्या | अज्ञात | २६६ |
| अहिल्या | निरंजन होळकर | २६७ |
| अहिल्या स्तवन (भैरवी) | अज्ञात | २६८ |
| सारे प्रजानन करा बोळवण | प्रा. म. सी. हळपे | २६९ |
| मानवता गौरवांकित झाली | अब्दुल गफूर | २७० |
| पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर : संगीतिका | सौ. मालती चितळे | २७१ |
| अहिल्याबाईंची आरती | नरहर शंकर रहाळकर | २८१ |

## संस्कृत विभाग


अथ अस्याः श्रीमत्या यशादृष्टं श्लाघावर्णनम् । — पं. खुशालीराम ........ २८२

श्रीदेव्यहिल्याष्टकम् । — पं. गजाननशास्त्री करमेलकर, काव्यतीर्थ ..... २८६

अहिल्या राजयोगिनी — महामहोपाध्याय डॉ. प्र. ना. कवठेकर ........ २८८

श्रीअहिल्याप्रशस्तिः — पं. गजाननशास्त्री करमेलकर, काव्यतीर्थ ..... २८९

अहिल्या प्रतिज्ञा (स्त्रग्धरा छन्दसि) — शैलेन्द्रनाथ पाठक ........ २९०


## English Section


Ahalya Baee — Joanna Baillie ........ 291

In Ahilya's Pious Memorium — R. R. Dwiwedi ........ 298

A Limerick in Praise of Devi Shri Ahilya — Nandlal D. Datta ........ 299

An ode to Devi Ahilyabai — S. K. Deo ........ 300

Devi Ahilya — C. A. Dobson ........ 301

Adoring Mata Ahilya — Sharad Lalge ........ 303

A Homage to Devi Ahilya Bai — Dr. N. G. Kale ........ 305

Mystical Ahilya — Sharad Lalge ........ 306

The Devi — K. C. Holkar ........ 308

Ahilyabai's Greatness — Deepa Rupesh Kale ........ 309

## अहिल्या प्रजाहितकारिणी

**प्रभाकर पानट**

ऐश्वर्यी विरागिणी
अष्टावधानी राजकारणी
रणरागिनी समरांगणी
क्षेत्र-धर्म-संवर्धिनी
निष्पक्ष न्यायदायिनी
कर्मण्वती संजीवनी
अहिल्या-प्रजाहितकारिणी

•

# अहिल्ये वरा-धरा-भूषा

## कविवर्य मोरोपंत

श्री हरिहर भक्ता तू देवी अहिल्ये वरा धरा भूषा।
पूषा तुज साधु म्हणे ख्याता तुजसम न बाणतनु भूषा।।
देवि अहिल्याबाई! झालीस जगत्रयात तू धन्या।
न न्यायधर्मनिरता अन्या कलिमाजि ऐकिली कन्या।।
धर्मार्थ गोत्रजन्या किंवा झालीस तू धरा जन्या।
तुज देवि भेटली ती सत्कीर्ति कधीच हे न राजन्या।।
जाणे धर्म करीना त्या स्तवितो कोण पंडित मन्या।
न न्याय धर्मनिरता अन्या कलिमाजि ऐकिली कन्या।।
न त्यजिसी नर्मदेते देवि! तुझी ती बहु प्रिया आली।
गंगेचीहि सखी हो की उभय मनांत सत्क्रिया आली।।
श्री विष्णूपदा! स्तविली त्वद्भक्ता हे तुलाहि मानावे।
विश्व जिला वानितसे का न मयुरेहि तीस वानावे।।

•

## प्रणवात्मिका आदिशक्ती

### मेघश्याम कृष्णराव सावकार

प्रणवात्मिका आदिशक्ती। जगद कल्याणकारिणी
अवनीवरी अवतरे ती। अहिल्यारुप घेऊनी ।।१।।
हिंदवी राजधर्माची। ध्वजा ही स्फूर्तिदायिनी
विश्ववंद्य महा साध्वी। अहिल्या शिवयोगिनी ।।२।।
पतिमृत्यु पुत्रमृत्यु। आपदा अदय दारुण
पचविले तिने जैसे। शिवे गरल प्राशन ।।३।।
साहुनी आपदा नाना। प्रजेशी सुखदायका
शोषुनी उष्णता देई। हिमांशू जशी चंद्रिका ।।४।।
शुद्ध धार्मिक नीतिमान। संयमी मंगलप्रदा
राजकार्यी सावधान। कर्तव्यी दक्ष जी सदा ।।५।।
भरारी रघुनाथाची। केली निष्प्रभ ती झणी
चंद्रावत बंडाळी। निग्रहे शमविली रणी ।।६।।
कलावंत कवी प्राज्ञ। गुणवान संत सज्जन
अहिल्या राहिली यांसी। कल्पद्रुम होऊन ।।७।।
ज्ञान-सत्रे, सदावर्ते नद्यांना घाट बांधणे
उध्वस्त देवता स्थाने। पुन्हा उंच उभारणे ।।८।।
धर्मशाला, ज्ञानशाला। वापी कूप जलाशये
प्रजा वात्सल्यभावाने। सर्वत्र निर्मिली स्वये ।।९।।
शिव निर्माल्यवत मानी। आपुली सर्व संपदा
जनी जनार्दन पाही। केली अर्पित तत्पदा ।।१०।।
धर्म सूत्री ग्रंथुनिया। समग्र भारत वर्षही
एकात्मता महद्दीव्य। दावी करुन साध्यही ।।११।।
राज संन्यासिनी राही। वैभवातही नित्य ती
जान्हवी जल पूता त्या। अहिल्येस नमस्कृती ।।१२।।

•

## नमस्कार त्या अहिल्या सतीला

### विठ्ठल रामचंद्र बडे

जशा देहु आळंदि या पुण्यभूमी। तशी मानिं चौंढी सती जन्मभूमी।।
तसें जी करी क्षेत्र माहिष्मतीला। नमस्कार त्या श्रीअहिल्या सतीला।।१।।

जरी जाल काशीस रामेश्वराला। असे द्वारकेला तुम्ही वा पुरीला।।
कुठेंही पहा हो जिच्या दानलीला। नमस्कार त्या श्रीअहिल्या सतीला।।२।।

नसे भारती तीर्थ वा क्षेत्र ऐसें। जिथें ना तिचें एकही कृत्य दीसे।।
जगीं जन्मुनी जे करी देवलीला। नमस्कार त्या श्रीअहिल्या सतीला।।३।।

कुठें अन्नदानें कुठें वस्त्रदानें। कुठें वारिदानें कुठें भूमिदानें।।
किती मंदिरें भव्यशाला धर्मशाला। नमस्कार त्या श्रीअहिल्या सतीला।।४।।

कुठें लाविले मार्गिही वृक्ष दाट। नदीतीरिं बांधी तसे रम्य घाट।।
किती मंदिरें बांधिल्या धेनुशाला। नमस्कार त्या श्रीअहिल्या सतीला।।५।।

भुकेला कुणीही पुरीं राहिला न। असें ऐकुनी जी स्वयें घेइ अन्न।।
जगी बोलती सत्य हें माय जीला। नमस्कार त्या श्रीअहिल्या सतीला।।६।।

हिमीं थर्थरा कांपतांना दिनांना। तृषार्ता तसेही पथीं चालतांना।।
बघूनी बहू कष्ट होतात जीला। नमस्कार त्या श्रीअहिल्या सतीला।।७।।

प्रजेच्या समाधानिं जी शक्ति राही। असंख्या बळें ती तशी येत नाहीं।।
म्हणूनी प्रजारक्षणीं रंगलीला। नमस्कार त्या श्रीअहिल्या सतीला।।८।।

कधींही शिवेना पराच्या धनातें। हरायास इच्छी परा - आपदातें।
कुणी शत्रु ना सर्वही मित्र जीला। नमस्कार या श्रीअहिल्या सतीला।।९।।

कुणी धाकुटे थोरले आप्त काही। स्वधर्मी विधर्मीं असा भेद नाहीं।
जगीं वाटती सारखे सर्व जीला। नमस्कार त्या श्रीअहिल्या सतीला।।१०।।

कुणी वैभवें जोडिती हत्ति घोडे। धना वेंचुनी बांधिती भव्य वाडे।
अशा वैभवाची नसे चाड जीला। नमस्कार त्या श्रीअहिल्या सतीला।।११।।

भवालागिं कोणी परार्थासि सोडी। पराकारणें कोणि संसार मोडी।।
परी दोनिही साधले अर्थ जीला। नमस्कार त्या श्रीअहिल्या सतीला।।१२।।

कथाकीर्तनें आणि पोथ्यापुराणें। जगीं ऐकती सर्वही कौतुकानें।।
परी बाणलें सत्य तें एकटीला। नमस्कार त्या श्रीअहिल्या सतीला।।१३।।

जिथें बाल राजा असे नारिसत्ता। तिथें शाश्वती ना जिवा अन् वित्ता।।
परी त्याहि मिथ्या करी जे वचाला। नमस्कार त्या श्रीअहिल्या सतीला।।१४।।

मुनी तापसी योगि वा देवराय। जिहीं नाडिले मानवा पाड काय? ।।
अशा जिंकि जी षड्रिपू राक्षसांला। नमस्कार त्या श्रीअहिल्या सतीला।।१५।।

पठाणासी जो काळसा उग्र वाटे। बघूनी जया शत्रुची छाति फाटे।।
अशा लाजवी राघवा पेशव्याला। नमस्कार त्या श्रीअहिल्या सतीला।।१६।।

अतिस्वार्थी मंत्री तिचा चंद्रचूड। करुं लागला आपलें स्थीर बूड।।
परि लावि संन्यास घ्याया तयाला । नमस्कार त्या श्रीअहिल्या सतीला।।१७।।

बहू मातले भील विंध्याद्रिमाजी। परी युक्तिनें जी करी त्यांस राजी।।
जिची राजनीती पटे इंग्रजाला। नमस्कार त्या श्रीअहिल्या सतीला।।१८।।

जिनें मोडिलें बंड चंद्रावताचें। वनीं मार्ग केले खुले पांथिकांचे।।
जपे सर्वदा जी स्वदेशोन्नतीला। नमस्कार त्या श्रीअहिल्या सतीला।।१९।।

प्रवृत्ती निवृत्ती कशा एक ठाया। स्वयें वर्तुनी दाविलें त्या उपाया।।
खरें साधलें कर्म निष्काम जीला। नमस्कार त्या श्रीअहिल्या सतीला।।२०।।

सदा देवकाजीं झिजे देह जीचा। वदे ईशनामें जिची नित्य वाचा।।
कवी पंत सांगे म्हणा धन्य जीला। नमस्कार त्या श्रीअहिल्या सतीला।।२१।।

असंख्यात ते जन्मले आणि मेले। परी जन्मसाफल्य कोणी न केलें।।
स्वयें उद्धरोनी कुलोद्धार केला। नमस्कार त्या श्रीअहिल्या सतीला।।२२।।

•

# देवी अहिल्ये प्रणाम करितो

## वनविहारी

(चाल :- धन्य शिवाजी)

देवि अहिल्ये। प्रणाम करितों भक्तिपुरःसरगे।
हृत्कोंदणि तुज विनीत भावें जपुनि ठेवुं शुभगे।।

धन्य हिंद-भू तुजसम रत्ना प्रसवुनिया धाली।
स्त्री-जातीच्या अतुल कृतीची नवलाई दावी।।

धन्या माता पिता धन्य तो प्रसवुनि ही दुहिता।
धन्य पती तो या जगती ज्या लाभलि ही कांता।।

धन्य वंश तो, धन्यचि कुळ ते, लाभलि ही रमणी।
तिच्या गुणांची, तिच्या कृतीची जन ओढी स्मरणी।।

उदार हृदया, सत्वशील जी, राज्यधुरा धरुनी।
न्याय नीतिची मंगलमूर्ती, प्रजाजना जननी।।

देवि अहिल्या गमली, सजली सत्प्रेमीं सुषमा।
सद्भाग्याची ठेव लाधली रामा अभिरामा।।

उपयोगाच्या समयीं साधूनि निस्वार्थी वृत्ती।
''प्रजा-जनांस्तव सतत झटावें'' हीच तिची पूर्ती।।

अबला सबला सकला गळाली शौर्याची मूर्ती।
राज्य धुरंदर, धैर्य - शालिनी, धर्माची पूर्ती।।

डंका नौबत झडे अजूनी पुढती झडणार।
तिच्या यशाची यशोदुंदुभी जगतीं घुमणार।।

विजय - पताका फडफड करिते जिवंत तेजानें।
अतुला कृतिची या देवीची, हेच जगीं - जगणें।।

वीर - वराला शब्द - कुसरिंनी हटवीलें मार्गे।
राष्ट्र - हिताचे, राष्ट्र - तेज तें तिच्या हृदीं जागें।।

तनु - मन, धनही खर्चुनिया ती राष्ट्र-कार्यि रमली।
निज - पति - सेवा गृह कृत्यातें कधी न अंतरली।।

सुगृहिणी ती, निपुणा राज्ञी, साध्वी ललना ती।
तिच्या गुणांची, तिच्या यशांची जन गाणी गाती।।

वीर-मयी ती, वीर पत्नि ती, परि शालिनतेची।
मंगल-मूर्ती देवि अहिल्या गमली या लोकी।।

महन्मंगले देवि अहिल्ये काय वानु तुजला।
क्षमा करी मज पामर परि घे शाहीरी मुजरा।।

•

# राजयोगिनी सती अहिल्या

**शान्ता ज. शेळके**

राजयोगिनी सती अहिल्या होळकरांची सून
मूर्ती ठसली तिची मनावर बाळपणापासून
माथ्यावरती पदर नेटका, भाव मुखी शालीन
पार्थिव हातामध्ये पूजेचे, दृष्टि आर्जवी लीन
बाह्य रूप हे जडले त्याला पुढें किती तपशील
धर्मपरायण सात्त्विक वृत्ती, निर्मळ पारद शील!
पोळुन निघतां वैधव्यातहि अधिक प्रतिष्ठा पावे
कीं सीतेचे अग्निदिव्य कां याहून थोर म्हणावे?
भोगामध्ये तिने ठेविली वृत्ती पूर्ण विरागी
जळात राहुन जसे पद्मदळ जळ न जुडूं दे अंगी
कठोरतेचे कवच तनूवर, हृदयी वत्सल भाव
अवघ्यांवरती सदयपणे करि ममतेचा वर्षाव
घाट, मंदिरे, मार्ग, सराया देवालयें बांधून
जनहितकामी द्रव्य वेचितां लवहि न ठेवी न्यून!
होते नव्हते सर्व वेचिले जनकल्याणासाठी
अजुन कोटिलिंगार्चन चाले नित्य नर्मदेकाठी
शिवनिर्माल्यापरी सतीने विभव मानिले सारे
गुणगौरव साध्वीचा गाती आजहि तिथले वारे
राजयोगिनी सती अहिल्या होळकरांची राणी
अजुनि नर्मदाजळी लहरती तिच्या यशाची गाणी!

•

# अहिल्या कर्मयोगिनी

**सौ. विजया जहागीरदार**

पुण्यशील तू, सती अहिल्या कर्मयोगिनी खरी
होळकरांची अमृत-कीर्ति नेली तू अंबरी ।।धृ०।।
तू मुत्सद्दी, राजकारणी
सर्वधर्मसमभाव धारिणी
तू तेजस्वी, न्यायदेवता - धन्य तुझी वैखरी ।।
रणचंडी तू - रणांगणावर
युद्धकलेची जाण निरंतर
बारूद तोफा, अस्त्रनिर्मिती ज्ञात तुझ्या अंतरी ।।
प्राणपणाने राज्य राखिले
हेर फितूरा प्रथम जोखले
दूरदृष्टिची थोर देणगी घुमली गिरीकंदरी ।।
अन्नछत्र अन् विहिरी दर्गे
कैक बांधली घाट मंदिरे
हे कल्याणी, तव औदार्या - तोड नसे भूवरी ।।
शुद्धमति तू, वंदनीय तू
गंगाजळ निर्मळ माता तू
मानवतेचे शतशत वंदन - या शुभ चरणांवरी ।।

•

# धर्मकार्य

## (पोवाडा)

### राजाराम दौलत गडकरी

१

नमस्कार आरंभी केला देवि अहिल्येला ।।
इतिहासाच्या पटलावरच्या अढळ तारकेला ।।
आद्य ऋषींनीं ज्याला स्तविलें अभिनव सूक्तांनीं ।।
श्रीसंतांनीं ज्ञानेशांनीं अभंग वाणीनीं ।।
त्या तत्त्वाचें जीवन सतिचें केवळ धर्माचें ।।
संसाराचें परमार्थाचें राजकारणाचें ।।
झाली कीर्ति तीर्थी जगतीं कोण गणिल गणती ।।
दशांकगणिती हात टेकिती धन्य सती म्हणती ।।
विश्वकुटुंबी धर्मावांचुनि तिला क्रिया नव्हती ।।
मऊ मेणाहुनि असिधारेहुनि तीक्ष्ण तिची नीति ।।
        तत्त्वमूळ चैतन्यांत ।।
        जड सृष्टींत ।।
        अबाधित असत ।।
        तो धर्म न तरवारीचा ।।
        तो धर्म न वाचस्पतिचा ।।
        तो धर्म न मिळमिळतेचा ।।
''वस्तूचें वस्तुत्त्व राखणें धर्म'' खरें वचन ।।
आज शाहिरा करी अहिल्यादेवीवर कवन ।।धृ।।

२

निसर्गनिर्मित सखा मनाचा धैर्याचा मेरु ।।
कैलासासम शीतल याचें स्थान पापहारु ।।
संततधारा कर्मरतीची येथुनीच गंगा ।।
दिक्कालाला भेदित वहाते दास्यपापभंगा ।।
तिच्या सुपुलिनीं खेळत नाचत वाजवीत वेणू ।।
कर्मवीर धरतीवरि करती सजीव अणुरेणु ।।
तो पावन मंगल नाद ।।
उठवि पडसाद ।।

देउनी साद ।।
चित्‌शक्ति तेव्हा उठते ।।
श्रुतिवीणा घेउनि वसते ।।
सूक्तांचीं गाणीं गाते ।।
प्रसन्न करिते जगा खुलविते फुलास फुलवूं ।।
आज शाहिरा करी अहिल्यादेवीवर कवन ।।धृ।।

३

देवींनों ती प्रसन्न सुमनें अम्हां काय होत ।।
रवि गेला पश्चिमेस येथें दाट तिमिर पडत ।।
मधुर माधवा पाहुनि मालति लता जरी फुलल्या ।।
मन नाहीं मनपणांत त्याला नाहिंच त्या दिसल्या ।।
कोणाकरितां गातां आतां सुरेल मधु गाणीं ।।
पक्षांनों हीं कशिं ऐकावीं परवश कानांनीं ।।
धर्म लोपतां उकिरड्यामधीं पडते समशेर ।।
मूषक मंडुक तिला तुडविती होवोनी स्वार ।।
समररंगणीं जिनें चमकुनी तांडव नाचावें ।।
आयस मानुनि वायसांनिं का तिजशीं खेळावें ।।
हें धर्मग्लानिचें माप ।।
पूर्विचें पाप ।।
पूर्ण संताप ।।
हृदयांनीं हृदय रहावें ।।
डोळ्यांनीं डोळस व्हावें ।।
गुणधर्म स्वयें जाणावें ।।
धर्मग्लानि करि ''जन्मसिद्ध हक्काचें'' निर्दलन ।।
आज शाहिरा करी अहिल्यादेवीवर कवन ।।धृ।।

४

धर्मग्लानिचा पेशवाईचा तेजहीन काळ ।।
आला तेव्हां व्यवहारावर पडलें आभाळ ।।
रविप्रकाशीं चमकत असतां महाराष्ट्र भूमि ।।
दुर्दैवानें अडवे आले मेघ गगनगामी ।।
वर्षाकालीं बरसातीची साथ सुरु झाली ।।
हात टेकुनी भूमि बिचारी कर्दमांत पडली ।।
नव रंगाचीं नवनवलाचीं लवलवीत लेणीं ।।
भिजलीं पडलीं झडलीं सुमनें वेलींचीं गळुनी ।।

कुठें मोडले वृक्ष माजली कुठें झाडझुडुपें।।
मंडुकमंडल कोठें जमलें कुठें नवीं रोपें।
रवितेजानें बनलें परि ते रविस आड आले।।
मत्त मेघ हे जसे डोइजड अधिकारी झाले।।
सत्तेचा फुटला बांध।।
नुरे धरबंध।।
नीतिचा गंध।।
सरदारा आशा सुटली।।
स्वार्थाची भुरळी पडली।।
बुणगेगिरि त्यांनीं केली।।
तेव्हां होती एक सती ही आत्मभाव स्मरुन।।
आज शाहिरा करी अहिल्यादेवीवर कवन।।धृ।।

५

समानतेच्या जाणिवतेचा सहज प्रश्न आला।।
समान जाणिव असे जिवांच्या अंतःकरणाला।।
कुणी उमजले जाणुनि कोणी जाणोनी भ्याले।।
या संरक्षक जाणिव धर्मा विष्णुदेव म्हटलें।।
देवरुप हा धर्म जागता नसतां जगतांत।।
लढे माजती हक्काचे रणप्रसंग येतात।।
तें भारत कसलें झालें।।
कशास्तव झालें।।
पहा तुम्हि आपुलें।।
नियमांत पांचही भूतें।।
असतात म्हणुनी विश्वातें।।
समृद्धि अबाधित मिळते।।
अवर्षणें दुष्काळ पडति जगिं होतां तत्पतन।।
आज शाहिरा करी अहिल्यादेवीवर कवन।।धृ।।

६

पतन हेंच की, आत्मविसर्जन लोभास्तव करणें।।
मानुषतेची निजस्त्रत्तेची पायमल्लि येणें।।
सौरभ पुष्पांचा पुष्पामधिं नियमानें आहे।।
तोच फुलांचा उत्क्रांतीचा खरा मार्ग आहे।।
पारतंत्र्य शरिराचें जरि अति कष्टप्रद दीन।।

लाजिरवाणें नाहिं मानसिक गुलामगिरिहून ।।
अभिमानास्पद सदा रहावें उच्च भावनेंत ।।
रहस्य भरलें हेंच अहिल्या दिव्यचरित्रांत ।।
करभार सुसंगत घ्यावा ।।
लोक राखावा ।।
मनिं न विटावा ।।
नीतिचा पथ बांधून ।।
न्यायाचा तोल धरुन ।।
जनमतास सांभाळून ।।
जिनें राजश्री स्वतंत्र केली धर्म वाढवून ।।
आज शाहिरा करी अहिल्यादेवीवर कवन ।।धृ।।

७

समर्थवचनें शिवरायाचें धोरण जें होतें ।।
तें चुकतां संभाजी झाला घातक राज्यातें ।।
शिवस्नुषेनें येसुबाइनें तदा कारवाई ।।
केली तसली होळकराची करी सूनबाई ।।
मालोजीच्या निधनानंतर कठिण काळ होता ।।
निवारिला तो तिनें तशी कटु चंद्रचूडखलता ।।
झडली न फैर तोफेची ।।
तरवारीची ।।
घातपाताची ।।
परि वैरी विसरला वैर ।।
लज्जेचा ताबेदार ।।
मानसीं वचकला फार ।।
ओजस्वी सत्त्वाचें असलें दिव्य तेज नमुन ।।
आज शाहिरा करी अहिल्यादेवीवर कवन ।।धृ।।

८

जितजेत्यांचे अधिकाराचें इथें काम नाहीं ।।
नैसर्गिक भावना मनाची नैसर्गिक राही ।।
हें जीवाचें बल साधोनी शक्ति वाढवावी ।।
अविरत सत्ता जगतावरतीं नित्य गाजवावी ।।
म्हणुनि पांगळे लुळे दरिद्री दुष्काळीं पिडिले ।।
भिक्षा देउनि दीक्षा द्याया कोणी भ्रष्टाविलें ।।

प्रेषित प्रेरुनि आकाशीं कुणि देव दाखवोत।।
रक्त शिंपुनी तरवारींनीं धर्म वाढवोत।।
जरि जबरीनें द्रव्याशेनें समाज फुगवीला।।
वातें फुगला देह परंतु देहि क्षीण झाला।।
मासला असा जुलुमाचा।।
नाहिं धर्माचा।।
अप्रगतीचा।।
काढिलें तेज सूर्याचें।।
पाडिले दांत सिंहाचें।।
नैसर्गिक देवाघरचें।।
कृत्रिमतेनें आत्मपणाचें होतें विस्मरण।।
आज शाहिरा करी अहिल्यादेवीवर कवन।।धृ।।

९

नमो अहिल्ये नमो देवते आदिशक्ती माते।।
''धर्मकार्य'' गातील कवीजन पावन तव चरितें।।
तुम्हीच भारतस्वराज्य मंगल देवि देवतांनों।।
हिंदभूमिच्या अभिमानांनों प्रियकर बालांनों।।
परतापानें निजराष्ट्राचा धर्मात्मा झुरतां।।
परात्पराचें परम तेज तुम्हि घेवोनी येतां।।
वात्सल्यानें पाजुनि त्याला स्फूर्तीची मात्रा।।
धर्माचें नवजीवन देता राष्ट्राच्या गात्रा।।
कसल्याशा चैतन्यानें।।
समभावानें।।
एकत्वानें।।
विश्वाला आच्छादोनी।।
काळाशीं झगडा करुनी।।
ताळ्यावर त्याला आणुनी।।
''धर्मराज्य'' जीवांचें जीवा देता मिळवून।।
आज शाहिरा करी अहिल्यादेवीवर कवन।।धृ।।

•

# पुण्यश्लोक देवी श्री अहिल्याबाई होळकर

**पुरुषोत्तम सदाशिव आरस**

**चाल : (राजहंस)**

१

हे चरित्र कथितो प्रेमें - त्या देविअहिल्यें विषयी
जगीं कर्मे केली कैसी - लोकांस फार हितदायी
होउनि जननी विश्वाची - जाहली लीन प्रभुठायी
रेखुनि तिच्या कित्त्याला
तुम्हि करा वीर आपुणाला
त्यागोनी भीरुपणांला
बसुं नका उगाची ठाई-गाजवा नांव या लोंकी

२

हे रत्न एकची झालें-लाभलें होळकर वंशी
घडविलें विधिनें तिजला - संपूर्ण बहु गुण राशी
स्वर्गीय सुंदरी भासे - पातली अहिल्या देवि
रूद्रमा, चांदबीबी असल्या
रझिया बेगम राण्या कसल्या
जगीं अशा बहू अवतरल्या
परि रत्न असें या भुवनि - प्रगटलें आजवर नाहीं

३

शिंद्याच्या उज्वल वंशी-विधि घाली सतिस जन्माला
रात्रंदिन वाढें जो जो-तोषविच स्वगुणें सकला
सौंदर्य अमित साध्विचें - मल्हारी पाहूनि भूलला
तो विचार मनि त्यां आला
ही रुप गुणांची बाला
योग्य पत्नि खंडोजीला
तिज स्नुषा करुनि त्या काळी-गृहलक्ष्मी आणी सदनाला

४

ती स्नुषा कुल शीलवान-लाविता चरण सदनाला
शुभ मंगल ऐश्वर्याचा - दिनमणि चढें उदयाला

मारुनि लढाया थोर – मल्हारी चढें नांवाला
खंडूजी अहिल्या बाला
ही दोघें प्राण तयाला
हृदयांत ठेवि दोघांला
परि हाय होई विधि वाम–पाहूनि सुखाचा काळ

५

नुलटली काहिशीं वर्षे – लग्नांस वीर तरुणिच्या
दुर्दैवि भाला भाळीं – घातला विधिनें सतिच्या
उरलें न कोणी बोलाया – गुजगोष्ठि चार प्रेमाच्या
खंडोजी समरी पडला
मल्हारी निद्रित झाला
मालवेश मालव गेला
दुर्दैव करुनि परिपाठी–करी घेंत सूत्र राज्याचें

६

उठुनियाही प्रातःकाळीं – जपतसे प्रभु नामाला
तदनंतर दीन दुःख्याच्या – प्रेमानें ऐकी बोला
तै परी भार राज्याचा – मोदानें वाही बाला
खोदिलें कूप अनिवार
बांधिलें घाट बहू थोर
अन्न छत्र चालवि फार
लाविला प्रजें कल्याणा – निजकोष सतिनें सारा

७

सीतार्थ दीन दुख्यांच्या – करी कंबल दान तयांना
पेरुनि शेत कणिसांचे – दे चुगा अमित पक्षांना
कुंपणें घेऊनि तैसी – अर्पिति ग्रास गाईंना
सतयुगीं राज्य रामाचें
कलियुगीं दुजें साध्विचें
बोलति मुदें जन वाचें
भेंद भाव लघु थोरांचा – उरला न तिच्या राज्यांत

८

वंदू या तिला आनंदे – जी जगतिं झालीं धन्य
ती दिव्य मूर्त प्रेमाची – जी सकला झाली मान्य

बोलति जीला शास्त्रज्ञ – नच केवळ स्त्री सामान्य
जी गमें जगाचीं माता
पावित्र्य जियेंचें गातां
वाटतों मोद बहु चित्ता
चंद्रासम निर्मल कीर्ति – ती अखंड गाजों जगती

९

त्या पुनीत सतिच्या पुण्यें – हो वृद्धि सदा राज्याची
निशिदिनी ही निर्मल गाजों दिशि दाहीं कीर्ति भूपाची
चिरकाल विजई हो भाला – तैं गादी होळकरांची
आमुचा भूप गुणवंत
त परि सदा बलवंत
''यशवंत'' होई यश-वंत
प्रार्थुनि तियेच्या पायी – ना उरे शक्ति कवनाला

•

# सती धन्य धन्य कलियुगी अहिल्याबाई

**(पोवाडा)**

**शाहीर प्रभाकर**

सती धन्य धन्य कलियुगी अहिल्याबाई।
गेलि कीर्ति करुनियां भूमंडलाचे ठायीं।।धृ.।।

महाराज अहिल्याबाई पुण्य प्राणी
संपूर्ण स्त्रियांमधि श्रेष्ठ रत्नखाणी।।

दर्शने मोठ्या पापाची होईल हानी।
झडतात रोग पापाची होईल हानी।।

वर्णिती कीर्ति गातात संत ते गाणीं।
झाली दैववशें ती होळकराची राणी।।।

**।।चाल।।** उद्धार कुलाचा केला। पण आपला सिद्धीस नेला।
महेश्वरास जो कुणि गेला।। (चाल पहिली)।।
राहिला तेथ जो जाउन घेउन बाप भाई।
संसार चालवी दीन दुबळ्यांची आई।।
प्रत्यही द्यावी ब्राह्मणास दश दानें।
ऐकावि पुराणे बहुत आनंदानें।।
शोभती होमकुंडे द्विज वृंदावनें।
टाकिती हजारो नेमांत अवदानें।।

**।।चाल।।** कधी कोटी लिंगें करवावी।।
वधुवरें कधी मिरवावी।
अर्भका दुधें पुरवावीं।। (चाल पहिली)।।
पर्वणी पाहूनी दान देतसे गाई।
जपमाळ अखंडित हातीं वर्णु काई।।
जेथें जोतिर्लिंग जेथें तीर्थे महाक्षेत्रें।
घातली तेथे नेहमी अन्नछत्रें।।
ज्यासि आली जरा झाली कांहीं विकल गात्रें।
पुरवावी त्यास औषधें वस्त्रें पात्रें।
कितिकांनीं घेतली स्मार्त अग्निहोत्रें।
दिली स्वहस्तें करुन त्या भटास क्षण मात्रें।

**।।चाल।।** आधि इच्छाभोजन द्यावें।
उपरांतिक तीर्थ घ्यावें।।
वाढून ताट वर मग न्यावें।। (चाल पहिली)
जेविल्या सर्व मग आपण अन्न खाई।
रघुवीरचरित्रें ती रात्रीस गाई।।

आली यात्राकऱ्याला पंचे जोडे।
कोणास आंगरखे कोणास धोतरजोडे।
कोणास दुशाला कोणास बटु घोडे।
गवयास मिळावे सुवर्ण कंठी तोडे।।
घाली गिराशाचे-लुटेरा पायांत बेडे खोडे।।

**(चाल)** बांधिले घाट मठ फार
कुठे शिवास संतत धार।
कुठे ठेवतां पाणी गार।। (चाल पहिली)।।
त्या साठी मुशाफिर कायें धांवत जाई।।
विश्रांत पावती पाहून आमराई।।

किती ग्रहण संधींत तीलतुला त्या केल्या।
कधि कनक रौप्य आणि कधीं गुळाच्या भेल्या।।
सांभाळ करुनि काशीस यात्रा नेल्या।
कावडी शतावधी रामेश्वरी गेल्या।।
संसारी असून तिच्या वासना मेल्या।
तिजपुढे सहज मग मुक्ति उभ्या ठेल्या।

**(चाल)** कवि गंगु हैबती म्हणती।
पुण्याची कोण करील गणती।
राज्यास होती पडपण ती। (चाल पहिली)
महादेव गुणींचें लक्ष तिचे पाई।
कवनांत प्रभाकर करीतसे चतुराई।।

•

# देवी अहिल्या

## चंद्रशेखर

तेजाच्या वलयामधुनि झुकुनि देवी 'अहिल्याच' ते
तिचे राजकुटुंबसे नगर हे स्वर्गातुनि पाहते;
ती साध्वी निज माऊली जरी अता स्वर्गस्थ आहे, तरी
हे इंदूर न, लाडके हृदय हे राहे तिचे भूवरी
पर्जन्यासह ह्यावरी वरतुनि वात्सल्य ती वर्षिते,
गोधूमान्न अजूनि ती सकळिका सत्वाढपसे अर्पिते;
नाना कीट, पिपीलिका, मृग, पशू, पक्षी, तसे मानव
धर्मोदार्य जिचे अखंड घडते ते भोगिती वास्तव
जिचा न्याय दयेचिया अचलशा पायावरोनि उभा,
शत्रू बाष्पसमान ते वितळले पाहोनि जिची प्रभा;
नाना सद्गुण-तेज पाहुनि जिचे रंभा मनी लाजली
राष्ट्राची अभिमान-मूर्ति अमुच्या येथे ती साजली
ज्योतिर्लिंग महंमदे मदभरे भेदोनि उच्छादिले,
संस्थापुनि धर्मतत्त्व अमुचे प्राचीन संगोपिले;
गंगेच्या जलकावडी रिचविल्या धाडुनि रामेश्वरी,
सेतू टेकविले असंख्य समयी गंगाप्रवाहान्तरी
श्वासोच्छ्वास पवित्र हेच जणु की ईश्वरी चालवी
तिच्या सुंदर मंदिरास्पद गमे इंदूर हे मालवी
वापी, कूप, तडाग, देवसदने, वृक्षावली, घाट ते
छत्रे, आदिक पूर्तधर्म बघता आश्चर्य हो वाटते!
दानाचे अमृतौघ वाहति सदा जे चार धामांतुनि,
त्यांचे निर्झर पावले उगम हे इन्दोर! तुझ्यातुनी
सेतूहूनी हिमाचलावधि जिचे औदार्य ये प्रत्यया,
इंदुराहुनि शाश्वतात झळके ती दिव्य देवी दया
ओंकारेश्वर ते महेश्वर महा तीर्थेच इंदूरची;
पावित्र्यासह तेथ सात्त्विक वसे शांती अहिल्या हिची
देवीचे शरदिन्दुसे मन तिथे रेवाजली बिंबले;
स्वर्गीचे सुख त्या उदार मतिने क्षेत्रांत ह्या आणिले!

दादांनी हिजलाच हो शह दिला आले करू सामना!
त्या अर्थी खलिता सतीस कळला वाटे अचंबा मना
देई उत्तर थोर वीरच तुम्ही जिंकाल बाईस या
आहे पौरुष त्यात काय? न कळे का हातघाईस या !

मी का यद्यपि जिंकिले, तरि तुम्हा लागेल जो काळिमा
जाणा तो मग वज्रलेप! न निघे यावद् रवी-चंद्रमा!
राघोबा, थिजले! तिला कळविती मी येतसे पाहुणा
देवी त्यांस म्हणे खुशाल या मी चाहते आपुणा

इंदुरातचि ह्या तदा बरसला तन्मान - सन्मान तो
पाहोनि बखरीत नेत्र निवती, वाचा, करा पान तो!

•

# पुण्यश्लोक देवी अहिल्याबाई

## विनायक आनंद रेघे

(चाल : पोवाड्याची)

१

नमुनि रमेशां यशगुण गातो प्रेमे परिसाची
अगाध कीर्ति साध्वि अहिल्या देवी ही साची
मूर्तिमंत पवित्र देविच्या पवित्र यश गानें
मूर्तिमंत पवित्र श्रोते सर्वहि खचित निश्चयानें
शिंदे नामक क्षत्रिय वंशी जन्म हिचा होई
सती रत्न ती गौतम वनिता जगती जणुं येई
''जगन्मान्य ही होईल, स्वगुणें तोषवील सकला
राणी होइल राजाची ही भविष्यज्ञ वदला''
चंद्रकले सम वाढुं लागली ही वैभवशाली
लेखन वाचन शिकुनि अहिल्या सर्वा प्रिय झाली
खेळही तेधवा तिचे
न इह लोकिचे
भावि देवीचे
ही लहान अहिल्या बाळी
देवासि पुजे त्या वेळी
ही सत्यशील त्या काळी
लहान असले तरी प्रभा का लपेल रत्नाची?
अगाध कीर्ति साध्वि अहिल्या देवी ही साची

२

त्यां समयीं श्रीमंत पेशवे स्वारी करण्यांस
उत्तर हिंदुस्थानीं निघती सरदार ही खास
मालव जिंकी बाहुबळे जो रणरंगी रंगे
सुभेदार मल्हाररावही होता त्या संगे
चोंडी ह्या मुक्कामीं येवुनि ते करिती वसती
सुभेदार श्रीमंत पेशवे खलबत बहु करिती
बैठक बसली असतां सहजचि आली ही बाला
मुख चर्येचे तेज पाहुनि मालव-पति दिपला
पाहुनियां मुखचंद्र वीर हृदयाब्धि उचंबळला

वदला ''पत्नी योग्य असे ही माझ्या खंडूला''
गोडस अवयव रेखिव नासिक पाणिदार नेत्र
सुंदरता कां नसे जगी ह्या प्रेमाला पात्र?
पितयाला बोलावुनि त्यानि विचार कळवियला
आनंदे अनुमोदन मिळता तिथि निश्चय ठरला
मग खंडेराव घरधणी
अहिल्या राणी
त्याचि होवोनी
हिरकणी कोंदणीं जडली
दोघांसी शोभा आली
ही पारख उत्तम झाली
रत्न पारखी फक्त जाणती किंमत रत्नांची
अगाध कीर्ति साध्वि अहिल्या देवी ही साची

३

दुर्दैव नदी सोडूनी चढली वैभव शैलांत
प्रेम सरोवरिं पोहु लागली बहु सुखवी कांत
मालेरावा प्रथम प्रसवली वीर प्रसू झाली
मुक्ताबाई सती साध्विच्या मग पोटीं आली
त्या समयीं देशांत शांतता ठाउक ना कैसी
तरवारीचा खणखणाट तो चाले दिवस निशी
श्रीमंतांचा निरोप येतां मान देति त्याला
सुभेदार युद्धार्थ निघाले घेवुनि पुत्राला
मर्द मराठे भगवा झेंडा पुढे करुनि निघती
गंगौघासम अखंड विजयी फौज दिसे हो, ती
''हर हर'' नादे दाहि दिशा त्यां दुमदुमुनी जाती
शिवरायाच्या वीर गड्यांची समर गर्जना ती
खंडणी वसूल कराया
देश जिंकाया
निघति फौजा ह्या
कुंभेरी गडाशी आला
जाटाच्या मानी बोले
श्रीमंत तेधवा अडलें
कुंभेरीसी भेरि धडकती घाई युद्धाची
अगाध कीर्ति साध्वि अहिल्या देवी ही साची

४

कुंभेर गडा वेढा पडला बहुत दिवस चाले
शिकस्त करिती पराक्रमाची तेथें दोनि दळे
एके दिवशीं शस्त्र रहित तो रणी मौजे बघत
खंडेराव निशाणापाशीं क्षणी उभा राहात
''सूं सूं सूं सूं'' येवुनि गोळा लागे हृदयाला
''हरहर'' वदुनी वीरमणी तो भूमिवर पडला
धांवत येवुनि बाळा बघुनि मालव-पति रडला
धैर्य-मेरु परि सुत-प्रेम-शरे तेव्हां ढासळला
साध्वीचा सौभाग्य सूर्य तो जाई अस्तासी
खंडोजी कैलासी जातां दुःख समस्तासी
प्राणपतीच्या निधनी तिजला शोक अति झाला
दुःखाश्रू-मौक्तिक-लक्ष ती वाही उमेशाला
साध्वीस दुःख ते अती
जावया सती
पुसें अनुमती
मग मालवेश तिज वदला
''खंडू जरि टाकुनि गेला
तूं टाकु नको गे मजला
वृद्धपणीं तू माझी काठी अससी वृद्धाची''
अगाध कीर्ति साध्वी अहिल्या देवी ही साची

५

''थांब अहिल्ये जाऊं नको गे टाकुनि मज बाळें''
गळामिठी घालुनिया वदतां बहुतचि गहिवरलें
दुःखे व्याकुळ परि श्वशुराची विनती मान्य करी
शीलवती ज्यां घरंदाज ज्या करिती ह्याच परी
घेवुनि तिजसी इंदूरासी येति सुभेदार
कधी कधी ते करिती स्वाधीन हिच्या कारभार
दीन जनांची गो विप्रांची तशी रैयतेची
श्वशुराच्या पश्चात काळजी माय जसी साची
लेखन वाचन जाणें बहुश्रुत सूज्ञबहू सुमती
मालव पति ही राजकारणीं हिचे साह्य घेती
अलंकार ते टाकुनि चिंतुनि नित्य स्व-पति-देवा

श्वेत वस्त्र परिधान करुनी करी ईश-सेवा
ईशाला परि तेहि न रुचले थोड्यां दिवसांत
सुभेदार नरवीर शिरोमणि कैलासी जात
होळकरांचा मूळ पुरुष जो उमेश भक्त खरा
भारतभूचे भूषण होउनि होइ मान्य हरा
श्रीमंतांचा सव्य हस्त जो यवनांचा काळ
बाहु प्रतापें वरिली मालव-राज्य-वधू-माळ
पुत्रांस भेटण्या घाई
फार त्यां होई
लोटुनी जाई
देविस दुःख गर्तेत
जी आधिच आधी-तप्त
धैर्याने साहे शांत
जंव जंव तापे तंव तंव किंमत चढे सुवर्णाची
अगाध कीर्ति साध्वि अहिल्या देवी ही साची

६

एका मागुनि एक जशा त्या जलधारा पडती
तशी संकटे मनुजावरतीं येती ह्यां जगती
अज्ञानी निजपुत्र म्हणुनियां कारभार पाही
वयांत येतां मालेरावा राज्य-सूत्र देई
सुत-राज्योत्सव-सौख्य थोडकें ती नयने देखे
दुःखाकाशी जणू क्षणभरी सौख्य वीज चमके
पुन्हा घातला दुर्दैवानें तिच्यावरी घाला
देवीचा कुलदीप मालवे मालवेश गेला
हृदयाचे प्रिय रत्न हरपले जीवाचा जीव
सोडुनि गेला प्रिय मातेच्या शोका ना ठाव
असो प्रभूची इच्छा मजला मान्य असें वदुनी
राज्य चालवी करुनि तुकोजीरावा सेनानी
दुरुपयोग सत्तेचा न करीं न्याय-धैर्य आगळे
मार्तंडासी साक्ष ठेवुनी करीं कर्म सगळे
राजकारणी खेळ खेळुनी सर्वां दिपवीले
राज्यरक्षणी निज कौशल्या अतिशय दाखविले
शौर्य धैर्य अप्रतीम अंगी उपमा त्यांसी नसे
अन्यायी जना दंड द्यावया तत्पर नित्य असें

वीर महादजी शिंदे वदती अतीपूज्य भावे
''जन्मचि घेणे तरी अहिल्या-उदर-कमलि यावें''
वर्तनहि शुद्ध पर्वाचें
नीति न्यायाचें
विश्व प्रेमाचें
टीपूही तिज वाखाणी
तैसी नानांची वाणी
पेशवा सतीला मानी
लहान थोरी प्रीति, जरब माहिष्मती-राज्ञीची
अगाध कीर्ति साध्वि अहिल्या देवी ही साची

७

नित्य निवारुनि संकट अभ्रें रक्षी राज्य शशी
पूर्ण सौख्य ती देइ प्रजेसी शिशुला माय जशी
नीतिपूर्ण ती भूतदयेने न्याये राज्य करी
दुष्काळ नसे त्रास नसे कधि, रैयत सौख्यभरी
राज्यव्यवस्था उत्तम म्हणुनि शांतताहि पसरे
युद्ध नसे कधि लोक म्हणति हें रामराज्य दुसरे
जनहितकारी कामें करण्या खर्चाची मोठी
नित्य दक्ष ती खर्च करी बहु रुपयाच्या कोटी
भारतवर्षी एकही असे क्षेत्र नसे उरले
जे न, साध्विच्या पदस्पर्शाने पवित्र तर झालें
तीर्थक्षेत्रीं दीन जनास्तव अन्नछत्र घाली
देवस्थानां नेमणुकाही करुनि मनीं धाली
तीर्थ-राज काशीचें काशीविश्वनाथ देव
हिंदू हृदयीं ठेवियली, ही कायमची ठेव
महेश्वरीचे घाट तयांचा थाट कोण वर्णी
रामेश्वरही धातो न्हावुनि गंगेचे पाणी
वृषभां लागी जीवन तैसे दाणें पक्षांना
राम नाम पिठांच्या गोळ्या घाली मत्स्यांना
बांधी मंदिरे घाट नद्यांना तश्या धर्मशाळा
पुराण श्रवणीं धर्मकारणीं खर्ची वेळ आपुला
पुढें पतीच्या निधनी जाई मुक्ताबाई सती
कर्मयोगिनी दुःख भराने वाकुनिं जाइ अती
मग तीहि निघाली वेगें

मुलीच्या मागें
नाथ-अनुरागें
नश्वर तनु टाकुनि गेली
ती दया पोरकी झाली
ही भरतभूमि हळहळली
घेवुनि थकला दुःख परिक्षा प्रभु ह्यां परिसाची
अगाध कीर्ति साध्वि अहिल्या देवी ही साची

८

दुःख ऐरणीं दुःख घणी हिरकणी तशी राहे
अजरामरही कीर्ति सरिता म्हणुनि तिची वाहे
पर-धर्म-सहा असुनि पक्की स्वधर्म निष्ठ खरीं
पोकळ गर्वा वाचुनि जगती फक्त हीच नारी
स्मीथ असेची वदतो दुसरा इतिहास लिहितां
''न्यायी-नृपती-श्रेष्ठ'' लिहुनी संबोधी ''माता''
हिंदू अहिंदू आंग्ल सर्वही म्हणति ''धन्य धन्य''
''पुण्यश्लोकां देवि अहिल्या त्रैलोक्या मान्य''
जोवरि गगनी रवि शशि तोवरि कीर्ति आखंड
धन्य अहिल्या धन्य होळकर धन्य भरतखंड
शिकवुनि गेली कधीं कुणासी देउ नका त्रास
स्वतःसि जिंकिल तो विश्वासी जिंकिल हे खास
ती देवी इह लोकीची
मूर्ति न्यायाची
तशी नीतिची
ती देवी भूत दयेची
ती मूर्ति हिन्दुधर्माची
ती देवि विश्व प्रेमाची
**आनंद सुता** पावन करि त्या धन्य माउलीची
अगाध कीर्ति साध्वि अहिल्या देवी ही साची

•

# श्री देवी अहिल्याबाई होळकरीण

**शि. श्री. पंडित**

### स्मरण १ ले

नमस्कार श्री महन्मंगला श्रीमार्तंडाला।
नमस्कार हे असोत माझे श्रीमल्हारीला।।१।।
स्फूर्ति दे प्रभो! यशगुण गाया देवि अहिल्येचे।
ललाम झाली भरतभूमिला त्या प्रिय मातेचे।।२।।
जय बोला श्री देवि अहिल्या मातेचा बोला।
जय बोला श्री महाराज यशवंतांचा बोला।।३।।
जय बोला होलकर गादीचा सदोदित साचा।
जय बोला हो तसाच साऱ्या राजघराण्याचा।।४।।
पापे जळती जिच्या नामाच्या प्रतापे सार।
करुं चला अजि स्मरण सतीचे मिळूनियां सारीं।। ५।।

### स्मरण २ रे

बाइल म्हणजे धनीण अमुच्या घरच्या कामाची।
'बसे सदा जी पडद्यांतचि' ती अमुच्या कामाची।।६।।
सुख-दुःखांचे भोग भोगणें हेंच तिचे काम।
या परतें नच संसृति-सरिते मधें दुजें धाम।।७।।
विकास व्हावा तिचे गुणांचा फक्त चुलीपुरता।
थोडें पुढतीं सरतां लागे पुरुषांची सत्ता।।८।।
असो परी ईश्वरी योजना 'औरच' ये म्हणतां।
कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुं ही त्याची सत्ता।।९।।
देवि अहिल्याबाई निर्मूनी रत्न महाथोर।
मानव नियमा ईश्वर फासे असाच हरताळ।।१०।।
महाभाग्य हे अम्हां लाभले रत्न अमोल असे।
भाग्यावाचून लाभ कुणां कां होई अनायासें।।११।।
ललाम झाली भरतभूमिला त्या प्रिय मातेला।
अनंत माझे नमस्कार हे देवि अहिल्येला।।१२।।

### स्मरण ३ रे

होळकरांचा कुंभेरीला वेढा जों पडला।
खाली खंडेराव शत्रुच्या गोळ्यानें पडला।।१३।।
हाहाःकार ध्वनी चहुंकडे अकस्मात् उठला।
हाय अहिल्याबाई सतीचा भाग्यरवी खचला।।१४।।
दुःख करी मल्हारराव कित्ती वर्णु शके कोण?
दुःखाग्नीने जाय अहिल्या अगदीं करपून!।।१५।।
पती जीव कीं प्राण सतीना अशी जगीं महति।।
पति म्हणजे सुख सौभाग्याचें गृह सतीचें जगती।।१६।।
प्राणांवाचुन देह तसा पति वाचून साध्विंना।
वियोग पतिचा होतां होतो जीव नको त्यांना।। १७।।
करी अहिल्या या समयीं मनिं एकच निर्धार।
देह करावा पतिसह अर्पण हेंच खरें सार।।१८।।
ऐकुनि सतीचा विचार यापरि मल्हारी बोले।
खंडू गेला कींव न त्याला आली मुळीं बाळें।।१९।।
परी वाटतें खंडु न मेला मेली अहिल्या ती।
तव रुपाने खंडू हा मज कींव येउं दे ती!।।२०।।
होउं नको मज वृद्धासह तूं निष्ठुर सूनबाई।
विचार मनिंचा सहगमनाचा सोडून तूं देई।। २१।।
श्वशुर वृद्ध त्याकडेच पाहुनि सती न जाय बाला।
अनंत माझे नमस्कार त्या देवि अहिल्येला।।२२।।
आकाशींची कुऱ्हाड पहिली करि ताटातूट।
पति पत्नीची भव सौख्याची मोडुनिया वाट।।२३।।

### स्मरण ४ थे

हाय टाकिली ईशें दुसरी कुठार वरतून।
सुटली थेटुन कोण तिला मग धरी आवरुन?।।२४।।
भक्त तयांच्या भालीं दुःखे तुवां लिहावीं तीं।
हीच असे कां देवा? तुझिया घरची न्याय नीति।।२५।।
मालोजी सुत एकलाचि त्या कालज्वर आला।
ज्वर तो कैचा मृत्युच आला दुजा अहिल्येला।।२६।।

फिरे मुलाचें सन्निध गाळित अश्रू अनिवार।
फिरे जशी पक्षीण आपुल्या पिला सभोंवार।।२७।।
विधवेचा सुत एकाकी त्यावरी तिची भिस्त।
प्राण घाबरे तिचा जरी तो होइ रोगग्रस्त।।२८।।
परि कां चुकला काळ कुणाला घालाया घाला?।
पुत्र-शोक जाहला अनावर माय अहिल्येला।।२९।।

**स्मरण ५ वे**

तोच पुण्याचा राघोबा करी विचार हल्ल्याचा।
होळकरांचे राज्याचा मनी लोभ धरुन साचा।।३०।।
होळकरांचा दिवाण गंगाधर हो लोभवश।
म्हणें पेशव्या 'असे होळकर गादी निर्वंश'।।३१।।
'चालून आली लक्ष्मी तिजला ओढा, जवळ करा'।
'करा खालसा नसे वारसा आतां होळकरां'।।३२।।
आले आले दादा आले राज्य हरायाला।
ऐकुनि हें नच धीर अहिल्याबाईचा खचला।।३३।।
म्हणे 'भोसले, दाभाडे या गायकवाड अहो'।
'पाप बुद्धिनें दादा येतो दौलत लुटण्या हो'।।३४।।
तोंच तिघे हे देति अहिल्येबाइस ललकार।
'म्हणति आमुची सेना तुमची - पळवा रिपु दूर।।३५।।
'अहो यावरी न चुके दादा घालाया घाला'।
'तरी जातिनें आम्ही येऊं प्रसंग जर पडला'।।३६।।
'धीर चढे मग अहिल्येस ती वीर स्नुषा ठरली'।
'नव जोमाची वीरत्वाची घेइ लाट उसळी'।।३७।।
'म्हणे सती ''वीर हो'' उठा हो करु अरिचा चूर।
'चढला उतरवुं शत्रुनयनिंचा लोभाचा धूर'।।३८।।
लाज न वाटे चाल कराया जाणून मी अबला।
राज्य मिळविले न भीक मागुनि दाखवुं दादाला।।३९।।
आले आले दादा जवळी राज्य हरायाला।
ऐकतांच हें दुप्पट चढला त्वेष अहिल्येला;।।४०।।
निरोप जाई तिचा पेशव्या ''स्त्रीसह नच लढणें।
ज्यांत तुम्हाला बट्टा येइल तो पथ नच धरणें।।४१।।

दोन हात मी करावयाला सिद्ध जरी आहे।
पराभव परि हा तुमचा होतां मरण तुम्हां आहे।।४२।।
ऐकुनि हा संदेश विरमले राघोबा दादा।
दूर जाहला नयनावरचा लोभाचा पडदा।।४३।।

**स्मरण ६ वे**

परी न येथें दुःख संपलें देवि अहिल्येचें।
दुर्दैवानें कमाल केली काय वदू वाचें।।४४।।
कुठार तिसरी पडे अहिल्येवर आकाशींची।
पति कन्येचा होई मृत नच सीमा दुःखाची।।४५।।
मुक्ताबाई सहगमनाचा विचार करि साचा।
आयुः पथिंचा एक विसावा सती अहिल्येचा।।४६।।
वदे अहिल्या बाळे त्यज हा विचार तव मनिचा।
मुक्ता बोले ''कधी तरी हा देह जावयाचा''।।४७।।
आइ जाउं दे कुंकुम लुटतां हेच मनी ठसलें।
मूलहि गेले कपाळ फुटले काय जिणे असलें!।।४८।।
मालू गेला तूं जाता मी कुणाकडे पाहूं।
काय पाहुनि मी वृद्धा जगि तनु अपुली वाहूं।।४९।।
दशरथ राजा मेला राजा राम वना जातां।
परि गेली का सांग सती ती कौसल्या माता?।।५०।।
'मज वृद्धेची दीनेची गे कांठीं तूं आहे'।
'मज एकाकी टाकून येथें कशीं जाउ पाहे?।।५१।।
परी न आली दया प्रभूला मग कसली मुलीला।
सज्ज जाहली मुक्ताबाई पति सहगमनाला।।५२।।
धीर सुटे मग फूटे ऊर तो सती अहिल्येचा।
कंप उठे पाहुनी तनूला निश्चय कन्येचा।।५३।।
आधिच कनवाळू त्यांतुनि हा प्रसंग अनिवार।
नवल नव्हे जरि गळे अहिल्याबाईचा धीर।।५४।।
चिता रचिली वर मुक्ता चढली नाथासह जाया।
जाया धन्या जी ओवाळी पति वरुनी काया।।५५।।
अग्नि शिखा लागल्या जावया वरति महा घोर।
अहा अश्रुचा पहा लोटला तिथें महापूर।।५६।।

स्मशान भूमी वरी निचेष्टित पडे अहिल्या ती।
चिता जाळि नच मुक्ता; जाळी चित्ता बहुरीती।। ५७।।
हृदय भेदि हा दुःखाग्नीचा दारुण देखावा।
कवि हृदयांनीं आप आपल्या मनांत वर्णावा।। ५८।।
मुक्ता झाली मुक्त खरी ती पतिसहगमनाने।
परी अहिल्या जाय मागुनी कन्या विरहाने।।५९।।

**स्मरण ७ वे**

धन्य माउली देवि अहिल्या सती जगीं धन्या।
तिच्या सारखी तीच जाहली पहा लोकमान्या।।६०।।
तरु सोशिती उष्ण परी ते पांथा सुख देती।
पल्लव खळबळ करुन तयांना निकट वाहताती।।६१।।
कड्या वरुन घे उड्या नदी ती अतिशय वेगानें।
तळमळ केवळ तिज तृषितांची म्हणुन तयां जल ने।।६२।।
मेघांची दिनरात्र चालते सकळ जगावरती।
धडपड; कारण लोक हिताची तयां उटारेटी।।६३।।
यापरि केवळ वाहियली तनु देवि अहिल्येनें।
लोक संग्रही सोसून-साही संसृतिची व्यसनें।।६४।।
राज्याची वदु कित्ति? अहिल्ये दगदग ती भारी।
त्यांतुन पति-सुत-सुता-निधन दे दुःख तयां न सरी।।६५।।
अशांत पाळी व्रतनियमादिक ती अपुला धर्म।
जसा वागला वनांत धर्मे तो राजा धर्म।।६६।।
पूज्य प्रतिकृति जिची उल्लसित करी सन्मनाला।
कुला भूषवी भरत भूमिला घालुनि यशमाला।।६७।।
गंगा-जीवन सम जीवन ज्या आवडले सतिला।
अमर होउनी ईह लोकिं जी लाजवि अमरांला।।६८।।
अनंत माझे नमस्कार त्या देवी अहिल्येला।
शाहिर पंडित श्रद्धांजलि हा मातृपदीं रमला।।६९।।

•

# अहिल्येचा अवतार
## (पोवाडा)

**वामनराव मोटे**

अहिल्येचा अवतार अहिल्याबाई झाली स्वर्गवास
करी रयत रोदनापुढें जगदीश होईल कैसें ।।धृ.।।
पुण्यश्लोकी जगा ठावकी कीर्त तुमची देशांतरी।
देशोदेशीं, तीर्थाचे ठायीं कीर्त केली नानापरी।।
अन्नसत्र घाट देवळें बांधले कळाकुसरी।
महारण्य कोकंठाणें घडविल्या बारवा विहिरी।।
नित्य दक्षिणा इच्छाभोजन ब्राह्मणास पूजन करी।
धर्मनीत अवतार केवळ कीर्ति वाढवी कोठवरी।
सुखवस्तीनें हेत तयाचा दया वाढतो वनवास।
गेला वृक्ष मोडून पक्षी बसती कोणा ठायास ।
अहिल्येचा अवतार।।१।।

गोविंदपंतदादा खासे गडे बाईसाहेबांचे दिवाण।
खासगी खर्चाचे दप्तर अवघे ज्याच्या स्वाधीन।।
धर्मनीत अवतार कोणाची कवडी लाच नाहिं घेनं।
हे मुत्सद्दी कारभारी कुठवर सांगू आख्यान।।

आप्पाशाम घ्यावे भवानी घ्यावे महिपति ऐकून।
जामदारखान्यामधीं तिघे राहतील एका नेमानं।।
दक्षिणा देयाचा हूकूम केला खंडोबाबूस।
अनुष्ठाना ब्राह्मण बसविले प्रत्येक ज्योतिर्लिंगास।।
अहिल्येचा अवतार।।२।।

अन्नछत्रामधीं कारभारी एक राजेवर भट सुज्ञान।
ब्राह्मणाच्या पंक्तीचा समाचार घडोघडी घ्यावा त्यानं।।
ब्राह्मणाची नित्य करी विनंति लागेल ते घ्या मागून।
माझ्या पदरचे काय जाते बाई अहिल्येचे पुन्न।।
गरीबा-गुरिबाची खबर घेतीं तीनदा येऊन।
आणखी उरलें अन्न देतो मागताति घ्या उचलून।।

अन्नछत्राचा कारभार एक शोभे राजेश्वरास।
जो का जेवत नसेल द्यावा सरंजाम त्यास।।
अहिल्येचा अवतार।।३।।

काशीराव दादासाहेबांवर मोठा बाईसाहेबांचा हेत।
भेटीच्या पक्षामधीं प्राण राहिला डोळ्यांत।।
आले काशीरावदादा पडली दुश्मनाला धासत।
बसविले गादीवर भेट मग घेती रयत।।
झाली नजरानजर आले मागुती धांवत।
एकापासून दहापांच। अवघ्यांशी झाली श्रुत।।
धन्याशीं मुजरा करुन गेली मग आपल्या घरास।
झाला हुकूम खाशाचा खबर केली चौकीवाल्यास।।
अहिल्येचा अवतार।।४।।

*टीप : हा प्रसंग अपूर्ण आहे.*

•

# अहिल्या प्रशस्ति

(पृथ्वी)

**दु. आ. तिवारी, जळगांव**

१

कितीक दिन जाहले गणति कोण त्यांची करी?
प्रभा धवल कौमुदी रुचिर भूवरी विस्तरी
तसे दिवस जाहले बहु जरी अहिल्ये तुला,
तुझें यश विभूषवी अजुन सर्व या भूतला!

२

पवित्र सरिता जिथें, वसति देव जेथें करी,
निसर्ग-रमणीयता जिथिल मानसातें हरी
किती सुजन या अशा वळति तीर्थभूमीकडे;
तिथें भगवति! तुझ्या झडति कीर्तिचे चौघडे!

३

प्रजाहित, दयालुता, परमन्यायता, धर्मता,
स्वकीर्ति-निरपेक्षता परगुणीं महोदारता,
किती विकसले असे गुण तुझ्या हृदीं नर्मदे!
जसे कमलखंडे ते विकसती तडागामधें!

४

अपत्यसम मानिलें, सुखभरें जिला पाळिलें,
प्रजेस अवलोकण्या मन तुझें बहू लोभलें,
न हा गगन चंद्रमा मुख तुझें गमे हे मशीं,
समुत्सुक सुरालयामधून वत्सले! पाहशी!

५

जिथे नृपति गाजले प्रथित विक्रमासारखे
गुणज्ञ रसिकाग्रणी प्रिय महाकवींचे सखे!
प्रदेश असला महोज्वल असूनही मालव
यशें उजळितां तूवां अधिकची, न शंका लव!

•

# देवी अहिल्याबाई होळकर

**महाराष्ट्रकवी यशवंत**

कुळ गोत असे कोणते
हाती न कुणाच्याहि ते
इतिहासहि मुजरे करी आदरे शौर्यशील नारिते
त्यातुन तू संन्यासिनी
तरि चातुर्याची खनी
तव धवल कीर्तिचे डिंडिम झडती नगारखान्यांतुनी
यौवनीच फुटला चुडा
टाकुनी स्कंधि बासडा
नच डगमगता ठाकलीस अबले उभी द्यावया लढा
दैव तेहि निष्ठुर किती!
आत्मजही पतिमागुती
निज धामा गेला! लेकि सुनाही गेल्या देखत सती!
जरि राज्याची स्वामिनी
सुखविलास तरि वर्जुनी
व्रतवैकल्ये आचरली प्रभुते पुजुनी रात्रंदिनी
वीथिका दिल्या यात्रिका
नेमिले कुठे नाविका
बांधिले घाट किति, तलाव, विहिरी, राउळात दीपिका
खल, पुंड, गुंड दुर्जना
वळविले प्रजारक्षणा
परिवर्तन घडवी खल हृदयाचे त्वदीय साध्वीपणा
ह्यापरी तुझ्या सत्कृती
नित जागविती त्वत्स्मृती
ह्या महिलावर्षी भारतवर्षी गाऊ तव आरती
तुज मुत्सद्यांची मति
संकटींहि निश्चळ धृति
तव चारित्र्यांतुन उपसुन नेली नक्षत्रांनी द्युति

•

# अहिल्याबाईंचा पाळणा

**सौ. मंदाकिनी गावडे**

पहिल्या दिवशी बोलली गंगा
नका करु तुम्ही सयांनो दंगा
माणकोजी पाटलांना जाऊन सांगा
शिंदे कुळाची पुण्याई धन्या
बाळ अहिल्या जन्मली कन्या
जो बाळा जो जो रे जो ।।

दुसऱ्या वेळेस बोलली भागा
निरंकार गं होईल जागा
सयांनो तुम्ही कामास लागा
तान्हे वासरु गाईला सोडा
तान्ह्या बाळाची दृष्ट हो काढा ।। जो बाळा..।।

पाहता पाहता मोठी हो झाली
जाऊ लागली महादेऊळी
फुलांची परडी घेऊन हाती
शिवपूजेत होई मग्न ती
कन्या लाडकी झाली चोंडीची ।। जो बाळा..।।

सातवं वर्ष लागे कन्येला
मल्हारराव तिथं आले स्वारीला
पाहिली मंदिरी अहिल्या गोजिरी
पेशवे वदले – ''कुळा उद्धरी''
सून करुन न्यावी ही घरी ।। जो बाळा..।।

आठव्या वर्षी बोलली तारा
घाला मांडव आपुला दारा
खंडेराव हा वर नेमिला
लग्न सोहळा थाटात झाला
गेली ही बाला होळकर घरा ।। जो बाळा..।।

सुभेदारांच्या नेतृत्वाखाली
राज्य चालवी इंदूर दरबारी

काश्मीर पासूनि कन्याकुमारी
लोक-कामाचे छत्र हे धरी
अठ्ठावीस वर्षे राज्य ही करी।। जो बाळा..।।

लुटारु-ठगांचा बीमोड झाला
मुक्ता-यशवंत विवाह केला
मंदिर, धर्मशाळा, बारवा बांधिल्या
विधवांचे केले दुःख-हरण
विद्वजनांचे वंदी चरण।। जो बाळा..।।

राघोबा दादांचा राज्यावर डोळा
अहिल्या देवीला आला उमाळा
साकडे घातले तुळजामाईला
महादजी बाबा होते जोडीला
सज्ज झाली ती युद्ध करण्याला।। जो बाळा..।।

खंडेरावांच्या मृत्युनंतर
सासरे-सुनेला दुःख अपार
सती जाण्याचा केला विचार
लोक-कल्याण चक्षुसमोर
रयतेसाठी सोडला विचार।। जो बाळा..।।

वद्य चतुर्थी श्रावण मासाची
वेळ ही होती नामस्मरणाची
परतत्त्वाशी विलीन होण्याची
पुण्यश्लोक सती अहिल्याबाईची।। जो बाळा..।।

माहेरवासी चोंडी या गावी
मध्यप्रदेशी इन्दूर महेश्वरी
जनलोकांनी भेट हो द्यावी
जिची पुण्याई पृथ्वीने गावी
धन्य धन्य ही अहिल्यादेवी।। जो बाळा..।।

•

## रम्य घाट बांधले कुणी?

### माधव जूलियन

स्थळे शोधुनी निसर्गसुंदर रम्य मंदिरे घाट कुणी।
वा पडशाळा बांधून केले येते जाते लोक, ऋणी।।
अन्नछत्रही विद्याभिक्षुक यात्रिक यास्तव करून सुरू।
संस्कृती चिंतेतून सोडविले विद्याध्यापक धर्मगुरू।।
जिच्या व्यक्तिगत उत्पन्नातून वाहे दानाची सरिता।
ती गंगाजलनिर्मल राणी कोण जिचा नच कोश रिता।।
भोग-पराङ्मुख होय परी न घे कर्तव्याचा संन्यास।
निदिध्यास घे सदा शिवाचा, योग कठीण हा अन्यास।।
राजयोग जनकाचा नाही भाकड गोष्ट पुराणीची।
रहस्य दावी इतिहासीची कथा अहिल्या राणीची ।।
कांचन गंगा वाहवूनी जी उभवी यशाचा धवलगिरी ।
होळकर कुलप्रभा, कोण हो तत्स्मृतीला न धरील शिरी।।

•

## या वीण आस ना चित्ता

### अज्ञात

या वीण आस ना चित्ता ।।

सती धन्य महा देवी अहिल्यामाता
जी वंद्या अखिला जगता
जरी जन्म तिचा आम्हा मानवी झाला
तरी पावे देवपणाला
ती आपुल्या सत्कृत्यांनी
बैसली उच्चशा स्थानी
त्या देवीचे सद्‌गुण गाता गाता
उल्हास वाटतो चित्ता ।।

जरी अल्पवयी संकटे सतीवरी आली
तरी तीळ न ती डगमगली
परी घेउनिया भार शिरी राज्याचा
दाविला प्रभाव स्त्रीचा
राघोबा पेशवा शूर
हिजपुढती तरी मजबूर
नच चालोनि परत फिरोनी गेला
इतिहास कथी हे सकला ।।

जरी धर्माला सतिच्या बघता नयनी
तरी धर्म लाजला स्वमनी
सत्कृत्यांनी नाम अपुले केले
अजरामर सतीने अपुले
जन्माचे सार्थ करुनी
आम्हास धडा घालोनी
जो दिला तो गिरवू आपण आता
या वीण आस ना चिता ।।

(श्रीमती दुर्गा भागवत यांच्या संग्रहातून)

# अहिल्या गीत

**प्राचार्य अनंत पोतदार**

## (साकी)

पुण्यश्लोका महन्मंगला दिगन्तविश्रुतकीर्ति
धन्य धन्य ती देवि अहिल्या मानवतेची मूर्ति
धन्य होळकर! धन्य मालवा! धन्य अहिल्या राणी
पौर जनांनो! सावध होउन परिसा दिव्य कहाणी

## (भूपति वैभव)

मल्हारपुत्रवधु खंडेराव प्रिया ती
जगिं अमर जाहलि होळकरांची कीर्ति
दिपवुनी विजेपरि गेलि अहिल्या राणी
आळवू आरती तिला गाऊनी गाणी!

## (चन्द्रकांत)

पहाट होता शेज सोडुनी स्नानादिक करुनी
प्रशासनाचे कार्य चालवी सांब शिवा स्मरूनी
राजाज्ञा धर्माज्ञा यांची संगति मधुर करी
गोब्राम्हणप्रतिपालक राणी जनगण हृदय हरी!

## (अभंग)

नर्मदेच्या तीरीं तीर्थ महेश्वर
सोनियांत झुले राज राजेश्वर
नाकी मासोळ्यांच्या सोनियाच्या नथा
नर्मदेस दिले कधीं न हो वृथा
कुळाचा खजीना अखण्ड उदण्ड
कृपाछत्रशिरीं मल्हारी मार्तण्ड

## (आर्या–गीति)

गगनीं अगणित तारे परि चन्द्राची कुणा न ये सर ती
तेवीं अन्य प्रशासन देवि अहिल्या पुढें स्वशिर लवती

### (साकी)

क्षमता ममता अन् तन्मयता राजकारणीं फार
शौर्य मावळे रिपुचे समरीं-घेती ते माघार

### (पादाकुलक)

मल्हारी मार्तण्ड विजयते-मल्हारी मार्तण्ड!
आसमन्तिं हा भरे निरन्तर एकच घोष प्रचण्ड!
शक्ति सिद्ध जय यश लाभाया अद्वितीय जो तरणोपाय
पांच अक्षरी मन्त्र आळवी नमः शिवाय ॐ नमः शिवाय!

### (अभंग)

गाई रसने तू । अहिल्या चरित
पावन जीवित । जये होई
गाई रसने तू । अहिल्या चरित
चैतन्याचे स्त्रोत । आदर्शाचे

### (जीवन लहरी)

गरिब घरी जन्म होय म्हणुनी का दीन कुणी?
गरिब घरी जन्म परी होय अहिल्या राणी
गरिबांचे हित साधुन झाली श्रीमन्त जगीं
कोटि कोटि जन करिती तीचा जयघोष जगीं

### (नृपममता)

अहिल्ये! शत शत वन्दन तुला!
गंगेवर यमुनेवर सुन्दर
स्थापुन घाट सकल तीर्थावर
अन्नछत्र स्थापुनिया प्रश्रय
गोर-गरीबा दिला - अहिल्ये शत शत वन्दन तुला!
करुनी निशिदिनि शिवसंकीर्तन
केलें अवघें जीवन पावन
पाषाणाच्या देवळातुनी
मानवतेचा देव दाविला - अहिल्ये शत शत वन्दन तुला!

धारातीर्थी जरि पति पडला
धीर तुझा ना लवही खचला
धर्म - राजकारण क्षमतेने
कार्यभार वाहिला - अहिल्ये शत शत वन्दन तुला!
थोरांची केली न अवज्ञा
शिरोधार्य श्वशुराची आज्ञा
वाट सतीची सोडुनिया तू
कल्याणास्तव लोकांच्या तू
कंटकपथ वरिला - अहिल्ये शत शत वन्दन तुला!
पतिपुत्राचा अन् कन्येचा
वियोग साहुनि आत्मजनांचा
दैवाचे आघात फिरविले
देव न परि सोडिला - अहिल्ये शत शत वन्दन तुला!
शक्ति युक्तियुत असते महिला
ती नच अबला परि उज्ज्वला
शत्रु तुझा लाजून परतला
इतिहासाचे पान उजळले
क्षात्रधर्म राखिला - अहिल्ये शत शत वन्दन तुला!
यत्न धैर्य अन् निश्चिय जेथें
विजयश्री यश सदैव तेथें
निज कर्तृत्वे दावियले तूं
सानथोर सकला - अहिल्ये शत शत वन्दन तुला!

## (नृपममता)

लाजुनि वाकवी मान देइ सन्मान तुला राघोबा
तूं थोर अशी जगदम्बा ।
पाहूनि वाकवी मान देइ सन्मान तुला गे, जनता
देवी तूं स्नेहल माता ।
पाहूनि वाकवी मान देइ सन्मान तुला विद्धान
देवी तूं प्रज्ञावान ।
वाहूनि अंजली तुला देवि निस्तुला धन्य तूं राणी
शिर अमुचे तुझिया चरणीं

### (अनुष्टुप्)

आनन्दकन्द तुझी गाथा देतसे शांति सर्वदा
आशीर्वाद कृपा देई जीवनी सुख सम्पदा

### (भूपति वैभव)

नृप नुरले, नुरली राजेशाही आतां
जाहली दिवंगत दिव्य अहिल्या माता
परि संचित पुण्य तियेचें उदया येई
आराध्य नर्मदा जीवन द्याया येई ।।

या मध्यप्रदेशीं महानगर हें पहिलें
इन्दूर मनोहर वैभवशाली डोले
देवीच्या पुण्य प्रतापें प्रासादांत
ती होळकरांची अखण्ड तेवत ज्योत ।।

हा भव्य जुना प्रासाद उभा थाटांत
नगराच्या मध्यें, हृदय जसें शरीरांत
प्रत्यक्ष बोलका तेजस्वी इतिहास
युगयुगें प्रेरणा स्त्रोत सकल लोकांस ।।

या प्रासादाच्या गवाक्षातुनी झाली
स्वातंत्र्य घोषणा बेचाळिसच्या सालीं
जन आकांक्षाचें प्रतीक हा प्रासाद
जन देवि अहिल्येचा करिती जयनाद ।।

हा असामान्य प्रासाद होइ सामान्य
परिवर्तन असलें जनता करी अमान्य
जनसागर खवळे, संघर्षाची ज्वाला
गत वैभव आणी फिरूनी तें उदयाला ।।

राष्ट्रास समर्पित होय भव्य प्रासाद
अन् जनता देई सादाला पडसाद
राष्ट्रध्वज फडके, फडके ध्वज देवीचा
हे पुण्य उदेले देवीचे - जनवाचा ।।

तेवते जोंवरी अखण्ड येथें ज्योत
जागते जोंवरी पुण्य देविचें येथ
'श्री विजय' तोंवरी सदैव सुलभ जनांस
कवि अनन्त शतदा वन्दन करि देवीस ।।

# कटाव महेश्वरचा

## अनंतफंदी

नर्मदातट निकट घाट, बहुत अफाट,
पायऱ्या दाट चिरेबंदी वाट, मुक्तीचीं शिवालयें ।।
कैलास साम्यता, नाना परिची रचना, रचली रामकृष्णमंदिरें ।।
बहुत सुंदरें बांधिली घरें रम्य रमणूक हवेल्या ।।
नयनीं पाहिल्या, नूतन घाट, प्रताप अहल्या, किल्ल्यावर तळवटी ।।
शहर गुलजार, बहुत बाजार, हजारों दुकानें ।।
लक्षापति सावकार, भारी भारी माल खजीना, रस्ता ।।
स्वस्ता सुकाळ, नाहीं दुष्काळ, बालवृद्ध प्रतिपाळ करीती ।।
गरिब गुरिब कंगाल, गांजले, अडले,
भिडले त्या देखोनियां अन्नछत्र ।।
सर्वत्र सारिखे, नाहीं पारखे पाहिलें नयनीं ।। महेश्वर क्षेत्रपूर ।।१।।
दान धर्म करी, नित्य शिवार्चन सत्त्वशील ऐकून धांवती देशोदेशींचे ।।
कर्नाटक, तैलंग, द्रविड, वऱ्हाड, कऱ्हाड, कोल्हापूर,
कृष्णातीर, गंगातीर, कोंकण, काशीकर ।।
गयावळ, माळवे, विरांगडे, येति कावडे, वेडे बागडे, गुजराथी, मैथुली,
पुरी भारती दिगंबर जटाधारी ।। बैरागी, योगी, कानफाडे
दर्शना येती हरिदासाचे प्रेमळ भक्त, सांप्रदाय पुष्कळ
पाहिले नयनीं सर्व ।। महेश्वर क्षेत्रपूर ।।२।।

•

# श्री देवी अहिल्याबाई

**रुक्मिणीतनय**

पूर्वी शांत सुशील एक रमणी, नामें अहिल्या सती,
गेली ठेवुन कीर्ति आज जगतीं, औदार्य गाजे अती।
होता मालव देश जो अधिप हा, त्याची स्नुषा साजिरी,
मल्हारीतनया प्रसाद हरिचा, ही सांपडे मंजिरी।।
न्यायीं निस्पृहता, सतेज दिसली, होती प्रजापालक,
भूतीं प्रेमदया, दिसे निशिदिनीं अन्याय विध्वंसक।
गेला नाथ, रणांत देह पडला, मागें स्मृती बालकें,
दैवाचा इतिहास जो प्रखर हा, सांगू कसा कौतुकें।।
ईशाला स्मरुनी, स्वकार्य अपुलें, ती राज्यदीक्षा करीं,
घेवोनी कुलवैभवा, निजबळें, जी वाढवी सत्वरीं।
झाला भर्तार-पिता प्रसन्न वदला ''खंडूच हा राहिला'',
''गेली ती अहिल्या, निघून पुढती मार्तंड भेटे तिला''।।
राज्याचा सगळा, कसा शकट ती, बोधप्रदा चालवी,
कोठें न्यून नसें, जुनाट तरुला, देवोनियां पालवी।
होते दुर्जन राज्यनाशक पुरे, काढी कसे नेमके,
तैसे सज्जन कोण आश्रित तिला होते खरे ठाउके।।
गेला दीर्घ निघोनि काल जरि तो, झाली चुकी मागुती,
आतां ही स्मृतिची, पुन्हा न विभुनें, द्यावी अम्हां दुर्मती।
ऐसी सद्‌गुण मूर्तिमंत पुतळी, दिव्यप्रभा ही ठरो,
होवो भारतसुंदरी, प्रभुवरें सर्वत्र कीर्ति वरो।।

•

# अहिल्या पुण्य-प्रताप

## पद (मांड केरवा)

### सी. के. देव

सति पुण्यप्रताप महान वानाया शिणली वाणी।।
संसाराची सतिच्या जेव्हा विधी करी धुळधाणी ।
तेव्हां बनूनी विश्वकुटुंबिनि, विधिला टोला हाणी।।
स्वर्गीची यशगंगा भगिरथी जरी हिमाचलि आणी,
तुझ्या यशाच्या कावडिविण कां, ती रामेश्वर न्हाणी।।
निर्मि अन्न-जल विश्वंभर परि जीव फिरती दीनवाणी ।
त्यांना विजनी, दाणा-पाणी घाली तुझाच पाणि।।
धारातीर्थी असिधाराव्रत केले शिव-बाजींनी।
तुझ्या वाहती सुकृत धारा, तीर्थातीर्थांमधुनि।।
स्वधर्ममंदिर रचिता खपले धीर-वीर-अभिमानी।
तुझी मंदिरे उभी दिगंतीं परमार्थाची ठाणी।।
'वैराग्याने पौरुष करणे', ऐसें ब्रीद लिहूनी।
परमार्थाची पुण्य पताका गेली स्वर्गि घेऊनी।।
अशी गुणांची खाणी म्हणुनी विश्व तिला वाखाणी।
होळकरांची राणी अहिल्या ब्रम्हांडास शिराणी।।

•

# देवी अहिल्या स्तवन

**श्रीमती गंगूताई महाजनी, कुरुंदवाड**

प्रथमारंभी भावें नमिला श्री मंगल मूर्ति ।।
देवीचें मज चरित्र गाया द्यावी अंतःस्फूर्ति ।।१।।
साध्वी अहिल्या देवीवर-तें-काय करावें काव्य? ।।
अल्पमती मी अबला, सतिचें चरित्र सुंदर दिव्य! ।।२।।
तरी यथामती त्यांचे उज्वल आचरणा आजि गावें ।।
कृपा प्रसादें करुनि तयांच्या कलमल सर्व धुवावें ।।३।।
स्नान, दान, जप, पूजा, करुनी राज्य शकट चालविला ।।
औदार्यानें दिपवुनि जनता भरतखंड लाजविला ।।४।।
काशी रामेश्वरादि यात्रा अनेक वेळां केल्या ।।
देवालये ही विविध बांधुनि कायम सनदा दिल्या ।।५।।
अन्न छत्र वा कोठे विहिरी अनंत धर्मशाला केल्या ।।
परंतु त्यांच्या चातुर्यानें नामशेष नच झाल्या ।।६।।
जागो जागी घाट बांधिले जीर्णोद्धारहि केले ।।
परि प्रजेचे कोण्या रीती एक न अनहित केले ।।७।।
धर्मासाठी सदा सर्वदा तत्परताच मनाला ।।
त्याच्या योगे राज्य-श्रीचा पाया बळकट झाला ।।८।।
संसारांतील कटु अनुभव ही अनेक वेळां आलें ।।
दुर्धर वैधव्यातें साहुनि श्रेष्ठ धैर्य ही धरलें ।।९।।
स्त्री-जाति-तारुण्य हि वैभव विपुलच जवळीं असतां ।।
पातिव्रत्या सांभाळुनिया केली जन्म सार्थकता ।।१०।।
साधी राहणी मधूर वाणी वत्सलता ही फार ।।
दीन गरिब दुबळ्यांना त्यांचा आधार वारंवार ।।११।।
न्याय-निष्ठूर वर्तणूक त्यांची वचक प्रजेला भारी ।।
परंतु प्रेमा तसाच केला प्रजा तुष्टली सारी ।।१२।।
सुशील सद्गुणी राजकारणी धन्य प्रजेला माता ।।
हा आदर्श पुढेहि ठेवूनी भगिनी घेवोत् कित्ता ।।१३।।
ऐसी अनेक राजकारणें दक्षपणानें केली ।।
राघोबांची चातुर्यानें मात्रा चालू न दिली ।।१४।।

किती वर्णावे गुण देवीचे अवतारिक ती मूर्ति ।।
म्हणोनि ऐसी रत्ने भूवरि धन्यवाद मिळवीती ।।१५।।
अद्यापीही यशोदुंदुभी राज्यासनी विराजें ।।
त्यांच्या सद्वंशी हे ऐसे उत्तम होतिल राजे ।।१६।।
खंडेराव हे दैवत त्यांचे दिर्घायु करो त्यांना ।।
पुत्र-पौत्र आणि विद्या, नीति, वैभव लाभो यांना ।।१७।।
''देह त्यागिता कीर्ति उरावी'' ऐसी समर्थ उक्ति ।।
त्या पंथानें जाउनि आपुली केली चिंरतन कीर्ति ।।१८।।
देवी अहिल्ये मातें लागी नमन असो तव चरणीं ।।
वेडी वाकडी अर्पण केली मोत्याची ही स्मरणीं ।।१९।।

•

# अहिल्या स्तवन

## गिरिजासुत

(चाल : स्वातंत्र्याची शीतळ छाया)

भारतिं कलि युगिं रत्न चमकलें।
अहिल्या इंद्रपुरीला।।
वदनों वदनीं सुहास्य विलसें।
हर्ष हा जगाला झाला।।धृ.।।

**चाल :**सति मूर्ति पुण्य तेजाची।
तैशीच आर्य धर्माची।।
फाकली प्रभा सु-गुणाची।
निज चातुर्ये अरि फिरवोनी।।
पावली जगीं भूषणाला।।१।।

**चाल :**दत्त दत्त स्मरा भूतें पळतीं।
वेताळ स्मरे मारोती।।
आस्तिकें सर्प पळताती।
दत्तमारुती आस्तिक राणा।।
तशि हे अहिल्या सकलां।
अनुभव देउन सत्यपालनी देई इच्छेला।।२।।

**चाल:** रजपूत घालिती द्वाही।
राणाजिची चोरी पाही।।
सत्यत्व पालना साठीं।
घालिती अहिल्या द्वाहीला।
ऐकिलें मी घाटीं तिजला।।३।।

**चाल :**विश्वास प्रजा धरि सतिचा।
वदतसे अजून जन वाचा।।
देईल शेर ती अमुचा।
निश्चये असा जो बसला।।
लाभ तो तसा त्या दिला।।४।।

**चाल :**सति धन्य अहिल्या देवी।।
सौख्यांमृत भरलें नांवी।
मार्ग ती सुलभची दावी।।
सामर्थ्य येवढें सतिला।
गिरिजासुताही अहिल्या स्तवनी गुंगति चित्ताला।।५।।

•

# नमस्कार त्या श्री अहिल्या सतीला

**अहिल्या भक्त**

गेलां जरी काशी रामेश्वराला।
कीं द्वारकेला तसे वा पुरीला।
ऐकाल तेथें जिच्या दानलीला।
नमस्कार त्या श्री अहिल्या सतीला।।

नसे भारती तीर्थ वा क्षेत्र ऐसें।
जिथें ना तिचें एकही कृत्य दीसे।।
जनी जन्मुनी जे करी देवलीला।
नमस्कार त्या श्री अहिल्या सतीला।।

भुकेला कुणीही पुरीं राहिला न।
असे ऐकुनी जी स्वये घेइ अन्न।।
जगीं बोलती सर्वही धन्य जीला।
नमस्कार त्या श्री अहिल्या सतीला।।

प्रजेच्या समाधानी जे शक्ति राही।
असंख्या बळाने तशीं येत नाहीं।।
म्हणूनी प्रजारंजनीं रंगलीला।
नमस्कार त्या श्री अहिल्या सतीला।।

असंख्यात ते जन्मले आणि मेले।
परी जन्म साफल्य कोणी न केलें।
स्वये उद्धरोनि कुलोद्धार केला।
नमस्कार त्या श्री अहिल्या सतीला।।

•

# अहिल्या गीत

**तारा करंडे**

(**चाल** : जाऊ कामाला)

वंदू अहिल्येला-चला गें जोडूनि कर कमला
शिंदे नामक उच्च कुलामधिं घेऊनि जन्माला
निज पावित्र्यें निज तेजानें दिपविलें सकला
पाहूनि बाला मल्हारी तें मोद मनीं झाला
खंडेरावा राजी ठरवुनि करीत स्नुषा तिजला
काहिं नुलटतां काळ सुखांचा वाटे प्रभु रुसला
टोंक लागूनिं मुकली बाला अपुल्या प्रेमाला
पति पावला पतन रणांगणीं श्वशूर स्वर्गी गेला
मालवंश कुल ज्योति निमालीं घोर तिमिर झाला
डगली परी नच सूत्रें घेऊनि राज्य शकट हाकला
''राज्य धुरंधर'' गेली साध्वी घेऊनि मानाला
अजरामर तें होळकराच्या केलें नावाला
मल्हारीच्या नरसिंव्हाच्या विजयी भाल्याला
देवो देवि आशिर्वाद ती अमुच्या भूपाला
दिर्घायु तो होऊनि लाभों संतति, सुख, कमला

•

# मातोश्रींच्या मनी

## गोविंद काळे

मातोश्रींच्या मनी। नेहमी विचार।
शेतीत सुधार। करण्याचा ।।

ओसाड जमिनी। आणि माळराने।
कष्टांनी आणणे। लागवडी ।।

सवय लागावी। कष्ट करण्याची।
केली कायद्यांची। तरतूद ।।

उत्पन्न लोभाने। कसावी जमीन।
नवीन कानून। चालू केला ।।

गोरगरिबांस। कष्टाळू लोकांस।
द्यावी कसण्यास। माळराने ।।

रीतसर नावे। जमिनी कराव्या।
लोकांना वाटाव्या। मालकीच्या ।।

आधी लागवड। त्या फळझाडांची।
सोय उत्पन्नाची। करण्यास ।।

नऊ त्या झाडांचे। पैसे मालकाचे।
जमा अकराचे। दौलतीत ।।

वाढविले कष्ट। पाऊसही खूप।
तरी नाही धूप। जमिनीची ।।

शेतीसाठी असा। काढला कायदा।
तिहेरी फायदा। पाहोनिया ।।

प्रजेसाठी सोई। करीत असता।
असे कल्पकता। त्यांचे मनी ।।

जाम घाटामध्ये। भीती वाटे फार।
चाले लूटमार। प्रवाशांची ।।

भीती ना वाटावी। कुणी ना लुटावे।
संरक्षण हवे। प्रवाशांना ।।

म्हणोनी नेमले। लोक सोबतीस।
करता प्रवास। घाटातुनी।।
हातझुलाई तो। बसविला कर।
देण्यास पगार। नोकरांचा।।
जामघाटामध्ये। दरवाजा केला।
त्यावर बांधला। शामियाना।।
शामियान्यातून। पाहती निसर्ग।
भासे तव स्वर्ग। जाम घाट।।
त्या दरवाज्याच्या। लगत बांधिला।
तलाव पाण्याला। पिण्यासाठी।।
वाटेल सर्वांना। पर्यटन स्थळ।
असा ताळमेळ। मातोश्रींचा।।
जमल्या करात। बांधकामे सर्व।
कल्पकता पर्व। मातोश्रींचे।।

('अहिल्या गाथा' मधून)

•

# मी सून सुभेदारांची

## शाहीर भास्करबुवा निरगुडकर

मी सून सुभेदारांची ।।धृ।।
तो काल यवन जातीचा अति जाचक हिंद देशाला ।।
अबलांचे हाल बहु होती, ह्या पुज्य भरत भूमीला ।।
कैलास निवासी शिवबा शिवनेरी जीजामातेला ।।
होवोनि पुत्र त्या सतिचा, जो रक्षी सकल प्रजेला ।।

**चाल ।।** यावनी बहुत निववीले, परि देव मतीकुल आपुले ।।
शिवबाचे आयू सरले ।।
रोविली मेढ वीरांची ।। मी सून सुभेदारांची ।।

पेशवे प्रांत दक्षिणते, शिवबाचे ओनामा ।।
गिरवूनी वीर रणधीर, मावळे मराठी माला ।।

चमकवी चहू भागाला, भूगोल आपुला केला ।।
ते भोसले शिंदे पवार, होलकर चहू बाजूला ।।

**चाल ।।** बसवीले चहू भागाला, तो प्रांत दक्षिण आपुला ।।
धन धान्यें भूषित केला ।।
दे साक्ष हिंद धर्माची ।। मी सून सुभेदारांची ।।

हा मालव प्रांत तयांचा, जे शूरवीर रणधीर ।।
त्या माहिष्मति होतें, रक्षणीं दक्ष सरदार ।।

तो छावा होळकरांचा, ऐकून शत्रु होणार ।।
जरि अश्व न पाणी पीती, बोलती शब्द अनिवार ।।

**चाल ।।** का जिवनि तुम्हां मलहारी, हे त्रास नेत्रीं भारी ।।
बोलूनि अश्व पुचकारी ।।
ही कृती शूर वीरांची ।। मी सून सुभेदारांची ।।

तो काळ पेशवाईचा, राघोजि भाज्यां भारी ।।
घे द्रव्य रसद मीषानें, तो संघ चमूचा भारी ।।

फिरतांना राघोबाची, ये मालव माती स्वारी ।।
होळकर वीर वंशाची, ती स्नूषा सत्ता धारी ।।

**चाल ॥** जाणुनी मनीं ती अबला, मागणी करी द्रव्याला ॥
दावितो वीर वृत्तीला ॥
परि मीन मनो ती साची ॥ मी सून सुभेदारांची ॥

सदरेशी राघोबांचा, ये निरोप तो निकराचा ॥
जरि द्रव्य न आम्हा देशी, करू मारा अति निकरांचा ॥
लोळवीन पृभी त्वरीत करू सडा रूधिर मांसांचा ॥
चमकवीत असिच्या धारा ॥ परि दाम न घे माघारा ॥

**चाल ॥** ऐकणे आमूचे सारे, हितकर तो ऐसे वदला ॥
करि सज्ज निज सेवेला ॥
दावितो धडाडी साची ॥ मी सून सुभेदारांची ॥

पाठवी निरोप राघोबा, सवें देई मूठ दारूला ॥
जर नीटपणे तूं आपुल्या हाल चाल निज सैन्याला ॥

घरि जावे घेऊन, ही आण असें तुम्हाला ॥
ऐकतां न ऐशा बोला पावाल भूं धाणीला ॥

**चाल ॥** मम सैन्य असे अबलांचे ते विजई होईल साचें ॥
तुम्ही व्हाल काळे तोंडाचें ॥
पटवीन साक्ष वीराची ॥ मी सून सुभेदारांची ॥

मी द्रव्य समर्पण केले त्या शिव प्रभू चरणाला ॥
बिबव मंजिरी सह त्यांसी, अर्पिन घेणाराला ॥
शिव निर्माल्य तुम्हाला, आवडेल जरी घेणाराला ॥
तुम्हि ब्राह्मण मी क्षत्रीं त्वरें यावें दान घेण्याला ॥

**चाल ॥** जरि मान्य असें तुम्हाला त्वरें यावें दान घेण्याला ॥
हा निश्चय माझा कथिला ॥
ही कृती असे पुण्याची ॥ मी सून सुभेदारांची ॥
मी स्नूषा वीर पुरूषांची ॥ अंगना असे वीरांची ॥
मी अभिमानी धर्माची ॥ मी भगीनी असे वीरांची ॥
मज आवड मनिं वीरांची, दावीन वृत्ती वीरांची ॥
वीरांची कन्यका आहे। वीरत्व दावीत साची ॥

**चाल ॥** समरात चकमक करतां, ये कातीन तुमचे हातां ॥
चित्तांत विक्षपकर्ता ॥
जा धरा वाट पुण्याची ॥ मी सून सुभेदारांची ॥

ऐकता निरोपा ऐशा राघोबा चकीत झाला।।
निज चमू सह (पेशाने) माघार घेता झाला।।
बसवीला वचक वीराला, वीरत्वे भारथ महिंऽला।।
अबला न रणरागिणी, भीववींले महायोध्याला।।

**चाल।।** ही कृती अतां आरळेची, शूर मर्द अहिल्येची।।
ही वृत्ती क्षात्र धर्माची।।
भास्करा सम तेजीची।। मी सून सुभेदारांची।।

•

# विजयोऽस्तुते

## काव्यशेखर

विद्यामंडित, राजकारणपटु, सर्वांमध्यें जाणती
गंगेच्या सम शुद्ध श्रेष्ठ महिला या भारतीं कोणती?
केला प्रश्न मला कुतूहलपणें एकें प्रसंगी कुणी
तेव्हां मी हरखुनिया तुजकडे दाखविली तर्जनी!
आहे होळकरामधें बहुपरी दातृत्व कर्णासम
ऐसा लौकिक देवि! तूं स्वकृतिनें गाजविला उत्तम
प्रेमें पाळुनिया प्रजा सुखविली तूं आमुची माउली
होती शीतल रम्य सौख्यद तुझी राष्ट्रांवरी सावली!
हंसाला प्रिय काय? काय विधिने निर्माण केले असे?
नंद स्त्री वद कोण? काय करुनी वेडा तुका होतसे?
पुण्यालंकृत कोणता ऋतु बहू मोहुनिया टाकितो?
सर्वांच्या प्रथमाक्षरांत सतिचे मांगल्य मी इच्छितों!
पुण्यश्लोक मला अतीव दिसते राज्ञी अहिल्या गुणी
आहे यास्तव दंग मी निशिदिनीं चारित्र्य पारायणीं!

•

# श्रीमंत इंदूर राजघराण्याचा संक्षिप्त इतिहासिक पोवाडा

**शाहीर रामचंद्र नरहर माळी**

श्रीमन्महाराणी अहिल्याबाई। धर्मदेवता ही अवतरली महीं।
जणो द्रौपदी मंदोदरी तारा।। कीर्ति जणू चमके अढळ तारा।।
झाली होळकर वंशोद्धारा।।धृ.।।

किती अगम्य ईश्वरी करणीं। असे ही धरणी।
रत्नाची खाणी। धन्य ईश्वरी खेळ सारा।।
साक्ष पटवितो ऐकणारा। होळकर इतिहास अवधारा।
इतिहास होळकर घराण्याचा। मूळ पुरुषाचा।।
मोठा महत्त्वाचा। अवर्णीय मनोरम सारा।
म्हणुनि थोडा इतिहास श्रवण करा। द्यावें क्षणभरि लक्ष जरा।।

पहिलें नांव होतें वीरकर। मूळ राहणार।
ठिकाण सुंदर। भगवान् श्रीकृष्णाची मथुरा।।
कृष्णदेवाचा ज्यास आसरा। भाग्यवान् तोचि जगांत खरा।।

औरंगाबादी कांहीं दिवस। करुनिया वास।
आले मग खास। नजीक निरा फलटण परगणा जिल्हा सातारा।
होळ नामें खेडें अवधारा।।

होळ नांवाच्या खेड्यांत राहिले। होळकर झाले। नांव हें पडलें।।
असूनि खेडें आलें उजगारा। चंद्र रविप्रकाश तितवरा।
गातही राहील कीर्ति धरा।।

**(पद – भूपति खरें ते)**

मूळ पुरुष खंडुजी होळ गांवीं चौगुले।।
सुप्रसिद्ध पोटीं मल्हारराव जाहले।।
मल्हारी बाळ असतांच खंडुजी गेले।।
मग मातुल गृहीं निजमातेसह ते आले।।
ते मामा तलौदे गांवीं जमीनदार असले।।
मल्हारी बापुडे आश्रयार्थ राहिले।।
त्या शेळ्या मेंढ्या राखाया सांगितलें ।।
हें मल्हारीच्या काम नशीबीं आलें।।

रोज सकाळीं उठुनि रानीं जावें ।।
त्या शेळ्या मेंढ्या राखित रानीं फिरावें ।। *चाल* ।।
असें असता नवल एकदिनीं वर्तलें ।
भर दोनप्रहरी उन्ह भारी तापले ।।
रानांत बाळ मल्हारी त्या वेळे ।।
चारुनिया शेळ्या मेंढ्या भागले ।।
धरणीची शेज करुनिया पहुडले ।।
झाडा-खालीं गाढ झोपोनि राहिले ।। *चाल* ।।
तों प्रखर रविकिरण बाल मुखावरि पडले ।।
भगवान् शेष तत्काळ धांवुनि आले ।।

**(चाल – चंद्रकांत)**
मल्हारी बाळावरती छाया शेषानें धरली ।।
विजेप्रमाणें नवल बातमी चोहोंकडे गेली ।।
भाग्यवान मग अभाग्याची नोकरी ती गेली ।।
सरदार कदम बांड्यांच्या पदरी नेमणुक झाली ।।
शेळ्या मेंढ्या चारणारा मल्हारी बनला ।।
शूरवीर समशेर बहादुर रणगाजी झाला ।।
मेंढपाळ म्हणुनी मल्हारी मातुल गृहीं राही ।।
तो मल्हारी त्या मामाचा जावई होई ।।
साध्वी गौतमाबाई आणि मल्हारी वीर ।।
लक्ष्मीनारायण सम जोडा या धरणीवर ।।

**(चाल – जी.जी)**
निजाममुल्कावरी बांड्यांनीं स्वारी केली ।।
त्यांत मल्हाररावांनीं तरवार बहुत गाजविली ।।
निजाममुल्काच्या सरदाराची मान छाटुनि सोडली ।।
लढण्याची शर्त अशी मल्हाररावांनीं केली ।।
नरवीर मल्हाररावाची कीर्ति पसरली ।।
पहिल्या बाजीराव पेशव्यांच्या कानावर गेली ।।
पांचशें घोडेस्वारांची सेनानायकी दिली ।।
सरदार कदम बांड्यांशीं रामरामी केली ।।

लाल सफेत तिकोनी निशाण आपुली केली।।
बांड्याची आठवण म्हणूनि ध्वजा ठरवीली।।

**(पद – प्रभु एक जगती त्राता)**

जे वीर मराठीशाहींत। मल्हारराव वीर एक त्यांत।।
सन सत्राशें अठ्ठाविसांत। बारा महाल मिळाले माळव्यांत।।
सन सत्राशें एकतिसांत। पुन्हा सत्तर मिळाले माळव्यांत।।
फौजेच्या खर्च वेतनार्थ। इंदूर परगणा मिळत।।
मल्हारावांना सुभेदार म्हणत। काका साहेब असेहि बोलत।। *चाल* ।।
बहुत पराक्रमी दिलदार उदार गुण–ग्राही वीर।
सात्त्विक लोकप्रिय फार।। *चाल पहिली*।।
झाला न पुढें होणार। जातिवंत असा सरदार।।

**।। मिळवणी ।।**

मल्हारराव मुळपुरुष होळकर वंश। आणिला उदयास।
कथाही त्याची दैवचित्रा।। आशीर्वाद त्यांच्या पुत्रपौत्रा।
मागुनि मग धरितो कथासूत्रा।।
अहिल्याबाईच्या आईबापांना। अहिल्याबाई । जाणा।
प्यारसम प्राणा। देणगी असे ईश्वराची।।
करवीरच्या महालक्ष्मीची।। हकिगत मोठी गमतीची।।
अहिल्याबाईचा माणकोजी (आनंदराव) पिता पत्निसमवेता। संतानाकरिता।।
वाट धरी थेट कोल्हापुरची।।
सेवाकरी नित्य जगदंबेची। कृपा होई श्रीमहालक्ष्मीची।।
अशा देवीचें नांव ऐकण्यास। उत्सुकता खास।
तुम्हा सर्वांस। सहजीं सहज व्हावयाची।।
अहिल्याबाई नांवाची। करा तर घाई गर्जनेची।।
अहिल्याबाई राणीकी जय। बोला हा समय।
टाळी द्या लय। लावूनि मूर्ति घ्यावी तिची।।
जणुं ते राम अवतारीची।। अहिल्या होळकर वंशाची।।

**(पद – श्रीमंत पतीची)**

त्या एकनिष्ठ सेवेनें, आंबा सुप्रसन्न झाली ।।धृ.।।
दृष्टांतीं दिले वरदाना। जा व्हालची सुभाग्यशाली ।।
परतुनी येते स्वग्रामीं। दिवस गतीनें शुभकालीं ।। चाल ।।
लाभलें सुकन्यारत्न। आनंदें भरलें गगन।
जनक जननी झाली धन्य ।। *चाल* ।।
तें बाळपणीचें कोड। पुरवीती जोड। नसे बिनतोड।
कोर चंद्राची वाढली जणु। सुखशाली ।।धृ.।।

**(पद – सबसे राम)**

आशा या बालपणींच्या कालीं, ऐका नवल वर्तलें एक ।।धृ.।।
मल्हाररावाचा पुत्र खंडेराव याची छावणी थोर।
आनंदरावाच्या गांवापाशीं पडली योगायोग ।। ऐका ।।
अहिल्याबाईचा लहानपणींचा शिक्षक छावणीच्या।
आसपास असताना खेळत आली अहिल्या बाळ ।। ऐका ।।
रमणीय सुंदर रुप मनोहर पाहुनी खंडेराव, अहा काय हें
स्वरुप, वदला स्वमनीं झाला थक्क ।। ऐका ।।
कोण कुणाची करी चौकशी खंडेराव तदा।
सर्व माहिती देता झाला त्यासि तो शिक्षक ।। ऐका ।।
मल्हारराव महाराज छावणींत होते त्या समयीं।
सहज कानीं हें पडे तयांच्या जन्मवृत्त निष्कलंक ।। ऐका ।।
क्षणीं घेतलें बोलावूनि माणकोजीरावाला।
त्याच छावणींत पाथरडीच्या साखरपुड्याचा झोंक ।। ऐका ।।
पुण्यास झाला मोठ्या थाटाचा लग्नसमारंभ।
शाहू छत्रपति साताऱ्याहूनि आले लग्नाला थेट ।। ऐका ।।
छत्रपतींनीं अंकावरती वधुवर घेवोनि।
गोड शर्करा मुखीं घालुनि पाही वधुवरमुख ।। ऐका ।।
अहिल्याबाई नांव ठेवी छत्रपति शाहु।
तोष पावले समारंभी त्या दोनीही राव रंक ।। ऐका ।।
उगीच वर्णन करा कशाला करुं तितके थोडें।
अपूर्व झाला विवाह त्यांचा किती वर्णावा थाट ।। ऐका ।।

**(पद – ठार करी)**

महाराज्ञी अहिल्या ती। महाराज खंडेराव नृपती।।
शुद्ध सात्त्विक प्रेमानें। सुखानें राज्य ते करिती।।
पुत्रकन्या लाभ होई। आनंदाला सीमा नाहीं।।
नामें युवराज मालेराव। मुक्ता युवराज्ञीचें हें नांव।।
आनंदाचा असा हा काल। द्रिष्ट लागे जळो तो काळ।।

**।। मिळवणी ।।**

कुंभेरीच्या किल्याच्या हल्यांत। खंडेराव तींत।
पावले धारातीर्थ।। राही मागें मालेराव मोहरा।
नऊ महिने राज्यकारभारा।। करुनिया गेले काळ धरा।।
अहिल्याबाई महाराणीवर। दुःखाचे डोंगर। परंतु धीर।
प्रसंगी मुळीं नाहीं सोडला। आर्य स्त्रीचा बाणा राखिला।
म्हणूनि नांव गाजतसें आजला।।
आर्यभूमींत धैर्याची पुतळी। अहिल्या जन्मली।
धन्य फार झाली। अभिमान यास्तव आर्याला।
वाटणें साहजिक सकलाला। लहानापासून थोराला।।
राजकारणी पुरुष म्हणविणारे। त्यांनाहि डोलविणारे अशा चातुरें।
राज्य करी अशी हीच महिला।।
इतिहास देतो साक्षीला। सावध व्हावें ऐकायाला।।
महाराणी अहिल्याबाई,। पुत्र पति नाहीं।
एक ती बाई, होळकर राज्य चालविण्याला।
अशा या नाजुक समयाला। एक डोकावी डोमकावळा।।
गंगाधर यशवंत नांवाचा। दिवाण मल्हारावाचा।
कावेबाज साचा। लागला डाव साधायाला।
ओळखले नाहीं त्यानें महाराणीला। साधारण वाटे स्त्री त्याला।।

**(पद – मजा देते)**

तो गंगाधर यशवंत, राणीस बोले परिसा।।धृ.।।
की सेवक मी तुमचा मल्हाररावापासुनिचा।
मी तुमच्या अन्नाचा। लेकरु मी तुमचा जैसा।। तो।।

महाराज मालेराव। ते करुनि गेले नांव।
ते दुर्दैवानें डाव। साधिला तरी हा कैंसा।। तो।।
स्त्री गादीवरती। करी काय अबला ती।
शत्रुची भीती। अबलेस राही सहसा।। तो।।
कुणी पुरुष गादीवरी। लढवया कोणी तरी।
जो नांव होळकरी। राखील नर केसरीसा।। तो।।

**(पद – म्हातारा इतुका)**

गोड गोड वचनास। बोले स्वार्थ साधायास।।धृ.।।
निरुपायास्तव मांडीवरती दत्तक तुम्ही कोणास।
असाल जरी घेणार। घ्या तरी घ्या कोणी पुत्रास।। बोले।।
शूरवीर समशेर बहादूर। सुपुत्र असा खास कीर्ति होळकर
वंशाची ती वाढवील ही खास।। बोले।।
हात जोडुनी पाया पडुनि विनवी महाराणीस मान्य करा
घ्या अनुभव एवढा। धरा मनीं विश्वास।। बोले।।
बाई माणुस भोळी भाळेल सहज गोड बोलास।
दिवाण लागे मनांतिल हे मांडेहि चुरायास।। बोले।।

**।। मिळवणी।।**

राणी अहिल्यादेवी होती पक्की। दिवाणजीची मक्की।
ओळखली नक्की। उडविले दिवाणजीचे बारा।
दिवाण धरी डाव मनांत पुरा। म्हणे सुड घेईन तरिच खरा।।
गंगाधर दिवाण फार चिडला। मनी धडपडला।
सूड घ्याया सजला। गाठले त्याने। राघोबादादाला हकिकत।
विदित केली त्याला। म्हणे यश जोडुनि द्या मजला।।
अहिल्याबाई असुनि एक अबला। गर्व तीस झाला।
किंमत नाहीं तिला। पुरुषजातीचा ताळ सोडला।
स्त्रीनें अपमानावें पुरुषाला। माझ्या आंगाचा भडका झाला।।
मी पुरुष तुम्हीही पुरुष। अभिमान विशेष। आणा ध्यानास।
आणावी शरण अहिल्याबाईला। दाखवा पुरुष पराक्रमाला।
कशाही तरी बायका अबला।।

कुणी आपल्या घराण्यातील। दत्तक ती घेईल। असे जरी कराल।
तरी बडी रकम नजर तुम्हाला।। देईन हें खास आणावें ध्यानाला।
करा काम धरा अभिमानाला।।

तुम्ही शूरवीर सरदार। फार महाशूर। तुमची समशेर।
गाजते आज अखिल महीला। दाखवा चमक अहिल्याबाईला।
गाजवा पराक्रम आपुला।।

**(पद – गजरा वेचनवाली)**

बडी खराब लालुच पैसे की। बडी भूल पडी राघोबाको।
कहे फिकीर नही करने की।। बडी।।
ऐसें करुंगा वैसे करुंगा। क्या बात अहिल्याबाई की।। बडी।।
जवान मर्द हम राघोबा हूं। चमक दिखवाइंगे समशेर की।। बडी।।

**(पद – दिलदार)**

तो राघोबा मग निरोप राणीस धाडीत तातडीनें।
श्रवण करुनि मम वचन करी मनन वचनोल्लंघन।
करीन अकारण। जाण सुचतुरपणें।।धृ।।

**।। श्लोक ।।**

जरी घेणें असले दत्तक कुणी मांडीवरती। आमची अनुमती।
परी गंगाधर यशवंत कुलीचाच घ्या कुणी तरी।
नच बरें ना तरी।। *चाल*।।
नच तरी। झडकरी। सत्यास्तव करी। उचितची समरीं।
खड्गची झणीं घेणें।।

**।। मिळवणी ।।**

अहिल्याबाईला पोचला संदेश। राणी मनीं हांस।
म्हणे काय पुरुष न्यारा। स्त्रीवरी हत्यार चालविणारा।
लांच्छन ब्राम्हण वंशवीरा। हाच काय पुरुषपणा सारा।।
अहिल्याबाईला निरोप पोंचला। उलट धाडिला।
खोंचदार भला। शाबास त्या अहिल्या देवीराणीची।
ऐका ती बाणी उत्तराची। पुरुषांनी मुख्य ऐकण्याची।।

घ्याया दत्तक माझी मी मुखत्यार।
मला शिकविणार नको कुणी थोर। सून मी मल्हाररावांची।
पत्नी मी वीर खंडेरावांची। अहिल्याबाई नांवाची।।

नव्हे बाई मी भटाभिक्षुकाची। किंवा अशा तशाची।
क्षत्रियवंशाची। आहे मज ओळख समराची।
भीति मुळीं नसे मजसी त्याची। बाणीदार वाणी आर्य स्त्रीची।।

पराक्रम पुरुषांनाच काही। देवानें दिला नाहीं।
स्त्रीच्या आंगींही। स्फूर्ती ती वसे पराक्रमाची।
येतांच ती वेळ परीक्षेची। किंमत नाहीं मग पुरुषाची।।

आतां ऐका आणखी एक। जबाब रोखठोक। घालू नका धाक।
विकतच्या श्राद्धतर्पणाची। सव्य अपसव्य करायाची।
कारण नाहीं तसदी घ्यावयाची।।

पुरुषानें स्त्रीस जिंकिलें। नवल काय झालें। असें जन बोले।
परी स्त्रीकडून पुरुषाची।  वेळ जर येई पराजयाची।
तरी मग लाज दाढीमिशीची।।

**(पद – तरुण कुलीन)**

निरोप ऐकियेला राणीचा।।
राघोबा दादा पुरुष परि तो मनीं चरकुनि गेला।।धृ।।

परि सर्व सिद्धता युद्धाची ती करी। राणीही जाया सिद्ध होई समरीं।
परि युद्धाची ती वेळ न आली खरी। माधवराव पहिला पेशवा।
निरोप धाडी राघोबाला न करी युद्धाला।।

**(पद सोनारुपा)**

देवी अहिल्या राणी होळकर अशा प्रकारें राज्य करी।।
राज्य कारभारास्तव केली राजधानी ती महेश्वरीं।।

लहान गांव होतें जें इंदूर थोर केली इंदूरनगरी।
नेमी तुकोजीराव होळकर सेनापति ती निजपदरीं।।

राज्य करी राणी निष्कंटकें गाती शत्रूही कीर्तिसरी।
भूतो न भविष्यति अशापरी धर्मराजसे राज्य करी।।

**(चाल)**

महाराणीची दिनचर्या। सकलासी ती श्रवणीया।।धृ।।
घटी दोन रात्र असतांना। करी उठोनि प्रातःस्नाना।
जपजाप्या पूजा करुनि। बसे पुराण श्रवण कराया।।
करी दानधर्म गरिबांना। तें अन्नदान क्षुधितांना।
मग भोजना करुनिया। विश्रांति जाई घ्याया।।
दोन प्रहरीं दोनपासुनी। ती असे राजकीय कामीं।
सहा होतां सायंकाळीं । मग करी नित्यविधि कार्या।।
पूजापाठ भोजना करुनि। दरबारीं पुन्हा येऊनी।
रात्रीचे अकरापर्यंत। ती करीत राज्यकार्या।। महाराणीची।।

**।। मिळवणी ।।**

अहिल्याबाई दयाधर्माची। न्यायनीतिची। शुद्ध पवित्राची।
मूर्ती कीर्तिचा डंका सारा त्रिखंडीं त्रिकाल गर्जे पुरा।
धन्य हा स्वदेश होई खरा।।
अहिल्याबाईनें तीर्थयात्रा केल्या। धर्मशाळा बांधिल्या।
विहिरी खोदविल्या। अडचण जाणुनि यात्रेकरुची।
सोय तिनें केली प्रवासाची। चहुंकडे सर्व प्रकाराची।।
बदरीनारायण रामेश्वर। ॐकारेश्वर। जगन्नाथपुरी।
केदारनाथ द्वारका उज्जनीची। अयोध्या गया प्रयागाची।
पंढरपुर सुलतानपुरची।।
हरिद्वार नाशिक जेजुरी। इंदुर महेश्वरीं। थोर काशीपुरीं।
सदावर्ते अन्नछत्रें यांची। देणगी आहे महाराणीची।
थोरवी किती वर्णूं तिची।।
असें क्षेत्र राहिलें नाहीं। जेथें गेली नाहीं। अहिल्याबाई।
कितीकशा देवमंदिराची। स्थापना केली धन्य तिची।
कुंठित गति कवित्वाची।।
बारा हजार सहाशें त्र्याहत्तर। धार्मिक स्थानेतर। सांप्रत खरोखर।
नुसती होळकर हद्दीमधीची। गणती करुं इतर ठिकाणींची।
जरुर मग निराळ्या पोवाड्याची।।

**(पद – प्रभो विभो)**

शिवार्चना करी अहिल्याबाई। आमरण व्रत पाही।।धृ।।
स्वतःच्या मूर्ती तीन। करी शिवालयीं स्थापन।
गयारामेश्वरीं त्या दोन। स्थापुनि धन्य होई शिवा।।
शोधन तृतीय मूर्तिचा। परि नाशिक मंदिराचा ।
दिसतोची संभव साचा। जी सांप्रत त्या ठायीं।। शिवार्चना।।

**(बाले घाटी)**

अहिल्याबाई राणी। गुण रत्नखाणी। अमोलिक मणी।
किती गाऊं तिचा पोवाडा। गहिंवरें जीव हा वेडा।।धृ।।
इह लोकी जन्मून। केली भूमि पावन। त्यांत स्वतः राहून।
केलीं धन्य महेश्वर नगरीं। महेश्वर किल्ल्या भिंत करी।। महाराज।।
पवित्र नर्मदा तीरीं। किल्ल्या शेजारीं। जणुं जप करी।
देवी अहिल्याबाईच्या सेवेला। सादर सज्ज तिन्ही काला।। *चाल*।।
किल्यांत असे राजवाडा। त्यांत राजकीय घडामोडी केल्या जी।।
अहिल्याबाईचा महाल तरी केवढा। नक्षीदार सुंदर नाहीं जोडा त्यासी।।
पुढें नगारखाना चौघडा। तिन्ही त्रिकाळ वाजे धडधडा।। ।। *चाल*।।
मधीं अहिल्याबाईची मूर्ति। संगमरवरी ती। शोभे गणपती।
दर्शनी उजवींकडे। डाव्या आंगी निशाण फडफडे।। होळकरी।।
महादेव शंकर। विराजले समोर। छत्री विठोबा महाराजांची।
तिथें स्वारी बसे नंदीची।। डौलदार।।
महाराज देव ॐकार। मातुलिंगवर। उंच तें शिखर।
वर कळस झळके सोन्याचा। हरे ताप दर्शनीं मनीचा।। महाराज।। *चाल*।।
सोन्याच्या झोपाळ्यावरती। गोपालकृष्ण बाळाजी डोलती।
कुलस्वामी मल्हारी मार्तंड। सोन्याचांदीचीं लिंगें अखंड।। शोभती।। *चाल*।।
महाराज मल्हारराव। यशवंतराव। तुकोजीराव। हरीराव।
छत्र्या घाटावरी रमणीय।। दर्शना।।

**।। मिळवणी।।**

कशा कशाचे करावे वर्णन। होत वेडे मन। घ्यावे दर्शन।
जावें तुम्ही एकदा महेश्वरा। दर्शनें जन्म पुनीत करा।
विनंती माझी स्वीकारा।।

अहिल्या कोटी लिंगार्चन। आठ्याऐंशी ब्राह्मण।
करिती अजून। सालीना पन्नास हजारांचा।
धर्मादाय खर्च महेश्वरीचा। अजुनिहि चालू असे साचा।।

अहिल्याबाईची माळ कंठींची। दर्शनीय साची।
पंचवीस लिंगाची। हिरा मोती पाच माणिक यांची।
खडा शोभे प्रत्येक लिंगावरिची। रुद्राक्षहि शोभे मेरुमणीची।।

राजवाड्यांत देव राजेश्वर। काशीविश्वेश्वर। आणिक सुंदर।
गणपती छान पोवळ्याचा। महिमा अगम्य दर्शनाचा।
महेश्वर नगरी क्षेत्राचा। महेश्वर किल्ला फार जुनाट।
नर्मदेचा काठ। सुंदर वर घाट। किल्ला आहे पांच दरवाज्याचा।
अति अवर्णनीय शोभेचा। ऐकण्यापेक्षा बघण्या योग्यतेचा।।

रामेश्वरची कावड काशीला। दर दिवसाला। लांबीचा पल्ला।
परि नेम होता अहिल्यादेवीचा। कीर्ति गाया महिमा चरित्राचा।।
पुण्यवान त्या धर्मात्म्याचा।।

**(पद – तू टाक चिरुनी मान)**

गे अहिल्या माय। कुठे अससी।
या भरतभूमिला काय विसरसी। सांग कुठे अससी।।धृ।।

जगतीच्या या किल्यांत। का सगळ्या धर्मा आत्म्यांत का सात्त्विकवृत्तीत।
का सगळ्या पावन क्षेत्री तीर्थी सांग कुठे अससी।।

का स्वर्गीय साम्राज्यांत। का इंद्र चंद्रलोकांत का तू वैकुंठपुरीत।
का भक्त शिवाची म्हणोनि। शिखरीं कैलासीं वससी।।

अहाहा सर्वा ठायीं। वर खालीं दाही दिशाही।
महाराणी माझी आई। रामचंद्र कवि नम्र देवीच्या लागें चरणासीं।।

**।। मिळवणी ।।**

जन्म १७२५ सालीं झाला। सतराशें पंच्याण्णव साला।
शिवलोकांला। अहिल्यागान गौरीहरा।।
शिरपेचवाला राज कवि करवीरा। वाही सप्रेमें हार खरा।।

# अहिल्यास्तुती

## भार्गवराम

देवि! अहिल्याबाई! माझीं तुझिया पदीं असो नमनें,
''शरणगतासि रक्षू'' ऐसें व्रत घेतलेचिं सुजन-मनें।।१।।
देवी! अहिल्याबाई! जन्मोनी वंश धन्य केला गे,
सादर सज्जन-गण तव चरणीं राजर्षि-कन्यके! लोग।।२।।
जेणें तुज जन्म दिला त्या यश गे! परम श्रेष्ठ रायाचें,
उभय-कुलोद्धार, तसें केलें व्रत विश्व उद्धरायाचें।।३।।
शुद्धचरणें जगती ''देवी'' ही लाधली तुला पदवी,
अरि-वदनें तव कीर्ति ''धन्य सती ही'' त्रिवार हे वदवी।।४।।
सद्धर्माची हातीं घेउनि करवाल वारिलें गनिमा,
महिमा किती वदावा, वैकुंठी लाजली तदा मनिं मा।।५।।
आली जी स्वर्गातुनि श्रीगंगा पावना तुझी आली -
झाली; पुण्य-जलानें दोघींच्या भारती मनीं घाली।।६।।
पति परलोकी जाता विव्हळला तात, धैर्य-नग ढळला,
वळला सती! तुजकडे, निज सुत तों त्यास तेथ आढळला।।७।।
श्रीसीता कीं वाटे सावित्री मूर्तिमंत अवतरली,
अनुसरली तुजला, जी वनिता भव-सागरीं पहा तरली।।८।।
झाल्या पतिव्रता, परि थोर तू एकलीच महिवरली,
प्रेमभरें सुर-लोकी देवेंद्राची शचीहि गहिवरली।।९।।
सांप्रत न दिसे आर्य-स्त्री, जी तुजसमचि हाल सोशील,
किती नटती किती मुरडती; लाभो त्यांचें तयांस तें शील।।१०।।
आर्या कशा गणाव्या, आचरणें ज्या कुलीन परि गणिका?
त्यांच्या मुखीं पडावी देवी-चारित्र्य-सिंधुची कणिका।।११।।
स्वसुखासाठी केवळ नटल्या, त्या सर्व मोलकरणी गे!
सन्यस्त राहुनी जन-सेवा केलीस होळकरणी गे।।१२।।
कर जोडुनि ''जी'' म्हणती सौख्यें सेवावया जरी सर्व,
झिडकारिलीस प्रज्ञे! पुण्याचें साधिलें तुवा पर्व।।१३।।
वैधव्य-भोग येतां आमरण करी प्रयास तापार्थ,
जगली, तपली संतत लोक-प्रतिपालनार्थ, न स्वार्थ।।१४।।

कमलांस्तव, जीवांस्तव, स्वार्थे न करी रवि प्रकाशाला,
सुमती इतरां न कधी, ऐसा झालाचि विप्र काशाला ।।१५।।
नयनमनोहर सुंदर काया धरलीस गे! महाभागे!
पावित्र्य-तेज कोमल विलसे, पाहील कोण तुज रागें ।।१६।।
झाली दिग्ङमूढ मही, मावळतां श्रीशिव-प्रताप रवी,
आली अज्ञान-तमीं शुचि-तेजाचीच चंद्रिका वरवी ।।१७।।
करवी मोह-तमाची होळी, अज्ञान-मूढता नुरवी,
वनिता-कमल-वनाचा बोध करी, सौख्य संपदा पुरवी ।।१८।।
सकल जन प्रतिपालन, हें प्रिय तुज जेंवि शंकरा वेल,
तुज शरण येउनी मग सद्वीर न का विशंक रावेल? ।।१९।।
राजस कोमल तनुची जन-हित-यज्ञीं करोनि रांगोळी,
सुख-सरिता वाहविल्या, केलिया जनता तयांत आंघोळी ।।२०।।
अबला पाहुनि तुजला घाली श्रीमंत पेशवे धांक,
''वांकविती नच माना वीर, असें सुयश राजसा! रांख ।।२१।।
परि-भव-पात्र रणाला वनिता-दल सिद्ध जाण करवीलें'',
धाडुनि निरोप यापरि, यश रायाचें समूळ हारविलें ।।२२।।
शौर्य तुझें पाहुनिया, वीरांनीं कौतुकेंचि डोलावें,
हे ठाऊकें जगाला, म्यां मतिहीनें कशास बोलावें ।।२३।।
सरलें आयु, न सरलें दान तुझें, हेंचि काय सामान्य,
अन्य करी घडणें नच; जगतीं हें जाहलें असे मान्य ।।२४।।
दानार्थ जागजागीं अन्नाची ठेविलीं तुवा कुंडें,
आतृप्त सेवुनी, जन-वृंद न देतील का दुवा तुंडे! ।।२५।।
आश्रीसेतु-हिमाचल शिवालयें तू अनंत जी बाई!,
बांधविलीं, देवांचि न, तुझींच ती स्मारकें चिरस्थाई ।।२६।।
देवी-निवास-योगें गमलें तें इन्द्रपूर इंदूर,
जगदीश्वरा पहावें जेथें सद्भक्त राहति न दूर ।।२७।।
वाढविले जन माते! प्रेमानें सर्व आप्त-बाळकसे,
पाळक बहु झाले, परि गमले सकलांस मूर्त काळ जसे ।।२८।।
दीनोद्धार कराया, सजल्या त्वत्सम विपन्नदी-तरणी,
विश्वाच्या कल्याणा  झिजवुनिया देह, दावलि करणी ।।२९।।
देहें न राहवें, परि कीर्तिनें का, न नित्य उरशील?
करिशील आर्य-वनिता-संगोपन, राखशील नित शील ।।३०।।

यति थकले, कवि सुकले गाता तुज, गोष्टि ही न पोरांची,
''आपण तरोनि इतरां तरावे'' हीच रीति थोरांची ।।३१।।
गंगा-जलवत निर्मल आचरण असें न आढळायाचें,
रुतलें अनीति-कर्दनि मन पापी, त्यास ना कळायाचें ।।३२।।
भगिनीं-बांधव-गणहो! देवीचें प्रति-दिनीं करा स्मरण,
सज्जन-गुण-सरिता-जल-लव-बिंदूही करी समुद्धरण ।।३३।।
कृति राहो, स्मरण तरी तेंही जड वाटतें आम्हां जीवा,
जी वानिली सुरांनीं, ती विस्मरलों भ्रमांत राजीवा! ।।३४।।
त्वन्नाम मोक्षदायी, आर्ये! आर्यांसि मंगलायतन,
वरदे! वरदेंश्वर तें राखो आम्हांसि आमुचें वतन ।।३५।।
पावन नाम सतीचें वदनीं माझ्या अखंड घोळावें,
लोळावें त्वद्गुण-रसिं, मद झडकरी उदंड पोहावें ।।३६।।
''सहचारिणी तुजसमा आर्यांसि मिळो'', दुजें न मागतसें,
भागतसे भरताची भूमी, हितकर घडेल वाग तसें ।।३७।।
जरि केलें बहु, वाटे अल्प, अशी परम नीच जग-रीती;
अघ-नीती मानवती, तेथ श्रमती परंतु शुद्धमती ।।३८।।
देवांचि घेउनि ये आज्ञा, भारत-जनीं धरी काय,
काय कठिण तुज? उद्धरी रुतली परदास्य-कदमीं गाय! ।।३९।।
माय जगाची देवी, आम्ही बालक पहा रडों धाय,
जाय, नुरे मग चिंता; सत्श्रवणीं शब्द हा पडो ''हाय!'' ।।४०।।
तू मूर्ती धर्माची, पाही सद्धर्म-पाद-तळ मळलें!
नित्य शिवाजी-राया-मन ज्याच्या रक्षणार्थ तळमळलें ।।४१।।
''दीन-दयाघन वर्षो! भारत-वर्षी'' अशाचि हाकांनी,
धाडील तुला फिरुनी, जरि गेला नाद त्याचिया कानीं ।।४२।।
श्रीशा! श्रीजगदीशा! श्रीधर्मेशा! दया-घना पाहें,
पावें, भारत-भूमी श्रमते भ्रमते, बरें न बापा हे ।।४३।।
गोविप्र-सांप्रदाया, धांव! न शिवलाचि जोंवरी अंत,
दुबळा तुझा मराठा झाला तरि अजुनि पाहसी अंत ।।४४।।
किंवा देव-द्वारीं धरणें धरिलेंसि आमुच्या साठी,
गांठी न पडे हरिची, याया यास्तव उशीर का पाठीं ।।४५।।
हरि राहो, परि त्याची आढळली जरि रमा प्रिया भार्या,
विनवावी तीच, सखे! वाटे मज परम योग्य या कार्या ।।४६।।

कळिंव तिला वृत्त बरें, वळिंव तिचें मन धरूनिया पाय,
माय जगाची आहे, सांगेल दया करूनि सदुपाय ।।४७।।
देवी! मजल-धामा! पुनरपि येवो महीस ताराया,
वाराया ताप-त्रय, परवशता-पाश दूर साराया ।।४८।।
चरितार्णव घुसळोनी, गुण-रत्नें काढिलीं वरी चार,
प्रेम-गुणें गुंफुनिया, अर्पियलीं त्वत्पदांसि साचार ।।४९।।
गुण दोष पाहुनिया, घेई गुण, फेंक दोष मजवरती,
सुज्ञमते! बहु नलगे सांगावें; मजवरी तुझी प्रीती ।।५०।।
गुण-संकीर्तन दुस्तर-भव-सागर-पारद प्रपन्नास,
रचिल्या आर्या आर्या-स्मरणार्थ अशा नवीन पन्नास ।।५१।।

•

# धन्य अहिल्या

### गोपाळ शंकरराव होळकर

धन्य अहिल्या, बहुगुणगाजी, राष्ट्रमाजी अवतरली ।
घेऊन राज्य करि, करणी अशी करी, जिच्या प्रभावे देवी ठरली ।।
कुंभेरीच्या किल्ल्यांत पतीचा, देह पाहूनि हळहळली ।
सती जाण्यास्तव तयार झाली, राष्ट्रासाठी राहिली ।।
अबला समजून सैन्यासह, राघोबाने स्वारी केली ।
विचार करोनी पत्र पाठवुनि, अबला नाही शूर ती ठरली ।।
सकाळी उठुनी पूजा करोनि, महादेवाला पावन झाली।
जातीची क्षत्रिय होती, मांसाहाराला नच ती शिवली ।।
घाट मंदिरे बांधुनि तिने, धर्मशाळाही उघडविली।
गोरगरिबांना दान करोनी, दुबळ्यांची ती वाली झाली ।।
पुण्यशील, सात्त्विक अहिल्या, जग सोडोनिही गेली ।
हिंद भूमीतील सीता-सावित्री, साध्वींच्या पंक्तीत बैसली ।।

•

# अहिल्या पंचक

## डॉ. शिवनंदन अकोलकर

१

विराजली सिंहासनी थेट माणसांशी नाते
अन्यायाला भेदण्यासी कधी तलवारीचे पाते
रयतेच्या हितासाठी घाट, विहिरी बांधते
माता नर्मदेच्या तीरी लेक अहिल्या नांदते

२

नाते श्वसुर-सुनेचे, परि मानिली दुहिता
आणि गुरू-शिष्यच हे, सर्वोपरी नि सर्वथा
बुद्धीचे त्या तेज पाहुनि राज्यतंत्र शिकविले
''सुभेदारांची सून'' म्हणवुनी ब्रीद सार्थ केले

३

झाडे लावा, पाणी अडवा होती तियेची नीती
शेतकऱ्यांना बळ पुरविले, ही राज्याची शक्ती
सारामाफी दुष्काळात नि पशुपक्षांना पाणी
गरीबांसाठी अन्नछत्र ही मानवतेची भक्ती

४

स्थापत्याचे उत्तम नमुने देशभरी निर्मिले
विहिरी, बारवा, घाट, मंदिरे, तलावही बांधले
निर्माणाची अखंड नीती, होळकरी टाकी
निर्माणातून मनामनांना, देशाला जोडले

५

महान होणे, आदर्श होणे, आहे गुणसंपदा
त्यागी होणे, दानी होणे लोकास्तव सर्वदा
'पुण्यश्लोक' परि एकमेव ही लाभे तियेस पदवी
अशी अहिल्या ठेवुनी गेली काळावरती मुद्रा

•

# ती एक अहिल्या होती

**नीलांबरी गानू**

कर्तृत्वाने तळपली अन् दातृत्वाने झळकली
जनमनाच्या आकांक्षांचे ती स्पंदन झाली
पापणीत वादळे ती नित्य जोजवित होती
ती एक अहिल्या होती..

उदयाचळीचे तेज लोपले, घोर तमाच्या म्यानी
नयनाच्या प्याल्यात साठले खड्गाचे पाणी
किती जागली, किती कष्टली, तमा जीवाची नव्हती
ती एक अहिल्या होती..

वनदेवींनो नका वाजवू पाऊल गंधाचे
मूक कळ्यांनो ऐका तुम्ही नाद भविष्याचे
रयतेशी समरसलेली तिची पाऊले होती
ती एक अहिल्या होती..

लाल फुलांचे डोळे उघडून क्रोधित होई धरणी
तृणांकुराचे हिरवे लाघव, परि विलसते मनी
चराचरास्तव अपार माया मनात जपली होती
ती एक अहिल्या होती..

कर्तृत्वाचे घाट बांधले, दीनांची माता
गंगाजळनिर्मळ जीवन मंत्र शिवाचा होता
उभय कुळाच्या पुण्याईची कीर्तिपताका होती
ती एक अहिल्या होती..

दिशादिशातून भरलेली ही पुण्याईची झोळी
महेश्वरच्या मातीमध्ये तेजोमय ओळी
लोकहितास्तव राज्य तियेचे, शांती नांदत होती
ती एक अहिल्या होती..

कर्तव्यासम तनमन सारे, न्यायाची मूर्ती
राज्य हडपण्या कुणी अवतरे सोडुनिया नीती
स्त्रीशक्तीचे तेज दाविले विसरून सारी नाती
ती एक अहिल्या होती..

घोर सतींच्या आक्रोशांनी दुःखाचे पूर
आयुष्याची त्यांच्या माती, कशी रूढी ही क्रूर
धर्माच्या या न्यूनत्वाची खंत मनाला होती
ती एक अहिल्या होती..

मनामनांच्या खोल तळाशी नांव अहिल्येचे
पावित्र्याचे प्रतीक आहे मूर्तीमंत साचे
इतिहासाच्या पानावरती अखंड राहील कीर्ति
ती एक अहिल्या होती..

•

# अहिल्याबाईंच्या सौभाग्यावर घाला

**अज्ञात**

एके दिनीं करित पौरुष देत वेढा।
खंडूजीराव असतां रणवीर गाढा।।
तोफेंतूनी सुटुनि शत्रुकडील गोळा।
लागोनि त्यास हृदिं तो पडला भुईला।।१।।

भासे तदा सकलिकां पडला अकालीं।
हा वीर काय अभिमन्यु धन्य खालीं।।
मल्हारजी त्यजुनि शुद्धिस ह्या कुवार्ते।
खालीं पडे गळुनि की गिरि वज्रपातें।।२।।

वेढा त्यजुनि मग तेथुनि सर्व वीर।
घेऊनि मूर्च्छितचि होळकरप्रवीर।।
मेण्यांत घालुनि तसा युवराजदेह।
गोटांत शीघ्र अपुल्या रिघले समोह।।३।।

हो बायकांमधिं अकांत; किती बरें तें।
होणार दुःख जननीस! किती स्त्रियेतें!।।
मल्हारजी हळु हळु उठुनी अशांत।
होऊनि सावध विलाप करी बहुत।।४।।

''हे बालका! मम करा किती थंडगार।
हा लागतो कर तुझा जणु शीत नीर!।।
जी उष्णता रणिं चढे रिपुमर्दनें ते।
गेली कुठें अजि करांतुनि सांग मातें?।।५।।

ऐसा तुझा अचल का पडला सुकाय!।
चांचल्य त्यांतुनि कुठें रणजन्य जाय?।।
हो काय भाजुनि दशा तरि ह्या मुखाची!।
गेली तयावरिल कांति कुठें यशाची?।।६।।

जी धाय घेउनि अनेक रणीं सदाही।
छाती तुझी डगमगे न पुरी जराही।।
द्याती आज भग्न कशि होय! कुठें तियेचें।
सामर्थ्य जाय? मज सांग मुखें स्वतांचे।।७।।

येता रणांतुनि तुझें मुख शौर्यगोष्टी।
सांगूनि देत अज का मजला न तुष्टी?।।
कां नेत्र आज मिटले? रणकष्ट होतां।
आहेस काय तरि निद्रित गाढ आतां!।।८।।
हा तात दीन तव मारित तूस हाका।
आह, तयासहि न उत्तर देशि तू कां।।
आक्रोश फार पडुनी धरणीवरीही।
माता करी तव, तिशीं तरि बोल कांहीं।।९।।
ही स्त्री सती तव अचेतन भूमिभागीं।
आहे, तिला तरि उठीव उठूनि वेगीं।।
हा लाडका सुत तुझा रडतो पहा कीं।
घेऊनि त्यास तरि तू समजीव अंकी।।१०।।
आतां मदीय गुणि बोलत हा न पुत्र!।
आतां मदीय कसला तरि! मी अपुत्र!।।
आतां गुणीहि कसला! गुण लुप्त सारे!।
देवा! कसा दिवस हा अणिला तुवा रे!।।११।।
आतां असे विफल जीवित हें मदीय।
दीपांविना सदन जेवि, तसेंच होय।।
आतां असे मजपुढें तम सर्व भागीं।
जाऊं कसा तरुनि ह्यांतुनि मी अभागीं!।।१२।।
आहे किती कठिण दुःसह की पित्यानें।
द्यावी तिलांजलि सुता अपुल्या करानें!।।
काळीज हें करपतें मम हे गिरीशा!।
भस्मूनि त्यासच करा मग शीघ्र नाशा।।१३।।
अंकीं स्वकीय शिशुंच्या धरुनी स्वशीर्ष!।
पंचत्व पावति सुखामधिं जे सहर्ष।।
ते तात धन्य किती होत! किती सुखी ते!।
आतांच मारुन विभो मज सौख्य दे तें।।१४।।
हें राज्य हें सदन काय करावयाचें?।
हें व्यर्थ जीवितहि काय करावयाचें?''।।
मल्हारजी वदुनि ह्यापरि खिन्न राहे।
होत्या स्त्रिया करित शोक बहुत मोहें।।१५।।

शास्त्रज्ञ पोक्त शुचि शंकरभट्ट नाम।
होता पुरोहित तिथें सुविचारधाम।।
तो ह्या क्षणीं, जरि मनामधिं खिन्न, वाचे।
लागे करु प्रथम सांत्वन बायकांचें।।१६।।
माता वदे ''कुलगुरो! कशि सांडु दुःख?।
गेला किं हो सुत बरोबरिचा सुरेख!
आम्हां कधीं दुखविलें न कुभाषणानें।
वृद्धा अम्हां त्यजुनि जाय कसा त्वरेनें?।।१७।।
आणूनि आजच वनामधुनी शिकार।
ठेवूनिया मजपुढें वदला कुमार।।
'आई! हिला करुनि ठेव, तुझ्या कराचें!
लागे मला बहुत भोजन गोड साचें।।१८।।
येता रणामधुनि जेविन सावकाश'।
गेला असें वंदुनि तो मजला रणास।।
हा वेळ पाहत बसें तव वाट बाळा!।
मातें कसें फसविलें पण तूं? कपाळा।।।१९।।
अतां कुणास तरि भोजन तें समर्पू!।
हातास ह्या यश न, काय तयास कापू?।।
दाटूंनि कंठ तिजला मग बोलवेना।
तों स्त्री तदीय वदली अतिशोकपूर्णा।।२०।।
''अता तुम्हास म्हणतें दुसरें न कांहीं।
जातें सती पतिसवें मज धीर नाहीं।।
ह्या सासुबाई जननीसम, मामुजी हे।
संभाळतलिच मुला वदणें नको हें''।।२१।।
शोकार्णवांत असता सगळे असे ते।
बोले पुरोहित ''घडे भवितव्य जें तें।।
होणार काय तरि शोक करुनि आतां।
जो प्राणि जाय नच तो मिळणार हातां।।२२।।
व्हावा रणांत मृत तो प्रभुचाच होता।
हा नेम; त्यास आपुला न उपाय आतां।।
विद्युद्विपत्ति अवचित शिरीं जगीं या।
ऐशाच कोसळति! ही प्रभुचीच माया!।।२३।।

जन्मे जगीं मनुज तो मरतोच तेथ।
आहे जरी खचित हें तरि भेद त्यांत।।
आहे असा, मनुज जे मरतात कांहीं।
सत्कारणींच, मग ते मृत हो कदाही।।२४।।
त्यांचाच मृत्यु अति धन्य, मरोनियांही।
पृथ्वीमधीं अमर ते असती सदाही।।
तारेच होत पृथिवीवरचे महा ते।
रत्नेंच होत तिचिया गळिंचीं जणो ते!।।२५।।
ह्या कोटींतीलच खरा तुमचा सुपुत्र
जो ठोकित स्वरिपु चालवित स्वशस्त्र।।
जो मुक्त देश करण्या निघतां स्वकीय।
पावे रणीं मरण तो नच रत्न काय?।।२६।।
आहे किती मरण गोड तरी अहा! हें,
चित्तास मोहुनि किती तरि हर्ष दे हें,।।
ह्याच्या पुढें खचित तुच्छ असे स्वर्गहीं।
बैसूनि कोट्यवधि वत्सर वांचणेंही।।२७।।
घेऊनि राज्य परके घुसता स्वदेशीं।
जो प्राण दे समरिं घालविण्यांत त्यांशीं।।
देशाभिमानयुक्त तोच उदार भारी।
स्तुत्यर्ह तोच नर तोच परोपकारी।।२८।।
जो देशमुक्तिकरितां पडतो रणांत।
त्याचाच तो सफळ जन्म असे बहूत।।
त्या स्वर्गवास चिर, उद्धरुनी कुला तो।
निभ्रांत उत्तम गती पितरांस देतो।।२९।।
पोटीं असें उपजणें सुतरत्न साचें।
हें फार थोर तरि भाग्य असे कुणाचें?।।
ज्याच्या असे पदरिं पुण्य तदीय पोटीं।
रत्नें अशीं निजपतात अमोल मोठीं।।३०।।
पुत्रें रणांत मरुनी स्वपित्या यथार्थ।
सर्वामुखीं म्हणविणें चिर वीरतात।।
मातेप्रती म्हणविणें चिर वीरमाता।
स्वस्त्रीप्रती म्हणविणें चिर वीरकांता।।३१।।

हें थोर भूषण मनोज्ञ परस्परांस।
आहे किती! न वदवे! उपमा न त्यास।।
तो धन्य तात! सुत धन्य! तशीच माता!
ती धन्य! त्यापरिच ती अतिधन्य कांता'' ।।३२।।

हे गोड बोल परिसोनि पुरोहिताचे।
शांती गमे मनिं जरा सगळ्या जणांचे।।
शिंदे जयाजि सुमती, रघुनाथपंत।
मल्हारजीस मग शांतविती बहूत।।३३।।

जाऊं सती न दिली आपुल्या सुनेस।
हें सर्व दुःख गिळुनि मथुरापुरीस।।
पुत्रप्रक्रियेस करण्यास्तव फार खिन्न।
मल्हारजी त्वरित जाय पुढें तिथून।।३४।।

•

# अहिल्याबाई सती जातात

## शाहीर बन्सीधर, इंदूर

चाल : पोवाडा
( धन्य धन्य भूपाल शिवाजी)

धन्य धन्य श्री सती अहिल्या नमन तिला माझें।
असो हें वंदन भक्तीचें।।ध्रु.।।

धन्य देश तो, धन्य घराणीं सती जिथें वसती।
जयांची अमर गाती कीर्ति पतिव्रतेचें दिव्य तेज हें तेजस्विनीलाही।
लाजवी चंद्रकलेलाही नरा पराक्रम, प्रेम सतीला पतिवरतीं निष्ठा।
भारतीं परंपरा सुष्टा प्रातःस्मरणी, धर्मगामिनी, पुण्यवर्धिनी या।
तळपवी दिव्य तेज-वलया

**चाल :** तारा भूवर साच्या। ताराया अवतरलेल्या
अवतार भवानीचा की। तेजानें चमचमलेल्या
झणिं देश-पावना होती। मनिं भाव-भक्तिनें भरल्या
पूज्य सतींची कीर्ति कवनीं रात्रंदिन गावी। कवन हें सोज्वळता दावी।।१।।

काळ पूर्विचा इतिहासाचा आठवता चित्तीं। लोचनीं अश्रू-पात होती
खडे वीर ते शूर मराठे घेउनि समशेरी। शिरावर शिरस्त्राण भारी
भाले, बरच्या, निमचे हातीं पाठीवर ढाली। अघाडी तोफा गरनाळी
जरिपटका तो, निशाण भगवें अंबरीवरतीं। दाविती राष्ट्राची कीर्ति

**चाल :** सरदार, शिलेदारांचा। शौर्याचा मर्दुमकीचा
राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा। तो काळ हिंद-वीरांचा
सुभेदार मल्हारी होळकर शौर्य मेरु-गणती। निघाला कुंभेरीवरतीं।।२।।

कुंभेरीचा जाट मातला हटेल रजपूत। जाहला शौर्य-मर्दे मत्त
भुइकोट तो किल्ला भवतीं चिखलाचा कोट। करितसे त्यावरतीं मात
सुभेदार मल्हारी यांनीं तोफा डागविल्या। उडति ना कोटाच्या चिखल्या
सुरंग भरुनी बार उडविले, व्यर्थ होति सारे। जाहले खिन्न मनीं सारे
धडाडिचा पण शेवटला तो सुरुंग लावियला। मनाचा निचय मग केला
''या कोटाची माती घेउनि टाकिन यमुनेंत। तरिच हा भाला मज सार्थ''

**चाल :** तो बार सार्थकी झाला। झणिं कोट उलथुनी पडला
आनंद मना बहु झाला। दुर्दैवी नच मानवाला
निज पुत्र खंडेरावाला। झणिं धक्का हृदया बसला

लढता लढता अश्वावरुनी धरणीवर पडला।
चमूमधि हाहाःकार झाला ।।३।।

एकच फटका दुर्दैवाचा, दुःखाचा चटका। बैसला हृदयाला झटका
हृदय विदारी भीषण वार्ता सती अहिल्येला। लागतां शोक अती केला
''जीव जिवाचा प्राण कुडीचा कंठमणी गळला। डाव हा दैवा! साधियला
धन भाग्याचें, भाग्य धनाचें सौभाग्यच एक। जीवन हें सौभाग्यच एक''

**चाल :** जगिं जीव सतीचा एका। शुभ मंगल-सूत्रा वरतीं
तो प्राण तयांचा एका। भरदार कुंकवावरतीं
तुटतांच कंठिंचें सूत्र। खुटलेंच आयु या जगतीं
साध्वी देवी घेत अहिल्या वाण तदा सतिचें। कराया सार्थक जन्माचें।।४।।

चिता धडकली चंदन-काष्ठीं धगधगत्या ज्वाला। लागली हळहळ सर्वांला
पवन देउनी साथ, नेतसे ज्वाला आकाशीं। लोचनीं गळती जळराशी
अलंकार ते सर्व टाकुनी सती अहिल्येनें। न्हाणली शीत-जल-स्नानें
शुभ्र वस्त्र परिधान करोनी केस मुक्त केले। पसरले पाठीवर ओले
भाळावरतीं मळवट ओल्या भरी कुंकवाचा। दिसे तो वेष भवानीचा
सरणाजवळीं उभी ठाकळी येउन जगदंबा। घातली प्रदक्षिणा सांबा

**चाल :** तें दृश्य पाहतां सारें। भवतालीं जन हळहळले
तो थाट पाहतां शोकें। पशु पक्षी मीन कळवळले
करि वंदन मल्हारीला। 'शुभ आशीवर्च हे उठले
फुटे हृदय हें तडकुन त्याचें उठला जंजाळ। फुटेना तोंडातुनि बोल।।५।।

तरी बोलला अडखळुनी तो एकवटुन जीव। ''करुं नको दुःखावर घाव
तूंच शोभशीं आर्य-कन्यका सुता भारताची। कुलाची स्वामिनी तूं अमुची
तरी प्रार्थना माझी तुजला विनंती पायाशीं। नको तूं मागूं मज आशी
ऐक एवढी तुझ्या पित्याची विनंती हृदयाची। नको तूं अवमानूं माझी''

**चाल :** ''तो पराग सोडुनि जातां। सुमनाची मग का महती
जरि गळता सुम सांबाचें। तरि निर्माल्यांतच गणती
शिरिं कृपा पतीची शांता। तें जीवन अमुचें जगतीं
निर्माल्यासम जीवन झालें शुष्क आज माझें। कसे मीं सांगावें वाचें'' ।।६।।

शोक दाटला नयनीं उठला अंतर डबडबलें। किती तरि अश्रू खळखळले
'पुन्हा विनंती करितों साध्वी घुटमळती प्राण। दे सती मजला जीवदान'
विनंती पाहुनि तंव श्वसुराची अंतरी कळवळली। परतली सती धन्य झालीं
पावित्र्याची दिव्य दीप्ति ती कर्तव्यीं रतली। जगासी वंद्य नित्य झाली।।७।।

•

## जा रे दूता निरोप माझा सांग पेशव्यांना

**वंदना विटणकर**

जा रे दूता निरोप माझा सांग पेशव्यांना
युद्धाचे आव्हान या क्षणी स्वीकारिले जाणा।।
दुर्दैवाचा घाला पडला
शोक जाळितो आज मनाला
दुर्बल असले जरि मी अबला
अन्यायाशी झुंजत राहीन हा माझा बाणा।।
तख्त आमुच्या पुण्याईचे
तलवारींच्या पराक्रमाचे
नाही कुणाच्या बांधिलकीचे
इमान त्याचे राखण्यास मी प्राणही लाविन पणा।।
उगा वल्गना कशास करिता
लक्ष्मीची अभिलाषा धरिता
कुणापुढे ना झुकेल माथा
रणांगणावर स्त्रीरत्नांची लढेल ही सेना।।
जरी मनगटे कोमल अमुची
बाजी लावून कर्तव्याची
शिरे छेदतिल अन्यायाची
हार न जाईल जिद्द आमुची मुळीच ही कोणा।।
शूर तुम्ही सेनानी खंदे
लाविलेत अटकेवर झेंडे
उगारता अमुच्यावर आयुधे?
प्राण असेतो लढू शर्थीने शूर आम्ही ललना।।
पराभूत जर तुम्ही जाहला
जडेल दूषण कर्तृत्वाला
कलंक तुमच्या यश कीर्तिला
मुद्रित होईल कालपटावर कलंकीत घटना।।

•

# अहिल्या झाली युगनिर्माती

**प्रा. म. ना. लोही**

पवित्र देवि स्वर्गलोकिची येई अवनीवरती
धारण केले नांव अहिल्या झाली युगनिर्माती ।।
ती धनगर कूलोत्पन्ना
आचरणे ब्राह्मणकन्या
ती राजमहिषी धन्या
पुलकित पाहुनि क्षात्रतेज हो मालवभूची माती ।।
नियतीने ताडन केले
पति-पुत्र हिरावुन नेले
यौवनात दुःखी केले
तरी न खचली धीराने करि मात विपत्तीवरती ।।
धर्माची वाही चिंता
संस्कृतिचा विचार चित्ता
त्यास्तव ती वेची वित्ता
धर्मरक्षणी प्रजापालनी झाली तिजसम ती ।।
तपस्विनीचे जीवन जगली
जनहितरक्षणि दक्ष राहिली
आक्रमका जी कधी न भ्याली
प्रजा मानुनी पुत्र वाहवी ममता भागिरथी ।।
ती मांगल्याची मूर्ती
ती नारी-जीवन पूर्ती
ती कवीजनांची स्फूर्ती
पुण्यश्लोक म्हणविली जाहली अजरामर भारती ।।

•

# होळकरांची राणी

## डॉ. देवीदास पोटे

पुण्यश्लोक ही देवी अहिल्या वीरांगना अन् रणी
लोकहितास्वत राज्य चालवी होळकरांची राणी ।।
वैराग्याची पावन मूर्ती
सात्त्विकतेची आंतर शक्ती
नदीतीरावर घाट बांधते सकलहितकारिणी ।।
मातोश्री गंगाजळनिर्मळ
नांव ऐकता कापती खळ
शिवतेजाचे जीवन अवघे कीर्तिमंत स्वामिनी ।।
मानवतेची विशाल कक्षा
राघोबांचा उतरवी नक्षा
न्यायासाठी कठोर होई अखंड सौदामिनी ।।
प्रशासनाची सुदूर दृष्टी
शोषितांस्तव होई कष्टी
नर्मदेतल्या लहरी गाती देवी अहिल्या गाणी ।।
महेश्वरची महाश्वेता
कर्तव्यास्तव सिद्ध सर्वथा
विश्ववंद्य ही माता अहिल्या नसे अन्य त्रिभुवनी ।।
स्फुर्ति देई ही जननी माता
तेजरुप अन् होऊ आता
त्रिवार वंदन महासतीला लीन मनी होऊनी ।।
वर्षे सरतील; युगे उलटतील
चंद्रसूर्य जोवरी तळपतील
आदर्शाची तोवर राहील चिन्मय तेजस्विनी ।।

•

# अहिल्याबाई : पद्यमय चरित्र

## गोविंद एकनाथ गोसावी, खानापूर

### (शार्दूलविक्रीडित)

**श्रीसीतारमणा**[१] तसेंच नमितों त्या विश्वनाथा[२] - प्रती।
हे देवोत मला सुकाव्य करण्या बुद्धी 'अहिल्या सती'।।
वाल्मीकादिक आद्य जे कवि तया सर्वांस वंदूनि मी।
मोरोपंत-कवीस वामन तुका इत्यादिकांना नमीं।।१।।
पुण्यश्लोक[३] नलादि साधुवर या भूमी-वरी होउनी।
गेले त्यापरि शुद्ध-कीर्ति अगदीं साध्वी अहिल्या जनीं।।
गेली होउनि गाजते बहु जिची सत्कीर्ति या भारती।
वापी[४], घाट, जलान्नदानसदनें[५] ऐसी जिची सत्कृती[६]।।२।।
देवाला भजणें, द्विजांस[७] नमणें, गायींस सांभाळणे।
पुत्राच्या-परि प्रेमयुक्त सकला मानूनिया बोलणें।।
सद्विप्रांस[८] धनें, तशींच वसनें[९] गो-दानही अर्पिणे।
देवागार[१०] सुनिर्मिणें कृति जिची स्वाद्वन्नही[११] वाटणें।।३।।
शास्त्री, पंडित वैदिकादिक द्विजा सन्मानुनी आदरें।
विद्याऽऽचार[१२] बघूनि देत सकला शाली तशी घोतरें।।
देवी, साध्वि, सती जिला म्हणुन हा भूलोक वाखाणितो।
तीतें मी नमुनी तिच्या गुणगणा[१३] वर्णावया इच्छितों।।४।।
आहे होळ म्हणूनि एक अगदीं कुग्राम[१४] नीरा-कुला[१५]।
त्यामध्यें परिवार घेउन सदा खंडू वसे चौगुला।।
त्यानें जन्म महा प्रसिद्ध पुरुषा मल्हार-रावा दिलें।
ज्यानें गाजवुनी स्वनाम जगतीं[१६] राज्यास संपादिलें।।५।।

---

१ शोभायुक्ता सीतारामाला, २ महादेवाला, ३ पवित्र आहे कीर्ति ज्यांची ते, ४ विहिरी, ५ पाणपोया व अन्नसत्रें, ६ चांगली करणी, ७ ब्राह्मणांस, ८ चांगल्या ब्राह्मणांस, ९ वस्त्रें, १० देऊळ, ११ गोड अन्न (पक्वान्न), १२ विद्या व वागणूक, १३ गुणांच्या समुदायास, १४ खेडें, १५ नीरा नदींच्या काठीं, १६ जगात.

(२)

**(स्त्रग्धरा)**

शेती-भाती करूनी उदर[१]-भर करी खंडुजीं, चौगुल्याला।
एकाएकीं यमानें करुन अवकृपा गट्ट केलें तयाला।।
त्याची कांता स्वभ्रा[२] त्या-जवळ मग निघे जावया खानदेशा।
मल्हारीचें स्वजीवा-सम अवन[३] करी नित्य प्रार्थी गिरीशा।। ६।।

**(इंद्रवज्रा)**

दुःखा[४]ऽऽकुला माय निघे मुलाला।
घेउनि, गेहा[५]प्रति पातलीला।।
भ्राता अशा त्या अपुल्या स्वसे[६]ला।
सांत्वूनि ठेवी स्वगृहीं तियेला।। ७।।

**(स्त्रग्धरा)**

मेंढ्या मल्हारि राखी प्रति-दिवशिं खपे मायही शेतकामीं।
ऐशा कष्टांत त्यांनी बहुत दिन अहो कंठिले त्याच ग्रामीं।।
एका मध्यान्ह-काळी दिनकर[७] तपता पूर्ण तीव्रा-करांहीं[८]।
माता[९] वृक्षातळाला भुजंगवर[१०]-फणेखालतीं पुत्र पाही।। ८ ।।

**(शार्दूलविक्रीडित)**

गेली धांवत भोजजीस कथिली वार्ता[११], बहू घाबरी।
पाहूनी भगिनी तसाच निघुनी तो ये भुजंगावरी।।
घालावा जंव घाव तों अटपुनी सर्वांग नागें तिला।
वल्मीकीं[१२] शिरुनी मुला न डसुनी आनंद तेव्हा दिला।। ९ ।।

आज्ञा-पालन[१३]-दक्ष शूर बरव्या भाचास त्या मातुलें।
कंठाजीस दिलें हुशार करण्या युद्धामधें चांगले।।
मल्हारी बहु धीर-वीर बनण्या प्रारंभ हा जाहला।
होता बारगिरी-वरी मग शिलेदारी पदा पावला।।१०।।

बाजीराव तदा पित्यासह[१४] निघे दिल्लीवरी जावया।
जाताना दिसला बहुत उमदा मल्हारि खासा तया।।
हल्ला दिल्लिवरी करी प्रथम तैं तेथें लढे चांगला।
याची युद्ध-कला बघूनि सकला बाळाजि आनंदला।। ११ ।।

---

१ पोट भरणें, २ आपल्या भावाजवळ ( भोजजीजवळ ), ३ रक्षण, ४ दुःखानें व्याप्त, ५ घरीं, ६ बहिणीला,

७ सूर्य, ८ तीक्ष्ण किरणांनीं, ९ मल्हाररावाची आई, १० मोठ्या नागाच्या फडेखालीं, ११ हकीकत, १२ वारुळांत, १३ आज्ञा पाळण्याविषयीं तत्पर, १४ पिता-बाळाजीपंतासह.

**(स्त्रग्धरा)**

बाळाजी-पंत याचें बघुन बळ तसें शौर्य चातुर्य झाला।
चित्त संतुष्ट भारी झडकरि मनसबदार केलें तयाला।।
स्वारांच्या पांचशांचा करुनि अधिपती[1] संगतीं ठेवुनी त्या।
मल्हारी, 'राव' तेव्हां मिळवुनि पदवी तोष दे मातृ[2]-भ्रात्या।।१२।।

**(शार्दूलविक्रीडित)**

पूर्वी दाय-बहादुरा यवनपें[3] त्या माळवीं नेमिलें।
होतें, त्यांत शिरुन त्यास निकरें युद्धार्थ बोलाविलें।।
आज्ञा युद्ध करावयास दिली तैं पेशव्यानें[4] तया।
मल्हारी मग थोर युद्ध करुनि कीर्तिहि पावे जया।।१३।।

होता शूर खरा रणाविण दुजा दाया[5] दिसेना बरा।
रस्ता स्वस्थपणें निघूनि सकलीं[6] जाया यमाच्या घरा।।
श्रीमंते करुनी कृपा मग सुभा बक्षीस मल्हारिला।
देवोनी तहशील-दार-पदवी मल्हारबा वानिला।।१४।।

ही वार्ता सुखदा[7] जनांत पसरे, मामास मातेस ती।
ऐकोनी अतितोष[8] होउनि तदा देवास तीं प्रार्थिती।।
''देवा थोर कृपा करुन गरिबा सौख्यामधें घातलें।
बाळा देउनि आयुपूर्ण[9] करवी सत्कृत्य[10] तू चांगलें ''।।१५।।

**(स्त्रग्धरा)**

मामाला एक कन्या सकल-गुणवती प्रौढही[11] अंबुजाक्षा[12]।
तेजस्वी धैर्यशाली धनगर असे अन् सद्म[13]-कृत्यांत दक्षा[14]।।
नामें जी गौतमा ती नव-नृपति[15] अशा मातुलें[16] भागिनेया[17]।
देऊनी तुष्ट केली सतनय[18] भगिनी आणखी आत्मजाया[19]।।१६।।

**(गीति)**

समरोत्साही[20] जाया[21], समरोत्साह्यास लाभली बरवी।
विजयीं उत्साह करी, अजयीं[22] पतिला लढाइला फिरवी।।१७।।
मोठें राज्य मिळालें, पूर्व-वयीं फार भोगिली विपदा[23]।
तरि चैनी नच झाला, मल्हारी रंजवी प्रजेस सदा।।१८।।

---

१ धनी, २ मामाला, ३ बादशहानें, ४ बाळाजीपंतानें, ५ दयाबाहादुरास, ६ सगळ्यांनीं, ७ सुख

देणारी, ८ फार आनंद, ९ आयुष्य, १० चांगले काम, ११ पोक्त, १२ कमलनयना, १३ गृहकृत्यांत, १४ चतुर, १५ नवा राजा, १६ मामानें, १७ भाच्याला, १८ मुलासह, १९ आपली बायकों, २० लढाईची उत्सुकता असलेली, २१ बायको, २२ पराभव झाला असतां, २३ दुःख.

प्रभु पेशव्यास युद्धामध्यें साह्यार्थ जो सदा टपला।
जपला प्राणाहुनिही, बाजीरावा तसेंच रयतेला।।१९।।
झाला पुत्र तयाचें, खंडोबा ठेवुनी दिलें नाम।
स्मारक[1] स्वपित्याचें वा, कुल-देवाचेंच हें असें नाम।।२०।।
ज्या देवीचें आम्ही, नमुन तिला सांगतों चरित्र भलें।
भावी पति खंडोबा, सकलांला मान्य युग्म[2] हें झालें।।२१।।
स्व-सुत[3]-मुखाला पाही, मल्हारी नंद जेविं कृष्णाच्या।
दशरथ रामाच्या वा, जन्में आनंदला स्वतनयाच्या।।२२।।

---

१. पित्याचे स्मरण म्हणून मुलाला त्याच्या आजोबाचे नांव ठेवीत, २. अहिल्या - खंडेराव हे जोडपे, ३. आपल्या पुत्राचे

**(अहिल्या पति-जनन नामक प्रथमांक समाप्त)**

---

### अंक दुसरा

## अहिल्या जनन

**(आर्या)**

श्री-एकनाथ-जन्में, पैठण आळंदि ज्ञानरायानें।
आली प्रख्यातीला[4], तैशी पाथर्डी या अहिल्येनें।।१।।

**(शार्दूलविक्रीडित)**

हल्लीं पाथरडी जनांस सकला कुग्राम ऐसी दिसे।
ती पूर्वी रमणीय[5] धान्यसहिता[6] संपत्तियुक्ता[7] असे।।
श्रीमंते वसवूनि पेट बरवी तैं फौजही ठेविली।
त्या-योगें नगरासमान गमुनी लोका दिसे चांगली।।२।।
गांवा-भोंवतिं लांबलांब कुरणें होतीं तृणांची[8] अती।
त्यामध्यें फिरती यथेच्छ चरती गो-वत्स[9] यांच्या तती[10]।।
विप्रांचीं सदनें[11] बरींच असुनी गावात देवालयें।
होतीं, शोभविलें तया नगरिला तैसेंच विद्यालयें[12]।।३।।

**(आर्या)**

आनंदराव शिंदे, धनगर होता तया पुरी-मध्यें।
साध्वी भार्या त्याची, तो वागे साधुसा जना-मध्यें ।।४।।

---

४ प्रसिद्धीला, ५ सुंदर, ६ धान्यानें युक्त, ७ धनाने युक्त, ८ गवतांचीं, ९ गाई व वासरें, १० रांगा, ११ घरें, १२ शाळेनें.

**(पृथ्वी)**

सदा विमल[१] मानसीं[२], रत[३] परोपकारीं सदा।
सदास[४] करुनी श्रमा पिकवि शेत तो, आपदा।।
कदा न शिवली जया धनगरांत मान्याग्रणी[५]।
स[६]दारा सुख-युक्तही असुनि तुच्छ सौख्या गणी।।५।।

**(शार्दूलविक्रीडित)**

भार्या प्रेमयुता, घरीं सकलही वस्तू बरी शेतकी।
विश्वेशीं मन, मान्य जे सुजन त्या, नाहीं परी सौख्य की।।
त्याला पितृजना[७] निवाप[८] तिथिला[९] द्याया नसे संतती।
त्या-योगें बहु खिन्न तीं उभयतां देवा सदा प्रार्थिती।।६।।
त्याची स्त्री बहु सावधान[१०] चतुरा साध्वीहि होती खरी।
संतानाविण मानसीं तळमळे यात्राहि भारी करी।।
मुंजाबास प्रदक्षिणा करुनिही मल्हारि जेजूरिचा।
सायासा नवसा करुन सुखवी हेतू पुरेना तिचा।।७।।

**(स्त्रग्धरा)**

सर्वांगीं राख ज्याच्या बहुत असति ज्या कंठिं रुद्राक्षमाला।
कक्षे भिक्षार्थ झोळी, असुनि नवजटा[११]जूट तो मस्तकाला।।
गोसावी एक ऐसा नशिब उघडता, पातला सुस्वभावें।
अन्नेच्छा[१२] तृप्त त्याची करुन सुखविला साध्विनें देवभावें।।८।।
गोसावी तुष्ट झाला, वदत मग तिला ''माय इच्छा कशाची।
आहे ती स्पष्ट सांगा'' नमुनि पद सुधी संतती-लागिं याची।।
स्वामी[१३] देउनि रक्षा[१४] ''पुरविल तुमची देव इच्छा भजा जा।
भावें सेवा करोनी करविर[१५] -नगरीं देविला तोषवा जा''।।९।।
ऐसी आज्ञा करुनी निघुन झडकरीं जाय तो भिक्षु वेगें।
कांता[१६] हें वृत्त येता प्रियकर पतिला फार हर्षेच सांगे।।

तेव्हा आनंदरावा बहुत प्रमद[१७] तो होय कोल्हापुराला।
जायाला सिद्ध झाला सुदिन[१८] बघुनि तो योग्य[१९]-काळी निघाला।।१०।।

---

१ निर्मल, २ मनांत, ३ गर्क, ४ चाकरासह, ५ मान्यजनामत मुख्य, ६ बायकोसह, ७ पितरांना, ८ तिलांजळी, ९ श्राद्धतिथीला, १० सावध, ११ नवीन जटाचा फेटा, १२ क्षुधा, १३ गोसावी, १४ अंगारा, १५ कोल्हापुरांत, १६ बायको (आनंदरावाची ), १७ आनंद, १८ चांगला दिवस, १९ मुहूर्तावर.

**(शार्दूलविक्रीडित)**

गेलें भाविक जोडपें करविरीं सेवावया देविला।
तेथें राहुन एक वर्ष करुनी सेवेस त्यांनी तिला।।
केले तुष्ट म्हणून स्वप्न-समयीं दृष्टांत रावा[१] भला।
झाला की ''उदरी तुझ्या जनु[२] स्वता मी घेत आहे'' चला।।११।।

**(स्त्रग्धरा)**

''सेवेनें तुष्ट झालें परत निघुन जा आपुल्या तू घराला।
येतें पोटीं तुझ्या मी'' कथुनि मग शिवा[३] गुप्त झाली; सतीला।।
ऐसें आनंद[४] सांगे श्रवण करवि तो आपल्या बायकोला।
विप्रांचा संघ[५] त्यानें धन, वसन, तदा देउनी तोषवीला।।१२।।

**(शार्दूलविक्रीडित)**

''कोणी एक सुवासिनी सतनया[६] माझ्याकडे येउनी।
भाळी कुंकम लावुनी मुलगिला ओटीमधें घालुनी।।
झाली गुप्त'' असें तदा स्व-पतिला स्वप्नास सांगे सती।
स्वप्नांनी परिपूर्ण हेतु गमुनी आले घरा दंपती।।१३।।
विप्रां भोजन श्री-फलांसह[७] खणां विप्रस्त्रियांना दिलें।
अंधाऽपांग[८] जना शिधा सकलही आप्ता जना चांगलें।।
देई भोजन तोष पावुनि मनीं राहे बहु प्रीतिनें।
ती, झाली मग गर्भिणी पतियुता[९], उत्साह केला तिनें।।१४।।
होता मास पुरे प्रसुत मग ती झाली, सुकन्या तिला।
पूर्णेंदूसम[१०] तेजयुक्त बघुनी आनंद आनंदला।।
पुर्वी सूर्य-कुलावतंस[११] नृपती पुत्रार्थ सेवा जशी।
धेनूची[१२] करुनी अपत्य-सुख[१३] घे याची कृतीही तशी।।१५।।
त्या वेळीं नगराहुनी[१४] धनगरें ज्योतिर्विदा[१५] आणिलें।
कन्येच्या टिपणास त्यास लिहिण्या-लागीं तदा प्रार्थिलें।।

त्यानें वर्तवुनी ग्रहांस लिहिली तत्पत्रिका बोलिला[१६]।
ऐकूनी सकला[१७] तया द्विजवरा अत्यादरें पूजिला।।१६।।

१ आनंदरावाला, २ जन्म, ३ देवी, ४ आनंदराव, ५ समुदाय, ६ मुलीसह, ७ नारळसह, ८ व्यंग, ९ पतीशींयुक्त, १० पूर्णचंद्रासारखी, ११ सूर्यकुलांतील मुकुटमणी दिलीपराजा, १२ कामधेनूची, १३ संतानसुख, १४ अहमदनगराहून, १५ ज्योतिष्याला, १६ वाचिली, १७ सगळी.

**(स्त्रग्धरा)**

ऐका हो पत्रिका ती ''सकल जन हिशीं मातृ[१]-प्रेमा धरून।
सन्मानें वागणूका करतिल, इजला एक राजा धरून।।
राज्ञी[२] खाशी करुनी रमविल प्रमुदें, ही पुढें तोषवील।
औदार्ये दानधर्मे सकल वसुमती तुष्ट भारी करील''।।१७।।

**(आर्या)**

बारा दिन झाले तैं, थाटाचें बारसें बहू केलें।
ठेवुनि नाम अहिल्या, घुगऱ्यांनीं बांधवां सुखी केलें।।१८।।
ती कन्या वर्षाची, झाल्यावर चालण्यास जैं लागे।।
तैसेंच बोलण्याला, झाले ते[३] हर्षचित्त[४] त्या योगें।।१९।।

**(शार्दूलविक्रीडित)**

सौंदर्ये रतिच्यापरी[५] जरि नसे, तेजस्वि होती सुता।
नेत्र[६] - घ्राण तशीं दुजीं सकल-ही तीं इंद्रियें पाहतां।।
भारी मोद मना जनास सकला देई अहिल्या भली।
तन्माता बघुनी हिच्या बहुविधा लीलांस आनंदली।।२०।।

**(आर्या)**

पिंपळपान कपाळीं, हसळी शोभे गळ्यामधें बरवी।
हातांत बिंदलीला, घालुनि माता तिला बहू सजवी।।२१।।
झाली दिगंत कीर्ति, साध्वीच्या ज्या गुणां-मुळें जगतीं।
औदार्यादि गुण तिचे, पंचम वर्षीहि चांगलें दिसती।।२२।।
ती पोर मैत्रिणीशीं, प्रेमानें वागुनी तया सुखवी।
कांहीं पदार्थ खाया, मिळतां सर्वांस वांटुनी देई।।२३।।
पोरपणीं खेळ तिचा, आवडता मांडुनी दगड एक।
त्याची पूजा करणें, तद्भजनें[७] ती दणाणवी चौक।।२४।।

१ आईवरील माया, २ राणी, ३ अहिल्याबाईचे आईबाप,? ४ आनंदित आहे चित्त ज्यांचे असे, ५ मदनस्त्रीसारखी, ६ नाक, ७ त्याच्या भजनानें.

मधुर तसें सत्य सदा, सर्वांशी बोलणें अहिल्येचें
कोणी असत्य वदता, भाषण तिजशीं मुळीं न होत इचें ।।२५।।
या सद्गुणांमुळें तीं, सर्वांना फार फार प्रिय बाला[१]।
झाली, सदैव जवळीं इच्छिति जन ती मनोहरा बाला[२] ।।२६।।
पंतोजि मित्र होता, आनंदाचा घरा-जवळ शाला।
होती, तो अनपत्यचि[३], सांभाळी नित्य प्रीतिनें इजला ।।२७।।
त्या गुरुवरतीं पितरांपेक्षां माया बहू करी बाला।
शिकवली वाचायाला, क्षण न विसंबे गुरुहि तो तिजला ।।२८।।
भारत रामायण त्या, पंतोजीला असे पुरें पाठ।
तो तीस कथा सांगुनि, करवी कविताहि कांहि मुखपाठ ।।२९।।
सत्य हरिचंद्राचे, सीतेचें प्रेम आपल्या रमणीं।
तैसा वनवास तिचा, तिजकरवीं ऐकवी कुलीनमणी[४] ।।३०।।
दमयन्ती लग्नोत्सव, ती सावित्री पती कसा उठवी।
अज्ञात-वास[५] सतिचा[६], सांगुनि दुःखार्त[७] मृत्यु[८]-भू ठसवी ।।३१।।

---

१ बाप जो आनंदराव त्याला, २ कन्या, ३ संतान नसलेला, ४ चांगल्या कुलांतील व श्रेष्ठ, ५ विराटाचे घरीं गुप्त राहाणें, ६ द्रौपदीचा, ७ दुःखाने भरलेली, ८ मृत्युलोक,

(**अहिल्या-जनन-नामक द्वितीयांक समाप्त**)

---

## अंक तिसरा

## अहिल्या विवाह

### (शिखरिणी)

तुझी कन्या एका नृपति-तनयातें[१] वरुन ही।
सुखातें पावोनी करिल सुख-युक्ता[२] बहु मही।
असें नक्षत्रज्ञें[३] जरिहि जनकाला सुचविलें।
तरी त्यानें आप्ता-प्रति[४] वर बघाया फिरविलें ।।१।।
परी त्यांचे गेले फुकट अगदीं यत्न सगळे।
नदी-संयोगाला जलनिधि[५] असावा नच तळें ।।
म्हणोनी ते सारे धनगर तदा स्वस्थ बसले।
वर-प्राप्ती[६]-साठीं सकलसुरदेवा[७] नवसिलें ।।२।।

---

१ राजपुत्राला, २ सुखी, ३ ज्योतिष्यानें, ४ सोयऱ्या-धायऱ्यांस, ५ समुद्र, ६ नवरा मिळण्यासाठीं, ७ परमेश्वराला.

### (शार्दूलविक्रीडित)

ज्यानें जन्म दिला मुलीस वरही त्या ईश्वरें पाहुनी।
ठेवूनी दिला असेल म्हणुनी केलें विचारा मनीं।।
राघोबासमवेत शूरवर[१] त्या मल्हारबाचा पडे।
जेव्हां हो तळ थोर पाथरडिला तेव्हां पती सांपडे।।३।।
होता एकच शूर-धीर[२]-वरही मल्हारबाला सुत।
संगे घेउनि त्यास नित्य शिकवी राज्यर्द्धिचें[३] हृद्गत[४]।।
अंगाने दृढ नाद त्यास बरवा त्या पारधीचा असे।
त्या-योगे बहुतोष तो कधिं कधीं शाहूसही देतसे।।४।।
लंगोटा चढवूनि तंग वरतीं काचा कसी तो गडी।
काढी दंडउदंड[५] पेलुनि बहू जोड्या करी पक्कडी[६]।।
घोडा धावत सोडुनी सकलही पैजा सुतें जिंकिल्या।
पुत्रा युद्ध[७]-विशारदा बघुनि त्या मातोश्रि[८] आनंदल्या।।५।।

### (स्त्रग्धरा)

खंडूचें लग्न आता लवकर करणें प्रार्थिलें गौतमीनें।
भर्त्याला फार प्रेमें परि वधु[९] बघण्या यत्न केला न त्यानें।।
सैन्याच्या सुव्यवस्थेप्रति करुन मुदें बैसले लोक काहीं।
गप्पा गोष्टी कराया नरमृगपति[१०] तो पेशवा आणि हाही।।६।।
शिष्यांना सोडुनी तो गुरुवर[११] तिथला पेशव्या भेटण्याला।
आला तैसाच बैसे रघुपति-जवळी[१२] गोष्टि ऐकावयाला।।
श्रीमंतोक्तीस[१३] माना डुलवुनि करुनी होस हो चाललेल्या।
तों तेथें येउनी ती गुरुजवळ बसे स्वस्थ-चित्तें अहिल्या।।७।।

### (शार्दूलविक्रीडित)

गोरीपान नसे तरी मुख तिचें होतें बहू चांगलें।
श्रीमंतादिक सर्व तीस बघुनी चित्तांत संतोषले।।
त्यांनी सर्व हकीकतीस पुसिलें पंतोजि सांगे कथा।
श्रीमंतासह राव[१४] तो बहु तदा आनंदला सर्वथा[१५]।।८।।

---

१ पराक्रम्यांत श्रेष्ठ, २ शूर व धैर्यवान यांच्यात मुख्य, ३ राज्य वाढविण्याचे, ४ इंगित, ५ जोर, ६ मल्लखांबावरच्या पक्कडी, ७ युद्धांत चतुर, ८ गौतमाबाई, ९ नवरी, १० पुरुषश्रेष्ठ, ११ गुरुश्रेष्ठ, १२ रघुनाथरावाजवळ, १३ श्रीमंत पेशव्यांच्या बोलण्यास, १४ मल्हारराव, १५ सर्व प्रकारे.

खंडूला बहु योग्य ही वधु असे मल्हारबा बोलला।
श्रीमंतासहि मान्य होउन पुढें खंडूहि बोलाविला।।
'व्हावी काय मुला तुला वधु बरी' सत्प्रश्न[१] हा ऐकला।
'सुज्ञांचे[२] सुविचार मान्य मजला' खंडू तदा बोलला।।९।।
पंतोजी-करवीं तया अणवुनी आनंदरावा पुसा।
हेतू हा तुजला असे मत[३] बरा किंवा तुझा तो कसा?।।
'मी आहें प्रभु[४] दास योग्य आपुला व्याही नसे व्हावया।
कन्येचें बहु भाग्य वा शिवकृपा' तोही वदे मान्य या।।१०।।

**(आर्या)**

श्रीमंत-मता तो घे, विप्राकरवीं सुपत्रिका पाही।
ऐकुनि हर्षित होई, उत्सव करण्यांत गुंतला व्याही।।११।।
साखर-पुडाहि दिला, लग्नोत्सव पुण्य-पत्तन[५]-स्थानीं।
धरुनि तिथी संन्निधची[६], करण्याचा बेत ठरविला त्यांनीं।।१२।।
आनंदराव कन्ये-सह, मग येऊनि सकल भार्येला[७]।
वृत्तांत घरी ऐकवि, नच मावे हर्ष तो तदा तिजला।।१३।।

**(स्त्रग्धरा )**

आनंदा तैं वऱ्हाडी जमवुनि सगळे घेउनी शिक्षकाला।
सामानाच्याही गाड्यांसह मग निघुनी पुण्यग्रामांत आला।।
इंदूराच्या अधीशें नृपति-वर दुजे उत्सवीं आणण्याला।
आमंत्राया तुकोजी सुविनय[८]-नत त्या धाडिलें भ्रातृजाला[९]।।१४।।

**(आर्या)**

जयपूर उदेपुर तें, बस्तर धामी तशीच कुंभेरी।
ग्वाल्हेर बडोद्याला, तैसे आव्हान[१०] जात म्हैसूरीं।।१५।।

**(शार्दूलविक्रीडीत)**

झालावाड[११] थिआक जाबल टिखा कोचीन बुंदी डुबा।
कोटा भावलपूर ईदर तसें तें झिंद नाभाहि बा।।
लाहारू बिकनीर सोनपुराही गोद्रा कुनीयारपा।
नालाघार तिरोज बादलपुरा तैसें दुजाही नृपा ।।१६।।

---

१ चांगला सवाल, २ सूज्ञ जे आपणा त्या आपले, ३ मान्य, ४ महाराज, ५ पुण्यास, ६ जवळची, ७ बायकोला, ८ विनयानें नम्र, ९ पुतण्याला, १० आमंत्रण, ११ यांतील बहुतेक संस्थानें उत्तर हिंदुस्थानांत आहेत.

(स्त्रग्धरा)

मल्हारी मित्र होता, म्हणुनि नरपती पातले लग्नकार्या।
सर्वांचा संघ[१] मोठा जमुनि गजबजे फार तें ग्राम[२] आर्या[३] ।।
वाजंत्री वाजती ही अभिनय[४] करुनी वारमुख्यांगना[५] त्या।
सर्वांच्या मानसाला[६] रमवुनि करिती सुस्वरें गान नृत्या ।।१७।।

(आर्या)

श्रीमंत शाहुराजा, देउनि बहुमान त्या परिजनाला[७]।
उल्हासें आला तैं, मल्हारीलाहि हर्ष बहु झाला ।।१८।।

(शार्दूलविक्रीडित)

मोठा मांडव त्या बितान[८] बरवें त्या भोंवती झालरी।
हंड्या झुंबर गोलकादि[९] खचले हो मौक्तिकांच्या सरी ।।
मोठीं घालुनि जाजमें वर[१०] भले मोठेच ते गालिचे।
गाद्या लोड बिछावले नरपती तैं बैसले देशिंचे ।।१९।।

(स्त्रग्धरा)

शाहू उच्चासनी[११] तो नृपति-वर दुजे बैसले त्याजपाशीं।
डाव्या बाजूस बैसे प्रतिनिधि दुसरी मंडळी आणि खाशी ।।
एका बाजूस राजे करभर[१२] नमनें अर्पिती सालसाला।
ते होते बैसलेहो वधुवर बघुनी हर्ष सर्वांस झाला ।।२०।।

(आर्या)

खंडोबानें कंठी, कंठा घालूनि मौक्तिकांचा तो।
शिरपेंच पगडिवरतीं, दिसला मदनासमान साचा तो ।।२१।।
मस्तकिं भर-जरि पगडी, तैशी पायांत ती तुमान बरी।
भरजरिचा अंगरखा, मणि-युत[१३] कटकांस[१४] घातलें स्वकरीं ।।२२।।
मंगल-विधि करण्याला, त्यांना लग्नगृहात मग नेलें।
तेथें समंत्र विप्रें, विधि करुनी 'सावधान' ही केलें ।।२३।।
मोठ्या थाटानें ती, वरात नगरांत मिरवुनी तेथें।
येउनि शाहु-पायीं, ठेविति सुकुमार-दंपती माथें ।।२४।।

---

१ समुदाय, २ पुणे, ३ हे श्रेष्ठ मनुष्या, ४ हावभाव, ५ श्रेष्ठ नायकिणी, ६ मनाला, ७ चाकराला, ८ छत, ९ गोळे वगैरे, १० जाजमावर, ११ उंच सिंहासनावर, १२ खंडणी, १३ रत्नखचित, १४ कड्यांना.

अनपत्य[१] शाहुराजा, मोठ्या प्रेमें वधूवरास स्वयें।
उंत्सगीं[२] घेउनि त्या, घाली मग शर्करा[३] मुखां-मध्यें ।।२५।।
सस्त्रीक[४] खंडुजी हा, मेंढ्या राखीत जो बसायाचा।
शाहूत्संगीं[५] परि तो बसला हा खेळ सत्य नशिबाचा ।।२६।।
शाहू नंतर दुसऱ्या, मानकऱ्यांनींहि घातली सुमुखीं[६]।
उत्साहें साखर ती, त्या-योगें फार हर्षली सुमुखी[७] ।।२७।।
इकडे तुकोजि-रायें, हार तुरे आणि तांबुलां दिलें।
अत्तर गुलाबपाणी, गणिका[८]-करवीं सुनृत्यही[९] केलें ।।२८।।
शाहूराजा मग नृप, दुसरे गेलेहि मंडपांतून।
तेव्हां बक्षिस घेउन, गेले वारांगनादि[१०] तेथून ।।२९।।
दुसरे दिवशीं त्यानें, थोर दिली मेजवानि राजांना।
मानादि[११] व्यवस्थेला, झाला आनंद पाहुनी त्यांना ।।३०।।
राजे निरोप घेउन, गेले स्वस्थानिं आपल्या वेगें।
मल्हारी जेजुरिला वोहर[१२] घेउनि पातला संगें ।।३१।।
कुल-दैवत खंडोबा, तत्पद[१३]-कमलीं मुलांस लोळविलें।
घेउन प्रसाद त्याचा, विप्रां द्रव्यादिकेंहि[१४] तोषविलें ।।३२।।
श्रीमंताज्ञा[१५] घेउनि, गेला मल्लारि माळवा-देशीं।
इंदूर-नगरिं झाली, पाहुनि सानंद[१६] ती प्रजा त्याशीं ।।३३।।
ज्योतिर्विद-कथनापरि[१७], कन्येला नृपति लाधला वर जैं।
आनंद[१८] बायको-सह, आनंदोदधिमधें[१९] बुडाला तैं ।।३४।।
परि कन्यासुख[२०] बघण्या, मृत्युनें ठेविला न हा जोडा।
नश्वर[२१] सुख-दुःखें हीं, पाहुनि संसार-पाश हा तोडा ।।३५।।
**(अहिल्या-विवाह-नामक तृतीयांक समाप्त)**

---

१ मूल नसलेला, २ मांडीवर, ३ साखर, ४ बायकोसह, ५ शाहूच्या मांडीवर, ६ सुंदर वदनांत, ७ सुवदना, ८ नायकिणी, ९ चांगला नाच, १० नायकिणी वगैरे, ११ मानपान वगैरे, १२ वधुवर, १३ त्याच्या पायावर, १४ धन, वसनें वगैरेंनीं, १५ पेशव्याचा हुकुम, १६ आनंदित, १७ ज्योतिष्याच्या सांगण्याप्रमाणें, १८ आनंद राव, १९ आनंद-समुद्रांत, २० कन्येचा सुख सोहळा, २१ नाश पावणारीं.

## अंक चौथा

# संसारसुख

### (शार्दूलविक्रीडित)

कोणी एक प्रवास निर्जन वनीं जेव्हां कराया निघे।
जाता ताप तयास दुःसह असा होई रवीचा[१], बघे।।
विश्रांतीस्तव त्यास एक सहजीं छायास्त्रही[२] सांपडे।
वापी संनिध पाहतां मग रमे विश्रांति घ्याया पडे।।१।।

संसाराटवि[३] दुःखदा[४] परि कधीं होतो सुखाऽऽभास ही।
तैसा भास महासतीस गमला वर्षे दहा खास हीं।।
लग्नानंतर सासरीं वसुन ती श्वेश्रूश्वसुरां-प्रती[५]।
आज्ञा पाळुनि तोष-युक्त[६] करुनी नांदे सुखानें सती।।२।।

होत्या ज्या नणंदा तयांवरि करी प्रेमा स्वसे[७]-सारखा।
ऐशा सद्गुणि बायकोस कधिंही नाहीं पती पारखा।।
ऐशीं पांच सुवत्सरें[८] निघुनि हो जाता ऋतु-प्राप्तिला।
होतां थोर महोत्सवास करुनी मल्हारबा तोषला।।३।।

### (स्त्रग्धरा)

सावित्री स्ववशूरा वनगत असतां पूर्ण सेवा करुन।
आनंदा नित्य देई प्रियकर वदुनी आत्मकांतास[९] मान।।
तैशी मल्हारबाची प्रतिदिवशिं बहू चाकरी सन्मनानें[१०]।
केली याही सुनेनें प्रमुदित[११] पति तो होय या वर्तनानें।।४।।

### (वसंततिलका)

मल्हारबा निघत जैं करण्यास आजी[१२]।
साध्वी सुनेस विजयाऽजय काय आजी[१३]।।
ऐसें पुसेच वदतां 'विजया मिळेल'।
तेव्हां प्रयाण करण्यास धजे नृपाल।।५।।

### (आर्या)

आत्म स्नुषामिषानें[१४], ही विजयश्रीच[१५] मूर्तिमान वसे।
येऊनि घरीं माझ्या, मल्हारीला सदैव वाटतसें।।६।।

---

१ सूर्याचा, २ छायायुक्त आंब्याचें झाड, ३ संसाररुप अरण्य, ४ दुःख देणारे, ५ सासू-सासऱ्याला,

६ आनंदित, ७ बहिणीप्रमाणें, ८ वर्षे, ९ आपल्या नवऱ्यास, १० मनापासून, ११ आनंदित, १२ लढाई, १३ आज, १४ सूनेच्या रुपानें, १५ विजयरुप लक्ष्मी.

**(स्त्रग्धरा)**

पत्नी मल्हारबाची, बहुत कडक ती गौतमाबाइ होती।
खंडोबाची सु-रमा[१] बहुत चतुरता सासुला दाखवी ती।।
सेवोनी तुष्ट ठेवी प्रति-दिवशिं तिचे पाय वंदी प्रमोदें।
आज्ञा पाळोनि साची वदवि गरिबही सून माझीच मोदे[२]।।७।।

**(आर्या)**

खंडोबाच्या भगिनी, सीताबाई दुजी उदाबाई।
असता माहेरीं ही,[३] प्रेमें वागूनि तोष त्या देई।।८।।
जिवलग मैत्रीण अशी, नणंदांना जाहली अहिल्या ही।
लिहिण्यास वाचण्याला, शिकवुनि त्यांना प्रमोद[४] बहु देई।।९।।
होते दास तशा त्या, दासीही फार या अहिल्येला।
परि त्या दास-जनांला, दुर्वचनें[५] त्रास लेश[६] नच झाला।।१०।।
''साध्वि-सती-अहिल्या, होउ शतायू[७]'' असें प्रभू-पाशीं।
प्रार्थिति सदैव दासी, या योगें तोष होइ बहु इजशीं।।११।।

**(स्त्रग्धरा)**

चाराचा चौघडा जैं घडघड करण्या लागतो तैं उठावें।
देवाचें नांव घ्यावें मग विधि करुनी[८] स्नान ही स्वच्छ व्हावें।।
प्रेमानें बालकृष्णा पुजुन तुळसही पूजुनी भक्तिभावें।
घाली फेऱ्या तियेला दर दिवस तिचा घालवी ती स्वभावें।।१२।।

**(आर्या)**

सासू श्वशुर कधिं कधिं, हांसत रागें हि भरत थट्टेनें।
भोळेपणा बघुनि हा, परि सत्क्रम[९] सोडिला नसेच हिनें।।१३।।
सेवकजनांकडूनी[१०], तैसी पितरांकडून[११] भार्येची।
स्तुति ऐकूनि आनंदे, खंडोबा मानि रत्नखनि[१२] साची[१३]।।१४।।
संयोग[१४] पत्नि-पतिचा[१५], करणारा समय पातला पतिनें।
सुख दिलें बहु इजला, हीहि तया रमवि फार प्रेमानें।।१५।।

---

१ सुंदर स्त्री, २ आनंद पावत असे, ३ अहिल्याबाई, ४ आनंद, ५ दुर्भाषणानें, ६ किमपि, ७ शंभर वर्षे वाचणारी, ८ प्रातर्विधि, ९ चांगला परिपाठ, १० चाकर-माणसांकडून, ११ आईबापांकडून, १२ रत्नांची खाण, १३ खरोखर, १४ मिलाफ, १५ नवरा बायकोचा.

### (शार्दूलविक्रीडीत)

गर्भाधान-दिनीं महाल सगळा शृंगारला, त्या स्थळीं।
हस्तीदंति पलंग त्यावरि, महाशय्या[१] असे घातली।।
पुष्पांचा रमणीय[२] वास[३] सुटुनी चित्ता बहू तोषवी।
खंडोबा सतिला करीं धरुनिया मोदें वरी[४] बैसवी।।१६।।

### (आर्या)

लग्नापूर्वीच हिनें, सीतादि सतिचें चरित्र खोदून।
हृदयीं ठेवून दिलें, होतें वागे तयास ती धरुन।।१७।।
स्त्रीचें दैवत पति हें, काया वाचा मनें करुन तया।
सुखवावें धर्म असा, साध्विचा[५] नित्य मानि ती सदया[६]।।१८।।
आज्ञा सदैव पाळी, पतिचें झाल्यावरीच भोजन ती।
जेवी बहु आनंदे, सासूला सासऱ्या करी प्रणती[७]।।१९।।
मृगया[८] करीत असतां, तत्पतिला[९] कधिं कधी दुपार टळे।
तद्भोजना[१०]-विना तरि,जलपानाच्या[११]-कडेहि मन न वळे।।२०।।
साध्वी पतिव्रता स्त्री, ज्यांना मिळते जगात तेच सुखी।
खंडोबा सुख द्याया, शब्द तिचा नित्य प्रीतिनें राखी।। २१।।
सुशील[१२] दंपति ऐसें, प्रेमाची वृद्धि ती करायाला।
झटतां दों वर्षांनीं, प्रेमांकुर[१३] लागला दिसायाला।।२२।।
झाली प्रसूत देवी, पुत्राला मालेराव नांव दिलें।
अत्यंत प्रेम आजा, आजी यांचें मुलावरी बसलें।।२३।।
जाता पति युद्धाला, ती साध्वी त्या सुताकडे बघुन।
कंठी वियोग-दिन हो, पूजन-भजनादि भक्तिनें करुन।।२४।।
लावण्य आणि गुणही, मातेचे घालुनी मुलीमाजीं।
विधिनें कन्या[१४] ऐसी, दिली त्यांना सुखाप्रती दे जी।।२५।।
मुक्ताबाई दिलें, नांव करी प्रेम माय[१५] तिजवरती।
पतिला मुक्त करुनी, जीहि स्वयें मुक्ति पावली सुसती।।२६।।

---

१ मोठा बिछाना, २ मनोहर, ३ सुगंध, ४ पलंगावर, ५ पतिव्रतेचा, ६ दयाळु, ७ नमस्कार, ८ पारध, ९ तिच्या नवऱ्याला, १० तो जेवल्याशिवाय, ११ पाण्याचा घोट घेणें, १२ सुखभावी जोडपें, १३ प्रेमाचा अंकूर (गर्भ), १४ ब्रह्मदेवानें, १५ आई (अहिल्याबाई)

### (शार्दूलविक्रीडीत)

संसारी सुख व्हावयास जगतीं जीं जीं जना साधनें।
व्हावीं तीं सगळींच लब्ध तिजला[१] देवा भजे सन्मनें[२]।।
सासू प्रेम मुली-परी तिजवरी तो सासराही करी।
कन्या, पुत्र, पती अखंड धनही बाई[३] सुखी ही खरी।।२७।।

### (आर्या)

बाळपणीं पितरांनीं[४], तरुण-पणीं पति-सुतादिकीं[५] दिलें।
तें सुख नष्टचि झालें, ईशे स्त्रीरत्न हें कसीं[६] धरिलें।। २८।।
दुःखद[७] कथा पुढें ही, श्रवण करावी ठसेल सद्बोध[८]।
चंदन स्वयें जळे तरि, गंधे सुखवी जना करी बोध।।२९।।

---

१. अहिल्याबाईला, २. चांगल्या मनानें, ३. अहिल्याबाई, ४. आई-बापांनीं, ५. नवरा, पुत्र वगैरेनीं, ६. कसावर, ७. दुःख देणारी, ८. चांगला उपदेश.

**अहिल्या-संसार-सुख नामक चौथा अंक समाप्त**

---

### अंक पाचवा

## पतिनिधन

### (वसंततिलका)

श्रीमान शूर अथवा सदसद्विचारी[१]।
चातुर्य-युक्त[२] परमेश्वरिं भार भारी।।
ऐशा नरा यम धरी स्वपुरास न्याया।
लज्जा नसे किमपि काय म्हणूं यमा या।।१।।

### (शार्दूलविक्रीडीत)

पोर्तुगीज निजाम शूर रिपुची[३] मोडूनिया खोडकी।
दिल्लीचा पति[४] तोहि हस्तक[५] असा राही नसे तोड की।।
राजस्तानपती[६] करुन सगळे सामंत[७] त्यानें[८] तदा।
शिंदे, होळकरादि ते बनविले सेवेकरी हो सदा।।२।।

---

१ चांगल्या वाईटाचा विचार करणारा, २ चतुर, ३ शत्रूची, ४ बादशाहा, ५ ताबेदार, ६ रजपुतान्यांतील राजे, ७ मांडलिक, ८ पेशव्यानें.

ऐसा थोर हिऱ्यापरीच चमके तो पेशवा भारतीं।
होतें सैन्य अफाट फार धनही होती प्रजेची रती[९]।।
श्रीमंते रघुनाथराव पृतना[१०] देऊनिया धाडिला।
हिंदुस्थानि वसूल खंड करण्या शिंदा सवें चालला।।३।।

---

९ प्रेम, १० सैन्य.

### (शार्दूलविक्रीडित)

रामाज्ञा[१] जशि मान्य त्या कपिवरा[२], तैशीच मल्हारजी।
आज्ञा पाळितसे म्हणून प्रभुला[३] कांहीं नसे काळजी।।
राघोबासह जावयास लिहिलें मल्हारबाला स्वयें।
तत्पत्रास[४] नमी ससैन्यसुत[५] तो त्याला[६] मिळायास ये।।४।।
खंडाचा महसूल फक्त करण्या-साठींच मोहीम ही।
नाहीं घोर लढाइ हींत म्हणुनी कन्या[७], स्नुषा[८] स्त्रीसही[९]।।
संगे घेउनि तो तया रघुवरा जाउनि भेटे यदा।
ती जंगी पृतना[१०] निघे झडकरीं खंडास घ्याया तदा।।५।।
गेला उत्तरदेशिं तो रघुपती तेथें नृपांनी तया।
खंडा देउनि पाहुणेर करुनी 'तुम्ही करावी दया'।।
ऐसे प्रार्थुनि सैन्यही मदतिला देऊनि सन्मानिला।
आनंदून निघे पुढें मग तसा कुंभेरीला पातला।।६।।

### (आर्या)

यश देवीचें[११]ज्यांच्या[१२], कर्णा-मध्यें शिरुन सुख झालें।
त्या[१३] भेटण्यास येतां, स्वागत करुनी तयांस[१४] तोषविलें।।७।।
प्रत्येक हिला[१५] म्हणती, 'साध्वी अहिल्ये तुझी बहू कीर्ति।
ऐकुन सीतादि सती, म्हणतिल सहवास[१६] -योग्य हीच सती'।।८।।

### (शार्दूलविक्रीडित)

जाटांचा नृपती सुरजमल जो, त्याला भटांचा पती[१७]
हट्टा पेटुनि 'कोटिखंड मजला द्यावा' म्हणे सन्मती।।
'देतों चाळिस लाख मी रघुपती ही दक्षिणा आपणा'।
नाहीं मान्य म्हणून 'जिंकिन तया' केलें रघूनें पणा।।९।।
मोर्चा लावुनि कुंभेरीवरि तदा गोळा सुरू जाहला।
जाटानेंहि चमूपती झडकरी संरक्षणा धाडिला।।

योद्धे थोर कितीक तेंवि रण तें जाती करोनी घरीं[१८]।
भूतांच्या पतिच्याच दीडमहिना झाला, न प्राप्ती बरी ।।

---

१ रामचंद्राचा हुकुम, २ मारुतीला, ३ पेशव्याला, ४ पेशव्याच्या पत्रास, ५ सैन्य व पुत्र यांसह, ६ राघोबाला, ७ सीताबाई व उदाबाई, ८ अहिल्याबाई, ९ गौतमाबाईला, १० सैन्य, ११ अहिल्येचें, १२ ज्या राजस्त्रियांच्या, १३ राज-स्त्रिया, १४ राजस्त्रियांना, १५ अहिल्याबाईला, १६ संगतीस योग्य, १७ रघुनाथराव, १८ कैलासीं.

केलें भोजन आणि येउन असा राहे उभा सत्वरीं ।
खंडोबा मग वैजयन्ति[१]-जवळीं हर्षेच युद्धा करीं।।
सूंसूं एक करीत गोलक[२] तदा आला यमासारखा।
खंडोबा-वरतीं पडून मग तैं केला पिता पारखा।।११।।

**(स्त्रग्धरा)**

गोळा वज्राप्रमाणें नृपति-वर-सुता[३] लागतां, शुद्धिहीन[४]।
खाली अंगास टाकी हरहर म्हणुनी तत्क्षणीं सांयुगीन[५]।।
ऐशा त्या मूर्च्छिताला झडकरिं शिबिरीं[६] नेउनीं सेवकांनीं।
ठेवूनी देउनी त्या शिव शिव अगदीं शोक केला तयांनीं।।१२।।

**(शार्दुलविक्रीडित)**

आला धावत बाप[७] मारित मुला हाका कशाला बरें।
एकाकी लढण्यास जाउन असा होऊनि आलास रे।।
कां नाहींस मुला अरे वदत तू काहीं तरी बोल बा।
ऐसा दाटत कंठ कंठिं मिठि तो घालीच मल्हारबा।।१३।।

**(स्त्रग्धरा)**

माता[८] ऐकून वार्ता, कहर उसळला काय देवा कसा रे।
केला त्वां घात माझा कुमरमृति[९]-मुळें हे प्रभो दीन सारे।।
झालों आम्ही, कसा रे तुजप्रति दिसला टाकुनी माय जाया।
खंडू रस्ता यमाच्या पुरिं वदुन तिनें घातलें त्याच ठाया।।१४।।
दादा आम्हांस आता तुजविण दुसरा कोण आणील[१०] गेहीं।
मोठ्या प्रेमें बिजेला[११] करुन धर मुली पैठणी घे तुला ही।।
नाहीं कोणीं वदाया सीता दुजि उदा-बाइ बोलोनि त्यांनीं।
भारी कल्लोळ केला सकल वसुमती अश्रुयुक्ता[१२] करोनी।।१५।।
कल्ला[१३] ऐकूनि आले रघुपति[१४]-मुख तैं शूर ते थोर थोर।
पाहूनी या प्रकारा रडत रडत ते स्तब्ध ठेले[१५] समोर।।

कोणी कांही न बोले हळहळत मनीं काय हा कोप देवा।
आम्हां सर्वांवरी तू करुन अवकृपा काय नेशीच रावा[१६]?।।१६।।

---

१ निशाणा - जरी पटक्याजवळ, २ तोफेचा (गोळा), ३ मल्हाररावाच्या मुलाला (खंडोबाला), ४ बेशुद्ध, ५ योद्धा (सांयुगीनो रणे साधु), ६ तंबूंत, ७ मल्हारराव, ८ गौतमाबाई, ९ मुलाच्या मरणामुळें, १० घरीं, ११ भाऊबिजेला, १२ आंसवांनीं भरलेली, १३ गोंगाट, १४ रघुनाथराव प्रमुख, १५ उभे राहिले, १६ खंडेरावाला.

हंबरडा फार मोठा मृत-पति[१] बघता, फोडिला त्या सतीनें[२]।
घाली तोंडांत माती वदन[३] बडवुनी 'काय केलें यमानें'।।

ऐसें बोले रडे ती फिरुनी फिरुनिया आपटी मस्तकाला।
भारी शोकास तेव्हां करुन मग करी बेत ही जावयाला[४]।।१७।।

**(शार्दूलविक्रीडित)**

माझा पुत्र न हा मनोरथ मला सोडूनि गेला स्वयें।
मातें[५] लोटुनि शोक-सागरिं[६] मुला जाऊ नको तूच, ये।।
मी मेल्यावर श्राद्ध तें करुनिया आत्म्यास रे तर्पण।
देणारा मज तूंच तूंच असता, जासी कसा आपण?।।१८।।
ऐसा शोक पिता बहूत करुनी निश्चेष्ट[७] भूमीवरी।
होवोनी पडला तशीच स्थितिही ती माय तेव्हां वरी।।
कांता[८] शोक पुरा करुन बदली 'येतें प्रिया मी त्वरें।
थांबा हो पुसतें नमून तुमच्या मातापित्यांना[९] बरें'।।१९।।

**(स्त्रग्धरा)**

पाणी नेत्रांस लावी रघुपति मग तो होउनी सावधान।
पाहे तों सर्व दुःखी, वर-सुत[१०] पडला, सून पाया पडून।।
आज्ञा मागें स्वताला पति-सह[११]-गमना, आणि जाटास[१२] शापी।
हे दुष्टा रौरवीं[१३] रे वसविल तुजला देव, तू[१४] फार पापी।।२०।।
मल्हारी लाल झाला विसरुनि सगळा शोक बोले अमर्षे[१५]।
'जाटाला ठार जेव्हां करिन नगरि[१६] ही ओस तैं पुत्र तोषे।।
किल्ला फेंकून सारा यमभगिनि[१७]-मधें देइना मी जरी हा।
जन्मा येउनि झालें विफल जनु मला निंदु भू-लोक[१८] हो हा।।२१।।
आहे ही ईवरेच्छा तिजप्रति मनुजें[१९] दोष देणें अयोग्य।
ऐसा साध्वी सतीनें निजमनिं करुनी त्या विवेकास[२०] योग्य।।

'मामाजी सुज्ञ आहां मज सहगमना पूर्ण आज्ञा असावी'।
बोलोनी ती सती तत्पदकमलिं[२१] शिरा स्फुंद स्फुंदोनि ठेवी ।।२२।।

---

१ मेलेला नवरा, २ साध्वी-अहिल्येनें, ३ तोंड, ४ सती जाण्यास, ५ मला, ६ शोक-समुद्रांत, ७ चलनवलन, रहित, ८ बायको (अहिल्याबाई), ९ (सासू सासऱ्याला), आई बापांना, १० श्रेष्ठपुत्र, ११ सती जाण्यास, १२ सुरजमल्लास, १३ नरकांत, १४ हे जाटा, १५ रागानें, १६ कुंभेरी, १७ यमुनेंत, १८ पृथ्वी, १९ मनुष्याने, २० विचारास, २१ त्या (मल्हाररावा)च्या पायांवर.

मालीरावास कन्ये[१]-सहि धरुन उरी न्हाणुनी अश्रुयोगें।
सासूच्या सासऱ्याच्या-जवळ मग तयां देउनी शिष्टि[२] मागे ।।
'कांताचा[३] योग नाहीं इह जरि घडला तो घडो स्वर्ग-लोकीं'।
ऐसी आशी[४] तुम्ही हो सकृप[५] मजवरी होउनी आज द्या कीं ।।२३।।
शो[६]कार्ता शब्द जेव्हां श्रवण करि पती माळव्याचा सुनेचे।
दाटोनी कंठ भारी रडत मग मिठी कंठिं घाली तियेचे ।।
बाई तू काय जाशी मजप्रति उघडें खंडुनें आज केलें।
तूं ही गेल्यावरी गे स्थविरपण[७] कसें कंठुं मी बोल बाले[८] ।।२४।।
मी झालों वृद्ध हीही[९] तूज दिसत नसे? वांकलेली [१०]जरेनें।
आम्हां दोघांस शोकीं बुडवुन मुलगा जाय स्वर्गी त्वरेनें।
त्याच्या पश्चात इच्छा जर सहगमनीं होत आहे तुला ही।
आम्हां वृद्धां अनाथां मग तनय[११] सुता[१२] कोण राखील पाही ।।२५।।
यासाठीं बाइ हो मी विनय[१३] नत तुम्हा प्रार्थितों भीक घाला।
सोडोनीया मला हो गमन करुं नये दीन ह्याही मुलाला ।।
तेव्हां खिन्ना स्नुषा ती बहु विनयवती हात जोडून याची।
'त्यांच्या-मागें तुम्हाला मज बघुनि व्यथा मात्र होईल साची'।।२६।।

**(शार्दूलविक्रीडित)**

तेव्हां वृद्ध म्हणे मुली करुं नको या साहसाला बये।
जाशी हट्ट धरुन तू तरि तसें आम्हीहि येऊ स्वयें ।।
चिंताऽऽक्रान्त[१४] सती मनीं वदतसे आतां करावें कसें?।
जातां सत्पति[१५]-मार्ग लक्षुनि तरी वृद्धान्त[१६] हा होतसे ।।२७।।

**(मंदाक्रान्ता)**

मामाजीचे श्रवण करुनी बेत हे ती मनाशीं।
बोले 'जावें तनय तनया आणि वृद्धादिकांशीं[१७] ।।

सांभाळावें पति-मुनियमा[१८] पाळुनी भक्तिभावें।
श्री-कृष्णाची प्रतिदिनिं पुजा की करोनी रहावें' ।।२८।।

---

१ मुक्ताबाईस, २ आज्ञा, ३ नवऱ्याचा, ४ आशिर्वाद, ५ दयाळु, ६ दुःखानें व्याप्त, ७ म्हातारपण, ८ मुली (संबोधन), ९ बायको ( गौतमाबाई ) ही, १० म्हातारपणानें, ११ मालीराव, १२ मुक्ताबाई, १३ विनयानें नम्र, १४ चिंतेनें व्याप्त, १५ श्रेष्ठ नवऱ्याचा रस्ता, १६ म्हाताऱ्यांचा शेवट, १७ म्हातारे वगैरेंना, १८ पतिव्रता स्त्रियांच्या नियमास.

मल्हारी तैं वदत मुलिला 'खंडु मानून तूंतें।
राहूं आम्ही सहगमन हो सोड हट्टा-सवें तें' ।।
तेव्हां साध्वी सज[१]लनयना बेत राहावयाला।
मोठ्या कष्टें करुन वदली मान्य मी राहण्याला ।।२९।।

तेव्हां सारा मृतविधि[२] पुरा जाहला दुःखितानें[३]।
पुत्राचें हो स्मरण म्हणुनी एक छत्री पित्यानें[४] ।।
तेथें भव्या[५] उठवुन दिली, कांही खर्चास ग्राम[६]।
देऊनी हो चिरस्मरण[७] तें चालवी तो इनाम ।।३०।।

**(शार्दूलविक्रीडित)**

व्हावा घात परंतु जाट कपटें दोघांमधे[८] भांडण।
लावी, याच मुळें तसाच पडला सिद्धी न गेला पण ।।
मल्हारी मग स्त्री, स्नुषा झडकरी घेऊनि ये इंदुरी।
तेथें शोक विवेक पूर्ण करुनी तो घालवी हो दुरी ।।३१।।

(**अहिल्या-पति-निधन नामक ५ वा अंक समाप्त)**

---

## अंक सहावा

**(उपेंद्रवज्रा)**

माता-पित्यांनी करुनी विचारा। दुःखास नाहीं दिलाच थारा[९] ।।
साध्वीस ऐसें करितां न आलें। तिनें दिनांला[१०] झुरण्यात नेलें ।।१।।

**(स्त्रग्धरा)**

पाहोनी तो पतिचा[११] हयवर[१२] दुसऱ्या वस्तु पाहोनि त्याच्या।
भारी शोका करुनी दर दिवस तिचा जाई दुःखात साच्या ।।

'जेथे सौभाग्य-योगें मम[१३] पति असतां नांदलें मी सुखानें।
तेथें वैधव्य-दुःखीं दिवस किति कसे कंठु, बाई श्रमानें'।।२।।
ऐसें बोले मनाशीं प्रतिदिवशीं झुरे अन्न कांहीं न खावें।
एका बाजूस कोठें तरि बसून तिनें सर्वदाही रडावें।।
पुर्वीच्या मैत्रिणींना बघुन भडभडे ऊर मानेस खालीं।
घालोनी स्फुंद स्फुंदे रमण[१४]-हिन पहा दीन बाई जहाली।।३।।

---

१ अश्रूंनीं डबडबले आहेत डोळे जिचे अशी, २ उत्तरक्रिया, ३ दुःखित अशा, ४ बापानें, ५ सुंदर व मोठी ६ गांवे, ७ चिरकालचें स्मारक, ८ शिंदे होळकरांत, ९ आधार, १० दिवसांना, ११ नवऱ्याचा, १२ श्रेष्ठ घोडा, १३ माझा, १४ नवऱ्याविना.

जातां ना कुंकुमाला झडकरिं अलिका[१] लावुनी मीं वदावें।
'बाई या हो बरें का' सखिजनहि[२] वदे, येउ' त्यांनींहि जावें।।
तो त्यांचा संघ[३] आतां असित[४] मम मुखा पाहुनी खिन्न झाला।
ऐसा तुम्ही कसा हा मजवर प्रभुजी आणिला दुःख-घाला।।४।।

**(शार्दूलविक्रीडित)**

ऐसा काळ तिचा कसातरि अहो जाया हळू लागला।
ये आज्ञा प्रभुची म्हणून लढण्या मल्हारबा चालला।।
राज्याचा भर त्या सुनेवरि स्वयें तो शूर दे टाकुन।
तो गंगाधर मंत्रि[५] नेमुन करी तैं घट्ट जाया मन।।५।।
जाता पानिपतीं सदाशिवसवें मल्हारबा चौगुले।
शिंदा, विंचुरवासि सर्व दुसरे योद्धे मिळाले भले।।
भाऊ घेउन त्यांस तो हळुहळू दिल्लीप्रती पातला।
त्यानें बादशहा तदा लुटुनिया तक्तीं दुजा स्थापिला।।६।।
'हें आहे अगदी अयोग्य तुजला' मल्हारबानें स्वयें।
त्याला सांगितलें तरी न फिरुनी वाटेवरी भाउ ये।।
कुत्सा तो करुनी तयास वदला 'रे मेषपाला[६] तुला।
मुत्सद्दीपण काय हें न कळलें का दोष देसीं मला।। ७।।
स्वामी-भक्त पुरा तयास दुसरा अद्यापि कोणी कधीं।
बोलोनी दुखवी न, राव[७] दुखवी वृद्धास[८] तेव्हां कुधी[९]।।
जो त्याला चुलत्या-समान असुनी ज्यानें करुनी रणें[१०]।
बापाला[११], चुलत्यास[१२] साह्य दिलें, त्याला अशा भाषणें।।८।।

तेव्हांपासुनि निश्चयास करुनी मल्हारबा स्वीकरी।
मौनातें, परि युद्ध तो निजबलें[१३] उत्साह[१४]-युक्तें करी।।
नाहीं त्या सकलांस लाभ धवला[१५] सत्कीर्तिचा[१६] जाहला।
त्यामध्यें[१७] पळुनी कितीक जगले, तैसाच हा[१८] वांचला।। ९।।

---

१ कपाळाला, २ मैत्रिणी, ३ समुदाय, ४ कृष्ण ( काळे ), ५ कारभारी, ६ मेंढ्या राखणाराला, ७ सदाशिवराव, ८ वृद्ध मल्हारराव, ९ दुष्टबुद्धीचा, १० युद्धे, ११ चिमणाजी आप्पाला, १२ बाजीरावास, १३ आपल्या सैन्यानें, १४ उत्साही, १५ शुभ्र, १६ चांगला लौकक, १७ पानिपतच्या लढाईत, १८ मल्हारराव.

**(शार्दूलविक्रीडित)**

इंदूराहुन मोहिमेवर[१] निघे मल्हारबा चौगुला।
तेव्हां राज्य बघावयास सतिला[२] नेमी, तिनें चांगला।।
राज्याचा मग कारभार करुनी संतुष्ट केली प्रज्ञा।
ऐसें ऐकुनि तोषला नरपती[३] मानी तिला आत्मजा[४]।।१०।।

**(स्त्रग्धरा)**

विप्रांना[५] दान देणें, अमरपति[६]-पुजा भक्तिभावें करुनी।
ऐसें आहे सुनेचें श्वशुर-वर बघे वागणें तो म्हणूनी।।
जाई युद्धार्थ राजा सुन प्रमद-युता[७] व्हावया-लागि मोठ्या।
देवोनी नेमणूका प्रतिदिवशिं तिला दान-धर्मा कराया।।११।।

**(इंद्रवज्रा)**

होता जरी दान करावयाला।
ओढा तरी ती कधिं ही बलीला[८]।।
हो हात लावीत नसे वसूल।
त्याच्याकडे[९] धाडिच साल[१०]-साल।।१२।।

**(स्त्रग्धरा)**

राज्याच्या कामाकाजीं तिजकडुन असे जाहला खर्च त्याला।
ठेवी बाई लिहूनी प्रति दिवशिं नृपा[११] सर्व दावावयाला।।
सारी सानंद[१२] झाली रयत इजप्रती प्रेमळा माय मानी।
ही कीर्ति ऐकुनी तो प्रमुदित[१३] नृपती होय तैं स्वाभिमानी[१४]।।१३।।
संग्रामांतून[१५] आले जन पळुन तया पाहुनीया व्रणींना[१६]।
साध्वी होऊनि दुःखी घळ घळ रडली, देउनी अन्नदाना।।
वस्त्रानें हीन त्यांना वसन जखमिंना लाविलें औषधाला।
ऐशी त्यांची व्यवस्था करुन मग घरीं संघ हा पोंचवीला।।१४।।

**(आर्या)**

मल्हारबा पुण्याला, परभारें जाइ त्या प्रभूचें[१७] हो।
सांत्वन करावया प्रभु, दिसतां दुःखाश्रु लागले वाहो ।।१५।।
विश्वासराव भाऊ, मजला सोडून एकटे गेले।
मल्हारबा कसें हो, या-परि नाना वदून तैं रडले ।।१६।।

---

१ स्वारीला, २ साध्वी अहिल्याबाईला, ३ ( मल्हारराव ) राजा, ४ मुलगी, ५ ब्राह्मणांना, ६ परमेश्वर, ७ आनंदित, ८ साऱ्या (चावडी)ला, ९ मल्हाररावाकडे, १० दरसाल, ११ मल्हाररावाला, १२ आनंदित, १३ आनंदित, १४ स्वतःचा आहे अभिमान ज्याला असा, १५ लढाईतून, १६ जखमींना, १७ पेशव्याचें.

हाहि[१] तदा शोक करी, भारी मग सांत्वनांस नानाच्या।
कष्टें करी कसें तरि, काहीं दिन राहिला घरीं त्यांच्या ।।१७।।
तेथें भूतदयेची[२], स्तुति ऐकूनि आपल्या सुनेची[३] ते।
झाले सानंद बहू, पुत्रापरि जीस मानिलें होतें ।।१८।।
जेव्हां श्रीमंत[४] स्वता, करुन तिचा फार फार स्त[५]व वदले।
'संकटिं साह्या करुनी, सर्वांना स्वगृहांस[६] पोंचविलें ।।१९।।
झाले अनंत सतिचे[७], उपकार जनावरी अशा समयीं।
आहों आभारी बहु, राहो शतवत्सरें[८] इथें बाई'।।२०।।
यापरि स्तुती सुनेची ऐकुन कोणा न हर्ष दाटेल।
साध्वी बाई ही ही, सीतासतिच्या परी न वाटेल ।।२१।।
या परिभवाऽऽधिमुळें[९], नानासाहेब जाइ वैकुंठा।
दुःखें इंदुरिं येउनि, मल्हारीही विसाववी कमठा[१०] ।।२२।।
मालीरावास पुरीं, द्वादश नप्त्रीसही असे नववें।
तेव्हां वर्ष म्हणुनिया, केलीं लग्नेंहि तैं तया रावें[११]।।२३।।
नप्त्रीस पानशांच्या, एथें दिलें मह्येवरीं रावें।
सुंदर वधू[१२] बघूनी, मालीरावास वृद्ध[१३] सुख पावे ।।२४।।
जरि कन्यापुत्रांची, लग्नें केलीं तरीहि संसारीं।
रति[१४] साध्वीची नाहीं, झाली खिन्नान्तती[१५] असे भारी ।।२५।।
सेवी न मद्य[१६]मांसा, अंगावरी एकही अलंकार।
घाली कधींहि न सती, रंगी वस्त्रास ती करी दूर ।।२६।।
कोठेंतरि क्षेत्राला, राहुन सार्थक करीन देहाचें।
श्वशुरास[१७] यापरी ती, याची तेव्हा म्हणेंहि तो साचें[१८] ।।२७।।
मग तो महेश्वरीं त्या, साध्वीला[१९] राहण्यास आज्ञा दे।
श्वशुराज्ञा[२०] मानुनि ती, तेथें मग राहिली बहू मोदें ।।२८।।

राज्याचा भार परी, नाहिं तिच्या काढला अहो वरचा।
तेथून राज्य पाही, श्वशुराज्ञा मोक्ष मानि ती साचा ।।२९।।
माहिष्मती असे ज्या, नगरीचें नाम हो पुराणांत।
बोलति महेश्वर तिला, रेवा-तीरीं[२१] असे बहू कांत ।।३०।।
अरुणोदयीं[२२] उठावें, नामस्मरणास भक्तिनें करुन।
प्रातर्विधि उरकुनि ती, स्नान करी नर्मदेस जाऊन ।।३१।।
देवपुजा करुन तिनें, गोदानांनीं[२३] द्विजांस[२४] सुखवावें।
भोजन करि, ग्रंथ बघे, पुराणे ऐके पुढें बहू भावें ।।३२।।
सायंकाळीं दर्शन, देवाचें घेउनी फराळाला।
सारावें मग सतिनें, ईवरभजनांत लोटि वेळाला ।।३३।।
नंतर थोडें निजणें, ऐशा नित्यक्रमास[२५] ती योजी।
असमाधान[२६] जरि कधीं, तरि मोडी ना हि या क्रमाला जी ।।३४।।

---

१ मल्हारराव, २ प्राणिमात्रावरील दयेचीं, ३ अहिल्याबाईची, ४ पेशवे, ५ स्तुति, ६ आपल्या घरांस, ७ साध्वी अहिल्याबाईच, ८ शंभर वर्षे, ९ पराभवाच्या योगानें झालेल्या मानसिक दुःखामुळें, १० धनुष्य, ११ मल्हाररावानें, १२ नवरी, १३ मल्हारराव, १४ प्रेम, १५ उदास अंतःकरणाची, १६ दारुला व मांसाला, १७ सासऱ्यास (मल्हारबाला), १८ खरें, १९ अहिल्याबाईला, २० सासऱ्याचा हुकुम, २१ नर्मदेच्या कांठीं, २२ बाम्ह मुहूर्तावर, २३ गोप्रदानांनीं, २४ ब्राह्मणांस, २५ नेहमींच्या क्रमास, २६ आजार वगैरे,

**(स्त्रग्धरा)**

झाली आज्ञा धन्याची[१], म्हणुन नरपती[२] द्यावयालागिं आजी।
मालीरावास संगें तनुजपरि[३] जया मानिलें तो तुकोजी ।।
घेवोनीया निघाला त्वरित रघुपती[४]-लागिं भेटेच जीन[५]।
राज्याचा भार बाई प्रतिनिधि-सह[६] ती वाहि त्या[७] काळजी न ।। ३५।।

---

१ पेशव्यांची, २ मल्हारराव, ३ मुलगा, ४ रघुनाथरावाला, ५ म्हातारा (मल्हारराव), ६ कारभाऱ्यासह, ७ मल्हाररावाला.

**(आर्या)**

तेव्हां रणें तुमुलही, झाल्यावर ते[१] अलंपुरा आले।
ठणके कान तयाचा, म्हणुनी हैराण फार ते[१] झाले ।।३६।।
औषध केलें बहु परि, गुण नाहीं वाटलें मुळीं न सुख।
मल्हारबा स्वदेवा[२], चिंतुनि सोसिति कसें-तरी दुःख ।।३७।।
निर्वाण[३]-वेळ जाणुनि, पौत्राला[४] त्या समीप बोलविलें।
हातीं तुकोजिच्या त्या, देउन 'सांभाळ रे मुला' बोले ।।३८।।

अहिल्याऽऽज्ञा पाळी, तिजला देऊन मदत आनंदें।
घेउन नाम-स्मरणा[५], वृद्ध[६] मिटी नेत्र तो बहू मोदें।।३९।।

**(स्त्रग्धरा)**

जो होता चौगुला हो श्रम बहु करुनी पावला राज्य मोठें।
प्रभ्वाज्ञा[७] मान्य केली सतनय[८] मरणा पावला, त्यास कोठें।।
स्वामीनिष्ठास जागा स्वनगरिंत नसे वाटुनी त्या यमानें।
केलें आतिथ्य[९] त्याचें मग शिवगिरिला[१०] धाडिलें त्यास मानें।।४०।।
कैलासीं पाहिलें तों स्वतनुज[११] दिसला, नाहिं पत्नी[१२] म्हणून।
थोडासा खिन्न झाला परि बहु दिन ही राहिली खिन्नता न।।
पत्नी ती गौतमाही, पति-निधन[१३] तिनें ऐकुनी दुःख केलें।
आली हर्षे पहाया भृडगिरिंत[१४] पती पाहुनी सौख्य झालें।।४१।।

**(शार्दूलविक्रीडित)**

दुःखाचा गिरि कोसळे सतिवरी[१५] किंवा तदा वज्र तें।
घेऊनी पडलें सतीस गमलें कष्टें गिळी दुःख तें।।
मालीराव पुढें करुन नृपती राज्यास ती चालवी।
भारी सुंदर ती कथा श्रुतिपथीं[१६] जावो सतीची नवी।।४२।।

**(अहिल्या-श्वशुर-निधन नामक ६ वा अंक समाप्त)**

---

१ मल्हारराव, २ जेजूरीच्या खंडोबाला, ३ मरणाची वेळ, ४ नातवाला, ५ देवाच्या नांवाचें स्मरण, ६ मल्हारबा, ७ पेशव्याचा हुकूम, ८ मुलासह, ९ आदरसत्कार, १० कैलासाला, ११ आपला मुलगा (खंडेराव), १२ बायको, १३ नवऱ्यानें मरण, १४ कैलासीं, १५ अहिल्याबाईवर, १६ कानांत.

---

### अंक सातवा

## सुत-निधन

**(शिखरिणी)**

दुरोनी पाहोनी हिम[१]नग मना तोष[२] गमतो।
दिसे भारी रम्या[३]ऽऽकृति परि तसा खास नसतो।।
कडे मोठे मोठे दिसति बहु गंभीर[४]चि गुहा[५]।
चढोनी जातांना सुख नसुन देई श्रम महा।।१।।

तसें या साध्वीचें चरित बघतां वाटत असे।
जरा सौख्या झालें प्रथम[६]वयिं आतां सुख नसे।।
पती गेला सासू गत तशिच झाली, श्वशुरही।
असे गेला तीतें त्यजुनि उघडी हो पडलि ही।।२।।

**(उपजाति)**

आतां हिला राज्य पहावयाचा।
प्रसंग आलाच, उपाय साचा।।
कांहीं नसे यास्तव या सतीनें।
केलें तदा राज्य स्वयें धृतीनें[७]।।३।।

**(शालिनी)**

आलंपूरीं मालिरावास वस्त्रें।
गादीची तैं देउनि शस्त्र अस्त्रें।।
राघोबा तो जाइ जेव्हां पुण्याला।
इंदूरीं तो मालिराजा हि आला।।४।।

**(शार्दूलविक्रीडित)**

मालीराव प्रभू[८] पित्यापरि[९] दिसे जो शूरही चांगला।
तो राज्यीं बसतांच बालिश[१०]तसा वागावया लागला।।
राज्याचें नुकसान हा भरुनियां काढील ऐसें जना।
मातेलाहि[११] तसेंच वाटत असे गेल्या वृथा कल्पना।।५।।

---

१ हिमालय, २ आनंद, ३ मनोहर आकाराचा, ४ खोल, ५ दऱ्या, ६ बालपणीं, ७ धैर्यानें, ८ राजा, ९ खंडोबाप्रमाणें, १० मूर्ख, ११ आईला (अहिल्याबाईला)

**(स्त्रग्धरा)**

मातेनें त्या करावी अतिथि[१]वरपुजा फार हो भक्तिभावें।
विप्रांनां गोप्रदानें धनवसन तसें देउनि तोषवावें।।
मालीराजा द्विजांना प्रतिदिवशिं अहो दानपात्रीं[२] विखारी[३]।
विंचू घालून त्यांना मग वदत असे 'घ्या तुम्ही द्रव्य भारी'।।६।।
''माझ्या हातून झालें खडतर अगदीं पाप मागील जन्मीं।
यासाठीं दुष्ट पोरा प्रसवुन जननी या पदा पावलें मी।।
बाई! वंध्यत्व होतें सुसह मज'' वदे 'काय आता करावें'।
विप्रांच्या लागुनीया मग पदकमलीं ती[४] क्षमा याचि भावें।।७।।

**(उपजाति)**

एके दिनीं प्राशून[५] मद्य फार।
करुन स्वारी[६] करि दुष्टचार[७]।।
दिवाण[८] कार्यार्थचि[९] तत्र[१०] आला।
त्यानें[११] दिला फारचि ठोक त्याला।।८।।

**(शिखरिणी)**

तुकोजीरावानें स्मरुन चुलत्याच्या उपकृती[१२]।।
तसी आज्ञा त्यानें मृति-समयिं[१३] केली सकल ती।।
धरुनीया चित्तीं जननिपरि मानीच सुसती।
नृपा[१४] बंधू ; होती सुजन सुखवाया बहु रती।।९।।

**(स्त्रग्धरा)**

एकांती मालिरावा धृति धरुन वदे एकदा तो तुकोजी।
'दुष्कृत्यानें तुझ्या या पडतिल नरकीं बाप आजाहि आजी।।
माता दुःखाश्रु ढाळी बघ दिन तिजला जाई दुःखात सारा।।
यासाठी सोड कृत्यें' नृपवदत[१५] असे दुष्ट तो यास मारा।।१०।।

**(शार्दूलविक्रीडीत)**

गुद्दे देउन त्यास तो नृप[१५] वदे 'जावे अरे तू घरा'।
एथें तू पद आपलें पुनरपि ठेउं नये पामरा[१६]।।
चित्तीं ठेउन वाग नाहिंतर मी काढीन राज्यातुन।
दुष्टें फार शिव्या तयास[१७] दिल्या; जाई तुका तेथुन।।११।।

---

१ श्रेष्ठ अतिथीची पुजा, २ दान देण्याच्या भांड्यांत, ३ विषारी, ४ अहिल्याबाई, ५ पिणें, ६ मालीराव, ७ चेष्टा, ८ गंगाधर, ९ कामाकरितां, १० तेथें, ११ मालीरावानें, १२ उपकार, १३ मरणाचे वेळीं, १४ मालीरावाला, १५ राजा, १६ नीचा, १७ तुकोजीला, मालीरावास बंधू मानी.

**((शार्दूलविक्रीडीत))**

येई जैं लहरी तदा[१] परिजना[२] बक्षीस देई बरें।
शिक्षा त्या अपराधहीन[३] स्वजना देई करी घाबरें।।
राजा वेनच जन्मला पुनरपी ऐसें जना भासलें।
मातेच्या वदनाकडे बघुनिया सोसीत त्रासा भले[४]।।१२।।

**(स्त्रग्धरा)**

जैसें नासून गेल्या तरुशिखरफला[५] भूमि आकर्षणानें[६]।
खालीं पाडी तसा हा वरनृपतिपदा[७]-पासुनी त्या मृतीनें[८]।।
पाडोनी त्यास नेला सकल-जन-मुखीं वृत्त झालें असें की।।
'ती देवी आत्मजाला विषय[९]-जन-सुखा-लागिं धाडीच नाकीं[१०]।।१३।।

जी साध्वी पुण्यकर्मे प्रतिदिवशिं करी धर्मकृत्यांत काल।
सारा जी घालवी ती स्वसुत[११] हनन या पातकाला करील?।।
ऐसें होणेंच नाहीं प्रसृत[१२] जनमुखीं वृत्त झालें असत्य।
साची वार्ता असी की 'कितितरि दिन तो रुग्ण[१३] होताच सत्य।।१४।।

**((शार्दूलविक्रीडीत))**

कोणी एक प्रसिद्ध मांत्रिक तदा त्या इंदुरीं राहुनी।
मालीराव-नृपास रोज फसवी दासीसही भोगुनी।।
ही वार्ता कळली तई, नवनृपें आणूनि त्या मांत्रिका।
सत्याऽसत्य न पाहतां मग करी आज्ञेस 'मारा ठका'।।१५।।

**(स्त्रग्धरा)**

तेव्हां त्या मांत्रिकानें नृप-पद[१५] धरिलें बोलिला तो नृपाला।
'नाहीं कृत्यांत या मी मज नृपति-वरा, मारणें पामराला।।
नाहीं रे योग्य कांहीं जर मजप्रति तू मारशी न्यायहीन।
होऊनी भूत राजा उरिं बसुन तुझ्या खास घेईन प्राण'।।१६।।

मारुनी ठार त्याला मग नरपतिनें[१६] चौकशी चालवीली।
तों केलें कृत्य खोटें प्रतिति असि तदा त्या नृपाळास आली।।
'होवोनी भूत आता उरिं बसुन मला मारितो खास हा की'।
ऐशी त्याच्या मनाला दहशत[१७] बसली याच शब्दांस घोकी।।१७।।

---

१ तेव्हां, २ चाकराला, ३ निरपराधी, ४ सुजनलोक, ५ झाडाच्या शेंड्यावरील फळाला, ६ गुरुत्वाकर्षणानें, ७ श्रेष्ठ राजपदापासून, ८ मरणानें, ९ राज्यांतील लोकांच्या सुखासाठीं, १० स्वर्गांत, ११ आपल्या पुत्राची हत्या, १२ पसार, १३ आजारी, १४ खरें खोटें, १५ राजाचे पाय, १६ मालीरावानें, १७ धास्ती.

देवी साध्विस तेव्हां सुत-निधन[१] दिसू लागलें, त्यास तीनें।
अंगारा आणि दोरा निजसुत[२] उठण्या फार केला सतीनें।।
केलेले यत्न सारे सफल अगदिंही नाहिं झाले, मुलानें।
साध्वीला आणि प्राणां मग पति-गमनें[३] सोडिलेंही सुनेनें।।१८।।

ज्यानें गादी श्रमानें मिळवुनि तनुजा[४]-साठिं केल्या लढाया।
जो योद्धा फार मोठा प्रबल अरि ज्या लागती हो नमाया।।
जो स्वामीनिष्ठ मोठा, रघुपति-मुख ते मानिती ज्यास फार।
त्याच्या वंशांकुराला[५] खुडुन यम कसा दुष्ट झालाच गार।।१९।।
भर्ता सोडून गेला, श्वशुर मग निघे जावया स्वर्ग-लोका।
सासू गेली तयांना अनुसरुन पुढें पुत्र गेलाच ना का।।
साध्वी देवीवरी हा क्रम धरुन कसा कोपला देव साच्या[६]।
दुःखाचा अंत नाहीं अजुन प्रभुवरें[७] काहि केला सतीच्या।।२०।।

**(पृथ्वी)**

असो चतुर वा नसो रत[८] परोपकारी न वा।
असो विमल[९] मानसीं[१०] व्यसनहीन पापिष्ठ वा।।
दिलें जननिला जरी सुख तसेंच दुःखा जरी।
तरी निजसुतास ती स्वमुख[११]-कंद मानी खरी।।२१।।

**(शार्दूलविक्रीडित)**

होता अंत मुलास घालुन मिठी आकांत केला तिनें।
कांताला, श्वशुरास आठवुन त्या सासूसही साध्विनें।।
देवा अंत किती पुढे बघसि या साध्वी सतीचा अरे।
सर्वज्ञा तुज हें कसें न कळलें अद्यापि सोनें खरें।।२२।।

**(स्त्रग्धरा)**

सोन्याचा पारखीही कनक[१२] बघुनिया त्यास भट्टींत टाकी।
झालें तें लाल भारी मग उचलुनिया त्यास भारीच ठोकी।।
टाकी भट्टींत त्याला पुनरपिहि पुन्हां ठोक ठोकोनि त्याला।
लावी भारी कसाला तशिच कृति[१३] दिसे ईवराची जनाला।।२३।।

(**अहिल्या-पुत्र-निधन नामक अंक ७ वा समाप्त**)

**पूर्वार्ध - समाप्त**

---

१ मुलाचें मरण, २ आपला मुलगा, ३ सती जाऊन, ४ मुला, ५ वंशाच्या रोप्याला, ६ खऱ्या (साध्वी देवीवर ), ७ ईश्वरानें, ८ निमग्न, ९ निर्मल, १० मनांत, ११ आपल्या सुखाचा गड्डा, १२ सोनें, १३ करणी.

## अंक आठवा

# राज्यसंकट

### (भुजंगप्रयात)

'जगीं सर्व सुखी असा कोण आहे'।
समर्थाऽग्रणी[१] वाक्य चित्तांत घ्या हें।।
जयानें स्वयं राज्य केलें, तसी ती।
यशःप्राप्ति[२] ज्याला अहो नित्य होती।।१।।
तयाचा पुढें वंश निर्वंश[३] झाला।
निवापास[४] त्यानें दुजाच्या मुखाला[५]।।
पहावें अशी प्राप्त झाली स्थिती ज्या।
कसें दैव कोपे सतीच्याच[६] राज्या?।।२।।

### (मालिनी)

क्षत्रिय असे जो राज्य मोठें मिळून।
प्रतिनिधिपरि[७] पावें मान राजाकडून।।
सकल अज अजांना[८] राखणें दूर सारी।
प्रबलतम[९] अरींना[१०] लोळवी शूर स्वारी[११]।।३।।

### (स्त्रग्धरा)

मल्हारी थोर कीर्ति मिळवुन जगतीं वाजवी नाम[१२]–ढक्का।
त्यामागें बैसला तत्तनुजसुत[१३] पदीं मालि जो मूर्ख पक्का।।
ऐशाही मूर्ख पोरा बघुन कसितरी घालवी साध्वि काला।
देवाला पाहवेना म्हणून यम तिचा पुत्र नेई पुरीला[१४]।।४।।

### (शार्दूलविक्रीडित)

गेलें राज्य न हें लया[१५] मज गमे ही ईश्वराची दया।
त्यानें बुद्धि दिली तदा सतिस हें द्याया तया पेशव्या[१६]।।
तीतें राज्य मिळे प्रजेस सुख तें द्याया झटूं लागली।
इत्यादी सुकथा[१७] तुम्हा परिसुनी होवो मती चांगली।।५।।

---

१ समर्थ श्रेष्ठ (रामदास), २ यशाचा लाभ, ३ तिरांतात, ४ तीलांजलीला, ५ तोंडाकडे, ६ अहिल्याबाईच्या, ७ मुख्य प्रधानाप्रमाणें, ८ शेळ्या मेंढ्यांना, ९ सर्वांत प्रबल, १० शत्रुंना, ११ मल्हारराव, १२ नांवाचा डंका, १३ त्याच्या मुलाचा मुलगा (मालीराव),१४ शहराला, १५ नाशास, १६ माधवरावास, १७ चांगली कथा (गोष्ट).

मालीराव मृतीमुळें[१] सकळिका[२] चिंता नवी लागली।
कोणा मालक नेमु गादिवर या राज्या करो माऊली[३]।।
हिंदूधर्म असा असे मुलिप्रती राज्याऽऽप्ति[४] नाहीं कधी।
तेव्हां त्या सतिला बरा न दिला सल्ला प्रधानें[५] कुधी।।६।।
तेव्हां मालवदेशिं तो रघुपती सैन्यास घेऊनिया!
होता हिंडत त्यास लांच मुलगा ओट्यामध्यें घ्यावया।।
द्यावा हें कथिलें तिला कुमतिनें[६] धर्मार्थ[७] प्रांता जरा।
घेवोनी मग स्वस्थ वा घरिं बसा क्षेत्रें तुम्ही तीं करा।।७।।

**(शिखरिणी)**

दिवाणाचा होता मतलब असा की बसवुनी।
मुलाला या राज्यीं सकल नृपसत्ता[८] हरवुनी।।
स्वयें या राज्याची अधिकृति[९] बघावीच, सतिनें[१०]।
घरीं वा सुक्षेत्रीं बसुन करणें देव-भजनें।।८।।

**(उपेंद्रवज्रा)**

म्हणून बोले जरि कारभारा।
कराल तुम्ही तरि तो दरारा।।
जनावरी नाहिं बसावयाचा।
मुलास घ्यावें नृप तोच साचा।।९।।

**(शार्दूलविक्रीडीत)**

पाणीदार सती मुळीं न बदली त्याला वदे सत्वरीं।
'राज्या वारस जे नृपाळ बसले इंदूरिं गादीवरी।
एकाची जननी[११] असून वनिता[१२] एका नृपाची अरे।
आहें मी म्हणूनी मलाच करणें हें राज्य बाबा बरें।।१०।।
लांचा देउन मी कधीं न मुलगा ओट्यामध्यें घेइन।
राज्या चालवुनी प्रजा मम[१३] सुता-पेक्षां बहु मानिन।।
जो जो धर्म मला असेल करणें तो तो स्वतांच्या करें।
देणारी असतां कसें मग पर-स्वाधीन[१४] होऊं बरें? ।।११।।

---

१ मरणामुळें, २ सगळ्यांना, ३ मातोश्री (अहिल्याबाई), ४ राज्याचा लाभ, ५ गंगाधरानें, ६ दुष्टबुद्धी (जो प्रधान त्या)नें , ७ दानधर्म करण्याकरितां, ८ राजाचा अधिकार, ९ अधिकार, १० अहिल्याबाईनें, ११ आई, १२ बायको, १३ माझ्या, १४ दुसऱ्याच्या ताब्यात.

ऐसें भाषण योग्य ती[१] करुन ही बोले तयाला[२] पुन्हा।
'घ्यावें बालक तें कसें करिल हो हें राज्य मोठें पहा।।
मामाजी[३] कर तो धरुन वदले जें त्या तुकोजी-प्रती।
ती आज्ञा शिरसाप्रमाणच तशी वागेन मी संप्रती' ।।१२।।

**(शिखरिणी)**

तुकोजी हा राजा म्हणुन फिरवी द्वाहि[४] सुमती।
तया भावोजीला कथि मग 'पहा ही वसुमती'[५] ।।
असी त्या साध्वीची सरल कृति वाटे कटु अती।
करी यत्ना भारी सचिव[६] फिरवाया तिजप्रती[७] ।।१३।।

**(स्त्रग्धरा)**

लोभी गंगाधरानें बघुनच अबला घात आतां करावा।
ऐसी इच्छा धरुनी मग लिहि खलिता तो रघूनाथरावा।।
'हें मोठें राज्य आता प्रभुवर तुमचें येउनी चालवावें।
कोणाचा हक्क नाहीं त्वरित रघुपती येउनी राज्य घ्यावें'।। १४।।
नानासाहेब ज्याला प्रिय बहुत असे राम[८] जैसा अनंता[९]।
ज्यानें मोठ्या लढाया करुन मिळविलें लौकिकाला अनंता[१०] ।।
तो राघोबा भरारी कलही करुनिया भ्रातृजा[११] माधवाला।
बोले 'राज्यार्ध द्यावें' प्रणिहित[१२] नच हो, घालि ही एक घाला।।१५।।

**(शार्दूलविक्रीडीत)**

होता माधव शूर दूरवर ती दृष्टीहि होती जया।
त्यानें त्या चुलत्यास[१३] तैं पळविलें युद्धास देउनिया।।
तेव्हां मालवदेशिं राज्य मिळतें ऐसें तया वाटलें।
दुष्टें त्या सचिवें तदा मदतही देऊन बोलाविलें।।१६।।

**(स्त्रग्धरा)**

मी येतों, साह्य आता मजप्रति तुमचें पाहिजे इंदुराला।
ऐसी चिठ्ठी रघूची बघुन सुख मना वाटलें ब्राह्मणाला[१४] ।।
ही वार्ता त्या नणंदेप्रति मग कळली साध्विला बोलली ती।
झाला हा दुष्ट पाजी द्विजवर[१५] उलटा, यास[१६] काढा सुयुक्ती।।१७।।

---

१ अहिल्याबाई, २ कारभाऱ्याला, ३ मल्हारराव, ४ दंवडी (डांगोरा), ५ पृथ्वी (राज्य), ६ गंगाधर यशवंत, ७ कृतीला, ८ दाशरथी राम, ९ लक्ष्मणाला, १० अमर्याद, ११ पुतण्याला, १२ मिळालें नाहीं, १३ राघोबास, १४ कारभाऱ्याला, १५ ब्राह्मणश्रेष्ठ, (गंगाधर), १६ ह्याविषयीं योग्य व्यवस्था करण्यास.

**(शिखरिणी)**

उदाबाई बोले सतिप्रति तदा वाक्य सरतें[१]।
तुम्हा दाणा-गोटा भरडुन भरावें उदर[२] तें।।
तशी आम्हा भिक्षा मिळवुनच लागेल भरणें।
असा आला वाटे समयच[३] उपायास करणें।।१८।।

**(शार्दूलविक्रीडित)**

झाली लाल सती तिला मग वदे 'तू स्वस्थ राहा बये।
प्राणा देइन मी परी द्विजकरीं हें राज्य जाउ नये।।
ऐसा काहि तरी इलाज करितें, देवो मला धैर्य ती।
देवी साह्य करो तसें' म्हणुनियां केली शिवेला[४] नती।।१९।।

**(आर्या)**

बाजी-पुत्र शिवाला, आत्माजीच्या सुतास बोलाविलें।
राजाराम जयाचें, नाम तसा सकल वृत्त[५] ऐकविलें।।२०।।
ब्राह्मण हरामखोरी, करितो आहे तरी तया सांगा।
''देईन मी लढाई, अपयश येतां तुम्हां नसे जागा।।२१।।
(युग्म) माझ्या श्वशुरानें हें, राज्य मिळविलें बहू श्रमानें जी।
ते राज्य सहज तुम्हा, प्राप्त कधीं होइना करा आजी''।।२२।।
ऐसें बोलून सती, राजांनाही[६] लिहीच लेखास[७]।
''आज जशी स्थिति माझी, तैशी तुमचीहि ती पुढें खास।।२३।।
(युग्म) माझें बेवारस हें, राज्य पहातो रघूपती घ्याया।
न्यायाऽन्याय न पाही, यास्तव साह्या करावयाला या''।।२४।।
साध्वीचें पत्र बघुन, निचय केला तया नृपांनींही।
''सत्पक्ष[८] धरुनि आपण, साह्य करुं या सतीस पुष्कळही''।।२५।।

---

१ शेवटचे, २ पोट, ३ प्रसंग (वेळ), ४ देवीला (पार्वतीला), ५ हकीकत, ६ स्नेही राजांना, ७ खलित्यास, ८ खरी बाजू.

**(शार्दूलविक्रीडीत)**

तेव्हां दीर तिचा[१] तुकोजि सगळ्या फौजेस घेऊनिया।
मेवाडांत उदेपुरीं नृपतिच्या[२] कार्यार्थ होता तया।।
धाडी पत्र 'तुम्ही चमू[३]सह स्वतां यावें इथें सत्वरी'।
आज्ञा पत्र बघूनि तो परतला, आला तुकोजी घरीं।।२६।।

वंदूनी सतिला म्हणे मग तिला 'आज्ञा कशाची मला।
आहे' तैं वदली सती सकलही 'तो पेशवा[४] आपला।।
आहे घात करीत त्यास दुसरा तो साह्य गंगाधर।
यासाठीं धृतिला धरुन मग हें सांभाळ तूं इंदुर'।।२७।।
केला बेत परंतु पार[५] फसला जाणूनि गंगाधरें।
येथूनी[६] पळुनी रघूस मिळण्या जावें अती सत्वरें।।
ऐसा बेत करुन तो निघुनही गेला, मिळाला नवा।
त्यांनीं बेत करुन ते निघति ही त्या इंदुरा तेधवा।।२८।।

**(शिखरिणी)**

अहिल्याबाई तैं लिहि सकल वृत्तांत सकृपा[७]।
पुण्याला धाडाया बहुत चतुरा माधव-नृपा।।
'अशा वेळीं कन्ये-परि अवन[८] राजा मम करा।
मला साह्या द्याहो अनय नय पाहा बहु बरा'।।२८।।

**(आर्या)**

सतिनें पत्र असें तें, माधवरावास धाडिलें तेव्हा।
सरदार धाडिलाही, कळवाया सकल भेद त्याला हा।।३०।।
ती बाइ अहिल्या मग, माधव-पत्नी रमासती इजला।
उंची नजराण्यासह, धाडि दुजें पत्रही करी नतिला[९]।।३१।।

**(स्त्रग्धरा)**

ऐका तें पत्र आतां, ''सकल-गुणवती श्रीमती पुण्यवासी[१०]
सौभाग्या[११]ऽखंण्डलक्ष्मीऽयुत सदय[१२] रमा-बाइला दीन[१३] दासी[१४]

---

१ अहिल्याबाईचा, २ राजकारणाकरितां, ३ सैन्यासह, ४ रघुनाथराव, ५ अगदी, ६ इंदुराहून, ७ दयाळू अशा, ८ रक्षण, ९ नमस्काराला, १० पुण्यात राहणारी, ११ सौभाग्य आणि अखंड लक्ष्मी यांनी युक्त, १२ दयाळू, १३ गरीब, १४ चाकर.

प्राथीं चित्तास द्यावें श्रवण करुनिया योग्य तैसें करावें।
श्रीमंताच्या कृपेनें विभव[१] मिळविलें सासऱ्यानें पहावें।।३२।।
या साठीं सर्वसत्ता[२] मम[३] करिं[४] असणें योग्य आहे नव्हे कां?।
दादासाहेब आम्हां-प्रति सचिव अहो साह्य घेऊन बाका[५]।।
वाकायालाच लावी करणि बरि नव्हे हें पतीलागिं[६] सांगा।
हें आम्हां अन्न चालो सतत परिजनीं[७] लोभ ठेवूनि वागा।।३३।।

**(शार्दूलविक्रीडीत)**

आला सन्निध तो रघूपति तदा धैर्या धरुनी सती।
बोले ती सकला प्रजेस 'तुमची ठेवा तयारी अती'।।
सेनेच्या अधिपास[८] ही मग कधी 'सैन्यास घेऊनियां।
माझ्या हत्तिवरी शरांसह धनू ठेवा लढाईस या'।।३४।।
दासी दास तसेंच लोक असती संतुष्ट ज्या साध्विला।
तीतें तें खुष सैन्यही जननिसें मानी तया बाइला।।
याचें कारण त्यास[९] ती कधिं कधीं बक्षीस देई भलें।
मोठें, आणि पराक्रमा स्तवुनिया मानी तयांना मुलें।।३५।।
ऐसें सैन्य तयार होय मग ती धाडी निरोपासही।
राघोबास तदा 'स्वतां असुन मी भीरु[१०] नसे शूरही।।
तुम्ही वाकव शूर वीर-वरही आहां परंतु त्वरें।
सेना जिंकिल माझि तैं मुख तुम्ही दावाल कोणा बरें'।।३६।।

**(आर्या)**

गाइकवाडाच्यापरि नागपुराच्याहि त्या अधीशानें[११]।
सेना[१२] मदतीस तिला, धाडुन दिली बहूत प्रेमानें।।३७।।
रेवा[१३]-तटिं येउन ती, तळ[१४] देउनि राहिली लढाईला।
दुसऱ्याही राजांनी, येतों मदतीस कळविलें तिजला[१५]।।३८।।

---

१ वैभव, २ अधिकार, ३ माझ्या, ४ हातांत, ५ चतुर, ६ नवऱ्याला (माधवरावाला), ७ चाकरावर, ८ सेनापतीस, ९ सैन्यास, १० स्त्री, ११ राजानें, १२ वीस हजार सैन्य, १३ नर्मदेच्या कांठीं, १४ छावणी, १५ अहिल्याबाईला.

**(स्त्रग्धरा)**

साध्वीचा पोंचला जैं रघुपति प्रति तो लेख वाचून फेंकी।
युद्धाचा बेत केला झडकरिं निघुनी येइ क्षिप्रे तटाकीं[१]।।
होते आतां लढाई म्हणून निजशिरा[२] साध्वि[३]-पायींच आशी[४]।
घ्याया ठेवी तुकोजी तिथुन मग निघे युद्ध द्याया रघूशीं।।३९।।

**(शार्दूलविक्रीडीत)**

राघोबास तुकोजि पाठवि अशा तेव्हा निरोपाप्रती।
'क्षिप्रेच्या इकडे[५] तुम्ही जर पदा ठेवाल हो तैं अती।।
देऊ ठोक तुम्हास योग्य करणें वाटेल तें आपण।
आहां थोर परंतु गाठीं मजशीं सिद्धीस नेतों पण।।४०।।

**(आर्या)**

विवास घातकी त्या, सचिवाला आणि दोष दादाला।
अन्यायाबद्दल हो, देउन शिंदा[६] वदे रघूपतिला।।४१।।
''अहिल्याबाईवर, मी नाहीं शस्त्र हें धरायाचा।
होईन साह्य तिजला,'' धैर्य-रहित होय तैं रघू साचा।।४२।।
या समयींच पुण्याहुन, आज्ञापत्रास धाडि माधव ही।
''बाई[७] मुखत्यार असे, मन माने राज्य तें करो स्त्री ही।।४३।।
(युग्म) याला कोणी व्यत्यय[८] केला असतां, तयास शासन[९] मी।
करण्यास सिद्ध आहें तत्पत्राला[१०] सती बहूत नमी।।४४।।
तेव्हां करि निश्चय ती, गंगाधरसह रघूपतीचा ही।
उतरवितेंच नक्षा[११]'' बोलुनि युद्धार्थ चालली सति ही।।४५।।
''सरदार साह्य नसतां, युद्धीं जय लाभणें बहू कठिण।
आहे तुकोजि योद्धा, नेइल सिद्धीस आपलाच पण।।४६।।

---

१ क्षिप्रा नदीच्या काठीं, २ आपल्या मस्तकाला, ३ अहिल्याबाईच्या पायांवर, ४ आशिर्वाद, ५ अलिकडे, ६ माधवराव शिंदे, ७ अहिल्याबाई, ८ अडथळा, ९ शिक्षा, १० माधवरावाच्या पत्राला, ११ खोडकी.

माधवरावाचेंही, अनुमोदन[१] या नसेच कृत्यास।
स्त्रीशीं युद्ध करुन मी, डाग कसा लावु हा स्ववंशास''।।४७।।
ऐशा पोक्त विचारा, राघोबानें मनांत मग केलें।
धाडुनि कारकुनाला, तुकोजिरावास हें असें पुसिलें।।४८।।
''मालिराव मृती-स्तव, दुःखवटा घेउनी समाचारा।
आलों आहें तुमचा, हेतू युद्धार्थ भासतो सारा[२]''।।४९।।
तेव्हां तुकोजिरायें, उलटुन दादास धाडिलें पत्र।
''सेना कशास संगें, प्रभु[३]वसें आणिली असो तत्र[४]।।५०।।
देतों धाडून तुम्हा, येण्याला पालखी सुखें यावें।
हें राज्य असे तुमचें, दासजनावरि[५] कृपा करा भावें।।५१।।
विप्रा[६]ऽऽशीर्वाद मला सुख देउनि कीर्तिचाहि वर्धिष्णू[७]।
होवो ऐसी इच्छा, सद्विप्रचि[८] तो अम्हां जनां विष्णू''।। ५२।।
जावा सर्वहि संशय, म्हणुन रघू पालखींत बैसून।
आला सडा, तुकोजी, सन्मुख जावोनि त्या करी नमन।।५३।।

दोघे दुःखी झाले, कंठ भरुनिही तसेंच दोघांना।
आले इंदूरी मग, प्रासादाजवळ[९] ठेवि दादांना।।५४।।

**(मालिनी)**

उपकृति[१०] करणाऱ्या साध्विचा कारभारी।
उलटून पडलों हें जाहलें पाप भारी।।
मसलत फसली हें जाणुनी तो[११] मनांत।
मग यति[१२] बनलाही राहि रानावनांत[१३]।।५५।।

---

१ अनुमत, २ सगळा, ३ महाराजांनीं, ४ तेथें, ५ सेवकावर, ६ ब्राह्मणाचा आशर्वाद, ७ वाढविणारा, ८ चांगला ब्राह्मणच, ९ राजवाड्याजवळ, १० उपकार, ११ गंगाधर, १२ संन्याशी, १३ खानदेशांतील अणकूबाईच्या रानांत.

**(स्त्रग्धरा)**

आलीं साह्यास सैन्यें म्हणून सति तया-लागिं हो मेजवानी।
देई आनंदयुक्ता सुकनक[१]-कटकें देउनी त्यांस वानी।।
गेलीं स्वस्थानिं सैन्यें स्तवन करित त्या साध्विचें स्थानस्थाना।
भारी कौशल्य[२] दावी सकल जन मुदें वाटिती शर्करांना।।५६।।

**(मालिनी)**

वसुन रघुपती तो त्या स्थळी एक मास।
निरखुन बघतांना त्यास वाटेच खास।।
जननिपरि जनाला वाटते साध्वि मानी।
अवन करि तयांचे पुत्र-प्रेमा धरुनी।।५७।।

**(शार्दूलविक्रीडीत)**

हीशीं वैर खरें करीन तर मी पावेन संत्रास तो।
कांही लाभ नसून खेद मजला होईल संप्राप्त तो।।
या साठीं निघुनी स्वयें निजपुरा जावें असे हें बरें।
साध्वीला पुसण्यास तो मग निघे माहिष्मतीला[३] त्वरें।।५८।।
तेथें एक कथा बरीच घडली आश्चर्य-युक्ता[४] पहा।
राघोबा बघुनी तिच्या धनचया[५] लोभिष्ठ झालाचि हा।।
मागे द्रव्य तिला परंतु सतिनें घ्या दक्षिणा बोलुनी।
आणाया जल धाडिलें, परि नसे तो[६] मान्य लाजे मनीं।।५९।।
'देतों युद्ध म्हणे रघूपती तदा बोले सती त्यास ती।
आहें सिद्ध, करा रणास, धन न्या जिंकून मातें अती।।

तेव्हां तो लढण्यास सिद्ध बघुनी युक्ती सतीनें नवी।
योजोनी फर्शि पाडिला रघुपती मानेसही वांकवी।।६०।।
केल्या सज्ज[७] स्त्रिया तिनें जलदिनें त्याशीं[८] लढाया स्वयें।
बांधी कंबर तो रघूपति रणा-प्रीत्यर्थ[९] भूमीस[१०] ये।।
पाहोनी अबला[११] मनांत दबला[१२] तैसाच ओशाळला[१३]।
साध्वीला वदला जसें गमतसे वाटा धनाला, चला।।६१।।

**राज्यसंकट नामक ८ वा अंक समाप्त.**

१ सोन्याची कडीं, २ चातुर्य, ३ महेश्वराला, ४ चमत्कारिक, ५ खजिन्यास, ६ रघुनाथराव, ७ तयार, ८ रघुनाथरावाबरोबर, ९ लढाईसाठी, १० रणभूमीस, ११ स्त्रिया, १२ वचकला, १३ खिजला.

---

**अंक नववा**

## तुकोजी – सिंहासन प्राप्ती

**(स्त्रग्धरा)**

दादासाहेब गेले निघुन झडकरीं पुण्यग्रामास[१] जेव्हां।
सत्याज्ञा[२] घे तुकोजी नृप-पद[३] बघण्या तोहि गेलाच तेव्हां।।
भेटे त्या माधवाला पद-कमल नमी भेटिला[४] ठेवुनी तो।
गादीच्या मालकीची मिळवुन वसनें[५] बोलला, त्यास[६] येतों।।१।।

**(शार्दूलविक्रीडीत)**

तेव्हां माधवभूपती सचिवही नेमीच नारायण[७]।
राज्यालागिं, वदे तदा 'मज शिवा बाजीस द्या आपण'।।
'आज्ञा मान्य मला' तुकोजि वदला वंदूनि त्या माधवा।
घे आज्ञा निघण्या, निघे स्वपुरिला[८] येण्यास राजा नवा।।२।।

**(स्त्रग्धरा)**

घेवोनी कारभारी नव[९], नवनृपती[१०] साध्विला भेटण्याला।
आला माहिष्मतीला पद नमि सतिला सांगता सर्व झाला।।
झाली सानंद साध्वी स्वकर[११] फिरवुनी त्यास पाठीवरुन।
बोले 'जा राज्य पाही, सुखवि वसुमती, तू प्रजा वत्स मान'।।३।।
आला तो इंदुराला सकल निजकरीं घेउनी राज्य सुत्रें।
पाही राज्यास तेव्हां प्रकृति[१२] सुखविली त्या नृपानें पवित्रें।।

मल्हारीची मृती ती कृति सकलहि त्या माजि मालीनृपाच्या।।
पाडी तो विस्मृतीला प्रकृति मग मुदा[१३] पावल्या सर्व साच्या।।४।।

**(शार्दूलविक्रीडीत)**

यानें योग्य पराक्रमा करुनिया राज्यर्धि[१४] केली भली।
श्रीमंतास करुन साह्य बरवें कीर्तिहि संपादली।।
अन्या मांडलिका नृपाकडुन हा खंडास घेई मुदें।
जे होते नृपतुल्य[१५] त्या मदतिला देऊन संतोष दे।।५।।

---

१ पुण्याला, २ साध्वी अहिल्याबाईचा हुकूम, ३ माधवराव (महतांपादशब्देन अंगमित्युच्यते बुधैः), ४ नजराण्यास, ५ वस्त्रें, ६ माधवरावास, ७ नारायण गोपाळ (कारभाऱ्याचें नांव), ८ इंदुराला, ९ नवीन, १० नवा राजा, ११ आपला हात, १२ प्रजा, १३ आनंद, १४ राज्याची वाढ, १५ राजाच्या बरोबरीचे.

हा राजा[१] चमके तदा नृप-पदीं[२] जैसा हिरा कोंदणीं।
केलें तीस[३] सुवत्सरें[४] नृपतीनें तें राज्य मोठ्या क्षणी[५]।।
कारस्थान करुन थोर मिळवी तो द्रव्य आणि रसा[६]।
राजे पाहुन यास धन्य म्हणती, नाहीं यशस्वी असा।।६।।

**(स्त्रग्धरा)**

मानी माता सतीला, वचन प्रतिदिनीं पाळि मोठ्या प्रमोदें।
तीही त्याला मुलाच्या-परि समजुनि हो वागली त्यार्शि मोदे।।
तो माई हाक मारी, परि सुदति तया पुत्र मल्हारिचा ही।
बोले तैशीच केली खुणहि सुसतिनें मुद्रिकेच्या[७] वरीही।।७।।

**(शार्दूलविक्रीडीत)**

नाहीं वाद विरुद्ध तीस शरदा[८]-मध्यें कधीं जाहला।
त्या योगें सतिला प्रमोद गमला, आनंद याला[९] भला।।
झाला प्राप्त असो महीप्रति[१०] सुधी[११] पाळावया लागला।
एकेवेळिं जराच गैर घडलें, बोले सती त्याजला।।८।।

**(शिखरिणी)**

'शिवा बाजीला तूं मज न पुसता ठेवुन दिलें।
कसें श्रीमंताच्या-जवळ' सतिनें त्यास पुसलें।।
तदा नारोपंता प्रतिनिधि-पदा[१२]-पासुन तया।
सती काढी बोले पुनरपि तुकोजीस सदया।।९।।

### (शार्दूलविक्रीडीत)

‘घाली दौलत मी घरांत तुमच्या केलें तुम्हाला धनी।
कीं कांहीं मन हें तुझें मजकडे ओढेल हेतू मनीं।।
नाहीं वाटत कीं तुझ्याकडुन हा हेतू पुरा होइल।
जा आतां प्रभु तो समर्थ मजला येथें मुदें रक्षिल’।।१०।।
साध्वीची अतिक्रोधयुक्त[१३] पडतां कर्णात शब्दावली[१४]।
बोले घाबरुनी तुकोजि ‘चुकलों’ तोंडांतही घेतली।।
‘‘काकाच्या हुकुमास मानुन सदा सेवा मुला-सारखी।
केली तत्फल[१५] हें परंतु कधिंही बुद्धी नसे पारखी।। ११।।

---

१ तुकोजी, २ सिंहासनी, ३ तास (३०) संख्या, ४ वर्षें, ५ आनंदाने, ६ पृथ्वी, ७ शिक्क्यावर, ८ वर्षांत, ९ तुकोजीला, १० पृथ्वीला, ११ सन्मती, १२ प्रधानाच्या अधिकारावरून, १३ मोठ्या रागाची, १४ शब्दपंक्ति, १५ त्याचे फल (सेवा केल्याबद्दल राज्यलाभ झाला हा अर्थ)

काका[१] आणिक मावली[२] मजप्रती आहां स्वयें आपण।
पोटीं घालुनी ही चुकी मम[३] करा पुत्रा-परी रक्षण।।
आज्ञाभंग[४] कधीं घडेल न पुढें हे देवि माझ्या करें’’।
बोलोनी मग पाय घट्ट धरिलें, साध्वी वदे ऊठ रे।।१२।।
तेव्हां त्यास म्हणे सती ‘‘पुनरपी होउ नये चूक रे।
बोलोनी फळ काय वागुन तसा दाखीव जा सत्वरें।।
इंदूरास करी प्रजा-जन सुखी मामाजिच्या[५] ही यशा।
राखोनी स्वयशा-मुळें भर तया घाली बरें शुभ्रशा[६]’’।।१३।।

### (शिखरिणी)

जरी त्या साध्वीनें नृपपदिं तुकोजी बसविला।
तरी कारस्थाने परकि नृपतींची सुसतिला।।
कळावीं तैसेंची वरमत हिचें घेउन तर।
निकालाला लावी मग सकल कामें नृपवर[७]।।१४।।
हिनें त्याला सेनापति करुन सेने-सह तया।
दिलें धाडूनीही कर[८] वसुल व्हावा म्हणुनिया।।
नृपांच्या-पासूनी कर जमवुनी हा नव नृप।
सतीपाशीं धाडी, व्यय[९] करि सती योग्य सकृप।।१५।।
तिच्या-पाशीं होतें धन विपुल[१०] त्याच्या[११] स्वमतिनें।
करावें खर्चाला बहुत करुनी दान सतिनें।।

सदावर्ते तीर्था-प्रति परत रम्या[१२] असि कृती।
करोनी देई ती सकल-जन-सौख्यास सुकृती[१३] ।।१६।।
तुकोजीच्या चित्तीं कपट कधिं आलें म्हणून न।
सदा वागे प्रेमें जननि[१४]-परि आज्ञेस धरुन।।
सतीची होती त्या जरब[१५] बहु राजास नवल।
घडे एका-काळीं परम जन ऐंकोत सकल।।१७।।

---

१ मल्हारराव, २ आई, ३ माझें, ४ हुकूम मोडणें, ५ मल्हाररावाच्या, ६ पांढऱ्या अशा, ७ श्रेष्ठ राजा, ८ खंड, ९ खर्च, १० पुष्कळ, ११ धनाच्या (खर्चाला), १२ मनोहर, १३ पुण्यवान, १४ आईप्रमाणें, १५ धाक.

**(शार्दूलविक्रीडित)**

देवीचंद म्हणून एक कमला[१]-सत्पुत्र होता जया।
मृत्यू येउन दौलतीस नव्हतें संतान कोणी तया।।
हें जाणूनि तुकोजि तो तदबला[२]-द्रव्यापहारी भला।
झाला आणि तसा निरोप तिजला तेव्हा नृपें धाडिला।।१८।।
हें ऐकूनि निघे महेश्वरिं सती-पाशीं कथायास ती।
सांगे सर्व कथा पदांस धुवुनी अश्रूजलें सन्मती।।
झाली सद्गदिता[३] सती तिस म्हणें बाळे सुखानें रहा।
संपत्तीस धनीन तूंच अससी, क्षेत्रादिकेंही[४] पहा।।१९।।

**(उपजाति)**

सती तुकोजीस निरोप धाडी।
प्रजा-धनाच्या हरणार्थ धाडी[५] ।।
कां घालितां, दूर तळास द्यावें।
क्षमेस याची मग तोहि[६] भावें।।२०।।

**(शार्दूलविक्रीडित)**

एका मांडिलिकें नृपें कर दिला नाहीं, लढाईसही।
राही तोच उभा म्हणून नृपती[७] जिंकावया त्यासही।।
भारी यत्न करी परी यश तया ना लाभलें यास्तव।
साध्वीला लिहुनी असेंहि पुसलें सल्ला करुं का नव?।।२१।।
पत्रा पाहुनि लाल होउन लिही 'मेलास तू ऽ रे जरी।
ऐशा या अपमान-कारक तहा इच्छूं नये बा तरी।।

वृद्धत्वास्तव[८] धैर्य होत नसलें देतें लढाई स्वयें।
एथें स्वस्थ बसावयास तुजला बोलावितें तूच ये' ।।२२।।
गेलें पत्र तसें तुकोजि-सुत[९]-ही साह्यार्थ धाडी सती।
संगे सैन्य धनास देउन, पुढें संग्राम झाला अती।।
धाकानें बहु झुंजता[१०] मग तया तेव्हाच लाभे जय।
शत्रू खंड तयास देउन नमी, नांदे सुखें निर्भय[११] ।।२३।।

---

१ लक्ष्मीपुत्र (श्रीमान), २ देवीचंदाच्या स्त्रीच्या द्रव्याचा अपहार करणारा, ३ गहिंवरलेली, ४ क्षेत्रें, तीर्थे वगैरे, ५ धाड, ६ तुकोजीरावही, ७ तुकोजीराव, ८ म्हातारपणामुळें, ९ तुकोजीरावाचा मुलगा (काशीराव), १० लढता, ११ निर्धास्त.

**(स्त्रग्धरा)**

सत्याज्ञा[१] नित्य, पाळी अवन[२] प्रकृतिचें[३] फार प्रेमें करी तो।
नाही द्रव्यार्थ किंवा अधिकृति[४]-करिता भांडला साध्विशीं तो।।
ऐशा त्या स्वात्म-निष्ठा[५]-प्रति बघुन सती फार पावेच मोद[६]।
वंशाचें तैं स्वताचें हित करि नृपती फार पावे प्रमोद।।२४।।

**(आर्या)**

अधिकार-धनप्राप्ती-साठीं जगतीं अनंत संग्राम[७]।
झाले आजवरी बहु, तुकोजि अपवाद की दुजा राम।।२५।।

**(तुकोजी-राज्य प्राप्ति नामक ९ वा अंक समाप्त)**

---

### अंक दहावा

## तीर्थयात्रा

**(आर्या)**

रघुनाथ पेशवा तो, होळकरांचें हरावया राज्य।
सचिवास[८] साह्य घेउन, यत्न करी परि वृथाच तें प्राज्य।।१।।
त्या-समयीं माधव-स्त्री, साध्वि रमा फार फार उपयोगी।
अहिल्येस पडे हो, त्याच मुळें ह्या धनादिका भोगी।।२।।
तेव्हांपासून सती, आणि रमाबाई या उभयतांचा।
प्रेमा फारचि वाढे सीता-सतिचा जसा सुरमेचा।।३।।

अहिल्याबाईला, साध्वि रमा ती प्रसूपरी[९] मानी ।।
हीहि तिला कन्येपरि, मानुनि करि लोभ फार अभिमानी ।।४।।
प्रतिमासीं सद्‌वृत्ता[१०], कळवुनि भेटीहि धाडिती फार।
उंची वस्त्रें कधिं कधिं, नग[११], रत्नांचे तसें कधीं हार ।।५।।
औदार्य[१२] शुद्धतादिक[१३], गुण होते या सतिद्वयापाशीं[१४]।
प्रतिमासी[१५] रमणीया[१६], कृति ऐकुनि तोषहो[१७] उभयतांशीं ।।६।।

---

१ साध्वीचा हुकुम, २ रक्षण, ३ प्रजेचें, ४ अधिकारासाठी, ५ आपल्या ठिकाणीं भाव ज्याचा अशाला, ६ आनंद, ७ लढाया, ८ गंगाधरास, ९ आई, १० कुशलवृत्तास, ११ दागिने, १२ उदारत्व, १३ पवित्रपणा वगैरे, १४ ह्या दोन साध्वी स्त्रियांपाशीं, १५ दरमहा, १६ सुंदर, १७ आनंद बिभीषण पत्नीचा.

स्त्रीचा स्वभाव भारी, परोत्कर्षासहिष्णु[१] विधि[२] करितो।
परि या सतीद्वयाचा[३], निर्मत्सर तो करुन सुख बघतो ।।७।।
ऐसें जनांस भासे, प्रेमा दोघींमधें बहू वाढे।
आमरणांतचि[४] राहे, इक्षु पुढें गोड जो प्रथम वाढें ।।८।।

**(शार्दूलविक्रीडीत)**

होता अल्पवयी तरी प्रकृति जो पाळी दिलीपा-परी।
आले दातिं तृणा धरुन शरणा ज्या माधवाला अरी[५] ।।
राहे माधव थेउरीं क्षय जया होउनी रुग्ण-स्थिती[६]।
झाली प्राप्त असा गजानन-पदीं ठेवूनि श्रद्धा अती ।।९।।

**(स्त्रग्धरा)**

जेव्हां मुक्काम त्याचा स्वनगरिं[७] असुनी फक्त होता अजारी।
येती तैं भेटण्याला नृप[८]-वर दुसरे मांडलीकादि भारी ।।
बाई तेव्हां अहिल्या सदय नजर ती घेइ संगें निघाली।
वाटे तैं त्या रमेला मम जननि[९] मला भेटण्या-लागिं आली ।।१०।।
दोघींची भेट झाली, हृदय भडभडे दोघिंचे नेत्र झाले।
साश्रू[१०] कंठांत घाली, मिठि मग सतिला ती रमाबाइ बोले ।।
'सासू माझी आनंदी रघुपति-वनिता भांडुनी मांडि दावा।
ईशानेंही पतीला शयनिं निजविलें, त्रास कोणा वदावा ।।११।।

**(शार्दूलविक्रीडीत)**

होता कांहिं अनिष्ट[११] जाइन पतीसंगे सती मी त्वरें।

हे माते मज[१२] भेटुनी सुखविले झालें बहू हें बरें' ।।
तेव्हां संकटिं पाहुनी बहु रमा केलें समाधान ही।
साध्वीनें तिजला असें सुचविलें दुःखाऽऽवृत्ता[१३] ही मही[१४] ।।१२।।
प्रासादीं[१५] सुसतीस ठेवुन दिलें, तेव्हां तिच्या दर्शना।
येती लोक असंख्य वंदिति तिला, साधूच वाटे जना।।
'सन्मार्गी[१६] मनुजा[१७] अनंत मिळतो सन्मान भू-मंडलीं।
जाता स्वर्गि तयास सौख्य मिळुनी मुक्ती मिळे चांगली।। १३।।

---

१ दुसऱ्याचा, उत्कर्ष सहन न करणारा, २ ब्रह्मदेव, ३ रमाबाई व अहिल्याबाई यांचा, ४ मरेपर्यंत, ५ शत्रू, ६ आजाऱ्याची स्थिती, ७ आपल्या (पुण्यांत), ८ मोठे राजे, ९ आई, १० आसवांनी डबडबलेले, ११ वाईट, १२ आई, १३ दुःखानें भरलेली, १४ पृथ्वी, १५ राजवाड्यांत, १६ चांगल्या रस्त्यानें जाणारा (सुमार्गी), १७ मनुष्याला.

आनंदी करि नित्य मत्सर हिचा[१] रुपाभिमानी[२] कुधी[३]।
नाहीं भेटली हीस ती अगदिंही धाडी बघाया सुधी[४]।
दासी येउनि सांगता, तिजप्रती सौंदर्य नाहीं तिला।
आहे तेज परंतु दिव्य तिजला देवीच भासे मला।।१४।।

**(आर्या)**

श्रीमंत माधवाला, देवाज्ञा होउनी प्रजा दुःखी।
झाली पतिच्यासंगें, सति जाउनि ती रमा बहूत सुखी।।१५।।
परमोदार धन्याला, सद्गुण[६]-मंडित तशीच तज्जाया[७]।
माता मज जी मानी, यम नेई काय तीस हो निलया[८] ।।१६।।
पाहूनि या प्रसंगा, बहु दुःखित खिन्न होउनी साध्वी।
झाली विरक्त अगदीं, यात्रा करण्यास लागली बरवी।।१७।।
घेई निरोप मग ती, कुल-दैवत[९]-दर्शनार्थ हो आली।
जेजूरीस पुढें मग, दक्षिण-यात्रा[१०] करावया फिरली।।१८।।
नियमित[११] जन संगें घे, अन्य जनांना महेश्वरी धाडी।
क्षेत्राप्रति कांहिंतरी, नूतन[१२] सत्कृत्य ती करुन सोडी।।१९।।
पर्वत-कड्यावरुनी, विपिनांतुनि[१३] पादचारि[१४] होऊन।
जावें लागे पूर्वी, अग्निरथानें[१५] प्रवास नच कठिन।।२०।।
आळंदी देहूला, जाउन मग पंढरी-प्रती गमन।
केलें तिनें सतीनें, विठ्ठल-मूर्तीस पाहतां नमन[१६] ।।२१।।
औदुंबरांत दत्ता,-प्रति नमुनी करविराकडे जाया।

झाली सिद्ध तिथें ती, पाही बहु रम्य विष्णुची जाया[१७] ।।२२।।
गोकर्णास शिवाचें, दर्शन घेऊन गेलि पंपेला।
जेथुन राम सलक्ष्मण, मारुतिनें-ऋष्यमूकिं[१८] हो नेला ।।२३।।

---

१ अहिल्याबाईचा, २ रुपाचा आहे गर्व जिला अशी, ३ दुर्बुद्धी आनंदीबाई, ४ बुद्धिमान दासी, ५ फार उदार, ६ सद्‌गुणी, ७ माधवरावाची स्त्री, ८ घरास, ९ खंडोबाच्या दर्शनार्थ, १० दक्षिण हिंदुस्थानांतील तीर्थयात्रा, ११ मोजके, १२ नवें, १३ अरण्यांतून, १४ पायानें चालणारा, १५ आगगाडीनें, १६ नमस्कार, १७ महालक्ष्मी (अंबाबाई), १८ ऋष्यमुक नांवाच्या पर्वतावर.

रामेश्वरा-प्रती मग, जाई ती साध्वि हो जगन्नाथीं।
स्नानादिक[१] करून तिनें, ठेवविलीं तत्पदीं[२] स्वसह[३] माथीं ।।२४।।
यापरि दक्षिणयात्रा, संपवुनी पचिमेस ती गेली।
ठाकूर सोमनाथा, पाहुन सानंद[४] द्वारका झाली ।।२५।।
काशी गया प्रयागा, मथुरादिक सर्व उत्तरेकडलीं।
क्षेत्रें तीर्थस्थानें, पाहुन साध्वी घरीं परत आली ।।२६।।

**(शार्दूलविक्रीडीत)**

कोठें जीर्ण[५] सुमंदिरे[६] सति करी, कोठें नवीं बांधिलीं।
कोठें घाट नदी-तटाक बघुनी बांधी सुधी मावली ।।
कोठें गांग[७] जला शिवा प्रतिदिनी कोठें प्रपाही[८] करी।
वापी[९] धर्मगृहें[१०] कुठें करवुनी संतुष्टता ती वरी ।।२७।।

**(वसंततिलका)**

यात्रेस जात असतां गिरिकंदरी[११] जे।
बैसूनि नित्य करिती तप मानसीं जे ।।
पाहूनि साधु करि साध्वि प्रणाम[१२] त्यांना।
घेई प्रसाद मग जाइच अन्य-स्थाना ।।२८।।

**(शार्दूलविक्रीडीत)**

मोठा कर्मठ विप्र[१३] एक सतिनें संगें पुराणाप्रती।
सांगायाप्रति घेतला प्रतिदिनीं ऐके कथा ती सती ।।
ऐसा नित्य असे प्रवास[१४]-क्रम त्या साध्वी सुधीचा अहो।
ऐकोनी सकला जनांस सुमती[१५] होवो तसें सौख्य हो ।।२९।।

### (आर्या)

ज्यांच्या ज्यांच्या हद्दीमध्यें तीर्थे पवित्र हीं होतीं।
त्या राजांनी तिजला, भेटुनि अत्यंत सुखविली सुसती ।।३०।।
साध्वीनेंहि तयाचें, जाणुनि उपकार मान-पानास।
केलें, त्यांना तोषवि, भोजन-दानें जसें सुविप्रास[१६] ।।३१।।

---

१ स्नान वगैरे, २ जगन्नाथाच्या पायांवर, ३ आपल्या (मस्तका)सह, ४ आनंदित, ५ जुनी, ६ चांगली मंदिरे, ७ गंगेच्या, ८ पाणपोई, ९ विहिरी, १० धर्मशाळा, ११ पर्वतांच्या गुहांत, १२ नमस्कार, १३ ब्राह्मण, १४ प्रवासांतील वागण्याची रीति, १५ चांगली बुद्धि, १६ चांगल्या ब्राह्मणांना.

### (मंदाक्रांन्ता)

साध्वी तीर्थे करित असतां, दुष्टवार्ता[१] सतीला।
ऐकूं आली रघुपति वधी भ्रातृजाला[२] मुलाला ।।
बैसे गादीवर मग कुधी[३], ऐकुनी त्यास शापी।
''पापी जावो निरयिं[४] असला, जो स्ववत्सास[५] कापी'' ।।३२।।

### (आर्या)

साध्वीनें त्यासमयीं, भविष्य केलें बुडेल गादी ही।
श्रीमंताची ऐसें, सतिच्या वचनापरीच घडलें ही ।।३३।।

### (युग्म)

राघोबास करावें, भ्रष्ट पदापासुनी[६] तया स्थानीं।
गंगाबाइ सतीला, आपण बसवूं असेंच सर्वानीं[७] ।।३४।।
ठरवून पत्र त्यांनीं, धाडुन दिलें तुकोजीरावाला।
इंदूरास सतीला, बोलावुन तोहि मग पुण्या गेला ।।३५।।

### (शार्दूलविक्रीडित)

झाल्या भानगडी बहूत तिकडे, सर्वांमध्यें हा[८] भला[९]।
होता, काढि रघू, तिथें बसविली गंगासती कोमला ।।
झाला पुत्र तिला, तयास बसवी सिंहासनीं त्याजला।
देई नाम सवाइ माधव असें, रामापरी भासला[१०] ।।३६।।

(**तीर्थयात्रा नामक दशम अंक समाप्त**)

---

१ वाईट बातमी, २ पुतण्याला, ३ दुर्बुद्धि (रघुनाथराव), ४ नरकात, ५ आपल्या मुलास, ६ सिंहासनावरुन,

७ सर्व कारभाऱ्यांनी, ८ तुकोजीराव, ९ संभावित, १० वाटला (रामासारखी कृति होती किंवा केली म्हणून).

### अंक अकरावा

## राज्येक्षण

**(आर्या)**

सरजान मालकम हे, भारतमध्याधिकारि[१] जैं होते।
सतिची धृती[२] स्तुति[३] मती[४], ऐकुनि शंकीत जाहले हो ते।।१।।
शोधक साहेब पुरे, वास्तवस्थिति[५] शोधिली तयांनीं ती
तेव्हा आढळलें त्या, सत्य असे मति, धृति तशीच स्तुती।।२।।

---

१ मध्य हिंदुस्थानांतील मुख्य अधिकारी, १२ धैर्य, १३ प्रशंसा, १४ बुद्धि, १५ खरी स्थिति.

मध्य-भरत[१]-खंडाचा, त्यांनी[२] इतिहास चांगला लिहिला।
त्या-मध्यें स्तुति करुनी, न्यायी नृप[३]-श्रेष्ठ मानिलें इजला।।३।।
अंगी सद्गुण असतां, स्वकीय परकीय मानिती पूज्य।
जैसें बहु प्रिय सकला, स्वादु[४] सुरभि[५] वाटतेंच तें आज्य।।४।।
ऐहिक कीर्ति होउनि, परलोकीं मुक्ति लाभते बरवी।
फल पुण्याईचें हें, सत्स्पर्शे[६] रविहि[७] धन्यता मिरवी।।५।।

**(शार्दूलविक्रीडित)**

राज्याचा अधिकार घेउन करीं, पाहावया लागली।
तेव्हां लौकिक ऐकुनी सचिवता[८] गोविंदपंता दिली।।
या प्रामाणिक राज-नीति निपुणा-पासून तैं फायदे।
झाले फार, जुने दुरुस्त करुनी केले नवे कायदे।।६।।

**(स्त्रग्धरा)**

सारा नेमस्त घ्यावा सुपिक नरम भू पाहुनी धोरणानें।
हक्कांलाही जपावें परम कुलिन त्या पाटलांच्या[९]; प्रधानें।।
प्रत्येकीं तो महालीं सदय[१०] नर जना सौख्य द्यायास नेमी।
ऐसी सौख्य[११]वृद्धि केली नव-सचिव[१२]-वरें फार तैं ग्रामग्रामीं।।७।।

**(शार्दूलविक्रीडित)**

होते भिल्ल तसेंच गोंड दुसरे राहून ते पर्वतीं।
लोकांना लुटती तशाच करिती चोऱ्या बहू दुर्मती।।
चौक्या बैसवुनी तयांस धरुनी मोडी सती खोड ती।
धंदे देउन त्यास पोट भरण्या संतुष्ट केलें अती।।८।।

**(आर्या)**

बैलामागें अर्धा, पैसा कर घ्यावया तयांस सती।
देई आज्ञा त्याला, '**भिलकवडी**' सर्व जन तदा वदती।।९।।

**(मालिनी)**

पडित जमिन त्यांना देउन ती इनाम।
पथ[१३] अवन कराया त्यांस नेमी तमाम।।
अट करि जर चोरी जाहली त्या महीला[१४]।
भरुन अगर पत्ता देउं आम्ही तुम्हाला।।१०।।

---

१ मध्य हिंदुस्थानाचा, २ मालकम साहेबांनी, ३ न्यायी राजांत श्रेष्ठ, ४ गोड, ५ सुवासिक तूप, ६ साधूच्या स्पर्शानें, ७ सूर्य सुद्धां, ८ प्रधानकी, ९ पाटलांच्या हक्काला प्रधानें जपावें, १० दयाळू (कामगार), ११ सुखाची वाढ, १२ नव्या श्रेष्ठ प्रधानानें, १३ रस्ते, १४ त्या प्रदेशाला.

**(शार्दूलविक्रीडीत)**

झाले तुष्ट बरेच गोंड परि ते कांहीं जरा रुष्ट[१] ही।
त्यां-मध्यें मनरुप सिंग कपटी होता अती दुष्टही।।
लोकांना लुटुनी करी कधिं कधीं प्राणान्त[२] ही हेतिनें।
त्याला ठार करुन लोक सगळे सानंद केले तिनें।।११।।

**(आर्या)**

केला भिल्लांपासुन, होणारा त्रास नाहिंसा त्यांनीं[३]।
लोकांस न्याय देणें, नृप-कर्तव्यांस ती मनीं मानी।।१२।।
लोकांच्या अर्जाचा, निकाल करण्यास पंच अधिकारी।
ग्रामीं नेमी साध्वी, न्यायाधिश मुख्य[४] नेमिला शहरीं[५]।।१३।।

**(शार्दूलविक्रीडीत)**

कोणी अर्ज तिच्याकडे जर स्वतां घेऊन गेला तरी।
तो घेई करि चौकसी, किमपिही दुर्लक्ष ती ना करी।।

न्यायाला करुणेस चित्तिं धरुनी पाही पुरावा खरा।
लोकां न्याय मिळे खरा, सुसतिनें भ्यावें सदा ईश्वरा।।१४।।
फांशींची बहुधा न देइ सदया कोणास शिक्षा कधीं।
बोले ''ईश्वरनिर्मिताप्रति कसें मारु स्वयें मी सुधी।।
त्याचा जाब मला तयास दिला तो पाहिजे हो वरी।
आहे मृत्यु मला'' म्हणून न सती देहान्त[६] शिक्षा करी।।१५।।
बाजीराव पुण्यास फार जनता[७] येवोनि राहो असें।
चित्तीं आणुनि बांधण्यास सुगृहें भूमी तिला[८] देतसे।।
तैसें इंदुर वाढण्यास करुनी योजीहि युक्ती नवी।
प्रासादास[९] मधें[१०] तसें द्विजगृहां वाप्यादिका[११] बांधवी।।१६।।

**(आर्या)**

राहे महेश्वरीं जरि, तरि साध्वीची कृपा असे शहरीं[१२]।
संपन्न इंदुरानें, व्हावें इच्छुन उपाय फार करी।।१७।।

---

१ रागावले, २ प्राणनाश, ३ प्रधान व अहिल्याबाई यांनी, ४/५ मुख्य शहरांत म्हणजे इंदुरांत, ६ फांशींची, ७ लोक-समूही, ८ जनतेला, ९ राजवाड्यास, १० गांवाच्या-मधें, ११ विहिरीं वगैरे, १२ इंदुरावर.

प्रकृति-धनाचे रक्षण, करण्याला दक्ष ती असें भारी।
आंग्लां-परी करांनीं, रयतेला क्षीण ती मुळीं न करी।।१८।।

खंडेराव कमाविस-दारीचें काम इंदुरी पाही।
नियमित वसूल जमवीं, जन सुखवी सकल तोषवी ही ही[१] ।।१९।।

**(स्त्रग्धरा)**

ठेवी सैन्यास थोड्या अवन[२] अवनिचें[३] व्हावया इंदुरांत।
बाकीची ती[४] तुकोजी-नव नरपतिच्या-पाशिं हो दक्षिणेंत।।
होतीही उत्तरेला चकमकि करण्या गुंतलेली जराशी।
अन्यायाला मिळेना स्थळ म्हणुन पळे बापडा दूरदेशीं।।२०।।

**(शार्दूलविक्रीडीत)**

सन्मार्गी प्रकृती-प्रती वळविण्या योजी दया दंड ती।
पाही मंतु[५] करी दया जर असे तो अल्प[६] तेव्हां सती।।
मोठ्याला करि दंड धाक सकला होता सतीचा अती।
खंडालाहि नृपाळ धाडिति सती मातेपरी मानिती।।२१।।

**(स्त्रग्धरा)**

राज्याचीं सर्व सूत्रें करिं धरुन स्वतां राज्य पाहावयाला।
लागे तेव्हा सती ही नृपपदिं बसुनी सर्व कामें नयाला[७]।।
चित्तीं ठेवूनि पाही नजर[८] कधिं न घे ती प्रजेच्या-कडून।
कोणाला घ्यावयाला अनुमति[९] कधिंही साध्वि देई तसें न।।२२।।

**(आर्या)**

नजराणा घेण्याची, लालुच[१०] मनुजास लागल्या-वरतीं।
अन्याय व्हावयाचा, संभव असतो असें म्हणे सुदती।।२३।।

**(भुजंगप्रयात)**

असो लक्ष किंवा कोटि देवी।
प्रजेच्या धनाला न लोभास दावी।।
सिरोजीं कुबेरा-परी खम[११] थोर।
असे एक विख्यात तो सावकार।।२४।।

---

१ अहिल्याबाई, २ रक्षण, ३ पृथ्वीचे (राज्याचें), ४ फौज, ५ अपराध, ६ थोडा, ७ न्यायाला, ८ नजराणा, ९ रुकार, १० गोडी, ११ खेमचंद.

परी तो अकालीं यमानेंच नेला।
वधू[१] दत्तकाला दिराच्या सुताला।।
स्वयें घेउनी पाहवी कारभार।
परी आड आला कमावीसदार।।२५।।

वदे ''तीन लक्षास द्यावें धनाला।
असें होइना मी तरी जप्त माला।।
करुनी तुम्हा लावितों हो भिकेला''।
तदा ती[२] स्वदुःखा कथी या सतीला[३]।।२६।।

सतीच्या पदीं ठेवुनी मस्तकाला।
कमावीस-दाराचिया भाषणाला।।
कथी, दत्तकाला खरें मानुनीही।
कमावीस-दारास काढी सती ही।।२७।।

**(शार्दूलविक्रीडित)**

तापीदास दुजा बनारस असे भ्राते धनी त्यांजला।

एकामागुन एक नेउन यमें संतोष तो मानिला ।।
तापीची वनिता[२] सतीस[३] वदली हें द्रव्य तुम्हाप्रती ।
अर्पावें मज वाटतें, सति वदे घेऊन जा संप्रती ।।२८।।
त्याच्या योग्य व्यया तुला कथितसें, तैसा करी तूं स्वयें ।
बांधी तूं खरगोणिं घाट नदिला तैशींच देवालयें ।।
आज्ञा मानुन ती करी सकलही नारी[४] तदा सन्मती[५] ।
श्रीलंबोदर-देवळासह तदा ती घाट बांधी कृती ।।२९।।

**(उपजाति)**

धर्माभिमानी जरि फार होती ।
तरी विधर्मीय[६] जना-प्रती ती ।।
करादिकांनीं[७] न कधींच त्रास ।
दिला, दिलें सौख्य खरें तयांस ।।३०।।

---

१ बायको (तापीदासाची), २ तापीदासाची स्त्री, ३ अहिल्याबाईला, ४ तापीदासाची बायको, ५ चांगली बुद्धिमान, ६ परधर्मी लोकांना, ७ डोईपट्टी वगैरे करांनी.

**(आर्या)**

जी पूज्य पद्धती त्या, अकबर यवनाधिपेंच[१] पसरविली ।
वा त्या शिवाजि-रायें, लावुन दिली तिलाच अनुसरली ।।३१।।
जरि कारभार पाही, राज्याचा तरी तिच्या क्रमा-मध्यें ।
नित्याच्या फरक नसे, भावें पूजादिका करीच स्वयें ।।३२।।

**(शिखरिणी)**

सदाचारी न्यायी समवन[२] कराया प्रकृतिचे ।
झटोनी जी मानी जन सकल माझे, जग जिचें ।।
गुणांला गावोनी बहुत करितें स्तोत्र; चरित ।
असें माल्कम हाही लिहिच इतिहासीं सुचरित[३] ।।३३।।

**(शार्दूलविक्रीडित)**

राज्याच्या शकटा सुयंत्रित कसें हाकी सती हें जया ।
वाटे गूढ परंतु शोध करितां आश्चर्य झालें तया[४] ।।
तो हा माल्कम दुष्ट भाव परकी टाकून बोलेच मा[५] ।
ही साध्वी नय-कीर्ति दान[६]-निलया प्रत्यक्ष साधू नमा ।।३४।।

**(आर्या)**

निःपक्षपात आणी, न्याय तयांची जनास माय दिसे।
त्यजुन कुकर्मे पार्वत[७], लागति वागावयास ते खासे।।३५।।
अधिकार्यप्रदेशामधिं[८], दंगा नाहीं कधींहि उद्धवला।
अधिकारी प्रकृति-वरी, नच करिती ते कधींहि जुलमाला।।३६।।

**(शार्दूलविक्रीडित)**

आली उन्नतिला प्रजा सकलहि वात्सल्य-योगें[९] जिच्या।
साधू-संत परी जिला नमुनियां गाती गुणां साध्विच्या।।
याचें कारण धर्म-भाव[१०] सतिचा तैसी व्यवस्था अती।
साध्वीला स्तविती नृपाल परकी सत्कारिती वंदिती।।३७।।

**राज्ये-क्षण-नामक ११ वा अंक समाप्त.**

---

१ मुसलमानी बादशाहानें, २ सांभाळ, ३ चांगले चरित्र, ४ मालकमसाहेबाला, ५ आई, ६ न्याय कीर्ति आणि दान यांचे घरच अशी, ७ पर्वतावरील गोंड, भिल्ल वगैरे, ८ आपल्या ताब्यांतील प्रदेशांत, ९ दयाळुपणा, १० धार्मिकपणा.

---

### अंक बारावा

## अन्य[१]-नृप-व्यवहार

**(उपजाति)**

दया क्षमा आणि तशीच शांती।
निर्लोभता ठेवुनी-ही स्वचितीं।।
वागावया जे झटतातही त्या।
ही[२] वंद्य होती सकला अहिल्या।।१।।

**(शार्दूलविक्रीडित)**

नीतीनें स्व[३]-करास अन्य नृपतीं-पासून घेई सती।
कोणा मांडलिका-कडून ठरल्यापेक्षां न मागे अती।।
तेंही खंड विलंब तो न करितां, साध्वीकडे धाडिती।
माफी तो[४] जर होच[५] मागति तिला, होता दरारा अती।।२।।

**(आर्या)**

सामंताची[६] उन्नति[७], व्हावी ऐसें सदैव तच्चित्तीं।
त्यांच्या अधिकृति-हरणा, यत्न करी जो तयास शासी ती ।।३।।
प्रकृतिस सुखी करावें, राज्य-व्यवस्था तसी सुधारुनी।
सल्लाहि द्यावयाला, तद्राष्ट्रीं[८] वकिल नेमिले त्यांनीं ।।४।।
सामंतीं तुष्ट सदा, राहुनि राज्यास आपल्या त्रास।
देऊं नये म्हणुन ही, साध्वी त्या देइ काहिं हक्कांस ।।५।।

**(शार्दूलविक्रीडित)**

साध्व्यौदार्य[९] तशीच भीति दुसरी वाटूनि सामंत ते।
साध्वीशीं बहु नम्र वागति कधीं दंगा करायास ते ।।
झाले सिद्ध न बोलती 'सतिप्रती द्यावें प्रभूनें अती।
आयुष्यास, करो सदैव अवना बाई अहिल्या-सती' ।।६।।

---

१ दुसऱ्या राजांशीं वागणूक, २ ही अहिल्याबाई, ३ आपल्या खंडणीस, ४ विलंब (अवकाश), ५ झालाच (तर), ६ मांडलिकाचा, ७ भरभराट, ८ मांडलिकांच्या राज्यांत, ९ साध्वी-औदार्य (साध्वीचे उदारपण).

**(आर्या)**

म्हैसूर, पुणें, दिल्ली; लखनौ, ग्वाल्हेर आणि कलकत्ता।
हैद्राबाद, बडोदें; स्वतंत्र चाले इथें नृपति[१]-सत्ता ।।७।।
येथील नृपाळांशीं, नागपुराशींहि होइ व्यवहार।
पत्रांचा, श्वशूराचे, तह पाळी ती करी न अपहार[२] ।।८।।
प्रतिदरबावारीं सतिचा होता एकैक चांगला वकिल।
पदरीं विश्वासु चमू[३], 'असता दंग्यास कोण हो करिल ।।९।।
मेवाडाच्या अळशी, राण्याच्या जात-भाइंनीं सतिचा।
रामपुरा घेण्याचा, केला नच यत्न हो सफल[४] साचा ।।१०।।
ही बातमी सतीला, कळतां धाडी शरीफ भाईला।
तो करि पराभवाला, नृप[५] मागे तो क्षमाहि मग सतिला ।।११।।
स्वतंत्र राजांमध्यें, महादजीशींच सख्य बहु होतें।
श्वशुराचे[६] स्नेही ते, शूर तसे नीति-दक्षही[७] होते ।।१२।।
शिंदा पराक्रमी तो, कारस्थानीहि चांगला असतां।
परि त्यास महत्त्वाची[८], आकांक्षा[९] दुष्टगुण अती होता ।।१३।।

एक वेळीं उसने, त्यानें साध्वीकडून तिस[१०] लक्ष।
ते द्रव्य घेतलें हो, यास्तव साध्वी-वरी असे लक्ष।।१४।।
कोणी ऐसें वदती, परि खोटें हें मला दिसे वचन।
औदार्य, धैर्य, दानत; पाहुन सतिच्या कडे वळेच मन।।१५।।
मुलकी आणी लष्करि, लोकांना सक्त ताकिदी शिंदा।
देई 'सत्याज्ञेला[११] पाळा न विलंब लावितांच सदा'।।१६।।

---

१ राजाचा अधिकार, २ अभिलाष, ३ सैन्य ,४ केलेली खटपट वाया गेली, ५ मेवाडचा राजा, ६ मल्हाररावाचे, ७ न्यायात चतुर, ८ मोठेपणाची, ९ इच्छा, १० तीस (३०) संख्या, ११ अहिल्याबाईचा हुकूम.

शिंद्यावरी दुजेही, राजे सतिचा बहूत सत्कार।
करुनी पाळिती वचना, साध्वीची पूज्यता असे फार।।१७।।
श्रीमंत पेशव्यांना, राज्य-व्यवस्था बघून अभिमान।
वाटे या बाईचा, माते[१]-परि हीस देति सन्मान[२]।।१८।।
टिप्पू[३] सुलतान दुजा, निजाम[४] आणी नबाब लखनौचा।
कलकत्त्याचा लाटहि[५], सदैव बहुमान ठेविती सतिचा।।१९।।
हिंद्वितर[६] नृपांचीही, साध्वी-विषयीं असी असे बुद्धी।
मग जे हिंदू असती, त्यांना होईल काय दुर्बुद्धी?।।२०।।
साध्वीस दुःख देणें, म्हणजे प्रत्यक्ष गोवधा[७] करणें।
ऐसें मानिति राजे, मुक्तिप्रद[८] मानिती तिला नमणें[९]।।२१।।
बांधी परराज्यांतहि, वाप्यादिक[१०] धर्मकृत्य नित्य सती।
यास्तव सतीस निजपर[११]-भाव नसे म्हणुनि मानिती नृपती।।२२।।
श्रीमंतास सती ही मान बहू देउनी सदा वागे।
हत्या[१२] करुन रघुपति, साह्य हिला नीच एकदा मागे।।२३।।
तेव्हां साध्वी त्याला, वदली यजमान[१३]-शत्रु तो माजा।
शत्रू आहे यास्तव कैद करिन रे द्विजा[१४] त्वरें पळ जा।।२४।।

**अन्य-नृप-व्यवहार-नामक १२ वा अंक समाप्त**

---

१ आईप्रमाणें, २ चांगला मान, ३ म्हैसूरचा राजा, ४ हैद्राबादचा राजा, ५ गव्हर्नर जनरल, ६ हिंदूहून इतर, ७ गोहत्या, ८ मुक्ति देणारी, ९ नमस्कार १० विहिरी वगैरे, ११ आपलेपणा व परकीपणा, १२ नारायणरावाचा खून, १३ धन्याचा शत्रू, १४ ब्राह्मणा (रघुनाथा).

अंक तेरावा

## दान-स्वभाव-दर्शन

**(शिखरिणी)**

असंख्या लोकांची हरति यमुना ती सुरनदी[१]।
किती पापें मोठीं म्हणुन जन वानीच अगदीं ।।
अहिल्याबाईची कृति तशिच होती वितरणीं[२]।
जिला मानी वानी सुखद[३]-कर-दानें-हि तरणी[४] ।।१।।

---

१ गंगा, २ दान देण्यांत, ३ सुखकर किरणांच्या दानाने (पक्षी सुखदायक खंड देऊन), ४ सूर्य

**(स्त्रग्धरा)**

देवस्थानास कोठें बहुत धन कुठें अन्नसत्रास स्थापी।
कोठें धर्मार्थ शाळा करवुन सतिनें बांधिल्या थोर वापी ।।
रेवा-बाईस नामी प्रतिकृतिसह[१] तो चांगला घाट बांधी।
छत्री बांधी वरी ती स्मरण निज जना राहण्यालाहि साधी ।।२।।

**(शिखरिणी)**

गयेला जीं नामी बहुत दिसती धर्म-निलयें[२]।
सती स्थापी तेथें प्रतिकृतिसह शुभ्रोपल[३] स्वयें ।।
तिला वंदी भावें जन सकल यात्रेकरु अती।
करी जो सत्कृत्यें सुनर बनतो तो सुरपती ।।३।।

**(स्त्रग्धरा)**

सांगावें काय जास्ती सुसति गुण-गणें[४] जाहली देव लोकीं।
जन्मे ती मानवांच्या कुळिं धनगरही पावली मान नाकीं ।।
ऐथें औदार्य दावी, सदय मन सदा लोक-सेवेस लावी।
ज्या साध्वीची प्रशंसा मयुर-कवि करी मानुनी तीस देवी ।।४।।

**(शार्दूलविक्रीडीत)**

झाली वंद्य द्विजांस जाउन बसे जी देवतांच्या स्त्रजीं[५]।
शत्रूपासुन राज्य-रक्षण करी बांधी बहू दुर्ग[६] जी ।।
वीथ्या[६], घाट, तलाव, धर्म-निलयें जीं देवळें बांधिलीं।
त्यां मध्यें रमणीय दोन पुढचीं सर्वांहुनी जाहलीं ।।५।।

**(आर्या)**

नेमावरास बांधी, कुल[७]-दैवत-देवळास दिव्य सुधी।
सुंदर घाट तसा ती, जामीं विंध्याचलाप्रती[८] बांधी।।६।।
हीं आणी इतरस्थळें, साध्वी शिलकेमधून हो बांधी।
यासाठीं कर दुसरा, प्रकृतिवरी[९] स्थापिना कधींच सुधी।।७।।
दुष्काळ-फंड '**इनकम्‌टॅक्स**[१०]' तिजा करहि तो मिठा-वरला।
'**मिशनरि**' पोषक चौथा, यांनिं तिनें नाहिंहो स्वजन पिळला।।८।।

---

१ प्रतिमा (पुतळा), २ धर्मशाळा, ३ संगमरवरी (पांढऱ्या दगडाची), ४ गुणांच्या समुदायानें, ५ माळेंत, ६ किल्लें, ६ मार्ग, ७ खंडोबा, ८ विंध्याद्रिपर्वतावर, ९ प्रजेवर, १० प्राप्तीवरचा कर.

**कर्पट[१]-प्राप्ति-करांहीं, लवण**[२]-करानें जना तिनें अपल्या।
खासें खाया घालुनि, इतर प्रजा नाहिं हो कधीं पिळल्या।।९।।
राज्यांतिल अर्ध-प्रजा, क्षुधित[३] असुनिही नव्या करा बसवी।
बसावया पर-राज्यें, '**फॅमिनफंडास**[४]' ही न ती पचवी।।१०।।

**(शार्दूलविक्रीडीत)**

यासाठीं सतिची खरी कृति असे, लोकांस सौख्या-प्रती।
देवोनी करि दान-धर्म दुसऱ्या लोकोपकारा सती।।
'लोकां-पासुनि शोषुनी जळुपरी काढूनि द्रव्या करी।
जो कृत्यें नृपती गम सकलिकां तो खास चोरा-परीं'।।११।।

**(स्त्रग्धरा)**

सत्राशें नव्वदाच्या इसविंत पडला, फार मोठा दुकाळ।
हिंदुस्थानांत तेव्हां बहुत जन हिनें वाचवीलेच, वेळ।।
होती भारी जनाला कठिण जन मृती पावले फार जेव्हां।
धान्याची पायली हो मिळत सकलिका रुपकालाहि[५] तेव्हां।।१२।।

**(मालिनी)**

प्रतिदिवशिं सती ही गो-प्रदानें हजार।
करुन द्विजवरांना[६] तोषवी फार फार।।
गरिब जन दुजे त्या अन्नवस्त्रांस वाटी।
विमुख जन कधीही जाउं देई न कष्टी।।१३।।

**(आर्या)**

अत्यंत नीच[७] लोकां, सणावारीं वाढुनीच पक्वानें।
देई खाया त्यांना, अंधाऽपांगासही[८] तसीं अन्नें ।।१४।।
बैरागी, गोसावी यांना सत्रें बहूस्थळीं करवी।
ठेउनि नोकर उष्णीं[९], वाटसरांना बहूत जल देई ।।१५।।
शिशिरीं[१०] गरिब जनांना वसनें[११] वाटावयास कारकुन।
फिरवी राज्या-मध्यें औदार्ये कर्ण भासवी ऊन[१२] ।।१६।।

---

१ कापडावरील जकात व प्राप्तीवरील कर यांनीं, २ मिठावरील करानें, ३ उपाशी (भुकेलेली), ४ दुष्काळ-फंडास, ५ एका रुपायाला, ६ ब्राम्हण-श्रेष्ठांना, ७ अतिशुद्र वगैरे, ८ आंधळ्या पांगळ्यांना, ९ उन्हाळ्यांत, १० हिवाळ्यांत, ११ वस्त्रें, १२ कमी.

**(इंद्रवज्रा)**

शेतामधें नांगर ओढतांना,।
जे श्रांत झाले वृषभादि[१] त्यांना ।।
पाणी पिण्यालाहि मिळो म्हणूनी।
नेमी सती सेवक फार रानीं ।।१७।।

**(शिखरिणी)**

पिकें शेतांमध्यें उभि असुनि खायास न मिळे।
तया पक्ष्यां हा हा बहु वदति केदार[२] सगळे ।।
म्हणूनी पक्ष्यांच्या उदर-भृति[३]-साठींच सुसती।
निराळी राखीही अवनि[४] सदया त्यांस महती ।।१८।।

**(उपजाति)**

नदी-तटाकीं असती स्थळें जीं।
तेथील मत्स्यां[५]-प्रति घालि रोजीं ।।
गोळे पिठाचे रघुनाथ[६]-नांवें।
घालून चारी सगळ्यांस भावें ।।१९।।

**(आर्या)**

प्रख्यात प्रभाकर-कवि, साध्वींच्या वेळिं हो असे भारतीं[७]।
त्यानें कटाव करुनी, साध्वि-गुणांलाहि गाइलेंच अती ।।२०।।
सारांश सांगतों मी, त्या कवि-रायें असे कथन केलें।
त्याचा, ध्यान असोद्या, सद्गुण[८] कोणा-प्रती न प्रिय झाले ।।२१।।

### (शार्दूलविक्रीडीत)

''नाहीं धन्य इच्या-परी कलि-युगीं जी जेववी ब्राह्मणां।
लक्षाहूनि अधीक कर्णहि तदा झाला नव्हे कां उणा।।
कुंडें पेटवूनी तयांत द्विज ते तैं आहुती टाकिती।
लग्नें तेलगुची[९] करुन मिरवी साध्वी वराती अती।।२२।।
दुग्धातें पुरवी स्तनं-धय[१०] मुलां, रोग्यांस पथ्यौषधी[११]।
वृद्धांला[१२] वसनान्न[१३] चालवि; द्विजा इच्छान्न[१४] घाली सुधी।।
होत्याला[१५] मठ अग्निहोत्र द्विज जो घेईल त्याला सती।
बांधूनी मग सर्व सोयहि करी त्याची त्वरें सन्मती।।२३।।

---

१ बैल, रेडे वगैरेंना, २ शेतकरी, ३ निर्वाहा-करितां, ४ पृथ्वी, ५ माशांना, ६ रामाचीं नावें (पिठाच्या गोळ्यांत चिठ्ठ्यावर लिहून घाली), ७ हिंदुस्थानांत, ८ चांगले गुण, ९ तेलंगी ब्राम्हणांची, १० तान्ह्या (स्तन पिणाऱ्या), ११ औषधपाणीं, १२ म्हाताऱ्यांना, १३ अन्नवस्त्र, १४ इच्छिलेलें अन्न, १५ होम करणाराला.

### (मंदाक्रान्ता)

कोटी लिगें[१] कधिं कधिं करी नित्य ऐके कथांना।
एका हातीं धरि जपस्त्रजे[२] आणि साध्वी जपांना।।
मोठ्या मोदें करि, प्रतिदिनीं वस्त्र यात्रे-करुला।
जोडे[३] कोणा विपुल धन तें देइ पात्रा[४] दिकांला।। २४।।

### (वसंततिलका)

यात्रे-करु जर गरीब असेल त्याला।
खर्चास सर्व सति देइ, सुपर्वणीला।।
ती तेल, तूप अथवा गुळ आणि तील।
यांच्या तुला व्दिज-वरांस करी बहाल।।२५।।
सौवर्ण[५] राजत[६] तुलांस कधीं द्विजांला।
वाटी सती धन बहू गरिबा जनांला।।
कोणास लग्न करण्या, व्रत उज्ज्वलाया।
नंदादिपा-प्रति कुणा गुहही कराया।।२६।।

### (स्त्रग्धरा)

साधूच्या दर्शनाला जशि जन[७]-तति हो नित्य येती नमाया[८]।
येती ते लोक भारी सकल-जन[९]-पदांहून साध्वी बघाया।।
देवी मानूनि तीतें नमन बहु-मुदें तत्पदी[१०] ते करुन।
झालों निष्पाप आम्ही वदन मनिं असें जाति यात्रा करुन।।२७।।

(आर्या)

भारी लौकिक सतिचा, उभय-कुलोद्धार[११] साध्विनें केला''।
पाहुनि प्रभाकरें मी, लिहिलें घेऊ न कोणि शंकेला।। २८।।

(स्त्रग्धरा)

बाई भावें सुमारें धन सकल जना आणि पश्वादिकांना।
ती खर्ची वीस कोटी स्व-पर[१२]-जन पदीं धर्म-कृत्यांत नाना।।
ऐसें ऐकूनि कोणी म्हणतिल सतिनें आळसी लोक सारे।
केले हें योग्य नाहीं, समजुत चुकिची ही असे खास बा रे।।२९।।

---

१ महादेवाची लिंगे, २ जपाच्या माळेला, ३ चर्मी जोडे, ४ भांडीं-कुंडीं वगैरे, ५ सोन्याच्या, ६ रुप्याच्या, ७ लोकांच्या पंक्ति, ८ नमस्कार करण्यास, ९ सर्व देशांहून, १० तिच्यापायीं, ११ दोन्ही कुलांचा उद्धार, १२ आपल्या व दुसऱ्याच्या प्रदेशांत.

होताही माल्कमाचा प्रथम समज हा विप्रवर्यें तयाला।
केलेल्या उत्तराला श्रवण करुनि तो फार संतुष्ट झाला।।
ऐकां तें ''साध्विनें या अपरिमित[१] धना व्यर्थ खर्चास केलें।
हा तुम्ही दोष त्यांना अगदिं फुकट कीं लादतां त्यास[२] बोले।।३०।।

(मंदाक्रान्ता)

या खर्चाच्या द्विगुणित[३] जरी खर्च फौजेस केला।
साध्वीनें त्या विपथिं[४] असतां, शांतता ही प्रजेला।।
भोगायाला कधिं न मिळती वाटतें आपणाला''।
तेव्हां तोही[५] श्रवण करुनी फार संतुष्ट झाला।।३१।।

(उपजाति)

मातेपरी प्रेम प्रजेवरी जी।
ठेवी तसा धर्म करी बहू जी।।
गुन्ह्यास शिक्षा बहु सौम्य देई।
होती दयाळू जगतांत बाई।।३२।।

(शार्दूलविक्रीडीत)

काठी[६] उंच नसे जिची तशिच जी ठेंगू नसे ही सती।
बांधा स्थूल नसे उदास मन ही दुःखामुळें तें अती।।
आनंदी मुख तें दिसे तरि सदा दासीं[७] करी प्रेम जे।
येई क्रोध तिला तदा तिजपुढें कोणी न जाया धजे।।३३।।

### (शिखरिणी)

असत्याचा[८] होता अगदिंच तिरस्कार सतिला।
असे जात्या स्त्रीही तरि बहुत तें धैर्य तिजला।।
प्रसंगी येईहो, करि निवृति[९] ती दुःख-ततिची[१०]।
असे मल्हाराची सुन म्हणविण्या तीस सुरुची[११]।।३४।।

### (शार्दूलविक्रीडीत)

विप्रांना अति पूज्य मानुन सती ठेवी भरंवसा अती।
राजांना परकीय पत्र लिहिणें किंवा वसुला-प्रती।।
धर्माचा विनियोग सर्व करवी विप्रांकडूनी सुधी।
विप्रांनी हि तसाच बे भरंवसा नाहींच केला कधीं।।३५।।

### (आर्या)

गो-ब्राह्मण[१२] प्रतिपाळी, गो-वध[१३] राज्यामधें तिच्या नव्हता।
व्हावा पर-राज्यांतहि[१४], बंद म्हणुनि यत्न साध्विचा होता।।३६।।

---

१ अमर्याद, २ मालकम साहेबास, ३ दुप्पट, ४ राज्यांत (प्रदेशांत), ५ मालकमही, ६ अंगकाठी, ७ चाकरांवर, ८ खोटेपणाचा, ९ निवारण, १० दुःखाच्या रायांची, ११ आवड, १२ गाई-ब्राम्हण, १३ गोहत्या, १४ दुसऱ्यांच्या राज्यांत.

परोपकारीं द्रव्या, खर्ची ती आश्रयार्थ विद्वाना।
यास्तव वैदिक पंडित, शास्त्री लांबून येति तैं नाना।।३७।।
कोणास शालजोड्या, धोतर-जोडे कुणास पागोटीं।
गवई गोंधळि यांना, देई बक्षीस ती कडीं कंठी।।३८।।
कधिं कधिं विद्वानांना, धाडुनि पत्रेंहि बोलवी साध्वी।
उचितादर करुनि सदा, मान-धनांनी तया बहू सुखवी।।३९।।
प्रसिद्ध मयुरकवीला[१], ती साध्वी पालखींत बैसवुन।
आणुनि महेश्वराला, किति-तरि दिन त्यास ठेवि गौरवुन[२]।।४०।।
अैशी विद्वत्ता ती, पाही तैसाचि तो सदाचार[३]।
अनंतफंदी मार्गी, गोष्टी सांगूनि आणिला चार।।४१।।
एकेवेळीं फंदी, येउन तो त्या महेश्वरींहि करी।
डफ तुतुण्यादिकांनी, नाच जनांच्या पुढेंच ही स्वारी।।४२।।
ऐकुनि हें सतीनें, बोलावुन त्यास आणिलें जवळीं।
बोले ''द्विज-वर असता, डाग कसा लाविता तुम्ही स्वकुळीं।।४३।।

निंद्य असे हा धंदा, अन्य प्रतिष्ठित कराच उद्योग।
व्हावा रविशीं[४] विधुचा[५], परि राहूशीं[६] कधीं न हो योग'' ।।४४।।
ऐकुन उपदेश[७] तिचा, फेंकुन दिलें डफादिंका त्यानें[८]।
बुद्धीचा सद्यय तो, करुनि पुढें मिळवि द्रव्य, यश वसनें[९] ।।४५।।
बालपणीं या सतिला, शिक्षण होतें गुरु-कडून जरा।
झाला उपयोग तिला, प्राकृत पोथ्या बघावयास बरा।।४६।।
विद्वत्सहवासानें[१०], संस्कृत-भाषाहि जाणण्यास सती।
लागे हळू हळू ती, वाचन श्रवणास ती करीच अती।।४७।।

---

१ मोरोपंताला, २ आदर करुन, ३ चांगली वागणूक, ४ सुर्याशीं, ५ चंद्राचा, ६ राहू प्रकाशीं, ७ बोध, ८ आनंदफंदीनें, ९ वस्त्रें, १० विद्वानांच्या सहवासानें.

राज्य-व्यवहाराचे, धार्मिक ही ग्रंथ पाहिले सतिनें।
केलें मनन तयांचें, मग केले कायदे स्वतां मतिनें।।४८।।
साध्वी-इतकी ज्ञानी, त्या वेळीं भारतीं[१] नसे नारी[२]।
तरि गर्व नसे सतिला, स्व-स्तुति[३]-श्रवणा कधींच ती न करी।।४९।।
(युग्म) एकें विप्रें स्तुतिपर, ग्रंथ तिला वाचुनीच दाखविला।
'मी मृत्यु-लोकची स्त्री, पापी[४] हें शोभतें मुळीं न मला।।५०।।
ईश्वर-स्तुति सोडुनिया, मनुज-स्तुति ही मुळीं नसे उचित'।
बोलुनि ग्रंथ सतीनें फेंकुन दिलाच नर्मदानदीत।।५१।।

**(दान-स्वभाव-दर्शन नामक १३ वा अंक समाप्त)**

---

## अंक चौदावा

# कैलासगमन

**(स्त्रग्धरा)**

प्रावृट्कालीं[५] प्रवासा, जर पथिक निघे पावसाच्या सरींला।
एकामागून एका तर निमुटपणें सोसणें भाग त्याला।।
केव्हां आल्हाद देई रवि निज-किरणीं दैव त्याचें म्हणावें।
धारांना रोज त्याला परि निज-शरिरीं लागतें नित्य घ्यावें।।१।।
तैसें हें ह्या सतीचें चरित मज गमे दुःख[६]-जीमूत-धारा।
श्रोत्यांचें वाचकांचे मन करिति सदा आर्द्र[७] हो नेत्रद्वारा।।

येऊनी बाह्य-देशीं वसन भिजविती नेत्रयोगें समस्त।
कांही भागांत थोडा सुख[८]-रवि दिसला त्या-विना सर्व अस्त।।२।।

**(शिखरिणी)**

विधात्याचा[९] हेतू सतिस निकषीं[१०] लावुन तिच्या।
पुरे धैर्याला हो बघुन मग द्यावेंच सतिच्या।।
गुणायोग्य स्थाना धरुन मनिं ऐसेंच विधि हा।
छळी या भागीं हो श्रवण करणें दुःखदचि हा[११]।।३।।

**(शार्दूलविक्रीडित)**

मुक्ताबाइस त्या महेश्वरिं दिलें होते जयाच्या घरीं।
तो संस्थानिक[१२] नीतिमान असुनी संपत्ति होती बरी।।

---

१ हिंदुस्थानांत, २ स्त्री, ३ आपली स्तुती ऐकणें, ४ हें वि. 'मी' याचें (मी पापी), ५ पावसाळ्यांत, ६ दुःखरुप मेघांच्या धारा, ७ ओलें (सद्गदित), ८ सुख-रुपी सूर्य, ९ ब्रह्मदेवाचा, १० कसावर, ११ हा भाग, १२ फणसे.

पातिव्रत्य तसे दुजे सुगुण ती मातेकडूनी[१] अती।
घेऊनी अगदीं तिच्या-परिच ही वागे असे नम्र ही।।४।।

**(स्त्रग्धरा)**

या नामी वर्तनानें निज-सुगुण[२]-गणें ती सतीच्या[३] मनाला।
दुःखाचा पाडि थोडा विसर मग तिला[४] पुत्रही एक झाला।।
पुत्राचें सौख्य तैसें, पति-सुख दुसरें वैभवाचें[५] असेही।
ऐशा सौख्य-त्रयींच्या-मधिं दिन अपलें घालवी कन्यकाही[६]।।५।।

**(शिखरिणी)**

गुणी मुक्ताबाई प्रतिकृति[७] सतीचीच दुसरी।
असे लोकां भासे पतिसहि सुखाची खनि[८] घरीं।।
अहिल्याबाईही कधिं कधिं सुतेचे गुण सुखी[९]।
कधी, मुक्ताबाई प्रमद बहु मानी निजसुखीं।।६।।

**(स्त्रग्धरा)**

दुर्दैवानें सतीच्या सुख-तंतिंत[१०] तिच्या[११] मृत्तिका[१२] कालवोनी।
कौटुंबीयांस[१३] दुःखीं तळमळत दिलें टाकुनी सौख्य मानी[१४]।।
देवानें जें दिलें त्या नशिब झडकरीं न्यावया सिद्ध होतें।
वाटे त्यालाचि[१५] देवाहुन अधिक किं हो शक्ति तेव्हा असे ते[१६]।।७।।

देवा-दैवांत लोकां-प्रति बल दिसतें फार दैवास, त्यांत।
मात्रेचा एक तोटा म्हणुन सहजची दैव त्याहून जास्त ।।
या दैवानें जनांला अजवरि छळिलें फार हो फार साच।
सीतेला पांडवांला नृपति-वर दुजा विक्रमाला तसेंच ।।८।।

**(शिखरिणी)**

दहा बारा वर्षें सुखयुत असे तत्प्रिय-सुता[१७]।
परी तापी[१८] काळा यम अवकृपेनें हरि नता ।।
तिच्या सत्पुत्राला करि बहुत दुःखास सुदती[१९]।
तदा माता[२०] बोधा करुन समजावी तिस अती ।।९।।

---

१ आई (अहिल्याबाई)कडून, २ आपल्या चांगल्या गुणांच्या समुदायानें, ३ अहिल्याबाईच्या, ४ मुक्ताबाईला, ५ संपत्तीचें, ६ मुलगी (मुक्ताबाई), ७ प्रतिमा, ८ खाण, ९ हें विशेषण 'सूतेचे', १० सुखपरंपरेत, ११ मुक्ताबाईच्या, १२ माती, १३ कुटुंबांतील लोकांस, १४ याचा कर्ता 'दुर्दैव', १५ दैवाला, १६ ती (शक्ति), १७ अहिल्याबाईची प्रिय कन्या, १८ ताप देणारा, १९ सुंदरी (मुक्ताबाई), २० आई.

**(शार्दूलविक्रीडीत)**

औदासिन्य[१] तदा कसें तरि महत्कष्टें गिळी सन्मती[२]।
व्हावा तुष्ट पती तशी जननिही[३] कष्टी न व्हावी अती ।।
यासाठीं सुख मानुनी मग पुन्हां वागावया लागली।
तों दुर्दैव पुन्हां करी तिजवरी हल्ला बिचारे भली ।।१०।।

**(स्त्रग्धरा)**

पुत्राचें दुःख कोठें विसरत असतां आणखी एक घाला आला।
कालें सुतेच्या पति-वरिच कि हो मारिला थोर भाला ।।
मुक्ताबाई धरेला धडकिन पडली पाहतां ही कुठार।
शोकानें व्याप्त भारी सकल जन तसी ती प्रसू होइ[४] फार ।।११।।
''या माझ्या लाडकीला मजपरिच कसें दुःख भोगावयाचें।
देवा त्वां आणिलें रे अलिकच[५] फुटकें काय माझ्या मुलीचें ।।
किंवा हें पाप माझें तिजप्रति फळलें वैर वा साधुनीया।
जामाता[६] जाइ स्वर्गा'' वदुन जननिनें घातलें त्याच ठायां ।।१२।।
मुक्ताबाई सतीच्या[७] उठुन मग मिठी कंठिं घाली पहातां।
भारी शोकाश्रु ढाळी रड रडुन करी नेत्रही शुष्क माता ।।
मातेनें त्या सुतेनें बहुत समय हो शोक केलाय, बोले।
मुक्ताबाईस माता मग ''नशिब तसें प्राप्त होतेंच बाले'' ।।१३।।

**(शार्दूलविक्रीडीत) (युग्म)**

तेव्हां ती तनया रडे गिळुनियां माते-प्रती बोलली।
''मी जातेंच सती मला जननि तूं आशीर्वचा[८] दे भली'' ।।
ऐकूनी प्रसुचा सुटूनि सगळा तैं धीर बोले तिला।
''झाला काय मुली विचार तुज हा कोणी नसे गे मला'' ।।१४।।
बाले ''मी तुजला बघूनि गिळिलें तें दुःख सारें तदा।
जासी टाकुनि एकटी मजप्रती, देऊ नको आपदा ।।
आहे प्रेम तुझें खरें मजवरी, टाकून जाऊ नको।
देवाची तुजला असे शपथ गे मी दीन हो बायको'' ।।१५।।

---

१ खिन्नता, २ चांगल्या बुद्धीची (मुक्ताबाई), ३ (अहिल्याबाई), ४ आई, ५ कपाळ, ६ जावई, ७ अहिल्याबाईच्या, ८ आशीर्वाद.

''आई प्रेम तुझें असें मजवरी,'' बोले सुता ती तिला।
''यासाठी म्हणणें तुझें सकल गे, तें मान्य व्हावें मला ।।
आई धार्मिक[१] आयु संपुन तुझें स्वर्गास जाता परी।
आहे कोण मला विचार करुनी दे शिष्टि[२] जाया[३] बरी ।।१६।।

**(स्त्रग्धरा)**

ऐकोनी शब्द माता उपलसम[४] तदा स्तब्ध बैसे, सतीला।
धर्माच्या आड येणें हरकत करणें धर्मकृत्या, मतीला ।।
यांची भीतीच वाटे, म्हणुन मुलिवरी नाहिं केला जुलूम।
राहायाला सतीनें, परि सदय मना सोडिना वत्स-प्रेम ।।१७।।

**(शार्दूलविक्रीडीत)**

झाला निश्चय जावयास मुलिचा मांगल्य[५]-स्नाना तिनें।
केलें, आणि सतीस योग्य वसना नेसूनिया, दागिने ।।
वाटी सर्व वधूं-प्रती[६], मळवटा भाळीं भरी ती सुधी।
जाया उत्सुख जाहली पति-कडे, ''भेटेने वाटे कधीं'' ।।१८।।
कंठीं घालुन कर्पुरादिक स्त्रजा[७] मातेंस वंदी सती।
घालूनींच तिच्या गळ्यास मिठिला, मागे निरोपाप्रती ।।
दुःखाऽऽवेंग न साहुनी जननि ती किंकाळली तैं अती।
''जासी काय मुली त्यजून मजला दुःखांत तू गे सती'' ।।१९।।
मातेला मग बोलणें न सुचलें झांकून नेत्रांस ती।
निचेष्टा[८] पडली, बघून मुलगी खेदास पावे अती ।।

आता कांहिं नसे उपाय म्हणुनी मातेस बोले सती।
''आई सोड ममत्व[९] बोध मजला आता नको सन्मती'' ।।२०।।

''आई प्रेम तुझें विशेष करिता स्वर्गी तुझी भेट ती।
होवो राहू तिथें वियोग नसता, मार्ग-प्रतिक्षा पती।।
स्वर्गी गे करितों निरोप मजला आई दिला पाहिजे''।
तेव्हां ती वदली ''मुली तुज करी तें योग्य वाटेच जें'' ।।२१।।

---

१ दानधर्म करणारें, २ आज्ञा, ३ सती जाण्यास, ४ दगडासारखी, ५ मंगलस्नान, ६ स्त्रियांना, ७ माळा, ८ बेशुद्ध (चलनवलन विरहित), ९ ममता.

प्रासादांतुन[१] काढिलें शव तदा कन्या सवें चालली।
देखावाच बघूनि वृद्ध जननी बेशुद्ध ती जाहली।।
विप्रांनी धरिलें तिला मग निघे जाया, स्मशाना-प्रती।
येवोनी मग ठेविती चितिवरी ते लोक प्रेताप्रती।।२२।।

जीं कृत्यें कथिलीं द्विजें सतिप्रती तीं तीं तिनें चांगलीं।
आनंदें करुनी सखींप्रति तदा सौभाग्य-दानें दिलीं।।
त्यांचा घेई निरोप, विप्र नमुनी आशीस[३] ही घेतलें।
मातेच्या चरणीं प्रणाम करि ती, त्यांनी निरोपा दिलें।।२३।।

**(वसंततिलका)**

केला प्रवेश मग त्या सतिनें चितेंत।
आलिंगिला प्रियपती प्रमुदेंच[४] तींत।।
अग्नी तिनें झडकरीं मग चेतवीला।
जाळून टाकुन दिलें अनलें[५] तयांला[६] ।।२४।।

**(उपजाति)**

चितेमधें जैं शिरली सुता ती।
माता धरी धैर्य बहू स्वचित्तीं।।
परंतु साध्वी बघतांच ज्वाला।
बेशुद्ध झाली पडली धरेला।।२५।।

**(स्त्रग्धरा)**

''मुक्ताबाई कुठें गे मज निरवुन तूं एकटी चाललीस।
भेटे तू एकदा गे शिव शिव मुलगी चालली काय खास'' ।।
ऐसा आलाप त्यांनी बहुत करुनिया लोकही साश्रू केले।
जायाला धांवल्या त्या अनल[७] शरणिं हो तैं द्विजीं[८] थांबवीलें।।२६।।

**(द्रुत विलंबित)**

धरुन गच्च तिला क्षितिला[९] द्विजीं।
बसविली शरिरास पिळीच जी।।
प्रथम धाक पुढें करि प्रार्थना।
''सहन हें मजला अक[१०] होइना''।। २७।।

१ राजवाड्यांतून, २ प्रेत, ३ आशीर्वादास, ४ आनंदानेंच, ५ अग्नीने, ६ मुक्ताबाई व तिचा नवरा यांना, ७ अग्निसरणावर, ८ ब्राह्मणांनी, ९ पृथ्वीवर, १० दुःख.

**(शार्दूलविक्रीडीत)**

सर्वांना प्रिय मावली तिजप्रती सोडावयाला कसें।
सांगा होतिल ते तयार द्विज तैं, साध्वी सतीला असें।।
बोलोनी समजाविती 'जननि हो आम्हा जना संप्रती।
आई बाप धनी तुम्हीच असतां जाता कुठें सन्मती'।।२८।।
गेली पार चिता जळुन मग ये शुद्धी-वरी सन्मती।
विप्रांना वदली पुढें विधि कसा, तैं विप्र जें सांगती।।
तें तें सर्व करुन खिन्न असतां गांभीर्य[१] दावी वरी।
सद्मीं[२] पाउल ठेवतां भडकलें तें चित्त शोका करी।।२९।।
एकांतीं बसली तदा रडत ती खाण्या-पिण्या वांचुनी।
काढी ती दिन तीन त्या स्थिति-मधें, केलें विवेका मनीं।।
केलें दान अती सती स्वतनया गेली तिथें तैं भलें।
मोठें देउळ बांधिलें अजुनही वाटे नवें चांगलें।।३०।।

**(आर्या)**

हें दुःख त्या सतीचें, शेवटचें अन्य दुःख नच झालें।
उदार आणी धार्मिक, शरीर दुःखाप्त[३] होउनी खचलें।।३१।।
पुत्रापरि प्रेम जनीं, औदार्य[४] लाजवीच कर्णाला।
त्या साध्वीस विभूनें[५], दुःख दिलें काय हो म्हणूं त्याला।।३२।।
न्यायी देव म्हणावा, तर न्यायाच्या विरुद्ध हें घडलें।
अन्यायी म्हणणें हें, चुकिचें होईल हें मला गमलें।।३३।।
नाहीं देव म्हणावा तर मग निर्माण जग कसें झालें।
तेव्हां देव असावा, ऐसें मत पूर्ण होउनी गेलें।।३४।।
निर्दय त्यास म्हणावें, तर गेला धाउनी सभेमाजीं।
राखावयास लज्जा, सतिची कैसा दयानिधी गाजी[६]।।३५।।

१ गंभीरपणा, २ वाड्यांत, ३ दुःखानें भरलेली, ४ उदारपणानें, ५ परमेश्वरानें, ६ प्रख्यात.

(शार्दूलविक्रीडीत)

सावित्रीस तसेंच दुःख दिधलें सीतेस, तारामती।
दुःखाब्धीत[१] बुडे तसी द्रुपदजा तैसी अहल्यासती[२]।।
या सर्वांस पुढें इथें सुख दिलें त्या ईश्वरानें परी।
तैसें सौख्य हिलाच[३] कां न दिलें! कां भेद त्याच्या घरीं।।३६।।

(आर्या)

याचा निर्णय करणें, विद्वानांच्या - वरीच सोंपवितों।
जें शक्य मृगेंद्राला, तें करण्या प्राणि कोणता धजतो?।।३७।।

(शिखरिणी)

सुता स्वर्गी जाता प्रियकर सतीला बहुत जी।
सती सोडी कृत्यें, सकल इहलोकीं सुखद जीं।।
तुकोजीला लिही तुम्हि निघुन यावें झडकरीं।।
धरा ही राज्याची अनिन[४] तुमची हो निजकरीं।।३८।।

(स्त्रग्धरा)

श्रीमंतांचा निजामा वर कर-हरणा-साठिं हल्ला करावा।
ऐसा तैं बेत झाला सबब न निघावे इंदुरालाच 'रावा'[५]।।
ऐके जेव्हां सती हें प्रतिनिधि[६]-वरि ती टाकुनी कारभार।
झाली ती साध्वि तेव्हां वरिं[७] सुखद[८] कृती त्या कराया तयार।।३९।।
झालीं शारीर दुःखें सतिस अजवरी मानसींचींहि झाली।
त्यायोगें क्षीणकाया वयहि बहुत हो सत्तर वर्षेहि गेलीं।।
तेव्हां आता परत्रीं[९] गमनच करणें प्राप्त आहे म्हणून।
स्नानाला तीन वेळां करुन हर पुजी पार्थिवाला करुन।।४०।।
झुंडी यात्रेकरुंच्या सतिप्रति बघण्या लांब लांबुन आल्या।
पंक्ती तैशा नृपांच्या सति-चरणीं शिरा वाहण्याला मिळाल्या।।
त्यांचा सन्मान साध्वी करुन सुखवि त्या भेटुनीही तशीच।
झाली हो क्षीणशक्ती शयनिं पहुडली बाइ त्या शांतशील।।४१।।

---

१ दुःख-समुद्रांत, २ गौतमाची बायको, ३ अहिल्याबाईला, ४ लगाम, ५ तुकोजीला, ६ कारभाऱ्यावर, ७ स्वर्गांत, ८ सुख देणारी, ९ स्वर्गांत.

### (शार्दूलविक्रीडित)

भेटी बंदचि जाहल्या द्विजवरां अन्नादिकें तर्पणें।
वस्त्राऽलंकृति[१]-दान दंपति-प्रती[२] देऊन सन्मानणें।।
अन्यांही सकलां जनांस दिलें वांछीत जें जें असें।
ऐसा तो क्रम चार मास सतिनें सांभाळिला हो असे।।४२।।
त्यांचें पुण्य अपार यास्तव सती-लागीं बिछान्यावरी।
काढावे दिन आठ लागति पुढें गेल्याच बाई वरीं[३]।।
सन्नाशा[४]-वरतींच सप्तदश त्या संवत्सराच्या-मधें।
झाला काळ चतुर्दशी असित[५] ती त्या श्रावणाच्या-मधें।।४३।।

### (स्त्रग्धरा)

संताजीनें[६] सतीच्या स्वजनसह तदा और्ध्वकार्यास केलें।
तेव्हां लक्षावधी ते जन जननिप्रती पोंचवीण्यास आले।।
''देवा ठेवी सतीला निज-चरणिं'' असें प्रार्थिलें हो तयांनीं।
नामाचा घोष मोठा करुन दश दिशा टाकिल्या त्या भरोनी।।४४।।
हिंदुस्थानांत सारे श्रवण करुन ही दुःखवार्ता सतीची।
भारी शोका करुनी हळहळति बहू वर्णिती कीर्ति साची।।
साध्वीची सुप्रजा तैं अपरिमित अशा दुःख[७]-पंकार्णवांत।
तैसें ते पेशवेही नृपति[८]-वर दुजे मग्न झाले तयांत।।४५।।
तारा मंदोदरी ती द्रुपद-नृपसुता-द्रौपदी आणि सीता।
सावित्री या स्त्रियांची ऋषि-वर भगवान् व्यास कीर्ति अनंता[९]।।
गावोनी हर्ष पावे तशिच गुणवती ही सती शुद्ध नामी।
तेव्हां तो व्यास व्हावा सत गुण-स्तवना अल्पबुद्धी किती मी।।४६।।

### (आर्या)

'गावी संत-चरित्रें' ऐसी आज्ञा प्रसिद्ध तुकयाची।
तीतें अनुसरलों मी, कीर्ति जरा बोललों महा-सतिची।।४७।।
खंडेराव कऱ्हेच्या, कांठीं राहून भक्त सांभाळी।
त्या मम कुल-देवाच्या, अर्पण करितोंच ग्रंथ पदकमळीं।।४८।।

---

१ वस्त्रें व दागिने यांचे दान, २ जोडप्यांना, ३ स्वर्गी, ४ शके, १७१७ त, ५ कृष्ण, ६ तुकोजीच्या भावाचें नांव, ७ दुःखरुपी चिखलाच्या समुद्रांत, ८ श्रेष्ठ राजे, ९ अमर्याद.

**(स्त्रग्धरा)**

श्री-कृष्णें विप्रवर्या मुठभर पृथुकांसाठिं सौवर्णस्थाना।
देऊनी निर्धनाला सधन करुनही नाशिले क्लेश नाना।।
तैसा मीही दरिद्री पृथुकपरिच हें काव्य माझें दयाळा।
श्रीकृष्णाच्या प्रमाणें वितरण हि करां प्रार्थितों लोकपाळा[१] ।। ४९।।

---

१. सर्व लोकांच्या पालका परमेश्वरा खंडेरावा.

**(कैलास-गमन नामक १४ अंक समाप्त)**

**(श्री-खंडेरावार्पणमस्तु शुभंभूयात्)**

**सुज्ञांस प्रार्थना.**

**(शार्दूलविक्रीडीत)**

बुद्धी अल्प असे तसी मजप्रती विद्याहि अल्पा असे।
विश्वाचें मज ज्ञान अल्प प्रभुची भक्ती अनल्पा[१] वसे।।
साध्वीचें यश अल्प मी कथियलें; मोदेंच विद्वज्जनीं[२]।
चित्ता देउनि पाहिलें म्हणून मी आभारि आहें मनीं।। १।।
शंभूनें विष कंठिं इंदु धरिला आहे जसा शेखरीं।
तैसें यांतिल दोष आणि गुणही घ्यावेंच विद्वद्वरीं।।
माझा हा पहिलाच यत्न करितां त्यागोनि दोषांप्रती।
द्याहो उत्सुकता मला प्रणमितों[३] युष्मत्पदा[४] संप्रती ।।२।।

---

१ पुष्कळ, २ विद्वानांनीं, ३ नमस्कार करितों, ४ आपल्या पदकमलास.

**समाप्त**

•

# श्री देवी अहिल्याबाईचे चरित्र

## ह. भ. प. संतकवि श्रीदासगणू महाराज

*१. आर्या*

देवी सती अहिल्या भारतभूला ललामभूता जी
राजकारणी चतुरा, असुनि जिनें ठेविला हरी राजी ।।१।।

श्रीदेवी अहिल्याबाईचें नांव माहीत नाही असा एकही पुरुष किंवा स्त्री महाराष्ट्रांत मिळणार नाही. अशा प्रकारची साध्वी, छत्रपतींच्या कुलांत किंवा पेशव्यांच्या घराण्यांत किंवा शिंदे, गायकवाड यांच्या घराण्यांत होऊन गेल्याचे दिसत नाही. ह्या घराण्यांतही कांहीं कांहीं राजकारणी व सन्नीतिमान स्त्रिया होऊन गेल्या; नाहींत असे नाहीं. पण अहिल्याबाईची सरी पावेल अशी एकही स्त्री झाली नाही, असे म्हटल्यास अतिशयोक्ति अथवा अन्यथार्थोक्ति होणार नाहीं, असो.

*२. दिंडी*

मेषपालाच्या वंशिं दक्षिणेंत । आलें उदया स्त्रीरत्न मूर्तिमंत ।।
किती वानूं मी? तया अहिल्येला । सिनाकाठीं चोंढींत जन्म झाला ।।१।।

अहिल्याबाईचा जन्म महाराष्ट्रातील धनगराच्या जातींत चोंढी या गांवी झाला. हा चोंढी गाव बीड जिल्ह्यात आता अहमदनगर जिल्ह्यात अष्टी तालुक्यांत आहे. कांहीं इतिहासकार हे तिचे बापाचे गांव असे सांगतात व कांहीं, ते अहिल्याबाईंचे आजोळ आहे असे म्हणतात.

*३. ओवी*

पाथर्डीचा रहिवासी । आनंदराव शिंदा परियेसी ।।
अहिल्याबाई त्याचे कुशीं । जन्म घेत्या जाहल्या! ।।१।।

हा पाथर्डी गांव नगर जिल्ह्यांत शेवगांव तालुक्यांत आहे. हा आनंदराव शिंदा धनगर असल्यामुळें :

***४. पद*** *(चाल–महाराज तुम्ही)*

व्यवसाय तयाचा अतिशय खडतर! किती कथूं वाचे?।।
काहीं शेती, कळप संग्रहा, शेळ्यामेंढ्यांचे।।
उन वारा, साहि खरा, विश्रांती, घे न जरा।।
करुनि कष्ट अति, कसें बसें करि, पोषण उदराचें।।१।।

लहान शेतकऱ्यांना दुय्यम धंदा केल्याशिवाय पोट भरण्याची सोय नाही. हा नगर जिल्हा म्हणजे :

*५. लावणी*

दुष्काळि मुलुख तो आधीं दया ती कधीं येइल देवाला
बाभळी हिवर जंगला ।।
कुठें क्वचित् धनंतर विहिरी, मळ्यांभीतरीं दुष्काळ पाण्याचा
सरितेस पूर वाळुचा ।।

टेंकड्या माळ, आणि कडे, भूषित तरवडे, फण्या निवडुंगा
सर्वत्र मुभा ती बघा! ।।
पिक पिके ज्वारि बाजरी, तिही ना पुरी, अहा! हत दैवा! ।।
गणु म्हणे, पाव माधवा! ।।१।।

अशा प्रकारचा वर पदांत वर्णन केल्याप्रमाणें, तो नगर जिल्हा असला तरी त्या नगर जिल्ह्याची :

**६. *आर्या***

परि दुबळ्याची आली कींव पहा वृद्ध तीर्थ-जननीला
घेउन अंकीं खेळवि गोदावरि माय नगर जिल्ह्याला! ।।१।।

कारण, थोरांना हीनदीनांचे रक्षण करणें हेच खरे भूषण आहे. म्हणून, सकल तीर्थांची जननी जी वृद्ध गोदावरी तिने ह्या जिल्ह्याला जणु काय आपल्या मांडीवरच घेतले आहे! नगर जिल्ह्याची बाह्यस्थिति जरी दीनवाणी दिसत असली, तरी त्या जिल्ह्याचे महत्त्व फार मोठे आहे.

**७. *श्लोक***

वा तो जिल्हा गमत प्रतिमा, साच श्रीशंकराची ।।
एकालाही, जगतिं न च ये, योग्यता हो तयाची ।।
दुर्भिक्षाची, धवल विभुती, वीष दुष्काळ कंठा ।।
शीर्षीं गंगा, शिवद सकला, नाहिं नाहीं करंटा! ।।

भूगोलाकडे पाहिले असतां, कोपरगाव तालुका हा नगर जिल्ह्याच्या शिरोभागी आहे. त्यामुळें, ह्या जिल्ह्याचा देखावा श्रीशंकरांच्या मूर्तीप्रमाणें भासतो. त्याचे यथातथ्य वर्णन वरील श्लोकांत आहेच. अशा ह्या शिवस्वरूपी नगर जिल्ह्यांत आनंदराव शिंदा पाथर्डीत राहत असे. एक दिवस आनंदराव शिंदा नेहमीप्रमाणें शेतांतून भाकर खाण्याकरितां घरी लवकर न आल्यामुळें, त्याची बायको आपल्या नवऱ्याची वाट पाहत आपल्या दारात बसली होती. तो इतक्यांत एक श्रीरामेश्वराला जाणारा भिक्षेकरी त्या धनगरांच्या गल्लीतून शिवाचे भजन करीत चालला होता. ते भजन असे :

**८. *पद***

श्री सांबसदाशिव भजले। नरतनुका सार्थक कर ले! ।।धृ०।।
नर-मुंडनकी माला कंठीं। शिरपर गोदा माता! ।
थय, थय, थय, थय, नृत्य करत हर, जगत्त्रयोंका पाता! ।।१।।
गजचर्मांबर ओढलिया है, डिम डिम डमरु बजावे ।।
भुं भुं भुं भुं शंख बजत है सन्मुख नारद गावें ।।२।।
वीरभद्र, गणनाथ, षडानन बैठे हरके साथ ।।
दासगणू कहे चलो भाईयों उनसे जोडो हात! ।।३।।

बैरागी शैव असल्यामुळें, शंकराचे भजन करीत चालला होता. त्यास पाहून अहिल्याबाईच्या मातोश्रींनीं त्याला एक भाकरीची भिक्षा घातली व बैरागी वैराग्यसंपन्न पाहून मोठ्या विनयानें प्रश्न केला की, 'महाराज! माझे पोटपाणी पिकेल का हो? (मला मुलेबाळे होती का हो?)' बैराग्याने तिची केविलवाणी मुद्रा पाहून, तिला सांगितले की ''बाई, तुला पोटपाणी पिकावें अशी इच्छा असेल तर :

*९. श्लोक (पृथ्वी)*

जगज्जननि अंबिका कमलजा रमा इंदिरा ।।
उभी अशिव वारण्या कलियुगांत कोल्हापुरा ।।
तदीय पद आठवीं, करिल पूर्ण ती कामना ।।
नको बसुस ये स्थलीं त्वरित जा तिच्या दर्शना ।।

''म्हणजे अंबाबाईच्या कृपेने तुला एखादे मूलबाळ होईल.'' असे सांगून बैरागी निघून गेला. अहिल्याबाईची आई ते ऐकून समाधान पावली व नवऱ्याला ही गोष्ट केव्हा सांगेन असे तिला झाले होते. इतक्यांत नवरा घरी आला. त्याला तिनें जेवायला वाढले व म्हणाली, ''आज एक बैरागी आला होता. त्यानें मला आशीर्वाद देऊन मूल होण्याचा उपाय सांगितला आहे तो तुम्हाला सांगावा, असे मला वाटते. तो तुम्हाला सांगू कां ?'' नवरा म्हणाला, ''वेडावाकडा नसेल, तर जरूर सांग.'' बायको म्हणाली :

*१०. ओवी (जात्यावरील)*

नाहिं आपणाला संतती!। धिक् संसार, प्राणेश्वरा ।।
आळवुं ती अंबाबाई । चला, करविर कोल्हापुरा ।।१।।

असे ऐकून, नवरा म्हणाला, ''ठीक आहे. चला कोल्हापुरला जाऊन येऊं! आपणा अनाथांची कीव श्रीअंबाबाईला आली, तर बरंच झालं.'' असे म्हणून, उभयतां कोल्हापुरांत आले. श्रीअंबाबाईची मनोभावे कांहीं दिवस सेवा केली. त्या योगाने :

*११. आर्या*

अष्टभुजा नारायणि विकली बुध हो! खचीत भक्तीला ।।
जन्मां येइ निजांशें शिंद्यापोटीं हरिप्रिया कमला! ।।१।।

कोल्हापुरास कांहीं दिवस राहून उभयतांनीं श्रीजगदंबेची मनोभावे सेवा केली व परत पाथर्डीला आले. श्रीजगदंबा आपल्या भाविक भक्ताला कधीही विन्मुख पाठवीत नाही. तिनें आपणच निजांशानें शिंद्याच्या पोटीं येण्याची तयारी केली! अहिल्याबाईचे आईस दिवस गेले. अहिल्याबाईच्या आईचे हे पहिलेच बाळंतपण असल्यामुळें, जनरिवाजाप्रमाणें ती आपल्या बापाच्या घरी म्हणजे चोंडी चापडगांवास गेली. या चोंडींत श्री अहिल्याबाईचा जन्म झाला!

*१२. दिंडी*

अहिल्या हें कन्येस ठेवियेलें । नाम, जननीं जनकास सौख्य झालें ।।
दिवसमासीं ती पुढें थोर झाली । जणूं वाढू लागली भाग्यवल्ली! ।।१।।

मुलाची बुद्धी नेहमी अनुकरणप्रिय असते. अहिल्याबाईचा बाप (वडील) आपल्या घरी आदितवारी, पौर्णिमेला श्रीखंडोबाची तळी आरती भरीत असे. ते पाहून अहिल्याबाईला वाटे कीं, ''आपल्या घरांत कोणते चांगले काम असेल, तर हेच आहे.'' त्याप्रमाणें तीही लहान मुलींत खेळतांना मातीचा डोंगर करी, त्यावर दोन दगड मांडी, व पोरींना म्हणें कीं :

*१३. ओवी (चाल–जात्यावरची)*

''नका खेळूं गं पोलिनों!। ओंगळशा भातुकलिला ।।

चला पहाया मम आंगणीं। म्यां मल्हाली मांडिला!।।१।।
जो लाजा जेजूलिचा। दिनदुबळ्यांचा ग धनी!।।
उभ्या सेवेस दों बाजुला। बाणु म्हाळसा कामिनी!।।२।।
वाहुं भंडाल खंडोबाला।, तलि आलती ती कलुनियां।।
या गं! हल हल महादेव म्हणा। सइ चिंतामणि मोलया!।।३।।

लटुपुटीची आरती मुलींना घेऊन करावी व मातीचा भंडार उधळून मोठ्या भावानें त्या मांडलेल्या देवास नमस्कार करावा. त्याप्रमाणें अहिल्याबाईला परमेश्वराची अहेतुक सेवा घडली. व हाच तिच्या अभ्युदयाचा पाया होय. श्रीखंडेरायांनी मनांत म्हटलें, कीं, ''अहिल्ये, तू माझी तळी उचललीस, मी तुझी उचलीन !'' असो. अशा प्रकारचे अहिल्याबाईचे रस्त्यांत चाललेले खेळ पाहून, समोरच मारुतीच्या देवळांत पळशीकर तात्या पंतोजींची शाळा होती. तेथें बसून, तात्या पंतोजीने हे मुलीचे खेळ पहावे व मनांत म्हणावें, कीं ''ही मुलगी नेहमी प्रल्हादासारखी खेळ खेळत असते! यावरून, ही कोणी तरी अलौकिक विभूति आहे, यांत संशय नाही.'' मुली कंटाळून आपल्या घरी गेल्या, म्हणजे अहिल्याबाईने मारुतीचे पायरीवर येऊन बसावे व तात्या पंतोजी मुलांना काय शिकवितो आहे, हे लक्ष लावून ऐकावे; आणि दुसरें दिवशीं मुले चुकली, कीं आपण पायरीवर उभे राहून म्हणावे, कीं ''तात्या! काल तुम्ही याला असं असं सांगितलं होतं.'' ते ऐकून तात्याला मोठे आश्चर्य वाटे! मुलीची तीव्र बुद्धी पाहून तो मुलीला जवळ बसून घेऊं लागला; व अवांतर मुलांप्रमाणें तिलाही तो लिहायला वाचायला शिकवूं लागला. त्यामुळें, अहिल्याबाईचे लक्ष खेळण्यांतून कमी होऊन सहजच विद्यार्जनाकडे लागले. तात्या पंतोजी तिला प्रेमानें शिकवूं लागला. अहिल्याबाईचा वेळ तात्या पंतोजीचे सान्निध्यातच जात असे. आईबापांनीं रानात जाताना तात्या पंतोजीला म्हणावें कीं, ''तात्या! मुलीची भाकर येथें ठेविली आहे. तिला भूक लागली, म्हणजे तिला ती द्या.'' असा क्रम पुष्कळ दिवस चालला. तात्याने पोथी वाचली, कीं अहिल्याबाईंनीं पुसावे, ''या पोथींत काय सांगितले आहे?'' व तात्याने ही तिला त्या पोथीतील मतलब गोष्टीरूपानें सांगावा. याप्रमाणें :

***१४. ओवी***

पंतोजीचें प्रेम भारी। जडलें तया अहिल्येवरी।
कोणा नावडे रायपुरी। साखर? सांगा विबुध हो!।।

तात्याचें प्रेम अहिल्येवर आपल्या पोटच्या मुलीप्रमाणें बसले!

**१५. पद** *(चाल : मित्रा मम जन्म०)*

घेउनियां तिजशिं अंकिं शिकवि लिहावया।।
रंजनार्थ गोष्टि सांगे बघुनि तद्वया।।ध्रु०।।
प्रल्हादें बाळपणीं जोडिला हरी।।
तू ही कां करशिल गे! सांग त्यापरी?
हरिभजनावीण सुखद वस्तु ना खरी।।
सत्य वदें, ठेवि दया, त्यजिं न कधिं नया!।।घेउ०।।

याप्रमाणें तात्या पंतोजींनी भारत, भागवत, रामायण, भक्तिविजय व दुसरें कांहीं ग्रंथ अहिल्याबाईस गोष्टीरूपाने सांगावें :

### *१६. लावणी*

राणि ती हरिश्चंद्राची, कशि सत्त्वाला जागली।।
दमयंति नळाची कांता, महापतिव्रता माउली।।धृ०।।
।।चाल।। द्रौपदी बहिण देवाची। बहुत आवडीची। तिच्या अब्रूची।
बूज राखिली, अगणीत वस्त्रें पुरविली!
।।मूळ चाल।। जनि दासि नामदेवाची, तिचि कथा सांगतों तुला!
जिनें भक्तिबळाने, बाई। विठु जात्यावर बसविला!।।१।।
।।चाल।। तुहि तसें अहिल्ये! करी। उरविं भूवरी। कीर्ति निज खरी।
नको पडु ख्यालीं, नाहिं अर्थ भवामधिं मुळीं!।।२।।

वरील पदांत वर्णन केल्याप्रमाणें, परमार्थाला न सोडतां तात्या पंतोजीनें अहिल्याबाईला उत्तम प्रकारचे व्यावहारिक शिक्षण दिले व अहिल्याबाई त्याच अधिकाराच्या असल्यामुळें :

### *१७. आर्या*

हृत्पटिं खोदुन ठेवी गुरुबोधामृत सुबोधशीं वचनें।।
मानस जल प्यायाला असल्या हंसास सहज तें माने!।।

असो. पाथर्डी हा गांव पेशवे सरकारच्या छावणीचा असल्यामुळें, उत्तर हिंदुस्थानांतून, श्रीमंत राघोबादादा पेशवे व सुभेदार मल्हारराव होळकर असे उभयतां पुण्याला परत जात असताना, पाथर्डीस मुक्कामास आले. त्यावेळीं ठिकठिकाणी आतासारखी ''ट्रॅव्हेलर्स बंगल्यां''ची सोय नव्हती! मारुतीचे देऊळ हाच त्या वेळचा ''ट्रॅव्हेलर्स बंगला!'' श्री मारुतीचे देवळांत राघोबादादा पेशव्यांचे आसन लागले. तात्या पंतोजी हा राजदर्शनाकरितां गेला; व त्याने मोठ्या अदबीने श्रीमंतास नमस्कार केला. ते अहिल्याबाई दुरून पाहात होती. ती मनांत म्हणाली, ''तात्या पंतोजी हा कोणाच्या पाया पडत नाही. फक्त मारुतीच्या पाया पडतो. तेव्हां आलेला बोवा कोणीतरी मारुतीच्या वरचा मनुष्य आहे! तेव्हां, आपणही त्याचं दर्शन घेतलंच पाहिजे.'' असे म्हणून ती थेट देवळात आली. पहारेकरी होते. पण त्यांना असें वाटलें, कीं 'ही तात्या पंतोजींची मुलगी दिसते आहे' म्हणून, त्यांनीही तिला जाण्याची हरकत केली नाही. अहिल्याबाई थेट देवळात आली. व तात्या पंतोजीला म्हणाली, ''तात्या! तुम्ही ज्यांना आतां नमस्कार केलात, तो बोवा कोण आहे?'' तात्या पंतोजी घाबरला व म्हणाला ''बाळ!''

### *१८. पद (झंपा)*

मुली! श्रेष्ठ सम्राट नृप छत्रपति शाहु ते।।
सकल हिंदूप्रती अन्नदाते! मुली०।।धृ०।।
पूर्वकालीं जसा धर्मराजा, तसा।।
नृपति हा! सांगतों सत्य तूतें।। मुली०।।१।।
तदिय हेची प्रधान, पेशवे गुणनिधान!।।
आदरें यां करीं वंदनातें।।....।। मुली०।।२।।

वरील पदांत वर्णन केल्याप्रमाणें, तात्या पंतोजीनें अहिल्याबाईस सांगितले. ते ऐकून, अहिल्याबाई म्हणाली, ''हे आपल्या सातारा सरकारचे प्रधान आहेत! तेव्हां त्यांना प्रधानाची कामें पुसूं कां?'' हे बोलणें राघोबादादानीं ऐकिले व ''तात्या! मुलगी काय विचारते ते तिला विचारूं द्या!'' असें म्हणाले. अहिल्याबाई म्हणाली :

***१९. ओव्या** (जात्यावरील)*

''हिंदुपद बाच्छाहाचे। तुम्हि प्रधान असला जरी।।
सांगा भूपतिच्या नांवाला। तुम्हि गाजविले कुठवरी?।।
अहो ! प्रधान, सेनापती। राजयाचे दोन्ही कर।।
म्हणुन पुसतें, माफी करा। मी धनगराची पोर!''।।१।।

***२०. आर्या***

ऐकुनि बोल तियेचे राघोबा खदखदा मनीं हासे।।
''ऐसें ज्ञान मुलीला आलें इतुक्या वयामधें कैसें?''

हे ऐकून, राघोबादादाला फारच कौतुक वाटले! तिला त्यांनीं आपल्या जवळ बसवून घेतले व म्हणाले, ''तुला प्रधानाची व सेनापतीच्या कामाची काय गं माहिती?'' अहिल्याबाईंनीं उत्तर दिले- ''आम्हांला तात्या रोज पुराणांतील गोष्टी सांगत असतात, म्हणून मला माहीत!'' दादासाहेब पुनः म्हणाले- ''एखादें उदाहरण सांग पाहू?'' अहिल्याबाई ताबडतोब म्हणाल्या :

***२१. ओवी***

वत्स राजाचा प्रधान। होता यौगंधरायण।।
त्याणें अपार मुलुख जिंकोन। नांव धन्याचें वाढविलें!।।

''तसे तुम्ही आमच्या सातारा सरकारचे नांव वाढविले कीं नाही?'' दादासाहेबांना मुलीची धिटाई व पुसण्याची ढब पाहून फारच आश्चर्य वाटले!

***२२. दिंडी***

तयिं दादा वदले किं सुभेदारा!।
''तुझ्या खंडूला योग्य हीच दारा!।।
तोहि खंदा, तशि हीहि कमी नाहीं!।।
अशा रत्ना पदरांत झणीं घेई!।।''

दादासाहेबांना जी ही बुद्धी झाली, ती श्रीखंडोबाच्या प्रेरणेनेच झाली असें म्हणण्यास बिलकूल हरकत नाही ! असो.

मल्हाररावाला अहिल्याबाईच्या हुषारीचे व धिटाईचे कौतुक वाटले. पण सून करून घेण्यास मन होईना. कारण अहिल्याबाई सुस्वरूप नव्हत्या व कुरूपही नव्हत्या. चार बायकांसारख्या होत्या. मल्हारराव कांहीं बोलत नाही, असें पाहून दादासाहेब म्हणाले- ''मल्हारराव, मुलीच्या सौंदर्याला काय पाहतोस? तिच्या अंतःकरणाला बघ! आणि त्याचा विचार कर. अरे! शूर वीर पुरुषांना अशाच अंतःकरणाच्या मुली पसंत करणे भाग आहे. ही जर ब्राह्मणाची मुलगी असती, तर मी तुला मुळींच गोष्ट काढली नसती ! आमच्या घराण्यांत नानाला सांगून, एखाद्या मुलाला करून घेतली असती ! म्हणून म्हणतो,

तू माझं म्हणणं मोडू नकोस. तुझ्या रणबहाद्दुर खंडेरावाला हीच मुलगी करून घे. व तू ही घ्यावीस अशी माझी बलवत्तर इच्छा आहे. शिवाय ही तुझ्या जातीची आहे.'' मल्हारराव म्हणाला : ''दादासाहेब! आपल्या म्हणण्याप्रमाणें, मुलगी हुषार आहे खरी. पण, पण..'' दादासाहेब म्हणाले : ''अरे, पण - पण काय? मुलगी गरीबाची आहे, इतकेच ना? मुलीची बाजू आम्ही सांभाळू. त्याची तू काळजी करू नकोस. कारण पाथर्डी हा गांव पेशवे सरकारचा आहे व तेथील लोक आमची रयत आहे. तेव्हां, रयतेचे सर्व बाजूंनी कल्याण करणे हे राजाचेच काम आहे. म्हणून तू माझं म्हणणं मोडू नयेस, असं मला वाटतं. मोडलंस तर, परिणाम बरा निघणार नाही!'' काम चिरडीला जात आहे, असे पाहून मल्हारराव म्हणाला : ''ठीक आहे. ज्याअर्थी श्रीमंतांची आज्ञाच होत आहे, त्याअर्थी ती मानणें भाग आहे. पण माझं मुलगं एकुलतं एक आहे. तेव्हां त्याचा कोणचेही प्रकारचा रुसवा शिल्लक राहूं नये, इतकीच विनंति आहे.'' दादासाहेब म्हणाले- ''ठीक आहे. तुझ्या मुलाचा रुसवा आम्ही उत्तम प्रकारे सांभाळू. चल, साखरपुडा आताच करून कुंकू लाव!''

### २३. *ओवी*

तें मानलें सुभेदारा। साखरपुडा झाला खरा।।
लग्ननिश्चय करून त्वरा। पुण्यामाजीं ठरविला!।।१।।

अहिल्याबाईंना जरीची पैठणी, खण, चंद्रहार वगैरे अलंकार घातले. तात्या पंतोजींनीं मुलीला तिच्या आईच्या मांडीवर नेऊन बसविले! तें पाहून अहिल्याबाईच्या आईला अतिशय आनंद झाला व ती म्हणाली :

### २४. *ओवी (जात्यावरची)*

''माझि अहिल्या भाग्याची। सुन पटली सुभेदाराला।।
ज्यानें आमच्या धनगराची। जात चढविली नांवाला!''।।१।।

राघोबादादा व मल्हारराव पुण्याला निघून गेले. राघोबादादांनीं नानासाहेबांस सर्व हकीगत सांगितली. त्यांनी ते मोठ्या आनंदाने कबूल केले. इकडे, मल्हाररावाने सर्व राजे-रजवाड्यांस लग्नाला येण्याविषयीं आग्रहाच्या पत्रिका पाठविल्या; व त्यांनाही मल्हाररावाच्या वजनामुळें लग्नाचे निमंत्रण मान्य करणें भाग पडले! मल्हाररावांनीं श्रीमन्महाराज शाहू छत्रपति यांनाही पुण्यापर्यंत लग्नाला येण्याची नम्र विनंति केली; व ती त्यांनीही मान्य केली! अहिल्याबाईचे आईबाप व कांहीं थोडीशीं मंडळी अहिल्याबाईला घेऊन पुण्यास आली. रीतीप्रमाणें लग्नसमारंभ झाला. अखेर वधूवरांची वरात शहरांत मिरवून शाहूमहाराजांच्या पायावर वधूवरे नेऊन घालावी असें ठरले. त्या वेळेला वरातीचा थाट कसा काय झाला व कोणकोणते लोक होते हे खालील कटावात नमूद केले आहे.

### २५. *कटाव*

पुण्य पट्टणी त्या लग्नाची, झालि तयारी, सत्वर साची, गणति न
करवे मंडपाची, बावन पागा श्रीमंतांच्या, आणिक निराळ्या
हुजरातीच्या, अन्य अन्य त्या सरदारांच्या, हजार हत्ती झुलू लागला!
छत्रपतीच्या वैभव-निधिला, वाटे तेव्हां पूरचि आला! भगवा झेंडा
हत्तीवरती, जरिपटक्याला मुळी न गणती, बाण, कैच्या, उंटावरती,
दण दण दण दण नौबती झडती; आघाडीस शिंद्याचें लष्कर,

धायबर, भोयटे नी पाटणकर; महाडिक, शिर्के, यादव, जाधव,
पवार, माने आणि निंबाळकर, घोरपडे, दाभाडे, आंग्रे धुळप,
चगुल, चव्हाण, शितोळे, मोहिते, सावंत, गायकवाडी, नवरमुलाची
धरली अघाडी, होळकरांच्या सरदारांनीं, मध्यभागिं वरपक्ष म्हणूनी,
भंडारासम निशाण पिवळें, हलकाऱ्याच्या कमरेस शेले, मल्हारराव
वर-बाप सुभेदार, यशस्वी ज्याची ती तलवार, नागपूरचे नृप
जानोजी, श्रीमंतांची बहुत मर्जी, बांडे, फांकडे, वीर गाजी,
पिछाडीस ते पंतप्रधान, नानासाहेब हर्षनिधान, गुणज्ञ पेशवे तसे
गुणवान, रास्ते, फडके नी ढमढेरे, थत्ते, परसनीस, परचुरे, राव
आप्पा बळवंत मेहेंदळे, विंचुरकर, अभ्यंकर, भावे, पटवर्धनांस
किती वानावें ? सुमंत, पानसे, सचीव खासे, पंत प्रतिनिधी राहणी
साधी, बुंदेले, बोकील, गोखले, चंद्रचूड, मोजुमदार, काळे, भिडे,
प्रभूणे, खासगीवाले, आणिक होते बहुत मिळाले, कुंभेर, बुंदी, कोचिन,
कोटा, झालवाड, जयपूर, उदेपूर, गोध्रा, झिंद, इदर, भावलपूर,
नाभा म्हैसुर, झांशी, बिकानेर, वधूवरांच्या भोवताली
बायांची ती गर्दी झाली, सवाष्ण कोणी घरिं न राहिली, कुणी
अंबारित, कुणी पालखित, कुणी पायदळिं, कुणी त्या गाडीत;
वाजंत्र्यांचा बहुत कडाका, नायकिणीचे ताफे देखा, वरातिचा हा
थाट ऐका, धन्य ! धन्य ! ती माय अहिल्या !, चवऱ्या तिजवर उडूं
लागल्या ! दासगणूनें नाहिं पाहिल्या, इतिहासांतुन गोष्टी ऐकिल्या,
त्याच कवनामधें गुंफिल्या, या समयीं त्या तुम्हास कथिल्या ।।
याप्रमाणें, वरात मिरवत मिरवत श्रीमन्महाराज शाहू छत्रपतींच्या
गोटांत जाऊन दाखल झाली; तेव्हां :

२६. ***आर्या***

छत्रपतींच्या चरणी नत होतांची वधूवरें पुढतीं ।।
प्रेमें त्या घे अंकीं साखर घालावया मुखी नृपती! ।।१।।

शाहू महाराजांनीं मोठ्या प्रेमानें खंडेराव व अहिल्याबाई यांना त्यांच्या मुखांत साखर घालण्याकरितां, आपल्या मांडीवर बसवून घेतले !

२७. ***लावणी (चाल – जेथे होईल)***

सुभेदार त्या पाहुनि कृतिला मुदित जाहला मनीं ।।
ढाळी आनंदाश्रु लोचनीं! ।।
मी चाकर पायाचा, माझी मुलें अंकिं घेतली! ।।
भूप ना, ही आमुचि माउली! ।।धृ०।।

।।चाल।। कथियला जसा तो धर्मराज भारतीं ।।

त्यापरी कलिंत हा पुण्यश्लोक भूपती !।।
हा पूर्ण चंद्र, आम्हिं नक्षत्रें भोंवतीं।।

।।मूळ चाल।। अलंकार आम्हिं अहो ! अवांतर, नृप अमुचा बिजवरा !।।
लाधला खरा चौकोनी चिरा !।।१।।

शाहू महाराजांनीं वधूवरांच्या तोंडांत साखर घालून, असा आशीर्वाद दिला :

*२८. साकी*

''अष्टपुत्र सौभाग्यवती हरि करो ! अहिल्ये ! तुजसीं।।
शतायु होवो ! तुझा पती ही, सुखवा सुभेदारासीं।।
माझ्या होळकरा...! त्याचे वर्तन ध्यानिं धरा !।।१।।

ते आशीर्वचन ऐकून मल्हारराव उठून उभा राहिला व हात जोडून मोठ्या नम्रतेनें म्हणाला,

*२९. पद (चाल : नृपममता रामावरती)*

''हा आशीर्वाद द्यायासी। आहेत पुरोहित महिसीं।। भूपते!।।

।।चाल।। आम्हि तोच तुम्हांपासून, हात जोडून, घ्याया लागून,
इच्छितों कधिं ना। इच्छितों कधिं ना। हे भूप-श्रेष्ठ !
नरभूषणा ! ।।भूपते!।।

सरकार, आयुष्य गुरूंनी चिंतावयाचे असते व सरकारांनी अभ्युदय चिंतावयाचा आहे ! तेव्हां माझ्या खंड्याला श्रीमंतांनीं असा आशीर्वाद द्यावा, कीं :

*३०. पद (झंपा)*

मरा रे! मरा! गादिसाठीं मरा! रे!
जगीं वीर हो ! कीर्तिरुपें उरा रे!।।धृ०।।
धर्म सोडू नका, राम जोडा सखा,
एकमेकांस द्या, सुख विचारें !।। मरा रे०।।
राजनिष्ठेपरी, भूषण नाहीं खरी,
वीर पुरुषा दुजी, गोष्ट वा ! रे !।। मरा रे०।।

मल्हाररावाच्या या भाषणानें शाहू महाराजांस व अवांतर सरदार मंडळीस अतिशय समाधान वाटले! शाहू महाराज म्हणाले : ''ठीक आहे. याचप्रमाणें होवो !'' पुढे अहिल्याबाईस :

*३१. ओवी*

पातळासाठीं महेश्वर। देते झाले राजेश्वर !।।
पेशव्यांनींही सत्वर। चोळीगांव चोळी दिली !।।१।।

अशा प्रकारें लग्नसमारंभ आटपल्यावर, सर्व मंडळीं आपापल्या ठिकाणीं गेली. खंडेराव होळकर हा स्वतः थोडासा विलासी होता. त्यामुळें :

**३२. पद**

पति ख्यालि खुशालिंत असे। तयाचा नसे, विषाद बाईला।
जी साध्वि अहिल्या तिला।।
मालेराव, मुक्ताबाई, संतती पाही। पतीच्या आज्ञेंत।
सासु-श्वसुर मानि दैवत।।२।।
नित पुजी प्रभू बाळकृष्णा, घालि प्रदक्षिणा, माय तुळशीशीं।
गणु म्हणे, वानुं किती तिशीं ?।।३।।

वर पदांत लिहिल्याप्रमाणें, अहिल्याबाईचा क्रम होता. तिच्या नशिबीं हे क्षणिक संसारसुख फार दिवस नव्हते. दैवयोग मोठा बलवत्तर आहे ! तो कोणालाही चुकविता येत नाही !

**३३. आर्या**

कुंभेरीच्या युद्धीं, खंडेरावास मृत्यु तो आला।।
जणु कां कौरव कटकी, अभिमन्यू बालवीर रणिं पडला!।।१।।

यामुळें अहिल्याबाईवर वैधव्याची कुऱ्हाड येऊन पडली ! व पुत्रशोकामुळें मल्हाररावाची कंबरच खचून गेली ! त्याने खंडेरावाचें प्रेत मांडीवर घेतले व तो शोक करूं लागला असतां, राघोबादादा जवळ होते, ते म्हणाले : ''मल्हारराव !''

**३४. श्लोक (भुजंगप्रयात)**

वदे पेशवा शोक हा आवरावा।
रणीं मृत्यु वीरास ऐसाच यावा!।।

तें ऐकून मल्हारराव म्हणाला : दादासाहेब!

**३५. श्लोक (३४ व्या श्लोकाचा उत्तरार्ध)**

खरें हें, परी तो मला कां न आला?।।
यमा! निष्ठुरा! कां वृथा बाळ नेला?''।।

खंडेरावाची खबर जनान्यांत कळताच, अहिल्याबाई,

**३६. दिंडी**

सती जायातें सजलि अहिल्या हो!।।
सासु-श्वसुरां पुसण्यास आलि बा हो।।
तेणें झाला सुभेदार साहेबाला।।
शोक भारी! किति करूं वर्णनाला?।।१।।

अहिल्याबाईला सतीच्या वेषात पाहून, मल्हाररावाला फारच भडभडून आले! तो म्हणाला :

**३७. श्लोक (मंदाक्रांता)**

''वृद्धावस्था मजप्रति अली, आण बाई मनांत!।।
गेला खंडू! तूंहि धरिशि कां, सांग गे! तोच पंथ ?।।

मालू, मुक्ता लहान असती, 'माय' त्यांनीं कुणाला ।।
बोलावें ? गे! त्यजिं न असु, ही भीक घालीं अम्हांला!'' ।।१।।

अहिल्याबाई म्हणाल्या : ''मामंजी ! आपलं म्हणणं ठीक आहे. पण मी धर्मबाह्य वर्तन कसं करू ? मला त्यांच्याबरोबर गेलंच पाहिजे !'' ते ऐकून, मल्हारराव म्हणाला : ''बाई ! आम्हाला आजपर्यंत पोथ्याबिथ्या कांहीं माहिती नव्हत्या ! तूं आमच्या घरात आल्यापासूनच त्यांचा सुकाळ झाला आहे. त्या पोथ्यांचा तूच विचार कर, म्हणजे झालं !

***३८. अभंग***

दशरथाच्या वेळेला। सती गेली कां कौसल्या? ।।
अभिमन्यु पडतां हिरा। सती गेली कां उत्तरा? ।।
गेलियाचा करणें शोक। हें तों अज्ञानमूलक! ।।
बाई! पोथ्या वाचल्याचा। उपयोग आता करी साचा! ।।१।।

हे मल्हाररावांचे म्हणणें अहिल्याबाईंने मान्य केले व सती जाण्याचा बेत रहित केला. पुढें मोठ्या निग्रहानें वैराग्य धारण करून, वैभवाला न भुलतां, अहिल्याबाईने ईशसेवा आरंभिली. बाईचा काल नेहमीं भजन-पूजनांत जाऊ लागला. त्यामुळें, तिची वाक्‌सिद्धि इतकी तयार झाली होती, कीं तिच्या तोंडावाटे जे येईल ते खरेंच होत असे! म्हणून, मल्हाररावही प्रत्येक काम तिला विचारून करीत असे. एक वेळेस पुण्याहून लिहून आले कीं, ''तुम्ही सिरंद बक्सराचे मोहिमेवर एकदम निघून जावे!'' म्हणून मल्हारराव, फौजेची तयारी करून अहिल्याबाईस 'मी सिरंद बक्सारला जातों, तूं मागे योग्य बंदोबस्त ठेव' असे सांगण्यास आला असतां, अहिल्याबाई त्यास म्हणाल्या :

***३९. पद (चाल : नृपममता रामावरती)***

युद्धास एकटे जातां?। मज कां न बरोबर नेतां?। येधवा ।।
वृद्धापकाल, मामाजी !। आलासे अपणां आजी !। येधवा ।।
चाल : सोडून अशा समयाला ।।
आम्हिं न राहूं आपणांला ।।
द्या मान झणीं विनतीला ।।
कां कोंडुन गेहीं ठिवितां? व्यर्थची ! ।।१।।

मल्हारराव म्हणाले : ''अहिल्ये ! तुझे विचार ठीक आहेत, पण युद्धासारख्या भयंकर प्रसंगीं बायका बरोबर असू नयेत. त्यातून, तो परक्यांचा मुलुख आहे ! म्हणून, तू घरींच राहून बंदोबस्त ठेव.'' त्यावर अहिल्याबाई म्हणाल्या : ''मामंजी ! आपलं म्हणणं मी ऐकलं. पण मी हिंदू-स्त्री आहे. आम्हां हिंदू स्त्रियांना स्वयंपाकही करता येतो व तलवारही धरता येते !

***४०. पद***

म्यां मदालसेची मागें मामंजि ! गोष्ट ऐकिली ।।
दशमुखी रावणाची, त्या सीतेनें वाट लाविली ! ।।
चाल : भामेनें नरकासुरा। घेऊन असि करां। रणी चरचरा।
गळा कापीला !। मी करिन तसें न्या मला ।।१।।

कांता मी वीर पुरुषाची। रणधुरंधराची स्नुषा।
मज पुत्र तुम्हीं मानीलें। त्या गोष्टि विसरतां कशा?
चाल : येरव्ही राहु पडद्यांत। परी युद्धांत। खड्ग हातांत।
घेऊन झगडाया। येउ तरिच होळकर स्त्रिया!'' ।।२।।

अशा प्रकारें अहिल्याबाईनें सांगितल्यावर, मल्हारराव म्हणाला :

''तुझ्यासारख्या नाजूक स्त्रीला तिकडील हवापाणी सोसणार नाही.'' ते ऐकून अहिल्याबाई म्हणाली : मामंजी! ऊनवारा सोसण्याची सवय तुमचेपेक्षां मलाच अधिक आहे. कारण :

### *४१. ओवी (जात्यावरची)*

माझ्या गरीब मायबापाच्या। सदनीं मी पाथर्डित।।
उन-वाऱ्याला सोशिलें। नाहिं त्याचें भय किंचित।।१।।

मल्हाररावानें अहिल्याबाईचा येण्याचा आग्रह पाहून, तिला बरोबर नेली. या मोहिमेत अहिल्याबाईनें आपल्या सासऱ्यास वेळोवेळीं उचित असा योग्य सल्ला दिला. त्यामुळें :

### *४२. आर्या*

सिरंद बक्साराच्या युद्धिं अहिल्या सती करायाला।।
साह्य सुभेदारासी, गेली अबला, सुवीर-सम प्रबला !।।

किल्ला सर झाला ! व मराठ्यांचे निशाण फडकले ! मोहीम संपून, मल्हारराव माळव्यांत परत आला, व शके १६६८ वैशाख शुद्ध ११ चे दिवशीं त्यास देवाज्ञा झाली !

### *४३. दिंडी*

कालगतिनें सासू व श्वशुर गेले !।
अहिल्येला त्यामुळें दुःख झालें !।।
परि न डगमगली लवहि चालवाया।।
राज्यशकटा, किति थोर तिचा हिय्या !।।१।।

राज्याची सर्व जबाबदारी अहिल्याबाईवर येऊन पडली ! तसेच :

### *४४. ओवी*

मालेराव पापमती। तोही निमाला ! सत्वरगती।।
गंगोबा चंद्रचूडें केली युक्ती। राज्य बुडविण्या होळकरांचें !।।१।।

गंगाधरपंत चंद्रचूड या नांवाचा होळकरांचा दिवाण होता. मालेराव वारल्यावर गंगाधरपंत चंद्रचूडास वाटले : ''राज्यास कोणी वारस राहिला नाही, हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें अहिल्याबाई ही विधवा आहे व तिची धर्मावर अतिशय श्रद्धा आहे. तेव्हां ती एखादा महाल आपल्या खर्चाला लावून घेऊन, बाकीची व्यवस्था मजवर सोपवील !'' आपला हा मनोदय त्यानें एक वेळ महेश्वरला जाऊन, श्रीअहिल्याबाईस समक्ष कळविला ! चंद्रचूड (अहिल्याबाईस) :

**४५. *दिंडी***

> ''मालु गेला ! वंशास कुणी नाहीं !''
> ''दैविं जैसें तैसेंच घडुन येई !'' ।।
> पुत्र कमि कां पांडवा तया जोगे ? ।।
> एक उरला परि परिक्षिती मागें ! ।।१।।

*अहिल्याबाई :* दिवाणसाहेब ! तसेच हे झाले आहे !

*चन्द्रचूड :* तुम्ही इतका देवधर्म करितां आणि त्याला असे वेडेवाकडे फळ कां यावे ?

*अहिल्याबाई :* त्याचे उत्तर मी तुम्हास दिले आहे ! दैव हे पूर्वार्जित पापपुण्याच्या योगाने बनत असते. शिवाय, या मृत्युलोकची सुखे आणि दुःखे दोन्ही खोटीच आहेत. तो दैवयोग समजून, आल्या प्रसंगाला तोंड देणें हे आपणा मानवांचे कर्तव्य आहे. माझा जो देवधर्म आहे, तो मी माझ्या आत्म्याच्या उन्नतीसाठी करीत आहे. असो. दैवाच्या व्यवहाराप्रमाणें, पांडवांच्या वंशात जसा एक परिक्षिती राहिला, तसा आमच्यांतही एक तुकोजी होळकरच आहे.

**४६. *ओवी***

> जा, तुकोजीबाबासी। वेगे आणा माझेपाशीं ।।
> त्या बसवून गादीशीं। बंदोबस्त ठेवणें ।।१।।

हा तुकोजी होळकर मल्हाररावाच्या भाऊबंधांच्या कुळांतला असून, तो मल्हाररावाच्या कसोटीस उतरून उमदा शिपाई म्हणून ठरला गेला होता. त्यांचे नांव ऐकताच चंद्रचूडाच्या मनांत असे आले कीं, आपण केलेली मसलत फसली ! तो आश्चर्ययुक्त मुद्रेनें म्हणाला : बाईसाहेब ! तुकोजी हा नुसता नांवानेच होळकर आहे !! त्यावर अहिल्याबाई म्हणाल्या : ''माझ्या सासऱ्याचे नांव त्याच्याप्रमाणें मागे चालवावे अशी तुमची इच्छा असेल, तर त्याला तुकोजीच योग्य आहे. तो तुम्हाला कां पसंत नाही, हे मला तरी समजत नाही ! तुमच्यासारख्या इमानी नोकरानें आपल्या धन्याचे नांव चालविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसेच तुम्ही करा.'' असे त्यास निक्षून सांगितले.

**४७. *आर्या***

> परि हा विचार सतिचा गंगोबातें मुळी न कीं पटला ।।
> विदुराच्या बोधाने शकुनि जसा हस्तिनापुरी विटला ! ।।१।।

चंद्रचूड कांहीं न बोलतां निघून गेले व त्यांनीं आपल्या घरीं जाऊन, पुण्यास राघोबादादास पुष्कळ आमिष दाखवून एक पत्र लिहिले ! ते असे :

***४८. पद (चाल–सवाई माधवराव तुकोजी)***

> भट वंशामधें जन्म घेउनी, स्वस्थ राघोबा कसे बसला ? ।।
> प्रधानकीचीं वस्त्रें माधवा, तुम्हीं पठाण कां पंक्तीला ? ।।
> पोर कालचें माधव, त्यासी, नमन करितसा दरबारीं ! ।।
> पोटावारी सदा राबता, आहे कुठें कां सरदारी ? ।।

चाल बदलून : यासाठीं सांगतों, युक्ति एक गोजिरी ! ।।
तलवार धरुनि या शीघ्र माळव्यावरी ।।
बेवारस गादी झालि असे होळकरी ।।
चाल पहिली : एक अहिल्या आहे तियेची, भीति नको मुळिं अपणांला ।।
जिंकिल पंचानना कुठोनी, किती माजला जरि कोल्हा ! ।।१।।

हें चंद्रचूडाचें पत्र पाहून,

### ४९. ओवी

दादासी तें मानवलें। सैन्य आपलें जमा केलें ।।
फौजेसहित निघाले। इंदूर शहर जिंकावया ! ।।१।।

दादासाहेबांनीं सखारामबापू बोकीलांच्या मसलतीने, काशीयात्रेस जाण्याचे मिष करून, माधवरावांची परवानगी मिळविली व आपल्या हस्तकांना जमा करीत चालले ! ही खबर उदाबाई नावाची एक अहिल्याबाईची नणंद होती, तिला समजली. म्हणून ती लगेच मेण्यात बसून महेश्वरला गेली. त्या वेळीं अहिल्याबाई पार्थिवाची पूजा करीत होत्या. उदाबाई एकाएकी आलेली पाहून, अहिल्याबाई म्हणाल्या : वन्सं ! आज एकदम कोणीकडे आलांत ?'' उदाबाई म्हणाल्याः

### ५०. ओवी (जात्यावरची)

''काय वहिनी ! बसलिस उगी ?। नांव बुडतें सुभेदाराचें ! ।।
डाव गंग्यानें साधिला !। कसें पाळलेंस पिलु सर्पाचें ? ।।
आले दादा फौजेसहीत। गादि इंदुरची घ्यावया ।।
तुला नेतिल पूण्याप्रती। बाई हरभरे भरडाया ! ।।
तुझ्या मागें आम्हां नको। नांव घ्यायाला मेण्याचें ! ।।
काय, पुण्य सरले ? देवा ! सुभेदार मल्हारजिचें ! ।।१।।

असे बोलून तिनें डोळ्याला पाणी आणिले, आणि म्हणाली : ''तुम्ही अशाच पूजा करीत व ब्राह्मणाला तूपसाखर घालीत राहा.''

### ५१. पद (चाल : भूपती खरे)

ब्राह्मणांवरी ठेविली, वहिनी ! तू निष्ठा ।।
परि तेच आले बघ, द्यावयास तुज कष्टा ! ।।
चाल बदलून : गाधिजें हरिश्चंद्रासी, छळियलें ।।
वामनें बळिस पाताळीं, दडपिलें ।।
भृगुनेंच पहा विष्णूला, ताडिलें ।।
चाल पहिली : अशी निमकहरामी, जात मुळिंच विप्रांची ! ।।
ना सुखद होय, संगती काचकुयरीची !'' ।।१।।

हे ऐकून अहिल्याबाई सर्द झाल्या, व म्हणाल्या : ''माझ्या सासऱ्याचा निर्वंश कां झाला, त्याचे कारण मला आज समजले ! ब्रह्मद्वेष हा कुलक्षयाला कारणीभूत होत असतो. वन्सं ! तुम्ही जे ब्राह्मणवर्गाचे वर्णन केले, ते एकदेशीय (एकांगी) व द्वेषमूलक आहे. सारासार विचार करून केलेले नाही.

*५२. पद (चाल : सवाई माधवराव तुकोजी)*

नका निंदु ब्राह्मणांस, वत्सं ! पाप तुम्हाला हें घडतें ।।
लाथ भृगुची भूषण झाली, त्या जगदीश्वर विष्णूतें ! ।।
चहुंवर्णाचे गुरू विप्र हे, त्यास आदरें वंदावें ! ।।
ब्रह्मद्वेषी जो कां नर हो, तो न कुठेंही सुख पावे ! ।।
। चाल । सुखि हरिश्चंद्र भूपती, वसिष्ठामुळें ।
श्रीकांत, बळीचे द्वारपाल जाहले ! ।
असे पुराणिंचे किति देउं तुम्हा दाखले ! ।
। मूळ चाल । बाजिराव बल्लाळ धन्याच्या कृपेनेंच कीं होळकरा ।।
सरदारी ही असे मिळाली, वैभव, हें तुम्हिं ध्यानिं धरा ! ।।१।।

जा, ब्राह्मणवर्गाविषयीं द्वेष मनांत धरू नका. एका चंद्रचूडामुळें सगळे ब्राह्मण कांहीं दुष्ट होत नसतात. किंवा एका वसिष्ठामुळें पुनीतही होत नसतात. माझ्या देहांत देह आहे, तोपर्यंत तुम्हाला मी मेण्यातच आणीन ! ऐहिक सुखाची इच्छा धरली, कीं अशीच वेडीवाकडी वासना उत्पन्न होत असते ! तुम्ही मला खबर सांगितली हे ठीक केले. मात्र, जी द्वेषमूलक भाषा केलीत, ती मला अगदी आवडली नाहीं ! जा. गंगाधर चंद्रचूडाचा बंदोबस्त मी चांगला करते.'' उदाबाई निघून गेल्या. मग अहिल्याबाईंनीं माळव्यांतील मराठे सरदार मंडळीस पुढीलप्रमाणें पत्रें पाठविली :

*५३. पद (चाल : नृपममता रामावरती)*

''धनि तुम्हा अम्हांला असती । पेशवे, छत्रपति नृपती ।। मनिं आणा ।।धृ.।।
रघुनाथराव दादांचा, धरु नये पक्ष कुणि साचा ! येधवा ।।
। चाल । दरबारिं फितुरी करी । कपट अंतरीं । विषाची सुरी ।
जयाच्या हातीं । ना प्रज्ञ तयाला चाहती ! ।। मनिं आणा ।।१।।

माझ्या मदतीला या, असे मी आपणाला म्हणत नाही. मात्र, रघुनाथराव दादाला तुम्ही कोणच्याही प्रकारें माझ्याविरुद्ध मदत करू नये. हा रघुनाथराव दरबारी फितुर करणारा व साम्राज्याची घडी मोडणारा आपमतलबी मनुष्य आहे ! आपणाला छत्रपतींची व पेशवे सरकारची बाजू धरणे भाग आहे.'' अशा अर्थाची पत्रें रवाना केली. त्यावरून, रघुनाथराव दादांची यासंबंधीं पत्रें आली असतां, त्यांस कित्येकांची उत्तरें गेलीं ती अशी :

*५४. ओवी*

''आमच्याच बंधूवर । तुम्हीं धरिली तलवार ।।
तेणें आमुची तिळभर । मदत न मिळे तुम्हातें ! ।।१।।

शिवाय आपल्यासारख्या थोरांना, अहिल्याबाईवर शस्त्र धरणें शोभत नाही! कां म्हणाल, तर –

*५५. श्लोक*

माता अहिल्या खनि सद्गुणांची ।।
दैना न, दादा! करणें तियेची! ।।

मोठेपणासी अपुल्या न टाका ।।
शीला न घ्या लावुन हो कलंका ! ।।१।।

अहिल्याबाईंचा पाठिराखा देव आहे. तिशीं झगडण्यात कोणालाही यश येणार नाही, हे ध्यानांत ठेवा !'' इकडे, अहिल्याबाईंनीं माधवरावसाहेबांच्या नांवचे पत्र लिहून, ते रमाबाईसाहेबांच्या मार्फत त्यांना पोचेल अशी व्यवस्था केली, व तुकोजीला पुण्यास पाठवून दिले. कारण रमाबाईसाहेबांचा व अहिल्याबाईंचा फार स्नेह होता. रमाबाई (माधवराव पेशव्यांचे कुटुंब) फार पवित्र बाई होती. पत्रांत असा मजकुर होता कीं,

### ५६. *पद (चाल–नृपममता रामावरती)*

''धनि थोर शिरावर असतां, आम्हि कां करावी चिंता ? ।। व्यर्थचि ।।
। चाल ।मर्जिचा पाहुनी रोख, हकीकत चोख, कथां निःशंक,
दुबळि मी झालें! । दुबळि मी झालें। विश्वासीं तुमच्या बसलें ।। येधवा ।''

हे पत्र रमाबाईसाहेबांच्या मार्फत माधवरावसाहेबांस पोचले. रमाबाईंनीं सांगितले कीं, ''दादासाहेबांची काशीयात्रा खरी नसून, अहिल्याबाईला धुळीस मिळविण्याचे ते कारस्थान आहे. त्याचा विचार आपण पोक्तपणाने करावा. तुकोजी होळकर हल्लीं पुण्यास आला आहे; व त्यांनीं ते पत्र दिले आहे.'' इतके ऐकिल्याबरोबर, माधवरावसाहेबानीं, दुसरें दिवशीं दरबार भरविला व तुकोजीस बोलावून आणून, तुकोजीस सुभेदारीची वस्त्रें दिली व सांगितले की, ''तुम्ही ही वस्त्रें अहिल्याबाईंपुढे नेऊन ठेवा आणि तिने दिल्यावर घ्या.'' तुकोजीने ते कबूल केले व तो इंदुरास निघून गेला.

### ५७. *ओवी*

वस्त्रें देऊनि तुकोजीशीं। दिलें धाडूनी इंदुरासीं ।।
आणि रघुनाथराव दादांसीं। पत्र लिहिलें येणें रींतीं! ।।

इकडे माधवरावसाहेबांनीं दादासाहेबांस एक पत्र लिहिले ते असे :

### ५८. *पद (चाल : मित्रा मम)*

भटवंशी दादा ! तुम्हि, भीष्म शोभतां ! ।।
पळ काढिती यवन, तुम्हा समरिं पाहतां ! ।।धृ.।।
उज्ज्वल त्या कीर्तिला अणु नका उणें ! ।।
असुन वयोवृद्ध तुम्हीं, अतुल शाहणे ।।
पोराचें कौतुक तुम्हिं, बसुन पाहणें ! ।।
।।मू०चा०।। आहे अवघी आपणांसि मानमान्यता ! ।।१।।

मी पेशवा जो आहे, तो रयतेला आहे; आपल्याला नाही!

५९. *आर्या*

मी पेशवा, प्रजेतें, तुमच्या पुढती परी असे पोर !।।
'हरि हरि' घरीं करा, या ! लाउन मागें वृथा न घ्या घोर !।।

हे माझे म्हणणें आपणास पटले नाही तर, मी पेशवा या नात्याने आपणास कळवितो कीं :

६०. *पद (चाल : नृप ममता रामावरती)*

होळकर सुभेदाराची। वारस अहिल्या साची।।एकटी।।
।।चाल।। म्हणुनिया तिला अडथळा, कुणी जरि केला, तरी त्याजला,
आम्हिं शह देऊं, आम्हि शह देऊं।।
धनमान हिरावुन घेऊं!।। मनिं आणा!।।१।।

अहिल्याबाईला कोणी अडथळा केल्यास त्याला सरकारांतून शह दिला जाईल. दादासाहेब ! आपल्या बंदोबस्ताकरितां खास फौज रवाना झाली आहे, याचा विचार करा !''

तुकोजी वस्त्रें घेऊन इंदुरास आला. अहिल्याबाईला त्याच्या तोंडून पुण्याकडील सविस्तर वर्तमान ऐकून समाधान वाटले. पण रयतेचे मन दादासाहेबांविषयीं कलुषित न होऊं देण्याचा तिनें प्रयत्न केला. तिनें आपल्या मुख्य सेनापतीस बोलावून सांगितले कीं :

६१. *ओवी*

सैनिकांसी बाहून। अहिल्याबाई करी भाषण।
तुम्हीं तयारी ठेवून। दबा धरून असावें।।१।।

कारण, दादासाहेब हे खरोखर माझ्याशी लढण्याला आले नसतील. मी त्यांना लग्नाच्या आधी प्रधानाची कामें विचारली होती. म्हणून ते आतां मला सरदारांची कामें पुसण्यास आले असतील, असे दिसते ! त्यांना वाटले असेल कीं, अहिल्या आता विधवा झाली आहे, ती आमची सरदारी काय करणार ? म्हणून फक्त तुम्ही दबा धरून असा. मी बायका घेऊन पुढें जातें ! म्हणजे सगळेच काय ते खरे कळेल ! त्यांनीं आमचा निकाल करून पुढे चाल केलीच, तर तुम्हाला काय करावयाचे असेत ते करा ! मल्हाररावांचे नांव जाता कामा नये. असे सांगून अहिल्याबाईसाहेबांनीं दोन हजार बायका घोड्यांवर बसवून व धुणे वाळत घालण्याच्या काठीला चोळीचें निशाण लावून, आपण हत्तीवर बसून दादासाहेबांशीं सामना करण्याच्या इराद्यानें पुढें आल्या ! व एक पत्र दादासाहेबांना पाठविले :

६२. *पद (चाल – लावणीची)*

भाउजी ! वीर पुरुषाला। नाहिं निमकहरामी बरी!।।
लाविलेले झाड तोडाया। तलवार धरिलि कां करीं ?।।
।। चाल।। चाकर आम्हीं पायाचे, असुन तुमचे, तळपट आमुचें
कराया हो आला, कुलकलंक खरे उमगला।।१।।
ज्याचें नांव ऐकतां वीर, कांपत होते थरथरा !
ऐशा त्या सुभेदाराची मी सून, मनीं हें धरा !

।। चाल।।        बेदम खाल हो मार, आथवा ठार, व्हाल साचार
                  इथुनि पळ काढा, ना अपेश डोहीं बुडा! ।।२।।

पेशव्यांचे सरदार, रणांगणांत जो शत्रू होऊन सामन्याला उभा राहिला, त्याला पाठ दाखवित नसतात ! मी जरी विधवा स्त्री आहे, तरी रणबहादुराची सून आहे, हे ध्यानांत ठेवा. व आपणच जिला सरदार केले आहे, ती मी आपल्यापुढें दोन हात करण्यास तयार आहे ! आपल्याला पाठ दाखवून जाणारी नाही. आपल्याला पाठ दाखविली तर, आपण केलेली निवड चुकीची ठरेल ! आतां आम्ही अबलाच आहोंत, म्हणून :

६३. *आर्या*

यदा कदाचित आम्हां, जरि राघोबा रणीं तुम्हीं जितलें ।।
तरि ना कौतुक ! उलटें झाल्या, लागे मुखाप्रतीं काळे ! ।।१।।

आमचा आपण निकाल केलात, तर कांहीं विशेष गोष्ट नाही. पण आम्ही बायकांनी जर कां आपल्यावर मात केली, तर इतिहासांत ''एवढा मोठा मराठ्यांचा सेनापती 'राघो भरारी!' त्याला धनगरणीने ठोकला !'' असें लिहिले जाईल. इतिहास कांहीं तुम्हाला क्षमा करणार नाही! शिवाय, जिचा साखरपुडा आपण करविलात, तिच्याविषयीं असा वाईट हेतू धरणें आपल्यासारख्या थोरांना शोभत नाही.

राघोबादादाकडे सरदारांची पत्रें ''आम्ही तुम्हाला अहिल्याबाईच्या विरुद्ध कोणत्याही रीतीनें मदत करणार नाही,'' अशा अर्थाची येऊन पोचलीच होती. पुण्याहूनही माधवरावसाहेबांचे खरमरीत पत्र आले ! अहिल्याबाई दोन हजार स्त्रिया घेऊन लढण्यासाठी उभी राहिली ! हे सर्व दृश्य अवलोकन करून राघोबादादा थोडे घाबरले व सखाराम बापू बोकिलांस म्हणाले : ''बापू! तुम्ही सल्ला दिला, त्याप्रमाणें आम्हीही निघालों. पण सर्व गाडे उलटे झाले! आतां यांत आपल्याला यश तर येणार नाहीच, पण जगात मात्र माझ्या कीर्तिला कलंक लागण्याचा प्रसंग आला आहे!'' ते ऐकून बापू म्हणाले, ''दादासाहेब, धीर सोडू नका. अहो ! हे राजकारणाचे डाव आहेत. यात एखादा फसला, म्हणून हताश होण्याचे कारण नाही. तुम्ही बिलकुल घाबरू नका. आता आपण या सगळ्यांना मूर्ख ठरवून, शहाणे बनू.'' दादासाहेब म्हणाले, ''ते कसे?'' बापू म्हणाले, ''आतां अहिल्याबाईने जे तुम्हांस पत्र पाठविले आहे, त्यावर तुम्ही असे लिहा,

६४. *आर्या*

''मी नच आलो लढाया, आलों अहिल्ये! तुझ्या समाचारा ।।
कां कीं, सांप्रतकाळीं। उरलों अवघ्यांत मीच म्हातारा! ।।१।।

आतां समाचाराचे कारण काय म्हणून म्हणशील तर ऐक.

६५. *दिंडी*

मालु गेला म्हणुनीच दुखोट्याला।
अलों घेउन जनरीति इंदुराला ।।
लढाईची भिति, मनिंची सोड सारी!।
माय अपुली नच कधीं पिलें मारी! ।।

तुला मी लढाईला आलो आहे असे कोणच्या मूर्खाने सांगितले ? आणि ते तुझ्यासारख्या धूर्त, शहाण्या, राजकारपटु स्त्रीला खरे तरी कसे वाटले? तुझा एकुलता एक मुलगा गेला, म्हणून आपल्यातील रिवाजाप्रमाणें मी दुखवटा घेऊन आलो आहे.'' असे लिहिलेत, म्हणजे त्या सगळ्यावर पाणी पडेल ! पुण्यालाही माधवरावसाहेबांना असेच लिहा कीं ''तुला पेशव्यांच्या गादीवर बसण्याची हौस आहे. पण पेशव्यांनीं कसे वागावे लागते, हे मात्र विसरलास ! तू पोरच आहेस, त्याबद्दल तुला फारसा दोष देता येत नाही. मी उलट तुझी बाजू सांभाळली व अहिल्याबाईला जातां जातां दुखवटा करून, काशीस जाण्याचा विचार केला. तो एकीकडेच राहिला, आणि मधेच अशा कंड्या पिकविल्या तरी कुणी ?'' म्हणजे माधवरावसाहेब सुद्धां जागच्या जागी गप्प बसतील ! दुखवटा सगळ्यात जो वडील माणूस असेल, त्यानेंच नेला पाहिजे. तेव्हां माधवरावाला या आपल्या कारस्थानाचा संशय न येतां, उलट त्याच्या कल्याणाविषयीं तुम्ही दाखविलेल्या कळकळीबद्दल व लोकाचार-संरक्षण केल्याबद्दल त्यांना फार समाधान होईल !'' ही युक्ती दादासाहेबांना पटली, व लगेच त्याप्रमाणें पत्र रवानाही झाली ! दादासाहेबांचे पत्र पाहून, अहिल्याबाईनें पुष्कळ वेळ विचार केला व निष्कर्ष काढला, कीं ''हे सर्व कारस्थान बापू बोकिलांचें आहे ! खरोखर, अशी शहाणी माणसें जर या कपटविद्येचा अवलंब करणार नाहीत, तर आमच्या मराठेशाहीचे वैभव किती तरी वाढेल !''

अहिल्याबाई बापूंच्या लिहिण्याचे कौतुक करीत राहिल्या ! त्यांनीं राघोबादादांस सामोरे येऊन, मोठ्या इतमानानें वाड्यात आगमन करण्याविषयीं विनंती केली. राघोबादादा वाड्यांत आले. अहिल्याबाई म्हणाल्या : ''श्रीमंतांनीं दुखवटा आणला, हा मजवर अनुग्रहच आहे. तोच सरळ आणला असतां, तर हा संशयाचा वेडावाकडा वृक्ष वाढला नसता ! ज्या अर्थी दबकत दबकत व ससैन्य आलात, त्याअर्थी आम्हालाही ही बाजू स्वीकारावी लागली ! आपल्या पदरीं बापूसारखे राजकारण पटु मुत्सद्दी असल्यावर, ते कोणत्या गोष्टीला कसा रंग देतील याचा नियम नाही ! मला वाटते, आपण चंद्रचूडाच्या पत्रावरून, द्रव्याचा अभिलाष धरून जर या ठिकाणी येण्याचा विचार केला असाल, तर मात्र अडचण उत्पन्न होईल. कारण, पेशव्यांनीं केलेले सरदार नामर्द नाहीत ! ते गनिमाला हार न जातां आपले संरक्षणच करतील.'' हे ऐकून दादासाहेब म्हणाले – ''अहिल्ये ! झाले खरे ! ह्या चंद्रचूडाच्या पत्रानें हा सर्व घोटाळा केला. असें पत्र आल्यावर कोणाही मनुष्याला अशी वासना उत्पन्न होईल. हा पत्रव्यवहार पहा, म्हणजे तुला समजेल.'' अहिल्याबाईने सर्व पत्रव्यवहार पाहिला व लगेच प्रतिज्ञा केली की, ''आज गंगाधर चंद्रचूडाला तोफेच्या तोंडीं दिल्याखेरीज मला पार्थिव पूजावयाचा नाही !'' व आपल्या प्रतिज्ञेची अम्मलबजावणी करण्याकरितां लागलीच चंद्रचूडाच्या वाड्याकडे माणसें रवाना केली !

**६६. *आर्या***

झाला समेट; इकडे गंगोबा चंद्रचूड संन्यासी ।।
होउन बसला सदनीं, रक्षण करण्या स्वकीय प्राणांसी! ।।१।।

जासूद आले. त्यांनीं गंगाधर चंद्रचूड संन्यासी झाले आहेत असें पाहून, परत येऊन अहिल्याबाईला कळविले, व विनंती केली कीं, ''आतां त्यांना तोफेच्या तोंडी देण्यासाठी न्यावयाचे कीं काय ? याची आज्ञा व्हावी.'' अहिल्याबाई म्हणाल्या : ''छे ! छे ! आतां त्यांना तोफेच्या तोंडीं द्यावयाचे नाही; तर त्यांची मला आता पूजा करावयाची आहे ! जा, पूजेची तयारी करा.'' त्याप्रमाणें हुजऱ्यानें तयारी केली, व अहिल्याबाई, करवतीकांठीं धोतरजोड्याच्या छाट्या रंगवून घेऊन, चंद्रचूडाच्या

वाड्यांत स्वामीचे पूजेसाठी आली. अहिल्याबाई म्हणाल्या : ''हा ! हा ! स्वामी ? हे काय ! आतां आपण मुळींच उठावयाचे नाही ! तुम्ही नारायणस्वरूप झालात. व होळकराच्या दिवाणांना म्हातारपणीं जे योग्य तेच तुम्ही केलेत. आता मला ताजीम देण्याचे मुळीच कारण नाही, व तोफेचीही भीती बाळगण्याचे कारण नाही !'' ते ऐकून चंद्रचूड गहिवरला ! अहिल्याबाईनें स्वामीची यथासांग पूजा केली व विचारले कीं ''आतां स्वामींची काय इच्छा आहे?'' चंद्रचूड म्हणाला, ''आता इच्छा येवढीच आहे : – मी आतां या ठिकाणीं राहू इच्छित नाही. मला दुसरीकडे जाण्यास परवानगी असावी.'' हे ऐकून अहिल्याबाई (मनात) म्हणाल्या – ''वा रे वा! तुला सोडण्याइतकी मी कांहीं मुर्ख नाही.'' कारण हा स्वामीचा संन्यास भीतीमुळें झाला आहे ! त्याला जर इथून जाऊ दिले, तर हा लगेच संन्यासदीक्षेचा त्याग करून नसत्या भानगडी करीत राहील ! तेव्हां याला येथून जाऊं देतां कामा नये. (उघड), ''छे छे स्वामी ! आपणाला आमच्या राज्याच्या बाहेर कसे जाऊं द्यावे? आमच्या राज्यातील वैराग्यभरित पुरुष आम्हीच संभाळले पाहिजेत ! तुम्हाला येथें राहणे बरे वाटत नसेल तर, अणकाईच्या किल्ल्यावर मी आपली सर्व व्यवस्था करते, व तेथें आपण स्वस्थ ईशचिंतन व आत्मनात्मविचार करीत रहा. तुमच्यासारखे साधू राज्यांत असले, म्हणजे आम्हाला भूषणच आहे !'' चंद्रचूडाला नाइलाजास्तव ते मान्य करणें भाग पडले व त्याची रवानगी अणकाईच्या पहाडावर झाली. मरेपर्यंत चंद्रचूड तेथेंच होता.

इकडे, राघोबादादाही, कांहीं दिवस अहिल्याबाईचा पाहुणचार घेऊन पुढें रवाना झाले !

अशा प्रकारें बाईने हिंमतीने होळकरशाहीचे रक्षण करून, तुकोजीला गादीवर बसविले; व आपण नर्मदाकाठीं महेश्वरीं ईशचिंतन करीत राहिल्या ! तरी, तेथूनही प्रसंगविशेषीं त्या राज्यकारभारासंबंधींची भानगडीची कामें पहात असतच. एकवेळ असें झाले कीं :

**६७. *पद (चाल : बामना बघुनि०)***

नेमाड ! मुलुख अडदांड, बहुतसे पहाड, भिल्ल राहाती।।
आल्या गेल्यासी सदा लुटति हो दरवडे।।
दरवडे, घालिती बंडे, भिलांच्यापुढे कुणि न धजती।।
लोक ग्रामास त्यजुनि पळती हो दशदिशा !।।१।।
दशदिशा, जाहली दशा ! समयिं त्या अशा, ओस पडला !
मुलुख नेमाड, गणू वदला हो।।१।।

नेमाडांत एकदा भिल्लांचे बंड झाले, व त्या बंडाच्या पारिपत्याकरिता :

**६८. *आर्या***

तत्पारिपत्य करण्या, गेला नेमाडिंचा सुभेदार।।
परि ना उपाय चाले, वाळूनें अडवितां न ये पूर !।।१।।

भिल्लांचा जमाव मोठा, सुभेदाराला ते बंड मोडणे अशक्य झाले. म्हणून त्यानें सैन्याची मदत पाठविण्यास अहिल्याबाईला विनंति-पत्र पाठविले. पत्र पाहून अहिल्याबाई म्हणाल्या, ''हा सुभेदार किती वेडा आहे ! बंड रयतेने केले आहे. तेव्हां बंडाचे कारण न सांगता हा सैन्याची मदत मागत आहे; तेव्हां ती देणे बरे नाही. रयतेला तसेच कांहीं तरी दुःख झाले असेल, तेव्हांच ती बंड करण्याला प्रवृत्त झाली असली पाहिजे.'' असे म्हणून जवळच्या कारकुनाला सांगितले कीं, ''आताच्या आतां नेमाडच्या सुभेदाराला कळव, कीं मदतीचे कांहीं कारण नाही !

६९. *दिंडी*

पत्र माझें हें भिलांप्रती द्यावें। काय होतें तें मजसि निवेदावें।।
तीहि आहे माझीच रयत सारी। दुःख त्यांचें मजविणें कोण वारी ?।।

भिल्लाला जें पत्र लिहिले, त्यात असा मजकूर होता.

७०. *लावणी*

''लेकरें रयत ती सारी, त्यालगिं माय भूपती।।
मग काय सुज्ञ शिशु कोठें, जननिच्या सवें भांडती ?।।
।। चाल।। स्तनरूप राजसत्तेंत, तुम्हाप्रीत्यर्थ, सौख्य पय सत्य।।
आहे तें प्यावें, काढा न ढंग नित नवे !।।१।।
मातेस शिशू जरि प्यारें, परि आडवें आल्या कापिती।।
जीं येतीं सरळ मार्गानें तीं, अंकावर खेळती।।
।। चाल।। स्थळ जननि, हट्ट करण्यास, खड्ग धरण्यास, योग्य ना खास।।
कथी अशि नीति, गणु म्हणे, अहिल्या सती !''।।२।।

आणि भिल्लांनीं माझ्या पत्राला मान दिला नाही, तर कळवा, म्हणजे ताबडतोब सैन्याची मदत पाठविता येईल. सांगितल्याप्रमाणें पत्रें रवाना झाली ! सुभेदारांनी अहिल्याबाईची पत्रें, त्या भिल्लांचा पुढारी मनरूपसिंग होता, त्याला दिली. भिल्लांनीं अहिल्याबाईंचे पत्र पाहताच तलवारी खाली ठेविल्या, आणि सुभेदाराला म्हणाले कीं, ''सुभेदारसाहेब ! आम्ही जे बंड केले त्याचा उद्देश हाच होता, कीं आमची दाद मातोश्रीपर्यंत लागावी ! ती आतां लागली. आता बंडाचे कारण राहिले नाही. अहिल्याबाईसारख्या प्रजावत्सल मातोश्रीवर आम्ही कधीही उठणार नाही. आमचा मातुश्रीला नमस्कार कळवा.'' ते पाहून सुभेदार चपापला व म्हणाला, ''काय अहिल्यामातोश्रींचे अलौकिक वजन हें ? हे भिल्ल माझ्या पलटणीला पाहून दबकले नाहीत ! ते अहिल्याबाईच्या एका चिटोऱ्याला पाहून तलवारी खाली ठेवते झाले! खरोखर, सदाचारासारखी दुसरी कोणतीही शक्ती नाही'' असो. पुढें अहिल्याबाईच्या सल्ल्यानें नेमाड प्रांतावर :

७१. *ओवी*

'भिलकवडी' कर बसवून। केले भिलांचे संरक्षण।।
तेणें आनंदलें मन। मनरूपसिंग वंशजांचें !।।१।।

अहिल्याबाईसाहेब चतुर, राजकारणी, धूर्त, धर्मनिष्ठ, सदाचारसंपन्न अशा होत्या; अशी स्त्री मराठेशाहीत होळकराशिवाय कोणत्याही राजघराण्यांत झाली नाही ! तिने एक दिवस तुकोजीला जवळ बोलावून सांगितले कीं, ''हे तुकोजी ! माझ्या सासऱ्यानें जी ही गादी स्थापन केली आहे, तिचा अभिमान तू बाळग. ही पुण्यश्लोक पुरुषाची गादी आहे. तिच्यावर बसून तू जर वेडावाकडा वागशील, तर ती तुला सुखदायी होणार नाही !

७२. *लावणी (चाल : आहे त्याची मला)*

मल्हार गादी होळकरी, कठिण जाणिजे।।
तिजवरी बसाया बाबा! अधिकार अंगिं पाहिजे!।।

मनगटीं असावा जोर, धैर्य जणु गिरी ।।
अभिमान स्वकिय राष्ट्राचा वाहणें प्रबल अंतरीं ।।१।।
।।चाल।। सन्नीति सदाचारास।। धर्मश्रद्धेस ।। रीतभातीस ।।
जो न कधिं टाकी, भोगील गादि तोच कीं ! ।।१।।

हे पूर्ण ध्यानांत ठेव. आपल्या मालूचे उदाहरण तुझ्या डोळ्यापुढे आहे. अनाचारी दुर्वर्तनी पुरुष ह्या शंकरांनीं दिलेल्या होळकरी गादीवर टिकणार नाहीत. उगीच कोणाच्या नादीं लागू नकोस. हे तुकोजीने ऐकिले, पण तो प्रत्येक आपली गोष्ट आपला सचिव जो नारो गणेश त्यास सांगत असे.

*७३. आर्या*

नारो गणेश नामें होता जो सचिव त्या तुकोजीचा ।।
तो मुत्सद्दी, परि हो ! परम असे कोश कुटिल नीतीचा ! ।।

त्याप्रमाणें हीही गोष्ट तुकोजीने नारो गणेशास सांगितली, पण हे ज्ञान त्याला पटले नाही ! तुकोजी हा सरळ, पापभीरु व करडा शिपाई होता. त्यास हे राजकारणी डावपेच समजत नसत. नारो गणेशानें हे भाषण ऐकून सांगितले कीं, ''सरकार ! मग आपण बाईसाहेबांच्या हातातले बाहुले होऊन बसणार ! महादजी शिंद्यासारखी कर्तबगारी कराल, तरच या शिपाईगिरीचे चीज होईल.'' असे सांगून तो वरचेवर तुकोजीचे मन बाईंविषयीं कलुषित करीत असे. पण तुकोजी स्वतः पापभिरु असल्यामुळे, त्याच्या कुटिल नीतीचा उपयोग बिलकूल होत नसे. नुसते संशयाचे डोंगर माजत.

एकदां, बाईची ताकद कशी आहे, हे अजमावण्यासाठी महादजी शिंदे महेश्वरीं आले. बोलणीचालणी बहुत झाली. तीन महिने मुक्काम झाला. एक दिवस आपला येथें आल्याचा मतलब साधण्यासाठीं पाटीलबुवा बाईस म्हणाले, ''बाईसाहेब ! आम्ही पुरुष व तुकोजीही पुरुष ! तेव्हां आम्ही जर आपल्या ढंगावर आलो, तर तुम्ही बायको माणूस काय कराल ?'' ते ऐकून ''आपणाला जो संशय आला त्यांत पुष्कळ सत्यता आहे'' असे अहिल्याबाईंना वाटले व त्यांनी शिंद्यास उत्तर दिले :

*७४. पद*

फळलें तुमचें तुम्हाला जें तें ।।धृ.।।
पेंच महादजी ! ते नच शिकवा
उगिच तुम्हीं इतरांतें ।। फळलें... ।।१।।
।। चाल ।। तुमच्या बाया शेळ्या चारी ! ।।
तुकोजिची ना स्थिति तयापरी ।।
त्याची वाघिण आहे महेश्वरीं ।।
बसलेली मी येथें ! ।। फळलें... ।।२।।

''तुम्ही आपल्या बायांना, डावपेंच करून सुपारीच्या खांडांसारखे तोंडात टाकले ! तसे तुकोजीला साधणार नाही. त्याची बाई शेळी नसून वाघीण आहे ! पाहिजे असल्यास सांगून पहा !

***७५. श्लोक (पृथ्वी)***

गुबार मनिंचा तुम्ही उकलिलांत केलें बरें !।।
लढाई करण्यास या मिळुन, मी न मागें सरें !
तुम्हा शपथ! हें करा, भिति न दाखवा बाउची !
करीन ठिकऱ्या रणीं, तरिच सून मल्हारिची !।।

आणखी :

***७६. पद (चाल : तुज काय देउं? सांवळ्या?)***

ज्या दिवशिं कूच तुमचें इंदुराहुन।।
त्या दिवशिं गजाच्या पायीं, अंड्यांसि पहा घालुन !।।
।। चाल।। तुमची करिन खातरी, तरिच मी खरी, सून होळकरी,
पुढें ना बोला !।'' असे म्हणुन विडा दीधला।।१।।

हे उत्तर ऐकून महादजी शिंदे सर्द झाले ! व विनयानें म्हणाले :

***७७. पद (चाल : बसनविहित ऐसे कां या)***

कोपवश न व्हावें ऐसे माझियावरी।।
कौतुकेंच वदलों हें मी समज अंतरीं।।
धैर्य तुझें पाहुन बाई !।। काळ सरेल मागें तोही।।
तेथ पाड अमुचा कांहीं।। धन्य तूं खरी !।। बाई ! धन्य तूं खरी !।।१।।

तें ऐकून बाई म्हणाल्या, ''महादजी, तुम्ही खरेच कौतुकानें बोलला असाल, तर त्याबद्दल मीही संशय घेणार नाही. तुम्ही सरळ असाल, तर मलाही सरळच वागावे लागेल. मी कांहीं जोधपूरचा राजा अभयसिंग नाही ! अहो ! आपण महाराष्ट्रीय मंडळी इकडे आलो आहो; तेव्हां परदेशांत तुमचा माझा वाकडेपणा बरा नाही. महाराष्ट्रीयांचा अभिमान टिकविण्यासाठी आपण एकमेकांना, मदतच केली पाहिजे. तरच आपण दक्षिणी लोक ! आपला दक्षिणी लोकांचा द्वेष या मुसलमानांना व रजपुतांना किती आहे, याचा अनुभव तुम्हाला लालसोटच्या लढाईत आलेलाच आहे ! त्या लढाईचा धक्का आपल्या मनास बसवून घेऊ नका. पुन्हा तयारी करा. व दक्षिणचे पाणी कसे सतेज आहे, हे आपल्या शत्रूंना दाखवा !

***७८. श्लोक (शार्दूलविक्रीडित)***

रक्षाया निज राज्यभाग झटणें शूरास आहे अधीं।।
शत्रूचीं उणिं उत्तरें नच खरा तो वीर ऐके कधीं !।।
देतें त्यास्तव तीस लक्ष रुपये, वेगें तयारी करा !।।
आहों आपण दक्षिणी जन कसे, हें दाखवा तस्करा !''।।१।।

हे ऐकून महादजी मनांत मोठा खजिल झाला व बाईच्या धडाडीचे त्यास आश्चर्य वाटले, तो म्हणाला :

***७९. श्लोक***

येतों, कृपा करिं! तुझ्या पदिं लीन शिंदा!।।
ऐसा न मी करिं पुन्हा कधिं नीच धंदा।।
जें जाहलें जननि! तें उदरांत घाल''।।
बोलून यापरि दिला उचलून बेल!।।१।।

महादजी शिंद्यांनीं बेलभंडारा उचलून देऊन, बाईची खातरजमा केली, व निरोप घेऊन इंदुरास गेले. तुकोजीला झालेली हकीगत साद्यंत सांगितली, व बाईशीं पूर्ववत् सलोख्याने वागण्याचा उपदेश केला ! पुन्हा जेव्हां तुकोजीची व अहिल्याबाईसाहेबांची गांठ पडली तेव्हां बाईंनीं त्यास पुढीलप्रमाणें कळवळ्याचा उपदेश केला. ''तुकोजी ! उगीच कोणाच्या नादीं लागू नकोस. सचिव नारो गणेश हा दुसरा शकुनि आहे हे ध्यानांत ठेव.

***८०. पद (चाल : तुज काय देउ सांवळ्या)***

श्रीमंत शाहु नरपती आपुले धनी।।
त्यांनींच ठेविला हा वा ! स्वराज्यवृक्ष लाउनी।।
।। चाल।। वृक्षाचें मूळ भोंसले; पेशवे भले, खोड जाहले,
आपण फांद्यांनीं, खुलविलें तयां लागुनी !।।१।।
तो वृक्ष करावा जतन हेंच सांगणें।।
तीव्रशा देशभक्तीचें, त्या सतत पाणि घालणें।।
।। चाल।। तरि फुटेल सौख्य पालवी, तया नविनवी,
म्हणुन ती हवी, एकि आपणांत !। गणुदास कवनिं सांगत।।२।।

जसा मनुष्यानें आपलेपणा सांभाळला पाहिजे, तसा आपला धर्मही सांभाळला पाहिजे; व परमेश्वरावर निष्कलंक प्रेम ठेविलें पाहिजे. त्याच्या आशीर्वादाशिवाय ऐहिक किंवा पारमार्थिक कोणतेही कृत्य होणे शक्य नाही ! याचा अनुभव तुला नवलसिंग जाटाच्या लढाईच्या वेळीं आलेला आहेच !

***८१. श्लोक***

''अष्टाक्षरी, धनगरा ! जप ना करीं रे!।।
हा जाट एक अज, जाउन त्या धरीं रे!
जातों त्वदीय मदतीस्तव मी अघाडीं।।
मागून ये झणिं, न घालविं वेळ थोडी''।।१।।

***८२. दिंडी***

असें येउन मार्तंड बोलला ना।।
स्वप्निं तुझिया ? त्यावरून आण ध्याना!।।
शरण गेल्या ईशास, सर्व कांहीं।।
मनाजोगें येतसे घडुन पाही!।।१।।

म्हणून, ईश्वर जगांत नाही या खोट्या कल्पनेला बळी पडू नकोस. राजकारणी पुरुषांनीं खलबते करावी, पण :

*८३. आर्या*

खलबत खलबत्त्यापरि, अरिचा करण्या चुरा असे योग्य!।।
त्याविण कुटीत बसल्या, बोटाचा जाय ठेंचुनी भाग!।।१।।

*८४. पद (चाल : वसंतीं बघुन मेनकेला)*

अपुलें रक्तचि अपणांतें।।
ये कामासी, मुळिं न पराचे, उपयोगी पडतें !।।धृ.।।
नच या विसरे तत्त्वातें।।
वर्ज्य करावें, अपुलेपण तें ज्या ठायिं न दिसतें।।
।। चाल।। अपुले शूर सुभेदार।।
तैसे छत्रपती थोर।।
किंवा बाजी बहाद्दर।।
यांनीं दक्षिणि लोकांतें !।। एक करूनी, अजिंक्य ऐशा,
जितलें शत्रूंतें।।१।।

*८५. कटाव*

अंकुर जो कां निरा तटींचा। हिरा अमोलिक ! होळ खनीचा।
परमभक्त श्रीमार्तंडाचा। त्या मम श्वशूर मल्हारजीनें।
वनिंचे धनगर केले शाहणे!। माळव्यांत या बाहुबलानें।
राज्य होळकरी केलें स्थापन!। पेशव्यांची मर्जी राखुन।
छत्रपतीचें दिलें फडकावुन। निशाण भगवें! किति सांगावें?।
हेंच हमेषा चित्तिं वहावें!। 'आम्हिं दक्षिणी' हें न विसरला।
जाट रजपुता मुळीं न भुलला!। नाहिं कधीं यवनांत मिसळला।
स्वजातियांवर प्रेम ठेविलें। देशामधुनी इकडे आणिलें।
नृपदरबारीं त्यांस बसविलें। ते हे बिंगले, चांगण, मतकर।
बुळे, बनसुडे, बारगळ, विरकर। भागवत, शिंदे, फणसे, निफाडकर।
वाघ, वहाड, बोराडे, पालकर। गावडे, झनानी, ते लंबाते।
असेच आणखी कितीक, त्यांतें। तूं नच विसरे, धरिं प्रेमातें।
असें वागल्या राखिल पाठी। श्रीमल्हारी शिव जगजेठी !।
दासगणू हें बोलत ओंठीं। तेंच धरावें हृदयसंपुटीं !।।१।।

म्हणून, तुकोजी, स्वजातीयांविषयीं प्रेम ठेव.
ज्याला आपले घर सुखी करतां येत नाही, त्याला गल्लीचे लोक कसे सुखी करितां येतील? म्हणून :

*८६. श्लोक*

एकी बरी, परि नको मुळिं संकराची !।।
ती ना जगांत सुखदा कधिं व्हावयाची !।।
आधीं करा घर सुखी, मग गल्लि, गांव।।
जा या क्रमें, तरिच दे यश साच देव !।।१।।

या तत्त्वाची अंमलबजावणी समाजाची एकी करतांना, चतुर पुरुषांनी धोरण ठेवून केली पाहिजे.'' अशा प्रकारें, वेळोवेळीं अहिल्याबाई तुकोजीला उपदेश करीत असे. त्यामुळें त्याच्या हयातीपर्यंत होळकरांचे राज्य उत्तम तऱ्हेनें चालले. असो.

अहिल्याबाईची मुलगी मुक्ताबाई सती गेली. त्यावेळीं अहिल्याबाईने तिला सांगितले कीं,

*८७. दिंडी*

सती जाणें सामान्य पुण्य, बाई !।।
तें न चुकवी गे ! जनन मरण पाहीं।।
तत्त्व कळल्यावांचून मानवांचा।।
जन्म मुक्ते ! या व्यर्थ जगीं साचा !।।१।।

म्हणून, तू सदाचारी राहून तत्त्वविचार कर. पण, हे बाईचें म्हणणें मुक्ताबाईला पटले नाही. ती सती गेली !

एक वेळ इंदूर, महेश्वरची मंडळीं श्रीकाशीला गेली होती. तेव्हां,

*८८. आर्या*

भागीरथींत एक्या नौकेला छिद्र थोर तळिं पडलें।।
घाबरले नावाडी, तेविं उतारू बहूत गडबडले !।।१।।

त्या वेळी त्या नौकेतील लोक श्रीअहिल्याबाईचा धावा करू लागले. ''हे साध्वी !''

*८९. पद (चाल : उद्धवा सांत्वन)*

हे साध्वि अहिल्याबाई !। या समया सादर होई।। जननि गे !।।
आम्हिं तुझीं लेकरें सारीं। कर देउनि, या पुरिं तारी।। जननि गे !।।
।। चाल।। जान्हवी काळ ही झाली !।
आई ! नांव तळाला फुटली !।
आतां न अन्य कुणि वाली !।
झणिं महेश्वराहुनि येई। या समया सादर होई। जननि गे !।।१।।''

अशा प्रकारें लोकांनीं अहिल्याबाईचा धावा केला व गंगेला म्हणाले – हे गंगामाई ! आमच्या माउलीचा मोठेपणा तुम्हाला पटला नाही, म्हणून तूं आम्हांला बुडविण्याची तयारी केलीस काय ? तुझ्यापेक्षां आमच्या मातोश्रीचे पुण्य कमी नाही बरें !''

*१०. श्लोक (शार्दूलविक्रीडीत)*

गंगे ! तूं पदपद्मजा ! परि मणी कंठीं अहिल्या असे ! ।।
पूज्याच्या शिरिं नाचतेस नित, तू ! ती त्या करीं घेतसे ! ।।
गोडा सोडुनि खारटाप्रति सदा भेटावया धांवसी ! ।।
होवोनी बहु स्वैर या महितलीं, नाहीं अहिल्या तशी ! ।।१।।

आम्ही तिची लेकरे आहोत. हे वरुणा ! तुला श्रीअहिल्याबाईची शपथ आहे.

*११. पद (चाल : कधिं तिला०)*

तिचि असे शपथ तुजला ! ।
येउ न द्यावें तरिंत जला? ।।धृ.।।
।। चाल ।। हे वरुणा ! करिं करुणा ।
आता ना करि दैना ! ।
त्यजु नको सुगुण अपुला ! ।।१।।''

अशी प्रार्थना करून लोक श्रीअहिल्याबाईचे भजन करू लागले.

*१२. पद (चाल : भजनाची)*

जय ! अहिल्या माता की । जय ! होळकर अम्मा की ! ।।धृ.।।
बुडने लागे बच्चे तेरे । अवो अम्मा ! देवो हात ! ।
तोरे भरोसे हम चलत है । हो न किसीका घात ! ।।१।।
शिवशंकर के लिंगार्चनपर । हेत हमारे अम्माका ।
तारो अहिल्येखातर, शिवजी ! पुण्य जननिका है बांका ! ।।२।।
कहे दासगनू 'जय' कहतेही । नांव झपाटेबंद चली ! ।
देवी अहिल्या यही देणगी । भारतको है अमोल मिली !! ।।३।।

*१३. ओवी*

महेश्वराकडे मुख । करून नाचूं लागले लोक ! ।।
काशीचे जन असंख्य । कौतूक पहाया लोटले ! ।।१।।

छिद्र पडले असतां नाव घाटाला लागली, हे पाहून काशीचे लोक आश्चर्याने म्हणाले, ''तुम्ही वाचलात, ही आश्चर्याची गोष्ट आहे !'' ते ऐकून नावेतील लोक म्हणाले, ''आम्ही वाचणारच ! आम्ही कोणाची लेकरे आहोत ! तुम्ही सुद्धां आमच्या माउलीचे भजन करा !

*१४. पद (चाल : भल्या माणसा)*

दख्खन्‌की वो रानि अहिल्या भइ भगवतसे बहु प्यारी ! ।
'जय ! अहिल्या !' मूंसे बोलो, ठाडी अम्मा महेश्वरीं ।।धृ.।।
रघूबंशका नाम बढाया, प्रभुनें आकर रघुकुलमें ।।
वैसा होलकरका फैलाया, नाम सतीनें दुनियामें ! ।।१।।

धन्य महेश्वर ! धन्य होलकर !। जिस बंशमें भयि अम्मा।
वो वंशका मानमरातब। रक्षो !' गनु कहे, 'सुखधामा !' ।।२।।

जेथे ही फुटकी नाव घाटाला लागली, त्याच ठिकाणीं हल्ली होळकर सरकारचा वाडा व अन्नसत्र आहे.

हा तिचा महिमा ऐकून काशीचे लोक आश्चर्याने म्हणाले, ''काय? राणी असूनही, ती इतकी संतविभूति आहे?'' लोक म्हणाले, ''हो हो ! यांत काय संशय ! अहो :

### ९५. *ओवी*

कलियुगिंच्या साध्वी स्त्रिया। कान्हो, मुक्ता, गिरजा, जनी !।।
मिरा, केरी, कर्माबाई। सखू, सांवत्याची कामिनी !।।
बिबी, कबीरमहाराजाची। भागु तुकयाची कन्यका !।।
त्यापरी अहिल्याबाई !। राणी म्हणून वगळू नका !।।१।।

### ९६. *आर्या*

ऐसें कितीक वेळां, निज राज्या संकटांत रक्षियलें।।
बहुत मिळवुनी कीर्ति, हरि-सेवेसी शरीर लावियलें !।।१।।

याप्रमाणे, अहिल्याबाई सदाचारी, धर्मनिष्ठ व ईश्वरभक्तिरत जरी होत्या, तरी त्या नेहमी श्रीशिवछत्रपतींनी लाविलेला स्वराज्यवृक्ष कसा टिकेल, याची विवंचना करीत असत. त्यांचा असा ठाम सिद्धांत होता कीं, 'सत्तेशिवाय धर्माचे रक्षण होणार नाही. धर्म ही वस्तु प्राणासारखी आहे व सत्ता ही शरीरासारखी आहे. या दोहोंचा समागम झाल्याखेरीज कांहींच सौख्य अथवा खरे श्रेय अनुभवाला येणार नाही !' या सिद्धांतानुसार वागण्याचा त्या नेहमी प्रयत्नही करीत.

पुढें, महादजी शिंदे व हरिपंत फडके ही कर्तबगार माणसे मृत्युमुखी पडल्यामुळें, अहिल्याबाईंच्या मनास पुष्कळ धक्का बसला व त्यांनीं कायमचे अंथरुण धरले ! तशाही स्थितीत त्या नित्यनेम शक्य तितके आचरण्यास कधीही चुकल्या नाहीत ! अशा त्या साध्वीचा अंत :

### ९७. *आर्या*

शक सत्राशें सत्रा श्रावणमासांत वद्य पक्षांत।।
जाय सती कैलासा चतुर्दशीला महेश्वरीं सत्य !।।१।।

श्रीअहिल्याबाईची कीर्ति अजूनपर्यंत भारतवर्षात हिंदूंच्या सर्व क्षेत्रांत दुमदुमून राहिलेली आहे !

### ९८. *कटाव*

पंढरपुर, करविर कोल्हापुर। औदुंबर, वेरुळ, घृष्णेश्वर।
त्र्यंबक, पुणतांबें, गोदातिर। परळी, औंढे, काशि, अवंती।
गया, अयोध्या, तशि मथुरा ती। गोकुळ, वृंदावन, तें पुष्कर।
हिंगलाज, गिरनार, डाकुर। सोमनाथ, सोरटी, चांदवड।
जेजूरी, मैलार, वणीगड। तुळजापुर, सोनारी, चोंढी।
रामेश्वर, टोंकें, पाथर्डी,। पुरी, द्वारका, व्यंकटेशगिरि।

ऐशा नानाविध क्षेत्रांतरिं। कीर्ति केली! वानूं कुठवरि? ।।१।।
घाट, कुठें मंदीर बांधिलें। कुठें छत्र तें चालूं केलें !।
क्षेत्रस्थां कुठें भूमिदान दिलें। पांथस्थांस्तव विहिरि खोदिल्या।
विमल यशाच्या ध्वजा लाविल्या !। दासगणु म्हणे धन्य अहिल्या !।।२।।

***९९. श्लोक***

अहिल्याबाईंच्या नंतर इंदूरच्या गादीवर, अनुक्रमें पुढील राज्यकर्ते :

सुभेदार, मालू, अहिल्या, तुकोजी। यशोजी, सदा राव मल्हार गाजी !।
हरीबा, तुकोजी, शिवाजी, तशा या। तुकोजी, यशोजी नृपांतें नमूं या !।।१।।

होळकरशाहीच्या वंशजांवर श्रीपरमेश्वराची अक्षय कृपा राहून, तो त्यांचे सदा रक्षण करो !

***१०० पद (चाल : किति मजेदार हार!)***

जय राज्ञि ! होळकर कुल-सती ! देवि अहिल्ये ! तुजसि नमो !।।धृ.।।
कीर्ति-पताका फडकति जगतीं !।
विमल यशा, तव बुधजन गाती !।
विमला, सरला, जणुं कां कमला !।
तू ही गे ! या भूभागा अवतरलिस, मन चारितिं रमो !।।१।।
साम, दाम, दंडास करूनी।
होळकरशाही रक्षिलि, जननी !।
रीति, नीति, भक्ति जगतीं।
त्वांचि गे ! माते ! आचरली, यच्छ्रवणें जन-पाप शमो !।।१।।
भूप सवाई राव तुकोजी।
कुमार त्यांचा जो रणगाजी।
त्या यशवंता कर सुखि ! आतां।
राहीं गे ! त्या पाठीं, देवी !। हेंचि मागे 'गणुदास', विभो !।।३।।

•

# धन्य महेश्वर

## अण्णासाहेब डांगे

धन्य ती महेश्वर नगरी।
अवतरले धर्मराज्य भूवरी।।धृ०।।

महेश्वर हे गाव चिमुकले।
नर्मदेच्या तीरावर वसले।
अहिल्यादेवींनी ते निवडले।
झाली पुण्य प्रतापी नगरी।।

पुण्योदक नर्मदा मातेचे।
खळाळे धार, स्वर चैतन्याचे।
ठिकाण हे नव संकल्पाचे।
अहिल्यादेवी अर्घ्य दान करी।।

बांधिले मंदिर विश्वेश्वराचे।
रुक्माई विठ्ठल निवासाचे।
मातंगेश्वर, भवानी मातेचे।
प्रकाशली ज्योत राजराजेस्वरी।।

लक्ष लक्ष लिंगांचे पूजन।
कथा कीर्तन पोथ्या पुराण।
दानधर्म सत्कार्यास आले उधाण।
अन्नदाने क्षुधा शांत करी।।

इथे असे माय ममतेची।
इथे नांदते माया बहिणीची।
इथे बांधली पूजा न्यायाची।
इथला कारभार दक्ष करारी।।

भुईकोट किल्याचे बुरुज भारी।
तटबंदी शिबंदीचे रक्षण करी।
होळकरांचे सैन्य दल भारी।
वाजे तुतारी गर्जत भेरी।।

रूप पालटले महिष्मतीचे।
प्रवेशद्वार मराठेशाहीचे।
उधळले घोडे स्वराज्याचे।
असे नजर भरतखंडावरी।।

देश, धर्म, संस्कृति रक्षिण्या।
स्वकीयास एकत्र करण्या।
अखंड भारत साकारण्या।
चालती खलबते महेश्वरी।।

•

## नमू या सती अहिल्या

**अज्ञात**

येऊन नारी जन्मा। सकलांस केले धन्य।
कीर्ति दिंगत व्हाया। नमू या सती अहिल्या।।

धर्मास जागविले। राष्ट्रास रक्षियेले।
धर्मास उद्धराया। नमू या सती अहिल्या।।

काशीस घाट बांधी। छत्रे असे किती ती।
प्राण्यास सौख्य द्याया। नमू या सती अहिल्या।।

सौभाग्य राष्ट्रभूचे। सत्कर्म ठायी ठायी।
औदार्य-तेज-मूर्ती। नमू या सती अहिल्या।।

आदर्श लोकमाता। गंगाजळ निर्मळा ती।
आदिम लोक-शक्ति। नमू या सती अहिल्या।।

रयतेवरी सदा ही। मातृत्वपूर्ण छाया।
जगण्यास अर्थ द्याया। नमू या सती अहिल्या।।

*संग्राहक : श्रीमती विमल लाळगे, इंदूर*

•

# अहिल्या

**निरंजन होळकर**

अहिल्या कल्याणाचे व्रत
अहिल्या त्यागाचे चरित्र
अहिल्या मल्हारींची शिष्या
अहिल्या दीनांचीच मित्र

अहिल्या सर्वस्वाचे दान
अहिल्या वास्तवाचे भान
अहिल्या मूर्तिमंत शिव
अहिल्या कर्तव्याची आन

अहिल्या शासनाचा अर्थ
अहिल्या नीतीचाच पार्थ
अहिल्या दाखवी सकलांसी
कर्तव्यातच परमार्थ

अहिल्या एक राजमाता
अहिल्या गरीबांची त्राता
अहिल्या लोकांचेच राज्य
अहिल्या भूमीची विधाता

अहिल्या प्रार्थनेचा मंत्र
अहिल्या समतेचे तंत्र
अहिल्या नारीचा गौरव
अहिल्या सर्वांहून स्वतंत्र

अहिल्या होळकरांची राणी
अहिल्या नर्मदेचे पाणी
अहिल्या एक लोकमाता
अहिल्या शाश्वताची कहाणी

•

# अहिल्या स्तवन
## (भैरवी)

**अज्ञात**

(**चाल** – प्रभु अजिं गमला)

भगवति, चरणा करी वन्दना।
दुःखार्ताच्या, दीनजनाच्या, देवि, शरणा।। धृ।।
दशरथतनयानें दाविण्या दिव्य लीला,
पथिं सहज शिलेचा पुण्य उद्धार केला।
रघुकुलमतिनें का त्या ऋणां फेडण्यातें,
म्हणुनि जननि, घेसी जन्म या वंशि, माते ?।।

•

# सारे प्रजानन, करा बोळवण

**प्रा. म. सी. हळपे**

वाटा भिजल्या अश्रूंनी, शोकाकूल महेश्वर
नर्मदेच्या दोन्ही तिरी, आसवांचा महापूर
अश्रू इथं ऐलतीरी, आत्मा गेला पैलतिरी
सतराशे पंचाण्णूत, माता गेली देवाघरी
जन्मभराच्या कष्टानं, अती शिणलेल्या जिवा
द्याया कायम विसावा, गेली देवाचिया गावा
विव्हळले प्रजानन, करतांना बोळवण
आता कुठलं दर्शन? उरे फक्त आठवण
गेली गेली लोकमाता, तिची रचयिली चिता
अग्नीदेव शहारला, घेता पोटी पतीव्रता
गोठ्यातल्या गाईस हे, जेव्हा कळे वर्तमान
हंबरडा फोडूनिया, तिनं त्यागियले प्राण
देह समाधीस्त झाला, कीर्त रुपानं उरला
स्वर्गातून देवतांनी, पुष्पवर्षाव केला
अशी माता पुण्यश्लोक, करू तिची आठवण
लावू सत्कारणी वेळ, थोडा समाजा कारण
तुम्हा देतो धन्यवाद ! मज इथं बोलावलं
होवो मार्तंडाची कृपा ! सकलांचं चांगभलं

•

## मानवता गौरवांकित झाली

**अब्दुल गफूर**
''अरमान', इंदूर

मानवता गौरवांकित झाली
तुझ्या धवल चारित्र्याने,
धन्य हो तू अहिल्याबाई
तुझ्या भक्तीच्या लहरींमध्ये
गीत गाई नर्मदामाई
अन्यायावर प्रहार केले
जुलमी मुखिया कंपित झाले
तुझिया धवल कर्तृत्वाने
मानवतेला अर्थ लाभले

हिन्दीतून स्वैर मराठी रूपांतर
निरंजन देव

•

# पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर
# संगीतिका

सौ. मालती चितळे

भारतीय स्त्री मातृत्व, कर्तृत्व आणि नेतृत्व या तीन गुणांनी परिपूर्ण असावी अशी प्रत्येकाची अपेक्षा असते. भारतीय स्त्रीला सर्वांगांनी परिपूर्ण बनविण्याच्या उद्देशानेच अनेक महिला संघटना कार्यरत आहेत. त्या दृष्टिकोनातून विचार करता अशी परिपूर्ण स्त्री विरळाच. परंतु राजमाता जिजाबाई - मातृत्व, देवी अहिल्याबाई - कर्तृत्व तर झाशीची राणी - नेतृत्व या तीन गुणांचे प्रतिनिधित्व करत असल्याने, भारतीय स्त्रियांपुढे त्या आदर्श नारीच्या रूपांत उभ्या ठाकतात.

शिवछत्रपतींना घडविणारी जिजाबाई वंदनीय देशमाताच होय. कर्तृत्वाचे बाबतीत देवी अहिल्याबाई होळकरांचे उदाहरण अलौकिकच. कोणत्याही परिस्थितीत हताश होऊन कर्तव्यपराङ्मुख न होता त्यांनी परिस्थितीला धैर्याने तोंड दिले. नीतिमत्तेचे हे जागते, ज्वलंत उदाहरण. आज नीतिमत्ता नावालासुद्धा उरलेली नसतांना पुण्यश्लोक अहिल्याबाईंचे नाव सामान्यजनांना दीपस्तंभ म्हणून प्रकाश देत आहे. तर शौर्य, धैर्य, नेतृत्व यांचा मूर्तिमंत पुतळा म्हणजे राणी लक्ष्मीबाई. पुरुषांनाही मार्गदर्शक. भारताच्या स्वातंत्र्यासाठी आपले बलिदान करणारी ती स्वातंत्र्य-देवता धन्यच होय.

आज या तीन देवतांपैकी पुण्यश्लोक अहिल्याबाईंच्या जीवनावरची ही संगीतिका आम्ही सादर करत आहोत.

अहिल्याबाईंचे बालपण, तारुण्य वगैरेचा परिचय करून देण्याचा प्रयत्न या संगीतिकेतून केला आहे. संगीतिका लिहिली आहे सौ. मालती चितळे यांनी. सादर करत आहेत सौ. स्मिता जोशी, श्यामला पोंक्षे, विद्या परूळेकर, काळे, साठे व ओक. आपणास ठाऊकच आहे की सौ. स्मिता जोशी आहेत प्रतिभावंत अभ्यासक अन् कीर्तनकार. त्यामुळे त्यांच्या मार्गदर्शनाखाली होणारा हा कार्यक्रम तुम्हाला निश्चितच आवडेल आणि एक विशेष म्हणजे सौ. बापट यांची पेटी साथ, श्री. खांडेकरांचे तबला वादन म्हणजे मणिकांचन योगच म्हणावा लागेल.

आपल्या परंपरेप्रमाणे हा कार्यक्रम सादर करतांना तो यशस्वी व्हावा म्हणून प्रथम गणराजाला आवाहन आणि ती ज्यांच्यावर ही संगीतिका गायली आहे त्या पुण्यश्लोक अहिल्याबाईंना वंदन.

काळ होता अठराव्या शतकातला. नव्हतं आत्तासारखं स्त्री शिक्षण, नव्हती स्त्री स्वातंत्र्याची कल्पना, नव्हता महिलांचा कैवारी, नव्हता महिला आयोग. परंतु अशाही काळात, भारतवर्षात एक महिलारुपी तारा स्वयंप्रकाशाने तळपत होता. कर्तृत्व, दातृत्व

अन् नेतृत्व याने प्रकाशमान असलेली महिला देवीपदास जाऊन पोचली होती. आपल्या गुणांच्या तेजाने साऱ्या भारतवर्षाला दिपवून टाकले होते तिने. स्वकर्तृत्वाने इतिहासाच्या पानावर तिचे नाव सुवर्णाक्षराने कोरले गेले. अन् म्हणूनच पुण्यश्लोक ही उत्स्फूर्त बिरुदावली मिळाली तिला.

आज साऱ्या महिलांनाच नव्हे तर साऱ्या पुरुषजातीला सुद्धा लोकसेवा कशी करावी याचा आदर्शच तिने घालून दिलेला आहे. अशी ही लक्ष्मीरूप महिला म्हणजे देवी पुण्यश्लोक अहिल्याबाईच हे लगेच ओळखता येते आपल्याला. अहिल्याबाईचे नाव काढताच इतिहासाच्या पुस्तकातील तिची प्रतिमा डोळ्यापुढे उभी रहाते. तो सात्त्विक, विचारी, असा गोल चेहरा. शांत, पवित्र असे टपोरे डोळे; डोक्यावरचा पदर, रुंद, भव्य कपाळ व त्यावरील कुंकवाची लांब चिरी. बघूनच कसं प्रसन्न वाटतं, नाही? नेतृत्व, कर्तृत्व गाजविण्यासाठी नाही तिला डोक्यावरचा पदर खाली आणवावा लागला, नाही पुसावे लागले भाळीचे कुंकू, लढाईस उतरताना नाही उतरविल्या बांगड्या. नुसत्या देखाव्याची तिला गरजच नव्हती. कर्तृत्व, नेतृत्व करताना बाह्य बदलांची नसते आवश्यकता, याचे ढळढळीत उदाहरण आहे ती. खऱ्या कर्तृत्वाला नकलीपणाची कवचकुंडले लागतच नाहीत. अन् या सूर्याला दाखविण्यासाठी शब्दरुपी प्रकाशाची गरज नसते हे पुन्हा एकदा पटवून दिले तिने. अहिल्याबाईचा विचार करतांना मला नेहमी एक कविता आठवते. एक अबू नावाचा माणूस होता. तो आपला वेळ ईश्वरचिंतनात न घालविता दीनदुबळ्यांची, गरीबांची, वृद्धांची सेवा करण्यात घालवत असे. लोक म्हणत, याचं कसं होणार? किंचितही ईश्वरभक्ती नाही म्हणजे काय? पण अबूला नव्हतं त्याचं काही. असाच एकदा अबू झोपला होता. मध्यरात्री त्याला जाग आली. तेथे एक देवदूत शाईने लिहीत बसला होता. पुढ्यात होता लांबलचक कागद. कागदावर आपला सारखाच लिहीतच होता. अबूला कळेना. त्याने त्याला शेवटी विचारले, ''हे देवदूता, तू काय लिहितो आहेस?'' तेव्हा तो देवदूत म्हणाला, ''जे ईश्वरावर प्रेम करतात, त्याची भक्ती करतात त्याची यादी करतोय मी.'' अबू म्हणाला, ''काय रे या यादीत माझे नाव आहे ना?'' देवदूत म्हणाला, ''नाही रे, तुझे नाही नाव यादीत.'' अबूला ना खेद ना खंत. त्याला जराही वाईट वाटले नाही.

दुसऱ्या दिवशी अबू असाच मध्यरात्री जागा झाला तर देवदूत आजही लिहित बसला होता. पण आज नव्हता कागद तर होता सोन्याचा कागदाप्रमाणे पातळ पत्रा अन् त्यावर नव्हती शाईने लिहिलेली अक्षरे तर होती हिऱ्याने कोंदणात बसविलेली अक्षरे. अबूला खूपच आश्चर्य अन् कुतूहल वाटलं. त्याने देवदूताला विचारले, ''आज काय करतो आहेस रे?''

देवदूत म्हणाला, ''आज ना देव ज्याच्यावर प्रेम करतो ना त्याचे नाव कोरतो आहे. पण यादीत एकच नाव आहे.'' अबू म्हणाला, ''असा माणूस खराच भाग्यवान. कोण आहे रे हा भाग्यवान?'' दूत म्हणाला, ''अरे अबू, तो भाग्यवान दुसरा तिसरा कोणीही नसून तूच आहे. तू निःस्वार्थीपणे जनसेवा करतोस ना म्हणून देव तुझ्यावर प्रेम करतो.

जनसेवा हीच ईश्वर सेवा.'' अबूप्रमाणेच आहेत अहिल्याबाई होळकर. व्रतस्थ राहून निःस्वार्थीपणे त्यांनी प्रजेची सेवा केली.

परंतु हिच्या स्वर्ग सुखाला कुणाची तरी दृष्ट लागली. एकामागून एकेक दुःखं तिच्यावर आदळू लागली. अन् सोन्याप्रमाणे तिची अग्निपरिक्षाच दैव घेऊ लागले. त्याचे वर्णन ऐकून डोळ्याचे पाणीच खळेना.

**१ नमन**

***पद १ ले : नमन***

प्रारंभि तुज नमन गजवदन तुज शरण
शिवकारी तव ध्यान शुभकार्या तुज गान
तूज पूजिती सुजन विद्यापति म्हणून ।।१।।
ऐकोन तव कीर्ति मी प्रार्थि गजमूर्ति
सहकार्या गीत स्फूर्ति दे हेचि वरदान

गोष्ट आहे नानासाहेब पेशव्यांच्या काळातील. नगर जिल्ह्यात पाथर्डी जवळ चोंडी नावाचं एक छोटसं खेडेगाव होतं. त्या गावी एक गरीब धनगर कुटुंब रहात होतं. नाव होतं माणकोजी शिंदे. पण प्रपंचातला खरा आनंद अपत्य. त्याचीच होती उणीव. माणकोजींपेक्षा त्याच्या पत्नीलाच त्याची खंत जास्त. तिला वाटायचं आपलं स्त्रीत्व व्यर्थ आहे. त्याबद्दल ती काय सांगते पहा -

**२ अहिल्याबाईला वंदन**

***पद २ रे : वंदन***

अहिल्या सतीच्या पदी ठेवू माथा
चला गाऊ या सांगु या कीर्ति गाथा
नमो मातृभूमि जिची ही सुकन्या
अशा नारी रत्नेच भूमि सुधन्या

अशाच नैराश्येत एक सकाळ आशेचा किरण घेऊनच अवतरली. एक दिवस दारात आला भिक्षेकरी. तो होता सूज्ञ. भिक्षा वाढणारी माता दुःखी आहे हे त्याने मनोमन जाणले. त्याने दुःखाचे कारण विचारले. ती भिक्षेकऱ्यांच्या पाया पडली. त्याने 'अपत्यवती भव' असा आशीर्वाद दिला. आशीर्वाद फलद्रुप झाला. तिला कन्यारत्न झाले. तीच अहिल्याबाई.

अहिल्येची आई आता कौतुकाने म्हणू लागली,

***पद ३ रे***

अहिल्येची मी गं माय । जात माझी धनगर ।।
पाथर्डीला गं माहेर । चोंढी गावाला सासर ।।१।।

अहिल्येची मी गं माय। धनी माझे शेतकरी
शेळ्यामेंढ्यांचे कळप। पोटासाठीं राखण करी।।२।।
अहिल्येची मी गं माय। धनी माणकोजी शिंदा।
दिनभरी ते बाहेरी। घरी माझा कामधंदा।।३।।
अहिल्येची मी गं माय। नव्हती कूस उजवली।
गेले बाई ते दिवस। परी, आज याद आली।।४।।
बाळावीण संसारात। सारे सुख फोल ठरे।
वांझ नारीला ग बाई। जीवनांत मोल नूरे।।५।।
बाळावीण संसारात। होते बाई मी उदास।
हाती काही नसतांना। उरे निराश निःश्वास।।६।।

अशा रीतीने घरीदारी प्रत्यक्ष लक्ष्मीच अहिल्येच्या रूपाने खेळू लागली. दिवसामासी वाढू लागली. घरची परिस्थिती मुलीचे नुसते कौतुक करत बसून चालणारी नव्हती. कामासाठी बाहेर पडावंच लागणार होतं. मग या लाडकीला कुठे ठेवायचं? त्यावेळी नव्हती आतासारखी पाळणाघरं.

***पद ४ थे***

अहिल्येची मी गं माय। नवसाची माझी पोर।
माझ्या संसारी आभाळी। उगवली चंद्रकोर।।१।।
अहिल्येची मी गं माय। चोंडी गाव सीनातीरी
लेक जन्मली भाग्याची। माझ्या सासरच्या घरी।।२।।
कन्या जन्माची सुवार्ता। पोचविली गं धन्याला।
होते राऊळी बैसले। रामायण ऐकायाला।।३।।
राऊळात चाललीसे। कथा अहिल्या उद्धार।
हेच नांव या कन्येचे। हेतू मनी हा विचार।।४।।
झाला सोहळा गं सारा। नांव अहिल्या ठेविले।
लक्ष्मीचे बाळरुप। पाळण्यात पहुडले।।५।।
काळी सावळी गं लेक। वाढू लागली घरात।
चाली दुडूदुडू। धावू लागे अंगणात।।६।।
मैत्रिणीच्या संगे खेळे। मांडे खेळ गं देवाचा।
भरी तळी आरतीला। भंडारा या खंडोबाचा।।७।।
आवड या मल्हाराची। आवड गं म्हाळसेची।
लुटूपुटीची देवळे। सदा तयारी पूजेची।।८।।

त्यावेळी गावात मारुतीच्या देवळात शाळा भरत असे. तिथल्या तात्या पंतोजींना आईने विचारले अन् आश्चर्य असे की पंतोजी तिला जवळ बसवून घेऊ लागले. अहिल्याबाईची बुद्धी कुशाग्र होती. शाळेत गुरुजी मुलांना जो पाठ शिकवावयाचे तो पाठ ती ताबडतोब तोंडपाठ म्हणून दाखवत असे. ही गोष्ट पळशीकर गुरुजी ज्याला त्याला कौतुकाने सांगत. ते म्हणत,

***पद ५ वे***

पळशीकर पंतोजी तात्या। मीच मुलीचा गुरु।
तीव्र बुद्धी चातुर्य पाहूनी। शिक्षण केले सुरु।
रानी जाता ठेवी घाई। मजपाशी भाकरी।
प्रेमे मांडीवर ती बसूनी। विविध प्रश्न ही करी।
पोथी आणि भक्तीकथा। ही ऐके आवडीने।
होईन काही देवप्रिया मी। पुसे तळमळीने।
सती द्रौपदी दमयन्ती। ती राणी तारामती।
सत्ताधारी धनिकच का हो प्रभूप्रिया असती।
बाहू चौकस चाणाक्ष माझी पोर।
साध्वी झाली जी पुढे जगी थोर।
धन्य झाले मी जन्म सार्थ झाला।
अहिल्येच्या किती सांगू कौतुकाला।।

अन् एक दिवस असा भाग्याचा उगवला की झोपडीतील हे लेणं पेशव्यांच्या प्रसादाने होळकरांच्या प्रासादाला भूषणभूत झालं. ह्या हिरकणीला संस्थानिकाचे कोंदण मिळाले.

पळशीकर गुरुजींची शिष्या, माणकोजी शिंद्यांची सुकन्या मल्हारराव होळकरांची सून झाली हे, अघटित कसं घडलं पहा –

***पद ६ वे***

एके दिवशी मंदिरात (२ वेळा म्हणणे)
आले राघोबा श्रीमंत
संगे होते मल्हार पंत
तसा केला मी नमस्कार
माझी अहिल्या निरखीत होती बड्या पाहुण्यांना
धिटाईने प्रश्न विचारी देत उत्तरांना
बुद्धिवान तेजस्वी लेक बहु आवडे दादांना
होळकरांना म्हणू लागले सून करुन घ्याना
होळकरांना पसंत होती गुणी माझी लेक

दारिद्र्याचा असे मानसी परि किन्तु एक
उणीव कसली आम्ही न ठेवू नका करु चिंता
हौस मौज करु सगळी तुमची शब्दच द्या आता

'उणीव कसली आम्ही न ठेवू, नका करु चिंता' असं आश्वासन बाजीराव पेशव्यांनी मल्हारराव होळकरांना दिलं. अहिल्येचा बाजूने स्वतः पेशवे उभे राहिले आणि पुण्यातच लग्नाचा मोठा थाट उडवून दिला. आपण समक्षच या समारंभात सहभागी होऊ या.

***पद ७ वे***

जाऊ या पुण्य नगरीला। पहाया लग्नाचा सोहळा
छत्रपतींची आली स्वारी। सरदार कुणी येत मानकरी
गुढ्या तोरणे नटली नगरी। जाहला मोद बहु सकला
सजे अहिल्या नवरि साजिरी। रत्न भूषणे वसने भरजरी
लक्ष्मीच ती दिसे गोजिरी। वरितसे खंडेरावाला
मस्तकावरी मंगलाक्षता। शुभ आशीषा देई जनता
वधूवरांनी माळ घालता। नौबती हर्षाने झडल्या
अंबारीमधी बसले वधुवर। झडती चौघडे सनया सुस्वर
पुढती हत्ती घोडेस्वार। बघाया जनसागर जमला
नळे भुईनळे चंद्रज्योती। आकाशामधी बाण उडविती

उंबरठ्यावरचं माप लवंडून लक्ष्मीरूप अहिल्येने होळकरांच्या घरात प्रवेश केला. साऱ्यांना आपल्या सुस्वभावाने तिने जिंकून घेतले. तिचा संसार बहरुन आला. ती त्यांत रंगून गेली. ती वर्णन करते –

***पद ८ वे***

सासरच्या उंबरठ्यावर माप लवंडलं
करुनिया लिंबलोणं उतरलं
कुलशीलवंत धर्मनिष्ठ माझे घर
व्रत पूजा पोथी नित्यनामाचा गजर ।।१।।
मल्हारराव होळकर। खंदे वीर रणशूर। पेशव्यांचे सरदार।
मायाळू मामंजी। अहो माझे मायाळू मामंजी ।।२।।
प्रेमळ गौतमाबाई। निर्मळ ती गंगामाई। सासू नव्हे तीच आई।
लाड करी माझे। अहो बाई लाड करी माझे ।।३।।
आठ वरषाची बाला मी या घरी आले।
वात्सल्याच्या वर्षावाने। भिजूनीया गेले ।।४।।
बारा वरषाने माझी संसारवेल फुले।

मालोजीचा जन्म झाला आईपण आले ।।५।।
मुक्ता येई पोटी मूल। दुसरे उमलले फूल
आजी आजोबांचे। जीव कौतुकी रंगले ।।६ ।।

परंतु हिच्या सुखाला कुणाची तरी दृष्ट लागली. एकामागून एकेक दुःख तिच्यावर आदळू लागली. अन् सोन्याप्रमाणे तिची अग्निपरिक्षाच दैव घेऊ लागले. त्याचे वर्णन ऐकूनच डोळ्याचे पाणीच खळेना.

***पद ९ वे***

काळ तीस वरषाचा। लाभे मला सौभाग्याचा।
तोच जीवनी सुखाचा। उडूनिया गेला।
काळ कैसा उडोनिया गेला ।।७ ।।
सुखामागूनी दुःखाचे। दिवसानंतर रात्रीचे।
चक्र काळाच्या गतीचे। कुणास ना चुकले
काळचक्र कुणास ना चुकले ।।८।।

अचानक कुंभेरीला रणकुंड पेटले. यज्ञवेदीवर खंडेरावाचा बळी गेला. मोठ्या वीरश्रीने लढणारा खंडेराव धारातीर्थी पडला. अहिल्याबाईला ही बातमी कळली. तिच्यावर वज्राघातच झाला. तिने निर्धार केला सती जाण्याचा. ज्याचा संगे संसारात प्रवेश केला त्याच्याच संगे त्याच्याच बरोबर स्वर्गात जावयाचा तिने निश्चय केला. हा संसार तिला असार वाटू लागला. ही बातमी वाऱ्याप्रमाणे सारीकडे पसरली. मल्हाररावांना कळली. मुलाच्या मृत्यूने पोरके झालेला हा म्हातारा एकदमच खचला. धावतच अहिल्येकडे आला. त्यांनी तिला शपथ घातली. तिच्या आधाराची भीक मागितली. त्यांनी तिची विनवणी केली.

***पद १० वे***

थांबवा तयारी सतीच्या सहगमनाची
तू ऐक अहिल्ये विनंती म्हाताऱ्याची ।। धृवपद ।।
ही कुऱ्हाड पडली तुझिया माझ्या माथी
मग म्हाताऱ्याची मोडून गेली काठी
कल्पना तुला का येईल मग दुःखाची ।।१।।
तो दशरथ नृपती येई माझ्या स्मरणी।
तो दिसतो श्रावण जनक माझिया नयनी।
अभिमन्यू मृत्यूने विकल स्थिती पार्थाची ।।२।।
कर्तव्य जयाचे सरले नाही अजूनी।
शोभेल न कोणा सोडूनी जाणे इथूनी।

बालके चिमणी ही आई तू ना त्यांची ।।३।।
वाढवील बाळा सांग तुझ्याविण कोण।
खंडू नि अहिल्या मानित नव्हतो दोन।
गेली ती अहिल्या उरली मूर्त सुताची ।।४।।
गेली का जिजाऊ सति शिवबाची माता।
राहिली मागुनी संभाजीची कांता।
तुज कथा ज्ञात त्या पंडुच्या कुंतीची ।।५।।
शिकविला तुला मी राज्याचा व्यवहार।
मजवरती आता येई दुहेरी भार
जाणीव तुज असो आता कर्तव्याची ।।६।।
तू बुद्धिमान, तू धीर आणि गंभीर।
तू शांत गुणवती, तेजस्विनी तू चतुर।
तू जाउ नको गं शपथ तुला प्राणाची ।।७।।

शेवटी अहिल्याबाईने सती जाण्याचा विचार सोडला. परंतु तिने सतीचं वाण जे घेतलं ते अखेरपर्यंत. मात्र संकटांनी तिचा पाठपुरावा काही सोडला नाही. थोड्याच दिवसांत मल्हारबाबांचे देहावसान झाले. सर्व कमी झाले म्हणून तिचा एकुलता एक पुत्र मालोजी हाही मरण पावला.

परंतु ती मोडली नाही, वाकली नाही, राज्याची धुरा मोठ्या जबाबदारीने पेलून धरली. प्रजेचे पुत्रवत पालन केले. तिच्या शुद्ध आचरणाने आणि तेजस्वी वृत्तीने तिने प्रजेवर विलक्षण छाप पाडली. लोकांना ती देवीच वाटू लागली. तिची नणंद उदाबाई तिच्याच मुलीला तिच्या आईची महती सांगताना म्हणाली -

***पद ११ वे***

अहिल्या माझी दानशूर ज्ञानी
लाभली थोर तुला जननी ।।धृ.।।
मातेवर आजोबांनी प्रेम बहु केले।
लिखित ना कोणा चुकले ते स्वर्गी गेले।
या आघाते तिच्या शिरी जणू पडली सौदामिनी ।।१।।
सुताच्या मृत्युने तिज शोक बहु झाला
तरी विवेके बांध घातला दुःख आवेगाला
सुखदुःखी ती अढळ राहिली कर्तव्या चरणी ।।२।।
राघोबा तव राज्यावरती चाल करुनी आले।

सैन्य स्त्रियांचे पुढे उभे केले।
तिची निशाणे बघता गेले राघोबा शरमुनी ।।३।।
बापू राघोबा गंगोबा तोंडघशी पडले।
परि आईने चातुर्याने सर्वा सावरले।
ती सून करी ठेऊनी ।।४।।
मुलुखात जाहले भिल्लांचे बंड
सिद्ध होताच सुभेदार त्या करावया दंड
सैन्याची तो मदत मागती पत्र तिला लिहूनी ।।५।।
मागील भिल्लांची त्या जाणुनी मागणी
पत्र धाडीले साध्वीने त्या लोक प्रेमानी
भाव त्यातला पाहुनी मोडली बंडाळी तत्क्षणी ।।६।।
प्रेम आदरे पत्र साध्वीचे भिल्ल शिरी धरती।
माउलीस मानूनी गुणगाना करिती
त्या साध्वीचा जयजयकार भरुनी राहिला जगती ।।७।।

सर्व प्रजेची ती देवताच आहे अशी श्रद्धा होती. तिच्या पुण्याईच्या बळावर ती आपणास कोणत्याही संकटातून वाचवू शकेल असा त्यांचा विश्वास होता. एकदा काहीजण काशीला गेले होते. नौकेतून गंगा पार करतांना नावेला अकस्मात छिद्र पडले. सर्वांच्यावर प्राणसंकट आले पण अहिल्याबाई आपणाला या संकटातून वाचवेल म्हणून ते तिचा ईश्वराप्रमाणे धावा करू लागले अन् काय आश्चर्य ! सर्वजणांनी गंगा सुखरुप पार केली.

***पद १२ वे***

नकोस सलीला आत शिरु
तू नकोस गंगे गर्व धरु
अहिल्येची तुज शपथ घालितो
साध्वींचा जयकार करु
अहिल्याकी जय जय बोला, धाव तारी तू बाळाला ।।
अहिल्या सती आमुची माय
महिमा तुजला सांगू काय
साध्वीचे त्या दिव्य तेज बघ बुडती नौका हाकारु ।।१।।
शिवपूजा ती नित्य करी
तो शिव तुझीया असे उरी
त्याच शिवाच्या कृपाप्रसादे फुटक्या नौके जाऊ तरु ।।२।।

पुण्यवान आमुची राणी
कीर्ति नाही का तव कानी
बाळे आम्ही तिची लाडकी तुझ्या रौद्ररुपास डरु ।।३।।
बाळाच्या संकट समयी
स्वस्थ राही का कधी आई
धावत येईल तारील आम्हां विश्वासाने नाम स्मरु ।।४।।

अशी ही पुण्यश्लोक अहिल्या देवी. तिचं जीवन म्हणजे धगधगत्या अग्निशिखेसारखं. अहिल्याबाई अत्यंत वैराग्यशील वृत्तीच्या होत्या. त्या शूर होत्या, चतुर होत्या, दानशूर होत्या. त्यांनी आपल्या सत्कृत्यांनी केवळ व्यक्तिगत पुण्यसंग्रह केला असे नाही तर आपल्या भारतमातेलाही समृद्ध केले, संतुष्ट केले. आपल्या सत्कृत्यांनी त्या अमर झाल्या. पुण्यश्लोक झाल्या. तिच्या चारित्र्यापासून आपल्याला निश्चितच स्फूर्ती मिळू शकते. संकटांना कसे सामोरे जाऊन कसे जीवन जगावे याचा वस्तुपाठच मिळतो आपल्याला अन् सहजपणे आपण म्हणून जातो.

***पद १३ वे***

त्रिभुवनी गाजे तव कीर्ति
दाखवू देवी अहिल्यां सती ।। ध्रुवपद ।।
नरजन्माचे केले सार्थक । तुला भेटला जगदोत्पादक ।
कर्मावरती रत न लिप्तता । तू तर ज्ञानवती ।।
हुरळलीस ना कधि सुखाने । खचलीस ना तू कधि दुःखाने ।
स्थितप्रज्ञता समूर्त झाली । तुझिया रुपे सती ।।२।।
न्यायप्रिय तू राजकारणी । धूर्त चतुर तू मधुरभाषिणी ।
प्रजाजनांची माय खरी तू । वात्सल्या ना मिती ।।३।।
अन्नछत्र मंदिरे विहीरी । दान भूमिचे घाट नदीतीरी ।
केली व्यवस्था देवपूजेची । चोहीकडे तूं सती ।।४।।
कर्णापरि तुज दानशूरता । रिपूस कांपवी तुझी थोरता ।
प्रेम आदरे विनम्र जनता । तुझिया चरणा प्रति ।।५।।
जगलीस हिंदू धर्मासाठी । लढलीस भूमि प्रेमासाठी ।
गौरविला ध्वज भगवा आपुला । गौरविली ही क्षिती ।।६।।
नारिजातीला तू तर भूषण । सदा आठवू त्वदीय सद्गुण ।
तव प्रेमाची उजळो ज्योती । अखंड या भारती ।।७।।

•

# अहिल्याबाईंची आरती

**नरहर शंकर रहाळकर**

आरती जगन्माउलीची । अहिल्या देवी साध्वीची
होळकर वंश दीपिका ती । त्रिखंडी गाती तिची कीर्ति
यन्नाम पूज्य वदनी वदती । सदा ते भवसागर तरती
ओवाळु तिला सद्भावे । न्याय, दया, नीति, स्वभावे
सकल जन-रीति पाळुनी प्रीति,
मिळविली जिने अक्षयीची । जिने ती पहा अक्षयीची ।।आरती ।।

हिमगिरी-बद्रिकेश्वरी ही । रामेश्वरी तेवि पाही
भारती सकल पूज्य स्थानी । बांधिली मंदिरे सतीनी
घातली कितिक अन्नसत्रें । पथिक-मन सतीनी
होत जे भ्रांत । व्हावया शान्त
स्थापिली गृहे परोपरीची। गृहे भव्य परोपरीची ।।आरती ।।

आप-पर भाव क्षुद्र शिवला। नच धर्मकर्मी कधी सतीला
पशु, पक्षी, जीव सकल तिजला । सारखे प्रिय ते साध्वीला
वसुधैव-कुटुंबकम-वृत्ति । राज्यी परि दक्ष
लावूनि लक्ष । आपुला पक्ष
राखिला, धन्य, शूरतेची । सतीच्या धन्य वीरतेची ।।आरती।।

•

## • संस्कृत विभाग •

### अथ अस्याः श्रीमत्या यशादृष्टं श्लाघावर्णनम् ।

**पं. खुशालीराम**

अथ अस्याः श्रीमत्या यथादृष्टं श्लाघावर्णनम् ।
नित्यं सा ददाति दानं देवब्राह्मणपूजकान् ।
कालं व्यतीयति सम्यक् धर्ममार्गपरायणा ।।१।।

कुरुक्षेत्रतीर्थे तुलादानमेवं सुवर्णां रौप्यादिकं वारवारम् ।
अहल्यापि सा संददो दानशीला धरादेवताभ्यो गुणज्ञानशीला ।।२।।

देशे देशे च नित्यं बहुविधमभितो दानमन्नस्य सम्यक् ।
पक्वापक्वं ददत्याः परमपि बहुधा दानमर्थानुरुपम् ।
दारिद्र्यं याचकानां बहुविधमपि यन्निर्गतं तत्प्रसंगाङ्गात् ।
वाङ्च्छाःपूर्णा वभूवुरथ शरणागतानामहल्याभिधायाः ।।३।।

अयोध्यामथुरामायाकांचीकाशीस्थब्राह्मणान् ।
पुष्करस्थान कुरुक्षेत्रद्वारिकाश्रितभूसुरान् ।।४।।

गयाप्रयागरामाद्रि : सुक्षेत्रोत्तमसंश्रितान् ।
जंबूमार्गस्थितांश्चापि ताम्रपर्णीसमाश्रितान् ।।५।।

अवन्तिकास्थितान्विप्रान्पूजयासास सर्वदा ।
तथैव देवतान् साध्वी पूजयामास भक्तितः ।।६।।

स्कन्दं श्रीवेन्कटेशं च श्रीरङ्गमेशमहाप्रभुम् ।
अनन्तशायिनं देवं सेतुरामेश्वरं हरम् ।।७।।

कामनाथं तथोंकारेश्वरं दिव्यं महाप्रभुम् ।
महाकालेश्वरं देवं काशीविश्वेश्वरं प्रभुम् ।।८।।

जगन्नाथं स्वयं दिव्यं तथा च बदरीश्वरम् ।
श्रीमंतकेशवं देवं जंबुमार्गेश्वरं शिवम् ।।९।।

पान्डुरंगविठ्ठलाख्यं गोकर्णेशशिवं तथा ।
गोवर्धनधरं नाथमेकलिंगाभिधं शिवम् ।।१०।।

दुर्गां लम्बोदरं भानुं शिवं नारायणप्रभुम् ।
पूजयामास धर्मज्ञा सर्वत्र प्रतिमामयम् ।।११।।

येषु येषु च देशेषु यद्यत तीर्थसमाश्रितान् ।
श्रीमन्मल्ल्हारिरावस्य स्नुषा धर्मवती च सा ।।१२।।

अहल्या पूजयामास भूसुरान्सर्वदा भुवि ।
भूदानै रत्नदानैश्च ग्रामैर्वर्षासनादिकै ः ।।१३।।

निरन्तरमहादानैनुष्ठानैरनेकधा ।
पारायणैः कथाभिश्च रामनामजपादिभिः ।।१४।।

कृत्वा च जीविकां तेषां वैतनैर्वार्षिकीमथ ।
ब्राह्मणानां चकाराथसमाराधनमुत्तमम् ।।१५।।

तीर्थे तीर्थे च सर्वत्र देवान्देवान्हि भूरिशः ।
प्रेषयामास सत्प्रीत्या वार्षिकं चाप्युपायनम् ।।१६।।

तदाश्रितेषु विप्रेषु पूजापौराणिकेषु च ।
अम्बारामाभिधस्त्वेको वाचया गीष्पतेः समः ।।१७।।

आद्यः पुराणवक्ता यः सर्वशास्त्रावबोधकृत् ।
माधुर्यस्वाक्षरव्यक्तिः पदच्छेदादिसुस्वरः ।।१८।।

स्थैर्यार्थावबोधज्ञो नानायुक्तिविशारदः ।
सुमुखः सुकृतिः स्वच्छो वेदवेदाङ्गपारगः ।।१९।।

असंशयः संशयच्छिन्निरेपक्षो महामना ः ।
ब्रह्मकर्मविशेषज्ञो सर्वधर्मावभासकः ।।२०।।

विस्पष्टमत्भुतं सम्यक् स्पष्टाक्षरपदार्थकृत् ।
कल्पस्वरसमायुक्तो रसभावसमन्वितः ।।२१।।

बोध्यमानः सदाह्यर्थं ग्रन्थार्थ कृत्स्नशः स हि ।
ब्राह्मणादिषु सर्वेषु सदोपकृतिकारकः ।।२२।।

भगवत्परिचर्यायां सक्तो भक्तिमयात्मकः ।
एवं पुराणवक्ता यः साक्षाद्व्यास इवापरः ।।२३।।

अम्बारामाभिधो यस्याः पौराणिकश्च विश्रुतः ।
विश्रुतो देवपूजायामपरश्च सदाशिवः ।।२४।।

भट्टो दयाशुची रम्यः परोपकृतिकारकः ।
मल्ल्हारिश्च महादेवो भट्टो वेदपुराणवित् ।।२५।।

भट्टगोपालनामेति गङ्गाराममनोहरो ।
सखोभट्ट - भटंभट्ट - रामभट्टादयोपरे ।।२६।।

अन्येपि देवपूजायामाश्रिता धर्मतत्पराः ।
वैदिकाः शुद्धकर्मज्ञास्तथा पौराणमांत्रिकाः ।।२७।।

पुराणस्य च श्रोतारस्तथान्येपि बहुश्रुता ः ।
सर्वोपकारकुशला केचित्सौम्या दयापराः ।।२८।।

केचिज्जपन्तः कृष्णेति सदाशिवशिवेति च ।
स्तवपाठकरश्चान्ये भट्टाः पूजनकारकाः ।।२९।।

अन्येपि सर्वतः शुद्धा मान्या विप्रा दयालवः ।
सर्वार्थकुशला दिव्या सदासत्कर्मकारकाः ।।३०।।

ज्योतिःशास्त्रविदः केचित्केचिद्वैद्यचिकित्सकाः ।
धर्मशास्त्रार्थत्त्वज्ञाः केचिन्नानार्थमूचका ।।३१।।

हरिदासास्तथान्ये च गायका विष्णुवल्लभाः ।
सभासदस्तथा ये च नानाज्ञानकथाकराः ।।३२।।

तथान्ये पन्डिता रम्या राज्यभारवहोचिताः ।
यदाश्रिताः प्रकुर्वाणा जनताहितमुत्तमम् ।।३३।।

ख्यातस्तेषां प्रवक्ता यो धर्मतत्त्वं सुधीमताम् ।
सदाचाररतो नित्यं शीलसम्पन्नमानसः ।।३४।।

साक्षात्सहब्रम्हावर्चस्वी पूर्वोक्तो यः पुराणवित् ।
तन्मुखात्सा प्रसन्नाहि कथाशुश्रूषणे रता ।।३५।।

अहल्या सर्वधर्मज्ञा समता सत्सुभासुरा ।
वाङ्मनःकायसंशुद्धा बहुश्रोतृपरायणा ।।३६।।

विष्णौ समर्पिका नित्यं त्रिविधोपात्तकर्मणा ।
जितेंद्रिया च सकलप्राणिनां हि हितैषिणी ।। ३७।।

देव-ब्राह्मणपूजार्हा ब्राह्मणेषु दयापरा ।
सदाचारवती नित्यं विध्युक्तं कर्मकारिणी ।।३८।।

व्यवसायात्मिका धिर्यस्या हि नियमात्मिका ।
युक्ताहारविहारां च युक्तस्वप्नावबोधिका ।।३९।।

सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि ।
दयार्द्रशुद्धभावेन सर्वत्र समदर्शना ।।४०।।

स्वयं श्रीपतिसद्भक्त्या श्रीमद्भागवतामृतम्।
रामायणं पुराणानि महाभारतमेव च ।।४१।।

धर्मशास्त्राणि चान्यानि प्रीत्या श्रुतवती सदा।
कथामृतात्परं लाभं मन्यते नाधिकं हि सा ।।४२।।

श्रद्धाप्रेमविवेकार्द्रा महाभागवती सती।
तस्या मल्ल्हारिरावस्य स्नुषाया गुणकर्मणा ।।४३।।

यंत्रितो रचयिष्यामि ग्रन्थं तन्नामद्योतितम्।
गणेशं गजास्यं सदाविघ्ननाशं
प्रणम्यादिपूज्यं महासिद्धये हम्।
अहल्याभिधां कामधेनुं प्रवक्ष्ये
प्रबंधक्रमाध्यायवत्साभिरामाम् ।।४४।।

श्रीमत्केशवसत्प्रसादसुधिया सच्छास्त्रवक्ता पुरा
भट्टः कौशिकगोत्रजन्मविदितः श्रीभास्कराख्यो ह्यभूत।
तद्व द्वंशे शुभशीलनिष्ठसुतपा यो देवदत्ताभिध -
स्तज्जो जीवनरामनामविदितो भट्टः सदाचारात् ।।४५।।

सम्यक्पुराणवक्तारो तत्पुत्रो प्राणवल्लभो।
खुशालीरामरायोऽ हं लक्ष्मीनाथस्तथापरः ।।४६।।
खुशालीरामरायेण मयार्थ क्रियते मुदा।
अहल्याकामधेन्वाख्यः सद्ग्रन्थो निर्णयात्मकः ।।४७।।

•

## श्रीदेव्यहिल्याष्टकम् ।

### पं. गजाननशास्त्री करमेलकर, काव्यतीर्थ

यस्याःपुण्ये दिनेऽस्मिन् स्मृतिपथपतिते भक्तिरुत्पद्यते नः,
यन्नामोच्चारणेन प्रचुरनरवरा नष्टपापा भवन्ति।
अस्माभिःसर्वलोकैर्धृतकरकुसुमैः पूज्यते याऽद्य सम्यक्,
सद्वन्द्या देव्यहिल्या जयति भुवि सदा सत्यासक्ता सती सा।

२

पुण्यक्षेत्रेषु घट्टान् स्नपनविधिसुखान् भारतेस्मिन् व्यधाद्या,
जीवत्यद्याऽपि लोके प्रथितगुणगणा कीर्तिकायेन याऽस्मिन्।
पान्थानां वासहेतोःसपदि खलु यया निर्मिता धर्मशालाः,
सद्वन्द्या देव्यहिल्या जयति भुवि सदा सत्यासक्ता सती सा।

३

स्वाचारे श्रद्धधाना ह्यवददिति च या ब्राह्मणो दैवतं मे,
भक्त्या याऽभोजयत्तं धनपटपटलैःसादरं पूजयित्वा।
दुष्कार्ये राज्यकार्ये विमलपटुमतिं मन्त्रिणं याऽकरोत्तम्,
सद्वन्द्या देव्यहिल्या जयति भुवि सदा सत्यासक्ता सती सा।

४

सन्तोषःस्वप्रजानां भवति बहुमुदे श्रेयसे राज्यकर्तुः,
इत्येवं राज्यसारं निजमनसि चिरं स्थापयित्वा प्रमोदात्।
स्वापत्यान्निर्विशेषं स्थविरयुवशिशुस्वप्रजा या ह्यरक्षत्,
सद्वन्द्या देव्यहिल्या जयति भुवि सदा सत्यासक्ता सती सा।

५

नोभुक्तं जातु नित्यामतुलसुखखनिं शैवपूजां विहाय,
दुर्वाक्यैःशल्यतुल्यैर्जगति न च यया कोऽपि जीवःक्षतोऽभूत्।

मित्रे पुत्रेऽपि शत्रौ च्युतविनयपथे तीक्ष्णदण्डाऽभवद्या,
सद्वन्द्या देव्यहिल्या जयति भुवि सदा सत्यासक्ता सती सा।

६

क्षुत्तृड्दैन्यार्तलोकान्निजनयनगतानन्ननीरार्थदानैः,
सन्तुष्टान् संविधातुं विहितबहुदया यत्नवत्याशु योऽऽसीत्।
नूनं पुंसोऽपि राज्याभिधशकटमिदं दुर्वहं या दधौ स्त्री,
सद्वन्द्या देव्यहिल्या जयति भुवि सदा सत्यासक्ता सती सा।

७

कान्तापुत्रासवर्गैःसह भुवि विलसन्नित्यमज्ञातदुःखः,
श्रीमान् भूपस्तुकोजी नरमणिरमले यत्कुले सम्प्रसूतः।
यस्याःपुण्येकलेशादिह सकलसुखं सेवते स्म स्वराज्यम्,
सद्वन्द्या देव्यहिल्या जयति भुवि सदा सत्यासक्ता सती सा।

८

सर्वश्रेयःप्रदश्रीहरिपदगतये साधनश्रेष्ठतम्,
देहं मानुष्यमेत्य स्वकृतसुकृतजं नैजकर्तव्यदक्षा।
मूर्त्या वाचा हृदा या पर इह सुखदं रामदेवं सिषेवे,
सद्वन्द्या देव्यहिल्या जयति भुवि सदा सत्यासक्ता सती सा।

•

# अहिल्या राजयोगिनी

**महामहोपाध्याय डॉ. प्र. ना. कवठेकर**

जन्मना मानुषी जाता कर्मणा राजयोगिनी ।
देवी धर्मेण लोकानां लोकमाता हि पालनात् ।।१।।
अहिल्या-समये देश संङ्घर्षोऽग्रिरजायत।
अस्यास्तु राज्ये शांतिं तु सर्वत्रान्वभवत् प्रजा ।।२।।
स्वजीवने दुःखितापि सुखं लोकाय सा ददौ।
विषं पीत्वाप्यतं शितिकण्ठरता ददौ ।।३।।
राज्यस्येकाधिकारेऽपि न राज्ञीव विलासिनी।
हस्ते राजदण्डोऽस्ति हृदि संन्यास भावना ।।४।।
धनं राज्यस्य लोकार्थं स्वीयं धर्मार्थ मेव सा।
व्ययेऽपि लोक कल्याणं पश्यन्ति समदर्शिनी ।।५।
सुखं मरुजलप्रायं दुःख मेरूसमं हृदि।
तयोरभावमानन्दं भवपादे तु साप्नुवत् ।।६।।
स्वगृहे दुःखसन्तापता परेषां गृह शान्तिदा।
वह्निना दह्यमानापि शमीव ननु शीतला ।।७।।
पुत्रशोकार्णवे मग्ना स्वामिना पीडिता यदा।
तदास्मिता-रक्षणार्थं शस्त्रं धृत्वा रणे स्थिता ।।८।।
लौकिकं जीवनं तस्या अलौकिकम् भूदहि।
सर्वाधिकारिणी सापि सर्वत्यागं परा बभौ ।।९।।
छात्राणां विषयाशक्तिः, न जनानां तु जीवने।
सुरासक्तिर्देव पूजायां, न प्रजानां तु जीवने ।।१०।।
देवमन्दिर शृंगारे तीक्ष्णता न प्रशासने।
नर्मदा वीचिषु दृष्टं चाञ्वल्यं न प्रजाजने ।।११।।
दानादस्याः करे दृष्टा चिरकालं जलार्द्रता।
याजकेष्वपि तुष्टेषु हृदि नित्यदयार्द्रता ।।१२।।

•

## श्रीअहिल्याप्रशस्तिः

### पं. गजाननशास्त्री करमेलकर, काव्यतीर्थ

वंशं होलकरं प्रविश्य प्रथितं मल्हारिराजस्नुषा,
पूतं तं विविधैःसुकर्मनिकरैः संभासयन्ती मुदा।
स्वाचारे दृढभक्तिरच्युतमहादेवार्चने यंसती,
श्रीकैलासगताऽपि कीर्तिवपुषा सा राजते नःपुरे।

२

यस्याःपुण्यपयोधिबिन्दुशकलं पीत्वा सदा प्रेमतः,
नष्टप्लुष्टसुतुष्टदुष्टकलुषस्वान्ता प्रफुल्लाननाः।
राज्यं चक्रुरिमे तदीयकुलजा भूपाःसमस्ताश्चिरम्,
श्रीकैलासगताऽपि कीर्तिवपुषा सा भासते नःपुरे।

३

स्त्रीजातिप्रभवाऽबलापि सबला धैर्य्याद्धुरैकाकिनी,
निर्भीका सततं स्वराज्यशकटं संचलयन्ती मुदा।
एनां भाययितुं कुलेखनिपुणान् राज्ञस्तदानीन्तनान्,
चातुर्योत्तरदानतो हतबलान् सद्यो व्यधाद्या सती।

४

रम्ये भारतभूतले क्व विषये क्षेत्रे क्व वा सुस्थले,
देव्याःसन्ति कियन्ति लोकहितकृत्कार्याणि धर्म्याण्यहो।
इत्यन्वेषणकारितत्कुलनृपैर्नालभ्यते तन्द्गतिः,
पुण्यानां महिमा सदा विजयते केनाऽपि न ज्ञायते।

५

न श्रान्ता ह्यजरावराऽप्यतिधरा यत्कीर्तिहंसी कदा,
यन्नाम प्रयतं निहन्ति सकलं पापं सकृत्संस्मृतम्।
यन्मूर्तिःखलु चन्द्रिका नयनयोर्हृच्चन्द्रकान्तद्रवे,
सा देवी भवतात्समस्तजनताक्षेमाय नित्यं भुवि।

६

राजन्ती निजधर्मकृत्ययशसा सत्क्षेत्रवभ्दारते,
नित्यं शंङ्करपूजनं विदधती श्रीदेव्यहिल्या सती।
लोकानां हितमिच्छते निजकुलेऽलंकारभूताय ते,
साप्त श्रीयशवन्तराव नृपते ! भूयात्सदा श्रेयसे।

•

# अहिल्या प्रतिज्ञा
# (स्त्रग्धरा छन्दसि)

**शैलेन्द्रनाथ पाठक**

मुक्ता मुक्ता प्रमेयं विलसति पुरतो -
यो हि दस्यून् विहन्यात्
सोऽस्याः पाणि-ग्रहीता भुवि मम भविता,
पूज्य-पादः प्रवीरः
राज्ये शान्ति-प्रसारो यदि भवति तदा
सौख्य-सारं स्वकीयं
नित्यं मन्ये प्रजयाः सुखमय-चरित्ते-
घोषणेयं मदीया

•

## • ENGLISH SECTION •

# AHALYA BAEE

### Joanna Baillie

This is an abstract from Joanna Baillie's 700 line long poem Ahalya Baee (Published in London, 1849). This episode depicts how Mukta Bai (Ahilya's only daughter) is determined to perform Sati. Ahilya's agruments went in vain. For the readers' convenience we have introduced the speakers names here, which are not in the original text. The last portion deals with Ahilya Bai's death and her greatness, for all times to come.

**For thirty years her reign of peace,**
**The land in blessings did increase**
**And she was blessed by every tounge**
**By stern and gentle, old and young.**

Mukta : "O Mother, do not grieve me so,
My lot is cast, and I must go.
Shall Jeswant Rao, my noble mate,
On Pyre be laid in lonely state,

While I, who was the only flower
He watched and cherished in his bower
A craven wife shall from the brink
Of love's last trial meanly shrink?

Forbid it Brahma, Lord above!
Forbid it faithfulness and love!"

Ahilya : "And dost thou think that Brahma's will
I did not righteously fulfil.

When I, bereft and sad, did strive
Thy noble father to survive?
And was not his high blessing poured
On one so severed from her Lord?

And characters, distinct and fair,
Did his approval will declare,
When flourishing beneath my sway
My people and my kingdom lay.

Yes; though a widow, so bereft,
My heart had other blessings left,

But still, as celled within my breast,
Thou wert my dearest and my best;

Thou wert as my own youngling still,
Who didst my first affections fill,
And wilt thou leave me sad and lone?
How shall I live when thou art gone?

Whom shall I fondly love and trust?
O, do not bow me to the dust!''
Mukta : ''O no! committed to thy care,
Thou hast thy children everywhere,

Their daily benefits will be
The comfort Brahma sends to thee.
And, dearest Mother! thou art old -
Thy grains of life will soon be told;

And what to me will then remain!
My lost will never return again!
I through these lonely rooms shall roam
A living thing, whose heart hath with the dead its home.

Then, best and dearest, to my passion bend,
And let my sorrows have an honoured end.''

Ahilya : ''An honoured end will close her life,
Who was a good and faithful wife;

Die when she will, funeral flame
Gives but a fruitless fleeting fame''

Mukta : ''I seek not fame, O say not so!
O, add not agony to woe!

Life would be death to me, and worse:
The inward working of remorse
Would make my day as darkness seem,
My haunted night a fearful dream.

For then he would be ever near,
And his upbraiding eyes appear
To glare upon a wife, whose love
Could not one moment rise above.

Base fears, but from her last sad duty started
And left his lonely bier unhonoured and deserted.''
All interchange of words were vain -
The Ranie answered not again;

But long fixed looks of anguish fell
Upon her Daughter's face, and well
Spoke that which language could not tell;
While actions too did piteously entreat
The Mother kneeling at her Daughter's feet:

But all in vain; nought may arrest
The purpose of her wounded breast.
The parent bent her to the cruel blow,
And left the dismal chamber sad and slow,

And, closely shut within her secret bower,
With humble penitence and prayer
Did her afflicted soul prepare
For the approaching, dreadful hour:

Her prayers were heard, and mercy gave
A stinted strength the dreadful hour to brave.
That hour is come; and from the palace - gate
There issues forth, in melancholy state,

A gorgeous pageant - Standards borne on high,
Moved by the fanning air, arrest the eye,
On which devices, traced in colours gay
Emblems of ranks and races make display.

First portly Brahmins, sombre and profound,
Walk, loosely robed, with eyes cast on the ground.
Next turbaned chiefs, with fierce and warlike mien.
Cinctured with shawls and flashing arms are seen;

Then high authorities, the lettered scribe,
And missioned men from many a different tribe,
Move slowly on, all ranged in sad array,
Proceeding on their mournful destined way.

With heavy steps, that from the ground,
Send up a muffled sullen sound.
Then doth from portal-arch appear,
Circled by friends, the stately bier,

On which the princely corpse[1] is laid,
In rich and splendid robes arrayed.
Whose features, like to chisled stone,
Do still an awful beauty own;

---

1. Dead body of Yeshwantrao (Mukta's husband)

The crowd on him intently gaze
And deeply murmur words in praise.
Anon they drop their eyes to find
The youthful Widow, close behind.

She moved with brow and step sedate,
As one who of her lifeless mate
Alone had conscious thoughts, and she
Worthy appeared his mate to be,

But when by priestly Brahmins stern and strong
They saw their own loved Ahilya led along
On her at once all eager eyes were turned
And grateful sympathy within each bosom burned,

Their inward sorrow broke through all restraint
And all round a loud and mingled wailing sent
Now onward as the long procession goes,
A different mournful harmony arose.

From many instruments, whose mingled sound
Is floating on the air and rising from the ground.
But when it reached the fatal spot,
All soft excitement was forgot;

A deep and solemn pause ensued,
Silence with strange mysterious awe embued.
Alas! what measured words can tell
The anguish of the last farewell?

When that young Widow with that Mother parted
From the intense embrance the younger started.
As if afraid, Her failing steps sustained,
The bier of death she has already gained

Hath on her lap with gentle kindness placed,
The lifeless head, and its cold form embraced.
To the heaped pile the torch hath been applied.
And from between the faggots are descried.

Pale curving streams of smoke, that wind and sweep,
Coil and uncoil, like serpents waked from sleep,
Then broadening and ascending hang on high,
A dusky, fearful canopy;

While pointed tongues of flames below
Burst forth; and soon one general glow
Involves in fierce consuming fire,
Roaring and red, the funeral pyre.

Then drum and trumpet, cymbal, gong
And stringed viols, harsh and strong,
Discordant minstrelsy, begin
To raise a loud and deafening din:

While faintly comes to fancy's ear
Shrieks from the burning bier
Aye, there are dismal shrieks, I wot,
But from the flames proceeding not.

It is Ahalya in despair,
And beats her breast tears her hair
Who, though by friendly force restrained
Convulsively hath freedom gained,

Her gnashing teeth and bleeding hand;
Too plainly show that self-command
Is from her princely spirit taken,
Of all its wonted power forsaken.

And pause we hear! That noble mind
To dull unconsciousness was for a while consigned.
Good heavens all merciful and potent Lord
To health of mind the Ranie soon restored.

She raised again her drooping head:
From Him received, as from the dead
The people saw their noble Dame,
And bade her hail with loud and long acclaim.

Still wasteful war, though raging round,
Within her precincts was not found
The husband man scarce turned his ear
Some far-off tale of blood to hear,

How bandits, on the distant border
With bandits strove in wild disorder;
Where sordid chiefs to robbers turned
Made might their right and justice spurned.

What cares her for their ceaseless coil?
She lives and reigns who will protect his toil.
In sooth, over all the watch she kept,
And waked, and thought, when others slept.

When early dawn appeared she rose,
Nor longer would indulge repose,
But to herself (for she could read)
Grave books perused. Then would succeed.

Hours of reflection and of prayer
That cleared her mind and soothed her care;
And oft her day, so well begun,
An easy, prosperous course would run,

Herself sagacious, firm and just,
She put in others generous trust;
And when their merit well was proved,
Her ministers she never removed.

With all the Rajahs powers of every Nation,
From time to time; she held communication.
Could points of policy with art contest,
But ever loved the simple method best.

And in good sooth, to reason cool,
The simplest was the wisest rule.
For who would venture to gainsay
Or doubt the faith of Ahalya Baee?

To death at last the missioned power was given
To call her hence: her earthly ties were riven
Through all the land a woeful wailing went
From cot to cot, from town to village sent;

A tender woe, like which there is no other
Bereaved children weeping for a mother.
Her life and reign were closed in glory,
And thus concludes my Legend's faithful story.

For thirty years - her reign of peace
The land in blessings did increase:
And she was blessed by every tongue,
By stern and gentle, old and young.

And where her works of love remain
On mountain pass, on hill or plain,
There stops the traveller a while,
And eyes it with a mournful smile,
With muttering lips, that seems to say,
THIS WAS THE WORK OF AHALYA BAEE

The learned sage, who loves to muse,
And many a linked thought pursues,
Says to himself, and heaves a sigh
For things to come and things gone by.

“O! that our restless chiefs, by misery schooled,
Would rule their state as that brave woman ruled.

Yea, even children at their mother’s feet,
Are taught such homely rhyming to repeat;

“In better days from Brahma came,
To rule our land, a noble Dame;
Kind was her heart, and bright her fame,
*AND* AHALYA WAS HER HONOURED NAME!

•

## In Ahilya's Pious Memorium

### R. R. Dwiwedi

Born Devi Ahilya the pious queen,
To make the Holkar garden green;
She made "Bharatvarsha" to say -
The time was golden in Her day.

She was generous, brave, and wise,
A precious jewel, above all prize;
Such truly, just, and noble queen,
Was never before in India seen.

When the country gloomy, weary, and dark,
With fierce strives was full to the mark;
Several battles raged in the plain,
She firmly held Her Kingdom's reign.

The ancient sacred Somnath-shrine,
Was repaired by this Heart Divine;
This famous queen of Holkar's race,
Has left her foot-prints all to trace.

To do good, ever just and right,
And tread the virtuous parth day and night;
Thus easily our boats we can sail,
Now merrily let us Devi Ahilya hail.

•

## A Limerick in Praise of Devi Shri Ahilya

**Nandlal D. Datta**

"There was a noble Maharani of Indore,
Qualities and reputation of a deity she bore,
Her name is sung as Goddess Ahilya,
From Cape Comorin to Mount Himalaya,
She has left an immortal name to adore,
Qualities and reputation of a deity she bore".

## An ode to Devi Ahilyabai

**S. K. Deo**

Oh! Holy Ahilya Devi!
We pay humble respects to thee

Thy glorious name Oh! Dame,
Has hallowed womanhood's fame,
O! Daughter of India worthy

The birds on the harvest twitter,
Thy feast makes them sing sweeter,
They thank thy bounty in glee!

Thy hospitable hands unseen,
Still feed the famished and lean
Immortal is thy charity!

The Ganges thou mad'st holier
By sending to bathe Rameshwar,
How wonderful thy piety!

The Himalaya raises its crown,
To look at thy lofty renown,
And reflects thy hoary glory!

•

# Devi Ahilya

### C. A. Dobson

With praise for Her Holiness evermore famed
Ahilya Bai : Ahilya Bai:
Blessed in this iron Age, through all the world famed
Ahilya Bai : Ahilya Bai:

A woman all virtue was ever our Queen,
A gem of the purest of splendours serene,
Like a diamond mine was she mid the rest,
Yet the simplest of words still describe her the best ll 1 ll

No sin ever dared in presence to stay,
When the full moon appears can the darkness delay?
Diseases found remedy; how could it be
But that all that was evil before her should flee? ll 2 ll

Blest Lakshmi smiled favour on Holkar's famed house
When Ahilya Bai came as Royalty's spouse
How, in strain that a - down the long ages shall ring
Her name and her fame shall the great sages sing ll 3 ll

Her house-hold from earth-clinging bonds she set free,
She moulded her life as willed it to be,
The poor man with other brothers, found rest,
Where she ruled as a Mother, Maheshwar the blest ll 4 ll

The Brahmins each day on charity fed;
The Purans she heard, with deep interest, read;
And gay are the shrines with Brahmins array,
As oblations they throw on the flames, while they pray ll 5 ll

Votive Lingums in crores in her day were prepared
Bride and bridegroom processions their constantly fared;
Orphan children, scarce knew that their parents were dead
So well were they nourished, with milk so well fed ll 6 ll

When the auspices claimed it, her charity grew,
And the cows she bestowed gained her merit anew
While the chaplet of beads that her hands ever held
The count of her virtues as constantly spelled ll 7 ll

How much can I say of her works and her worth?
Wherever a sacred spot lies on the earth.
Count the shelters for saints and the poor that then rose
Where the sick man found healing, the naked found clothes ll 8 ll

Full many she helped for the worship of fire
And the Brahmins were filled to their spirits desire
While the water her feet sanctified was the mead
That the others in crowds took according to need ll 9 ll

Only then did this Queen to her own food repair
To her still rooms retreating, aloft, up the stair,
When her household content let her think it was right
Ever she chanted the praise of Shri Rama at night ll 10 ll

To the pilgrims way-worn she gave garments and shoes
With nicely her gifts for their needs did she choose
While singers got necklets and bracelets of gold,
The rogue and the thief were kept fettered in hold, ll 11 ll

By the soul cleansing streams, bathing stages were reared
And the shrines of great Shiva in hundreds appeared,
Where the water drops fell on His symbol of power.
From vessels of earthen ware, hour to hour ll 12 ll

Cool water the thirst-tortured traveller receives,
Where the groove of green mango his eye sight relieves,
Though the wilderness stretch around dusty and dry
Our good Queen has brought him this comfort a nigh ll 13 ll

When the sun or moon omnious dark in eclipse
She multiplies charity, not a chance slips,
She is weighed against till seed of silver, or gold
That the cup of her merit its fullest should hold ll 14 ll

To the pilgrim her escorts grant, progress in peace.
From Ganges so far Rameshwaram ne'er cease
The prayerful train who the blest waters bear;
To the shrine of great Shiva who awaits them, they fare ll 15 ll

So living on earth, what of earth did she seek?
All her cravings extinguished, what more need I speak.
To the height of attainment her spirit has soared;
In the hearts of people she dwells adored ll 16 ll

•

## Adoring Mata Ahilya

### Sharad Lalge

1

Who! Ahilya is, Yes our Mother!
Most powerful of Holkar-race
Even to elder, ever soother
So alluring drawing face!

Notwithstanding they revere
I with her garland favour

With this and above oysters
Entwined sprayed perfumed in

Silvery white may not within
Bestow beneath feet to steer.

2

Spread diffuse O so widely
Showing not as queen mother
Just desirous to be glidely
But uprightly why I bother!

No less than deity all strike
Thy act of coming into life.

A farmer's village; house so!
O how shown appropriately
Whom discern such a mood O!
Son's bride so proximately!

3

Who Malhar Rao's shaky shadowed son
A soothsayer then said :
"Would spring great warrior-one"
Sword Master as founder paid

What not to a great dynasty!
Entrusting stately weight to piety

Hindered Khanderao Her husband
Who warworn fatal; Oh her fate!
Magnanimous woman of high rate
Liked to keep all shunned.

4

Raghoba discerned with large army
Abruptly his messsenger seen around
“A woman so to sway say not foamy
Shallow water aye murmuring sound”

“Say would loose by female hand
Pages would spit on him
A vast quantity of writing-ream
Hearing this reposing did stand”.

5

“Personally to see sheathing sword
With army large! Oh uttering lie”
Personage great heard words
Wondered roared “So high”.

A character of pearled queen
Such spirit couldn’t be seen

Featly faced with rebellions
Making dominion calm, quiet
Language sweet, short, straight
Reforming ruling hearty millions.

6

Miseries to Her yet mystical to all
To Anandibai, Chandrawat of Udaipur
Subordinate showed at Her call
Such was queen of Indore.

Learned and artisans were held
Her daily act never failed.

Queen as such delighted flown
Having wealth outer-inner
Loving to all Oh refiner
Cater yet living as deity shown.

•

## A Homage to Devi Ahilya Bai

**Dr. N. G. Kale**

Born of a humble, rustic parentage,
Ahilya made her way to Royal Lineage,
A girl of eight, wedded to Khande Rao, the brave,
Unknown the path of glory, that led to the grave,

Subedar Malhar Rao, moulded her in his own way,
'Doulat' and 'Khasgi', she handled in full sway,
Alas! Khande Rao lost his life, in the prime of youth,
'Don't end your life' urged Subedar for sooth,

'Friend, philosopher and guide' also left her behind,
Prince Male Rao too, snatched by the Fate Unkind!
The only hope Mukta Bai gave her some solace,
Her little child, Nathyaba prattled in the palace

His blossoming bud also, nipped by a fatal disease,
''Yeshwant Rao followed the son, only woe to increase,
Appeals went in vain, to stop, the Sati Mukta Bai,
All parted one by one, thus bereaved Ahilya Bai!

'A Negative Capability' made her firm and strong,
Her thirty years of reign, smoothly sailed, along.
Day and night, her subjects, the 'Mother' cared,
Thirsty Oxen, hungry birds and fish she reared,

Well secured her kingdom, Lord Brahma's Legacy
'Service to people is Service to God' was her only policy!
Rulers have come, but stayed long never,
The revered name of AHILYA, will go forever!!

•

## Mystical Ahilya

**Sharad Lalge**

1

As Heart, the Colour - hue
Where O hoisted blessed!
Pivot position holding Indore
On highway at Centre placed.

2

How other colours mingled
With National hearty anthem!
Malhar's flag flapping wings
What O showing aim!

3

Facing it people see what?
Ahilya's Monochord does stand
How moving feelings of
Hard hearted bastard brand.

4

Placing top at top Palace
High up so face
All passerby pay homage
And fetch admitting solace.

5

Her act of first discerning
Finds in His gifted land
Malhar Rao amazing her forehead
Accepts son's bride so grand.

6

Raghoba reposing personally knelt
High character so seen better!
In verbal utterance! sages pilgrims
Visit temples thither scattered.

7

Performing ablation utter name
Devi Ahilya say deity shown
How pearled queen delighted as
Having motherly heart flown!

8

To get pearls made one to dazzle
How could spare other leaving
Holding to step short, sought
Swing sacred goodly thing!

9

Judging shown high intelligence
Money monger in case adoption
Reforming displayed high character
Telling tales of fabled affection.

10

On Ahilya that thou won
Hearts of Millions and shall
Conduct mystical ever living
Rating magnanimous before all.

•

## The Devi

**K. C. Holkar, Indore**

Born in the year seventeen twenty five
Was a 'femme' who for the poor would strive
A pious and a very holy lady,
To help the needy she always was ready.

Justice was metted out on equal ground,
Whenever she had the judicial round
She served the Lord in words and deeds
Serving the masses and fulfilling their needs.

Bestowed a blessing, she has on the great city of Indore
Due to which the prices there never soar,
She helped the people when they needed her most
While today for help we have to run from pillar to post.

The tradition of her greatness is preserved by every holy city
And at her anniversary there is fun, frolic and gaiety,
At last she breathed her last in seventeen ninety five
But her memory in our minds will always thrive.

I pay my respects to 'DEVI' through this poem of mine
For her blessing' and vision, I always will pine!

•

## Ahilyabai's Greatness

**Deepa Rupsh Kale**

Pleasure or pain, for Ahilyabai duty was first,
Her life was busy, from early dawn to midnight,
Devoted to her Gods and the people's welfare,
While others slept, she kept waking with care.

Her life was holy and character chaste,
Justice Free, Fair and Fast, with no time waste.
She feared the God, the Supreme Almighty,
All her works honest and full of piety.

She ruled in the name of Lord Shiv Shankar,
Built temples, ghats, wells in every corner,
Her motto was 'Service to people, is service to God'
She protected the innocent and punished the fraud.


Worthy poets and notable writers, she praised,
Cows, fishes and birds she well nourished.
Heaps of misfortunes fell on her head,
Yet she remained calm and a balance held.

She lost many a dear ones and near ones,
But complaints to God, she never made once.
She was well known, even in the Western world,
She was saluted by French Dudernaic and American Boyd.

Sir John Malcolm and Joanna Baillie of London,
All around the globe, they made her - Known.

•

## भाग तीन



# स्वातंत्र्यवीर यशवंतराव होळकर यांजवरील काव्य

**खंड नऊ : भाग तीन**

# होळकर रियासत : काव्यायन

**स्वातंत्र्यवीर यशवंतराव होळकर**
**यांजवरील काव्य**

**Volume Nine : Part Three**

# Holkar Riyasat : Kavyayan

**Swatantrayaveer Yashwantrao**
**Holkar Yanjvaril Kavya**

## पूर्व प्रकाशन

- *वीरश्रेष्ठ यशवंतराव होळकर (पोवाडा)* इ. स. १९६७
  शाहीर अमरशेख
- *मालव-केशरी यशवंतराव होळकर यांचा पोवाडा* इ. स. १९४३
  शाहीर खाडिलकर
- *रणकीर्ती यशवंताची* इ. स. १९३५
  दु. आ. तिवारी

# अ नु क्र म णि का


- **वीरश्रेष्ठ यशवंतराव होळकर (पोवाडा)** ३१४
  शाहीर अमरशेख
- **मालव–केशरी यशवंतराव होळकर यांचा पोवाडा** ३४२
  शाहीर खाडिलकर
- **रणकीर्ती यशवंताची** ३५०
  दु. आ. तिवारी
- **स्वातंत्र्यवीर यशवंतराव होळकरांचा पाळणा** ३५३
  रामभाऊ लांडे
- **यशवंत गाथा** ३५६
  घनश्याम होळकर
- **संपादक परिचय** ३५७

# वीरश्रेष्ठ यशवंतराव होळकर

## (पोवाडा)

### शाहीर अमरशेख

स्वातंत्र्यसूर्य मावळत होता मराठ्यांचा
वठुं लागे कल्पतरु तोरा कुसळ सराट्यांचा
सुळ्सुळाट् झाला होता मराठ्यांत नरुट्यांचा
होता काळ षंढ बावळट लाळघोट्यांचा
घुबडांचे घुत्कार नि कलकलाट कोल्ह्यांचा
अशा भयाण भीषण काळीं
पुनः तळपली भवानि माउली
झाला थरकांप हिंदद्वेष्ट्यांचा, गोऱ्या सायबांचा ।। जी जी जी ।।
गेली गेली मराठेशाहि गेली जरी विलयाला
तशी आली पेशवाई तरारत उदयाला
कटकेलाच नव्हे अटकेला झेंडा भिडविला
असा धाक दरारा साऱ्या हिंद देशाला
झगमगत होता कीर्तीचा चांद गगनाला
चंद्राला डाग लागला
क्षय पण झाला, ग्रहण खग्रास
लागले होते पूर्ण चंद्राला, घरं काळजाला ।। जी जी जी ।।

**चाल : बदल – येशीला काढुन बाहेर – तानाजी**

नवसानं पोरगं व्हावं
बोल गोड बोबडं गावं
रांऽगता रांगता थांबावं अन्
दुडूदुडू धावतच यावं
असं खेळ कौवतिकाचं व्हावं
गावाला याड लावावं
कृष्णानं शिवबारूप व्हावं
खानांत कंस हेरावं
त्याचं आतडं त्यानि काढावं

त्याच्या गळ्यांत अडकवुन द्यावं
संताजी धनाजि कधि व्हावं
शत्रूचं कळस कापावं
घोड्यानं पाणी पिया जावं
पाणी पितां पितां बिचकावं
'बुर्गि' यलो मेलो ओरडावं
बंगालचं नरडं कोरडावं

**चाल : बदल – परकी स्त्री माना माता (शिवाजी)**
संभाजी भरत भासावा
वाघाचा जबडा लीलया उचकटुनि द्यावा ।। जी जी जी ।।
तसा रावचिमणाजी बावा
लिस्बनच्या गोऱ्याचा चड्डिपट्टा ढिला व्हावा ।। जी जी जी ।।

**चाल : तीच काडतुसे पिस्तुलही ते (उद्धमसिंग पोवाडा)**
'बाजीरावाचा विडा रंगला मस्तानी हाती'
इष्कबाजिचा विडा उचलि रणमैदानावरती ।। जी जी जी ।।
इष्कामधला जोष आगळा मराठ्यांत होता
इष्काच्या धुंदीत गातसे स्वराज्य संगीता ।। जी जी जी ।।

**चाल : चढती**
मराठ्याला वेड देशाचं
लढाईपेशाचं, कैक वर्षाचं
धडक सह्याद्रि देत होता
खडकातुन झरे इष्क–सरिता
थके शाहीर गाता गाता हा ।। जी जी जी ।।

**चाल : संभाजी भरत..**
शौर्याचं पवाडं गावं
शाहिरी धर्माचं आम्ही
इमान राखावं ।। जी जी जी ।।

जनमानसास रिझवावं
गंगौघ शूर वीरांचं
रणीं लोटावं ।। जी जी जी ।।
शत्रूनं अचानक यावं
आपसूक डफ तुणतुणे
पाठी बिलगावं ।। जी जी जी ।।
पाठ सोडून ढालीनं यावं
कमरेच्या तलवारिनं वैरि
रक्तानं न्हावं ।। जी जी जी ।।
दहा वैरि आधीं छाटावं
अकरावं आलंच तर हसत
देशासाठिं जावं ।। जी जी जी ।।

**चाल : चढती – पुढं दांगटी..**

शाहीराचं भाग्य होतं मोठं
सांगत न्हाई खोटं, शाहिर कुठं कुठं
भिडत होता दऱ्याकपारीला
जरी दारिद्र्य पांचवीला
भाकरन् कांदा प्यार त्याला
मराठी इनाम पाठीला
राजानं इनाम देउ केला
कडे तोडाचं पदक त्याला
''इनाम जहागीर नको मजला
सुईदोऱ्याला औक्ष बोला''
दरबारांत सांगे पेशव्याला
''हिऱ्यापोटिं गारगोटि झाला''
स्वार्थ लवलेश नाहि कसला
पवाडा लोक कल्याणाला

**चाल : बाजीरावाचा विडा..**

याच पवाड्याचं राखिन माझं राज्य मराठ्यांचं
खुरपुन काढिन रान माजलं कुसळ सराट्यांचं ।।

आली लावणी तर दावणी बांधुनी घालिन मी चारा
आला वीर रण गाजवून तर घाल म्हणिन वारा ।।
कशासाठी हो वीर शोधाया आम्ही दूर 'जावं'?
महाराष्ट्रातून गवत पाल्यागत वीरच उगवावं ।।
देशास्तव ज्या तृणपात्यांची शिरं उडायाची
त्या वीरावर लावणीराणिची प्रीत जडायाची ।।

**चाल : चढती – पुढं दांगटी..**

अशि लावणी सेवारत बसली
वीरासंगं हंसली–राजाला दिसली
न्हेलं त्यानं उचलुन लावणीला
बांधलं बघा आपल्याच दावनीला
आतुन राजवाडा बंद केला
केलि सुरुवात हैदोसाला
सिमा न्हाई ऱ्हाइली विलासाला
नको ते आलं नशीबाला
फंदफितुरीनं कहर केला
विश्वासच हद्दपार झाला
हद्दिवर तोफखाना आला
तोफेचा गडगडाट झाला
जाग आलि शनवार वाड्याला
दार उघडता धस्का बसला
थवा माकडांचा दाट दिसला
मरण उभं इलाजच खुटला
दरदरुन धाम की रं सुटला रं ।। सांगु काय दादा ।।

**चाल : बाजीरावाचा विडा..**

हाती कोलितं टोपडि इंग्रजी सिमेवर्ति दिसली
कुणा कळेना, कुठलि माकडं, कशी कुठुन घुसली ।।
कळसूत्री बाहुली यंत्रागत शिस्तबद्ध दिसली
छोडो गद्दी नेटिव आदमी ठिसठिसून हंसली ।।
कलकत्त्यापासून मुंबई माकडांचि रांग
होति रोखली तोफ दिल्लीवर रांगांच्या मागं ।।

**चाल : उतखडा जणू अंबेचा – वाढवून**

तीन प्रहर माथ्यावर दिवस कलू लागावा
नौकेतुन किनारा स्पष्ट डोळ्यापुढं यावा।। जी जी जी।।
संकटावरती मात करून दर्यापार व्हावा
डोलकांठींभोंती पाखानी झिम्मा खेळावा।। जी जी जी।।
सार्थक झालं जन्माचं हर्ष मनिं व्हावा
हा गाठुंच किनारा पुढला बेत मनिं घ्यावा।। जी जी जी।।

**चाल : येशिला काढुन बाहेर – तानाजी,**

(इतक्यांत) गडगडाट् मेघांचा व्हावा
अंधार भोंति दाटावा
हतबद्ध सूर्य नभिं व्हावा
मेघमंडळानं जखडावा
लोळ झळाळ् विजेचा यावा
पेटवून शीड लोपावा
धों धों वारा तुफानी यावा
ताबा सुकान्वरला जावा
(लावणीचा सूर थडकावा)
लाटेनं कावा साधावा
नौकेनं तळ गाठावा,
डोळ्यापुढं काजव्याचा थवा
माणूस भ्रष्टमति व्हावा,

**चाल : चढती – शेवट दांगटी**

भारताची भ्रष्टमति झाली
अंधारी आली। न् सुधबुध गेली
असा हा काळ होता आला
साय्बाला हर्षवायु झाला
स्कॉच व्हिस्किचा ताल धरला रं।। ऐक माझ्या राजा
बॉल डॉन्साचा फेर धरला रं।। ऐक माझ्या राजा
डान्सांत साहेब गुंग झाला
शनवारवाड्याला। तोफ रोखलेला
स्वर्ग त्याला दोन बोटं उरला

पुनः व्हिस्किचा पेग भरला
पार्टीचा माज त्याला चढला रं।। ऐक माझ्या राजा
तोफगोळा घेऊन नाचु लागला रं।। ऐक माझ्या राजा
स्वातंत्र्यसूर्य मावळत होता मराठ्यांचा
वठुं लागला कल्पतरु तोरा कुसळ सराट्यांचा
सुळसुळाट झाला होता मराठ्यांत नरुट्यांचा
होता काळ षंढ बावळट लाळघोट्यांचा
घुबडांचे घुत्कार नि कलकलाट कोल्ह्यांचा
अशा भयाण भीषण काळी
पुनः तळपली भवानि माउली
झाला थरकांप हिंदद्वेष्ट्यांचा।। जी जी जी।।

## चौक दुसरा

**चाल : धांवती – दांगटी**

तोफेवर साहेब उभा झाला
दावतो मराठ्याला। निशेत बरळला
एवढ्यामध्ये पोलादाचा पंजा
धरलि मान् बंद झाल्या गमजा
क्षणातच थंड बेंडबाजा रं।। ऐक माझ्या राजा
साहेब म्हणे गॉड मेरे आजा रं।। ऐक माझ्या राजा
साहेबावर बाजु उलटली
व्हिस्कि उतरली। मूर्छना आली
सूर्याची पिलं त्याला दिसती
तोफेच्या तोंडि पडलि माती
माकुडं सारि धुमाधार पळती रं।। ऐक माझ्या राजा
त्याच्या देवाची होईना छाती रं।। वाचवाया दादा।।

**चाल : स्वातंत्र्यसूर्य**

त्यो पंजा पोलादी एका धनगराचा होता
तलवार भवानिच गावली जणू त्याच्या हाता
पाय टाकिल तिथं यशवंत होत त्यो होता
शिवबाच्या मागुती दृष्टा एक यशवंता

''यशवंतराव होळकर'' नांव हे निघता
पळ पळ पळत् सुटे त्यो गोरा
म्हणे त्याला मारा, कमीत कमी धरा
पंधरा लाखांचि देतो जहागीर मला कुणि तारा ।।
त्यो दासिपुत्र जरि होता होळकराघरी
ही खंत बाळगली नाही त्यानं कधि उरी
''माणूस म्हणुन जन्मलो गोष्ट ही खरी
रक्षाया हिंद घेतली भवानिच करी
जो जो हिंदपुत्र तोच येईल मैदानावरी
एकजूट भारती करूं, बकरा ह्यो धरूं, दिसलं तिथं मारूं
दिल्लीवर डोळा, तोफेचा गोळा
उडवण्या आधीं संगरी चला-छाटुं या त्याला'' ।। जी जी जी ।।

**चाल : स्वतंत्र**

तो होता गोरा गोरा पान, 'हंसतमुख छान' तरणाबांड ।।
तो विजयी भीम बलवान्, घोड्यावर प्राण, टाकलि मांड ।।
बिजलीत येतसे जान, घेतसे आण, जिंकुं ब्रह्मांड ।।
जणु खडीसाखरेची खाण, वाणिचा वाणं, उसाचं कांडं ।।
जणु असावरीची तान, कस्तुरिचं रान, निवडुंगाचं बोंडं ।।
म्हणुनीच फौजि नौज्वान, होउन देहभान, उपाशी तोंड ।।
यशवंत शब्दाला मान, देउन दाणादाण, शत्रुची खांड जी ।।
करितसे खांड जी, खांडुळी खांड जी ।।

**चाल : उतखडा – वाढवून**

महाराष्ट्र भूमिशी एकनिष्ठ असलेला
कुणि क्वचित् मराठा होतात त्याच्या साथीला ।।
कधिं आवाई उठे यशवंत होळकर मेला
दुसऱ्याच दिवशि दिसे छातीवर्ती बसलेला ।।
उठे आवाई खतम झालि सारि होळकर सेना ।।
त्याच विशि होळकर सेना, मोजता येना ।।
सायबाला कोडं, ह्यो फौज जमवितो कैसा?
त्याच्याजवळ नसतो कधिं वीष खायाला पैसा ।।

जाट, शीख, पठाण, रजपूत सेनेमधिं यायचा
'यशवंत' तोफ साम्राज्यावरती डागायचा।।

**चाल : धांवती – दांगटी**

तोफेचा आधार साहेबाला
भिक घालील होळकर त्याला?
यशवंतराव गर्जला
"तोफेची धमकी कोणाला?
मैदानि या नि मग बोला
घोडं हैच माझ्या मांडिला
सडाफटिंग असेन एकला
भिडवीन तोफ तोफेला."
निर्धार मनोमन केला
जिंकाया भारती आला,
त्या एकूण एक गोऱ्याला
वेंच वेंचून काढून ठेचण्याला
यशवंतराव होळकर कमरबंद झाला.।। जी जी जी।।
मार खाइन हार न्हाइ जाणार कधीं कोणाला।। जी जी जी।।

**चाल : बाजीरावाचा विडा**

करिन रक्तबंबाळ देश मी ब्रिटिशांनों तुमचा
भारतभूच्या तसू तसूवर हक्क फक्त अमुचा।।
फंदफितुरी बंद करा अन् या मैदानाला
मेल्या आईचं दूध होळकर नाही हो प्याला।।
नेपोलीयन युरोपात 'ह्यो होळकर' हिकडं
अडकित्त्यातली जशी सुपारी करू तुकडं तुकडं।।

**चाल : चढती – पुढं दांगटी**

एक गोरा कॅप्टन टॉड, होता लई गोड
घेतली दौड करित पुढं पुढं
होळकरा चरणि लीन झाला
इमानदारीचा दावा केला

दुजा होळकर बंधु सजला
केलि सुरुवात फितूरीला
नव्हता यशवंत झोपलेला
हाती पुराव्याच्या लखोट्याला
घेउनी ढेऱ्यामध्यें बसला
बोलविलं टॉड साहेबाला
त्याच्या साऱ्या सग्या-सोयऱ्याला
लखोटा हसत म्होरं धरला
टॉड होता गारेगार झाला
आला संताप होळकराला
तिथल्या तिथं काढलं तल्वारीला
टॉडचा शिरच्छेद केला
एकुण एक गोरा कत्ल झाला
मुंडक्याचा ढीग हुबा झाला
धडाएगळ्या मुंडक्याला
भाल्याच्या टोकावर्ती धरला
छावणी छावणीत मुंडका फिरला
धडकि साऱ्या भर्लि ब्रिटिशाला
गव्हर्नर बर्न, छाति बडवून रडू लागला रं
ऐक माझ्या दादा-ए दादा रं

**चाल : मिळवणी**

स्वातंत्र्य सूर्य मावळत होता मराठ्यांचा
वठुं लागे कल्पतरु तोरा कुसळ सराट्यांचा
सुळसुळाट झाला होता मराठ्यांत नरुट्यांचा
होता काळ षंढ बावळट लाळघोट्यांचा
घुबडांचे धुत्कार नि कलकलाट कोल्ह्यांचा
अशा भयाण भीषण काळीं
पुनः तळपली भवानि माउली
झाला थरकांप हिंदद्वेष्ट्यांचा-गोऱ्या सायबांचा।। जी जी जी।।

## चौक तिसरा

**चाल : स्वतंत्र**

मुकुंदऱ्याची ऐका कहाणी मन लावुन राव
ऐका तुम्हि मन लावुन राव ।।
कपटि इंग्रजांनीं होता टाकला वेगळाच डाव
खरंच बघा वेगळाच डाव ।।
''अडसर एकच अवघ्या भारती चला इंदुराला
चौकुन चढवू या हल्ला ।।
खुनी, लुटारू, सैतानाच्या गाडुं म्होरक्याला
होळकर एक शत्रु आपुला ।।
दक्षिण बाजू जनरल बेलस्लीनें आवळावी
लगोलग खच्चुन आवळावी ।।
चांदवडाहुनि इंदौरावर त्वरित धांव घ्यावी
धडक त्यानं सैन्यासह द्यावी ।।
कर्नल मरे गुजराथेतुन माळव्यांत यावा
मरे हा माळव्यांत यावा ।।
करित मार्चिंग, बिगुल वाजवित इंदुरि पोंचावा
होळकरि तख्तच फोडावा ।।
लॉर्ड लेकनं उत्तरेकडून अग्निच वर्षावा
तोफेचा भडीमार द्यावा ।।
उरला सुरला समदा माळवा भाजुन काढावा
बेत हा तडीलाच न्यावा ।।
जॉन बापटिस्ट फिलोज, शिंदे बापूजी यावा
लेकला हात त्यानं यावा ।।
शिंदेशाहीच्या दौलतीनं ह्यो वाटा उचलावा
पेग विजयाचा भरुन द्यावा ।।
विजयी सेनापती मान्सुन गगनीं तळपावा
यूनियन जॅक घेऊन यावा ।।
इंदूरावर ध्वज गोऱ्यांचा डौले फडकावा
असा होता गोऱ्यांचा कावा ।।
लष्करि कावा, त्याचा सुगावा, नव्हता जगताला
जणूं यशवंत झोपलेला ।।

धडाड्-धाड इंग्रजी गिधाडं आलि घेरायाला
नभीं तळपत्या भास्कराला ।।''

**चाल : धावती – स्वतंत्र**

व्युह रचुन पुरा होता झाला हे जी जी
लष्करी फांस आवळला हे जी जी
विजयाचा मद चढलेला हे जी जी
शिंद्यांचा सेनापति भला हे जी जी
बाटिष्ट फिलोज पुढें आला हे जी जी
अष्टे, सिहोर, भिलसा जिंकिला हे जी जी
दौलतराव शिंद्याला हे जी जी
आनंद मनोमनिं झाला हे जी जी
हे कळलं लॉर्ड लेकला हे जी जी
लेक देतो व्हिस्कि शिंद्याला हे जी जी
यशवंतराव होळकर गालामंदि होता हसत बैसला हे जी जी रं जी हे जी ।।
डावाला डाव देण्याला हे जी जी
होळकर होता टपलेला हे जी जी
कुणी नव्हतं त्याच्या साह्याला हे जी जी
साहेब मनी बोलला हे जी जी
काय करिल एकटा आपल्याला हे जी जी
लॉर्ड लेक खुषित चालला हे जी जी
शिकंदरा बियाना घेतला हे जी जी
हिंदोन, रामगडि गेला हे जी जी
दोन बोटं स्वर्ग राहिला हे जी जी
देव्सरी मुक्काम करण्याला हे जी जी
बालहिरा, करोली घेउन् लॉर्ड लेक आरामांत झोपला
हे जी जी रं जी हे जी ।।
मान्सुनचा थाट एगळा हे जी जी
कुणि नव्हतंच आडवायला हे जी जी
निर्वीर्य अव्नि दिसे त्याला हे जी जी
जिंकीत ठाणिं चालला हे जी जी
कोटा घेउन् दक्षिणदाराला हे जी जी
मुकंदराखिंड-काळजाला हे जी जी
कापून-घेतलं सोनाऱ्याला हे जी जी

अन् बलाढ्यशा किल्ल्याला हे जी जी
हातचा मळ समजला हे जी जी
तो हिंग्लज गड घेतला हे जी जी
मांडे मनचे मनीं खात विजयगीत गात साहेब गुरीला -
आला, रे जी रं जी हे जी

टेकडीवर जाउन, दुर्बिण लावुन, इंदूर शहर
दिसतंय् कां पाहूं लागला
जो अजब दिसला तो प्रकार, सांगतो अमर शाहीर
आपुला पुढच्या चौकाला।। तुम्ही ऐका तो राघुबा।।

स्वातंत्र्यसूर्य मावळत होता मराठ्यांचा
वठुं लागे कल्पतरु तोरा कुसळ सराट्यांचा
सुळसुळाट झाला होता मराठ्यांत नरुट्यांचा
होता काळ षंढ बावळट लाळघोट्यांचा
घुबडांचे घुत्कार नि कलकलाट कोल्ह्यांचा
अशा भयाण भीषण काळी
पुनः तळपली भवानि माउली
झाला थरकाप हिंदद्वेष्ट्यांचा, गोऱ्या सायबांचा।। जी जी जी।।

## चौक चवथा

**चाल : चढती – दांगटी**

सुसरीनं पाण्यावर यावं
तरंगु लागावं, किनारि बसावं
बघणाराला खडक दुजा दिसणार
मासे धरायाला राघु येणार
गळ टाकून वर्ति बसणार
शेजारि चूलबि पेटविणार
मासं तळायला तेल ओतनार
घमघमाट वास त्याचा येणार
तोंडाला त्याच्या पाणी सुटणार.
जिभेवर टुकडा एक ठेवणार
इतक्यातच सुसर बुडी घेणार
घशातला घास घशात अडणार

तंगडं त्याचं पाण्यावरती दिसणार
शेवटी सुसरीला निवद होणार मासेवाला दादा राघु माझा दादा हे दादा रं जी रं
घशामध्ये घास अडकला।
ठस्का लागला। साहेब बोंबटला
रक्ताची गुळ्णि झालि सुरुवात
इंदुराकडं केलि त्यानं पाठ
दिसेना परी त्याला काई वाट
भोंती अंधार झाला घनदाट
साहेब क्षणभर पड्ला होता चाट
दिसंल तशि काढूं लागला वाट
पळाय लागला तसा सैराट
पाटलुनिची सुटलि सायबाच्या गाठ
चड्डि झालि पिवळी त्याच्या पाठोपाठ
नूर साहेबाचा आगळा थाटमाट
रक्ताचा वाहतो जणू काय पाट
झाला दमछाट, तरी पण पाठ
टेकायाला जागा सायबाला नाही
माझ्या राघू रं दाजी रं जी जी

**चाल : स्वातंत्र्य – सूर्य**

हुलकावणि होळकरानं मरे सायबाला दिली
त्याला वाटलं होळकरी पिडा आपल्यावर आली
उज्जैनि मोर्चाची गोरि फौज हादरली
आणि फौज धास्तीनं महीनदी मागं नेली
थप्पड गनिमी काव्याची मरेला दिली
एक गोळी नाहिं झाडली
युक्त काढिली, फट पाडली
मान मॉन्सुनचा राखाया, तोफ होळकरी झडली जी जी जी।।

मग्रुरित साहेब गुरगुरत गुरी पतुर गेला
विजयाच्या धुंदीतच पुढं सरकुं लागला
मॉन्सुन होळकराच्या जाळ्यात अलगदच गेला
यशवंत मॉन्सुनला उलटा झोडपुं लागला
दुंदुभी यशाच्या भिडल्या थेट गगनाला

**चाल : दुडकी**

गगनांत वरुण हर्षला
गडगडगडाट चौकडं झाला
कल्लोळ विजेनं केला
तेजाळ तुकडा फेकला
तो खड्गरूप जाहला
यशवंताहाती शोभला
चंबळ, चंबळि नदीनाला
विजयानं धुंद झालेला
बनासेला पूर आलेला
गर्जून सांगे जगताला
आला हिंद-मुक्त करण्याला
यशवंत होळकर आला
व्हा तयार या समयाला
द्या भारतीय 'ओ' त्याला
आम्ही आहोत त्याच्या पाठिला
सर्वांनि बेत आहे केला
भारत अपुला लुटायाला
जो जो गोरा भारतीं आला
नाहि न्यायचं पैलथडि त्याला
बेत नदीनाल्यांनीं केला
परि न्यायचं यमसदनाला
पर्जन्य उग्र होता झाला
चिखलंच सगळिकडं केला
जिथं हत्ती पुरा रुतलेला
तोफगाडा कुठला ब्रिटीशाला
सारा होता रुतुन बैसला
दारुगोळा कामातुन गेला, ओलाचिंब झाला
प्रकार असा झाला ऐका तुम्ही राजे।।
ती उपासपोटीं तोफ सायबाची रुसली
द्या खायला दारू असा हट्ट धरुनिया बसली
चालाया राजमार्ग द्या अशी फुसफुसली
तोफखाना-तुकडि चिखलात लोळताना दिसली

यशवंत होळकरा हाती भवानी हंसली
एक एक गोरा उरलेला
होता टिपित होळकर त्याला
असा हाहाःकार होता झाला
मॉन्सुन प्रार्थी येशुला
आकाशातल्या आपल्या बापाला
''तार रे येशु आम्हाला''
पुनः गडगडाट नभिं झाला
आकाशातुन येशु बोलला
''न्याय गॉड देइल काय तुला?''
इंग्लंड दिलं आपल्याला
का रं सोडुन भारतात आला?
पाहुणा म्हणून तू आला
घरधनी तुवा ग्रासला
तुम्हिं आला हिंद लुटायाला
हेच कळत नाहि काय त्याला?
तुम्हिं इलाज माझा खुटविला
कसं समजाउ रं गॉडला
सारि लेकरं सारखी त्याला
भेद करिल कसा बरं बोला
हे लेकरु लहान हें मोठं
असं देव बोलंल कधि खोटं?
काळा गोरा भेद कोणाला
आकाशातल्या माझ्या बापाला?
नाहि ओळखलं रं तुम्हिं त्याला
बायबल उलटा वाचला
आता दोष द्या रं कर्माला''
असं सांगुन येशु तो गेला;
दोष दैवाला, देऊ लागला।। फायदा न्हाई राजे

**चाल : बाजीरावाचा विडा**

हिंदी मॉन्सुन गोऱ्या मॉन्सुनाच्या सारखा स्वागताला
चिखलें माखुनी दुथडी वाहत होता नदीनाला।।

निसर्गाची मुक्त कराची साथ होति त्याला
होळकरी डावपेच पाहुनी तोहि स्तिमित झाला।।

**चाल : चलती – दुडकी**

हल्ला होतो हल्ल्यावर
बोला हरहर। अल्ला अकबर
जाट, रजपूत, पठाणाला
अरब, मराठ्याला चेव आला
शीख सत्श्री अकाल बदला
मॉन्सुनाचा धीर पुरा खचला
पाव काय टुकडा दिसेना त्याला
भुकेनं साहेब कळवळला
पाणी शोधाया साहेब गेला
नद्यांनी गाळ दिला त्याला
जवळचा दारुगोळा सगळा
भिजवुनी ओलाचिंब केला
कणव आली भिल्ल, रामुशाला
सायबाच्या आला वं मदतीला
साहेबाचे आंसू पुसायाला
बिस्तरा त्याचा आवरायला
आवरून लागलाय पळवायला
बिछाना नाहिं हो सायबाला
आला जो सायबाच्या मदतीला
तोच त्याच्या इरुद्ध लढाय लागला
गोळ्यांचा पाउस सुरूं झाला
कोरडच पडलिया नरडीला
व्हिस्किचा पेग त्याला कुठला
गुरीहुन साहेब पळत सुटला
थेट आगऱ्याला येउन थटला
सव्वादोनशे मैल पल्ला
क्षणाची उसंत ना त्याला
दीड लाखाचा फौज खटला
शून्य भोपळा हातीं फुटला रं।। ऐक माझ्या राजा।।

**चाल : बाजीरावाचा विडा**

रणांगणावर दीड लाखाहुनि अधिक फौज गेली
आगऱ्याला येऊन मोजली दीडशे न उरली ।।
इंग्रजी इतिहासांत आगळा प्रसंग हा घडला
मान्सुनचा चेहरा काळाठिक्कर हो पडला ।।
लॉर्ड वेलस्ली व्हाइसरायला चिंता एक पडली
शोधु कुठे मान्सुन आगऱ्याची गल्ली अन् गल्ली ।।

**चाल : धावती**

दीड लाख फौजेचा खिमा रस्त्यामध्यें झाला
चंबळ, चंबळितला मासा होता भुक्याजला जी जी
दीड लाख गोरा त्यानं मटकावुन टाकिला जी जी
त्यानं टोपडं, इजारिला हात नाहि लाविला जी जी
सायबाच्या पोषाखाचा मान त्यानं राखिला जी जी
सारा पोषाख पुरातुन विलायतेला पोचवीला जी जी
असा हिशोब वेलस्ली व्हाइसराया हाती आला जी जी

**चाल : मिळवणी**

स्वातंत्र्य सूर्य मावळत होता मराठ्यांचा
वठुं लागे कल्पतरु तोरा कुसळ सराट्यांचा
सुळसुळाट झाला होता मराठ्यांत नरुट्यांचा
होता काळ षंढ बावळट लाळघोट्यांचा
घुबडांचे धुत्कार नि कलकलाट कोल्ह्यांचा
अशा भयाण भीषण काळीं
पुनः तळपली भवानि माउली
झाला थरकांप हिंदद्वेष्ट्यांचा-गोऱ्या सायबांचा ।। जी जी जी ।।

## चौक पांचवा

**चाल : मध्यरात्रीच्या सुमारास – तानाजी**

आग्रा घेउन वायुवेगानं, मथुरा घेउन श्रीकृष्ण मुक्त केला त्यानं ।
भक्तिभावानं ।।

गेला धावत, दिल्लीचं तख्त बसला घेरून, मराठ्यांची राखण्या शान।
खऱ्या जिद्दीनं ।।
परि हाय घेरलं फितुरीनं, पेटलं रान, दिल्लीच्या अवतिवभंवतीनं।
वणव्यापरमाणं ।।
बोले जनानखान्याच्या इरुद्ध गोरा ऐटिनं, जनानखान्यात उभा राहून,
सांगतो ग्यान ।।
सोडिल्या मडमा त्यानं जनानखान्यात नेऊन, गांजिली दिल्ली फितुरिनं।
एळ ओळखून ।।

**चाल : दुडकी – येशीला काढून बाहेर – तानाजी**

शहा आलम लुळा खुळा झाला
इंग्रजांच्या खिशात बैसला
दिल्लीची राखण करण्याला
होता चेव गोऱ्याला आला
मान्सुनचा पराभव झाला
त्याचा सूड घेण्या टपलेला
दिल्लीवर कब्जा करण्याला
तो साहेब आतुर होता झाला
सारि ताकद एकवटुन आला
मराठ्याला लोळवायला
ओळखून सायबि होऱ्याला
यशवंत सावध हो झाला
आठ दिवस वेढा दिल्लीला
पटकन त्यानं उठविला
पुनः गोरा कापायचा बेत परतुनी केला
भरतपुरि गेला ।। जी जी जी ।।

**चाल : दोघांचे समानच वार**

रणजीतसिंग होता सच्चा
नव्हता तो कच्चा। जाटाचा बच्चा
रामाला भरत शोभला खास
होळकरासाठी भोगि वनवास
इंग्रजांनि जरी आवळला फास ।। जी जी जी ।।

लढविला भरतपुर किल्ला
हल्ल्यावरी हल्ला। होता जरि झाला
असा झोडपिला
कि इंग्रज मेटाकुटी आला
सत्रा एळ पराभव झाला
मोहऱ्यावर मोहरा त्याचा पडला रं। ऐक माझ्या राजा।।
लष्कर इंग्रजाचं मोठे
नव्हतं आडमुठं। लष्करी शास्त्र
जगामध्ये श्रेष्ठ
घमेंडित होता साहेब गोरा
भेटला नव्हता कुणी मोहरा
नक्षा उतरला त्याचा सारा रं।। ऐक माझ्या राजा।।

**चाल : बाजीरावाचा विडा**

डावाला प्रतिडाव होळकर टाकितसे आगळा
असुन पाण्यामध्यें मासा पायाशी, उपाशीच बगळा
खच खंदकांमध्यें इंग्रजी प्रेतांचा पडला
नव शस्त्रास्त्रें असून इंग्रज खंदकांत सडला
घारिगिधाडांपासुन वाचिव आई मेरी मजला
किती वेळा तरी धावा करायचा प्रसंग हो आला

**चाल : दुडकी**

चार महिने वेढा किल्ल्याला
फितुरीचा फांस आवळला
परि किल्ला येईना हाताला
तोफांचा भडीमार केला
घाम ना फुटे किल्ल्याला
हसतच किल्ला बोलला
''काय सायबा खेळ चालविला?
मी भरपूरचा किल्ला
असा तसा नाही बनलेला
माझा देह तुला वाटला
मातीनं निस्त्या घडविला

भरताचा पाय लागला
त्याचा कणकण जमविला
माझा देह असा घडलेला
दाद देइल तुझ्या तोफेला?
रावण घे रे मदतिला
सारी शस्त्रं अस्त्रं साह्याला
तरि पुरुन उरंन मी त्याला
बडवीन तुझ्यासारख्याला
अद्दल घडविनच तुला
ये पुढं'' शड्डु ठोकला
अंवति भंवतिला किर्र झाडिला, तळ्या तडागाला
शब्द तो गेला, त्वेष आला दादा।। हे दादा रं।।

**चाल : स्वातंत्र्यसूर्य सुरुवात – पुढें धावती दुडकी**
तीस फूट रुंदीची भिंत होती किल्ल्याला
तो चिकण मातीचा गोळा होता पसरला
पाण्याचा लोट जर वरुन सोडुनी दिला
तोफेचा भडीमार सारखा त्याच्यावरी केला
भाकरीगत खपला पण उडत नसे नांवाला
सारा तोफगोळा भिंतीत रुतुन बैसला
हा प्रकार सायबाला जगाएगळा वाटला
कधि वरुन उकळते तेल येई स्वागताला
तर कधि गडगडत दगड अंगावर आला
पेटत्या गोळ्यानिं कहर की हो मांडिला
खंदक तपासुन जरी साहेब उतरला
आला लोंढा एकदम साहेब खंदकांत मेला
सारा भुताटकीचा प्रकार वाटला त्याला
इंग्रजी सैन्य तर आलंच रडकुंडीला
साहेबच साहेबाचा हुकुम मानिनासा झाला
तर कुणा वाटले होळकर मदतीला
प्रत्यक्ष आला मल्हारिमार्तंड आला
किती लेफ्टनंट लोळविला
प्रेतांचा ढीग रचलेला

बघे साहेब छाति फुटलेला
भाटांच्या कानीं लागला
रोज पाहुन रक्तपाताला
जाट राजा होता कटाळला
मानाचा तह त्यानं केला
हुलकावणी देउनि गोऱ्याला
मराठ्यांचा मोहरा निसटला
सतलज नदीपार गेला
यशवंतराव निसटला पंजाबात गेला, हत्तिघोडं सारा तोफखाना नेला
हात कपाळाला सायबाचा गेला।।

**चाल : स्वातंत्र्यसूर्य**

यशवंतराव होळकर पंजाबात गेला
हत्ति, घोडे, तोफखाना सरंजाम साथिला
महापराक्रमी रणजीतसिंह गाठिला
गोऱ्यांच्या मुकाबल्यासाठी पाचारी त्याला
शीख आणि मराठा जर एक जाहला
आईचं दूध आठवलं व्हाइसरायाला
सारा हिंद राहिल पाठिला
नुसतं हूं बोला, तोफ डागायाला
पुढं यशवंत होळकर दिसंल तुम्हां समद्याला।। जी।।

काबूलच्या अमीराला खलिता त्यानं धाडिला
इंग्रज तेवढा कापून काढुं या चला
जो तुमचा शत्रु तो माझा शत्रु बोलला
ओळखून होते जरि दोघे त्याच्या शक्तिला
रणजीतसिंग अमिराचा धीर सुटलेला
हा किंतु त्यांच्या मनांतला
होता हेरला, परतुनी चला
हुकुम सोडून होळकर सतलजकडं परतला।। जी जी।।

सतलज दुथडि भरुनिया होति चालली
अन् दुसऱ्या काठावर गोरि फौज बैसलेली

उताराची नाकीं दाबून त्यानि धरलेली
मुंगीला यायला वाट नव्हति उरलेली
गोऱ्यांना दिसे होळकरी पायलि भरलेली
हत्ती, घोडे, तोफा, फौजफाटा
होळकराच्या वाटा-बंद अन् कांटा
काढायाचा व्यूह पुरा होता झाला।। जी जी जी।।

आता फक्त वाढुनच मरण ठेवलं होतं पुढं
मरा नदीत नाहितर येऊं द्या घशामध्यें घोडं
यशवंतरावापुढं ठेवलं मृत्यूनं कोडं
मृत्यूनंच ठेवलेलं कोडं सुचंल कुणा तोड
सोडवावं मनलं तर लागंल देवाला वेड
मार्गच होता खुंटला
फक्त स्वर्गाला, तडक जाण्याला
देवा भेटिला, रस्ता मोकळा होता बघा दादा।। जी जी जी।।

**चाल : बाजीरावाचा विडा**

उत्तरेकडे तोफ रोखुनी आंग्लसैन्य बसले
दुथडी भरुनी आनंद वाहे प्रश्नचिन्ह कसले?।।
हात जोडुनी विजय त्यांपुढें उभा दिसे त्यांना
नेत्री तेल न् दक्ष इंग्रजी सेना असताना।।
अजिंक्य इंग्रजी लष्करशास्त्राचाच फुगा फुटला
पाठिमागुनी सहीसलामत होळकर उठला।।
हत्ती, घोडे, तोफा, लष्कर मागें कसे आले
अघटित पाहुनि गोरे चेहरे काळेकिट्ट झाले।।
टोपी इंग्रजी खाली उतरली सलाम करण्याला
विजय मानतो मालवेश्वरा मुजरा आपुल्याला।।
अजिंक्य तुमचे शास्त्र लष्करी पूर्ण आम्हां पटले
पराभवाचे तुमच्या राजे मार्ग सर्व खुटले।।
जातकुळीवर पराक्रमाची भिंत उभी नसते
गगन व्यापल्या काळजाकरीं खड्गवीज हसते।।
मुजरा करुनी हात तहाचा त्यानिं पुढें केला
''मालव्यांत ना ठेवुं पाय, हा घ्या मालव अपुला।।''

**चाल : मिळवणी**

स्वातंत्र्य सूर्य मावळत होता मराठ्यांचा
वठुं लागे कल्पतरु तोरा कुसळ सराट्यांचा
सुळसुळाट झाला होता मराठ्यांत नरुट्यांचा
होता काळ षंढ बावळट लाळघोट्यांचा
घुबडांचे धुत्कार नि कलकलाट कोल्ह्यांचा
अशा भयाण भीषण काळीं
पुनः तळपली भवानि माउली
झाला थरकांप हिंदद्वेष्ट्यांचा, गोऱ्या सायबांचा ।। जी जी जी ।।

## चौक सहावा

**चाल : चढती**

फक्त एक राजा असा झाला
आंग्लशाहीला। आग लावायला
वेडा झालेला
की इंग्रज हकलुनिया लावा
ओळखा एकमेक भावा
बुद्धि पण कसोटीला लावा
नवी शस्त्रास्त्रं, गनिमी कावा
दावा अन् विजयध्वजा रोवा - हा ।। जी जी जी ।।
फक्त एक राजा असा झाला
आंग्लशाहीला। धक्का देण्याला
एकटा पुढं झाला
एकाकि लढुन विजयी झाला
इंग्रजच पाया पडत आला
तहासाठि यावं लागलं त्याला
अजिंक्यत्वाचा तोरा गेला
असा यशवंत हिरा झाला हो ऐका तुम्ही राजे ।।
ज्याच्या पायावर्ति लोटांगणं
घातलि इंग्रजानं असा होता कोण हिंदभूषण
ज्याचं शाहिरानं नावं गावं
डोक्यावर घेऊन नाचावं

इतिहासाला लेणं व्हावं
लहानथोरांच्या ओठी ऱ्हावं
यशवंतराव। फक्त एक नांव।
आम्ही ते गावं तुम्ही ऐकावं ऐका तुम्ही राजे।।
साहेबाचं भाग्य होतं मोठं
सांगत न्हाई खोटं। साहेब जिथं जिथं गेला तिथं तिथं
नशीबात असे ढुंगणावर लाथ
होळकर पाडायाचा त्याचे दात
तोरा मिरवायचा लाथ खात खात
फितुरिनें करू पाह्यचा घात
होळकर लोळवितसे हातोहात, करीतसे मात सांगु काय राजे।।

**चाल : चढती – पुढं दुडकी**

पोवाड्याच्या शेवटची कथा।
शाहिराची व्यथा।
शौर्याची गाथा। गाता गाता
लाख इंगळ्या डसति त्याला
जगात न्याय उल्टा झाला
शौर्याचा पुतळा जणुं ठरला
वाटलं जावं पुजायाला
अमर शाहीर पुढं झाला
हात कुठं लागलाय चरणाला
शाहिराचा हात कलम झाला
होळकर यशवंत आपुला
असा जरि वीर होय आगळा
लुटारू, चोर, डाकु ठरला
लूट जाळपोळ करायाला
पुण्याला म्हणे होता आला
महाराष्ट्राचा शत्रु ठरला
असा त्यानं गुन्हा काय केला, नुमगे शाहिराला ऐका तुम्ही राजे।।
यशवंत होळकराचा गुन्हा
इंग्रजाविणा, दिसला न्हाई कुणा
सांगतो पुनः

पेशवाईचा होत होता अस्त
बाजिराव दुसरा होता सुस्त
शिंदेशाहीची चाले गस्त
बाजिराव खेळणं होतं नुस्तं
शिंद्याचा शब्द दरोबस्त
शब्दावर होई उदय अस्त हो। पुणें दरबारी। ऐका तुम्ही राजे।।

**चाल : उंच उंच भिंति – उद्धमसिंग**

मुजऱ्याचा मान श्रीमंत फक्त द्या मला
कोपऱ्यांत बसूं द्या आपल्या या हुजऱ्याला
महाराष्ट्र माईचा पुत्र शोभुं द्या मला
यशवंतराव परोपरी विनवुं लागला
पदोपदी त्याचा अपमान मानभंग झाला
मल्हारराव त्याचा भाउ होता छोनुकला
मारेकरी त्याच्यावर पुण्यामध्ये घातला
दोन प्रहर माथ्यावर दिवस होता आलेला
रावबाजी पेशवा पोटभर जेवलेला
अन् पक्कान्नांची ढेकर देतच आला
शनिवार वाड्याच्या सज्जामध्यें बैसला
चघळीत सुपारी खाली इशारा दिला
शनिवार वाड्यापुढं खेळ होता सुरू झाला
होळकर विठोजी हत्तिपायिं बांधला
केलि खूण लाविलं हत्ति पिटाळायाला
यशवंतरावाची भावजय कोमला
धाय धाय मोकलुन विनवि बाजीरावाला
परि दया नव्हति पेशव्याला, हसूं लागला
हालहाल करून। हाल होता हंसून। जरि चिंध्या करून
यशवंतरावाचा भाऊ ठार मारिला
तुम्हि ऐका हो राघुबा दाजी।।
पदोपदी जरी अपमान होळकराचा झाला
महाराष्ट्र धर्माचा वारकरी एकला
महाराष्ट्र ध्वजा होति प्राणाहून प्रिय त्याला

त्याचा दाखला शाहिरा हातीं आज लागला
पुण्याजवळ वानवडीला गेला शाहिर मुजऱ्याला
कणकण मातिचा शाहिराशि बोलला
अरे ऐक शाहिरा सत्य सांगतो तुला
प्रत्यक्ष आमच्या डोळ्यांनी प्रकार पाहिला
रुजलेल्या गवताच्या मुळ्या आहेत साक्षिला
ती रात्र आठवते आज आम्हां समद्याला
हा वारा होता इथं शांतपणे पडलेला
सारा वानवडीचा माळ होता झोपलेला
वारा हळुंच येउनी आमुच्या कानि लागला
काईतरी अघटित घडतंय हो या वेळा
शिंदेशाही तोफखाना घोडेस्वार सगळा
बोलतोय, वागतोय, चालतोय वेगळा
घोटाळ्यात पडलो आम्हि पाहु लागलो सारं
शाहिरा ऐकलं रं आमच्या कानानीं न्यारं
होळकर धरा। धरुनिया सारा। चला करा त्वरा
शिंद्यांचा हुकूम सुटलेला तुम्हि ऐका हो राघुबा दाजी।।
यशवंत होळकर रावबाजि भेटिला
निवडक जवान घेऊन होता चालला
एक गोळा तोफेचा सूं सूं करितच आला
पेशव्यांच्या हुकमानं शिंद्यानं सोडलेला
यशवंतराव जवानांना परी बोलला
पंचवीस गोळ्यांचा निवद घ्याहो आपुला
सव्विसाव्या गोळ्याच्या आधी पुढें व्हा चला
नंतरच कापा हो शिंदेशाही मामला
शिस्तीनं मार्ग काढायचा आहे आपुला
असा ठरल्याप्रमाणं शिंदेशाहीनं हल्ला
होळकर दळावर भडीमार सुरू केला
शिंद्यांचा हर्ष गगनात मावेनासा झाला
होळकर पडल्याची वार्ता कळंल आपल्याला
सव्विसाव्या गोळ्या आधिं हुकुम होळकराचा झाला

फक्त स्वार तीनशे होते त्याच्या साथिला
गोळ्यांच्या वर्षावांत घुसुन पुढें त्यो गेला
शिंद्यांचा तोफखाना पुरा हातीं घेतला
कपा कपा कापितच चालला शिंदे सैन्याला
शिंद्यांचं दळ। काढुं लागलं पळ। दसदिशा मोकळं
रान धावलं बघा त्याना तुम्हि ऐका हो राघुबा दाजी।।

पंजपक्वान्नावर आडवा हात मारलेला
रावबाजी नेहमि परमानं तृप्त झालेला
लढाईचा ''तमाशा'' पहावया चालला
चघळीत पान पालखीत होता बैसला
रामूशि गेटावरी येउनि दाखल झाला
एवढ्यात पळापळ दिसलि त्याचा नजरेला
पालखितच आनंदानं होता डुलूं लागला
कातर्लि  सुपारी तोबरा भरित बोलला
''पळते हें सैन्य होळकरी नेम ठरलेला''
आनंदातच आपली मांडी थोपटुं लागला
एवढ्यात हुजऱ्याचा शब्द कानिं ऐकला
''श्रीमंत शिंदे फौजेचा पळ सुरूं झाला''
ऐकतां बाजिराव त्यजुनीया पाल्खीला
झाला स्वार घोड्यावर पळुन सिंहगडि गेला.
यशवंतराव होळकर विजयि झालेला
घनघोर लढाइआधिं हुकुम त्यानं सोडिला
''गेला प्राण नका अवमानूं जरीपटक्याला''
महाराष्ट्रध्वजा करि उंच उंच धरलेला
शनिवार वाडा। गांठुनिया खडा। मानाचा मुजरा
त्यानं पेशवे गादिला केला। तुम्हि ऐका हो राघुबा दाजी।।

असा महाराष्ट्र भक्तिचा महामेरु झाला
क्षणोक्षणीं झोडपुन काढलं गोऱ्या सायबाला
दुर्दैव राज्यकर्ताच गोरा पुढं झाला
इतिहास आमचा त्यानिं आमच्यासाठिं लिहिलेला

चोर, डाकू, लुटारू होळकर म्हटलेला
तो कुराण, गीता, बायबल आम्हाला झाला
आम्हिं घोकुन घोकुन तो दिला साऱ्या राष्ट्राला
गुलामीनं अंध झालो ठोकरलं सत्याला
गायाचा पवाडा सोडुन शिव्या दिल्या त्याला
अन् धन्य मानुनी घेतलं आम्हिं स्वतःला
असा इतिहासाचा बक्ट्याबोळ आम्हिं केला
स्वातंत्र्य मिळताक्षणिं गाळ खालि बैसला
निर्मळ-जळ-इतिहास ओंजळित आला
प्रोफेसर फाटकांनी हात ओंजळिला दिला
उगवायचा सूर्य तो सत्य सूर्य उगवला
शिवराया मागं होळकर फक्त एकला
महाराष्ट्रध्वजा अति उंच उभारुनि गेला
नव इतिहासाचा नवा सत्य दाखला
अमरनें दिला। मुजऱ्याला चला। यशवंतराव होळकर बोला।
चांगभलं बोला बोला तुम्हिं राजे।।

•

# मालव–केशरी यशवंतराव होळकर यांचा पोवाडा

## शाहीर खाडिलकर

निराशेचा वणवा पेटला। चारी बाजुला। तरि न डगमगला।
केला ज्यानं दुष्मनांचा संहार। मुकुंदरा खिंड गाजविली फार।
कीर्तिनं ज्याला घातला हार। यशवंतराव रणवीर। पराक्रमी धीर।
पांडुरंग शीर। त्याला नमणार।।ध्रृ.।।

## प्रास्तविक

डोळे जसे काय मोती टप्पुरे होते पाणिदार।
वरती कमान भिवयांची शोभली काळी काळी भोर।
दृष्ट कुणाची कशी लागली एक डोळा चूर।
बंदुकीच्या दारूनं उडविला मर्द खरा वीर।
अंग पिळलेलं छाती जशी काय भिंत भव्य थोर।
अभयदान देण्यास सज्ज ती झाली तलवार।।
कंगणीदार पागोटं वीराच्या शोभे शिरावर।
शिरपेंच मोत्यांचा वर। जडविलीं रत्नं सुंदर।
वरती मोत्यांचा तुरा घोळतो राजमस्तकावर।। जी।। चाल।।
लंका घोडी शोभे सुंदर यशवंत झाला वर स्वार।
भाला बर्ची ढाल तलवार। शत्रूंचे फोडी जिव्हार।। चाल।।
घोड्यांच्या टापा ऐकून। झाले अर्धेमुर्धे रणधीर।। चाल।।
कनवाळू उदार दिलदार। प्रेमाची घाली पाखर।
गांजलेले लोक पाहून। रायाला येत गहिंवर।।

## चौक १ ला

मल्हारगर्दी झाली पुण्याला। मल्हारराव जीवें मारला।।
विठोजीला हत्तीच्या पायाखाली चिरडिला।।
तंवा यशवंतराव निसटला। हळु हळु कान्हदेशीं आला।
तिथं चिमणाभाऊ भेटला वीराला।
त्यानं रुपये तीनशें आणि लंका घोडी दिली त्याला।
पुढें यशवंतराव आले धारेला।।

आनंदराव पवार राज्य करत होते धारेला ।।
रंगराव औडीकर चाल करून आला।
आनंदरराव हटू लागला इतक्यांत यशवंतराव पुढं झाला।
अन् बोलला आनंदरावाला। ''नका सोडू धीर या वेळेला।
हा यशवंत तुमच्या बाजूला। मग अपयश कसं बोला।''
असं म्हणून चवताळुन औडीकरावर गेला।
अन् फडशा उडविला। आनंदी आनंद झाला।
मग यशवंत माळव्यांत आला।
खंडेराव (मल्हाररावाचा मुलगा) वारस राज्याला।
यशवंतराव त्याच्या नावानं करतो राज्याला।
एक वर्षात प्रकार काय झाला। यशवंतराव सेनापति झाला।
पुढं बडगोंदे येथे वीर गेला।
तिथं निशाण मारतांना फुटला दारूचा गोळा।
अन् दारूनं फोडला एक डोळा। इकडं पुण्याला प्रकार काय झाला।
दुर्बुद्धी सुचली पेशव्याला। अन् त्यानं होळकरचा मुलुख जप्त केला।
यशवंतानं लिहिलं पेशव्याला। ''कीं हा मोठा अन्याय तुम्ही केला।
खंडेराव वारस गादीला। खंडेराव लहान पोर झाला।
म्हणून त्याच्या नावानं मी चालवतो राज्याला।
तरी जरा सुविचार करा। आपापल्यांतच कटाकटी करून नाश सर्वाला।
पण पेशव्यानं ऐकलं नाहीं तवां यशवंतराव पुण्यावर चालू करून हो
गेला।। *चाल ।।*

होळकरी फौजा पाहून। बाजीराव गेला घाबरून।
गेला पळून पुणं सोडून। वसईला गेला धावून।।
तिथं इंग्रजाला गेला शरण। राज्य दिलं त्याला लिहून।
बाजीचा पक्ष घेऊन। इंग्रज आला चाल करून। *चाल ।।*

इंग्रज बोलला यशवंतरावाला। ''तुम्ही निकमहराम झाला।
धन्यावर शस्त्र टाकायला। कसे तुम्ही तयार झाला?।
तरी जा परत माळव्याला। राज्य देऊ परत तुम्हाला।।''
इंग्रजी कावा हा झाला। बाजीराव आला पुण्याला।
पर सत्ता विकली कंपनीला। कळसुत्री बाहुलं तो झाला।।१।।

## चौक २ रा

दौलतराव शिंद्यांच्या फौजा पार उधळून। कंपनीच्या रस्त्यांतील कांटा काढला उपटून। वेलस्ली गेला स्वप्नांत पार रंगून ! की हिंदुस्थान लाल रंगाचा करीन वेगानं।। जी ।। हिंदुस्थानी राजे लोकांना साऱ्या जिंकून। इंग्रजांचं राज्य मी आता करिन वेगानं। खड्या सारखे सारे लढवय्ये देह फेकून। हिंदुस्थान नांव खरडून। इंग्रजांचं नांव देशाला खास देईन।।जी।। सारे राजे आले शरण। पण यशवंतराव दारुण। त्याला आता जिंकल्यावीण। मुळी नाहीं जिवाला चैन।। कुरापत कांहीं काढून। त्याला द्यावं धुळीस मिळवून। असा बेत दुष्ट करुन। यशवंताला लिहिलं वेलस्लीनं।। की तुम्ही चिथवता राजेलोकांला। इंग्रजांना हकालुन देण्याचा कट तुम्ही केला। तुम्ही पाठविता पत्रं राजाला की चला, पिटाळुया टोपीवाल्याला। सात हजार मैलांवरनं आला। अन् त्यानं घेतलं आमच्या मुलुखाला। हिंदुधर्म चालला ऱ्हासाला। हिंदुराज्य चाललं ऱ्हासाला। जो जो राजा आमचा दोस्त आहे झाला। तुम्ही धमकावता त्या त्या सर्वांला। कंपनीचे दुस्मन तुम्ही झाला। असा पुरावा आमच्या हाताला। तुमचं राज्य परत देण्याचा विचार होता केला। पण तुम्ही बंडखोर झाला। म्हणून राज्य मिळणार नाही तुम्हाला। तर मुलखाचा ताबा द्यावा पेशव्याला। नाहीतर धाडतो आम्ही फौजा तुमच्या मुलखाला।। *चाल*।। इंग्रजांचा खलिता वाचून यशवंत गेला भडकून।। *चाल*।। त्यानं दिला जबाब वेलेस्लीला। आपला खलिता पोचला। सुखासुखी मुलुख द्यायला। हा यशवंत वेडा नाही झाला। धाडा फौज झुंज करायला। पण ठेवा लक्षात या बोला। या यशवंताशी गांठ तुम्हाला। जर जाल माझ्या वाटेला। तर बेचैन करीन तुम्हाला।। दीड लाख घोड्यांची धाड जंवा येईल तुमच्या मुलखाला। तंव हाय खाऊन मराल – हे बोल सांगतों तुम्हाला। होळकर कधी भीत नाहीत मरणाला। शिंदे झालेत वश आम्हाला। भरतपूरकर–जयपूरकर–सारे राजे आमच्या बाजूला। समुद्राच लाटांवर लाटा जशा धडाधडा आदळती खडकाला। तशा माझ्या सैन्याच्या लाटा गिळतील तुम्हाला। तुमचा मुलुख मिळविन धुळीला। लाखो लोक बळी पडतील माझ्या तलवारीला। याचा आधीं विचार करा। मग धाडा आपल्या फौजेला। मीच येतो आधी सामना द्यायला। असा त्यानं खलिता धाडला। अन् सैन्याचा बंदोबस्त केला। यशवंताला संशय आला। की फौजेतले गोरे अधिकारी फितुर साहेबाला। तंवा व्हिकर्स–टाड व रायन या तीघाला। पकडून आणलं सदरेला। अन् त्यांचा शिरच्छेद केला! ती मुंडकी टोचली भाल्याला। अन् फौजेत फिरविलीं गरगरा। दहशत बसली सर्वांला। पुढं काय प्रकार झाला। तो सांगीन तिसऱ्या चौकाला।।२।।

## चौक ३ रा

होळकराचा खलिता पाहून। फौज घेऊन। मोठ्या वेगानं। लेकसाहेब चाल करुन आला आगऱ्याला। तळ त्याचा पडला। यशवंतराव चिडून गेला।। *चाल*।। फौजेचे सेनापति दोन। आले उत्तरेकडनं। डॉन साहेब आणि मान्सन।। जी।। आला मान्सन एका बाजूनं। डॉनसाहेब दुसऱ्या बाजुनं।। जी।। वेलेस्ली दक्षिण बाजूनं। मरे आला पश्चिमेकडनं।। जी।। शिंद्यांच्या फौजा पूर्वेनं। असा रचाल व्यूह साहेबानं।। जी।। चार सिंह चारी बाजूनं। गरजत आले चालून।। जी।। *चाल*।। सिंहाचा सिंह यशवंत। सदा यशवंत। शत्रूंचा अंत। करण्याला वीर आला तय्यार। दीड लाख घोडा केला तय्यार। तोफखाना सात हज्जार तय्यार। एकोणीस हजार पायदळ झालं तय्यार। एकशें नव्वद तोफा केल्या तय्यार ।। जी।। यशवंतरावानं पत्रं तंवा धाडलीं हिंदुराजाला।। कंपनीनं अन्याय केला। देशी राज्यं खालसा करण्याचा सपाटा चालवला। शिंद्यांशी वेगळा तह केला। पेशव्यांनी वेगळा तह केला। आता आलाय खायला आम्हांला। जर आमचा आज मोड झाला। तर हिंदुराज्य जाइल विलयाला। हिंदुधर्म जाइल विलयाला। म्हणून यावं आमच्या मदतीला ।। *चाल*।। टोपीवाला आलाय चालून। आम्हांवरती चंग बांधून।। *चाल*।। यवनांचा जाच बंद झाला। आता आलाय ताम्र छळण्याला। याचा वेळीच जर बंदोबस्त नाहीं केला। तर डोईजड होइल सर्वांला। म्हणून ऐका माझ्या शब्दाला। आम्ही आज संग्राम मांडला। माझा घोडा चाललाय आघाडीला। काळ आणीबाणीचा हा आला। अशी पत्र धाडली सर्वांला। अन् यशवंतराव चालले आघाडीला। अमीरखानाला धाडलं बुदेलखंडाला। आडवायला टोपीवाल्याला। इकडं यशवंतराव घेऊन फौजेला। जयपूरच्या रोखानं गेला। अन् जाळपोळ केली, लुटालूट साऱ्या मुलुखाला। जयपूरचा राजा इंग्रजांचा दोस्त झाला। तवा त्या दोस्ताला मदत करायला लॉर्ड लेकनं पाठवलं मान्सनला। तोफखाना दिला मदतीला। चाळीस हजार फौज मदतीला। मान्सननं विचार केला। की जसवंत राव कोणच्या झाडाचा पाला?। दोन दिवसांत पकडिन मी त्याला। नाहीतर करिन ठार त्याला। पुढं कसा काय रंग लढाईला। ते सांगीन चौथ्या चौकाला।। ३ ।।

## चौक ४ था

मान्सनसाहेब चालून आला। यशवंतरावानं विचार मनिं केला। घ्यावं पाठीवरती साहेबाला। अन् न्यावं आपल्या मुलखाला। डोंगराळ मुलखांत घेऊन जावं त्याला। मग घ्यावं समाचाराला। असं म्हणून यशवंतराव फिरला माघारा। अन् इंदूरच्या रोखानं चालला। इकडं मही नदी उतरून मरे होता आला। त्याला वाटलं यशवंतराव आपणावर आला। तवा मरे साहेब अर्धामुर्धा मेला। अन् मही नदी ओलांडून मागच्या मागं पार झाला।। बापूजी शिंद्यानीं लिहिलं मान्सनला। साहेब! यशवंतराव घाबरून गेला। त्यानं तुमचा दिमाख

पाहिला । अन् लागलाय सारखा धावायला। दिनरात्र चैन नाही त्याला। भीतिनं गांगरून गेला! झोप नाहीं येत रात्रीला। पळता भुई थोडी झाली त्याला। बेदिली झाली फौजेला। जर आता कराल जोराचा हल्ला। तर होळकरी फौज येईल तुमच्या बाजूला । मान्सननं विचार केला । की पाठलाग करावा या वेळा। अन् होळकरला चिरडावा पुरा । अन् यश घ्यावं आपल्या वाट्याला। असा बेत करून तो चालला पाठलागाला।। तंवा लॉर्ड लेक बोलला त्याला । अरे पावसाळा अगदी जवळ आहे आला। तर जाऊ नको पाठलागाला। तंवा मान्सन त्याला बोलला। त्याची चिंता नको तुम्हाला। होळकर कोणच्या झाडाचा पाला? । टाच मारीन आता घोड्याला। अन् पकडून आणीन त्याला । असं म्हणून चालला पाठलागाला । पुढं यशवंत, मागं मान्सन धावू लागला।। असो । आता ऐका गोष्टीला। पाठोपाठ मान्सन आला। मान्सन काट्याला आला। तिथनं मुकुंदऱ्याच्या खिंडीत आला। तिथनं सोनारा गांवी तो आला। तिथं हिंगलजगडचा किल्ला त्यानं सर केला। मग पिंपळघाट उतरून आला। होळकर सारखा पुढं नेतोय त्याला । चंबळा नंदी ओलांडून आला। दोनशे पंचवीस मैलांचा पाठलाग मान्सननं केला। अन् गुरीगांवीं तळ त्यानं दिला। इतक्यांत मान्सून (पावसाळा) सुरू झाला। मान्सूनला पाहून मान्सन घाबरून गेला।। पुढं काय प्रकार झाला । होळकरानीं डाव काय केला। ते आतां सांगीन मी दादा! पांचव्या चौकाला।। ४।।

## चौक ५ वा

मान्सनसाहेब आला गुरीला। पाठलागाला। आनंदुन गेला। वाटलं त्याला यशवंतराव झाला गार। गोळ्या झाडून करिन ठार। मान्सनला झाला गर्वभार फार।। जी।। पण कळलं नाही वेड्याला। यशवंतानं कावा काय केला। मान्सनला आणलं खेचत आपल्या मुलखाला। जसं सिंहानं आणावं सावज आपल्या गुहेला। तसा मान्सन जाळ्यांत सांपडला पुरा। मग यशवंतराव उलटला। अन् जसा नाग साफ उलटावा, तसा केला मान्सनवर हल्ला (८ जुलै इ. स. १८०४) ।। साहेबाचा चेहरा गोरामोरा झाला। साहेबाला धक्का बसला। अन् लावला मार्ग पळायला। पुढं मान्सन मागं यशवंत सिंह चालला।। ऐंशी हज्जार टापांचा थयथयाट सुरू केला।। वीस हज्जार तळपला भाला।। भगवा झेंडा चालला आघाडीला। गुरी गांवावर छापा घातला। मान्सन घाबरून गेला। टोपीवाला कैक ठार झाला। तंवा ल्यूकनसाहेब आला लढाईला। तंवा यशवंत बोलला त्याला।। यावं आता शेकहॅन्डाला। तंवा ल्यूकन बोलला। शेकहॅन्ड करायची ऑर्डर नाही मला। तुम्ही नेटिव राजे पळपुटे-घाबरट-लोक-कुणी म्हटलं टोपीवाला आला। तर दहा कोस पोबारा केला। तुझ्यासारख्या लुटारुशी शेकहॅन्ड कोण करणार बोला?।। चल कर दोन हाताला। तंवा दोघं लागले झुंजायला। तोफांचा धडधडाट झाला। तलवारी लागल्या चमकायला। घोडेस्वार घालती झडपेला। धूळ भिडली जाऊन गगनाला। हेलमेटं पडलीं घळघळा । मान्सनसाहेबाचा धीर

खचला। अन् लागला सारखा पळायला। इतक्यात ल्यूकनसाहेबाला वार लागला। ल्यूकनसाहेब घायाळ झाला। अन् त्यांत बिचारा मरुन गेला (८ जुलै इ. स. १८०४)। विजयानं हार चढविला हो यशवंताला।। ५।।

## चौक ६ वा

मान्सनसाहेब तिथनं पुढं चालला फौज घेऊन। सोनारा (गाव) पुढं मुकुंदरा खिंड गाठून। नऊ जुलै अठराशें चारला बसला अडवून। त्याला वाटलं आता होळकर। पाठोपाठ नाहीं येणार खिंडीची जागा अवघड फार पाहून।। जी।। पर लगेच दुसऱ्या दिवसाला (१० जुलै इ. स. १८०४)। होळकर आला। अचानक हल्ला। केला त्यानं झाले टोपीवाले गार। यशवंतानं लिहिलं मान्सनला। खाली ठेवा शस्त्रं या वेळा। अन् यावं शरण आम्हांला। नाहीतर ठिकऱ्या उडवील माझी तलवार।। जी।। मान्सननं जबाब नाहीं दिला। लाज वाटली जबाब द्यायला। थोडी फौज ठेवली खिंडीला। अन् तिथनं चालला कोट्याला। कोट्याच्या राजाला मान्सन बोलला। अन्नपाणी नाही फौजेला। दोन दिवसांचा उपास झाला। तुम्ही आमचे दोस्त झाला। म्हणून द्यावं खायला प्यायला। अन् जरा आसरा राहण्याला। होळकर लागला आमच्या पाठीला तंवा कोट्याचा राजा बोलला। सांगायला। अन्नपाणी मिळणार नाही तुला। होळकर आमचा जातभाई झाला। अन् जर आसरा देईन तुला। तर यशवंतराव मिळवील मला धुळीला। तंवा विनंती साहेब तुम्हाला। तुम्ही पुढचा रस्ता धरा।। चाल।। मान्सन झाला बेजार। पाठोपाठ आला होळकर।। ध्यानी मनी स्वप्नीं होळकर। झाला मान्सनसाहेब गार।। तिथनं चालला गनियास गावाला। तिथं चंबळेनं अडवलं त्याला। तंवा मान्सनला वाटलं त्या वेळा। आता इथंच करावं युद्धाला। म्हणून त्यानं चंबळेच्या काठाला। लढाईचा बंदोबस्त केला। तिथं काय प्रकार झाला। तो आता दादांनो। सांगीन सातव्या चौकाला।। ६।।

## चौक ७ वा

यशवंत पाठोपाठ आला पाठलागाला। गनियास गावीं मान्सन होता बसलेला।। भडिमार तोफांचा मारा त्यानं सुरू केला। घोडेस्वार लागले कचरायला। लोक लागले पटपटा मरायला कैक त्या वेळा।। जी।। इंद्रानं प्रकार असा पाहिला। तंवा यशवंताला मदत करायला। आकाशातनं तोफा त्यानं रोखल्या जागोजागेला।। चाल।। आभाळातनं तोफा रोखून। गोळे झाडले धडाडा इंद्रानं।। जी।। विजेचे तुकडे करून। तलवारी केल्या इंद्रानं।। जी।। दारूगोळा भिजवून दिला!। तवां मान्सन अर्धामुर्धा झाला। अन् लागला मागं पळायला। तो चंबळेनं आडवलं त्याला। चंबळा बोलती मान्सनला। नाहीं देणार रस्ता मी रे तुला।

मी यशवंताच्या बाजूला। यशवंत बाळ माझा झाला। तुम्ही आलायत त्याला मारायला। त्यानं काय तुमचा अपराध केला?। सात हजार मैलावरनं आला। इथं माझीं मुलं बाळं मारायला। जा, सांगा थेम्सबाईला। की चंबळेनं रस्ता नाही दिला। पण जाणार कसे तुम्ही बोला?। एक रस्ता दाखवते तुम्हाला। यशवंत चौफेर लागलाय फिरायला। आता माझ्याबरोबर तुम्ही चला। समुद्रापर्यंत नेतें तुम्हाला। तिथनं जंगलात वाचलात तर जा परत तुमच्या देशाला। अन् सांगा थेम्सबाईला की चंबळेनं रस्ता नाही दिला। तंव मान्सन बोलला चंबळेला। चंबळे! पुरे कर वटवट या वेळा। हा मान्सन भिणार नाही तुला। पायांखाली तुडवून जाइन तुला। असं म्हणून बोलला फौजेला। चला तुडवा पायाखाली हिला। अन् दुसऱ्या तीराला चला। असं म्हणून लागला चंबळा ओलांडायला। तो चंबळेला महापूर आला। अन् त्यांत मान्सन लागला गटांगळ्या खायला। टोपीवाले लागले बुडायला। नाकातोडातनं पाणी शिरलं त्या वेळा। अन् चालले नदीबरोबर समुद्राला। किती तोफा गेल्या तळाला। किती घोडा वाहून गेला। दारूगोळा पाण्यातनं चालला। कसाबसा मान्सन गेला दुसऱ्या तीराला। इतक्यांत यशवंत आला पाठलागाला। चंबळेनं रस्ता दिला त्याला। इकडं मान्सन पुन्हा लागला धावायला। पण रस्त्यानं चिखल फार झाला। तोफा रुतल्या जागोजागेला। तोफा टाकून मान्सन तसाच चालला। पाठीमागं होळकर लागला। मान्सन टोंकरामपुऱ्याला गेला। पुढं बनास नदीनं आडवलं त्याला। तिथं यशवंतानं केला जोराचा हल्ला। अन् मान्सनचा धुव्वा उडविला। तिथनं मान्सन हिंडौनला गेला। तिथनं गेला बियाला खिंडीला (२८ ऑगस्ट इ. स. १८०४) तिथनं आगऱ्याला जाऊन पोचला। आयुष्याची दोरी भली म्हणून मान्सनसाहेब वांचला।। जी।। याच्या पुढचं सारं सांगीन आठव्या चौकाला ।। ७ ।।

## चौक ८ वा

मान्सनला दूर पिटाळून। मोठ्या वेगानं। चाल करून। यशवंतराव मथुरेला गेला। घोडेस्वार बरोबर नेला। पायदळ तोफखाना भरतपूरला। मथुरेचा ताबा घेऊन। वायुवेगानं। टाच मारून। गेला दिल्लीला।। आगऱ्याला प्रकार काय झाला। मान्सनचा फजितवाडा झाला। तंवा लॉर्ड लेक चवताळुन गेला। भरतपुरचा राजा सामील होळकराला। होळकरी पायदळ आणि तोफखाना होता भरतपुरला। म्हणून साहेब चालला भरतपुरचा किल्ला घेण्याला। किल्ल्याबाहेर तळ पडला। तिथनं तोफा डागल्या किल्ल्याच्या बुरुजाला। आतनं जाट आणि मराठ्यांनी तोफांचा मारा फार केला।। किल्ल्याचा खंदक फार मोठा झाला। नव्वद हात होता रुंदीला। अन् चाळीस हात खोल तो झाला। पाण्यानं होता खंदक भरलेला। इंग्रजांनी निकराचा हल्ला केला। तंवा एक खिंडार पडलं कोटाला। इंग्रज लागले खिंडारा चढायला। पण जितके वर आले तितक्या सगळ्यांला। मराठ्यांनी कापून काढलं त्या

वेळा। तीन वेळा कोट भंगला। पण तीन्ही वेळा भरून काढला। भरतपुरचा किल्ला अभंग राहिला ।। पुढं भेदनीतीचा उपाय केला। भरतपुरचा राजा फुटला। अन् त्यानं आंग्लाशी तह केला। पण यशवंत गेला अमृतसरला। तिथं भेटला रणजितसिंगाला (१०-१२-१८०५)। यशवंत बोलला काय त्याला। तुम्ही जर सामील व्हाला आम्हांला। तर ताम्राची चटणी करुं या वेळां। पण रणजितसिंग बोलला त्याला। यशवंतरा ! तुम्ही म्हणतां ते खरं-पण अजून वख्त योग्य नाहीं त्याला। ताम्राशीं सध्यां करा सल्ला। पुढं पाहू त्या विचाराला। असं म्हणून त्यानं पाठवला वकील-भागसिंग-इंग्रजी तळाला।। यशवंत जड झाला होता सर्वाला। म्हणून कंपनीनं तह केला व्यासघाटडाला (६-१-१८०६)। त्यांत राज्य मिळालं यशवंताला। आनंदीआनंद झाला। मग यशवंतराव आला माघारा। पण शांति मिळेना मनाला। ताम्राला काढून कसा द्यावा। तो ध्यास लागला जीवाला। तोफांचा कारखाना सुरु केला। दोनशे तोफा ओतवल्या। आणि दोनशे तयार करण्याचा विचार केला। अन् त्यांत यशवंत वेडा झाला।। चाल।। मातृभूमीच्या स्वातंत्र्याचं वेड लागलं वीराला। अन्नपाणीही विसरुन गेला। तोफा एक दिसती त्याला।। वेडाचा अतिरेक जाहला केला मृत्युचा मग हल्ला। भानुपुरी यशवंत भानु हा हाय! अस्ताला हो गेला!!।। लंका घोडीचं प्रेम अलौकिक सोडीना यशवंताला। खाणं पिणं तिनं सारं सोडलं अश्रु लोटले नयनाला। यशवंताचा जीव चालला सोडुनिया या लोकाला। लंका घोडीचा जीव चालला - गेली घोडी परलोकीला।। भानुपुरी जर जाल तुम्हीं तर दृश्य दिसेल त्या जागेला। यशवंताच्या समाधिपायी दिसेल लंका तुम्हाला।। पांडुरंगाची घडण साधी लावील चटका जीवाला। यशवंतराव की जय जय बोला यशवंतराव की जय बोला।। जी।। ८।।

रचना : ता. १-१०-१९४३

(सौजन्य : श्री. संजय सोनवणी, पुणे)

•

# रणकीर्ती यशवंताची

## दु. आ. तिवारी

इ. स. १८०४ साली यशवंतराव होळकरांनी इंग्रजांबरोबर ज्या लढाया मारल्या त्यात त्यांचे शौर्य, धैर्य व कर्तृत्वशक्ती ह्यांनी त्यांची रणकीर्ती अजरामर झाली आहे. प्रथम इंग्रज सेनापती कर्नल मान्सन यास त्यांनी आपल्या हद्दीत बिनधोक घुसू दिले. हा इंदूरचा सिंह जाळीत दबा धरून बसला होता आणि शत्रूच्या हालचालीवर सारखी नजर ठेवीत होता. कर्नल मान्सन चांगलाच आत घुसला आहे असे पाहून त्यांनी त्याच्यावर एकदम झेप घेतली. या झेपेने कर्नल मान्सन घाबरून जावून पळू लागला. मान्सन पुढे आणि यशवंतराव मागे अशी ती हुतुतूची लढाई सारखी पावणे दोन महिने चालली होती. कर्नल मान्सन हा जो एकदा पळू लागला तो होळकरांशी तोंडाला तोंड देऊन लढण्याकरिता फारच थोडा उभा राहिला. पाठीवर होळकर आला की मान्सनसाहेब पुढे निघालाच.

फोडिली मराठी जूट - इंग्रजी राजनीतीनें
एकेक बरूज ढासळला - या देशातील फितुरीनें
देखिले भयानक दृश्य - इंदूरच्या यशवंतानें
आठवून मल्हारीला
प्रतिपक्षाच्या झुंजीला
एकटाच सादर झाला
किती गावी ही तेव्हांची - रणकीर्ती यशवंताची

२.

कर्नल मान्सन हा योद्धा, झुंजारांतील झुंजार
घुसला मालव देशांत, उठले तोफांचे बार
विजयेच्छु इंग्रज सेना जाहली चमेली पार
कोट्यावर खजिना पडला
हिंगलजगड तो गडबडला
धुंदींत शत्रु संचरला
प्रगटे मालव भूपाची-रणकीर्ती यशवंताची

३.

पंचानन घेई झेप, कंदारमधोनी जैसा
वीजेचा उसळे गोल - अंबरामधोनी जैसा

उसळला रिसालेदार, इंदुर नगरीचा तैसा
कर्नलचा पदवीवाला
घाबरला टोपीवाला
सेने आधींच पळाला
चढली डंक्यावर साची – रणकीर्ती यशवंताची

४.

लेफ्टनंट ल्युकन राहे, शूराला अडवायला
वृक्षाने अवरोधावें, सांगा केवी पवनाला
पहिल्या हल्ल्यातचि धरिलें, त्या जखमी सेनानीला
तलवारीच्या घाटाला
एकही शिपाई न उरला
भैरवी रणोत्सव घडला
जननी झाली स्फूर्तीची – रणकीर्ती यशवंताची

५.

त्वेषाने मारूनि दौड, गांठिलें पुन्हा मान्सनला
मोकंदरच्या खिंडींत, रोखिला उरावर भाला
संदेश दिला शूरानें, निःशस्त्र शरण येण्याला
दुर्दैवाच्या अतिथीला
संदेश न जेव्हां रूचला
घाव तों निशाणीं चढला
रसरसली वीरश्रीची – रणकीर्ती यशवंताची

६.

''घे घे'' या अवसानानें, लागला शिकारी मागें
अनिवार जिवाचा मोह, सावज धावे आवेगें
साह्याला कोणी न येई, प्रीतीचे तुटले धागे
श्रावण मासाचे मेघ
त्यांनाही चढला वेग
फूं फूं करी चमला ओघ
श्रवणीं तिचिया पडताची – रणकीर्ती यशवंताची

७.

पलटणी अडकल्या तीरीं, चमला दुथडी भरलेली

गाळात अडकल्या तोफा, दारूही, ती भिजलेली!
परि होळकराची दौड, पाठीवरती भिडलेली
        सूं सूं सुटताती गोळ्या
        टोळ्यावर पडती टोळ्या
        उठल्या जखमी आरोळ्या
विस्मृतीगत ना व्हायाची - रणकीर्ती यशवंताची

८.

सरितेंत उड्या टाकोनि, किती मेले गणती नाहीं
छाप्यांत कटोनि पडले, त्यांचीही गणती नाही
आसरा मिळेना कोठें, अष्टही दिशांना द्वाहीं
        जयपुर भरतपुरवाले
        शिंदे ग्वालेरीवाले
        इंग्रजांस सोडुनि गेले
फुरफुरली अश्वावरचीं - रणकीर्ती यशवंताची

९.

जो चढला होता कैफ, असईच्या संग्रामाचा
जो गर्व वाढला होता, आरगांवच्या युद्धाचा
जिरला तो जिथल्या तेथें, हा विक्रम होळकरांचा
        देशास लागले डाग
        ते धुतले जागोजाग
        शमली ना तरीही आग
स्मृति देते संताजीची - रणकीर्ती यशवंताची

१०

जेजुरीचा मल्हारी संचारिला होता देहीं!
तैसा पूर्वज मल्हारी संचारिला होता देहीं!
एक बहादुर लढला, कोणीहि न झाला स्नेहीं!
        अश्वांस विसावा नाहीं
        देहास विसावा नाहीं
        हल्ल्याची प्रतिदिनिं घाई
स्फुरवी मति शाहीराची - रणकीर्ती यशवंताची

•

# स्वातंत्र्यवीर यशवंतराव होळकरांचा पाळणा

**रामभाऊ लांडे**

पहिल्या दिवशी आनंद झाला
तुकोजी पोटी हिरा जन्मला
वाफगावात झाला बोलबाला
प्रजेच्या मनी हर्ष दाटला जो बाळा जोजो रे जो।।

दुसऱ्या दिवशी सर्वांना सांगा
बाळा पाहण्या लाविल्या रांगा
न्हाऊ घालती यमुना गंगा
फेडिल बाळ हा मातीच्या पांगा जो बाळा जोजो रे जो।।

तिसऱ्या दिवशी होळकर कारभारी
रेशीम कपडा घेऊन दरबारी
बाळंतविडा आला महेश्वरी
जणु अवतरे शौर्य भूवरी जो बाळा जोजो रे जो।।

चवथ्या दिवशी चौघडा वाजे
होतील राज्याचे यशवंत राजे
तयांची कीर्ती दिगंती गाजे
होळकरांचे नाम विराजे जो बाळा जोजो रे जो।।

पाचव्या दिवशी पाचवी केली
देवी अहिल्या पाहण्या आली
देव खंडोबा येळकोट बोलली
तिने मायेची छाया धरिली जो बाळा जोजो रे जो।।

सहाव्या दिवशी केला पोशाख
कंठी झळकती मोती माणिक
हाती सोन्याचे कडे आणिक
भेटाया आले राजे कितीक जो बाळा जोजो रे जो।।

सातव्या दिवशी सातवी केली
होळकर वंशाला माता बोलली
पुण्याई माझी सार्थकी झाली
आता शत्रूची शंभरी भरली जो बाळा जोजो रे जो।।

आठव्या दिवशी बाळ यशवंत
दाही दिशांनी एक आसमंत
पराक्रमी हा पुत्र श्रीमंत
पळभराची नसे उसंत जो बाळा जोजो रे जो।।

नवव्या दिवशी नवस बोलिला
रेशीम दोरीने पाळणा ओढीला
मल्हारीरायाच्या ठेवी चरणाला
पिवळा भंडारा उधळून दिला जो बाळा जोजो रे जो।।

दहाव्या दिवशी हाती तलवार
आशिश देती राजे पवार
सवे फत्तेसिंग माने सरदार
स्वराज्याचा आता नित्य एल्गार जो बाळा जोजो रे जो।।

अकराव्या दिवशी राजाचा साज
महाडिक बाबा, विसाजी शामराज
राज्याभिषेक होई, महेश्वर राज
बाळाच्या शिरी चढे शिरताज जो बाळा जोजो रे जो।।

बाराव्या दिवशी घेतली आण
बेलभंडारा हाती राखील मान
फडकत राहील बांडे निशाण
होळकर कुळाचे शिवभूषण जो बाळा जोजो रे जो।।

तेराव्या दिवशी स्वारी निघाली
तलवारीने कामे फत्तेही केली
राजपुताना नि दिल्ली जिंकली
अखंड शौर्याची शर्थच झाली जो बाळा जोजो रे जो।।

चौदाव्या दिवशी बसे दरारा
नवाब, पठाण इंग्रज घाबरा
चारी मुलखाला यशवंत नारा
जिद्द यशाची, थरार सारा जो बाळा जोजो रे जो।।

पंधराव्या दिवशी लढाई झाली
मुकुंदरा घाटी, धूम उडाली
दुधाखेडी, हिंगलाज माता पावली
होळकरशाहीची ध्वजा रोविली जो बाळा जोजो रे जो।।

सोळाव्या दिवशी भानपूर नगरीला
यशवंतरावांचा ध्वनी गर्जला
आधी या देशातून इंग्रज हाकला
पारतंत्र्याचा कहर झाला जो बाळा जोजो रे जो ।।

सतराव्या दिवशी धाडिले पत्र
मराठा, राजपूत, नबाब मित्र
वीर घराण्याचे लढाऊ गोत्र
यशवंताचे धवल चारित्र्य जो बाळा जोजो रे जो ।।

अठराव्या दिवशी रणजितसिंग भेटीला
पंजाब लाहोरी पठाण संगतीला
सांगितले इंग्रज नाही हो आपला
एक होऊनि लढू या चला जो बाळा जोजो रे जो ।।

एकोणीसाच्या दिनी रण पेटले
जाट नि होळकर मिळुनि लढले
गोरे इंग्रज धरणीत गाडले
भरतपुराचे संकट मिटले जो बाळा जोजो रे जो ।।

विसाव्या दिवशी जाती जेजुरीला
बारगळ, भांड, वाघ, बुळे सोबतीला
दुसरे बाजीराव पडले धास्तीला
पुणे सोडुनि पळती आसऱ्याला जो बाळा जोजो रे जो ।।

एकविसाव्या दिवशी पाळणा गातो
लांडे रामभाऊ काळजातुन लिहितो
शब्दांतुनि पुन्हा वीर जन्मतो
स्वातंत्र्यवीराचे चरित सांगतो जो बाळा जोजो रे जो ।।

•

# यशवंत गाथा

**घनश्याम होळकर**

खुपसत होते शूल फिरंगी भारतभूच्या छातीमध्ये
वीर जन्मला एक तेधवा वाफगावच्या मातीमध्ये
होळकर कुळगौरव, अखंड राष्ट्र हा ध्यासच होता
इंग्रजांशी युद्ध छेडले, स्वातंत्र्याचा त्राता होता
गोऱ्यांसंगे करीत होते भिऊनी दोस्ती कुणी
होळकरांचा राजा लढला, एकाकी हा रणी
वाऱ्याहूनही वेग दौडीचा, अमर तयाचा भाला
पराक्रमाची वार्ता ऐकून वेलस्ली थरकापला
शिवरायांचा थोर वारसा, होता गनिमी कावा
राज्यारोहण विधी घडविला, जाणुनी परकी कावा
पेशवाईची गादी वाचवी, परि तया बदनामी
परंपरेला नाही उमगली, थोर तयाची उर्मी
स्वामी, योद्धा, प्रशासक अन् धर्माचा वाली
तख्तच होते घोड्यावरती निळ्या आभाळाखाली
वीरांचा हा वीर आणि ही शौर्याची गाथा
इतिहासाच्या पानोपानी होई उन्नत माथा
भानपुऱ्याच्या भूमीमध्ये पाषाणातून बोल उमटती
यशवंताच्या स्मृती जागवीत होते पुलकित माती
दिशादिशांवर अजुनि दाटती पराक्रमाच्या खुणा
इतिहासातून स्फूर्ती मिळते, इतिहास घडविण्या पुन्हा

हिन्दीतून स्वैर मराठी रूपांतर :
निरंजन देव

•

## संपादक परिचय

### डॉ. देवीदास पोटे

- जन्म : डुबेरे, ता. सिन्नर, जि. नाशिक
  ७ मे १९५०
- निवृत्त सहाय्यक विक्रीकर आयुक्त
- संतसाहित्य अभ्यासक, अहिल्याचरित्र आणि इतिहास अभ्यासक, लेखक, कवी, संपादक
- सदस्य, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
- ''युगबोध'' आणि ''मुक्त आनंदघन'' या संत साहित्यविषयक दिवाळी विशेषांकांचे संपादन : १९९३ ते आजपर्यंत. या अंकांना विविध मान्यवर संस्थांचे पन्नासहून अधिक पुरस्कार प्राप्त.
- अहिल्याबाई चरित्रविषयक 'महेश्वरच्या घाटावरून' आणि 'युगप्रवर्तक अहिल्याबाई' या ग्रंथांचे लेखन. तसेच होळकर रियासतीचा सांस्कृतिक इतिहास, अ.. अहिल्याबाईंचा, अहिल्यायन, शिवयोगिनी, ती एक अहिल्या होती या ग्रंथांचे संपादन. यापैकी दोन ग्रंथांना महाराष्ट्र शासनाचे उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार.
- गंधयात्रा, प्रवासाचे क्षण, शब्द, मन, प्रेम, टिंब टिंब, मांदियाळी, दिंडी चालली आदि कवितासंग्रह प्रकाशित.
- संत साहित्यविषयक भारतीय संत कवयित्री, कैवल्याचे लेणे, चैतन्याचा ज्ञानदीप, कबीर चिंतन, श्रीकृष्ण : एक अभ्यास, महान भारतीय संत, अवघाचि विठ्ठल या ग्रंथांचे संपादन.
- वारी, अद्वितीय युगप्रवर्तक : संत तुकाराम, संतशब्दांचा परिमळु, कबीरायन, अवघाचि राम, अहिल्यानीती हे आगामी ग्रंथ प्रकाशनाधीन.
- अनेक सामाजिक / सांस्कृतिक संस्थांमध्ये विविध पदांची जबाबदारी. साहित्यिक / सांस्कृतिक / सामाजिक कामाबद्दल महाराष्ट्र आणि बृहन्महाराष्ट्रातील विविध मान्यवर संस्थांचे वीसहून अधिक पुरस्कार.
- भ्रमणध्वनी : ९८२०३ ३२१२८, Email : dspote7@gmail.com

भारतीय इतिहासात ब्रिटीश आमदनीत जी विविध संस्थाने होती, त्यात कोल्हापूर, बडोदे आणि इंदूर ही संस्थाने वैशिष्ट्यपूर्ण होती. लोककल्याणकारी राज्यकारभार आणि प्रगतीशील विचारधारा हे त्यांचे मुख्य सूत्र होते.

इंदूरच्या होळकरशाहीचे संस्थापक सुभेदार मल्हारराव होळकर. हिंदुस्थानभर मराठा सत्तेचा अंमल प्रस्थापित करण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. मल्हारराव हे मराठेशाहीचा आधारस्तंभ होते. अहिल्याबाईंनी तीस वर्षे शांततापूर्ण राज्यकारभार करून होळकरशाहीचा पाया आणखी मजबूत केला. आदर्श राज्यकारभार आणि सात्त्विक, समर्पित जीवन हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष होते. यशवंतराव होळकर यांनी अडचणीच्या प्रसंगांतून होळकरशाहीचे राज्य वाचविले. ते धडाडीचे योद्धे आणि स्वातंत्र्यवीर होते.

होळकरशाहीतील ही तीन प्रमुख राज्यकर्ती व्यक्तिमत्त्वे. त्यांच्या चरित्र आणि कर्तृत्वाचा वेध घेणाऱ्या काव्याचा हा संकलनात्मक ग्रंथ आहे. कविता, गीत, पोवाडा, पाळणा, दीर्घकाव्य, पद्यमय चरित्र अशा विविध काव्यप्रकारांतून या कर्तृत्वशाली व्यक्तिमत्त्वांचे काव्यरूपातून परिशीलन करणारा हा ग्रंथ इतिहासप्रेमी आणि वाङ्मयप्रेमी रसिकांना निश्चितपणे उपयुक्त ठरेल, असे वाटते.